રાજકીય સંસ્થા

હર્બર્ટ સ્પેન્સર

ના.દ. પાઠકે

समाजशास्त्राचीं तत्त्वें—भाग ५ वा

राजकीय संस्था

हा ग्रंथ

हर्बर्ट स्पेन्सर

ह्यांच्या

" The Political Institution " नामक ग्रंथाधारें

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए.

हेडमास्तर ठाणें हायस्कूल

ह्यांनीं लिहिला.

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर

नारायण पेठ, घर नंबर ४६८ पुणें सिटी.

शकवर्ष १८२९—३० सन १९०७.

पुणें पेठ बुधवार एथें

गंगाधर गोविंद गोंधळेकर ह्यांनीं आपल्या

" **भारतभूषण** " छापखान्यांत छापिला.

पुढील ग्रंथ

ज्ञानमकरंद

आमच्या मालेंतील नंबर ५ शास्त्ररहस्य ह्याच्या धर्तीवर खालीं लिहिलेल्या विद्वानांचे लेख त्यांत येतील.

१. प्रिन्सिपाल रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे,
एम्. ए., बीएस्. सी. (सीनियर रँगलर)
२. प्रोफेसर हरी गोविंद लिमये, एम्. ए.
३. प्रोफेसर वैजनाथ काशीनाथ राजवाडे, एम्. ए.
४. प्रोफेसर गोविंद चिमणाजी भाटे, एम्. ए.
५. प्रोफेसर वासुदेव बळवंत पटवर्धन, बी. ए.
६. लेफ्टनेंट कर्नल डॉक्टर कान्होबा रणछोडदास कीर्तिकर
७. प्रोफेसर केशव रामचंद्र कानिटकर, एम्.ए., बीएस्.सी.

विषयाची निवड ज्यांचे त्यांचे पसंतीवर ठेविली आहे. ते विषय लवकरच प्रसिद्ध करूं. प्रत्येक लेखास "शास्त्ररहस्य" सांचाचीं ५०–६० पृष्टें जागा योजिली असून एकंदरीनें सुमारें ४००–४२५ पृष्ठांचा ग्रंथ होईल; व डिसेंबर १९०७ अखेर प्रसिद्ध होईल.

नारायण पेठ, घरनंबर ४६८ } बळवंत गणेश दाभोळकर.
पुणें सिटी. } प्रकाशक.

आतांपर्यंत प्रकाशित झालेले
माझे उपयुक्त ग्रंथ.

१. **नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या " The Data of Ethics " ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० **चिंतामण गंगाधर** भानु, बी. ए. ह्यांकडून लिहविला. –प्रती शिल्लक नाहींत.

२. **न्यायतत्त्वें**–सदरप्रमाणें "Justice" ह्या ग्रंथाच्या आधारानें. किंमत २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

३. **ज्योतिर्विलास** अथवा **रात्रीची दोन घटका मौज**— रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला. —प्रती शिल्लक नाहींत.

४. **संसारसुख**—दी राइट ऑनरेबल सर **जॉन लबक**, एम्. पी. ह्यांच्या "The Pleasures of Life" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० सा० **कृष्णाजी परशुराम गाडगीळ** ह्यांकडून लिहविला.—(आवृत्ति तिसरी)–किंमत १॥। रु०; टपालहंशील २ आणे.

५. **शास्त्ररहस्य**—रा० रा० **ना० ल० फडके**, बी. ए.; रा० रा० **शं० बा०** दीक्षित; प्रि० **म० शि० गोळे**, एम्. ए.; प्रो० **वि० वा०** भाटे, बी. ए.; प्रो० **धों० के० कर्वे**, बी. ए.; रा० सा० **कृ० प० गाडगीळ**; प्रो० **चिं० गं०** भानू, बी. ए.; रा० रा० **ह० ना०** आपटे व रा० रा० **भि० जोशी** ह्या नऊ विद्वानांकडून निरनिराळ्या विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला.-प्रती शिल्लक नाहींत.

६. **आत्मनीतीचीं तत्त्वें** आणि **परोपकार**–हर्बर्ट स्पेन्सरच्या " The Ethics of Individual Life " व " Beneficence " ह्या ग्रंथांच्या आधारानें यथाक्रम रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहवून एकत्र केला.–प्रती शिल्लक ना०.

७. **नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धान्त**—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या " The Inductions of Ethics " ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो॰ **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहविला, —किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

८. **धर्ममीमांसा–नैसर्गिक धर्म** आणि **भौतिक धर्म**--**भट्ट मोक्षमूलर** ह्यांच्या " Natural Religion " व " Physical Religion " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा॰ रा॰ **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

९. **राजनीतीचीं मूलतत्त्वें** (भाग १)—**हेनरी सिजविक्** ह्यांच्या " The Elements of Politics " ह्या ग्रंथाच्या आधारानें रा॰ रा॰ **वासुदेव बळवंत पटवर्धन**, बी. ए. व प्रो॰ **धोंडो केशव कर्वे**, बी ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१०. **अज्ञेयमीमांसा** (**स्पेन्सरचरित्रासह**)—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Unknowable " भागाच्या आधारानें रा॰ रा॰ **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.- प्रती शिल्लक ना॰.

११. **धर्ममीमांसा-पितृमूलक धर्म** आणि **आध्यात्मिक धर्म**—**भट्ट मोक्षमूलर** ह्यांच्या "Anthropological Religion" व "Psychological Religion" ह्या ग्रंथांच्या आधारानें रा॰ रा॰ **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१२. **जीवनशास्त्राचीं सामान्य तत्त्वें** (पुस्तक १)—रा॰ रा॰ **विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी. ए. यांजकडून स्वतंत्रग्रंथरूपानें लिहविला. किंमत १॥। रुपये; ट. हं. ३ आणे.

१३. **ज्ञेयमीमांसा** (पूर्वार्ध)—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या "First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Knowable" भागाच्या पूर्वार्धाच्या आधारानें रा॰रा॰**नारायण लक्ष्मण फड-**

के, बी.ए. ह्यांजकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; ट.हं. ३आ.

१४. **भारतवर्षीय भूवर्णन** (प्राचीन)–रा०रा०**शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांनीं लिहिला.—प्रती शिल्लक नाहींत.

१५. **ज्ञेयमीमांसा** (उत्तरार्ध)–हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या "First Principles" ग्रंथाच्या "The Knowable" भागाच्या आधारानें रा०रा०**नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.–किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१६. **जीवितकर्तव्य** अथवा **संसारकर्तव्य**–दी राइट ऑनरेबल **लॉर्ड एव्हबरी** ह्यांच्या "The Use of Life" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० रा० दत्तात्रेय **नारायण नावर** बी. ए.,एल्एल्. बी. ह्यांजकडून लिहविला. प्रती शिल्लक नाहींत.

१७. **राणीच्या राज्याचा इतिहास**–जस्टिन् मॅकार्थीकृत "A History of Our Own Times" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला.—किंमत २ रुपये; टपालहंशील २ आणे.

१८. **आत्मविद्या**—रा०रा०हरि **गणेश गोडबोले**,बी. ए. ह्यांनीं आर्यतत्त्वज्ञानाच्या प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांच्या आधारें स्वतंत्र रीतीनें लिहिला.–किंमत १॥। रुपये; टपालहंशील २ आणे.

१९. **समाजशास्त्राचे मूलसिद्धान्त**—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या "The Principles of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला.–प्रती शिल्लक नाहींत.

२०. **समाजशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त व गृहसंस्था** –हर्बर्ट **स्पेन्सर**च्या "Principles of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला.— प्रती शिल्लक नाहींत.

२१. **जननमरण-मीमांसा**–रा०रा०**विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी. ए. ह्यांजकडून स्वतंत्रग्रंथरूपानें लिहविला.—किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

२२. **राजकीय संस्था**—हर्बर्ट स्पेन्सर यांच्या "The Political Institution" नामक ग्रंथाधारें रा० रा० नारायण लक्ष्मण फडके, बी. ए. यांनीं लिहिला. किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

कायम वर्गणीदार आणि त्यासंबंधानें माहिती.

प्रतिवर्षी मी दोन नवीन ग्रंथ प्रसिद्ध करीत असतों: एक साधारणपणें मे-जून महिन्यांत व दुसरा नवंबर-डिसेंबरांत. हे ग्रंथ आधुनिक शास्त्रांवर, विद्वानांस श्रमाचा मोबदला देऊन, भाषांतररूपानें अगर स्वतंत्रग्रंथरूपानें मी मुद्दाम लिहवितों. आतांपर्यंत निरनिराळ्या शास्त्रांवर विद्वानांकडून २२ मराठी ग्रंथ मीं लिहविले व प्रसिद्ध केले. शास्त्रीय ग्रंथ बहुधा कोणासही रुक्ष व नीरस वाटणारे असतां इतके ग्रंथ मीं प्रसिद्ध केले कसे, हें खरोखर आश्चर्य

वाटण्यासारखें आहे. परंतु सुशिक्षित व समंजस माणसांच्या मदतीचें, आणि माझ्या अल्पसंतोषाचें, सतत उद्योगाचें व दीर्घपरिश्रमाचें हें फल आहे. मजकडून प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाच्या अमुक प्रती घेत जाऊं अशाबद्दल आजरोजीं सुमारें ५०० सभ्य गृहस्थांचें मजजवळ लेखी वचन आहे. आणि जोंपर्यंत त्यांत कमतरता येणार नाहीं तोंपर्यंत आणखी कांहीं ग्रंथ प्रसिद्ध लिहवीन व प्रसिद्ध करीन अशी माझी उमेद आहे. कायम वर्गणीदार असलेल्यांखेरीज ज्या कोणांस ह्या उद्योगास मदत करणें योग्य वाटेल व सोय असेल त्यांस पुढीलप्रमाणें नियमांनीं कायम वर्गणीदार होतां येईल.

(१) प्रत्येक ग्रंथाच्या अमुक प्रती घेण्याबद्दलचें लेखी वचन असावें.

(२) आवडीप्रमाणें अमुक विषयाचा ग्रंथ हवा, अगर अमुक विषयाचा ग्रंथ नको, असें म्हणतां यावयाचें नाहीं. प्रसिद्ध होत जाईल त्या प्रत्येक ग्रंथाच्या वचन दिल्याप्रमाणें तितक्या प्रती स्वीकारिल्या पाहिजेत.

प्रत्येक ग्रंथाची किंमत १॥ किंवा २ रुपये असते. म्हणजे वर्षाचे कांठीं ३ किंवा ४ रुपये किंमतीचे ग्रंथ प्रसिद्ध होतात. आणि पुढें प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाची तपशीलवार माहिती अगोदरच्या ग्रंथांत दिली जाते. तसेंच, परगांवच्यांस व्ह्याल्युपेएबलनें व पुण्यांतल्यांस प्रती घेऊन येणाराजवळ किंमत द्यावी लागते.

कायम वर्गणीदारांस फायदा येणेंप्रमाणें आहेः—

(१) पुण्यांतील कायम वर्गणीदारांस आगाऊ वर्गणीदार होणारांकरितां ठेविलेल्या किंमतींत ४ आणे कमी पडतील.

(२) परगांवच्यांस टपालहंशील व व्ह्याल्युपेएबल मनीआर्डरचा खर्च पडावयाचा नाहीं.

(३) बाहेरगांवीं ५ प्रती एकत्र घेणारांस टपाल व व्ही. पी.चा खर्च न पडतां ५ प्रतींऐवजीं ६ प्रती मिळतील.

नारायण पेठ, घर नंबर ४६८ } बळवंत गणेश दाभोळकर
पुणें—सिटी. } प्रकाशक.

प्रस्तावना

" समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें " ह्या ग्रंथाचा प्रस्तुतचा भाग पांचवा असून ह्यांत राजकीय संस्थांची उत्पत्ति व वाढ ह्यांचें विवेचन पद्धतशीर रीतीनें केलेलें आहे. तें विवेचन करावयास लागण्याच्या पूर्वीं आपण आपल्या मनाची समता ठेवण्याकरितां कसें व किती जपलें पाहिजे ह्याबद्दलचा खुलासा पहिल्या प्रकरणांत केलेला आहे. त्यासंबंधानें पहिली सावधगिरी ठेवावयाची ती ही कीं, निरनिराळ्या रानटी व अर्धवट सुधारलेल्या लोकांच्या निरनिराळ्या संस्थांचा विचार करीत असतां आपल्या मनांत तिरस्कार, खंती, क्रोध वगैरे जे मनोविकार उत्क्षुब्ध होण्याचा संभव आहे ते अगदीं बाजूस ठेविले पाहिजेत; आणि मूळलोकांच्या देवभोळ्या समजुती शुद्ध नुकसानकारक आहेत असें मानण्याच्या ऐवजीं सामाजिक उत्क्रमणांत त्यांचें अंग कितपत आहे ह्याचा शांतपणें आणि चौकसदृष्टीनें विचार केला पाहिजे. शिवाय, प्रारंभीं समाज एकमेकांचीं नेहमीं वैरें करीत, आणि त्यामुळें अनेकप्रकारच्या विपत्ती उत्पन्न होत. असें आहे तरी, त्या विरोधांचा समाजोत्क्रमणाच्या कामीं किती उपयोग झालेला आहे हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. तद्वतच, कांहीं प्रकारच्या शासनपद्धती आपणास आवडत नाहींत एवढ्यावरून त्या, त्या त्या लोकांना त्या त्या काळीं योग्यच होत्या हें आपण विसरतां कामा नये. सारांश, सामाजिक व्यवस्थांची जर आपणास समाधानकारक अशी

उपपत्ति लावावयाची असेल तर आपलें मन बहुतेक निर्विकार केलें पाहिजे.

अशा रीतीनें प्रस्तुत विषयाचें विवेचन करतांना मनाची स्थिति कशी ठेविली पाहिजे हें पहिल्या किंवा प्रास्ताविक प्रकरणांत सविस्तर रीतीनें सांगितल्यावर पुढच्या म्हणजे दुसऱ्या प्रकरणांत राजकीय घटनेचें सामान्यस्वरूप कसें असतें ह्या प्रश्नाचा विचार केलेला आहे. तो अर्थात् उत्क्रान्तिदृष्टया केलेला आहे, आणि कोणत्याही गोष्टीचें उत्क्रमण व्हावयाचें म्हणजे तिच्या घटकांचें घनीभवन किंवा संकलन आणि विविधस्वरूपीकरण किंवा विभिन्नीकरण झालेंच पाहिजे. म्हणून राजकीय घटनेचें संकलन व विभिन्नीकरण कसें होत जातें ह्या प्रश्नाचा विचार अनुक्रमें तिसऱ्या व चवथ्या प्रकरणांत केलेला आहे.

एवंच राजकीय संघटनेच्या वाढीचा सामान्यस्वरूपीं विचार केल्यानंतर तिचीं जीं निरनिराळीं स्वरूपें सामान्यतः सर्वत्र दृग्गोचर होतात त्यांचा व तीं उत्पन्न करणाऱ्या शक्तींचा विचार पांचव्या प्रकरणांत केलेला आहे. तीं स्वरूपें एकेरे किंवा संयुक्त राजकीय मुख्य, त्यांच्या संयोगानें बनलेलीं सल्लागारमंडळें, आणि प्रतिनिधिमंडळें हीं असल्यामुळें त्यांचा यथाक्रम विचार सहाव्या ते नवव्या प्रकरणांमध्यें केला आहे.

आतां शास्ता एकेरा असो वा संयुक्त असो, त्यास राज्यकारभार चालविण्याच्या कामीं मदतनीस पाहिजेतच; म्हणून त्यांचा किंवा प्रधानमंडळांचा विचार दहाव्या प्रकरणांत करून, राष्ट्र मोठें असलें म्हणजे स्थानि-

क कारभार पाहण्याकरितां सुभेदार, म्युनिसिपालिटच्या, पंचायती, वगैरे ज्या स्थानिक संस्था असतात त्यांचें विवेचन अकराव्या प्रकरणांत केलें आहे.

आतां शास्त्याचीं किंवा शास्त्या मंडळाचीं मुख्य कामें म्हटलीं म्हणजे समाजाचें परचक्रापासून संरक्षण करणें, आणि नागरिकांचें एकमेकांपासून संरक्षण करणें हीं असल्यामुळें तीं करण्याचीं साधनें ज्या लष्करी व न्यायविषयक संस्था त्यांचा विचार सविस्तर रीतीनें पुढील दोन म्हणजे बाराव्या व तेराव्या प्रकरणांत केलेला आहे.

नागरिकांनीं एकमेकांशीं कसें वागावें, व त्यांनीं एकमेकांची आगळीक केल्यास त्यांचा न्याय कसा करावा, हें ठरविण्यास अर्थात् ठराविक लेखी किंवा तोंडी कायदे पाहिजेतच; म्हणून त्यांचें विवेचन चवदाव्या प्रकरणांत केलेलें आहे. तद्वतच, कायद्यांनीं लोकांचें जें संरक्षण करावयाचें तें त्यांचे देह व वित्त ह्यांचें करावयाचें असतें; म्हणून हरएक प्रकारची मालकी किंवा स्वामित्व ह्याच्या उत्पत्तीचा व वाढीचा विचार त्याच्या पुढील म्हणजे पंधराव्या प्रकरणांत केलेला आहे.

नागरिकांचें एकमेकांपासून व परराष्ट्रापासून संरक्षण करण्यास ज्या वर सांगितलेल्या निरनिराळ्या संस्था अस्तित्वांत येतात किंवा आणितात त्यांचें पोषण करण्यास अर्थात् द्रव्याची जरूरी लागते, व तें द्रव्य सरकार लोकांपासूनच वसूल करीत असतें; म्हणून त्या बाबींचा म्हणजे करांचा व जमाबंदीचा विचार सोळाव्या प्रकरणांत केलेला आहे.

अशा रीतीनें निरनिराळ्या राजकीय संस्थांच्या उ-

त्पत्तीच्या व वाढीच्या संबंधानें यथाक्रम व यथासांग विवेचन केल्यानंतर, समाजाचें जें प्रारंभीं दिसणारें युद्धशील स्वरूप व मागाहून त्यास हळू हळू येणारें जें उद्यमशील स्वरूप त्यांचा विचार सतरा व अठरा ह्या दोन प्रकरणांत केला आहे.

एवंच प्रस्तुत विषयाचें विवेचन सर्वांगांनीं सविस्तररीत्या अठरा प्रकरणांत केल्यानंतर एकोणिसाव्या म्हणजे शेवटच्या प्रकरणांत नेहमींच्या पद्धतीप्रमाणें एकंदर विषयाची गोळाबेरीज करून, आणि राजकीय संस्थांची वाढ उत्क्रांतिनियमासच अनुसरून आजपावेतों कशी झालेली आहे हें दाखवून, त्यांच्या भाविस्थितीचें विवेचन अखेरीस केलेलें आहे, आणि अशा रीतीनें एकंदर विषयाचा समारोप केलेला आहे.

ठाणें, ता० ३०
आगस्ट १९०७. } **नारायण लक्ष्मण फडके**

अनुक्रमणिका

समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें (भाग ५ वा)

राजकीय संस्था

प्रकरण १ लें

प्रास्ताविक

—:०:—

१. विचार व (मनो) विकार यांचें साहचर्य पूर्णपणें नाहींसें करतां येत नाहीं. प्रत्येक मनोविकाराच्या उकळीस कमी किंवा ज्यास्ती स्पष्ट असा आधारभूत कल्पनांचा सांगाडा असतो; आणि प्रत्येक कल्पनासमूह मनोविकाराच्या उकळीनें कमज्यास्त प्रमाणावर रंगलेला किंवा भरलेला असतो. तथापि ह्या दोन्ही रूपीं त्यांच्या संयोगप्रमाणांमध्यें मोठाले भेद असतात. आपले कांहीं मनोविकार असे असतात कीं, त्यांच्यामध्यें बौद्धिक निश्चितपणाची वाण असल्यामुळें ते अस्पष्ट असतात; आणि दुसरे कांहीं असे असतात कीं, त्यांना त्यांच्याशीं सहचारी असलेल्या भावनांनीं स्पष्ट असे आकार आलेले असतात. कधीं कधीं आपल्या विचारांत जो दांडगा मनोभाव भरून गेलेला असतो तेणेंकरून ते विकृतस्वरूप बनून जातात, आणि कधीं कधीं त्यांच्यामध्यें आवड किंवा नावड यांचा लेशमात्र दिसत नसतो. शिवाय हेंहि उघडच आहे कीं, आपल्या मानसिक

स्थितीचे जे हे घटक ते निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या प्रमाणांनीं निश्चित झालेले असतील. म्हणजे, कल्पना त्याच असून त्यांच्यांशीं संयुक्त झालेली जी मनोविकाराची उकळी ती कमी किंवा ज्यास्त जोराची असेल; आणि ही गोष्ट सर्वांस माहीतच आहे कीं, कोणत्याही गोष्टीबद्दल आपण जो निर्णय ठरवीत असतों तो बरोबर असणें ही गोष्ट जरी मनोविकाराच्या उकळीच्या अभावावरच अवलंबून नसली, तरी निरनिराळ्या मनोविकारांच्या उकळ्यांच्या समतोलावर, म्हणजे त्यांतील कोणतीही उकळी फाजील नसण्यावर अवलंबून असते.

मानवी जीविताच्या संबंधाच्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्या संबंधानें तर ही गोष्ट विशेषच खरी आहे. माणसांचीं व्यक्तिविषयक किंवा सामाजिक जीं कृत्यें त्यांकडे दोन तऱ्हांनीं पाहतां येतें. ते कांहीं चमत्कारसमूह असून त्यांचें विवरण आपणास करावयाचें आहे, अशा दृष्टीनें आपण त्यांचा विचार करूं शकूं, किंवा तीं कृत्यें सुखें आणि दुःखें उत्पन्न करीत असतात, अशा दृष्टीनें त्यांचा विचार करून त्यांजबद्दल आपण आपली पसंती किंवा नापसंती दाखवूं शकूं. वर्तनविषयक प्रश्नांचा बौद्धिकदृष्ट्या विचार करून तें (वर्तन) कांहीं विशिष्टशक्तींपासून उत्पन्न होतें असें आपण म्हणूं, किंवा त्याचा नैतिक दृष्ट्या विचार करून, आणि त्याचे परिणाम विशिष्ट उदाहरणांत चांगले आहेत किंवा वाईट आहेत ही गोष्ट ध्यानांत आणून, त्याबद्दल आपण आपल्या मनांत पसंतीस थारा देऊं किंवा क्रोधास थारा

देऊं. आतां, पहिल्या उदाहरणांतल्याप्रमाणें आपण माणसांच्या कृतीचा आपल्याशीं कांहीं संबंध नाहीं अशा दृष्टीनें, म्हणजे केवळ ती कृति समजवून घ्यावयाची अशा दृष्टीनें, विचार करणें; किंवा दुसऱ्या उदाहरणांतल्याप्रमाणें ते आपल्यासारखेच कांहीं प्राणी आहेत, त्यांच्या जीवितांशीं आपल्या जीवितांचा निकट संबंध आहे, आणि त्यांच्या वर्तनामुळें आपल्या ठिकाणीं प्रत्यक्ष आणि सहानुभूतिपूर्वक असे प्रेमाचे किंवा द्वेषाचे मनोभाव उत्पन्न होतात अशा दृष्टीनें, त्यांच्या कृतीचा विचार करणें; ह्या दोन गोष्टी फार निराळ्या आहेत, आणि त्यामुळें त्यांवरून ठरणारे जे आपले निर्णय तेही फार भिन्नच असले पाहिजेत.

स्पेन्सर साहेब म्हणतात, माणसांच्या मनोविकारांवरून त्यांनीं ठरविलेले निर्णय कसे विपरीत होत असतात, हें मीं " समाजशास्त्राचें अध्ययन " या मदतनीस ग्रंथांत वर्णिलें आहे. भीत्या किंवा आशा यांच्या योगानें त्यांची फसगत होऊन ते चुकीचे अंदाज कसे बनवितात; अधीरपणामुळें त्यांस दुसऱ्यांचा विनाकारण निषेध करण्याचा मोह कसा उत्पन्न होतो; आणि एके ठिकाणीं द्वेषामुळें तर अन्य ठिकाणीं सहानुभूतीमुळें, त्यांचे समज चुकीचे कसे बनतात; ह्या सर्वांचीं उदाहरणें त्या ग्रंथांत दिलेलीं आहेत. शिक्षणजन्य पूर्वग्रह आणि स्वदेशाभिमानजन्य पूर्वग्रह ह्या दोहोंच्याही योगानें माणसांच्या खात्र्या वांकड्या तिकड्या कशा बनत असतात, ह्या सत्यालाही त्या ठिकाणीं उदाहरणांचा दुजोरा दिलेला आहे. आणि तेथें असेंही दाखविलें आहे

कीं, स्ववर्गविषयक पूर्वग्रह, राजकीय पूर्वग्रह, आणि धर्मविषयक पूर्वग्रह, हे जे पूर्वग्रहांचे निरनिराळे विशिष्ट प्रकार, त्यांपैकीं प्रत्येकाच्या योगानें सार्वजानिक किंवा राजकीय गोष्टींच्या संबंधानें हें किंवा तें मत बनविण्याची माणसामध्यें एकप्रकारची पूर्वप्रवृत्तिच उत्पन्न होत असते.

म्हणून तेथें अखेरीस ठरविलेला जो सिद्धांत तोच एथें पुनः जरा जोरानें सांगणें इष्ट दिसतें. तो हा कीं, आपण समाजशास्त्रविषयक प्रश्नांचा विचार करीत असतां, आणि त्यांतल्या त्यांत प्रस्तुत ग्रंथांत ज्या प्रश्नांचा विचार कर्तव्य आहे तो करीत असतां, त्यांत येणाऱ्या गोष्टींमुळें जे मनोविकार उत्क्षुब्ध होण्याचा संभव आहे त्यांस साधेल तितकें एकीकडे ठेविलें पाहिजे, आणि त्या गोष्टींची उपपत्ति कशी लावावयाची ह्याच प्रश्नाकडे लक्ष दिलें पाहिजे. एतद्विषयक असे अनेक चमत्कारसमूह आहेत कीं त्यांचा विचार करतांना तिरस्कार किंवा खंती, किंवा क्रोध, हीं खवळण्याच्या बेतांत येतात, पण त्यांस आवरलें पाहिजे.

२. मूळमाणसाच्या देवभोळ्या समजुतींची कांहींच किंमत नाहीं अशा समजुतीवर त्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या ऐवजीं किंवा त्या शुद्ध नुकसानकारक आहेत असें मानण्याच्या ऐवजीं, सामाजिक उत्क्रमणांत त्यांचें अंग कितपत आहे ह्याचा विचार आपण केला पाहिजे; आणि जरूर पडल्यास त्यांची उपयुक्तता कबूल करण्याचीही आपली तयारी असली पाहिजे. ज्या समजुतीमुळें रानटी माणूस प्रेताबरोबर मोलवान् जिन्नस पुरितो किंवा थडग्यासन्निध अन्न नेऊन ठेवितो, तिची उत्पत्ति स्वाभा-

विकरीत्याच होत असते; तद्वतच वनस्पति व प्राणी आणि दगड व खुंट ह्यांचें समाराधन करणें ही कांहीं केवळ मूर्खपणाची गोष्ट नाहीं; आणि श्मशानविधीच्या समयीं रानटी लोक गुलामांना जे बळी देतात ते त्यांच्या अशिक्षित बुद्धीला जी एक कल्पना सयुक्तिक म्हणून भासते, तिलाच अनुसरून देतात; ह्या सर्व गोष्टी आधींच (समाजशास्त्र—भाग १ ह्यांत) आपल्या लक्षांत आलेल्या आहेत. आतां ह्या पिशाचकल्पनेचे राजकीयदृष्ट्या काय काय परिणाम झालेले आहेत ह्याचा आपणास लवकरच विचार करावा लागणार आहे; आणि तेथें राजकीय प्रगतीस तिची अनिवार्यच जरूर होती असें मानण्यास आपल्यास कारण दिसल्यास तो सिद्धान्त कबूल करण्यास आपली तयारी असली पाहिजे.

समाजांच्या परस्परवैरांमुळें अगण्य वर्षें सर्वत्र ज्या विपत्ती उत्पन्न झालेल्या आहेत त्यांचें आपणास ज्ञान आहे म्हणून, सुधारणेच्या कामीं ह्या विरोधांचा जो अत्यन्त मोठा उपयोग झालेला आहे, तो आपण विसरतां कामा नये. प्रारंभीच्या काळीं जगांत सर्वत्र लढाईनंतर माणसें मारून खात हें ऐकून आपणास कसेंसेंच वाटतें.- रानटी लोकांमध्यें लढाया झाल्या म्हणजे आजपर्यंत हजारों वेळां कैद केलेल्या लोकांचे बळी दिलेले आहेत हा विचार मनांत येऊन आपल्यास रागानें कंप सुटतो.— रानटी लोक परदेशावर स्वाऱ्या करून शत्रूंच्या डोक्यांचे ढीग रचीत असत, आणि त्यांचीं हाडें नंतर कित्येक वर्षें पिचत रहात असत, इत्यादि वर्णनें वाचून आपल्या अंगावर रोमांच उभे राहतात. ह्या सर्व गोष्टी

जरी खऱ्या आहेत, आणि, साहेब म्हणतात, अजूनही आमच्यामध्यें देखील युद्धशील प्रवृत्तीमुळें ज्या नीच अशा फसवाफसवी आणि क्रूर असे परातिक्रम दिसून येतात, त्यांचा आपण द्वेष करणें हें जरी योग्य आहे, तरी ह्या अंतर्राष्ट्रीय कलहांमुळें सामाजिक रचनांच्या वृद्धीस उत्तेजन मिळालेलें आहे ही गोष्ट ह्या मनोवृत्तींच्या सपाट्यांत आपण विसरतां कामा नये.

शिवाय, कांहीं प्रकारचीं सरकारें किंवा शासनपद्धती आपणास आवडत नाहींत म्हणून त्या त्या लोकांच्या परिस्थितीला योग्यच होत्या किंवा आहेत हें आपण लक्षांत आणण्यास चुकतां कामा नये. कीर्तीची जी सामान्य कल्पना आहे तिचा त्याग करून, आणि विजेत्या जुलमी राजांना शिपाई व शाळू पोरें ह्यांच्याप्रमाणें ' मोठे ' ही पदवी लावण्याचें नाकारून, जुलमी राज्यपद्धतीचा जरी आपण तिटकारा करितों, सर्वत्र आपला अंमल व्हावा एतदर्थ ते आपल्या लोकांचे व इतर लोकांचे जे बळी देतात तो ते महान् अपराध करितात असें जरी आपण समजतों, तरी ते जीं राज्याचीं एकीकरणें करितात त्यांपासून कधीं कधीं होणारे फायदे आपण ध्यानांत घेतले पाहिजेत. आपल्या प्रजेची कत्तल उडविण्याचे रोमन बादशाहा जे हुकूम सोडीत असत त्यामुळें, किंवा प्राच्य देशांतील राजे आपल्या आप्तांचे जे वध करितात त्यामुळें, किंवा जुलमी राजांच्या बळजबरीमुळें राष्ट्रेंच्या राष्ट्रें जीं उध्वस्त पडतात त्यामुळें, आपणास इतका तिटकारा येतां कामा नये कीं, बलिष्ट माणसाच्या अमर्यादित सत्तेपासून कांहीं प्रकारच्या परि-

स्थितींत जे फायदे होतात त्यांची किंमत आपल्या लक्षांत येऊं नये. तद्वतच लोकांचे हाल करण्यासाठीं दुष्ट राजे अनेक क्रूर साधनांचा उपयोग करीत किंवा त्यांना भिंतींतूनही पुरून टाकीत असें आपण वाचितों म्हणून, कोठें कोठें लोकांनीं असल्या राजांस अगदीं नमून असणें हें जरूरच असे, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये.

माणसें पूर्वीं एकमेकांस गुलाम करीत ही जी गोष्ट तिचेंही असेंच आहे. हीरोडोटस हा ग्रीक इतिहासकार अशी दंतकथा सांगतो कीं, ईजिप्तमधील मोठा मनोरा बांधण्यास एक लाख गुलाम सारखे वीस वर्षें खपत होते; आणि दुसरें असें सांगतात कीं, सेंटपीटर्सबर्ग शहर बांधण्यासाठीं ज्या गुलामांस जबरीनें लाविलें होतें, त्यांपैकीं तीन लाख गुलाम त्या कामीं बळी पडले; ह्या गोष्टी जरी आपण खऱ्या मानिल्या, तरी गुलामगिरीची चाल सर्वथैव निषेध्य होती असें आपण समजतां कामा नये. ज्या स्त्रीपुरुषांना गुलाम करून ठेवीत त्यांच्या हालांच्या इतिहासावरून जरी ते कल्पनातीत असत असें दिसतें, तरी त्यांपासून कांहीं फायदे झाले आहेत असें दाखविणारा कांहीं पुरावा असल्यास त्याचा स्वीकार करण्यास आपण तयार असलें पाहिजे.

सारांश, सामाजिक व्यवस्थांची जर समाधानकारक अशी उपपत्ति आपणास लावावयाची असेल, तर आपलें मन बहुतेक निर्विकार केलें पाहिजे. ह्या व्यवस्थांचा एरवीं विचार करीत असतां जरी आपले मनोविकार उत्क्षुब्ध व्हावयाचे आपणास बंद करतां येणार

नाहींत व करूंही नयेत, तरी त्यांचा जेव्हां आपण स्वाभाविक चमत्कार म्हणून, आणि त्यांचीं कार्यकारणें ध्यानांत आणण्यासाठींच, विचार करीत असतों, तेव्हां आपल्या ज्ञानवत्तेंत विकारांस थारा देतां कामा नये.

२. मानवी कृत्यांमध्यें जें निरपेक्षदृष्टचा वाईट असेल तें सापेक्षदृष्टचा चांगलें असतें, आणि निरपेक्षदृष्टचा चांगलें असेल तें सापेक्षदृष्टचा वाईट असतें, हें सत्य जर आपण नेहमीं मनांत वागविलें, तर, अशी जी ही मनाची समता ठेवणें जरूर आहे,तीस मदत होणार आहे.

ज्या संस्थांखालीं एका जातीची भरभराट झाली असेल त्या दुसऱ्या जातीस चालतीलच असा नेम नाहीं, हें सत्य जरी लोकांच्या माहितींतील झालें आहे, तरी तें त्यांस व्हावें तितकें परिचित झालेलें नाहीं, कागदी राज्यव्यवस्थांवरील ज्यांचा विश्वास उडालेला आहे ते देखील कनिष्ठ जातींना जशा रीतीनें वागवावें म्हणून म्हणतात, त्यावरून त्यांचा असा समज झालेला दिसतो कीं, सुधारलेल्या लोकांचे सामाजिक आचारविचार असुधारलेल्या लोकांवर लादल्यानें त्यांचा फायदा होणार आहे, ज्या व्यवस्था आपणास अगदीं निंद्य म्हणून वाटतात त्या त्यांच्या संबंधानेंहि निंद्यच होत, आणि कौटुंबिक, औद्योगिक, व राजकीय अशा ज्या संस्था आपल्यास फायदेशीर म्हणून आढळून येतात, तशासारख्या संस्थांपासून त्यांचाही फायदाच होईल. पण कोणत्याहि समाजाचा नमुना त्यांतील घटकांच्या स्वभावांवर अवलंबून असतो हें सत्य जर आपण कबूल केलें, तर त्यावरून निष्पन्न होणारें दुसरें असेंही कबूल

करणें आपणास भाग आहे कीं, जी राज्यव्यवस्था खरोखरच अत्यन्त कमी दर्जाची असेल, ती तशी असूनही रानटी परिस्थितीला अगदीं योग्य म्हणून ठरेल.

हीच गोष्ट दुसऱ्या अशा रीतीनें सांगतां येईल कीं, आमचें पक्क असें जें वर्तनाचें बाड आहे त्याचा मुख्यत्वेंकरून खाजगी संबंधांशीं संबंध असल्यामुळें, ज्या अपक्क वर्तननियमसरणीचा मुख्यत्वेंकरून सार्वजनिक-व्यवहाराशीं संबंध आहे तिच्याबद्दला त्याचा उपयोग करतां कामा नये. हल्लीं माणसाचें जीवित इतर माणसांशीं शांततेचा व्यवहार करण्यांत बहुधा गुंतलेलें असल्यामुळें, हल्लींच्या ज्या नैतिक कल्पना आहेत, त्या माणसामाणसांमध्यें होणाऱ्या ज्या क्रिया त्यांनाच मुख्यत्वेंकरून अनुलक्षून बनलेल्या आहेत; पण प्रारंभींप्रारंभींच्या पायऱ्यांवर, माणसाच्या जीविताला मुख्य उद्योग म्हटला म्हणजे शेजारच्या समाजाशीं झगडण्याचा असल्यामुळें, त्यावेळीं ज्या कांहीं नैतिक कल्पना होत्या त्या बहुतेक सर्वांशीं समाजांसमाजांमध्यें होणारे जे व्यवहार त्यांना अनुलक्षून असत: म्हणजे, माणसांच्या कृतींचा सगळ्या जातीच्या कल्याणावर काय परिणाम होतो हें पाहून त्यांस बऱ्या किंवा वाईट म्हणून समजत असत. आणि समाजसंरक्षण हें व्यक्तिसंरक्षणाला आवश्यक आहे म्हणून त्यापेक्षां जास्त महत्त्वाचें असल्यामुळें, त्यावेळच्या सामाजिक गोष्टींचा विचार करीत असतां, त्यांच्यासंबंधानें ‘चांगलें’ आणि ‘वाईट’ ह्या शब्दांची उपपत्ति त्यांच्या आधुनिक अर्थीं लावण्याच्या ऐवजीं त्यांच्या प्राचीनतर अर्थींच लाविली

पाहिजे; आणि म्हणून जें समाजाच्या टिकावाला अनुकूल असेल तेणेंकरून त्यांतील व्यक्तींना जरी फार मोठाले त्रास सोसावे लागले असले, तरी तें तेव्हांच्या दृष्टीनें ' चांगलेंच ' म्हणून समजलें पाहिजे.

४. राजकीय उत्क्रमणाची बरोबर उपपति आपणास लावावयास यावयास पाहिजे असेल, तर आपल्या कल्पनांपैकीं आणखी एक कल्पना आपण बरीच विस्तृत केली पाहिजे. ' सुधारलेलें ' आणि ' रानटी ' ह्यांचे जे हल्लीं रूढ अर्थ आहेत, त्यांहून त्यांचे बरेच निराळे अर्थ केले पाहिजेत. ज्या लोकांचीं मोठीं राष्ट्रें बनलेलीं असतील त्यांना सर्वांशीं अनुकूल, आणि ज्यांचे लहान लहान समूह बनलेले असतील त्यांना सर्वांशीं प्रतिकूल, असा जो एक मोठा भेद नेहमीं दाखवीतअसतात, तो अगदीं बदलून टाकिला पाहिजे, असें आपल्यास त्या गोष्टीबद्दलचें जें जास्त चांगलें ज्ञान झालें आहे त्यावरून स्पष्ट होतें. रानटी लोकांमध्यें अशीं कांहीं शीलें दृष्टीस पडतात कीं, तीं सुधारलेल्या लोकांतील अगदीं उत्तम लोकांचीं जीं शीलें त्यांच्याहून देखील श्रेष्ठ दर्जाचीं असतात. त्यांच्यामध्यें ज्ञान अगदीं अल्प आणि कला अगदीं ओबडधोबड असूनही त्यांच्यांतील कांहीं लोक इतके सद्गुणी असतात कीं, आमच्यामध्यें ज्यांचें शिक्षण व संस्कार हीं अत्यन्त उच्च असतील, त्यांनीं देखील त्यांजकडे पाहून लाजेनें मान खालीं घालावी.

हिंदुस्थानांतील कांहीं मूळ जातींच्या लोकांपैकीं जे शिल्लक राहिले आहेत, त्यांच्या स्वभावांत सत्य बोलणें हा गुण अगदीं गोंवून गेलेला दिसतो. बुद्धिदृष्ट्या

आणि शिक्षणदृष्ट्या त्यांच्या फार पुढें गेलेले असे जे त्यांच्या सभोंवतालचे हिंदू लोक, त्यांच्याहूनच ह्या बाबतींत ते श्रेष्ठ आहेत असें नाहीं, तर युरोपियनांहूनही श्रेष्ठ आहेत. ह्या डोंगरी लोकांपैकीं कांहींकांबद्दल असें सांगतात कीं, त्यांनीं कांहीं म्हटलें तरी तें बेलाशक खरें म्हणून घेऊन चालावें; पण साहेब म्हणतात, असलें विधान आपल्यापैकीं व्यापाराच्या बनावट खुणा वापरणारे कारखानदार आणि मुद्दाम फसविणारे परराष्ट्रीय वकील, ह्यांच्याबद्दल खचीत करतां येणार नाहीं. वरील गुण सांताळ लोकांमध्यें दृष्टीस पडतो; कारण त्याच्यासंबंधानें हंटर साहेब असें म्हणतो कीं, " त्यांच्यासारखे खरें बोलणारे लोक मला कधींही आढळले नाहींत " ; तद्वतच, सौरा लोकांबद्दल शार्ट साहेब असें म्हणतो कीं, " त्यांच्या वर्तनांतील एक आनंदकारक विशेष असा आहे कीं, ते अगदीं सत्यवादी आहेत; त्यांना खोटें कसें बोलावें तें माहीत नाहीं ". टोडा लोकांमध्यें स्त्रीपुरुषसंबंध इतके हलक्या व प्राथमिक दर्जाचे असूनही त्यांच्याबद्दल असें वर्णन आढळतें कीं, " त्यांस खोटें बोलणें हा अत्यन्त मोठा दुर्गुण म्हणून वाटतो " . युरोपियन लोकांशीं ते ढोंगानें वागतात असें जरी मेट्झ् साहेब त्यांजबद्दल म्हणतो, तरी ह्या दोष त्यांजमध्यें युरोपियनांशीं व्यवहार केल्यामुळेंच उत्पन्न झालेला आहे हीही गोष्ट तो कबूल करतो. आणि स्पेन्सर साहेब म्हणतात, इतर डोंगरी लोकांबद्दल जें हिंदुस्थानांतील एका सिव्हिल सर्व्हंटानें मला सांगितलें, त्याच्याशीं हें म्हणणें जुळतें; कारण

तो असें म्हणतो कीं, त्या जाती पूर्वीं खऱ्या बोलणाऱ्या म्हणून प्रसिद्ध असून गोऱ्या लोकांशीं त्यांचा संबंध यावयास लागल्यामुळें त्या कमी खऱ्या बोलणाऱ्या बनल्या आहेत. ' सुधारलेल्या ' लोकांनीं ह्या रानटी लोकांस बिघडविलेलें नसेल तर खोटें बोलणें हा दुर्गुण त्यांजमध्यें इतका अल्प दिसतो कीं, हंटर म्हणतो कीं सगळ्या बंगाल प्रांतांत " टिपरा नामक जातींत मात्र तो दृष्टीस पडतो. "

तद्वतच, प्रामाणिकपणाच्या बाबतींत देखील, कनिष्ठ म्हणून मानिलेले जे हे लोक, त्यांपैकीं कांहीं श्रेष्ठ म्हणून गणलेल्या लोकांस धडे घालून देण्याजोगते आहेत. आतांच सांगितलेले जे तोडा लोक ते जरी अज्ञ आणि कांहीं बाबतींत नीचावस्थेप्रत पावलेले असे आहेत, तरी त्यांच्यासंबंधानें हार्कनेस असें म्हणतो कीं, " स्वकीय आणि परकीय ह्या दोन हक्कांतील भेद ज्यास्त श्रद्धापूर्वक पाळणारे दुसरे कोणी लोक सुधारलेल्यांमध्यें किंवा असुधारलेल्यांमध्यें माझ्या कधीं नजरेस आलेले नाहींत ". गोंड लोकांपैकीं मऱ्या म्हणून जी जात आहे, ते लोक " इतर पुष्कळ रानटी लोकांप्रमाणें सत्यवादित्व आणि प्रामाणिकपणा ह्या दोन बाबतींत अगदीं विलक्षण प्रतीचे आहेत ". खोंड लोकांमध्यें " कोणाचें देणें नाकबूल जाणें हें ह्या तत्त्वाच्या विरुद्ध असून, तें महापाप आहे म्हणून समजलें जातें ". ते लोक म्हणतात, ' माणसानें ' आपल्या सावकारास आपल्यापाशीं असेल तें सर्व द्यावें. सांताळ लोकांस आपल्या पाहुण्याशीं व्यवहार करणें मुळींच आवडत नाहीं; पण त्यांच्या पाहुण्यांनींच तो

विषय काढिल्यास ते त्यांच्याशीं आपल्या लोकांप्रमाणेंच प्रामाणिकपणानें वागतात. ते एकदम कोणत्याही वस्तूची खरी किंमत असेल ती सांगतात. लेप्चा लोक " विलक्षण-रीत्या प्रामाणिक असतात, आणि त्यांच्यांत चोरी म्हणून बहुतेक ठाऊकच नाहीं". आणि बोडो व ढिमाल लोक " शब्द आणि कृति ह्या दोन्ही बाबतींत प्रामाणिक व खरे असतात". कर्नल डिक्सन हा कर्नाटकांतील रानटी लोक विश्वासु, खरे बोलणारे व प्रामाणिक असतात, आणि त्यांच्या इमानावर कोणतीही गोष्ट टाकिली म्हणजे ते विलक्षण भक्ति व्यक्त करितात, असें त्यांजबद्दल लांबलचक वर्णन करितो. आणि चकमा लोकांबद्दल हंटर असें म्हणतो कीं, " ह्या प्राथमिक लोकांत गुन्हा फारच क्वचित् दिसून येतो; चोरी बहुतेक ठाऊकच नाहीं".

ह्या व दुसऱ्या कांहीं सुधारलेल्या लोकांची सामान्य सद्गुणांच्या संबंधानें अशीच गोष्ट आहे. उदाहरणार्थ, सांताळ लोक " गोड्या स्वभावाचे असून फारच संगतिप्रिय आहेत; यांच्यांत स्त्रीपुरुषांना एकमेकांच्या संगतीची अत्यन्त आवड असूनही त्यांच्या बायका अत्यन्त शुद्ध असतात". बोडो व ढिमाल लोकांच्या अंगीं " गोड असे गुण पूर्ण भरलेले आहेत". लेप्चा लोकांबद्दल हंटर असें म्हणतो कीं, ते " आनंदी, दयाळू आणि सहनशील असून, संगतीला फारच उत्तम असतात; " आणि ह्या लोकांत कर्तव्यबुद्धि फार प्रबल असल्याचा परिणाम काय होतो ह्याचें एक उदाहरण डॉ० क्यांबेल देतो. त्याप्रमाणें कांहीं मलायोपोलिनिश्यन आणि पापुअन लोकांबद्दल जीं वर्णनें आढळतात त्यांवरून, सुधारलेली

राहणी आणि श्रेष्ठ धर्माचें शिक्षण ज्यांस पुष्कळ दिवसांचें आहे अशा लोकांचेच जे कांहीं गुण असतात म्हणून आपण समजतों, ते ह्या लोकांत फार जाड्या प्रमाणावर आहेत असें दाखवितां येईल. ह्याबद्दलचा अगदीं आलीकडचा एक दाखला म्हटला म्हणजे सीनार डी. आलबर्टिस ह्याचा होय; कारण यूल बेटानजीक कांहीं न्यूगिनी लोक त्यानें पाहिले त्यांबद्दल तो असें म्हणतो कीं, ते अगदीं प्रामाणिक, ' फार दयाळू ' आणि 'चांगले व शांतताप्रिय ' असून, त्यांच्यांत गांवागांवांमध्यें तंटा झाला तरी मागून " पूर्वींप्रमाणेंच ते एकमेकांशीं मित्रत्वानें वागतात, आणि मनांत द्वेषभाव वागवीत नाहींत " ; पण ह्यासंबंधानें त्यानें कलोनियल इन्स्टिटयूट या सभेपुढें जो लेख वाचिला त्यावर टीका करतांना रेव्हरंड लॉविस असें म्हणतो कीं, गोरे लोक त्यांस वाईट रीतीनें वागवीत असल्यामुळें त्यांचें गोऱ्या लोकांबद्दलचें जें चांगलें मत तें बदलत चाललें आहे; पण साहेब म्हणतात, ही नेहमींचीच कथा आहे.

उलट पक्षीं, जगाच्या निरनिराळ्या भागांतील शिक्षण आणि व्यवस्था ह्या बाबतींत बऱ्याच सुधारलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या कित्येक लोकांकडे पाहतां असा पुरावा सांपडतो कीं, ते लोक इतके पुढें गेलेले असूनहि त्यांच्या कल्पना, मनोभाव आणि रूढी हीं क्रूरपणाचीं असूं शकतात. अशिक्षित लोकांमध्यें फीजियनलोक अत्यन्त हुशार आहेत, असें पिकरिंगसाहेब त्यांचें वर्णन करीत असूनही, ते अत्यन्त क्रूर आहेत. खोटें बोलणें, फसवणें, चोरणें, आणि खून करणें, हे त्यांच्यांत

गुन्हे नसून अब्रूचीं कृत्यें समजलीं जातात; आणि ज्या माणसांना त्यांस खावयाचें असेल त्यांस ते कधीं कधीं जिवंतच तोडितात; त्यांच्यांत बालवध फारच आहे, आणि रोगी असेल त्यास ते फांस घालून मारून टाकितात. असें आहे तरी "त्यांची राजकीय संस्थासरणी मोठी संकीर्ण व मोठ्या व्यवस्थेनें चाललेली अशी आहे"; त्यांच्या सैन्यांत उत्तम व्यवस्था आहे; त्यांची तटबंदी मजबूद आहे; शेतकी सुधारलेली असून पाटबंधारेही आहेत, आणि ते जमिनींतून निरनिराळीं पिकें एकामागून एक काढीत असतात; त्यांच्यांत श्रमविभाग बराच आहे; माल इकडून तिकडे पोंचविणारी व्यापारी मंडळी त्यांच्यांत स्वतंत्र आहे, आणि नाण्याचेंही बीज आहे; आणि कळाकुसरीच्या कामांत ते इतके हुशार आहेत कीं, तीनतीनशें माणसें नेणाऱ्या केनो नामक बोटी ते बांधूं शकतात. डेहामी नामक जे आफ्रिकेंतील लोक त्यांचीही गोष्ट अशीच आहे. त्या लोकांत अगदीं निरनिराळे असे सहा वर्ग आढळतात; त्यांच्यांत राजकीय व्यवस्था संकीर्ण असून कामगार नेहमीं दुहेरे असतात; त्यांच्या सैन्याच्या निरनिराळ्या पलटणी बनविलेल्या असून त्यांच्या कवायती व खोट्या लढाया होत असतात; त्यांच्यांत तुरुंग, पोलीस व खाण्यापिण्याचे वगैरे कायदे आहेत; ते शेतांतून खतांचा उपयोग करीत असून वीस प्रकारचीं धान्यें उत्पन्न करितात; त्यांच्या शहरांभोंवतीं खंदक असून, पूल आहेत, आणि बेडीं-किंवा गुरें न जातील अशीं फाटकेंही आहेत. पण सामान्यतः इतकी मोठी सामाजिक सुधारणा त्यांच्यांत असूनही गुन्हे करण्याचें कामही

त्यांच्यांत जणू काय व्यवस्थेनेंच चाललेलें असतें. उदाहरणार्थ, राजाचा वाडा माणसांच्या डोक्यांनीं सुशोभित करण्यासाठीं ते लढाया करीत असतात; राजा मेला म्हणजे त्याच्या शेंकडो प्रजेस मारितात; आणि स्वर्गास त्याच्याकडे निरोप पोंचविण्याकरितां दर वर्षीं पुष्कळांची कत्तल करितात. ' क्रूर व रक्तभिलाषी ' , ' खोटें बोलणारे व फसविणारे ' , अशीं त्यांचीं वर्णनें आढळत असून, ते " आपल्या कुटुंबांतील माणसांशीं देखील दयापूर्वक किंवा सहानुभूतिपूर्वक वागत नाहींत " ; आणि त्यामुळें त्यांच्यांत " नवरा व बायको, किंवा आईबाप व मुलें, ह्यांच्यांत दिखाऊ प्रेम देखील वसत नाहीं ". अमेरिका खंड प्रथम शोधून काढिलें, तेव्हां तेथें देखील अशीच स्थिति आढळून आली. उदाहरणार्थ, मेक्सिकन लोकांचीं शहरें लाख लाख घरांचीं असूनही त्यांचे देव नरभक्षक असत, त्यांच्या तोंडांत गरम गरम नरमांस कोंबावें लागे, आणि त्याचा पुरवठा करण्याकरतांच ते मुद्दाम लढाया करीत; आणि त्यांच्यांत मोठालीं व भपकेदार देवळें बांधण्याचें कौशल्य असूनही मेक्सिको राजधानी व सभोंवतालचीं शहरें ह्यांतूनच दर वर्षीं अडीच हजार माणसांचे बळी जात; आणि बाकीच्या प्रदेशांतून ह्याच्याहूनही ज्यास्त जात. तद्वतच, मध्य अमेरिकेंतील मोठ्या वस्तीच्या राज्यांतून गणनशास्त्र, पंचांग, पुस्तकें, नकाशे इत्यादिकांचा समावेश जिच्यांत झालेला आहे एवढी सुधारणा झालेली असूनही कैदी, गुलाम, आणि मुलें ह्यांचे मोठाले यज्ञ होत, आणि त्या यज्ञांत या बळींचीं काळजें ताजीं ताजीं बोच-

कारून काढून वेदीपुढें मांडीत; आणि कांहींकांना जिवंतच फाडून त्यांचीं कातडीं त्यांच्यांतील उपाध्ये लोक देवापुढें नाचतेवेळीं अंगावर चढवीत.

पण साहेब म्हणतात,सुधारलेले म्हणून गणले जाणारे समाजप्रकार, आणि सुधारणेबरोबर जे उच्चतर मनोभाव येतात म्हणून आपण समजत असतों ते मनोभाव, ह्यांमध्यें आवश्यकच संबंध आहे असें मुळींच नाहीं हें सिद्ध करण्याकारितां आपणास दूरच्या प्रदेशांत किंवा आमच्याहून अगदीं भिन्न अशा जातींकडेच गेलें पाहिजे असें नाहीं. आसीरियन लोकांच्या खोदीव कामामध्यें कैद्यांना छिन्नविच्छिन्न करण्याचे जे प्रकार दाखविलेले आहेत त्यांच्याहून ज्यास्त क्रूर प्रकार अत्यन्त रक्ताभिलाषी अशा रानटयांत देखील दिसत नाहींत; आणि इजिप्तचा दुसरा राम्सीस नामक ज्या राजास देवळांच्या भिंतीवर बारा कैद्यांच्या केंसटचा हातांत धरून एकदम त्यांचीं डोकीं तो तोडीत आहे असलीं आपलीं चित्रें सर्वत्र खोदलेलीं आवडत, त्यानें आपल्या स्वाऱ्यांमध्यें जितक्या माणसांची कत्तल केली, तितकी रानटी लोकांच्या एक हजार नायकांच्या हातून देखील होत नसेल. प्राचीन काळीं गुन्हेगारांस क्रूसावर चढवून, किंवा संशयित बंडखोरांस मारलेल्या जनावरांच्या कातडयांत शिवून टाकून, अथवा धर्मविरोध्यांच्या अंगास ज्वलनक्षम पदार्थ फांसून त्यांस आग लावून देऊन, जितकी हालअपेष्टा युरोपांतील लोक करीत, त्याच्यापेक्षां जास्त हाल तांबडे इंडियन लोक पकडलेल्या शत्रूंचे करीत नाहींत. जे रोमन लोक आपल्या खेळाच्या

पटांगणांतून पुष्कळ माणसांची एकदम कत्तल केलेली पाहून संतोष पावत, त्यांच्यापेक्षां जे डमारा लोक आपल्यापैकीं एकाद्यास एकाद्या वन्यपशूनें ठार केलेलें पाहून हंसतात ते कांहीं ज्यास्त क्रूर नाहींत.... .... बरें, पुढें ख्रिस्ती धर्म सुरू झाला म्हणून ह्या बाबतींत फारशी सुधारणा झाली असें नाहीं. यूरोपामध्यें मध्ययुगांत राजकीय गुन्हे आणि धार्मिक मतभेद यांबद्दल मुद्दाम काळजीपूर्वक वेदनायंत्रें तयार करून लोकांचे जे हाल करीत ते अगदीं रानटी लोक पकडलेल्या शत्रूंचे जितके करितात त्यांहून ज्यास्त नसले तरी कमी खचींत नसत.

सुधारणा वाढत जाईल तसा दयाभूतपणा वाढत जात नाहीं; उलट, सुधारणेच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर थोडा-फार निर्दयपणाच दाखवावा लागतो; हें सत्य जरी विलक्षण दिसतें, तरी तें ध्यानांत आणणें जरूर आहे. रानटी लोकांच्या टोळ्यांपैकीं ज्या ज्यास्त दयाभूत असण्याच्या ऐवजीं ज्यास्त निर्दय असतील, त्याच टोळ्या ज्या जयांमुळें अगदीं पहिले समाजसंघ बनतात, ते जय मिळवूं शकतात; आणि पुढच्या पुष्कळ पायऱ्यांवर, राजकीय वाढ होण्यास समाजाच्या बाहेर बिनदिक्कत दुसऱ्यांचे मुलखावर स्वाऱ्या करणें, आणि समाजांतल्या समाजांत निर्दयपणानें लोकांवर जबरदस्ती करणें, ह्या गोष्टी नेहमीं कराव्या लागत असतात. जे रानटी लोक प्रथमारंभीं, आणि नंतर पुष्कळ काळपर्यंत, जास्त प्राबल्य व जास्त लबाडी ह्यांचा उपयोग करीत आले, त्यांचेच पुढें जास्त व्यवस्थित असे समाज बनले,

आणि त्यांच्या वर्तनांत बाहेरून बदल करणारीं कारणें आतां नष्ट झालीं असूनही त्यांच्या स्वभावांत फारशी सुधारणा अद्यापि झालेली नाहीं. साहेब म्हणतात, "विलक्षण सत्यवादी व प्रामाणिक", "नम्र व प्रेमळ", "कोणीही आपली जरा कांहीं इच्छा प्रदर्शित केल्याबरोबर त्याप्रमाणें करणारे, आणि त्यांजवर कोणी नजर ठेविल्यास किंवा त्यांस मदत केल्यास फार आभारी होणारे", अशीं वर्णनें ज्यांच्याबद्दल आढळतात त्या अगदीं असुधारलेल्या रानवेड्या लोकांकडे पाहिलें, आणि दुसरीकडे आह्मीं जी नुक्तीच इतर लोकांच्या मुलखाची केवळ लूट केली, आणि त्याबरोबर आमचा ज्यांनीं कांहीं गुन्हा केला नाहीं अशा हजारों लोकांस जें ठार केलें, आणि शिवाय अगदीं विश्वासघात करून लढाईत धरलेल्या कैद्यांस विनाकारण मारिलें, तिकडे पाहिलें, तर आपल्यास असें कबूल करणें भाग पडतें कीं, असुधारलेले आणि सुधारलेले, असे जे माणसांचे निरनिराळे वर्ग करितात, त्यांच्यामध्यें समजतात तसले भेद खचीत नाहींत. नैतिक स्वभाव आणि समाजप्रकार ह्यांच्यामध्यें कांहींही संबंध असला, तरी हल्लींचा समाजस्थ माणूस पूर्वीं समाज नव्हते तेव्हांच्या माणसापेक्षां, मनोवृत्ति दृष्ट्या सर्वांशीं श्रेष्ठ आहे, असें त्या संबंधावरून खचीत गर्भित होत नाहीं.

९. बहुतेतक वाचक असा प्रश्न करितील, "प्रगतिविषयक जी कल्पना तिच्याशीं ह्या सिद्धांताची जुळणी कशी करावयाची? अत्युच्च मानवी गुणांपैकीं कांहीं गुण, जें राष्ट्र विस्तृत असून सुव्यवस्थित आहे, ज्याच्यामध्यें

कलांची अभिवृद्धि विलक्षण तऱ्हेची झालेली आहे, ज्याचें ज्ञान विस्तृत व खोल आहे, आणि ज्याच्यामध्यें लोककल्याणाचीं अनेक साधनें आहेत, त्या राष्ट्रांतील लोकांपेक्षां जे रानटी लोक रानांतून जोडप्याजोडप्यांनींच केवळ विखरलेले राहतात त्यांच्यामध्यें जास्त आहेत असें जें हें ह्या ठिकाणीं ध्वनित होतें तें जर खरें असेल, तर सुधारणा होणें इष्ट आहे ही गोष्ट कोणत्या मुद्यावर सिद्ध करावयाची "? ह्या प्रश्नाचें उत्तर एका प्रकारच्या साम्याच्या द्वारा उत्तम रीतीनें दिलें जाणार आहे.

जो जीवनार्थकलह सगळ्या जीवनसृष्टीमध्यें चाललेला दिसतो, तो उत्क्रमणाचें अत्यावश्यक साधन बनलेला आहे. एकाच जातीच्या व्यक्तींमध्यें चढाओढ चालली असतां योग्यतमाचा जो तगाव निघतो, त्याच्या योगानें प्रारंभापासून त्याच जातीच्या उच्चतर नमुन्याची उत्पत्ति होण्यास मदत झालेली आहे एवढेंच आपल्या दृष्टीस पडतें असें नाहीं, तर आपल्या दृष्टीस असेंही पडतें कीं, वाढ आणि इंद्रियव्यवस्था हीं दोन्ही मुख्यत्वेंकरून उपजातींमधील जें सतत चाललेलें युद्ध त्याच्यायोगानें उत्पन्न होत असतात. सार्वत्रिक कलहाविना सक्रिय किंवा जोरदार शक्तींची वृद्धि झाली नसती. दर्शनविषयक व चलनविषयक इंद्रियांची उत्क्रान्ति पाठलाग करणारे व करून घेणारे ह्यांच्या परस्परव्यापारापासून हळू हळू झालेली आहे. सुधारलेले अवयव व ज्ञानेंद्रियें ह्यांच्यायोगानें पोटांतील इंद्रियांना आवश्यक द्रव्यांचा ज्यास्त चांगला पुरवठा झालेला आहे, आणि सुधारलेल्या अंतरिंद्रियांनीं शुद्ध केलेल्या रक्ताचा पहि-

ल्याहून ज्यास्त चांगला पुरवठा अवयव व इंद्रियें ह्यांस करून दिलेला आहे; इकडे, उत्क्रमणाच्या प्रत्येक पायरीवर ह्या ज्यास्त संकीर्ण इंद्रियरचनांच्या क्रियांमध्यें परस्परांशीं सुसंगति उत्पन्न करण्यास उच्चतर ज्ञानतंतुजाल कारणीभूत झालेलें आहे. पारधीवर राहणाऱ्या जनावरांमध्यें उपासमरीनें मरण येऊन, आणि पारधीच्या जनावरांमध्यें संहारानें मृत्यु येऊन, ज्या व्यक्तींमध्यें व उपजातीमध्यें फेरबदल अत्यन्त कमी अनुकूल असे झालेले असतील त्या नष्ट झालेल्या आहेत. बळ, वेग, चपळता, किंवा शहाणपणा ह्या बाबतींत वरील दोन वर्गांपैकीं एका वर्गांतील प्राण्यांमध्यें जी जी सुधारणा झालेली आहे, तेणेंकरून दुसऱ्या वर्गांतील प्राण्यांमध्यें तसलीच सुधारणा होणें आवश्यक झालेलें आहे; आणि पकडण्यास व पळण्यास सतत यत्न केल्याविना, आणि ह्या कामीं चुकल्यास मरणाचीच शिक्षा होत नसती तर, ह्या दोन वर्गांपैकीं कोणत्याचीच प्रगति झाली नसती.

तथापि आतां हें लक्षांत आणा कीं, (टेनिसन कवि म्हणतो त्याप्रमाणें) जिचे दांत व पंजे रक्तानें लाल झालेले आहेत, अशा सृष्टिदेवतेचें हें दयाविहीन शिक्षण सचेतनजीविताच्या प्रगतीस जरी आवश्यक झालेलें आहे, तरी त्यावरून सर्व कालपर्यंत सर्व प्राण्यांसंबंधानें तें तसेंच चालू राहिलें पाहिजे, असें त्यावरून अनुमान काढतां कामा नये. ह्या सार्वत्रिक कलहामुळें आणि कलहासाठीं उत्क्रान्त झालेली जी उच्च इंद्रियघटना तिचा त्याच कामासाठीं सततच उपयोग करावयाचा नाहीं; तर ह्या घटनेपासून जी शक्ति व बुद्धि उत्पन्न होते तिचा फार

अन्य तऱ्हेनें उपयोग करतां येण्यासारखा आहे. वंशपरंपरेनें प्राप्त झालेल्या घटना स्वसंरक्षण व पराक्रम ह्या कामांसाठींच उपयुक्त आहेत असें नाहीं, तर दुसऱ्या अनेक कार्यांसाठीं त्यांचा उपयोग करण्यासारखा आहे; आणि हीं जीं अन्य कार्यें तींच शेवटीं त्यांची कायतीं किंवा तेवढींच कामें म्हणून बनण्याचा संभव आहे. ज्या लक्षावधि वर्षांच्या संग्रामामुळें सर्व प्रकारच्या हलक्या दर्जाच्या प्राण्याच्या शक्ती वृद्धिंगत झालेल्या आहेत, त्या सर्व कालांमध्यें, अत्युच्च प्रकारचा प्राणी, मारणें आणि मारून घेण्याचें टाळणें ह्या कार्याव्यतिरिक्त अगण्य कार्यांकडे आपल्या ज्या शक्तींचा हल्लीं उपयोग करीत असतो, त्या त्यास वंशपरंपरेनें प्राप्त झालेल्या आहेत. त्याचे हातपाय, नखें आणि दांत ह्यांचा उपयोग लढण्याच्या कामीं तो फारच अल्प करितो; आणि त्याचें मन हल्लीं सामान्यतः इतर प्राणी मारण्याच्या युक्त्या काढण्यांत, किंवा ते इजा करतील त्यांपासून आपलें रक्षण करण्यांत, गुंतलेलें नसतें.

सामाजिक देहांचीही असलीच स्थिति आहे. निरनिराळ्या समाजांमध्यें जीवनार्थ जे कलह झालेले आहेत, ते त्यांच्या उत्क्रमणास कारणीभूत झालेले आहेत हें सत्य आपण लक्षांत आणिलें पाहिजे. लहान लहान समूहांचें एकीकरण व पुनरेकीकरण होऊन मोठाले समूह बनणें; ह्या मोठाल्या संयुक्त व पुनःसंयुक्त समूहांची व्यवस्था लावणें; आणि सुधारणेबरोबर उच्चतर जीवितासाठीं जीं साधनें उत्पन्न झालीं आहेत त्यांची वरील व्यापाराबरोबरच वृद्धि होत जाणें; ह्या गोष्टींपैकीं कोणतीही गोष्ट

टोळ्याटोळ्यांमधील किंवा राष्ट्रांराष्ट्रांमधील कलहांविना शक्य झाली नसती. सामाजिक सहक्रियेस संयुक्त संरक्षण व अतिक्रम ह्यांपासून सुरुवात होत असते; आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या सहक्रियेपासून सर्व प्रकारच्या सहक्रिया उत्पन्न झालेल्या आहेत. हा जो सार्वत्रिक कलह चाललेला आहे, आणि ज्यास हजारों वर्षांमागें लहान लहान जमावांच्या नेहमींच्या वैरांच्या रूपानें सुरुवात होऊन, हल्लीं ज्यास मोठमोठाल्या राष्ट्रांच्या कधीं कधीं होणाऱ्या महासंग्रामांचें स्वरूप आलेलें आहे, त्या कलहामुळें उत्पन्न झालेले भयंकर अनर्थ जरी अकल्प्य आहेत, तरी हें आपणास कबूल करणें भाग आहे कीं, ह्या कलहाविना गुहांतून राहणाऱ्या आणि वन्य वस्तूंवर निर्वाह करणाऱ्या दुर्बल नमुन्यांचीं माणसें जगांत हल्लीं देखील दृष्टीस पडलीं असतीं.

पण आतां ही गोष्ट लक्षांत आणा कीं, समाजाचें उत्क्रमण करण्याच्या कामीं जो अंतर्राष्ट्रीय जीवनार्थकलह अत्यावश्यक झालेला आहे, त्याचें आजपर्यंत जसलें महत्व होतें तसलें पुढेंही राहीलच असा कांहीं नेम नाहीं. मोंगली राष्ट्रें बनवून त्यांच्या संस्थारूप इंद्रियांची वाढ करण्याच्या कामीं युद्धाचा मोठा उपयोग झालेला आहे ही गोष्ट ध्यानांत घेतली तरी आपणास असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, अशा रीतीनें प्राप्त झालेल्या ज्या शक्ती त्या दुसऱ्या कामीं उपयोगीं पडावयास लागून त्यांचे पूर्वींचे जे उपयोग ते नाहींसे होतील. ह्या सतत चालणाऱ्या रक्तस्रावजनक कलहाविना सुधारलेल्या समाजांची उत्पत्ति होऊं शकली नस-

ती, आणि त्या कलहांला हुशार पण क्रूर अशाच स्वभावाची जरूरी होती, ह्या गोष्टी कबूल केल्या तरी, त्याबरोबर असेंही मानण्यास आपल्यास हरकत नाहीं कीं, असले समाज आतां उत्पन्न झालेले असल्यामुळें त्यांची उत्पत्तिसरणी चालू असतां जें स्वभावक्रौर्य आवश्यक होतें, त्याची आवश्यकता त्या सरणीबरोबरच नाहींशी झालेली असल्यामुळें तें क्रौर्यही नष्ट होईल. लुटारूपणाच्या कालांत प्राप्त करून घेतलेले फायदे जरी वंशपरंपरा संक्रान्तीनें कायम राहतील, तरी त्या कालामध्यें जीं अनिष्टें उत्पन्न झालीं, तीं कमी होऊन हळू हळू अगदींच नाहींशीं होतील.

एवंच, सामाजिक रचना व व्यापार ह्यांचा उत्क्रांतिदृष्ट्या विचार करीत असतां, नैतिक पसंती व नापसंती वाटण्याच्या आपल्या शक्ती न गमावतां, त्या रचनांची व व्यापारांची शास्त्रीय उपपत्ति लावण्यास आवश्यक अशी जी मनाची समता ती कायम राखण्यास आपल्यास हरकत नाहीं.

६. राजकीय संस्थांचा विचार करणाऱ्यानें आपल्या मनाची स्थिति कशी ठेविली पाहिजे ह्याबद्दल जे हे प्रास्ताविक विचार सांगितले त्यांमध्यें आतां, त्याला ज्या विषयांचा विचार करावयाचा असतो त्यांच्यासंबंधानें थोड्याशा अल्प विचारांची भर घातली पाहिजे.

सर्व समाज एकाच जातीचे असून, त्यांच्या वाढीच्या मजला आणि रचना ह्यांसंबंधानें जर त्यांच्यामध्यें भेद असता, तर त्यांच्या तुलना केल्यानें त्यांच्या उत्क्रमणाची सरणी स्पष्टपणें आपल्या लक्षांत आली असती;

पण त्यांजमध्यें कमजास्त प्रमाणानें भिन्न भिन्न असे नमुने असल्यामुळें असल्या तुलनांपासून निष्पन्न होणारे सिद्धान्त स्पष्टपणें लक्षांत येत नाहींत.

शिवाय, आणखी कांहीं कारणें आगंतुक म्हणून उत्पन्न न होतां जर प्रत्येक समाजाची वाढ व विस्तार हीं झालीं असतीं, तर त्यांची उपपत्ति हल्लींहून ज्यास्त सुलभपणें लावतां आली असती; पण समाजवृद्धीच्या ज्या संकीर्ण सरणी आहेत त्या निरनिराळ्या कारणसमुच्चयांमध्यें फेरबदल होऊन ज्यास्त संकीर्ण होतात. नवा मुलूख जोडला जाऊन अथवा जुना मुलूख गमावला जाऊन, सामाजिक समूहाचा आकार कधीं कधीं एकदम मोठा होतो किंवा लहान होतो; कधीं कधीं नवी जात जिंकणारी किंवा जित म्हणून त्या समूहांत सामील होऊन त्याच्या घटकांचें जें सामान्य शील त्यांत बदल होतो; आणि ह्यामुळें दुसरा एक असा परिणाम होतो कीं, जुन्या सामाजिक संबंधांना नवे सामाजिक संबंध येऊन जुडतात. पुष्कळ ठिकाणीं समाजांनीं वरचेवर एकमेकांचीं अतिक्रमणें केल्यामुळें, लोक आणि संस्था ह्यांचीं संमिश्रणें झाल्यामुळें, आणि जुने समूह मोडून नवे बनल्यामुळें, नेहमींच्या सरणींचें सातत्य इतकें मोडिलें जातें कीं, त्यावरून कांहींही निर्णय ठरविणें, अशक्य नाहीं तरी, फारच दुर्घट होऊन जातें.

शिवाय, समाज कधीं कधीं ज्यास्त युद्धशील आणि कधीं कधीं ज्यास्त उद्यमशील होत जाऊन त्याच्या सामान्य जीवितसरणीमध्यें जे फेरबदल उत्पन्न होतात, ते नव्या रूपांतरांस सुरवात करितात; म्हणजे, समाज-

व्यापार बदलल्यामुळें समाजरचनाही बदलतात. म्हणून एकच समाजनमुन्याच्या ज्यास्त होणाऱ्या वाढीमुळें सारखे चालू राहणारे रचनाफेरबदल, आणि नव्या समाजनमुन्यास सुरवात होऊन उत्पन्न झालेले रचनाबदल, ह्यांच्यांतील भेद लक्षांत आणिला पाहिजे. जी समाजव्यापारसरणी नष्ट झाली आहे, किंवा पुष्कळ दिवस बंद पडलेली आहे, तिला योग्य अशा घटनेच्या ज्या रेषा, त्यांमधून जी नवी व्यापारसरणी पहिलीच्या ऐवजीं उत्पन्न झालेली आहे तिच्या घटनेच्या ज्यास्त ज्यास्त स्पष्ट होणाऱ्या रेषा आडव्या जाऊं लागतात; आणि त्या सरण्यांपैकीं एकीचे जे विशेष ते दुसरीचे म्हणून समजल्यानें चुकी उत्पन्न होण्याचा संभव असतो.

म्हणून आपण असें अनुमान केलें पाहिजे कीं, संकीर्ण आणि घोंटाळ्याचा असा जो एतद्विषयक पुरावा त्यामधून मोठालीं तेवढीं सत्यें स्पष्टपणानें बाहेर पडण्याचा संभव आहे. याकरितां, प्रस्तुत विवेचनापासून कांहीं सामान्य असे सिद्धांत जरी खातरीनें स्थापन झाले, तरी ज्यास्त विशिष्ट असे जे सिद्धान्त ते केवळ संभवनीय आहेत इतकेंच निष्पन्न होईल असा अंदाज करण्यास कांहीं हरकत नाहीं.

तथापि, सुदैवानें अशी स्थिति आहे कीं, खात्रीनें स्थापन करतां येण्यासारखे जे हे ज्यास्त व्यापक सिद्धांत तेच पुढील मार्ग दाखविण्याच्या कामीं आपल्यास अत्यंत उपयुक्त होणार आहेत आणि ही गोष्ट अखेरीस आपल्या निदर्शनास येणार आहे.

प्रकरण दुसरें

राजकीय घटनेचें सामान्य स्वरूप

७. कांहीं व्यक्ती एकत्र होऊन त्यांचा समूह बनला, म्हणजे तेवढ्यानेंच त्यास समान स्वरूप येत नाहीं. परस्पर सान्निध्याव्यतिरिक्त जेव्हां सहकार्य उत्पन्न होतें, तेव्हां समाजशास्त्रदृष्ट्या समाज म्हणून बनतो. जोंपावेतों त्या समूहांतील व्यक्ती कांहीं सर्वसामान्यहेतु किंवा हेतू साध्य करण्याकरितां आपल्या शक्ती एकत्र खर्च करीत नाहींत, तोंपावेतों त्यांस एकत्र राखण्यास बहुतेक कांहींच कारण नसतें. जेव्हां प्रत्येकाच्या गरजा, तो एकटाच उद्योग करीत असतां जितक्या भागण्याचा संभव आहे, त्यांहून इतरांशीं मिळून उद्योग केल्यानें जास्त चांगल्या रीतीनें भागूं लागतात, तेव्हांच ते एकमेकांपासून पृथक् होण्याचे बंद होतात.

एवंच सहक्रिया म्हणजे, जिच्याविना समाज अस्तित्वांत असूं शकत नाहीं ती, आणि जिच्याकरितां समाज अस्तित्वांत असतो ती. आतां ही सहक्रिया दोन प्रकारची असूं शकेल; एकट्याच्याच शक्तीनें जी गोष्ट होण्यासारखी नसेल ती करण्यासाठीं अनेकांच्या शक्ती एकत्र करणें, हा एक प्रकार; आणि निरनिराळ्या माणसांना निरनिराळीं कामें लावून देऊन त्या सर्वांना एकमेकांच्या उद्योगाचा फायदा मिळवून देणें, हा दुसरा प्रकार. आतां ह्या सहक्रियेला प्रोत्साहक कारण शत्रूंपासून स्वसंरक्षण करणें हें असेल,—आणि हेंच प्रथम फार प्र-

बळ असतें,—किंवा पारध अथवा अन्य साधन यांच्या योगानें ज्यास्त सुलभ रीतीनें भक्ष्य मिळवणें हें असेल; किंवा हीं दोन्हीही कारणें असतील; आणि बहुधा तसेंच असतें. कसें झालें तरी येणेंकरून समाजघटक स्वातंत्र्यास्थितींतून निघून परस्परावलंबी स्थितींत संक्रमण करितात; आणि ज्या मानानें ते असें करितील, त्या मानानें ते ' समाज ' ह्या शब्दाच्या खऱ्या अर्थीं एकमेकांशीं युक्त होतात.

पण सहक्रियेमध्यें व्यवस्थित आकार किंवा संघटना अंतर्भूत होते. क्रियांचा जर फलदायी असा संयोग करावयाचा असेल, तर त्यांचे काल, राशी, आणि स्वरूपें, ह्यांच्यासंबंधानें त्यांचा ज्यांच्या योगानें योग्य मेळ बसेल, अशा कांहीं व्यवस्था पाहिजेत.

८. परस्परसंगत क्रियेला साधन म्हणून आवश्यक अशी जी सामाजिक संघटना ती दोन प्रकारची असते. जरी हे दोन प्रकार सामान्यतः साहचर्येंकरून अस्तित्वांत असतात, आणि कमजास्तमानानें एकमेकांत सिसळलेले असतात, तरी त्यांचीं उत्पादक कारणें आणि त्यांचीं अंतःस्वरूपें हीं भिन्नभिन्न असतात. खाजगी कार्यें साधण्याच्या मागें लागलें असतां, विचार न करतां, आपोआप जें सहकार्य उत्पन्न होत असतें तो एक प्रकार; आणि सार्वजनिक उद्देशांच्या सिद्ध्यर्थ मुद्दाम बनवून आणिलेली जी सहक्रिया तो दुसरा प्रकार. हे दोन प्रकार स्थापन करून चालविण्याचे जे मार्ग आहेत, त्यांच्यांत ठळक भेद दिसून येतात.

जेव्हां जेव्हां एकाद्या प्राथमिक समूहामध्यें श्रमांचा

मोबदला करून उत्पन्न होणारें जें सहकार्य त्यास आरंभ होतो—जेव्हां जेव्हां व्यक्तीस असें आढळून येतें कीं, आपणास जे पदार्थ उत्तम रीतीनें करतां येतात ते देऊन त्यांच्या मोबदला जे जिन्नस करण्याच्या कामीं आपण कमी हुशार आहों, आणि जे करण्याचीं साधनें आपल्यापाशीं असावीं तशीं नाहींत ते घेणें, ह्याच्या योगानें अपल्या गरजा जास्त चांगल्या रीतीनें भागतात, तेव्हां तेव्हां अशा प्रकारची एक संघटना सुरू होते कीं, ती तेव्हां, आणि पुढें तिच्या उच्च पायऱ्यांवरही, खासगी उद्देशसिद्ध्यर्थ केलेल्या यत्नांपासून निष्पन्न झालेली असते. प्रारंभापासून शेवटपर्यंत, राहणीमध्यें फायदा झाल्याच्या अनुभवापासून श्रमविभागाची उत्पत्ति होत असते. प्रत्येक नव्या प्रकारचा उद्योग किंवा प्रत्येक उद्यमवैशिष्ट्य, ज्यास त्यापासून फायदा मिळूं लागतो त्याच्या प्रयत्नानें सुरू होत असतें; आणि दुसऱ्यांच्या फायद्यास कशा तरी रीतीनें साहाय्यभूत होऊन कायम होत असतें. एवंच अशा प्रकारचें एक सहाकार्य आहे कीं, आणि त्याच्यावरून अशा प्रकारची एक विस्तृत सामाजिक संघटना उत्पन्न होत असते कीं, ज्याची उत्पत्ति विचारपूर्वक संगनमतानें झालेली नसते. त्या संघटनेच्या लहान पोटभागांमध्यें कामास लावणारा व कामकरी (ज्यांपैकीं पहिला दुसऱ्यास हुकूम देत असतो) यांचा परस्परसंबंध जरी सर्वत्र दृष्टीस पडतो, तथापि खासगी हेतूंच्या वृद्ध्यर्थ स्वेच्छेनें बनवलेला, आणि स्वेच्छा असेल तोंपर्यंतच चालू राहणारा जो हा संबंध, तो सार्वजानिक उद्देशांच्या सिद्धीसाठीं जाणून बुजून बनव-

लेला नसतो; कारण त्या उद्देशांचा विचारच मनांत आणिलेला नसतो. आणि व्यापारविषयक उद्यमाचें नियमन करण्यासाठीं, मागणी असेल त्या मानानें पुरवठा व्हावा असा योग घडवून आणणाऱ्या व्यवस्था उत्पन्न होत असतात; तरी त्या व्यवस्था हें कार्य प्रत्यक्षरीत्या उत्तेजन देऊन किंवा नियंत्रण घडवून आणीत नाहींत, तर बातमी पसरून त्या हें उत्तेजनाचें किंवा नियंत्रणाचें कार्य करीत असतात; आणि दुसरें असें कीं ह्या ज्या व्यवस्था उत्पन्न होत असतात त्या व्यापाराचें अशा रीतीनें नियमन करावें ह्यासाठींच म्हणून उत्पन्न होत नाहींत, तर खासगी फायदा करून घेण्यासाठीं व्यक्ती जे उद्योग करितात त्यांपासून उत्पन्न होत असतात. ज्या विस्तृत श्रमविभागाच्या योगानें मालाची उत्पत्ति करणें व वांटणी करणें हल्लीं चाललेलें आहे, तो विभाग इतका आपोआप उत्पन्न झालेला आहे कीं, तो पहिल्यापासून असा बनत चाललेला आहे ही गोष्ट आलीकडेसच लोकांच्या लक्षांत आलेली आहे.

दुसऱ्या पक्षीं, सर्व समाजाच्याच प्रत्यक्ष संबंधाची एकादी गोष्ट करण्यासाठीं होणारी जी सहक्रिया ती जाणून बुजून केलेली सहक्रिया होय; आणि ती सहक्रिया अन्यरीतीनें बनविलेली अशी अन्य संघटना चालवीत असते. प्राथमिकसमूहास जेव्हां अन्यसमूहापासून स्वसंरक्षण करावयाचें असतें, त्या वेळीं त्याचे घटक जे एकत्र होऊन तें काम करितात, तें केवळ स्वतांच्या ज्या इच्छा त्यांच्या प्रेरणांहून अन्य प्रेरणांनीं प्रेरित होत्साते करितात. अगदीं प्रारंभीं देखील, एकाद्या नायकाचें नि-

यंत्रण उत्पन्न होण्याच्या अगोदर, सगळ्याच समूहानें आपल्या अवयवांवर चालविलेलें नियंत्रण असतेंच; आणि त्यांपैकीं प्रत्येकास, सार्वजानिकमतामुळें, सामान्य संरक्षणाला हातभार लावणें भाग पडत असतें. लवकरच, स्पष्टरीत्या श्रेष्ठ असा जो त्यांच्यांतील योद्धा असेल तो, लढाईच्या वेळीं, समूहाच्या प्रभावाखेरीज आपलाही प्रभाव प्रत्येकावर चालवूं लागतो; आणि त्याचा अधिकार स्थापन झाला म्हणजे तेणेंकरून त्यांच्या संयुक्त क्रियेला ज्यास्त उत्तेजन मिळतें. एवंच, ह्या जातीची सहक्रिया पहिल्यापासून जाणून बुजूनची सहक्रिया असते, आणि शिवाय ती सहक्रिया सर्वांशीं व्यक्तींच्या खुषीवर अवलंबून नसून, वरचेवर त्यांच्या खासगी इच्छांच्या विरुद्धही असते. ह्या सहक्रियेनें सुरू केलेली संघटना जशी वृद्धिंगत होत जाते, तसे पहिल्या प्रथम समाजाचा जो लढणारा भाग त्याच्या ठिकाणीं हेच विशेष अत्यन्त जाडच्या प्रमाणावर दिसून येऊं लागतात; म्हणजे, सेनाघटक असे जे निरनिराळ्या दर्जांचे व भागांतले लोक ते व्यक्तींच्या इच्छांस न मानणाऱ्या व्यवस्थांच्या मुद्दाम स्थापिलेल्या नियमनाखालीं ज्यास्त ज्यास्त प्रमाणावर सहक्रिया करूं लागतात. दुसरी गोष्ट अशी दिसूं लागते कीं त्या सर्व समाजामध्यें तशाच जातीची एक संघटना पसरून जाते; आणि ती तशाच जातीची इतक्या प्रमाणावर असते कीं, लष्कर आणि त्याचें नियंत्रक सरकार यांचें पोषण करण्यासाठीं लोकांस खासगी कामाच्या ऐवजीं सार्वजानिक कामासाठीं श्रम करण्यास भाग पाडणाऱ्या अशा व्यवस्था ती

स्थापन करीत असते. आणि, ह्याबरोबरच, आणखी एक अशाच प्रकारची संघटना वृद्धिंगत होत असते; आणि ती व्यक्तींच्या क्रियांचें अशा प्रकारचें नियंत्रण करीत असते कीं, खासगी हेतूंच्या मागें अनियंत्रित रीतीनें लागल्यानें उत्पन्न होणाऱ्या अव्यवस्थेनें समाजाच्या सुरक्षितपणास धक्का बसूं नये. एवंच ही सामाजिक संघटना जाणून बुजून सार्वजनिक हेतू साधण्यासाठीं उत्पन्न झालेली असते, हा तिच्यांत व पहिल्या प्रकारच्या संघटनेंत भेद असतो; आणि त्या हेतूंच्या सिद्धयर्थ व्यक्तींच्या इच्छांचें नियमन प्रथम सगळ्या समूहाच्या संयुक्त इच्छांच्या द्वारा होत असतें, आणि मागाहून त्या समूहामधून उत्क्रान्त झालेल्या नियामक व्यवस्थेच्या इच्छेच्या द्वारा ज्यास्त स्पष्ट रीतीनें होऊं लागतें.

ह्या दोन्ही प्रकारच्या संघटना जरी समाजकल्याणास कारणीभूत होतात, तरी त्या विरुद्ध मार्गांनीं तशा होतात, हें लक्षांत आलें म्हणजे त्यांच्यांतील परस्परभेद ज्यास्त स्पष्टरीत्या आपल्या लक्षांत येणार आहे. उद्यमविषयक कार्यांसाठीं श्रमविभागाच्या संबंधानें जी संघटना दृष्टीस पडते, तिच्या ठायीं संयुक्त क्रिया व्यक्त होते हें खरें आहे; पण त्या संयुक्तक्रियेचा प्रत्यक्ष हेतु व्यक्तींचीं हितें साधवयाचीं हाच असतो, व तींच ती साध्य करीत असते, आणि व्यक्तींचा संभाळ करून अप्रत्यक्षरीत्या ती सगळ्या समाजाचें हित साधीत असते. उलटपक्षीं, जी संघटना शासन व संरक्षण ह्या कार्यांसाठीं उत्क्रान्त झालेली असते, तिच्या ठिकाणींही संयुक्त क्रिया दिसून येतेच; पण त्या संयुक्तक्रियेचा प्रत्यक्ष-

हेतु सर्व समाजाचें मिळून कल्याण साधण्याचा असतो, व तें ती साधीत असते, आणि समाजाचें संरक्षण करून अप्रत्यक्षरीत्या त्यांतील व्यक्तींचीं कल्याणें ती साधीत असते. समाजघटकांनीं स्वसंरक्षणार्थ केलेल्या प्रयत्नांपासून यांपैकीं एका प्रकारच्या संघटनेची उत्पत्ति होत असते; आणि सगळ्या समुदायानें स्वसंरक्षणार्थ केलेल्या प्रयत्नापासून दुसऱ्या प्रकारच्या संघटनेची उत्पत्ति होत असते. पहिल्या ठिकाणीं खासगी उद्देशासाठींच जाणून बुजून खटपट चाललेली असते; आणि ह्या खटपटीपासून उत्पन्न झालेली जी तत्संबंधी संघटना, ती न जाणतां वाढत गेल्यामुळें, तिच्या ठिकाणीं नियंत्रक शक्ति नसते. दुसऱ्या ठिकाणीं जाणून बुजून सार्वजनिक उद्देशसिद्ध्यर्थच खटपट चाललेली असते; आणि तत्संबंधी संघटना, जाणून बुजून स्थापिलेली असल्यामुळें, ती नियंत्रणाचा उपयोग करीत असते.

ह्या दोन प्रकारच्या सहक्रियांपैकीं आणि त्या घडवून आणणाऱ्या संघटनांपैकीं एकीचाच आपणास एथें विचार कर्तव्य आहे. राजकीय संघटना म्हणजे समाजसंघटनेचा तो भाग म्हणून समजावें कीं जो सार्वजनिक उद्देशांकरितां दिग्दर्शक आणि नियंत्रक हे व्यापार जाणून करीत असतो. आतां वर सांगितलेल्या दोन प्रकारच्या संघटना अनेक रीतींनीं एकमेकींशीं संमिश्रित झालेल्या असतात—म्हणजे त्यांच्या निरनिराळ्या प्राबल्याच्या मानानें त्यांपैकीं प्रत्येकीचे फांटे कमजास्त मानानें दुसरीमध्यें पसरलेले असतात, हें खरें आहे; आणि ही गोष्ट जशी आह्मीं पूर्वींच सुचविलेली आहे तशी पुढेंही

लवकरच आपल्या नजरेस आणखीही येणार आहे. पण त्यांचा उद्गम आणि अंतःस्वरूप ह्यासंबंधानें त्या तत्त्वतः भिन्न आहेत; आणि सध्यां, साधेल तितकें, आपण आपलें लक्ष त्यांपैकीं दुसरीकडेसच दिलें पाहिजे.

९. माणसांची सुधारणा होऊन जी सहक्रिया त्यांजमध्यें हळूहळू उत्पन्न झालेली आहे तिच्यायोगानें, पूर्वी त्यांच्या प्राथमिक स्थितींत ते ऐककटे रहात असतां जे फायदे त्यांस होत नव्हते, ते त्यांस होऊं लागले आहेत; आणि ह्या सहक्रियेला राजकीय संघटना अगदीं आवश्यक साधन म्हणून फायदेशीर झालेली आहे; ह्या गोष्टी ज्या लोकांत ती संघटना मुळींच उत्पन्न झालेली नाहीं त्यांची स्थिति, आणि ज्यांच्यांत ती कमजास्त मानानें उत्पन्न झालेली आहे त्यांची स्थिति, ह्यांच्यांतील भेद पाहिल्यानें आपल्या लक्षांत येणार आहेत.

आतां हें खरें आहे कीं राजकीय संघटना असतां व्यक्तिजीवित जितकें चांगलें असावयाचें तितकेंच तिच्याविना असतें अशा कांहीं स्थिती आहेत. एस्कीमोच्या वसतिस्थानाप्रमाणें ज्या ठिकाणीं थोडेच लोक असून ते फार फार अंतरावर विखरलेले असतात; ज्या ठिकाणीं बहुधा लढाईस भौतिक अडचणी फार आणि प्रोत्साहक कारणें दुर्बल असल्यामुळें लढाई मुळींच होत नाहीं; आणि ज्या ठिकाणीं धंदे इतके एकस्वरूप असतात कीं, श्रमविभागास बहुतेक मुळींच जागा नसते; अशा ठिकाणीं परस्परावलंबनास अवकाशच सांपडत नाहीं, आणि तें बनवून आणणाऱ्या रचनांची जरूरीही नसते. ही अपवादात्मक स्थिति लक्षांत आणून, ज्या

स्थिती अपवादरूप नाहींत, त्यांचा आतां विचार करूं.
डिगर इंदियन नामक लोक ' ओरांग औटांग ' ह्या मनुष्याकृति जनावरापासून फारच थोड्या अंशांनीं भिन्न असून सेरानेव्हाजच्या डोंगरामध्यें विखरलेले आहेत; ते बिळांतून राहत असून मुळें व कीडमुंग्या यांवर निर्वाह करीत असतात, आणि "अत्यन्त घाणेरड्या व कंटाळवाण्या स्थितींत नागडे उघडे अत्यन्त भिकार अवस्थेंत कसेतरी दिवस काढीत असतात ". त्यांच्यांत आणि शोशोनलोकांच्या इतर पोटजातींत हा भेद आहे कीं त्यांच्यांत सामाजिक संघटना मुळींच नाहीं. त्या जातीचे नदीकांठानें आणि मैदानांतून भटकणारे जे भाग आहेत त्यांच्यावर थोडेंसें सरकारी नियंत्रण असल्यामुळें त्यांचीं जीवितें वरच्याहून कांहीं बरीं असतात. दक्षिण अमेरिकेंत डिगर इंडियनांप्रमाणें हलक्या दर्जाचे, व त्यांच्याप्रमाणेंच नीच व भिकार स्थितींत राहणारे जे चाको इंदियन म्हणून लोक आहेत, त्यांच्यांत व त्यांच्या सभोंवतालच्या त्यांच्याहून श्रेष्ठ व ज्यास्त सुखी लोकांमध्यें हा भेद आहे कीं ते समाजविहीन आहेत. बिडुइन लोकांच्या टोळ्यांमध्यें शिरारात म्हणून जे लोक आहेत, त्यांच्यांत व इतर टोळ्यांत असा भेद आहे कीं त्यांचे अनेक विभाग व पोटविभाग असून त्यांचा सर्वांचा असा नाईक मुळींच नाहीं; आणि म्हणून सगळ्या बिडुइन लोकांमध्यें ते अत्यन्त दरिद्री आहेत असें त्यांचें वर्णन आढळतें. कांहीं जवळजवळच्या आफ्रिकन लोकांत बेकरला जो फरक दिसला तो ह्याहूनही ज्यास्त ठळक आहे. तो म्हणतो, वस्त्रहीन व शासनहीन अशा

टोळ्यांपासून, म्हणजे अत्यन्त रानटी स्थितीपासून, अर्धवट सुधारलेल्या स्थितीकडे एकदम जाऊन आपण उनियोरोमध्यें अगदीं कडक अशा जुलमी राजाच्या मुलखाकडे येतों; तो अत्यन्त क्षुल्लक अपराधाबद्दल जीव घेण्याच्या व हाल करण्याच्या शिक्षा करीत असतो; पण तेथें राज्यकारभार व्यवस्थित असून पोटसुभेदार आहेत, कर आहेत, वस्त्रें चांगलीं आहेत, आणि कला, शेतकी व शिल्पकाम हींही आहेत. तद्वतच, न्यूझीलंद प्रथम शोधून काढिलें तेव्हां त्यासंबंधानें कूक असें म्हणाला कीं, त्यापैकीं जे भाग एकाद्या राजाच्या अमलाखालीं होते त्या भागांत इतर भागांपेक्षां ज्यास्त भरभराट व ज्यास्त लोकवस्ती दिसत होती.

ह्या शेवटच्या उदाहरणावरून आणखी एका सत्याशीं आपली ओळख होते. तें असें. राजकीय संघटनेच्या ज्या पहिल्या पायरीमुळें व्यक्ती एका मुख्य नायकाच्या सत्तेखालीं जातात तिजपासून पहिल्याहून ज्यास्त चांगल्या सहक्रियेचा फायदा मिळतो; इतकेंच नाहीं तर जेव्हां धाकटाले राजकीय मुख्य एका मोठ्या राजकीय मुख्याच्या कह्यांत जातात तेव्हां हा फायदा वृद्धिंगत होतो. ह्या व्यवस्थेमुळें कोणत्या अनिष्ट गोष्टी टाळल्या जातात हें बलुची लोकांच्या उदाहरणावरून चांगलें लक्ष्यांत येतें; कारण त्यांच्या टोळ्या एका सामान्य शास्त्याच्या कह्यांत गेलेल्या नसल्यामुळें त्या नेहमीं एकमेकींशीं लढाया करीत असतात; आणि म्हणून त्या लोकांत अशी चाल पडलेली आहे कीं, प्रत्येक शेतांत एकेक लहानसा मातीचा बुरूज उभारावयाचा, आणि तेथून

शेताचा मालक आणि त्याचे हाताखालचे लोक ह्यांनीं शेतांतील पिकाचें रक्षण करावयाचें. स्काटलंदच्या डोंगरी प्रदेशांतील टोळ्या जेव्हां एका मुख्य सत्ताधीशाच्या कह्यांत गेलेल्या नव्हत्या, तेव्हां तेथें जशी स्थिति होती तसल्या प्रकारची ही स्थिति आहे, पण त्याहून वाईट आहे; ते लोक आपल्या बायकांचें व गुराढोरांचें रक्षण करण्याकरितां मजबूद किल्ले बांधीत असत. अशा प्रकारचें ज्यास्त व्यापक नियंत्रण ज्या ठिकाणीं असतें, मग तें एका साध्या मुख्याचें असो किंवा संयुक्त मुख्याचें असो—त्या ठिकाणीं काय फायदे होतात हें प्राचीन काळच्या ग्रीक लोकांच्या उदाहरणावरून व्यक्त होतें. कारण त्यांच्या आम्फिक्टिऑनिक नामक सभेनें असा कायदा केला होता कीं, " ग्रीक लोकांच्या कोणत्याही टोळीनें दुसऱ्या कोणत्याही टोळींचीं घरें जमीनदोस्त करूं नये; आणि कोणत्याही ग्रीक शहरास वेढा घातला असतां तेथील पाणी बंद करूं नये ". लहान लहान समाज एकत्र होऊन एक मोठा समाज ज्या समाजरचनेच्या प्रगतीमुळें बनतो, तिच्या योगानेंही लोककल्याणाची वृद्धि कशी होते ह्याचें उदाहरण खुद्द इंग्लंद देशाच्या इतिहासांतच दिसून येतें; कारण रोमन लोकांनीं जेव्हां तो देश जिंकिला तेव्हां तेथें निरनिराळ्या टोळ्यांमध्यें होणाऱ्या ज्या लढाया त्या बंद झाल्या; आणि पुढें फ्यूडल सरदार जेव्हां राजाच्या कह्यांत गेले, तेव्हां त्यांच्या आपसांतील लढाया बंद पडल्या. बरें, ह्याच्या उलट स्थिति झाली म्हणजे पुनः लुटालूट कशी सुरू होते ह्याचींही उदाहरणें इतिहासांत विपुल आहेत*.

मोठमोठ्या आकारांच्या लोकसमूहांमधून राजकीय संघटना जशी वाढत जाईल, तशी ती व्यक्ती व टोळ्या ह्यांच्या कलहांमुळें उत्पन्न होणारा अडथळा काढून टाकून समाजकल्याणास प्रत्यक्ष उत्तेजन देते इतकेंच नाहीं, तर ती अप्रत्यक्षरीत्या त्या कल्याणास अन्य तऱ्हेनेंही उत्तेजन देते. लहानशा समाजसमूहामध्यें अगदीं अल्पशा श्रमविभागापलीकडे कांहीं होऊं शकत नाहीं. जिन्नसांची प्रकारसंख्या वाढण्याच्या अगोदर ते उत्पन्न करणारांची संख्या वाढली पाहिजे; आणि प्रत्येक जिन्नस अत्यन्त थोडक्या खर्चानें उत्पन्न व्हावयास लागण्याच्या पूर्वी तो उत्पन्न करण्याच्या ज्या निरनिराळ्या पायऱ्या आहेत, त्यांची वांटणी निरनिराळ्या काम करणारांमध्यें झाली पाहिजे. एवढ्यानेंच भागत नाहीं; कारण लोकसमाज मोठा असून जिनसांना मागणी मोठी असल्याविना, कमींत कमी खर्चानें जिन्नस तयार व्हावयास व्यक्तींचे जे मिश्रित समूह बनले पाहिजेत, ते बनावयाचे नाहींत, आणि ते सुलभ रीतीनें उत्पन्न करण्याच्या यंत्रांची जी वाढ झाली पाहिजे, तीही व्हावयाची नाहीं.

१०. पण सहक्रियेपासून फायदे होण्यास अगोदर राजकीय संघटना पाहिजे हें जरी खरें आहे, तरी ह्या संघटनेपासून कांहीं तोटेही अवश्यमेव होतात; आणि कधीं कधीं हे तोटे फायद्यांपेक्षांही ज्यास्त होण्याचा संभव असतो. कारण नियंत्रक रचना पोसाव्या लागतात; त्या जीं नियंत्रणें लादतील तीं सोसावीं लागतात; आणि सरकारचे कर व जुलम ह्यांपासून उत्पन्न झालेलीं अ-

निष्टें, सरकार ज्या अनिष्टांचा बंदोबस्त करितें, त्यांहून कदाचित् ज्यास्त होऊं शकतील.

कांहीं देशांतून कधीं कधीं राजे इतकी लुटालूट करीत असतात कीं, शेतकरी लोकांपासून ते सगळें धान्य बुचाडतात, आणि मग रयतेस पेरे करण्यासाठीं कांहीं बीं त्यांस परत द्यावें लागतें. आणि ह्यावरून व्यवस्था उत्पन्न करणारी जी ही राजरूपी संस्था ती अव्यवस्थेनें उत्पन्न होणाऱ्या विपत्तींहून ज्यास्त विपत्ति कधीं कधी कशी उत्पन्न करिते, हें चांगलें दिसून येतें. रोमनसाम्राज्याखालीं ईजिप्तची जी स्थिति होती तिजवरूनही ह्या गोष्टीचेंच निदर्शन होतें. कारण रोमनलोक तेथील देशी हपिसरांवर स्वतःचे हपीसर नेमीतच असत, आणि त्या देशांतील उत्पन्नावर तेथील कारभाराच्याच नव्हे तर बादशाही कारभाराच्याही खर्चाचें ओझें लादीत असत. नियमित करांव्यतिरिक्त, फौज कोठेंही ठेविलेली असली तरी तिला पोसण्यासाठीं व कपडेलत्ते पुरविण्यासाठीं जादा मागणी ते करीत असत. शिवाय सार्वजनिक इमारती वगैरे कामांसाठीं ह्यांव्यतिरिक्त मागण्या वरचेवर येतच असत. ह्या करांनीं खुद्द हपीसर लोक देखील इतके विपन्न झालेले असत कीं, ते “अन्न कमी करणारे उद्योग पत्करीत, किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे गुलाम बनत”. सरकारास ज्या देणग्या म्हणून प्रथम देत त्यांस लवकरच जबरीच्या देण्याचें स्वरूप येई; आणि पैसे भरून असल्या जाचांतून जे आपली सुटका म्हणून करून घेत, त्यांस असें आढळून येई कीं पैसे जाऊन पोहोंचले कीं जांच पुनः सुरू झालाच. गॉल (आली॰

कडील फ्रान्स) देशांत राजकीय संघटनेची फाजील वाढ झाल्यापासून होणारीं अनिष्टें ह्याच्याहूनही ज्यास्त भयंकर होतीं; आणि तीं रोमनसाम्राज्यास उतरती कळा लागली तेव्हां दिसूं लागलीं. कारण तेथें “ कर देणारांच्या मानानें ते घेणारांची संख्या इतकी मोठी होती, आणि कराचें ओझें इतकें जबर होतें कीं, कामकरी वर्ग त्याखालीं खचून गेला, मैदानें ओसाड पडलीं, आणि जेथें शेतें होतीं तेथें रानें बनलीं. ... . प्रत्येक प्रांतावर किती हपीसरांचा वर्षाव होई ह्याचें गणितच करतां येत नाहीं. ... ... चाबकांचा आवाज आणि ते खाणारांचें रडणें ह्यांनीं आकाश दुमदुमून जाई. प्रामाणिक गुलामानें धन्याविरुद्ध, बायकोनें नवऱ्याविरुद्ध, आणि मुलानें बापाविरुद्ध साक्ष द्यावी एतदर्थ त्यांस पीडा करीत.... ... ह्या सर्व जुलमांमुळें गुरांची संख्या कमी झाली, आणि लोक मरूं लागले. तरी मागें राहिल्यांना मृतांचे कर द्यावयास लावीत ”. ह्या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, “ लोकांना शत्रूपेक्षां कर गोळा करणाराची भीति ज्यास्त वाटूं लागली, आणि दुसऱ्यास टाळण्याकरितां ते पहिल्याकडे पळून जाऊं लागले, आणि अशी इच्छा करूं लागले कीं, रोमनसाम्राज्यांत राहण्यापेक्षां रानटी लोकांबरोबर राहणें बरें ”. त्याच देशांत अर्वाचीनकाळींही ह्याच गोष्टीची पुनरावृत्ति झाली. कारण फ्यूडल सरदार राजाच्या कह्यांत जाऊन त्या देशांत जरी अंतःशांततेचीं सुखें लोकांस भोगावयास मिळूं लागलीं, आणि राजाची सत्ता प्रबळ झाल्यामुळें, सूड उगविण्यासाठीं गुन्हेगाराच्या कोण-

त्याही नातेवाईकास ठार करण्याची रानटी चाल जरी बंद झाली, तरी राजकीय संघटनेच्या ह्या वृद्धीपासून तेवढींच किंवा त्यांहून ज्यास्त मोठीं इतर अनिष्टें उत्पन्न झालीं; म्हणजे कर, जबरीचीं कर्जें, विनाकारण जमिनी सरकारांत घेणें, मनसोक्त दंड, नाणीं हलक्या धातूचीं बनविणें, आणि सरकारी नोकऱ्या विकत मिळूं लागल्यामुळें लांचाची वृद्धि, ह्या सर्व गोष्टी उत्पन्न झाल्या; आणि ह्याचा परिणाम असा झाला कीं, पुष्कळ लोक दुष्काळानें मेले, पुष्कळांनीं आत्महत्या केल्या, आणि पुष्कळ घरेंदारें सोडून रानींवनीं भटकूं लागले. पुढें राजा स्वेच्छाचारी होऊन सर्व सामाजिक कृतींचें नियंत्रण करूं लागला, आणि त्यामुळें दोन शतकांच्या आंत अप्रत्यक्ष कराचें ओझें एक कोटीचें एकतीस कोटी झालें, सर्व राष्ट्र भिकारी व विपन्न झालें, आणि शेवटीं राज्यक्रांति झाली. हल्लीं देखील कित्येक ठिकाणीं असलीं उदाहरणें दिसतातच. इजिप्त देशांत नाईल नदींतून वर चाललें म्हणजे मुख्य सरकारापासून लोक जितके दूर तितके अधिक सुखी, असें आढळून येतें; आणि हिंदुस्थानांत, साहेब म्हणतात, आमचें राज्य फार कल्याणकारक आहे अशी बढाई आह्मी मारितों तरी, त्याबद्दल तेथील लोकांवर आह्मीं इतकीं जबर ओझीं व नियंत्रणें लादिलीं आहेत कीं, त्या लोकांस शेजारचींच देशी राज्यें आमच्याहून बरीं वाटतात, आणि म्हणून कांहीं भागांतील लोक आपलीं घरें सोडून निझाम व शिंदे ह्यांच्या मुलखांत जाऊन रहात आहेत.

राजकीय संघटनेपासून होणारा फायदा कमी करणारीं,

किंवा कधीं कधीं उलट नुकसान करणारीं जीं हीं अनिष्ट त्यांपासून शासितांचेंच तेवढें नुकसान होतें असें नाहीं, तर शास्त्यांचेंही नुकसान होतें. कारण निरनिराळ्या दर्जांचे अधिकारी खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जसे जुलूम करितात, तसे वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून ते जुलूम करून घेतात; आणि सर्वांत वरिष्ठ शास्ता देखील, त्याचें श्रेष्ठत्व कायम राखण्यासाठीं जी शासनपद्धति निर्माण केलेली असेल, तिचा गुलाम बनतो. ईजिप्तदेशांत प्राचीनकाळीं राजानें दररोज केव्हां काय करावें हें कायद्यानें अगदीं बारीक रीतीनें ठरविलेलें असे; आणि म्हणून तो नांवाचा जरी सर्वांत बलिष्ठ म्हणून समजला जाई, तरी खरोखर तो आपल्या प्रजेपेक्षां कमी स्वतंत्र असे. सर्व स्वेच्छाचारी राजांची स्थिति नेहमीं अशीच असते. जपानांत, परवांपर्यंत संघटनेचें स्वरूप कायमचें बनून गेलें असल्यामुळें, आणि अगदीं मोठ्यापासून अगदीं लहानापर्यंत सर्वांचे जीवितक्रम कायद्यानें सूक्ष्मरीत्या ठरविलेले असल्यामुळें, अधिकार चालविणें इतकें त्रासदायक झालेलें होतें कीं अधिकारी लोक आपला अधिकार आपोआपच सोडून देत; आणि म्हणून त्या देशाच्या संबंधानें आपल्या वाचनांत असें येतें कीं, " तेथें बादशहापासून तों अत्यन्त क्षुल्लक माणसापर्यंत सर्व वर्गांत राजीनामा येणें हें अगदीं सामान्य असे ". ह्या प्रतिक्रियारूप जुलमाचीं उदाहरणें युरोपियन राष्ट्रांतही आढळून येतात. गिबन म्हणतो, " बायझन्टाइन बादशहाच्या राजवाड्यांत त्यानें घालून दिलेल्या विधींचा तो पहिला गुलाम असे ". फ्रान्सांतील चवदाव्या

लुईच्या राजवाड्यांतील कंटाळवाण्या जीवितक्रमाच्या संबंधानें मॅडम मेन्टेनॉन असें म्हणते कीं, "तेथें अत्यन्त उच्च दर्जाचे जे लोक आहेत त्यांखेरीज जर कोणी ज्यास्त अभागी असतील तर जे त्यांचा हेवा करितात तेच होत. तेथें किती त्रास आहे ह्याची तुम्हाला कल्पनाच व्हावयाची नाहीं".

एवंच, व्यवस्था ठेविल्यानें आणि विस्तृत श्रमविभाग करतां येईल एवढे मोठाले समुदाय बनविल्यानें माणसांच्या गरजा जरी पहिल्यापेक्षां ज्यास्त चांगल्या भागूं लागतात, तरी त्यांच्या कृतींपासून झालेल्या उत्पन्नांचा बराच मोठा भाग काढून घेतल्यानें आणि त्यांच्या कृतींवर आळाबंदा घातल्यानें—आणि बहुधा जरूरीपेक्षां ज्यास्त प्रमाणावर ह्या गोष्टी केल्यानें त्यांच्या कल्याणामध्यें कमतरताही येत असते. आणि राजकीय नियमनापासून अप्रत्यक्षरीत्या तें नियमन चालवून घेणाराचें जसें नुकसान होतें, तसें तें नियमन करणारांचेंही होतें.

११. एकादें घर ज्या दगडांचें बांधलेलें असेल त्यांचा अन्य प्रकारचा उपयोग तें मोडिल्याविना करतां यावयाचा नाहीं. ते दगड जर चुन्यावर बसविलेले असतील, तर ते वियुक्त करण्यास ज्यास्तच त्रास करावा लागेल. आणि तो चुना जर शेंकडो वर्षें घट्ट झालेला असेल, तर त्याचे बनलेले गोळे फोडणें इतकें त्रासाचें काम होतें कीं, त्यापासून काढलेल्या दगडांनीं नवी इमारत बांधण्यापेक्षां अगदीं नव्या दगडांनींच ती बांधण्यास कमी खर्च लागतो.

ह्या गोष्टी येथें सांगण्याचें कारण हें कीं, कोणत्याही

गोष्टीची कोणतीही व्यवस्था अगोदर झालेली असेल, तर तिची पुनर्व्यवस्था करण्याच्या कामीं ती आडवी येते, हें सत्य उदाहृत व्हावें; आणि संघटना ही एक प्रकारची व्यवस्थाच आहे, म्हणून तिलाही हें सत्य लागू आहेच. एकादा जीव उत्क्रांत होत असतां त्याचा घटक पदार्थ प्रथम सामान्यतः समस्वरूप असून त्यास पुढें जेव्हां विविधजातीय भागांच्या संयोगाचें स्वरूप येतें, तेव्हां त्यामध्यें आणखी रूपान्तर होण्यास नेहमीं मोठी मारामार पडते, आणि कधीं कधीं तर अशक्यच होतें; म्हणजे, रचना जितकी ज्यास्त संमिश्र व ज्यास्त निश्चित असेल, तितकी ती आपल्यांत बदल करून घेण्यास ज्यास्त प्रतिबंध करिते. आणि ही गोष्ट जर व्यक्तिशरीरास ठळक रीतीनें लागू आहे, तर समाजशरीरास, जरी कमी ठळक रीतीनें, तरी लागू आहेच. समाजदेह हा सुटच्या घटकांचा बनलेला असल्यामुळें, आणि अगण्य सदृश समाजांकडून वंशपरंपरेनें त्याचा नमुना कायमचा बनलेला नसल्यामुळें, व्यक्तिशरीरापेक्षां ज्यास्त लवचीक असतो, तरी त्यास व व्यक्तिदेहास एकच तत्त्व लागू आहे. समाजाचे भाग जसजसे ज्यास्त विविधजातीय बनले जातील, म्हणजे समाजांतील वर्ग, निरनिराळीं कर्तव्यें करणारे जमाव, आणि कायमचे कारभार, जसे बनले जातील, आणि ते स्वतांशीं व इतरांशीं जसे सुसंगत होत जातील, तसे त्यांना बदलूं पाहणाऱ्या शक्तींशीं ते झगडा करूं लागतात. पुष्कळ दिवसांपासून स्थापन झालेल्या प्रत्येक संस्थेमध्यें जें प्रस्तुतस्थितिप्रेम आढळून येतें त्यावरून हें सत्य चांगलें उदाहृत होतें. एकाद्या

धर्मसंस्थेच्या व्यवस्थेंत बदल करण्यासाठीं होणाऱ्या कायद्यास धर्माधिकारी जो विरोध करितात तिकडे पाहिलें काय, लष्करी नोकऱ्या विकत घेण्याची जी चाल ती मोडतांना त्या खात्यांतील लोकांनीं त्यास केलेल्या विरोधाकडे पाहिलें काय, आणि कायद्यांच्या सुधारणेस वकील लोकांचा जो विरोध येतो तिकडे पाहिलें काय, सर्वत्र एकच गोष्ट दिसून येते; आणि ती ही कीं कोणत्याही संघटनेचे जे भाग एकदां विशिष्ट स्वरूप बनलेले आहेत, त्यांच्या रचना किंवा व्यापारसरणी ह्यांमध्यें सहजगत्या बदल करतां येत नाहीं.

सगळ्या जीवशरीराच्या विविधक्रियांचा सामान्य हेतु स्वसंरक्षण हा असतो हें जसें खरें आहे, तसें त्याच्या घटक इंद्रियांचा हेतु आपण आहों तसें आपणास संभाळून ठेवावें असा असतो हेंही खरें आहे. आणि तद्वतच सर्व समाजाच्या संयुक्तक्रियांचा हेतु समाजाचें अस्तित्व कायम राखावयाचें हा जसा असतो, तसा त्याचे निरनिराळे वर्ग, अधिकारीसमूह, आणि त्याचे इतर विशिष्ट भाग, ह्या सर्वांचा हेतु आपापलें अस्तित्व कायम राखावयाचें हा असतो, म्हणजे, जी क्रिया करावयाची तो नव्हे, तर ती क्रिया करणारांचें संरक्षण, हा मुख्य उद्देश होऊन बसतो; आणि ह्याचा परिणाम असा होतो कीं, एखाद्या रचनेचा व्यापार अनावश्यक किंवा प्रत्यक्ष हानिकारकही झाला तरी ती रचना साधेल तितके दिवस आपल्यास कायम ठेविते. ह्याचें उदाहरण म्हटलें म्हणजे लंदनमधील ट्रेड गिल्ड्स् किंवा व्यापारी जमाव हें होय; कारण त्यांचें पूर्वीचें काम जरी ते हल्लीं करीत

नाहींत, तरी त्यांनीं आपले विशेष हक्क मोठ्या हेव्यानें कायम ठेविले आहेत. अशीं दुसरीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

एकादी संघटना पुनःसंघटनेस किती अडथळा क-री त अ ते, हें तिचा विरोध संयुक्तप्रमाणानें वाढत जातो हें ध्यानांत आणिल्याशिवाय पुरतेपणीं लक्षांत य.वयाचें नाहीं. कारण प्रत्येक नवा भाग एकीकडे जसा फेरबदलास जादा अडचण उत्पन्न करितो, तसा दुसरी-कडे फेरबदल उत्पन्न करणाऱ्या ज्या शक्ती त्यांच्यामध्यें तो कमीपणा आणितो. बाकीच्या गोष्टी जशाच्या तशा-च राहून एकाद्या समाजांतील राजकीय रचनांची अ णखी वाढ झाली, पूर्वींच्याच राजकीय रचनांचा जर विस्तार झाला, किंवा नव्या रचना उत्पन्न झाल्या, जर सम जक्रियांचें ज्यास्त बारीक रीतीनें सूत्रधारित्व कर-ण्यासाठीं नवे कामगारसमूह नेमिले गेले, तर ह्या सग-ळ्याचे परिणाम असे होतात कीं, नियमन करणारांचा जो एकंदर जमाव तो मोठा होतो, आणि त्याबरोबरच तें करून घेणारांचा एकंदर समुदाय तितका लहान होतो. नियमन करणारांचा आणि कारभार करणारांचा जो एकंदर समूह असतो, त्यांतील सर्व लोक अनेक रीतींनीं एकमेकांशीं संयुक्त आणि इतरांपासून पृथक् होऊन जातात. त्यांचीं विशिष्ट कामें कांहींही असलीं तरी त्यांच्या खात्यांचे जे मुख्य अधिकारी त्यांच्याशीं त्यांचे संबंध सारखेच असतात, आणि त्यांच्या द्वारा मुख्य सरकाराशीं असतात; आणि म्हणून त्या सर्वांचा मिळून जो संस्थासमूह बनलेला असतो, त्यासंबंधानें

त्यांच्या कल्पना व मनोभावना सारख्याच झालेल्या असतात. राष्ट्रीय उत्पन्नांतून त्या सगळ्यांचा उदर-निर्वाह होत असल्यामुळें तें उत्पन्न कसें करावयाचें याबद्दलचीं आपलीं मतें व मनोविकार परस्पर-सदृश बनविण्याकडे त्यांचा साहजिक कल असतो. त्यांच्या निरनिराळ्या भागांमध्यें कांहींही मत्सरभाव असले तरी त्यांपैकीं एकाद्या भागाचें अस्तित्व किंवा विशेष हक्क ह्यांना धक्का बसण्याचा प्रसंग आला, म्हणजे ते ते एकीकडे गुंडाळून ठेवितात; कारण एका भागाला आज धक्का बसला तर उद्यां दुसऱ्याला बसेल ही त्यांस भीति असते. शिवाय त्या सर्वांचे समाजाच्या बाकी-च्या भागांशीं सारखेच संबंध असतात; कारण ते त्या भागांच्या कृत्यावर कोणत्या ना कोणत्या तऱ्हेची देख-रेख ठेवीत असतात; आणि म्हणून असल्या देखरेखी-ची आवश्यकता आणि तिला लोकांनीं नमून वागण्याची युक्तता, ह्याबद्दलच्या त्यांच्या समजुती सहजच परस्पर-सदृश झालेल्या असतात. विशिष्ट माणसांची पूर्वीचीं मतें कांहींही असोत, त्यांनीं कोणतींही सरकारी कामें पत्करिलीं कीं त्यांशीं जुळणाऱ्या अशा मतांकडे त्यांच्या मनाचा ग्रह झालाच पाहिजे. एवंच ज्या संस्था सा-माजिक शक्तींचें नियमन किंवा व्यवस्था किंवा पाहणी किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें नि-यंत्रण करीत असतील, त्या जसजशा वाढत जातील तसतसे त्यांत ज्यास्त फेरबदल होण्यास एकेक ज्यास्त अडथळा उत्पन्न होतो; आणि ह्याचें कारण जें बदलावयाचें तें ज्यास्त बळकट होत जातें, आणि तें जें

बदलणार तें कमी बळकट होत जातें हें होय; ह्याचा शेवटीं परिणाम असा होतो कीं, त्या संघटनेचा घट्ट-पणा फार वाढला जाऊन तिच्यांत फेरबदल करणें अ-शक्य होतें, आणि तिचा नमुना कायमचा बनून जातो.

राजकीय संघटनेची जशी एकेक ज्यास्त वाढ होत जाईल, तशी नियामकांची शक्ति वाढून आणि नियमि-तांची कमी होऊनच केवळ फेरबदलास होणाऱ्या अड-चणी वाढत जातात असें नाहीं. कारण लहानपणापासून जी राज्यपद्धति परिचित झालेली असेल तिला अनुकूल अशा सर्व समाजाच्या कल्पना आणि मनोभावना बनत जात असतात. आणि त्यामुळें ती पद्धति नैसर्गिकच आहे असें त्यास वाटूं लागतें. सरकारी संस्था रोजच्या अनुभवाचा जसा ज्यास्त भाग व्यापूं लागतील आणि इतर संस्थांकरितां कमी भाग शिल्लक ठेवूं लागतील, तसा सरकारी नियमन सर्वत्र आवश्यक आहे असें मा-नण्याचा लोकांचा कल वाढूं लागतो, आणि इतर रीतीं-नीं नियंत्रण करतां येईल हें मनांत आणण्याची त्यांची शक्ति कमी होत जाते शिवाय लोकांचे मनोभाव या नियामक संस्थाजालाला योग्य असे बनले गेल्यामुळें ते त्याला अनुकूल असेच होऊन जाऊं लागतात, आणि तें नसलें तर जी रिती जागा पडेल तिचा विचारच मनांत आणण्यास प्रतिकूल होऊन जातात. ह्या स-त्याचीं उदाहरणें फ्रान्स आणि जर्मनी या दोन्ही देशांत दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, फ्रेंच तत्त्वज्ञ कॉम्टे पुढें येणाऱ्या औद्योगिक स्थितीचा विचार करीत असतां, फ्रान्सांतील समाजस्वरूपास योग्य अशा भावनांचा

व अभिरुचींचा त्याजवर एवढा पगडा बसलेला होता कीं, त्यानें भविष्यत् कालच्या उत्तम स्थितीकरितां जी संघटनाक्लृप्ती सुचविली आहे, तिजमध्यें समाजाच्या युद्धशील नमुन्यास योग्य आणि औद्योगिक नमुन्याला अगदीं अयोग्य अशा व्यवस्था त्यानें योजिलेल्या आहेत. जें व्यक्तिस्वातंत्र्य औद्योगिक जीवितापासून उत्पन्न होतें आणि जेंणकरून औद्योगिक संस्थांस त्यांचें विशिष्ट स्वरूप प्राप्त होतें, त्या व्यक्तिस्वातंत्र्याचा त्याला अत्यन्त तिटकारा असे. जर्मनीमध्यें सोश्यालिस्ट किंवा समाजप्राबल्याभिमानी म्हणून जो पक्ष आहे, आणि ज्यांचा हेतु समाजसंघटना अगदीं नवी बनवावी असा आहे, व लोकही आहे म्हणून समजतात, त्या पक्षाचे लोक ज्या समाजनमुन्याखालीं वाढलेले आहेत त्याहून अन्यत्र रीत्या विचार करण्यास ते इतके अक्षम झालेले आहेत कीं, त्यांनीं योजिलेली जी नवी समाजपद्धति आहे, ती जी पद्धति त्यांच्या मनांत नष्ट करावयाची आहे तिचेंच तत्त्वतः नवें स्वरूप आहे. कारण त्या पद्धतीप्रमाणें सार्वजनिक संस्थांच्या द्वाराच जीवित आणि श्रम ह्यांवर देखरेख ठेविली जावयाची आहे, आणि त्या हल्लींच्या संस्थांसारख्याच सर्वत्र पसरावयाच्या असून त्यांच्यासारखाच त्यांनीं जबरदस्तीचा उपयोग करावयाचा आहे; म्हणजे व्यक्तिजीवितांचें नियमन हल्लींपेक्षांही ज्यास्त कडक व्हावयाचें आहे.

एवंच कायमच्या व्यवस्था नसल्यास सहक्रिया होऊं शकत नाहीं हें जरी खरें आहे, तरी ज्या व्यवस्थांमुळें हलक्या दर्जाचें सहकार्य सुलभ होतें, त्या वर-

च्या दर्जाच्या सहकार्यास अडथळा आणितात. निरनिराळ्या भागांमध्यें स्थापित संबंधांविना संयुक्त क्रिया जरी होऊं शकत नाहींत, तरी असले संबंध जितके ज्यास्त विस्तृत व संकीर्ण होत जातील, तसे त्या क्रियांचे सुधारलेले असे संबंध बनविणें ज्यास्त कठीण होऊन जातें. कारण त्यांस घट्ट करणाऱ्या शक्ती वाढत जातात, व सईल करणाऱ्या कमी होत जातात, आणि अखेरीस पूर्ण रचना पावलेल्या जीवशरीराप्रमाणें पूर्ण रचना पावलेलें समाजशरीर परिस्थितीस योग्य बनण्यास अक्षम असें होऊन जातें.

१२. सजीव प्राणी ज्याअर्थी प्रारंभीं परस्परसदृश अशा घटकसंचयांचा बनलेला असतो त्याअर्थी त्याच्या ठिकाणीं संघटनेची प्रगति व्हावयाची म्हणजे त्याच्या निरनिराळ्या विशिष्ट भागांचे जे घटक त्यांनीं प्रत्येकीं आपापलीं स्थानें संभाळली पाहिजेत इतकेंच नाहीं, तर त्यांच्या पश्चात् त्यांची प्रजा त्यांच्या त्या स्थानीं येऊन बसली पाहिजे. उदाहरणार्थ जे सूक्ष्म पित्तपिंड आपल्या क्रिया करीत असतां वाढतात, आणि नवे पित्तपिंड उत्पन्न करितात, ते क्षीण होऊन नष्ट झाले म्हणजे हे नवे पिंड त्यांच्या जागीं येतात; त्यांच्यापासून उत्पन्न होणारे सूक्ष्म पिंड, मूत्रपिंडांकडे किंवा स्नायूंकडे किंवा ज्ञानतंतूंच्या जुडग्यांकडे, स्वस्थान सोडून, त्यांच्या व्यापारास हातभार लावण्यासाठीं जात नाहींत. आणि हें उघडच आहे कीं, प्रत्येक इंद्रिय ज्या एकेऱ्या घटकांचें बनलेलें आहे, त्यांजपासून तसल्याच विशिष्ट घटकांची उत्पत्ति झाल्याविना, आणि ते त्याच

स्थानीं राहिल्याविना, भागाभागांच्या ज्या ठरीव संबंधांमुळें व्यक्तिशरीर विशिष्ट प्रकारचें बनलें जाऊन आपल्या विशिष्ट जीवनसरणीस योग्य असें बनतें, ते संबंध मुळींच उत्पन्न व्हावयाचे नाहींत.

समाजामध्यें देखील क्रमिक पिढ्यांतून स्थानें आणि व्यापार ह्यांची संक्रान्ति रचनास्थापनेस अनुकूल होते. राजकीय संघटना जशी सुधारत जाईल तसे जे वर्गविभाग उत्पन्न होतात त्यांचें रक्षण होण्यास प्रत्येक वर्गामध्यें पदवी आणि स्थान ह्यांचीं वंशपरंपरेनें संक्रांति झालीच पाहिजे. कांहीं समाजांत ज्या वर्गविभागांपासून निरनिराळ्या ज्ञाती बनतात, आणि कांहीं समाजांत समुदित असे धंदेसमूह बनतात, त्यांचीही स्थिति अशीच आहे. जेथें रूढी किंवा कायदा ह्यामुळें प्रत्येक कामकऱ्याच्या मुलांस बापाचा धंदा स्वीकारणें भाग पडतें, तेथें औद्योगिक रचनांमध्यें फेरबदल होण्यास अडचणी उत्पन्न होतात, आणि त्या, नियामकरचनांमध्यें दुर्लंध्य पदवीभेद असले म्हणजे त्यांच्या सुधारणेस ज्या अडचणी उत्पन्न होतात त्यांच्यासारख्याच असतात. आपल्या ह्या देशांत ही गोष्ट अत्यन्त मोठ्या प्रमाणांत दिसून येते; आणि प्राचीन काळीं इंग्लंदांत जे धंदेसमूह असत त्यांच्यांत ती कमी प्रमाणावर दिसून येत असे; कारण त्या समूहपद्धतीमुळें त्या त्या धंद्यांत असलेल्या लोकांच्या मुलांस तो तो स्वीकारणें सुलभ पडे, आणि इतरांनीं तो स्वीकारूं म्हटल्यास त्यांस अडथळा होई. एवंच पदवी आणि व्यापार

ह्यांची वंशपरंपरा जी संक्रान्ति तीस समाजसंघटनेंतील स्थैर्याचें तत्त्व असें म्हणतां येईल.

ह्या संक्रांतामुळ स्थैर्यास आणखी एका तऱ्हेनें मदत होत असते. कारण तेणेंकरून वडिलाची श्रेष्ठता कायम राहते; आणि या श्रेष्ठतेमुळें जी व्यवस्था स्थापित असेल ती तशीच राहण्याचा संभव उत्पन्न होतो. कारण वडील माणूस पूर्वींच्या राजाच्या, मांडलिकाच्या, नायकाच्या, यजमानाच्या, कामदाराच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही पदवी किंवा इस्टेट यामुळें अधिकृत झालेल्या माणसाच्या, मरणामागून, अधिकारक्रांतीच्या कांहीं ठरीव नियमांप्रमाणें, त्याच्या जागीं आला म्हणजे, त्याच्याहून तरुण लोक किंवा मध्यम वयाचे लोक ह्या दोघांसही तो कारभार करण्यांत हात घालतां येत नाहींसा होतो. ज्या ठिकाणीं धंदेउद्योगामध्यें देखील असाच नियम असतो, म्हणजे बाप मेल्याविना माल उत्पन्न करणें व विकणें ह्या कामावर वडील मुलाची नेमणूक होत नाहीं, त्या ठिकाणींही धाकट्या मुलास वडील भावाच्या कारभारांत हात घालतां येत नाहीं. आतां हें सत्य रोजच्या अनुभवांतील आहे कीं, उत्क्रमणसरणीमुळें संघटनेमध्यें जो घट्टपणा सारखा वाढत जातो, तेणेंकरून वृद्धमाणसामध्यें संवयी जास्त बळकट होत जातात, आणि त्यांस फेरबदल नकोसे होतात. एवंच पदवी आणि व्यापार हीं वंशपरंपरेनें सक्रान्त होत असलीं म्हणजे त्याबरोबरच सर्व सत्ता सर्वांत वडील माणसाकडे जावी अशी जी दुसरी चाल अवश्यमेव सुरू होते, तिजमुळें जिकडे तिकडे पुराणप्रियता प्रबल होते; आणि त्यामुळें

वस्तुस्थिति आहे तशीच राहण्यास आणखी कारण होतें

उलटपक्षीं, पदव्या आणि व्यापार हीं ज्यां मानानें माणसांच्या गुणांवरून मिळूं लागतील त्या मानानें सामाजिक फेरबदल सुलभ होतो. एका पदवीचे जे लोक दुसऱ्या पदवीमध्यें आपणास स्थापन करून घेतात ते तितक्यापुरता त्या पदव्यांमधील भेद प्रत्यक्षरीत्या मोडून टाकितात; आणि पहिल्या पदवीच्या लोकांशीं आपले कौटुंबिक संबंध कायम राखून आणि दुसऱ्यांतील लोकांशीं नवे संबंध जोडून ते भेद ते अप्रत्यक्षरीत्या दुर्बल करितात; आणि शिवाय त्या दोन पदव्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या कल्पना व मनोभावना पूर्वीं ज्या कमज्यास्त मानानें भिन्न असतात, त्या एकमेकांमध्यें आतां फेरबदल उत्पन्न करूं लागतात, आणि अशा रीतीनें शीलामध्यें फेरबदल होऊं लागतात. त्याचप्रमाणें माल उत्पन्न करणाऱ्या व पसरणाऱ्या वर्गांच्या पोटविभागांमध्यें एकमेकांत प्रवेश करण्यास जर अडचणी नसतील, तर ज्या मानानें हे प्रवेश ज्यास्त होतील, त्या मानानें प्रत्येकाचे शारीरिक व मानसिक प्रभाव इतरांचे स्वभाव बदलण्यास कारण होतात; आणि उद्यमभेदामुळें उत्पन्न होणारे स्वभावभेद स्थापण्याच्या कामीं अडथळा आणतात. पण अशा प्रकारचें हें एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत किंवा एका समूहांतून दुसऱ्या समूहांत जाणें त्या माणसांच्या त्या नव्या स्थानाला व कामाला योग्य असण्यावर एकंदरींत अवलंबून राहिलें पाहिजे. आगांतुकी करून जे दुसऱ्यांच्या धंद्यांत शिरतात त्यांना त्यांत यश येण्यास सामान्य योग्यतेहून ज्यास्त योग्यता त्यांचे अंगीं

असली पाहिजे; म्हणजे, त्यांतच ज्यांचा जन्म गेला आहे त्यांपेक्षां त्यांना तो धंदा चांगल्या रीतीनें करतां आला पाहिजे, म्हणजे, त्यांच्या उदाहरणानें तो धंदा करण्याची पद्धति सुधारली पाहिजे. एवंच ज्याच्या त्याच्या सामर्थ्याप्रमाणें ज्यास त्यास धंदा निवडण्याची मोकळीक देणें ह्यास समाजसंघटनेंत फेरबदल होण्याचें तत्त्व असें म्हणतां येईल.

योग्यतेप्रमाणें धंदा करण्याची मोकळीक असल्यानें फेरबदल होण्यास आणखी एका रीतीनें मदत होते. ती ही कीं त्यामुळें तरुणांना निरानिराळ्या धंद्यांत मुख्य अधिकार हातीं घेण्याची संधि सांपडते, आणि त्यामुळें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोन्ही तऱ्हांनीं धंद्यांत नाविन्य उत्पन्न करणें सुलभ होतें. शक्ति कमी होत चालली म्हणजे सुधारणेस ज्या अडचणी दिसूं लागतात, व तिजपासून जीं अनिष्टें दिसूं लागतात, त्यांबद्दल शक्ति भरपूर असेल तेव्हां मुळींच शंका वाटत नाहीं. शिवाय तरुणांमध्यें कल्पनाशक्ति ज्यास्त आणि संवयीचें दार्ढ्य कमी असल्यामुळें नव्या कल्पना स्वीकारण्यास आणि नव्या पद्धति अनुभवून पाहण्यास वृद्धांपेक्षां ते ज्यास्त तयार असतात.

एवंच असें सिद्ध होतें कीं, वंशपरंपरेनें कोणताही उद्यम प्राप्त झाल्यास तो जसा रचना घट्ट करण्यास कारणीभूत होतो, तसा योग्यतेनुरूप तो प्राप्त झाल्यास रचना लवचीक राखण्यास तो मदत करितो. वंशपरंपरा उद्यमप्राप्ति आहे तें राखण्यास अनुकूल असते, आणि योग्यतेनुरूप उद्यमप्राप्ति फेरबदलास अनुकूल असल्यामुळें तिजपासून सुधारणा होण्याचा संभव उत्पन्न होतो.

१३. व्यक्तिशरीरांप्रमाणें समाजशरीरांमध्यें देखील शरीराचा एकंदर गोळा जसा वाढत जाईल तशी रचनेची संमिश्रताही वाढत जाते हें आधीं सांगितलेंच आहे. लहान समाज संयुक्त होऊन जेव्हां एक मोठा समाज बनतो, तेव्हां त्या पोटसमाजांचें नियंत्रण करणाऱ्या ज्या व्यवस्था असतात त्यांना आधीन ठेवणारी एक नवी मुख्य व्यवस्था उत्पन्न करावी लागते; म्हणजे, नवीन रचनांची आवश्यकता उत्पन्न होते. बरें, पुनः असल्या समाजांचा आणखी संयोग झाला म्हणजे नियामक संस्थांमध्यें आणखी असलीच संमिश्रता उत्पन्न करावी लागते; आणि ह्या वाढीच्या प्रत्येक पायरीवर इतर सर्व व्यवस्थाही ज्यास्त संमिश्र झाल्याच पाहिजेत. ही गोष्ट लोकसंख्या वाढून किंवा राज्याचा विस्तार वाढून एकंदर गोळ्याची जी वृद्धि होते त्या दोहोंसही लागू पडते; आणि ह्याचीं उदाहरणें जुन्या रोमन साम्राज्याकडे पाहिलें काय, किंवा नव्या ब्रिटिश साम्राज्याकडे पाहिलें काय, दोन्ही ठिकाणीं सारखींच सांपडतात.

पण आतां ह्या सिद्धान्तापासून आणखी एक सिद्धान्त निष्पन्न होतो त्याकडे लक्ष द्या. जर एका पक्षीं ज्यास्त वाढींत ज्यास्त संमिश्र रचना अंतर्भूत होते, तर दुसऱ्या पक्षीं, रचना बदलण्यासारख्या असणें ही गोष्ट ज्यास्त वाढ होण्यास आवश्यक असते, आणि, उलटपक्षीं, रचना बदलत नाहींशी झाली कीं वाढ बंद पडते. ह्या सत्याचीं वरच्या सत्याप्रमाणेंच व्यक्तिशरीरांमध्यें स्पष्ट उदाहरणें सांपडतात. सजीव प्राण्याची धाकट्या अपक्व आकारांतून मोठ्या पक्व

आकारांत सक्रान्ति होण्यास शरीराच्या सर्व भागांचे आकार आणि सबंध बदललेच पाहिजेत; प्रत्येक इंद्रियाचा प्रत्येक भाग बदलला पाहिजे; आणि हे बदल उत्पन्न होण्यास त्यांमध्यें लवचीकपणा कायम असला पाहिजे. तद्वतच, पक्कपणा प्राप्त होण्याचा समय नजीक आल्यावर इंद्रियें आपल्या कायमच्या रचना धारण करूं लागतात, तेव्हां त्यांचा वाढत जाणारा निश्चितपणा आणि दृढता, हीं त्यांच्या वाढीस ज्यास्त ज्यास्त अडथळा आणूं लागतात. समाजाचेंही असेंच आहे. त्याचा गोळा वाढला म्हणजे त्याच्या पूर्वींच्या रचनांत फेरबदल करणें आवश्यक होतें, मग तो बदल नवा भाग जुन्यांत मिसळून होवो, किंवा जुन्या रचना नव्यांत प्रसरण पावून होवो. पण एकंदर व्यवस्था जितक्या जितक्या ज्यास्त विस्तृत होत जातील, तितका तितका ह्या गोष्टीस ज्यास्त अडथळा उत्पन्न होतो; आणि ताठरपणा प्राप्त झाला म्हणजे गोळ्याच्या वृद्धीमध्यें जे फेरबदल अंतर्भूत होतात तसले उत्पन्न होणें अशक्य होतें, आणि म्हणून वाढ बंद होते.

पण एवढ्यानेंच भागत नाहीं. नियमन करणाऱ्या व कारभार करणाऱ्या ज्या व्यवस्था आहेत, त्या वाढीचीं द्रव्यें आपल्यांत ओढून घेऊन वाढीस प्रतिबंध करितात. राजकीय संघटनेपासून प्राप्त होणाऱ्या फायद्यांबरोबर जीं अनिष्टें येत असतात, तीं दाखवीत असतां हा परिणाम आधींच अप्रत्यक्षरीत्या ध्वनित केला आहे. तेथें असें दाखविलें होतें कीं, सरकारचे खर्च जिन्नस उत्पन्न करणारांचा माल घेऊन त्यांच्या जिवितांत तूट आणीत

असतात; पण याचा अखेर परिणाम समाजाच्याच जीवितांत तूट पडावी हा होतो; म्हणजे, घटकांची जी नुकसानी तिच्यामुळें सगळ्या समूहाची नुकसानी होतें. ज्या ठिकाणीं सार्वजनिक (सरकारी) कामासाठीं खासगी साधनें फार अतिरिक्त काढून घेतलीं जातात (कर जबर बसवितात), तेथें दारिद्र्योत्पत्ति होऊन लोकसंख्या कमी होते; आणि जेथें कमी अतिरिक्त काढून घेत असतील, तेथें लोकसंख्या वाढावयाची बंद होते. उघडच, ज्या समाजघटकांचा मिळून नियामक भाग (सरकार) बनलेला असतो ते घटक आणि त्यांचे जे सर्व आश्रित त्यांना जीविताचें साधन समाजाचे जे भाग मालाचें उत्पन्न व वांटणी हे व्यापार करीत असतात त्यांसच पुरवावें लागत असतें; आणि म्हणून इतर भागांच्या मानानें हे नियामक भाग बरेच वाढत चालले, तर सरतेशेवटीं अशी स्थिति आलीच पाहिजे कीं, त्या वेळीं, उत्पादक व विभाजक वर्गांपाशीं खाऊन पिऊन जी शिल्लक राहिली असेल ती सर्व संपून जावी; आणि असें झालें म्हणजे पोषणाभावीं लोकसंख्यावृद्धि बंद झालीच पाहिजे.

एवंच, समाजाची रचना आणि त्याची वाढ ह्यांमध्यें एक महत्त्वाचा संबंध वसत असतो. जरूरीहून ज्यास्त संघटना झाल्यास, एरवीं जी आकारवृद्धि, आणि म्हणून उच्चतर नमुन्याची प्राप्ति, हीं झालीं असतीं, तीं व्हावयाचीं बंद पडतात.

१४. आपणांस आतां लवकरच ज्या विशिष्ट गोष्टींची उपपत्ति लावावयाची आहे ती लावण्याच्या कामीं

मदत व्हावी एतदर्थ ह्या आतांपर्यंत सांगितलेल्या सामान्य गोष्टी आपण मनांत वागविल्या पाहिजेत. त्यांचा थोडक्यांत असा गोषवारा देतां येईल:—

सहक्रिया समाजाच्या योगानें शक्य होते, आणि समाजास शक्य करिते; तिला अगोदर समुदित माणसें असलींच पाहिजेत; आणि माणसें समुदित रहातात ह्याचें कारण सहक्रियेपासून फायदे होतात हें होय.

परंतु वेळ, राशी, आणि प्रकार, ह्यासंबंधानें क्रिया सुसंगत करणाऱ्या व्यवस्था असल्याविना सर्वांच्या मिळून क्रिया होऊं शकणार नाहींत; आणि सहक्रिया करणारांनीं निरनिराळीं कामें अंगावर घेतल्याविना निरनिराळ्या प्रकारच्या क्रिया होऊं शकणार नाहींत. म्हणजे काय, तर, सहक्रिया करणारे स्वेच्छेनें किंवा स्वेच्छेविना संघटित बनले पाहिजेत.

सहक्रियेमध्यें जी संघटना गर्भित होते ती दोन प्रकारची असून त्यांचे उद्गम आणि अंतःस्वरूपें हीं अगदीं निरनिराळीं असतात. एक प्रकारची संघटना व्यक्तिविषयक उद्देश साधण्यासाठींच प्रत्यक्ष उत्पन्न झालेली असून, आणि तिजपासून समाजकल्याण अप्रत्यक्षरीत्याच होत असून, ती न समजतां वाढत असते, आणि तिजमध्यें जबरीचा भाग मुळींच नसतो. दुसऱ्या प्रकारची संघटना सामाजिक हेतू साधण्यासाठींच प्रत्यक्ष उत्पन्न झालेली असून, आणि तिजपासून व्यक्तिहित केवळ अप्रत्यक्षरीत्या होत असून, ती जाणूनबुजून उत्पन्न केलेली असते, आणि ती नियंत्रक असते.

राजकीय संघटनेनें सहक्रिया शक्य झाल्यामुळें, जरी

तिजपासून फायदे होतात, तरी त्या संघटनेपासून त्या फायद्यांत तूटही पडत असते. तिला अस्तित्वांत ठेवण्यास बराच खर्च येतो; आणि म्हणून कधीं कधीं ह्या संघटनेपासून टळणाऱ्या अनिष्टांपेक्षां हा खर्चच ज्यास्त मोठें अनिष्ट बनतें. तिला लोकांवर निबंधनें लादावींच लागतात; आणि हीं निबंधनें इतकीं कडक होण्याचा संभव आहे कीं, मुळींच शास्ता नसून जीं दुःखें प्राप्त व्हावयाचीं, तींच बरीं असें लोकांस वाटूं लागावें.

कोणतीही संघटना स्थापन झाली म्हणजे ती पुनः-संघटनेस अडथळा आणिते. कोणत्याही सगळ्या गोळ्याप्रमाणें त्याच्या प्रत्येक भागाचाही मुख्य उद्देश स्वसंरक्षण करणें हा असतो; आणि म्हणून एकदां बनलेले भाग उपयुक्त असोत व नसोत, स्वतास अस्तित्वांत ठेवण्याकडे त्यांची नेहमीं प्रवृत्ति असते. शिवाय इतर गोष्टी जशाच्या तशाच राहिल्यास, नियामक रचनांत ज्यास्त ज्यास्त भर पडणें ह्याचा अर्थ नियमित असा जो बाकीचा समाज तो कमी होणें असाच होतो; आणि म्हणून असें होतें कीं, एकीकडे फेरबदल होण्यास येणारे अडथळे वाढत असतां, दुसरीकडे फेरबदल उत्पन्न करणाऱ्या शक्ती कमी होत जातात.

समाजाची संघटना कायम राहण्यास त्या गोष्टीची जरूर आहे कीं, त्यांतील पोटरचना ज्यांच्या बनल्या आहेत ते घटक जसे मरत जातील, तसे त्यांच्या ठिकाणीं नवे घटक उत्पन्न झाले पाहिजेत. त्यांच्या मरणानें ज्या रिकाम्या जागा पडतील, त्या त्यांच्या वंशजांनीं न भांडतां जर भरून काढिल्या तर, समाजस्थैर्यास तेणें-

करून बळकटी येते; आणि अनुभवानें त्या जागांना सर्वांत योग्य म्हणून जे ठरतील, त्यांनीं त्या जागा भरून काढिल्यास फेरबदलास उत्तेजन मिळतें. एवंच, वंशपरंपरेनें सक्रांति हें समाजाच्या ताठरपणाचें बीज आहे; आणि गुणानुरूप संक्रान्ति हें समाजाच्या लवचीकपणाचें बीज आहे.

सहक्रिया शक्य होण्यास, आणि म्हणून सामाजिक वाढ सुलभ होण्यास, संघटना जरी आवश्यक आहे, तथापि जी संघटना बनवावी तीच वाढीस व्यत्यय आणिते; कारण ज्यास्त वाढ व्हावयाची म्हणजे पुनःसंघटना झालीच पाहिजे, आणि तीस तर अस्तित्वांतील असलेली संघटना प्रतिरोध करिते; आणि दुसरें कारण हें कीं, ती संघटना वाढीचें जें द्रव्य त्यांतील कांहीं भाग आपल्यांत ओढून घेत असते.

म्हणून प्रत्येक पायरीवर, संघटना पूर्ण केल्यानें जरी तात्कालिक ज्यास्त चांगले परिणाम घडवून आणिता येतात, तरी तेणेंकरून अन्तिम असे जे ज्यास्त चांगले परिणाम त्यांस कांहीं तरी खो बसतोच.

प्रकरण तिसरें

राजकीय संकलन

१५. व्यक्तिशरीर आणि समाजशरीर ह्यांमध्यें जें इतक्या पुष्कळ बाबतींत साम्य दृष्टीस पडतें, तें वाढ करणाऱ्या ज्या क्रिया त्यांच्यासंबंधानें देखील दृष्टीस पडतें. ह्या साम्याच्या दृष्टीनें राजकीय संकलनाकडे आतां नजर फेंकल्यास फार बोधप्रद होणार आहे.

प्रत्येक प्राणी जो आत्मपोषण आणि वाढ हीं करितो, तीं इतर प्राणिघटक जीं द्रव्यें किंवा वनस्पतिघटक द्रव्यें तीं आपल्यांत ओढून घेऊन करितो आणि अत्यंत सूक्ष्म जंतूपासून तों वरवर अत्यन्त मोठ्या आकारांच्या आणि अत्यन्त उच्च दर्जाच्या प्राण्यांपर्यंत एकंदर प्राण्यांचें जें उत्क्रमण झालेलें आहे तें अशा रीतीनें आपल्यांत खाद्य ओढून घेण्याचा जो कलह त्यांत यश येऊनच झालेलें आहे. अत्यन्त हलक्या जातीचे जे प्राणी आहेत ते ही गोष्ट शुद्ध भौतिक किंवा अचेतन रीतीनें करीत असतात. ज्ञानतंतुजाल किंवा ठरीव असे शरीराचें निरनिराळे भाग कांहींच नसतां, ह्रिझॉपॉड (सूक्ष्मपाद) हा प्राणी पोषकद्रव्याचे कण आपल्यांत ज्या क्रियांनीं ओढून घेतो, त्यांस अचेतन किंवा अजाण म्हणणें भागच पडतें. असले सूक्ष्म प्राणी एकत्र होऊन जे साधे समूह बनतात त्यांचें असेंच आहे. उदाहरणार्थ, स्पंज हा प्राणिसमूह त्याचें जें तंतुजाल मृतस्थितींत आपण पाहतों त्यामध्यें, जिवंत असतां, कितीतरी एकेरे

जीव बाळगून असतो; आणि स्पंजाच्या ठिकाणीं ज्या चळवळी चालतात त्या अशा असतात कीं तेणेंकरून त्या एकेऱ्या जीवांच्या पृथक् जीवितांचें रक्षण प्रत्यक्षरीत्या होतें, आणि सगळ्या जीवसमूहाचें अप्रत्यक्षरीत्या होतें; कारण सगळ्याला मिळून चेतना नसते व चलनशक्तिही नसते. पण ह्याच्याहून उच्चतर दर्जाच्या संयुक्त जीवाच्या ठिकाणीं पोषकद्रव्यें आपल्यांत ओढून घेण्याची क्रिया सचेतन रीतीनें चाललेली दृष्टीस पडते; आणि तिच्यांत व वरच्या क्रियेंत फरक असा दृष्टीस पडतो कीं, ती प्रत्यक्षरीत्या सगळ्या समूहाचें पोषण करिते, आणि अप्रत्यक्षरीत्या त्यांतील घटकजीवांचें करिते. सरतेशेवटीं, ज्यास पूर्वीं त्याच्यांतील घटक सूक्ष्म प्राण्यांच्या जीविताच्या पलीकडे मुळींच जीवित नव्हतें असा तो आतां चांगलें घनीभवन पावलेला व व्यवस्थित बनलेला जीवसमूह त्या घटकांच्या जीवितांहून प्रबल असें समुदित जीवित प्राप्त करून घेतो; आणि ज्या इच्छांच्या द्वारा त्यास आपल्या चळवळीस समुदाय बनविण्याच्या क्रियांचें स्वरूप देतां येतें अशा इच्छाही त्यास आतां प्राप्त होतात. पुढें त्याचें उत्क्रमण चाललें असतां, त्याचा आकार जसा वाढत जाईल तसा तो भक्ष्य म्हणून मोठमोठाले समूह आपल्यांत ओढून घेत असतो.

समाजरूपी शरीरांची वाढ आणि त्याबरोबर होणाऱ्या क्रियांचीं स्वरूपें ह्यांमध्यें असलींच साम्यें दाखवतां येतात. प्रारंभीं घटकव्यक्तींमध्यें दिसणाऱ्या जीवितापेक्षां निराळें असें जीवित त्यांच्या समूहांत नसतें; आणि जशी संघटना वाढत जाईल, तसेंच परस्परावलंबी क्रियांच्या

रूपानें बनलेलें जें संयुक्त जीवित तें त्या सगळ्या समूहास मिळून प्राप्त होतें. रानटी टोळीचे घटक, सईलरीतीनें समुदित झालेले, आणि अधिकारविभागविहीन, असे असल्यामुळें, व्यक्तिसंरक्षणापासून प्रत्यक्ष मदत व्हावी एतदर्थच सहक्रिया करितात, आणि समुदायसंरक्षणाकरितां त्या मानानें फारच अल्प प्रमाणावर करितात. सगळ्यांच्याच हितावर एकदम गदा आली असतां जेव्हां ते एकसमयावच्छेदेंकरून लढतात, तेव्हां देखील ते पृथक् पृथक् लढतात; म्हणजे, त्यांच्या क्रियांना सुसंगतस्वरूप आलेलें नसतें; आणि जय आल्यास ते जी लूट आणितात ती अशाच प्रकारची असते कीं जी व्यक्तिव्यक्तींना स्वताला म्हणून घेतां येईल. पण असल्या व्यवस्थितस्वरूप न पावलेल्या समूहांमध्यें जीवनार्थ कलह चालले असतां, प्रत्येक टोळीला व्यक्तिस्वरूप येईल अशी राजकीय संघटना त्यांजमध्यें उत्पन्न होऊन, त्याबरोबर एकमेकांस प्रथम कांहीं अंशीं आणि मग सर्वांशीं समुदित करण्यासाठीं कलह सुरू होतो. ज्या टोळ्या ज्यास्त मोठ्या किंवा ज्यास्त व्यवस्थित, किंवा दोन्ही प्रकारच्या, असतात त्या शेजारच्या टोळ्यांस जिंकतात, व आपल्यांत सामील करितात, आणि मग ते एका सगळ्याचे घटकभाग बनतात. आणि राजकीय उत्क्रमण जसें वाढत जाईल, तसा ज्यास्त मोठ्या व बलिष्ठ समाजांचा हा एक स्वभावविशेष बनून जातो कीं, त्यांस दुर्बलतर समाजांस जिंकून आपल्यांत सामील करण्याची प्रबल वासना होऊं लागते.

लहान जमावांच्या लढाया आणि मोठ्या राष्ट्रांच्या

लढाया यांतील फरक पाहिला म्हणजे हा भेद पूर्णपणें लक्षांत येईल. रानटी माणसांमध्यें खाद्य मिळविण्यासाठीं खटपट चालत असतां जेव्हां एक टोळी दुसरीच्या मुलखांत शिरते तेव्हां व्यक्तींचे जे खाद्यासाठीं चाललेले कलह त्यांस टोळयांच्या कलहांचें स्वरूप येतें. गुरेंढोरें बाळगून राहण्याची किंवा धनगरी स्थिति आली म्हणजे त्या कलहहेतूंत कांहीं फरक उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, बेचुआना लोक मागील दरवड्यांचा सूड उगविणें हेंच बहुधा लढाईचें कारण दाखवीत असतात; पण त्यांचा खरा हेतु शत्रूचीं गुरेंढोरें आणावीं हा असतो. प्राचीनकाळीं युरोपांतही अशीच स्थिति होती; उदाहरणार्थ, ट्रोजन लोकांबद्दल आकिलीस असें म्हणतो कीं, " त्यांनीं माझा कधीं अपराध केला नाहीं, कारण त्यांनीं माझे बैल किंवा घोडे कधींही चोरलेले नाहींत ". प्राचीनकाळीं स्काटलंदातही गुरें चोरून नेणें ह्यावरून निरनिराळ्या टोळयांच्या लढाया वारंवार होत असत हें ध्यानांत आणतां हे व्यक्तिपोषणाचे कलह किती सारखे चालत हें स्पष्ट होतें. जेथें जीवित शेतीवर चाललेलें असेल तेथें देखील प्रारंभीं असेंच होतें. उदाहरणार्थ, खोंड लोकांबद्दल म्याकफर्सन असें म्हणतो कीं, प्रांताच्या हद्दीवरील जमिनीच्या एकाद्या लहान तुकड्याबद्दल देखील शेजारशेजारच्यां गांवांमध्यें त्या लोकांत लढाईचा प्रसंग येतो. एवंच, प्रथम प्रथम सामाजिक वाढीबद्दल जी चढाओढ सुरू असते ती त्या वाढीला अप्रत्यक्षरीत्या हितकारक असें जें व्यक्तिहित त्याच्या साधनांबद्दल असते.

हें सामान्य सत्य आणखी एका रीतीनें उदाहृत झालेलें दृष्टीस पडतें. घटकांची संख्या वाढवून समाजाची वाढ जास्त करणें ही गोष्ट असल्या समाजांत स्त्रियांस चोरून आणण्याच्या रूपानें दृष्टीस पडते, आणि रानटी लोकांत लढाईचें हें आणखी एक कारण असतें. बायका चोरून आणल्यानें प्रथम त्यांच्या रूपानें आणि मागून त्यांस पोरें होतील त्यांच्या रूपानें अशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या लोकसंख्येंत भर पडत असते. सारांश, येथें देखील व्यक्तींनीं कांहीं वस्तू आपल्याशा करून घेतल्यानें प्रत्यक्षरीत्या, व त्यांचें पुनरुत्पादन करून अप्रत्यक्षरीत्या, समूहवृद्धि होत असते.

उलट पक्षीं, ह्यांहून पुढें गेलेल्या समाजांत जे कलह दृष्टीस पडतात ते एकमेकांचीं पोषणसाधनें किंवा संततिसाधनें जबरीनें आपलींशीं करण्यासाठीं होत नाहींत, तर सर्व समाजच आपलासा करण्यासाठीं होत असतात. मोठाल्या राष्ट्रांच्या इतिहासाकडे पाहतां एका दृष्टीनें तो अशाच प्रकारच्या कलहांमध्यें मिळविलेल्या विजयांचा इतिहास म्हणून आढळून येतो; आणि आतांपर्यंत राष्ट्रांची वृद्धि अशाच रीतीनें होत आहे. इटालीचा एक भाग फ्रान्सानें आपल्यास जोडिला आहे; फ्रान्साचा जर्मनीनें जोडिला आहे; टर्कीचा रशीयानें जोडिला आहे.

एवंच, व्यक्तिशरीरांप्रमाणेंच समाजशरीरांमध्येंही उच्च संघटना व्हावयास जरूर आणि आवश्यक असे जे मोठाले समूह ते, प्रथम एकमेकांचीं वाढीचीं साधनें आपलींशीं करून, आणि नंतर एकमेकांसच भक्षण करून, जो जीवनार्थ कलह चालतो, त्यापासून उत्पन्न होतात.

१६. बाह्यस्थितीमुळें आणि अंतःस्थितीमुळें राजकीय संकलनास कधीं साहाय्य होत असतें आणि कधीं विरुद्ध होत असतें. ह्या स्थितींत परिस्थिति विशेष येतात, आणि समाजघटकव्यक्तींचीं शीलेंही येतात. त्यांचा आपण अनुक्रमें विचार करूं.

हवा वाईट असल्यास किंवा जमीन नापीक असल्यास लोकसंख्या न वाढल्यामुळें राजकीय संकलनास प्रतिबंध कसा होतो, हें ह्या शास्त्राच्या पहिल्या भागांत दाखविलेंच आहे. तद्वतच पृष्ठभाग फार सारखा असणें आणि खनिज पदार्थ, प्राणी आणि वनस्पति हेही सारखे असणें, हेही त्यास मोठालेच अडथळे होत; मानवी कल्याणास अनुकूल किंवा प्रतिकूल असे जे वनस्पतिविशेष व प्राणीविशेष त्यांवरही सामाजिक वाढीस आवश्यक जी व्यक्तींची भरभराट ती कांहीं अंशीं अवलंबून असते; ह्याही गोष्टी तेथें दाखविल्याच आहेत. तद्वतच तेथें असेंही दाखविलें होतें कीं, दळणवळणास आणि पळून जाण्यास साहाय्यकारक किंवा प्रतिबंधकारक जशी वसतिस्थानाची रचना असेल, तसा तेथें बनलेल्या सामाजिक समूहाचा आकार बऱ्याच अंशानें मोठा लहान होत असतो. उदाहरणार्थ, ताहिती, हवाई, टोंगा, वगैरे पॉलिनिशियन बेटांच्या सभोंवतीं चोहोंकडून समुद्र असल्यामुळें तेथील रहिवाशांचे बरेच मोठाले जमाव लहान लहान भागांत बनलेले आहेत. राहण्याच्या ठिकाणीं दळणवळणाचे मार्ग चांगले असले तर लोकसंख्या ज्यास्त होण्यास चांगली मदत होते.

समाजवृद्धीस व्यक्तींची एकप्रकारची शरीरयष्टि-

हीं पाहिजे ह्याबद्दलचा पुरावा तेथेंच दिला होता. ह्या ठिकाणीं आणखी असें सांगावयाचें कीं ज्यासारख्या श्रमांव्यतिरिक्त समाजसुधारणा व्हावयाची नाहीं ते श्रम करण्यास जी चांगली शरीरशक्ति पाहिजे ती एकदम यावयाची नाहीं; तर वंशपरंपरा प्रकृति सुधारतां सुधारतां हळूहळूच येईल. हलक्या दर्जाच्या माणसांच्या अंगीं काम करण्याचें सामर्थ्य नसतें याचीं साक्ष पारागवेमधील इंदियन लोकांत सांपडते. जेसुइट लोकांनीं त्यांच्यावर व्यवस्थित अम्मल सुरू करून त्यांस उद्योग करण्याची संवय लाविली, पण त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांस संततिच होईनाशी झाली. असा अनुभव इतर रानटी लोकांच्या संबंधानेंही आलेला आहे, आणि त्यास कारण त्यांच्या अंगीं फार श्रम सोसण्याची कुवत नाहीं हें होय.

मूळमाणसाच्या मनोवृत्तिविशेषांचा विचार करतांना, माणसाचे मोठाले समुदाय जमण्यास कोणते नैतिक विशेष अनुकूल असतात व कोणते प्रतिकूल असतात हेंही तेथें (पहिल्या भागांत) सांगितलें होतें. एथें इतरांस नमून वागण्यास ज्या विशेषांमुळें ते योग्य किंवा अयोग्य बनतात तेवढ्यांचींच उदाहरणें देतों. अबार लोक स्वताच आपल्याविषयीं म्हणतात कीं, आह्मीं-वाघासारखे आहों, आमच्यापैकीं दोन असामी देखील एकत्र राहूं शकावयाचे नाहींत. त्यामुळें त्यांचीं घरें दूर दूर, एकेटीं, किंवा फार तर, दोन दोन तीन तीन, एकेका ठिकाणीं असतात. उलटपक्षीं, कांहीं आफ्रिकन जातींचे लोक त्यांच्यावर जबरी केली म्हणजे कह्यांत येतात इतकेंच नाहीं, तर जो जबरी करील त्यास ते वाखाणि-

तात. गाल्टन म्हणतो, डमारा लोकांस गुलाम होणें फार आवडतें, आणि ते धन्याच्या मागून कुत्र्यासारखे जातात. दक्षिण आफ्रिकेंतील दुसरा एक माणूस स्पेन्सर साहेबांच्या एका ओळखीच्या गृहस्थास म्हणाला, " असे कसे तुम्ही धनीपणा करतां? आज मी दोन वर्षें तुमच्या नोकरीस असून तुम्हीं मला एकदां देखील मारिलें नाहीं ". आतां राजकीय संकलन होणें हें स्वभावभेदावर बरेंच अवलंबून असतें हें उघडच आहे.

शिवाय, भटकण्याची उपजतबुद्धि अंगीं असणें किंवा नसणें हेंही ह्यास एक कारण असतेंच. ज्यांनीं पिढ्यानुपिढ्या पारध करून किंवा गुरें-ढोरें बाळगून भटकण्यांत आपलें जीवित घालविलें आहे, त्या लोकांस जबरीनें शेती करावयास लाविली, तरी ते एकत्र जमाव करून राहूं शकत नाहींत. आपल्या ह्या देशांतील डोंगरी लोकांचें असेंच आहे. उदाहरणार्थ, कुकी लोकांना भटकण्याची इतकी संवय आहे कीं, ते एकेच ठिकाणीं दोन किंवा तीन वर्षांवर रहावयाचे नाहींत; मिश्मी लोकांचें असेंच आहे; ते आपल्या गांवास कधींच नांव देत नाहींत; कारण एकेठिकाणीं ते कधींच फार दिवस रहात नाहींत. कांहीं जातीच्या लोकांत ही संवय मोठालीं शहरें त्यांनीं बनविलीं तरी जात नाहीं. आतां ज्यांस आपल्या मूळ घराची फार चाड आहे अशा लोकांपेक्षां असल्या लोकांस आपले मोठे जमाव बनविणें फार कठीण जातें हें उघडच आहे.

कोणते बुद्धिविशेष मनुष्यसमुदाय जमण्यास अनुकूल असतात व कोणते प्रतिकूल असतात, हेंही

पूर्वी सांगितलेंच आहे. एथें त्यासंबंधानें आणखी दोन महत्त्वाचीं सत्यें सांगतों. सामाजिक जीवित सहक्रियेचें असल्यामुळें तीस अनुकूल अशा माणसांच्या मनोवृत्तीच असल्या पाहिजेत असें नाहीं, तर सहक्रियेपासून फायदे काय होतात ते ओळखण्याची व सहक्रिया घडून येईल अशा रीतीनें वागण्याची त्यांचे अंगीं बुद्धिही असली पाहिजे. असुधारलेल्या लोकांमध्यें जो विचारीपणाचा, कार्यकारणसंबंधविषयक ज्ञानाचा, आणि रचनात्मक कल्पनाशक्तीचा अभाव दृष्टीस पडतो, तेणेंकरून त्यांच्यामध्यें सहक्रियेस किती अडथळा येतो हें त्याचीं उदाहरणें पाहिल्याखेरीज ध्यानांत यावयाचें नाहीं. अर्धवट रीतीनें सुधारलेले लोक देखील अगदीं साध्या गोष्टींत आश्चर्यकारक असा सहक्रियेचा अभाव दाखवितात. एवंच सहक्रिया बरोबर रीतीनें होण्यास मुख्याच्या कह्यांत राहण्याची नैतिकबुद्धिच माणसांत पाहिजे असें नाहीं, तर त्याच्यावर विश्वास बसेल अशी बौद्धिक स्वभावघटनाही पाहिजे. म्हणून योग्य मनुष्य पाहिला म्हणजे त्याच्या अंगीं दैविकशक्ति आहे असें समजावयाचें अशी जी असुधारलेल्यांची किंवा अर्धवट सुधारलेल्यांची भोळी भावना असते, आणि पुढें जिच्यामुळें त्याच्या भुताची भीति वाटून माणूस त्यानें पूर्वी केलेल्या आज्ञा पाळण्यास तयार होतो, आणि जिच्यामुळें त्याचे वंशजही देवच आहेत असें वाटून त्याच्या राजकीय नियंत्रणास दुजोरा येतो, त्या भोळ्या बुद्धीविना राजकीय संकलनाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर चालावयाचेंच नाहीं. जबरीच्या सहक्रियेची जीस जरूर आहे अशा

प्रकारची जोंपावेतों माणसाची नैतिक व बौद्धिक स्वभावघटना असेल तोंपावेतों त्याच्याठायीं संशयबुद्धि असणें हें विघातक होत असतें.

एवंच राजकीय संकलनास पुष्कळ ठिकाणीं परिस्थितीमुळें अडचण येत असून, पुष्कळ जातींमध्यें त्याची फारशी प्रगति न होण्यास त्यांच्या शारीरिक, नैतिक, व बौद्धिक स्वभावाची अपात्रता हें कारण होत असतें.

१७. सामाजिक संयोग होण्यास व्यक्तींच्या स्वभावपात्रतेखेरीज त्यांच्या ठिकाणीं बरीच स्वभावसमरूपताही असावी असते. प्रारंभीच्या समूहांतील व्यक्तींचीं एकमेकांशीं जवळदूरचीं नातीं असल्यामुळें ही आवश्यक समस्वरूपता त्यांच्या ठिकाणीं आयतीच असते. ह्याचा पुरावा रानटी लोकांत आपल्यास सर्वत्र सांपडतो. उदाहरणार्थ, बुशमेन लोकांबद्दल लिटेन्स्टिन असें सांगतो कीं, त्यांच्यामध्यें कुटुंबांचेच तेवढे एकेरे लहान लहान जमाव बनत असतात. रॉकव्हेड्डा लोकांबद्दल असें सांगतात कीं, त्यांचे नात्यावरून लहान लहान जमाव बनलेले असून ते पारधीसाठीं आपल्यामध्यें रान वांटून घेत असतात. ह्याच्याहून अधिक सुधारलेल्या रानट्यांत ह्यांच्याहून ज्यास्त व्यवस्थित जमाव दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, न्यूझीलंदर लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, "त्या देशांत अठरा ऐतिहासिक राष्ट्रें असून त्यांपैकीं प्रत्येकांत कित्येक पोटटोळ्या आहेत; आणि त्यांच्या आडनांवावरून त्या पूर्वीं एकेक कुटुंबच होत्या असें दिसतें." दक्षिण अमेरिकेंतील इंदियन लोकांबद्दल हम्बोल्ट असें म्हणतो कीं, "रानटी लोकांस त्यांचीं

कुटुंबें तेवढीं माहीत असतात; आणि त्यांच्यामतें टोळी म्हणजे आह्मांचा कुटुंबापेक्षां मोठा जमाव होय. मिश-नऱ्यांसमवेत राहणाऱ्या इंदियनांस रानांतील इंदियन भेटले म्हणजे तो म्हणतो, " ते खरोखर माझे नातलग आहेत, कारण ते बोलतात तें मला समजतें ". पण हेच रानटी लोक आपल्या टोळीच्या बाहेरच्यांचा तिरस्कार करितात. सारांश, त्यांस कौटुंबिक बंधनांचीं आणि नात्याचीं कर्तव्यें तेवढीं समजतात, पण मानवी बंधनाचीं समजत नाहींत.

कौटुंबिक संबंधांचा विचार करतांना, नातीं जशीं ज्यास्त ज्यास्त निश्चित आणि विस्तृत होत जातील तसें सामाजिक स्थैर्य वाढत जातें, असें मानण्यास कारणें दाखविलीं होतीं. कारण नातीं वाढल्यानें सहक्रियेला उत्तेजनकारक असें स्वभावसादृश्य जसें एकीकडे साधतें, तसें समूह मोडण्यास प्रतिबंध करणारे कौटुंबिकबंध दुसरीकडे बळकट होतात आणि वाढत जातात. जेथें संमिश्र स्त्रीपुरुषव्यवहार असतो, किंवा लग्नें हंगामी असतात, तेथें माहीत अशीं नातीं थोडीं असून निकट नसतात, आणि संवय आणि नात्याची अर्धवट कल्पना ह्यांपासून होणाऱ्या समाजस्निग्धतेपलीकडे कांहीं नसतें. अनेकपतिपद्धतीपासून, आणि विशेषतः त्या पद्धतीच्या उच्चतर प्रकारापासून, कांहींशीं निश्चित अशीं नातीं उत्पन्न होतात, आणि त्यांचा पुढील संबंध लावतां येतो; त्यामुळें सामाजिक समूह एकत्र राखण्यास ज्यास्त सुलभ पडतें. अनेकपत्नीपद्धतीपासून कौटुंबिक संबंध ह्याहून ज्यास्त निकट व ज्यास्त पुष्कळ होऊन जातात. पण

तिसऱ्या भागांत दाखविल्याप्रमाणें अत्यन्त निश्चित आणि फारच पसरलेले असे जें कौटुंबिक संबंध उत्पन्न होतात, ते एकपत्नीपद्धतीपासून होत; आणि असल्या कुटुंबांपासूनच सर्वांत मोठें व अत्यन्त सुसंबद्ध असे समाज उत्पन्न होतात. समाजसंघनतेस ह्या पद्धतीपासून जो फायदा होतो, तो परस्परसंबद्ध परंतु परस्परभिन्न अशा दोन रीतींनीं होतो.

अनेकपति किंवा अनेकपत्नी ह्या पद्धतींपासून झालेलीं मुलें आणि एकपत्नीपद्धतीपासून झालेलीं मुलें ह्यांमध्यें हा फरक असतो कीं, पहिल्या प्रकारचीं मुलें सावत्र किंवा त्याहूनही कमी प्रतीचीं भावंडें असून दुसऱ्या प्रकारचीं मुलें दोन्हीकडून सख्खीं भावंडें असतात. एवंच त्यांचा संबंध ज्यास्त निकट असल्यामुळें त्यांच्या मुलांचाही ज्यास्त निकट असतो. आणि हीं मुलें मोठीं होऊन त्यांचा एक जमाव जमला, आणि ते एकत्र श्रम करूं लागले, म्हणजे त्यांचीं नातीं आणि औद्योगिक हिताहितें ह्या दोन्हीं प्रकारीं तीं एकमेकांशीं संयुक्त बनतात. हा कुटुंबसमूह आणखी वृद्धिंगत होऊंन पुढें जेव्हां त्यांची एक जाति किंवा ज्ञाती बनते, तेव्हां त्यांचीं औद्योगिक हिताहितें जरी विभागलीं जातात, तरी एरवीं जितकीं तीं एकमेकांपासून स्पष्टपणें भिन्न झालीं असतीं, तितकीं विभिन्न होत नाहींत. पुढें ज्ञातीपासून जेव्हां वाढ होऊन टोळी बनते तेव्हांही असेंच होतें. पण एवढ्यानेंच नाहीं झालें. स्थानिक परिस्थितीमुळें जर असल्या अनेक टोळ्या एकत्र झाल्या, तर त्यांजमध्यें दूरचें तरी अद्यापि एकमेकांशीं नातें असल्यामुळें असें होतें कीं,

त्या एकमेकींसन्निध येऊन राहिल्या म्हणजे, कांहीं अंशीं एकमेकांत पसरल्यानें आणि कांहीं अंशीं परस्परांशीं लग्नें करून, त्या एकमेकींत हळू हळू मिसळून जातात, आणि त्यापासून जो संयुक्त समाज बनतो, तो राजकीय हिताहितें आणि नात्याचे संकीर्णसंबंध यांनीं संयुक्त असल्यामुळें त्याच्यामध्यें एरवींपेक्षां ज्यास्त बळकट असें परस्परबंधन उत्पन्न होतें. प्राचीनकाळच्या बलिष्ठ समाजांकडे पाहतां ह्या सत्याचें निदर्शन होतें. उदाहरणार्थ, **ग्रोट** म्हणतो:—"अत्यन्त प्राचीन अशा आथीनियन लोकांच्या कायद्यांबद्दल जें आपल्या कानीं येतें तें ज्ञातिविभाग आणि बंधुविभाग याच्यावर रचलेलें आहे, आणि हे विभाग कुटुंबाचीच वृद्धि होऊन उत्पन्न झालेले होते असें त्याजबद्दल वर्णन आढळतें". तद्वतच, **मॉम्सेन** असें म्हणतो कीं, रोमन राष्ट्राची रचना, त्या राष्ट्राचे मूलघटक आणि आकार ह्या दोन्ही बाबतींत, रोमन कुटुंबाच्या नमुन्यावर केलेली होती. रोमन लोकांचा समाज जो उत्पन्न झाला तो रोमिलाय् व्हॉल्टिनाय्, फेबिआय्, इत्यादि प्राचीन टोळयांच्या संयोगापासून झाला, मग तो संयोग कोणत्याही रीतीनें उत्पन्न झालेला असो. आणि साध्या कुटुंबापासून कौटुंबिक समाज आणि त्यापासून ग्रामसमाज ह्यांची उत्पत्ति कशी होते, हें सर हेन्री मेन यानें सविस्तर रीतीनें दाखविलेलें आहे. ज्यांच्यांत स्त्रीपुरुषसंबंध अनियमित आहेत असल्या जातींमध्यें जो पुरावा दृष्टीस पडतो, त्यावरून पाहतां जरी आपणास असें म्हणतां येत नाहीं कीं राजकीय सहक्रिया होण्यास माणसें एकाच वंशांती-

ल पाहिजेत, तरी जेथें मूळपुरुष एकच आहे, आणि विशेषत: जेथें एकपत्नीपद्धति आहे, तेथें समाजघटक एकच वंशांतील असणें हीच गोष्ट राजकीय सहक्रिया होण्यास मुख्यत्वेंकरून नाहीं तरी बऱ्याच अंशीं करणीभूत होत असते.

आप्तसंबंधाचा, आणि विशेषत: एकपत्नीपद्धतिजन्य आप्तसंबंधाचा,कमी प्रत्यक्ष तरी अत्यन्त महत्त्वाचा, असा एक परिणाम अद्यापि सांगावयाचा आहे. तो धर्माचें ऐक्य हा होय; म्हणजे, एकच देव पूजिल्यापासून कल्पना आणि मनोभाव ह्यांचें जें सादृश्य उत्पन्न होतें तें. ह्या धर्मैक्यास कुटुंबाचा जो मृत मूळपुरुष त्याच्या संतर्पणापासून सुरवात होऊन, कुटुंबशाखा जशा वाढत जातील, तसें तें संतर्पण त्यांतील सर्व वंशज करीत असतात. आणि अशा रीतीनें त्यांचा हळूहळू जमलेला जो संयुक्त संघ तो एकत्र धरून ठेवण्यास, आणि त्या संबंधाच्या पोटभागांत उत्पन्न होणारे विरोध दाबांत ठेवण्यास, ही गोष्ट साहाय्यभूत होत असते; आणि अशा रीतीनें संकलनास मदत होते. धर्मैक्यामुळें उत्पन्न झालेल्या बंधनाचा प्रभाव प्राचीन इतिहासांत आपल्या दृष्टीस सर्वत्र पडतो. पण त्याचीं विशेष उदाहरणें देण्याची जरूर नाहीं. कारण तो आपणांस स्वानुभवावरून चांगलाच परिचित आहे.

बरें, पुढें एकाच जातीचे लोक ज्यास्त वृद्धिंगत होऊन ज्यास्त मुलखावर पसरले, आणि त्यांचे शेजारशेजारचे समाज बनले, म्हणजे त्यांच्यामध्यें जें वरच्याहून कमी ठळक असें स्वभावसादृश्य दृष्टीस पडतें,

त्यालाही ही गोष्ट लागू आहेच. त्यांच्यामध्येंही त्यांचें स्वभावसाम्य, दंतकथा, कल्पना, आणि मनोभाव ह्यांचें साम्य, आणि भाषासाम्य, ह्यांच्यामुळें त्यांच्यांत एकोपा राहण्यास, वरच्यापेक्षां जरी कमी जोराचें तरी उत्तेजन मिळतच राहतें. निरनिराळ्या नमुन्यांचीं माणसें असलीं म्हणजे त्यांमध्यें एकमेकांच्या भाषांचें अज्ञान आणि विचार व विकार ह्यांचें वैसदृश्य, ह्यांच्यामुळें सुसंगत क्रियेस अवश्यच अडथळा येत असतो. कोणी कांहीं म्हटल्याचा भलताच अर्थ केल्यानें एकाच कुटुंबांतील माणसांमध्यें देखील वारंवार कलह कसे उत्पन्न होतात हें ध्यानांत आणिलें म्हणजे, निरनिराळ्या जातींच्या भाषा पूर्णपणें किंवा कांहीं अंशीं निरनिराळ्या असल्यापासून घोंटाळे व विरोध कसे उत्पन्न होत असले पाहिजेत, हें सहजच लक्षांत येईल. तद्वतच ज्यांच्यामध्यें मनोवृत्तिविषयक किंवा बुद्धिविषयक स्वभावांमध्यें भेद असेल, तेंही एकमेकांस आपल्या वर्तनानें नेहमीं घोंटाळ्यांत पाडीत असतात, आणि प्रवासी लोक या गोष्टीचा वरचेवर उल्लेख करीत असतात. ह्यामुळें सहक्रियेस आणखी विघ्न उत्पन्न होतें. रूढीभेदामुळें देखील तंटे उत्पन्न होतात. एका जातीचें खाद्य दुसऱ्या जातीस जर तिरस्कार्य वाटत असेल, एका जातीला जो प्राणी पूज्य असेल तो दुसरीला जर अमंगळ वाटत असेल, एकीला जो वंदनप्रकार आवडतो तो दुसरी जर मुळींच मान्य करीत नसेल, तर संयुक्तयत्नांस विघ्नकर अशीं वांकडीं त्यांजमध्यें वरचेवर उत्पन्न झालींच पाहिजेत. इतर गोष्टी समान असल्यास, सहक्रियासौलभ्य सहानुभ-

तीच्या कमजास्तपणावर अवलंबून राहतें, आणि सारख्या परिस्थितींत सारख्या रीतीनें वागण्याच्या जें आड येईल तें तें सहानुभूतीस प्रतिबंध करितें. ग्रीक लोकांमध्यें ह्या सर्व गोष्टी चांगल्या रीतीनें दृष्टोत्पत्तीस येत असत. उदाहरणार्थ **ग्रोट** म्हणतोः—सर्व हेलेन (ग्रीक लोक) एकाच रक्तमांसापासून व एकाच आईबापांपासून उत्पन्न झालेले होते; कारण त्या सर्वांचा मूळ जनक जो हेलेन त्याचे ते वंशज होते. इतिहासप्रसिद्ध ग्रीक लोकांबद्दल विचार करतांना ही गोष्ट आपण नेहमीं ध्यानांत वागविली पाहिजे; त्यांचे सर्व व्यापार ह्याच मनोभावाच्या जोरावर चालत असत. ग्रीक लोकांचा समुदाय एकत्र ठेवणारीं जीं चार कारणें होतीं त्यांत हिरोडोटसनें त्यांस अग्रस्थान दिलें आहे. तीं चार कारणें हींः—एकभाषा, एकधर्म, आणि सारख्या रीतीभाती व स्वभाव.

ह्यावरून गर्भितार्थ असा निघतो कीं, बरेंच स्वभावसाम्य नसेल तर बनलेले राजकीयसमूह अस्थिर असतात; आणि ते कायम राखण्यास जबरीचाच उपयोग केला पाहिजे; पण जबरी ही केव्हां ना केव्हां तरी निष्फळ व्हावयाचीच. गतकाळीं मोठालीं राष्ट्रें विनष्ट होण्यास जरी अन्य कारणें मदतनीस झालीं आहेत, तरी हें मुख्य कारण झालेलें आहे. हल्लीं तुर्की राज्याचा जो क्षय होत आहे, त्यास मुख्य नसलें तरी बरेंच मोठें कारण हेंच आहे. **साहेब** म्हणतातः—आमचें हिंदुस्थानांतील साम्राज्य देखील शक्तीच्या जोरावर कृत्रिम अशा समतोलांत जरी आह्मीं ठेविलेलें आहे, तरी घटकावयवामध्यें सुसंबद्धतेची वाण असली म्हणजे ते एकत्र कसे राहत

नाहींत ह्या सत्याचें तें स्वपतनानें निदर्शन करून दाखवील अशी भीति आहे.

१८. एकंदर उत्क्रमणाच्या नियमांपैकीं एक असा आहे कीं, सदृशघटकांवर एकाच शक्तीचा किंवा सदृशशक्तींचा प्रयोग होत असला म्हणजे संकलन उत्पन्न होतें (आदितत्त्वें भाग दुसरा); आणि राजकीयसंकलनाच्या पहिल्या पायरीपासून ह्या नियमाचें निदर्शन झालेलें आपल्या दृष्टीस पडतें. समाजघटकांचा संयोग होण्याच्या कामीं, सारख्याच बाह्यक्रियांच्या माऱ्यांत असणें, आणि त्यांच्याविरुद्ध सारख्याच प्रतिक्रिया करणें, हीं प्रारंभापासून अग्रकारणें झालेलीं आहेत.

रानटी लोकांच्या लहान टोळ्यांस जें प्रथम सुसंबद्ध स्वरूप येतें, तें शत्रूंना संयुक्तविरोध करतांना येतें, हें अगोदरच (पूर्वींच्या भागांत) ध्वनित केलेलें आहे. त्या टोळीच्या घटकांवर एकच संकट आलेलें असल्यामुळें, आणि त्याचा प्रतिकार करण्याकरितां ते एकत्र मिळाल्यामुळें, त्याविरुद्ध सहक्रिया करीत असतां ते एकमेकांशीं ज्यास्त संयुक्त होतात. पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर लढाईच्या वेळीं झालेला संयोग लढाई संपल्याबरोबर तुटतो, यावरून त्याच्यांतील हा कार्यकारणसंबंध स्पष्ट दिसतो; म्हणजे थोडासा राजकीयसंयोग जो नुक्ताच दिसूं लागला होता तो नाहींसा होतो. पण शत्रूंना सर्वांनीं मिळून विरोध करीत असतां, आणि त्यांजवर हल्ले करीत असतां, सरळ समूहांचें संकलन होऊन जे संयुक्तसमूह बनतात, त्यांचे ठिकाणीं ह्या गोष्टीचें उत्तम निदर्शन होतें. उदाहरणार्थ, क्यारेन्स लोकांबद्दल

मेसन असें म्हणतो कीं, "त्यांच्या प्रत्येक गांवांतील समाज अगदीं स्वतंत्र असल्यामुळें बहुतेक इतर सर्व गांवांशीं त्याचे तंटे चालत असत. परंतु ज्यास्त प्रबल अशा एकाद्या सामान्य शत्रूपासून भीति उत्पन्न झाली, किंवा एकाद्या सामान्य शत्रूचा सूड उगवावयाचा असला, म्हणजे अनेक गांवांतील लोक त्या कामासाठीं एकत्र जमत असत". हाटेंटाट, न्यूक्यालिडोनियन, आणि सामोअन लोकांबद्दल असेच पुरावे आढळतात. ऐतिहासिक लोकांचेंही असेंच झालेलें आहे. इस्रलाइट लोकांच्या अनेक टोळ्या ज्या एक झाल्या, व त्यांस व्यवस्थित राष्ट्राचें स्वरूप आलें, ते डेव्हिडच्या वेळीं ज्या लढाया झाल्या त्या वेळींच आलें. ग्रीक लोकांचीं अनेक लहान लहान राज्यें एकत्र होऊन जें त्यांस साम्राज्याचें स्वरूप आलें, तें पर्शियन लोकांनीं पुष्कळ वर्षे लढत असतांनाच आलें. रोम, इंग्लंद, आणि फ्रान्स ह्यांच्या इतिहासावरून हीच गोष्ट व्यक्त होते. लहान समाजांचें संकलन होऊन मोठें राष्ट्र बनण्यास या रीतीनें सुरवात कशी होते हें असले संयोग प्रथम लढाईसाठींच बनत असतात ह्यावरून स्पष्ट दिसतें; पुढें हा जो संयोग कायम होतो आणि सगळ्यांस मिळून सामान्य राजकीय संघटना प्राप्त होते, ती लढाईमध्यें संयुक्तरीतीनें वागणें संवयींतलें झालें म्हणजेच होते.

लढाईमध्यें सहक्रिया केल्यानें लहान समाजांचे संयोगानें मोठे समाज बनणें ही जी क्रिया खात्रीपूर्वक होते तीस कारण जे लहान समाज अशी सहक्रिया करीत नाहींत ते नष्ट होतात हें होय. उदाहरणार्थ, डा-

मारा लोकांबद्दल **गाल्टन** असें म्हणतो कीं, त्यांच्यापैकीं एका गांवास लुटलें तर शेज़ारचे गांव त्याच्या रक्षणार्थ क्वचितच उठतात; ह्यामुळें नमाका लोकांनीं त्यांची सरासरी अर्धी संख्या नष्ट केली आहे किंवा गुलाम केली आहे. ह्यावरून असें दिसतें कीं, समाजांमध्यें योग्यतमांचा टिकाव म्हणजे लढाईच्या कामीं सहक्रिया करण्यास जे अत्यन्त शक्तिमान् त्यांचा टिकाव असा असतो; आणि इतर सहक्रियांचा मार्ग ह्या सहक्रियेपासून तयार होत असतो. एवंच, सामाजिक जीविताला अत्यन्त योग्य असे लोक त्या जीविताला अत्यन्त कमी योग्य लोकांना जे जित कारितात, ते ह्याच अनिवार्य रीतीनें (लढाईच्या रीतीनें) कारितात.

अशा रीतीनें झालेल्या संकलनाबद्दल हें ध्यानांत ठेवावयाचें कीं, ह्याला प्रारंभ साधे समूह बनण्यापासूनच होतो, आणि त्यांचे संयोग व पुनःसंयोग होऊन त्याची प्रगति होते. रानटी लोक लहरी असल्यामुळें, आणि संयुक्तक्रिया करण्याची शक्ति त्यांजमध्यें केवळ अल्प असल्यामुळें, त्यांच्यांत इतका अल्प सुसंगतपणा उत्पन्न होतो कीं, त्यांच्या लहान लहान जमावांसच स्वसंयोग कायम राखतां येतो. असल्या लहान जमावांचे घटक थोड्याशा राजकीय संघटनेनें बद्ध झाल्याविना त्यांचे मोठाले जमाव बनवणें शक्य होत नाहीं; कारण असले जमाव एकत्र राहण्यास संयुक्तक्रिया करण्याची योग्यता ज्यास्त लागत असते, आणि उत्पन्न होण्यास संघटना ज्यास्त पक्क पाहिजे. बरें, त्यांचे पुनःसंयोग बनण्यास हे संयुक्त जमाव कांहींअंशीं घनीभूत झाले

पाहिजेत. उदाहरणार्थ, प्राचीन ईजिप्त देशांत जे लहान लहान समाज होते, त्यांचे वरचा ईजिप्त व खालचा ईजिप्त असे दोन समूह प्रथम बनले, आणि नंतर त्यांचा एक समाज बनला. ग्रीस देशांत कित्येक गांव एकत्र मिळून शहरें बनलीं, आणि शहरें मिळून संस्थानें बनलीं. इंग्लंदांतही असेंच झालें. पदार्थविज्ञानशास्त्राचें असें एक तत्त्व आहे कीं, ज्याअर्थी कोणत्याही वस्तूची ताणांस प्रतिरोध करण्याची शक्ति तिच्या आकाराच्या वर्गाच्या मानानें वाढत असून, तिच्या वजनामुळें जे ताण तिजवर बसत असतात ते तिच्या आकाराच्या घनाच्या मानानें वाढत असतात, त्याअर्थी तिचा गोळा जसा वाढत जाईल, तशी आपलें संकलितस्वरूप कायम राखण्याची तिची शक्ति कमी होत जाते. समाजांचें कांहीं अंशीं असेंच आहे. सुसंबद्धता अल्प असतांना लहान जमावच एकत्र राहूं शकतात; आणि मोठमोठाले जमाव एकवट राहण्यास, योग्य झालेला मनुष्यस्वभाव आणि त्यापासून उत्पन्न झालेली सामाजिक संघटनेची पकता, हीं त्या मोठ्या जमावांत अंतर्भूत झालेल्या ताणांचा प्रतिकार करण्यास उत्पन्न झालेलीं असलीं पाहिजेत.

१९. सामाजिक संकलन जसें वाढत जातें, तसे मोठाले होत जाणारे समूह आपल्या घटकांवर ज्यास्त नियंत्रणें चालवूं लागतात; हें सत्य वर सांगितलेल्याच सत्याचें दुसरें अंग आहे; तें सत्य हें कीं, मोठ्या जमावास संकलितस्थिति कायम ठेवण्यास त्याच्या अंगीं अधिक चिकटपणा असावा लागतो. ज्या शक्तींच्या योगानें समूह आपल्या घटकांस एकत्र राखीत असतात,

त्या प्रथम अल्प असतात; आणि सामाजिक उत्क्रमणाच्या एका विशिष्ट पायरीवर त्या जोराच्या होऊन नंतर त्या सइलावतात; किंवा, आपलीं रूपें बदलतात असें म्हणणें ज्यास्त बरें.

प्रारंभीं रानटी माणूस ह्या किंवा त्या जमावाला जो जाऊन मिळतो तो अनेक हेतूंनीं प्रोत्साहित होत्साता मिळतो, पण स्वसंरक्षणाची इच्छा हा त्याचा मुख्य हेतु असतो. उदाहरणार्थ, पाटागोनियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांतील कोणी माणसानें स्वतंत्र राहण्याचा यत्न केल्यास तो सांपडल्याबरोबर ठार होण्याचा किंवा गुलाम बनण्याचा फार संभव असतो. पण अशा रीतीनें कोणत्या तरी जमावास जाऊन मिळणें जरी त्यास अवश्य असतें, तरी एकाच जमावास चिकटून राहणें नसतें. उदाहरणार्थ, नायकानें जुलूम केला म्हणजे कालमक व मोंगल लोक त्यास सोडून दुसऱ्या नायकाकडे जातात. ह्यामुळें कांहीं टोळ्या वृद्धिंगत होत जातात आणि दुसऱ्यांस क्षय लागतो. उदाहरणार्थ, कुकी लोक एकाद्या गांवासभोंवतीं सुपीक जमीन असून तेथील नाईक लोकप्रिय असला म्हणजे आपापले गांव सोडून त्यासच जाऊन मिळतात, व तो गांव वाढतो.

व्यक्तीला जशी स्वसंरक्षणाची जरूर वाटते तशी जमावाला आपली शक्ति वाढविण्याची वाटते; म्हणून दत्तक घेण्याची पद्धति सुरू होऊन संकलनास आणखी मदत होते. उदाहरणार्थ, उत्तरइंदियन लोकांस कोणी इतर टोळीचा माणूस सांपडला म्हणजे ते त्यास दत्तक

व्हावयास लावीत, आणि न झाल्यास त्याचे हाल हाल करीत. ग्रीक व रोमन लोकांत जी दत्तकाची चाल होती, ती आरंभीं जेव्हां ते भटकण्याच्या स्थितींत होते तेव्हांच उत्पन्न झाली असावी, आणि पुढें पूर्वजांस बळी मिळत रहावे म्हणून ती चालू राहिली असावी. आतां जमावांस स्वशक्ति वाढवावीशी वाटते ह्याचें कारण जमावाजमावांत लढाया होत असतात हें होय हें उघड आहे.

असल्याच हेतूंवरून असलेच परिणाम वरच्याहून अधिक आधुनिक समाजांत, जेव्हां त्यांचें संकलन पूर्ण झालेलें नसून त्यांच्यांत आपसांत कलह होत होते तेव्हां उत्पन्न होत. उदाहरणार्थ, इंग्लंडांत नॉर्मन वगैरे राजांच्या वेळीं स्थानिक अधिकारी मुख्य अधिकाऱ्यांच्या कह्यांत गेले नव्हते, तेव्हां प्रत्येक स्वतंत्र माणसास (गुलाम नसेल त्यास) कोणत्या तरी सरदारास किंवा नगरास किंवा धंदेजमावास चिकटून रहावें लागे; नाहीं तर त्यास वर सांगितल्यासारखी भीति असे.

पुढें समाजसंकलन जसें वाढत जाईल तशी एका जमावांतून दुसऱ्या जमावांतच जाण्याची व्यक्तीची शक्ति कमी होते असें नाहीं, तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणींही जाण्याची शक्ति कमी होते. आतां भटकण्याची स्थिति जाऊन स्थाईक स्थिति येणें ह्यांतच हें अंतर्भूत होतें हें खरें आहे; कारण असें होतें तेव्हां प्रत्येकजणाचें कांहीं इस्टेट उत्पन्न होऊन त्यानें तो विशेष ठिकाणास बऱ्याच अंशीं बांधलाच जातो. गुलामगिरीच्या पद्धतीमुळें व्यक्ती कांहीं विशिष्टस्थानबद्ध माणसांना, आणि म्हणून विशिष्ट स्थानांना, बांधल्या जा-

ऱ्या ही गोष्ट आणखी एका तऱ्हेनें उत्पन्न होते; जेथें शेत गुलाम असतील तेथेंही ही गोष्ट कांहींशी फरकानें उत्पन्न होतेच. पण मोठ्या प्रमाणावर संकलितसमाजांत, गुलाम नाहींत असे लोक देखील स्वस्थानबद्ध होऊन जातात. उदाहरणार्थ, प्राचीन पेरूदेशांत एका प्रांतांतून किंवा गांवांतून दुसरीकडे जाणें हें कायद्याविरुद्ध समजलें जाई आणि योग्य कारणाविना कोणीं गांव सोडल्यास त्यास भटक्या म्हणून शिक्षा होई. इजिप्शन व जपानी लोकांत अशासारखेंच असे, आणि खुद्द यूरोपांतही कांहीं देशांत पासाशिवाय अजूनही जातां येत नाहीं.

पण समाजाच्या युद्धशील नमुन्यामध्यें उद्यमशील नमुन्याची जसजशी ज्यास्त भेसळ होत जाईल, तशीं व्यक्तींवर समाजांचीं चालणारीं बंधनें इतर बाबतींप्रमाणें ह्या बाबतींतही कमी होऊं लागतात; ह्याचें एक कारण उद्यमशील समाजांत लोकसंख्या बरीच असल्यामुळें त्यांतून कोणी निघून गेल्यास त्याची जागा भरण्यास जादा लोक पुष्कळ असतात, आणि दुसरें कारण हें कीं, युद्धशील नमुन्यामध्यें जुलूम नाहींसा झाला तरी, द्रव्यविषयक कायदे, कौटुंबिक बंधनें, आणि देशप्रीति, ह्यांपासून लोकांत योग्य तेवढी समाजस्निग्धता उत्पन्न झालेली असते.

२०. एवंच रचनावृद्धि होऊन जें राजकीय उत्क्रमण दृग्गोचर होतें, त्याबद्दल एथें कांहीं न म्हणतां, आणि केवळ समाजाच्या गोळ्याच्या वृद्धीनें दृग्गोचर होणाऱ्या ज्या राजकीय उत्क्रमणास आपण येथें राजकीय संकलन असें नांव दिलें आहे तेवढ्याचकडे नजर पुरवि-

ली असतां, त्याच्या ठिकाणीं पुढील विशेष आपल्या नजरेस येतात.

जोंपावेतों जमाव लहान असतील तोंपावेतों वाढीची सामग्री आपल्यांत ओढून घेण्याचें त्यांचें काम दुर्बल रीतींनीं, म्हणजे एकमेकांची पारध पकडून, एकमेकांच्या बायका हिसकावून घेऊन, आणि कधींकधीं एकमेकांतील पुरुष दत्तक घेऊन, चालतें. पण मोठमोठाले जमाव जसे बनत जातील तसें त्यांच्यांत हें काम जास्त ठोकळ मार्गांनीं व्हावयास लागतें; म्हणजे, प्रथम जिंकलेल्या टोळ्यांच्या निरनिराळ्या घटकांना गुलाम करून, आणि नंतर त्या सर्वच टोळ्या व त्यांचे मुलूख आपल्यांत सामील करून, आणि संयुक्तसमूहांना जसें दुबार व तिबार संयुक्तसमूहांचें रूप येऊं लागतें, तशा शेजारचे धाकटाले समाज आपल्यांत ओढून घेऊन पूर्वींहूनही मोठाले समाज बनवण्याच्या त्यांच्या इच्छा ज्यास्त ज्यास्त प्रबल होऊं लागतात.

समाजाची वाढ आणि मजबुती ह्यांस अनेक प्रकारच्या स्थिती अनुकूल किंवा प्रतिकूल होत असतात. त्याचें वसतिस्थान मोठ्या लोकसंख्येचें पोषण करण्यास योग्य असेल किंवा नसेल; किंवा त्यामध्यें दळणवळणाचीं साधनें विपुल किंवा अल्प असल्यामुळें सहक्रियेस मदत किंवा अडथळा होत असेल; किंवा त्याला स्वाभाविक सीमा असल्यामुळें किंवा नसल्यामुळें प्रथम व्यक्तींवर जी जबरी करणें जरूर असते त्या दाबाखालीं त्यांस ठेवण्याचें काम सुलभ किंवा दुर्घट असेल. आणि त्या जातीच्या पूर्व-इतिहासानुरूप त्यांच्यांतील व्यक्तींना सं-

युक्तक्रियेस योग्य करणारे जे शारीरिक, मानसिक, आणि मनोवृत्तिविषयक स्वभाव ते त्यांजमध्यें कमजास्त प्रमाणावर असतील.

प्रत्येक ठिकाणीं सामाजिक संकलन कोठपर्यंत नेतां येईल ही गोष्ट कांहीं अंशीं जशी वरील गोष्टींवर अवलंबून असते, तशी कांहीं अंशीं त्या समाजाच्यामध्यें घटकांत जें साम्य असेल त्याच्या प्रमाणावर अवलंबून असते. प्रथम जोंपावेतों घटकांचा स्वभाव सामाजिक जीविताला अल्प योग्य बनलेला असतो तोंपावेतों त्यांचे समुदाय बनणें हें बऱ्याच अंशीं त्यांच्यांतील आप्तपणाच्या बंधनांवर अवलंबून असतें. ज्या समूहांमध्यें असलीं बंधनें आणि त्यापासून उत्पन्न होणारी सुसंगतता, हीं अत्यंत ठळक असतील, आणि ज्यांच्या कौटुंबिक दंतकथा एकच असल्यामुळें, मूळपुरुष एकच असल्यामुळें, आणि त्याची ते सर्व पूजा करीत असल्यामुळें, जे समूह ह्या रीतींनीं आपल्या कल्पना व मनोभाव ह्या बाबतींत आणखी परस्परसदृश असतील, त्या समूहांत अत्यन्त समाजस्निग्धता आणि सहक्रियाशक्ति हीं उत्पन्न होतात. पुष्कळकाळपर्यंत असल्या पितृशासित जमावांपासून उत्पन्न झालेल्या ज्या ज्ञाती आणि टोळ्या त्यांची राजकीय सहक्रिया ह्या आप्तपणाच्या बंधनानें आणि त्यामध्यें अंतर्भूत झालेल्या सादृश्यानें सुलभ होत असते. जे एकाच खुंटापासून उत्पन्न झालेले नसतील त्यांमध्यें सुसंगत सहक्रिया जी उत्पन्न होते ती सामाजिक जीविताला ते बरेच योग्य झाल्यानंतर होते; आणि तेव्हां देखील त्यांचे स्वभावभेद लहान प्रमाणावरच अ-

सले तरच ती उत्पन्न होते. जेथें त्यांचे स्वभावभेद मोठे असतील, तेथें समाज केवळ जबरीनेंच एकवटलेला राहिला असल्यामुळें, ती जबरी खुंटली म्हणजे तो विकलन पावण्याच्या पंथास लागतो.

सामाजिकसमूहघटकांमध्यें सादृश्य असणें हें त्यांच्या संकलनास एक कारण असून, शत्रुक्रियेविरुद्ध त्यांची संयुक्तक्रिया असणें हें दुसरें कारण आहे; म्हणजे, लढाईमध्यें सहक्रिया असणें हें सामाजिकसंकलनाचें मुख्य कारण आहे. स्वसंरक्षण आणि परातिक्रम ह्यासाठीं रानटी लोक जे तत्पुरते जमाव जमवीत असतात, त्यांवरून ह्याची पाहिली पायरी दृग्गोचर होते. जेव्हां पुष्कळ टोळ्या एका सामान्य शत्रूविरुद्ध संयुक्त होतात, तेव्हां त्यांची संयुक्तक्रिया पुष्कळकाळपावेतों चालल्यामुळें त्या कांहीं सामान्य-नियंत्रणाखालीं सुसंगत होतात. आणि पुढें त्यांच्याहून मोठ्या समूहांचेंही असेंच होतें.

समाजसंकलन वृद्धिंगत होत जाणें हें घटकांमध्यें पृथक्पणा कमी होत जाणें ह्या गोष्टीचें कारण आहे आणि कार्यही आहे. प्राथमिक भटकणाऱ्या जातींस आपल्या घटकांवर इतकें नियंत्रण चालवतां येत नाहीं कीं तेणेंकरून त्यांस एक टोळी सोडून दुसऱ्या टोळीस जाऊन पाहिजे तेव्हां मिळतां येण्याची बंदी व्हावी. जेथें टोळ्या ज्यास्त पक्क झालेल्या असतात, तेथें एक टोळी सोडून दुसरींत जाणें हें कमी सोपें असतें; आणि ज्या दीर्घकालामध्यें युद्धशीलतेमुळें समाज विस्तृत होऊन घनीभवन पावत असतात, त्या कालांत घटकांची राष्ट्रान्तर करण्याची क्षमता ज्यास्त ज्यास्त मर्यादित होत जाते.

उद्यमशीलता वाढावयास लागून जबरीच्या सहक्रियेच्या ऐवजीं जेव्हां स्वैच्छिक सहक्रिया उत्पन्न होईल, तेव्हांच स्थानान्तरावर असलेले प्रतिबंध नाहींसे होतात; म्हणजे असल्या समाजांत जबरीच्या संयोगाबद्दल स्वैच्छिक-संयोग योग्य प्रमाणावर उत्पन्न झालेला असतो.

आणखी एक सत्य एथें सांगावयाचें राहिलें आहे तें हें कीं, राजकीयसंकलन जसें वाढत जाईल, तसें तें संयुक्त भागांमधील जे प्रारंभींचे भेद ते नाहींसे करितें. प्रथम, नात्यामुळें ज्ञाती आणि टोळ्या ह्यांच्या ठिकाणीं दिसणारे जे स्थानविषयक विरहीत भेद उत्पन्न झालेले असतात, ते हळूहळू नष्ट होतात. नंतर, जे धाकटे स्थानिकसमाज मिळून मोठा समाज बनत असतो, त्यांच्यांतील पृथक् संघटना दीर्घकालीन सहक्रियेमुळें नष्ट होतात; म्हणजे, एका सामान्य संघटनेच्या शाखा त्या सर्व समाजांतून पसरूं लागतात. आणि शिवाय, ह्याबरोबर, त्यांच्या स्थानविषयक मर्यादा नष्ट होऊं लागतात, आणि त्यांच्या ऐवज़ीं सामान्य संघटनेच्या ज्या नियमनविषयक मर्यादा त्या उत्पन्न होऊं लागतात. ह्यावरूनच ह्याच्या उलट सत्य सिद्ध होतें. तें हें कीं, सामाजिक अपक्रमण चाललें असतां मोठाले समूह प्रथम पृथक होतात, आणि नंतर सामाजिक अपक्रमण तसेंच चालू राहिल्यास हे पृथक् भाग आणखी पृथक् होऊन लहान लहान भाग उत्पन्न होतात. आणि जेथें अपक्रमणसरणी फारच पुढें जाईल, तेथें सरासरी मूळच्या स्थितीसारखीच स्थिति उत्पन्न होऊन लहान लहान लुटारू समाज सभोंवतालच्या समाजांबरोबर लढाईत सारखे गुंतून राहतात.

प्रकरण चवथें

राजकीय विभिन्नीकरण

२१. "आदितत्त्वें—भाग २ "—ह्यामध्यें दाखविल्याप्रमाणें समस्वरूपतेची स्थिति म्हणजे अस्थिरतेची स्थिति होय. हें सत्य इतर सर्व समूहांप्रमाणें सामाजिक समूहांसही लागू आहे; आणि दुसरें असें कीं, जेथें आधींच कांहींशी विजातीयता उत्पन्न झालेली असेल, तेथें आणखी विजातीयता उत्पन्न होण्याकडे कल दिसत असतो.

पण समूहाची समस्वरूपता नष्ट होण्यास, किंवा कदाचित्, असलेली विजातीयता वाढण्यास अशी गोष्ट असावी लागते कीं, त्याचे भागांची स्थिति विजातीय असली पाहिजे; आणि भागांच्या स्थिती विभिन्न होण्याला जें जें प्रतिबंध करील, तें तें विजातीयतेलाही प्रतिबंध करितें. यामध्यें एक गोष्ट अशी गर्भित होते कीं, भागांची जी विभागणी तिजमध्यें सारखे फेरबदल होतां कामा नये. कधीं एक भाग व कधीं दुसरा भाग सगळ्यांच्या संबंधानें जर एकच स्थान व्यापून राहील, तर कायमचे रचनाविषयक भेद उत्पन्न होऊं शकणार नाहींत. म्हणजे, भागांमध्यें अशी परस्परास्निग्धता असली पाहिजे कीं, त्यांचें सहजगत्या स्थानान्तर होऊं नये.

ह्या सत्याचें निदर्शन आपणास अत्यन्त सरल अशा व्यक्तिशरीरांचे ठिकाणीं दिसून येतें. हलक्या प्रतीचा जो ऱ्हिझॉपॉड (अस्पष्टपाद) प्राणी आहे त्याच्या घ-

टकद्रव्यामध्यें बहुतेक द्रवद्रव्याचीच चलता असल्या-मुळें, तो बहुतेक समस्वरूपच असतो; कारण त्याचा प्रत्येक भाग क्षणोक्षणीं दुसऱ्या भागांच्या संबंधानें आणि परिस्थितीच्या संबंधानें नवे नवे संबंध धारण करीत असतो. आणि अत्यन्त साध्या समाजांचेंही असेंच आहे. फ्यूजियन लोकांचे जे लहान लहान अस्थिर जमाव त्यांच्यासंबंधानें कुक असें म्हणतो कीं, त्यांच्या-मध्यें इतरांपेक्षां कोणाचीही ज्यास्त प्रतिष्ठा नसे. वेड्डा, आण्डामानी, आस्ट्रेलियन, वगैरे लोकांमध्येंही सामाजिकस्थितीचीं कायमचीं वैसदृश्यें दिसत नाहींत. दक्षिण-अमेरिकेंतील कोरोआडो लोकांच्या संबंधानें असेंच आहे.

उलटपक्षीं, जेथें एकाद्या सामाजिक समूहाच्या निरनिराळ्या भागांची स्थिति कायमची विजातीय असेल, तेथें ते भाग त्या मानानें विजातीय होतील. ही गोष्ट आपण या विषयाकडे अन्य तऱ्हेनें पाहिल्यास आपल्या लक्षांत ज्यास्त स्पष्टपणें येणार आहे.

२२. सारखे घटक सारख्या शक्तींच्या माऱ्यांत असल्यास त्यांचा कल संकलनाकडे असतो ह्या सत्याचें निदर्शन गेल्या प्रकरणांत सामाजिकसमूह कसे बनतात हें दाखवून केलें होतें. एथें, एकाद्या समूहाचे सदृशघटक ज्या मानानें विसदृशशक्तींच्या माऱ्यांत सांपडतील, त्या मानानें त्या समूहाचे विभिन्नीकृत भाग बनवण्याकडे त्यांचा कल उत्पन्न होतो, हें सामान्य सत्य आपणांस लक्षांत घ्यावयाचें आहे.

प्राथमिक राजकीय विभिन्नीकरण जें उत्पन्न होतें तें प्राथमिक कौटुंबिकविभिन्नीकरणापासून उत्पन्न होतें.

स्त्रीपुरुषें संसारामध्यें निरनिराळीं कामें करीत असल्यामुळें कुटुंबाप्रमाणें समाजांतही पहिल्यापासूनच तीं निरनिराळ्या दर्जाचीं बनूं लागतात; म्हणजे, फार लवकरच, शासित व शास्ते हे दोन राजकीय वर्ग तीं अनुक्रमें बनवूं लागतात. आणि त्यांच्यामध्यें सामाजिक दर्जाची जी ही विसदृशता उत्पन्न होते, ती सामाजिक व्यवहाराशीं त्यांचे जे विसदृशसंबंध त्यांवरून उत्पन्न झालेली असते हें किती खरें आहे, हें, ज्याप्रमाणें ही विसदृशता लहान किंवा मोठी असेल त्याप्रमाणें दर्जाची विसदृशताही लहान किंवा मोठी असते, हें ध्यानांत आणिल्यानें आपल्या लक्षांत येणार आहे. तिसऱ्या भागांत स्त्रियांच्या स्थितीचा विचार करतांना असें दाखविलें होतें कीं, चिपिवायन व चिनूक हे लोक मासे व मुळें ह्यांवर रहात असल्यामुळें, आणि तीं मिळविण्यांत बायका व पुरुष हीं सारखींच प्रवीण असल्यामुळें, त्यांच्यांत स्त्रियांची योग्यता व प्रभाव इतकीं असतात कीं, इंदियन लोकांमध्यें तशीं फारच क्वचित् आढळतात. तद्वत् हेंही आपल्या दृष्टीस तेथें पडलें होतें कीं, डेहामीमध्यें पुरुषांप्रमाणेंच बायकाही लढवय्या असल्यामुळें त्यांना इतका मान आहे कीं, राजकीय संघटनेंत त्या पुरुषांहून श्रेष्ठ समजल्या जातात. आतां सामान्यतः पुरुष हे लढाई व पारध ह्यांमध्येंच गुंतलेले असल्यामुळें त्यांना अमर्याद अधिकार असतो, आणि बायका बारीकसारीक खाद्य पदार्थ गोळा करण्यांत आणि ओझीं वाहण्यांत गुंतलेल्या असल्यामुळें त्या अगदीं गुलाम असतात; म्हणून ह्या दोन स्थितींतील भेद लक्षांत आणतां सामाजिक व्यव-

हाराशीं भिन्न भिन्न संबंधांवरून सामाजिकसंबंधाची भिन्नता कशी उत्पन्न होते हें लक्षांत येतें. आणि बोडो व ढिमाल लोकांप्रमाणें जे नेहमीं शांततेनेंच राहणारे लोक आहेत, त्यांच्यामध्यें लढवय्ये व कामकरी असा भेद नसल्यामुळें, त्यांच्यांत स्त्रीपुरुषांमध्यें सांगण्यासारखा दर्जाचा भेद दिसत नाहीं; ह्यावरून देखील ह्या सत्याचेंच आणखी निदर्शन होतें.

आतां पुरुषांमध्येंच जें कमज्यास्त राजकीय विभिन्नीकरण उत्पन्न होतें त्याकडे पाहतांही असेंच दिसतें. जेथें जीवित कायमचें शांतिशील असेल तेथें निश्चित वर्गभेद नसतात. उदाहरणार्थ, वर सांगितलेले जे बोडो व ढिमाल लोक त्यांबद्दल हॉडसन असें म्हणतो कीं, त्या सर्वांना सारखेच हक्क असतात आणि त्यांस एकच कायदा लागू असतो. लेप्चा नांवाची जी दुसरी न लढणारी डोंगरी टोळी आहे त्यांच्यामध्यें ज्ञातिभेद मुळींच नाहींत. पापुअनलोकांपैकीं जे आराफुरा लोक त्यांचेंही असेंच आहे.

२३. युद्धशील समूहामध्यें स्त्रीपुरुषांमधील घरगुतीसंबंधास शास्तावर्ग व शासितवर्ग ह्या राजकीयसंबंधाचें जसें स्वरूप येतें, तद्वतच धनी व गुलाम हा जो पुरुषापुरुषांमधील पहिला घरगुतीसंबंध त्यासही, नेहमीं लढाया होऊन तींत पकडलेल्यांस गुलाम करणें जसें सामान्य होऊन जाईल, तसें त्याच संबंधाचें स्वरूप येतें. नियामक रचना आणि पोषक रचना ह्यांच्यामध्यें जें राजकीय विभिन्नीकरण उत्पन्न होतें, तें गुलामांचा वर्ग बनल्यापासून उत्पन्न होतें, आणि सामाजिक उत्क-

मणाच्या पुढच्या सर्व पायऱ्यांवर तें कायम राहतें.

क्रेन म्हणतो कीं, "क्यालिफोर्नियापासून बेहरिंगच्या सामुद्रधुनीपर्यंत सर्व किनाऱ्यावर अत्यन्त क्रूर अशी गुलामगिरी दिसून येते; कारण तेथील बलिष्ठ टोळ्या साधेल तितक्या इतर सर्वांस जित करून गुलाम करीत असतात. पण किनाऱ्याच्या आंतील भागीं लढाई फारच अल्प असून गुलामगिरी मुळींच नाहीं". सर्वत्र हींच स्थिति आढळून येते. एकंदर पुराव्यावरून असें दिसतें कीं, गुलामगिरीचा प्रघात मनुष्यवधाच्या प्रघातापासून त्यांत हळू हळू फेरबदल होऊन उत्पन्न झालेला आहे. उदाहरणार्थ, नूटका लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, "त्यांच्यांत गुलामांचे कधीं कधीं बळी देऊन त्यांजवर मेजवानी करीत असतात." आतां हा प्रघात, आणि शत्रू सांपडल्याबरोबर त्यांस मारून खाण्याचा इतरत्र दिसणारा प्रघात ह्यांच्यांतील भेद पाहतां असें लक्षांत येईल कीं, पुष्कळ शत्रू एकदम सांपडले म्हणजे त्या सर्वांस एकदमच मारून खाणें शक्य नसल्यामुळें त्यांपैकीं कांहीं पुढें मारून खाण्यासाठीं वगळून ठेवण्याचा, व त्या मुदतींत त्यांस कामास लावण्याचा, प्रघात उत्पन्न झाला असेल, आणि अशा वेळीं त्यांस मारून खाण्यापेक्षां त्यांस जिवंत ठेवून त्यांच्याकडून काम घेणेंच बरें असें रानट्यांच्या अनुभवास आलें असावें, आणि त्यावरून गुलामगिरीची चाल उत्पन्न झाली असावी. तें कसेंही असो; ज्या टोळ्यांना त्यांजमध्यें नेहमीं लढाया असल्यामुळें त्या कामास योग्य अशी कांहींशी रचना प्राप्त झाली आहे, त्यांच्यांत लढाईत कैद

केलेल्यांस गुलाम करण्याची चाल बहुधा स्थापन होते. लढाईंत पकडलेलीं बायकामुलें, आणि न मारलेले पुरुष, त्यांचे पक्के गुलाम बनतात हें उघडच आहे; म्हणजे, त्यांस पकडणारांस त्यांच्या जीविताची पाहिजे ती वासलात लावण्याचा हक्क येतो. सारांश, ते त्यांची मालमत्ता बनतात, आणि तिचा त्यांनीं पाहिजे तो उपयोग करावा.

गुलाम मिळविणें ही प्रारंभीं लढाईची आनुषंगिक गोष्ट असून मागून तो लढाईचा उद्देशच बनून जातो. उदाहरणार्थ, हाण्डुरासमधील लोक शत्रूला युद्धाची नोटीस देतांना असें जाहीरच करीत कीं, आह्मांस गुलामांची जरूर आहे. सेंट जॉन म्हणतो, " डायाक लोकांपैकीं पुष्कळांस शिरांपेक्षां गुलामांची अपेक्षा ज्यास्त असते; म्हणून एकाद्या खेड्यावर हल्ला करतांना जे त्यांस विरोध करितील किंवा पळून जाऊं लागतील तेवढ्यांनाच ते मारितात ". आफ्रिकेमध्यें तर गुलाम करण्यासाठींच लढाया चालतात.

लढाईमध्यें प्रथम उत्पन्न झालेला हा वर्गभेद मागून अन्य तऱ्हांनीं वृद्धिंगत होतो; कारण लवकरच गुलाम विकत घेण्याची चाल सुरू होते. उदाहरणार्थ, चिनूक लोक लढाईंत गुलाम करण्याव्यतिरिक्त शेजारच्या टोळ्यांतून गुलाम करण्यासाठीं पोरें विकत घेतात, आणि पोरें गुलाम म्हणून विकण्याची चाल रानट्यांत बरीच आहे, हें कौटुंबिकसंबंधाचाविचार करतांना आपल्या नजरेस-आलेंच आहे. शिवाय स्वसंरक्षणासाठीं कांहीं जण खुशीनेंच गुलाम होतात; कांहीं कर्जासाठीं होतात;

आणि कांहीं अपराधांबद्दल होतात; आणि अशा रीतीनें त्या वर्गाचा विस्तार होतो.

लढाईमध्यें ज्या ह्या विभिन्नीकरणास सुरवात होते ती दुसरे समाजच्या समाज किंवा त्यांतील वर्गच्या वर्ग, सामील करून घेऊन होत नाहीं, तर इतर समाजांतील एकेऱ्या व्यक्ती सामील करून घेऊन आणि तसल्याच अन्य प्रकारांनीं होते. हा दासवर्ग प्रथम स्पष्टपणें भिन्न असा सामाजिकवर्ग बनत नाहीं; तर गुलामांच्या मालकांच्या अधिकारांवर जशीं नियंत्रणें पडत जातील तसा तो स्पष्ट पृथक्पणा पावतो. म्हणजे, गुलामांचे हक्क ओळखले जाऊन त्यामुळें त्यांच्या मालकांचे हक्क जेव्हां मर्यादित होतात, तेव्हां घरांतील गुराढोरांची जी योग्यता तीच प्रारंभींची जी त्यांची योग्यता ती नाहींशी होऊन ते समाजाचा एक पृथक् भाग म्हणून बनूं लागतात.

२४. सामान्य समजूत अशी आहे कीं शेतगुलामगिरी घरगुलामगिरीस सौम्यस्वरूप येऊन उत्पन्न होते; पण वस्तुस्थितीचें परीक्षण करतां ती निराळ्या रीतीनें उत्पन्न झालेली दिसते. एक समाज जेव्हां दुसऱ्या समाजासच आपल्यांत सामील करून घेऊं लागतो तेव्हां तिची उत्पत्ति होते.

पहिल्या व दुसऱ्या गुलामगिरींत हा भेद आहे कीं, पहिलींत पकडलेले लोक त्यांच्या घरांतून काढिले जातात; दुसरींमध्यें त्यांस त्यांचें घर सुटत नाहीं. उदाहरणार्थ, न्यूझीलंदर लोकांमध्यें एका टोळीनें दुसरीस जिंकलें म्हणजे ती तिची नांवाची गुलाम बनत असे, कारण तिनें खाद्याची वगैरे कांहीं खंडणी देण्याचें कबूल

केलें म्हणजे तींतील लोकांस त्यांच्या नेहमींच्याच घरीं राहण्याची परवानगी मिळत असे. सांडविच बेटासंबंधानें एलिस असें लिहितोः—" सामान्य लोक बहुधा जमिनीस चिकटलेले म्हणून समजले जातात, आणि म्हणून जमीन एका नायकाकडून दुसऱ्याकडे गेली म्हणजे तेही तिजबरोबर त्याच्याकडे जातात". यूरोपांत ग्रीक व रोमन या प्राचीन लोकांत, आणि इंग्लिश, फ्रेंच व रशियन या आधुनिक लोकांतही असेंच असे.

ह्या चालीचें मूळ कारण उघडच असें दिसतें कीं, एकादा देश जिंकिला तर शेती करणाऱ्या लोकांविना त्याचा कांहीं उपयोग होत नसे; म्हणून तेथील जमीन मूळच्याच शेतकऱ्यांच्या ताब्यांत ठेविली जाई; आणि त्यांस त्यांच्या व त्यांच्या मुलाबाळांच्या पोषणास पुरेल इतकें शेताचें उत्पन्न दिलें जाई; आणि शिवाय त्यांचें संरक्षणही केलें जाई.

मूळची गुलामगिरीची पद्धति आणि ही शेतगुलामगिरीची पद्धति ह्यांच्यांत केवढा मोठा भेद मूळांतच आहे, हें लक्षांत आणावयाचें असल्यास आणखी अशी गोष्ट ध्यानांत आणावी कीं, पहिली केवळ रानटी व धनगरी टोळ्यांत असून, दुसरी शेतीची स्थिति प्राप्त होईल तेव्हांच शक्य होते; कारण तेव्हांच एका समाजास दुसऱ्यास आपल्यांत सामील करण्याची शक्ति येते, आणि जितांस त्यांच्या जमिनीवर अडकवून ठेवतां येतें.

२५. जे समाजान्तर्गत लोक पारध करून राहतात, आणि ज्यांस व्यापलेल्या मुलखाची किंमत केवळ पारधीचें वसतिस्थान म्हणूनच वाटते, त्यांची त्या मुलखा-

वर जी मालकी असणार ती संयुक्त मालकीच असणार. म्हणून प्रारंभीं, सहजच, असल्या समाजांतील जे वयांत आलेले पुरुष ते सर्व पारधी व लढवय्ये असल्यामुळें तेथील जमिनीचे ते आपणास सामान्य मालक समजतात, आणि तिजवर इतर टोळयांनीं चाल केल्यास त्यांस प्रतिबंध करितात. आतां धनगरी स्थितीच्या पहिल्या पहिल्या अमदानींत, ज्या मुलखावर त्यांची टोळी भटकत असेल, त्याजवर जरी तिची मूळची निश्चित मालकी नसते, तरी ती तेव्हांपासून उत्पन्न होऊं लागते, आणि पुढच्या अर्धवट धनगरी स्थितीच्या पायरीवर टोळीच्या प्रत्येक विभागाला ठरीव प्रदेशांतच आपलीं जनावरें चारावीं लागतात.

लढवय्ये लोकांचा वर्ग आणि जमीनदारांचा वर्ग हे पहिल्यापासूनच एकच कसे होऊं लागतात, हें दाखविण्यासाठीं वरील गोष्टी सांगितल्या आहेत. कारण विशिष्ट समूह पारध करून राहणारा असो वा गुरेंढोरें बाळगून राहणारा असो, त्याच्या घटकांपैकीं कोणापाशीं गुलाम असल्यास त्यांस कधीं जमिनीची मालकी मिळत नाहीं. म्हणजे, जे गुलाम नसतील किंवा स्वतंत्र असतील ते सर्व लढवय्ये असून ते अर्थातच जमिनीचे मालक बनतात. हा संबंध, त्यांत अनेक फेरबदल होऊन पुष्कळकाळपावेतों चालतो; आणि तसा तो चालणें अनिवार्यच आहे. प्रारंभीं स्थाईक बनलेल्या समाजांत जमीन तेवढीच कायती बहुतेक सर्व संपत्तीची जनक असल्यामुळें, आणि त्या काळीं "बळी तो कान पिळी" हें तत्त्व पूर्णपणें अंमलांत असल्यामुळें, शारीरिक शक्ति

आणि मालकी हीं सहजच एकत्र वास करीत असतात. म्हणून जेथें जमिनीची मालकी सगळ्या समाजाकडे असण्याऐवजीं ती कांहीं ग्रामांमध्यें किंवा कुटुंबांमध्यें किंवा व्यक्तींमध्यें वांटून दिलेली असते, तेथें तिची मालकी बहुधा शस्त्र धारण करणाराकडे जात असते. प्राचीन ईजिप्त देशांत प्रत्येक लढवय्या जमीनदार असे, आणि त्याच्या वांटणीस बहुधा सहा एकर जमीन आलेली असे. रोममध्यें देखील सतराव्या वर्षापासून तों साठाव्या वर्षापर्यंत प्रत्येक जमीनदारास लष्करांत नोकरी करणें भाग असे; म्हणून मुक्त झालेल्या गुलामाला यदाकदाचित् जर जमीन मिळाली, तर त्यालाही तसें करणें भाग पडे. ग्रीस व इंग्लंड येथेंही असेंच असे.

शिपाईगिरी आणि जमीनदारी ह्यांच्यामध्यें पुढें ह्याखेरीज आणखी संबंध उत्पन्न होतो. तो असाः—युद्धामध्यें यश येऊन आणि समाजोत्क्रमण होऊन जेव्हां मुख्य शास्त्याच्या हातीं जास्त सत्ता येते, तेव्हां तो आपल्या मुख्य मुख्य लढवय्यांस जमिनी बक्षीस द्यावयास लागतो. ह्याचीं उदाहरणें ईजिप्तपासून तों इंग्लंदपावेतों सर्वत्र दृष्टीस पडतातच. नंतर मग असल्या जमीनदारांकडून लढाईमध्यें मदत करण्याच्या शपथा ते वाहून घेत असत.

इंग्लिश जमीनदारांच्या पूर्वजांच्या ज्या तजबीरा त्यांच्या वाड्यांतून टांगलेल्या दिसतात, त्यांचे पोषाक बहुधा लष्करी वेषाचे असतात ह्यावरून देखील हीच गोष्ट व्यक्त होते.

२६. आतां असा प्रश्न उभा राहतो कीं, सरदार

आणि स्वतंत्र लोक (Noble and Free men) असा जो या वर्गांमध्यें पोटविभाग पुढें उत्पन्न होतो, तो कसा होतो ?

ह्या प्रश्नाला अत्यंत सामान्य उत्तर म्हटलें म्हणजे अर्थात् हें आहे कीं, अवश्यमेव अस्थिर असल्यामुळें ज्यांच्या स्थिती प्रथम सम होत्या, त्यांच्या त्या कालेंकरून असम होतात. अर्धवट सुधारलेली स्थिति येईपावेतों हें विभिन्नीकरण निश्चित होऊं शकत नाहीं; कारण तोंपर्यंत संपत्तिसंचय फारसा होऊं शकत नाहीं, आणि जो कांहीं होईल तो कायम राहण्यास रखे वारसदारीचे कायदेही नसतात. पण धनगरी आणि शेतकरी ह्या दोन स्थितींमध्यें, आणि विशेषतः पुरुषांचीच वारसदारी जेथें स्थापन झाली असेल तेथें, ह्या विभिन्नीकरणाला अनेक कारणें उत्पन्न होतात. पहिलें कारण मूळपुरुषाशीं निरनिराळ्या वंशजांचीं निरनिराळीं नातीं उत्पन्न होतात हें होय. जसजशा जास्त पिढ्या होत जातील तसतशीं धाकट्या वंशजांच्या धाकट्या मुलांचीं सर्वांत वडील वंशजाच्या वडील मुलांशीं नातीं दूरदूरचीं होऊं लागतात; आणि त्यामुळें सामाजिक कनिष्ठता उत्पन्न होते. कुटुंबांतील एकाद्याचा कोणीं खून केल्यास जीवास जीव घेऊन त्याबद्दलचा सूड उगविण्याची जबाबदारी ज्याअर्थीं नात्याच्या विशिष्ट पायरीच्या पलीकडे जात नाहीं (प्राचीन फ्रान्सांत सातव्या पायरीच्या पलीकडे जात नसे), त्याअर्थीं त्याबरोबर येणारा जो मान तोही जात नाहीं. ह्याच कारणामुळें इस्टेटीच्या संबंधानेंही कमीपणा उत्पन्न होतो. कुटुंबाची इस्टेट पिढ्यानुपिढ्या सर्वांत वडील घ-

राण्याकडे गेल्यास त्याचा परिणाम असा होतो कीं, मूळपुरुषापासून जे अत्यन्त दूरचे असतील, ते अगदीं गरीब बनतात. नंतर ह्या कारणांत आणखी एका कारणाची भर पडते; तें ज्यास्त संपत्तीमुळें जी जादा सत्ता हातीं येते तें होय. कारण टोळींतल्या टोळींत जेव्हां तंटे उद्भवतात, तेव्हां श्रीमानांपाशीं स्वसंरक्षणाचीं साधनें ज्यास्त चांगलीं असल्यामुळें आणि मदत विकत घेण्याचें सामर्थ्य ज्यास्त असल्यामुळें, त्यांना गरीबांवर सहजच ताण करतां येते हें कारण मोठें जबरदस्त आहे. ह्याचा पुरावा हेन्री मेन यानें सांगितलेल्या एका गोष्टींत सांपडतो. "आमच्या युरोपीय सरदारवर्गाच्या एका भागाचे मूळजनक जे डेनिश लोक ते पूर्वीं शेतकरी असून आणीबाणीच्या ग्रामकलहांच्या वेळीं आपलीं घरें तटबंदीनें बळकट केल्यामुळें त्यांस जो फायदा मिळाला त्याचा उपयोग त्यांस चांगला झाला". अशा रीतीनें एकदां श्रेष्ठपणा प्राप्त झाला म्हणजे तो दुसऱ्या एका रीतीनें वृद्धिंगत होतो. कधीं कधीं गुन्हेगार आणि कधीं कधीं त्रस्त झालेले लोक दुसऱ्या समाजांतून पळून येऊन ते ज्या समाजांत पळून येतील ते समाज कांहीं अंशीं वाढत असतात हें मागच्या प्रकरणांत आपल्या नजरेस आलेंचआहे. ज्या ठिकाणीं असे पळून आलेले लोक श्रेष्ठ दर्जानें असतील तेथें ते बहुधा शास्ते बनतात (उदाहरणार्थ, या देशांतील पुष्कळ डोंगरी टोळ्यांचे राजे हिंदु आहेत), आणि जेथें त्याच दर्जाचे असतील तेथें त्यांना असें करतां येत नसल्यामुळें नव्या टोळींतील जे मुख्य सत्ताधारी असतील त्यांचा ते आश्रय करि-

तात. कधीं कधीं संरक्षणासाठीं ते आपलें स्वातंत्र्य त्यांच्या हवालीं करितात. म्हणजे इष्ट धन्याच्या पुढें एक भाला मोडून माणूस आपल्यास गुलाम करून घेतो (जसें पूर्व आफ्रिकन लोकांमध्यें), किंवा कांहीं थोडीशी आपल्या शरीरास इजा करून घेतो (जसें फुल्ला लोकांत). प्राचीन रोममध्यें अर्धवट गुलामांचा जो " कुळें " (Clients) म्हणून वर्ग उत्पन्न झाला, तो अशाच रीतीनें झाला. पण जेथें पळून आलेला माणूस लढाईत उपयोगीं पडण्यासारखा असेल तेथें तो संरक्षण व पोषण ह्यांच्या बदलीं लढण्याचें कबूल करितो. ह्यासाठीं सहज जो ज्यास्त प्रबल संपत्तिमान् असेल त्यासच तो विशेष पसंत करितो; आणि अशा रीतीनें जो आधींच प्रबल असेल त्यास तो जास्त प्रबल करितो. बरें,असले लोक आपल्या धन्यांना तेवढे ओळखीत असल्यामुळें आणि इतर समाजाच्या हिताहिताशीं त्यांचा कांहीं संबंध नसल्यामुळें,समाजाचे हक्क वळकावण्याच्या कामीं आणि बाकींच्यास हलक करून याचीमान वर करण्याच्या कामीं, त्यास साहाय्यभूत होतात.

पायरीपायरीनें हा फरक वाढत जातो. कारण अशा रीतीनें ह्या मुख्य माणसाचे जे आपखुषीनें झालेले गुलाम त्यांखेरीज इतर कांहीं, लढायांमध्यें सांपडून त्याचे गुलाम होतात, इतर जुगारांत स्वतास पणास लावून होतात, आणि दुसरे कांहीं विकत घेतल्यानें, कांहीं गुन्हा केल्यामुळें, आणि कांहीं ऋणको म्हणून होतात. बरें, अशा रीतीनें गुलामांची संख्या वाढली म्हणजे मालकाची सत्ता व संपत्ति ज्यास्तच वाढत जाते, आणि

उच्च व नीच यांच्यांतील भेद ज्यास्तच वाढतो. आणि शेवटीं कनिष्ट स्वतंत्र माणसापेक्षां हा श्रेष्ठ स्वतंत्र माणूस किंवा सरदार इतका वरचढ बनतो कीं, त्यास देखील (कनिष्ट स्वतंत्र माणसास देखील) सुरक्षिततेसाठीं त्याचा अनुयायी बनणें आवश्यक होतें; आणि अशा रीतीनें प्रारंभीं स्वेच्छेनें उत्पन्न झालेला जो संबंध तो हळू हळू ज्यास्त ज्यास्त जबरीचा होऊं लागतो; "स्वतंत्र माणसास आपला धनी (Lord) पसंत करण्याची मोकळीक असे...पण त्याला कोणी तरी धनी असावाच लागे, जो त्याचें संरक्षण करील व त्यास जामीनही राहील."

२७. समाजाच्या ज्या घटकांना श्रेष्ठस्थिति प्राप्त झाली आहे, आणि जे कनिष्ठस्थितींतच राहिले आहेत, त्यांजमध्यें शारीरिक व मानसिक असे कांहीं स्वभावभेद ह्याबरोबरच अस्तित्वांत येणाऱ्या कांहीं अन्य कारणांवरून उत्पन्न होतात. स्थितिभेद एकदां उत्पन्न झाले म्हणजे त्यांपासून जीवितभेदांचीही उत्पत्ति होते, आणि ते भेद (जीवितभेद) स्वभावभेदांस उत्पन्न करून हे स्थितिभेद बदलण्याचें काम ज्यास्त दुर्घट करून टाकितात.

जीवितभेदांमध्यें प्रथम खाणें आणि त्याचे परिणाम ह्या संबंधाचा भेद उत्पन्न होतो. प्राथमिक टोळ्यांमध्यें पुरुषांचें उष्टें राहील तें बायकांनीं खावयाचें अशी जी चाल सामान्यतः असतें, आणि मोठ्या पुरुषांस जे मिष्ट पदार्थ वाढावयाचे ते लहानांस घालावयाचे नाहींत अशी जी त्याबरोबरच दुसरी चाल असते, तिजवरून दुर्बलांचें नुकसान करून सबलांनीं चरावयाचें ही जी

अनिवार्य प्रवृत्ति तिचें चांगलें निदर्शन होतें; आणि वर्ग-भेद उत्पन्न झाले म्हणजे कनिष्ठापेक्षां श्रेष्ठांचें पोषण नेहमींच ज्यास्त चांगलें होऊं लागतें. फार्स्टर म्हणतो, "सोसैटी आयलंड्स्"नामक बेटांत कनिष्ठ वर्गांना वरचेवर जी अन्नाची टंचाई भोगावी लागते, ती श्रेष्ठ वर्गांना कधींच भोगावी लागत नाहीं. सांडविच बेटांत प्राण्यांचें जें मांस म्हणून मिळेल तें मुख्यत्वेंकरून त्यांचे नाईकच खातात. फिजियन लोकांतील नरमांसभक्षणासंबंधानें सीमन असें म्हणतो कीं, "जमावांतील सामान्य लोक आणि सर्वच वर्गांतील बायका यांस तें कांहीं मिळत नाहीं." थोडे शास्ते आणि पुष्कळ शासित ह्यांमध्यें खाण्याच्या संबंधाचा जो भेद उत्पन्न होतो त्याचें ह्यावरून चांगलें निदर्शन होतें. ह्या भेदामुळें आणि त्याबरोबर येणाऱ्या वस्त्रें, घरें, आणि श्रम, ह्या संबंधाच्या भेदामुळें, सरते शेवटीं शारीरिक भेद उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, फीजियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, "त्यांच्यांतील नाईक उंच, चांगल्या बांध्याचे, आणि मजबूत असतात; पण कनिष्ठ वर्गांमध्यें फार श्रम आणि अल्प खाणें ह्यांपासून उत्पन्न होणारी दुर्बलता दृष्टीस पडते". सांडविच बेटांतील नाईक तर इतके उमदे दिसतात कीं त्यांची जातच निराळी आहे असें कित्येक समजतात. ताहितियन, टाँगन, आणि आफ्रिकन लोकांबद्दल असाच पुरावा सांपडतो. खुद्द इंग्लंदांत देखील धंदेवाले लोक कामकरी लोकांपेक्षां उंच आहेत आणि वजनानेंही ज्यास्त आहेत.

याबरोबरच शास्ते व शासित यांजमध्यें शारीरिक

चापल्य व चातुर्य यांच्या संबंधानें भेद उत्पन्न होतात. श्रेष्ठ पदवीचे लोक लढाईत गुंतलेले नसतील तेव्हां पारधींत गुंतलेले असल्यामुळें त्यांना नेहमीं असें शिक्षण मिळत असतें कीं, तेणेंकरून अनेक शारीरिक श्रेष्ठ गुण त्यांजमध्यें उत्पन्न व्हावे; उलटपक्षीं, जे शेती, ओझीं वाहणें, आणि इतर काबाडकष्टाचीं कामें करण्यांत गुंतलेले असतील, त्यांच्या अंगीं मूळचें जें कांहीं चापल्य व हुशारी असेल, तीही ते कांहीं अंशीं गमावून बसतात. अशा रीतीनें विशिष्ट वर्गाच्या श्रेष्ठत्वास ज्यास्त मदत होते.

शिवाय रोज सत्ता चालविल्यानें आणि रोज तीस नमून राहिल्यानें जे मानसिक विशेष उत्पन्न व्हावयाचे तेही ह्या दोन वर्गांत उत्पन्न होतात. एकसारख्या त्याच त्याच कल्पना, मनोभावना, आणि वर्तनसरणी पुनःपुनः उपयोगांत आणिल्यामुळें एका बाजूस वंशपरंपरागत हुकूम करण्याची योग्यता येते, आणि दुसऱ्या बाजूस ते मान्य करण्याची येते; याचा परिणाम कालेंकरून असा होतो कीं, ह्या दोन वर्गांमध्यें स्थापन झालेले संबंध स्वाभाविकच आहेत असा दोघांचाही समज बनतो.

२८. स्थाईक समाजांमध्यें सारख्या लढाया चालत असल्यामुळें त्यांचे संयुक्तसमाज बनत असतात; आणि म्हणून वर वर्णिलेले जे वर्गविभाग ते असल्या समाजांत ज्यास्तच संकीर्ण होतात; ही संकीर्णता जेते व जित लोकांच्या समूहांमध्यें आधींच जे वर्गभेद होते त्यांच्या मिश्रणापासून उत्पन्न होत असते.

वाढत जाणाऱ्या संकलनाबरोबर हें जें विभिन्नीक-

रणही वाढत जातें, तें सांडविच बेटवाल्यांसारख्या अर्धवट सुधारलेल्या समाजांत चांगलें दृष्टीस पडतें. त्यांच्यामध्यें अशा पदव्या आहेतः—" १. राजा, राणी आणि राजकुटुंब, आणि शिवाय मसलतगार किंवा राजाचा मुख्य प्रधान. २. निरनिराळ्या बेटांचे सुभेदार आणि कित्येक मोठाल्या प्रांतांचे नाईक. ३. जिल्ह्यांचे किंवा गांवांचे मुख्य अधिकारी, जे जमिनीबद्दल ठरीव सारा देतात आणि कुळांकडून शेती करवितात. ह्या वर्गांत प्राचीन उपाध्येही येतात. ४. कामकरीवर्ग, म्हणजे जे जमिनीचे लहान लहान तुकडे साऱ्यानें घेतात, किंवा जे अन्नवस्त्रासाठीं शेतांतून खपतात, आणि सुतार, सोनार वगैरे शिल्पी, बजवय्ये, आणि नाचे." आणि इतरत्र दाखविल्याप्रमाणें ह्या कामकरी वर्गाचे मजुरी घेणारे कारागीर, शेतगुलाम, आणि पूर्णगुलाम, असे आणखी भेद होतात. उपलब्ध पुराव्याची चाळणी करतां असें बरेंच स्पष्ट होतें कीं, सर्वांत हलक्या दर्जाचे नाईक पूर्वी स्वतंत्र असून, शेजारच्या राजांनीं जेव्हां त्यांस जिंकिलें व ते स्थानिक राजे बनले, तेव्हां हे नाईक दुसऱ्या वर्गांत ढकलले गेले; आणि आणखी विजयांनीं सगळ्या समूहाचा मिळून जेव्हां एक राजा बनला, तेव्हां हे स्थानिक राजे दुय्यम प्रतीचे बनून नाईक तिसऱ्या प्रतीचे बनले. असल्याच पायऱ्यावर असलेल्या अन्य समाजांत असलेच भेद असल्याच कारणांनीं उत्पन्न झालेले दृग्गोचर होतात. उदाहरणार्थ, न्यूझीलंदर व आशांटी लोकांत सहा वर्ग आहेत, व आबिसीनियन लोकांत पांच आहेत. पेरूदेशांतील प्राचीन राज्यांत हे भेद

फारच ठळकरीतीनें दृष्टीस पडत, आणि इजिप्शन व रोमन लोकांतही ते होतेच. खुद्द इंग्लंदांत नार्मन लोकांनीं तो देश जिंकिला तेव्हां त्याचे श्रेष्ठ व कनिष्ठ सरदार साक्सन सरदारांच्या डोक्यावर येऊन बसल्यामुळें ते (साक्सन सरदार) तिसऱ्यां वर्गांत ढकलले गेले. आतां येथें सतत लढाया चालून प्रथम लहान लहान समूह बनतात, नंतर मोठाले बनतात, नंतर ते फुटतात आणि नंतर नवे समूह बनतात, तेथें समाजामध्यें अनेकच विभाग उत्पन्न होतात; आणि ही स्थिति यूरोपांत बाराव्या ते पंधराव्या शतकापर्यंत दिसत होती.

आतां ज्यास्त राजकीय संकलनामुळेंच ज्यास्त राजकीय विभिन्नीकरण कसें होत जातें, हें वरील अनेक उदाहरणांवरून लक्षांत आणतांना आपण हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, प्रारंभींप्रारंभींच्या पायऱ्यांवर समाजस्निग्धता अल्प असेल तोंपावेतों ज्यास्त राजकीय संकलन व्हावयाचें तें ज्यास्त राजकीय विभिन्नीकरणानेंच शक्य होतें. कारण एकत्र संभाळून धरावयाचा गोळा असुसंबद्ध असल्यास, तो जितका मोठा असेल तितके त्यास एकत्र संभाळून धरावयास कमी कमी दर्जाचे ज्यास्त ज्यास्त कार्यकरी लागत असतात.

२९. युद्धशील स्थितीपासून ज्या राजकीय विभिन्नीकरणांस सुरवात होते, आणि जीं पुष्कळकाळपर्यंत इतकीं ज्यास्त ज्यास्त निश्चित होत जातात कीं लग्नानें निरनिराळ्या पदव्यांचें मिश्रण करणें गुन्हा समजला जाऊं लागतो, त्यांच्यांत पुढच्या पायऱ्यांवर आणि अन्यपरिस्थितींत फिरवाफिरव होऊं लागते, आणि तीं कांहीं

अंशीं किंवा सर्वांशीं नष्ट होऊं लागतात.

ज्या ठिकाणीं कित्येक पिढ्यांपर्यंत लढाईमुळें अनेक प्रकारचीं संकलनें आणि विकलनें बनत असतील, त्याठिकाणीं सामाजिकबंधनें वरचेवर मोडत व पुनः उत्पन्न होत गेल्यानें, वर वर्णिलेल्या रीतींनीं स्थापन झालेले जे विभाग ते अस्पष्ट व्हावयास लागतात. आणि ज्या ठिकाणीं एकादा समाज शेजारच्याच सजातीय समाजांनीं जिंकला जाण्याच्या ऐवजीं अगदीं भिन्न अशा जातीकडून क्रूर रीतीनें जिंकला जातो, त्याठिकाणीं जितसमाजांतील मूळच्या सामाजिक पायऱ्या अगदीं नाहींशा होतात, आणि जेत्या समाजानें स्थापिलेल्या अगदीं नव्या पायऱ्या कदाचित येतात. आशियाखंडांतील कांहीं भागांत ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते, तेथें वंशपरंपरागत पदवी बहुतेक मुळींच नसते; आणि सरकारी हुद्याची पदवी तेवढीच ओळखिली जाते. सरकारानें नेमिलेल्या हुद्देदारांच्या पदव्यांव्यतिरिक्त तसेच राजकीय अर्थ ज्यांत आहे असे वर्गभेद तेथें मुळींच नसतात.

मूळच्या पदव्या गौण होऊन नव्या पदव्या उत्पन्न होण्यास आणखी एक कारण होत असतें. तें राजकीय घनीभवनाची प्रवृद्धि हें होय. ह्याचें उदाहरण चीन देशांत दृष्टीस पडतें. गुट्झ्लाफ म्हणतोः—इतर देशांतील गर्विष्ट व प्रबल असे जे सरदार लोक ते एथें गादीचे भिकारी आश्रित बनलेले आहेत. सर्व वर्गांना एका रूळाखालीं चेपून सारखें करण्याचें तत्त्व ह्या देशांत फारच अमलांत आलेलें आहे. त्याचा उद्देश राजाचा अधिकार सर्वांत श्रेष्ठ करावा असा आहे.

असल्या फेरफारांचीं कारणें समजण्यांस कठीण नाहींत. पहिली गोष्ट ही कीं, संकलन जसें वाढत जाईल तशी जित अशा स्थानिक शास्त्यांची सत्ता ज्यास्त ज्यास्त नष्ट होऊन त्यांची नांवाची नाहीं तरी वास्तविक पदवी ते गमावितात; म्हणजे खंडणी देणाऱ्या राजांच्या वर्गातून ते प्रजेच्या वर्गांत जातात. कधीं कधीं तर राजा त्यांचा मत्सर करावयास लागून त्यांस महत्त्वाचीं कामें मुळींच सांगत नाहींसा होतो. उदाहरणार्थ, फ्रान्सचा चवदावा लुई सरदारवर्गास प्रधानकीचीं कामें मुद्दामच सांगत नसे. पुढें सरकारानें निर्माण केलेल्या त्यांच्या तोडीच्या दुसऱ्या पदव्यांमुळें ह्यांचा मान ज्यास्त व कमी होतो. जमीनदार अशा लष्करी मुख्यांच्या वंशपरा आलेल्या पदव्यांच्या ऐवजीं राजानें दिलेल्या पदव्या येतात. अशा रीतीनें स्थापिलेले कांहीं वर्ग लष्करीच देखील असतात. कांहीं निरनिराळ्या दर्जाचीं राजकीय कामें केल्यापासून उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, सतराव्या शतकांत फ्रान्सांत मोठ्या कौन्सिलाचे आणि फडणिशी खात्याचे हपीसरांना वंशपरंपरा सरदारी मिळत असे. न्यायाधीशांना, आणि डाक्टरांनाही असल्या पदव्या कधीं कधीं मिळूं लागतात. उदाहरणार्थ, फ्रान्सांतच असें करीत असत. असो. यावरून मूळचे वर्गभेद कसे पुसटले जातात, आणि नवे वर्गभेद विशिष्टस्थानविरहित असे कसे उत्पन्न होतात, हें स्पष्ट दिसतें. म्हणजे, जणू काय हे थरच असून ते संकलित समाजांतून आडवे पसरतात; त्यांतील पुष्कळांचा विशिष्ट जाग्यांशीं कांहीं संबंध

नसतो, आणि त्यांना सर्वच स्थानें सारखींच अपरिचित असतात. आतां हें खरें आहे कीं, अशा रीतीनें निर्मिलेल्या पदव्यांपैकीं अत्युच्च पदव्या प्रांत किंवा शहरें यांच्या नांवावरून घनलेल्या असतात. पण ज्या इतर आधुनिक पदव्या राजकीय, न्यायविषयक व इतर कामांवरून उत्पन्न झालेल्या आहेत, त्यांचीं नांवें देखील स्थानविशिष्ट नाहींत. भागांचें संकलन होऊन सगळ्याची संघटना होऊं लागली म्हणजे हें रूपान्तर त्याबरोबर सहजच उत्पन्न होऊं लागतें.

पण लष्करी पद्धतीमुळें प्रथम उत्पन्न झालेले राजकीय विभाग नष्ट करण्यास याहूनही सबळ कारण म्हटलें म्हणजे वाढत जाणारी उद्यमशीलता ही होय. ह्या कारणाची क्रिया दोन रीतींनीं होते. पहिली रीत ही कीं जमिनीची मालकी किंवा सरकारी हुद्दा ह्याव्यतिरिक्त ज्यांचें सामर्थ्य उत्पन्न झालेलें आहे असा एक वर्ग ह्यापासून उत्पन्न होतो; आणि दुसरी रीत ही कीं, त्याच्यायोगानें विशिष्ट वर्ग आपण सर्वांत श्रेष्ठ आहों असा जो दिमाख करीत असतो त्याला विरुद्ध अशा कल्पना व मनोभावना समाजांत उत्पन्न होतात. आपल्या हें नजरेस आलेंच आहे कीं प्रथम संपत्ति आणि पदवी ह्यांचें नेहमीं साहचर्य असतें. व्यापारवृद्धि होण्याच्या अगोदर, आणि जमिनीची मालकी असेल तरच साधनवैपुल्य प्राप्त व्हावयाचें असें असेल तोंपावेतों, सरदारी आणि संपत्ति ह्यांचा प्रत्यक्ष संबंध असणें हें अगदीं साहजिकच आहे. म्हणून, सर हेन्री मेन म्हणतो त्याप्रमाणें, मोठ्या कुळांत जन्म आणि संपत्ति,

आणि विशेषतः जनन आणि जमिनीव्यतिरिक्त मिळविलेली संपत्ति ह्यांमध्यें विरोध दिसतो तो अगदीं आधुनिक आहे. "कारण ठोकळ व्यापारांपासून मोठी किफायत व्हावयास लागावी इतकी उद्योगधंद्याची वाढ झाली म्हणजे असे कांहीं व्यापारी उत्पन्न होतात कीं, ते पुष्कळ जमीनदारांहून संपत्तीनें ज्यास्त प्रबल होतात; आणि नंतर राजे आणि सरदार यांस कर्ज वगैरे देऊन उपकारी करून घेऊन समाजांत आपलें वजन बसवितात; असें झालें म्हणजे ते आणि पदवीवाले वर्ग ह्यांच्या मधील कांटेरी वई कधीं कधीं मोडून जाऊं लागते. ही सरणी फ्रान्सांत १२७१ सालापासूनच सुरू झाली; कारण तेव्हां रावल नांवाच्या सोनाराला राजानें पहिलीच सरदारी पदवी अर्पण केली. असो. अशा रीतीनें एकदां एक उदाहरण झालें म्हणजे मग तसलीं वारंवार घडूं लागतात; आणि कधीं कधीं पैशाची टंचाई पडली म्हणजे राजे लोक उघड किंवा चोरून असल्या पदव्या विकूं लागतात. ह्याचींही उदाहरणें फ्रान्स व इंग्लंद ह्या दोन देशांच्या इतिहासांत आहेतच. आणि शिवाय उद्यमशील जीवितामुळें सर्व लोक सारखे समजण्याची जी एक वृत्ति उत्पन्न होते, तिच्या योगानें मूळचे राजकीय विभाग मोडण्यास आणखीच मदत होते. दुसऱ्याच्या हक्कांकडे योग्य लक्ष देऊन स्वताच्या हक्कांचें संरक्षण करण्याची प्रवृत्ति माणसांमध्यें जशी वाढत जाते, (आणि ही गोष्ट व्यापाराच्या प्रत्येक कामांतच होत असते), तशी परवशतेला प्रतिकूल अशी मनाची भावना उत्पन्न होऊं लागते;

आणि ज्या मानानें असें होऊं लागेल त्या मानानें परवशताव्यंजक जे राजकीय भेद त्यांना संभाळून धरणारी जी पूज्यबुद्धि ती लोकांच्या मनांतून ज्यास्त ज्यास्त नष्ट होऊं लागते.

३०. एवंच, सामाजिकजीविताला मूळ प्रारंभ झाला तेव्हांच वर्गभेद उत्पन्न झालेले आहेत. जे भटकणारे लहान लहान जमाव इतके विस्कळित असतात कीं, त्यांच्या घटकभागांचे परस्परांशीं व परिस्थितीशीं जे संबंध ते वारंवार बदलत असतात, असले जमाव वगळतां, आपणांस असें आढळून येतें कीं जेथें जेथें समाजांत थोडीशी सुसंबद्धता असेल, आणि त्याच्या भागाभागांमधील संबंध कांहींसे स्थिर झाले असतील, तेथें तेथें राजकीय विभाग उत्पन्न होऊं लागतात. सामर्थ्याच्या सापेक्ष श्रेष्ठत्वामुळें (स्त्रियांपेक्षां पुरुषांस सामर्थ्य ज्यास्त असल्यामुळें) प्रथम स्त्रीपुरुषांच्या उद्योगांमध्यें आणि त्यावरून त्यांच्या दर्जांमध्यें कौटुंबिक व सामाजिक असें दोन्ही प्रकारचें विभिन्नीकरण उत्पन्न होतें. आणि नंतर पुरुषापुरुषांमध्येंच तसलें विभिन्नीकरण उत्पन्न होऊं लागतें, व तें पकडून आणलेल्यांच्या दास्यत्वांच्या रूपानें दिसूं लागतें. म्हणजे, पुरुषांमध्येंच धनीवर्ग आणि गुलामवर्ग असे दोन वर्ग बनतात.

स्वताकरितां किंवा स्वतःच्या गुरांढोरांकरतां जेथें भक्ष्यांच्या शोधार्थ माणसें रानांतून भटकतच राहतात, तेथें त्यांनीं बनविलेल्या जमावांना एकमेकांतील व्यक्ती पकडून आणण्यापलीकडे लढाईपासून स्वतःचा कांहींच फायदा करून घेतां येत नाहीं. पण जेथें माणसांना शे-

तर्कीची किंवा स्थाईक स्थिति प्राप्त झालेली असेल, त्या ठिकाणीं एका समाजाला दुसऱ्या सगळ्याच्या सगळ्या समाजास आणि त्याच्या मुलखास जिंकतां येतें. जेव्हां असें होतें तेव्हां आणखी वर्गभेद उत्पन्न होतात. कारण जित झाल्यामुळें खंडणी देणारा जो समाज त्याचा नाईक जेत्या समाजाचा अंकित बनतो, आणि शिवाय त्यांतील लोकांना जरी आपल्या शेतांवर राहण्याची परवानगी मिळते तरी त्यांस त्यांच्या नायकांच्या द्वारा शेताच्या उत्पन्नाचा कांहीं भाग आपल्या विजेत्यांस द्यावा लागतो; ही शेवटीं शेतगुलाम बनणाऱ्या व्यापाराची पहिलीच पायरी होय.

पहिल्यापासून लढवय्या वर्ग हा शस्त्रास्त्रांच्या जोरावर प्रबल वर्ग बनलेला असल्यामुळें त्याच वर्गाच्या हातीं अन्नाचा उद्गम जी जमीन ती असते. पारधीच्या व धनगरी पायऱ्यांवर जमावांतील लढवय्ये जमिनीचे समाईक मालक असतात. त्यांस स्थाईक स्थिति प्राप्त झाल्यावर त्यांची मालकी अनेक रीतींनीं कांहीं अंशीं समाईक आणि कांहीं अंशीं व्यक्तिविषयक अशी बनते, आणि सरते शेवटीं बहुतेक सर्वांशीं व्यक्तिविषयक बनते. पण सामाजिक उत्क्रमणाच्या पुष्कळ पायऱ्यांवर जमीनदारी आणि लष्करी पेषा हीं साहचर्यानेंच आढळतात.

नियमितरीत्या वंशपरंपरेनें आणि विशेषतः पुरुषवंशामध्यें, वित्ताची संक्रान्ति व्हावी ही रीत स्थापन झाल्यानें, आणि सर्वांत वडील माणसाच्या सर्वांत वडील मुलाकडे पदवी व संपत्ति हीं सारखीं वंशपरंपरेनें जावीं ही पद्धति स्थापन झाल्यानें, लढवय्येपणानें उत्प-

न्न झालेल्या वर्गविभिन्नीकरणास जोर येतो. त्यामुळें जवळचे नातलग आणि दूरचे नातलग ह्यांच्यामध्यें पदवी आणि संपत्ति ह्यांच्यासंबंधानें वैसदृश्यें उत्पन्न होतात; आणि असल्या वैसदृश्यांस एकदां सुरवात झाली म्हणजे तीं वाढूं लागतात; कारण त्यामुळें असें होतें कीं त्यांसंबंधानें जे श्रेष्ठ असतील त्यांना स्वसंरक्षण व पराक्रम ह्यांचीं साधनें जमवून स्वसत्ता कायम ठेवण्याच्या युक्त्या जास्त जास्त साध्य करून घेतां येतात.

बाहेरचे लोक पळून येऊन समाजांतील अत्यन्त प्रबल माणसाचे आश्रित बनल्यानें, आणि त्यांजपैकीं कांहीं काम करणारे नोकर म्हणून त्याजपाशीं राहिल्यानें, आणि कांहीं जमिनीशीं संबंध नाहीं असे त्याचे लढवय्ये आश्रित बनल्यानें, वरील विभिन्नीकरणास ज्यास्तच पुष्टि येऊन आणखी एक नवें विभिन्नीकरण स्थापन होतें. आणि ज्याअर्थीं असल्या जमावांच्या संघांपैकीं जो अत्यन्त प्रबल जमाव असेल त्याकडेच असले आश्रयार्थी सर्वांत ज्यास्त जातात, आणि त्याच्या नायकाचे आश्रित बनतात, त्याअर्थीं विजयांमुळें मागून उत्पन्न होणारीं जीं संकलनें आणि विभिन्नीकरणें त्यांची अभिवृद्धि करण्याच्या कामीं ते कारणीभूत होतात.

सामाजिकपदवीमधील वैसदृश्यांमुळें अन्नवस्त्र आणि घर ह्यांच्या जाती व संचय ह्यांच्यासंबंधानें भेद उत्पन्न होऊन त्यापासून शारीरिक भेद उत्पन्न होऊं लागतात; आणि त्यामुळें शास्त्यांचें वर्चस्व आणि शासितांचें दौर्बल्य हीं दोन्ही जास्त होऊं लागतात. आणि ह्या शारीरिक भेदांव्यतिरिक्त, या दोन वर्गांच्या निरनिराळ्या

जीवितसरण्यांमुळें, बौद्धिक आणि मनोवृत्तिविषयक, दोन्ही प्रकारचे मानसिक भेद उत्पन्न होऊन त्यांच्यांतील जो सामान्य स्वभावभेद त्यास ज्यास्तच जोर येतो.

ज्या विजयांमुळें एकेरे संयुक्तसमाज आणि दुबार संयुक्तसमाज बनतात, असे विजय जेव्हां होतात, तेव्हां पदव्यांवर पदव्या उत्पन्न होतात. आणि त्याचा सामान्य परिणाम असा होतो कीं, जेत्या समाजांतील पदव्या पूर्वी होत्या त्यांहून श्रेष्ठ होऊन जित समाजांतील पदव्या पूर्वींहून कमी दर्जाच्या होतात.

युद्धशीलतेच्या पहिल्या पायऱ्यांवर बनलेले जे हे वर्गभेद ते, पुष्कळ लहान समाजांचें घनीभवन होऊन एक मोठा समाज जसा बनत जाईल, तसे इतर वर्गभेदांनीं आक्रमिले जाऊन अस्पष्ट होत जातात. स्थानिकसंघटनेच्या संबंधाच्या ज्या पदव्या त्यांच्याऐवजीं सामान्यसंघटनेच्या संबंधाच्या पदव्या उत्पन्न होतात. दुय्यम शास्ते व तिय्यम शास्ते, जे शासित प्रांतांचे लष्करी मालक असतात, त्यांच्याऐवजीं असे शास्ते उत्पन्न होतात कीं, त्यांचा अंमल सर्वच समाजाच्या एका विशिष्ट थरावर कमज्यास्त स्पष्ट असा असतो; आणि असली शासनपद्धति ही पक्क झालेल्या राजकीय अंमलदारीची एक सहचारिणीच आहे.

पण मुख्यत्वेंकरून ध्यानांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, इकडे मोठाल्या सामाजिक समूहांच्या उच्चतर राजकीय उत्क्रमणामुळें, घटक अशा लहान सामाजिक समूहांमध्यें उत्पन्न झालेले पदवीभेद, नवे पदवीभेद उत्पन्न होऊन, मोडिले जात असतां, दुसरीकडे वृद्धिंगत होणा-

ऱ्या उद्योगधंद्यांमुळें ते मूळभेद आणखीच मोडिले जातात. पदवीशीं संबंध नाहीं अशी संपत्ति हे उद्योगधंदे उत्पन्न करीत असल्यामुळें त्यांपासून पदवीवाल्यांच्या सत्तेशीं वरचढ करणारी अशी एक (व्यापाऱ्यांची) नवी सत्ता उत्पन्न होते; आणि त्याबरोबर सर्व व्यापारविषयक सवद्यांच्या संबंधानें कायद्याच्या दृष्टीनें सर्व लोक सारख्या पदवीचे आहेत असें तत्त्व अमलांत येऊन, प्रारंभीं ज्या भेदांमुळें कायद्याच्या दृष्टीनें लोक विषमपदवीचे मानिले जात असत, ते भेद क्षीण होऊन जातात.

प्रकरण पांचवें

राजकीय स्वरूपें आणि शक्ती

३१. जीं शरीरें प्रौढपणांत अगदीं बहुतेक सर्वांशीं भिन्न दिसतात तीं त्यांच्या पहिल्या पायऱ्यांवर फार सारखीं असतात, हा शोध लागल्यामुळें, आणि सर्वच देहांना सारख्याच रचनेपासून सुरवात होते ह्या शोधामुळें, जीवशास्त्रज्ञांच्या कल्पना पूर्वींहून फारच व्यापक झाल्या आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या जीवांच्या परस्परसंबंधाविषयींच्याच त्यांच्या कल्पनांमध्यें ह्याच्यायोगानें पूर्ण क्रान्ति झाली आहे असें नाहीं, तर प्रत्येक जीवाच्या निरनिराळ्या भागांच्या परस्परसंबंधांविषयींच्या त्यांच्या कल्पनांतही येणेंकरून अगदीं क्रान्ति झाली आहे.

समाजांचें जर उत्क्रमण झालेलें आहे, आणि सहक्रियेमध्यें जें भागांचें परस्परावलंबित्व अंतर्भूत होतें, तें जर हळूहळूच प्राप्त झालेलें आहे, तर त्यावरून असें व्यक्त होतें कीं, त्यांच्या वाढलेल्या रचना कितीही परस्परविसदृश असल्या, तरी प्रारंभींची त्यांची रचना एकच असली पाहिजे. म्हणून असली कांहीं मूळची समस्वरूपता जर आपल्या नजरेस आली, तर अखेरची जी त्यांची विभिन्नता तिची उपपत्ति लावण्याच्या कामीं ती आपल्या कामीं येईल. प्रत्येक समाजांतील राजकीय संघटनेचे निरनिराळे घटक हल्लीं दिसतात तसे ते कसे बनले आहेत, आणि आपल्या समाजांतील त्या घटकां-

चा इतर समाजांतील तसल्या घटकांशीं संबंध कसा आहे, हें आपल्या लक्षांत पूर्वींहून ज्यास्त चांगल्या रीतीनें येईल.

ज्यामध्यें पुरुष, स्त्रिया व मुलें आहेत असा एक अव्यवस्थित जमाव प्रथम घेऊन आपण असा प्रश्न करूं कीं, त्या जमावाला स्थलान्तर करण्याच्या किंवा शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याच्या कांहीं सार्वजनिक प्रश्नाचा निकाल करण्याचा समय आला म्हणजे काय झालें पाहिजे. अशा प्रसंगीं त्या जमावांतील व्यक्तींचे कमी किंवा ज्यास्त स्पष्ट असे दोन विभाग झाले पाहिजेत. त्यांच्यांतील ज्यास्त वडील, ज्यास्त बळकट, आणि ज्यांचें शहाणपण व धैर्य हीं अनुभवानें सिद्ध झालीं आहेत ते ह्या सगळ्यांचा मिळून त्या दोन विभागांतील धाकटा विभाग होईल, व ते वरील प्रश्नाची चर्चा करतील; आणि त्यांच्यांतील लहान, अशक्त आणि कधीं पुढें न आलेले अशांचा बनलेला जो मोठा विभाग तो ती चर्चा ऐकेल, व त्यांतील लोक केव्हां केव्हां रुकार देणें किंवा मतभेद दर्शविणें ह्यापलीकडे बहुधा कांहीं करणार नाहींत. त्यासंबंधानें आणखीही एक अनुमान करण्यास हरकत नाहीं. त्यांतील प्रमुख माणसांच्या संघांत एकजण असा असावयाचाच कीं, त्याचें वजन सर्वांत ज्यास्त आहे—उदाहरणार्थ, एकादा वृद्ध पारधी, एकादा नामांकित योद्धा, एकादा हुशार वैद्य—आणि शेवटीं जो त्यांचा निश्चय ठरेल त्यामध्यें त्याचें अंग सर्वांत ज्यास्त असेल. म्हणजे काय, तर, त्या सर्व जमावाचे तीन विभाग पडतील. जीवशास्त्रांतील भाषेनें बोलावयाचें म्हटल्यास,

सामान्य गोळ्यांतून एक मध्यस्थानवर्ती गोळा, व त्यांतील मध्यस्थानवर्ती भाग, असे, विभिन्नीकरणव्यापारानें, उत्पन्न होतील.

राजकीय रचनेचे जे हे मूळ अंकुर आपोआप उत्पन्न झाले असले पाहिजेत म्हणून आपण वर अनुमान केलें, ते अत्यन्त रानटी लोकांत देखील उत्पन्न झालेले आपल्यास आढळून येतात. व्हिक्टोरियामधील रानटी लोकांच्या टोळीचा जेव्हां आपल्यांतील कोणास मारिल्याबद्दल दुसऱ्या एका टोळीवर सूड उगविण्याचा बेत ठरावयाचा असतो, तेव्हां " त्या टोळींतील सर्व वृद्ध माणसांचें एक कौन्सिल भरतें....त्यावेळीं बायका पुरुषांच्या भोंवतीं वेटोळें करून बसतात...त्यांचा नाईक (त्यांच्यापैकीं वजनदार गृहस्थ) वादविवादास सुरवात करितो ". या देशांतील खोंड लोकांमध्येंही अशीच चाल आहे. त्यांजबद्दल असें वाचनांत येतें:—" सामान्य महत्त्वाच्या प्रश्नांचा निकाल करण्यासाठीं एका टोळीच्या किंवा तिच्यांतील पोटभागांच्या सभा भरत असतात. त्यांमध्यें तिच्यांतील सर्व लोकांस हजर राहण्याचा हक्क असून जे प्रश्न पुढें येतील त्यांजवर बोलण्याचाही अधिकार असतो. तथापि त्यांची सार्वजनिक चर्चा होईल त्यांत बोलण्याचा वृद्धांचा तेवढा हक्क असतो. न्यूझीलंदमध्यें देखील राज्याचा कारभार सर्व लोकांच्या सभा जमून त्यांत मत पडेल त्याप्रमाणें चालत असे; आणि टोळींतील बहुजनांच्या संमतीशिवाय त्यांच्या बायकांना लढाई किंवा तह, किंवा दुसरें कोणतेंही सार्वजनिक महत्त्वाचें काम, करतां येत नसे. ताहितियन लो-

कांबद्दल एलिस असें सांगतो कीं, राजाचे कांहीं नाईक हे मुख्य सल्लागार असत, पण राष्ट्रीय महत्त्वाचें कोणतेंही काम जमीनदारांच्या सल्ल्याशिवाय होत नसे, आणि सार्वजनिकसभाही भरत असत. मादागास्कारमध्यें " सर्वांत मोठी राष्ट्रीय सभा म्हटली म्हणजे राजधानींतील लोक, आणि प्रांतांचे, शहरांचे, गांवांचे, वगैरे मुख्य यांची असे ". तेथें राजा बहुधा स्वतः अध्यक्ष असे.

ह्या उदाहरणांतून तीन घटकावयवांच्या अधिकारांमध्यें जरी आपणास मोठाले फेरबदल झालेले आढळून येतात, आणि बाहेरच्या पुष्कळांचा अधिकार कमी होऊन आंतील थोड्यांचा जरी वाढलेला दिसतो, तरी ते तिन्ही घटक हजर दिसतात; आणि कित्येक प्राचीन राष्ट्रांकडे पाहतां त्यांच्यामध्येंही ते हजरच दिसतात. फिनिशयन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, आलेक्झांडरच्यावेळीं टिरियन लोकांनीं राजा हजर नसतांच सेनेट आणि लोकसभा ह्यांच्या संमतीनें लढाई सुरू केली. तद्वतच प्रारंभींच्या रोमन लोकांत राजा, सेनेट, आणि स्वतंत्र लोक ह्यांचे जे परस्परसंबंध असत ते मूळच्या सभेच्या संबंधांवरूनच उघड उघड उत्पन्न झालेले होते. कारण ह्या तिहींचा जरी एकसमयावच्छेदेंकरून व्यापार होत नसे, तरी महत्त्वाच्या प्रसंगीं राजा जमलेल्या नागरिकांस आपले बेत कळवीत असे; नंतर ते त्याबद्दल आपली पसंती किंवा नापसंती दर्शवीत, आणि सेनेटाचे सभासद जे टोळ्यांचे मुख्य ते जरी ह्या प्रश्नांची चर्चा सार्वजनिक रीतीनें करीत नसत, तरी प्रसंगीं राजा व नागरिक ह्यांचा ठराव रद्द करण्याचा त्यांस अधिकार असे.

जर्मन लोक आणि स्कांडिनेव्हियन लोक यांच्यासंबंधानें अशींच वर्णनें आढळतात. इंग्लंदांतील साक्सन राजांच्या वेळची जी " बिटाने जिमॉट " नामक सभा तिजबद्दल फ्रीमन असें म्हणतो:—ह्या सभेची घटना कशी असे ह्याविषयीं जुन्या कोणत्याही लेखांत स्पष्ट किंवा खात्रीची हकीकत सांपडत नाहीं. ती शहाणे, सरदार, मोठे माणूस, ह्यांची सभा असे, असलीं अस्पष्ट वर्णनें आढळतात; पण दुसऱ्या वर्णनांकडे पाहतां तिजमध्यें ह्यांहूनही ज्यास्त लोकांचा समावेश असे असें दिसतें. एडवर्ड राजास " सर्व लोकांनीं " मिळून निवडिलें असें म्हणतात. अर्ल गॉडविन " आपलें भाषण राजा आणि देशांतील सर्व लोक ह्यांच्यापुढें करितो ". आणि फ्रीमन म्हणतो त्याप्रमाणें ह्या सगळ्याचा गर्भितार्थ असा दिसतो कीं, ह्या सभेच्या वादाविवादांत लोकांचें अंग एवढेंच असे कीं ते ओरडून आपली पसंती किंवा नापसंती दर्शवीत.

एवंच शासनसंस्थेचें हें स्वरूप सामाजिक जीविताच्या प्रारंभीं नजरेस येत असल्यामुळें, आणि पुढेंही निरनिराळ्या परिस्थितींत तें कायम राहिलेलें दिसत असल्यामुळें, तें त्या संस्थेचें मूळस्वरूप म्हणून ठरतें. आर्यन आणि कांहीं सीमाइट लोक असल्या उच्च दर्जाच्याच लोकांमध्यें तें दृष्टीस पडतें असें नाहीं, तर मलायोपॉलिनिशियन लोक, उत्तर अमेरिकेंतील तांबडे लोक, या देशांतील द्रविडियन जातीचे डोंगरी लोक, आणि आस्ट्रेलियांतील रानटी लोक, ह्या सर्व लोकांत देखील तें दृष्टीस पडतें. वास्तविकरीत्या पाहतां, आधींच ध्वनित केल्याप्रमाणें

राजकीय घटना दुसऱ्या एकाद्या रीतीनें सुरू होणें शक्यच नाहीं. एकापक्षीं, सर्व लोकांनीं एकत्र जमून प्रदर्शित केलेल्या सर्व जमावाच्या इच्छेव्यतिरिक्त प्रथम नियामक अशी सत्ता दुसरी कोणतीच नसते. दुसऱ्यापक्षीं, ही जमावाची इच्छा निश्चित करण्याच्या कामीं, त्या जमावापैकीं जे थोडेसे श्रेष्ठ असतील त्यांचें प्रमुख अंग असणें हेंही अनिवार्यच आहे. आणि ह्या थोड्याशा श्रेष्ठांपैकीं सर्वांत श्रेष्ठ असा एक कोणी तरी असलाच पाहिजे. ह्या ठिकाणीं जी विशेषतः ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती, सरकाराचें स्वतंत्र स्वरूप हेंच मूळ स्वरूप होय, ही नव्हे; जरी हीही गर्भित गोष्ट विचार करण्यासारखीच आहे. बरें, पुष्कळ कनिष्ठांपासून थोडे श्रेष्ठ पृथक् झालेले जे पुढें ठळक रीतीनें आढळून येतात तो पृथक्पणा अगदीं प्रारंभींच नजरेस येतो हीही गोष्ट ती नव्हे; जरी हीही गोष्ट निराळी काढून तिच्यावर विशेष जोर देण्यासारखी आहे. बरें, ज्याची नियंत्रक सत्ता इतर सर्वांच्या सत्तेहून ज्यास्त असते असा माणूस प्रारंभींच दिसूं लागतो ह्याही गोष्टीकडे मुख्यत्वेंकरून लक्ष द्यावयाचें नाहीं; जरी दिलेल्या पुराव्यावरून हेंही सिद्ध होण्यासारखें आहे. तर, येथें विशेषकरून ध्यानांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, "एकांत तीन" अशा तीन अंगी राजकीय रचनेचें अस्पष्ट स्वरूप अगदीं प्रारंभींच नजरेस पडूं लागतें.

३२. आतां हें उघडच आहे कीं ह्या तीन घटकांच्या शक्तींमधील प्रमाणें कोणत्याही दोन उदाहरणांत सारखीं नसतात. आणि वरच्यांपैकीं कांहीं उदाहरणांत ग-

भिंत केल्याप्रमाणें प्रत्येक ठिकाणीं त्यांच्यामध्यें कमजास्त फेरबदल होत असतो. ह्या फेरबदलास कोठें जमावांतील माणसांच्या मनोवृत्ति कारण असतात; कोठें भौतिक परिस्थिति कारण असते (कारण ती स्वातंत्र्यास अनुकूल असते किंवा प्रतिकूल असते); कोठें त्या लोकांच्या ज्या युद्धविषयक किंवा उद्यमविषयक चळवळी त्या कारण असतात; आणि कोठें विशिष्ट व्यक्तींचे अपवादभूत स्वभाव हे कारण असतात.

विलक्षण शहाणपण, चातुर्य, किंवा बल हीं दैविक आहेत अशी मूळमाणसांची सामान्यतः समजूत असल्यामुळें, त्याच्या योगानें टोळींतील एकाद्या माणसाचें इतरांवर इतकें वजन पडतें कीं, तें वंशपरंपरेनें त्याच्या मागूनच्या माणसाच्या अंगीं येतें असें समजलें जाऊन त्याचा अधिकार इतर पुढारी लोक आणि एकंदर जनसमूह ह्या दोघांवरही स्थापन होतो. किंवा, कांहींनीं लढवय्येपणाचाच धंदा करावा, आणि बाकीच्यांनीं इतर धंदे करावे, असा श्रमविभाग एकाद्या जमावांत उत्पन्न झाल्यामुळें त्यापासून असें होतें कीं, श्रेष्ठ असे नियामकसंस्थेचे जे दोन घटक (नाईक आणि पुढारीलोक) त्यांच्या अंगीं तिसऱ्याला (सामान्य जनसमूहाला) धाऱ्यावर बसविण्याइतकी शक्ति येते. किंवा, तिसऱ्या वर्गाचे घटकांनीं त्यांच्यावर जबरी करणें दुर्घट किंवा अशक्य होईल अशा आपल्या संवयी कायम ठेविल्यामुळें, त्यांचें बाकीच्या दोघांवरचें सामान्य प्राबल्य चालूं राहतें. आणि शिवाय ह्या तीन शास्त्या वर्गांचे सर्व समाजाशीं जे संबंध त्यामध्यें, त्यांच्या वादविवादात ज्याचें अंग

नाहीं असा जो प्रथम बायकांचाच बनलेला, आणि मागाहून त्यांचा, गुलामांचा आणि इतर आश्रितांचा बनलेला मुका वर्ग तो बनल्यानें फेरबदल होतो.

लढाईत जय आल्यानें हा मुका किंवा थंडा वर्ग उत्पन्न होतो इतकेंच नाहीं, तर लढाईमध्यें पुढाऱ्यांच्या कह्यांत इतरांनीं रहाणें आवश्यक असल्यामुळें शास्त्या वर्गाचे जे हे तीन भाग त्यांच्या परस्परापेक्ष शक्तींतही लढाईमुळें कमजास्त निश्चित असा फेरबदल होतो. इतर गोष्टी समान राहिल्यास ज्याअर्थी ज्यांच्यांत हुकमांत वागणें ज्यास्त आहे ते जमाव ज्यांच्यांत तें कमी आहे त्यांस जित करीत असतात, त्याअर्थी प्रबल अशा थोड्या माणसांची नियामक सत्ता ज्या जमावांत इतरांच्या मानानें फार असेल, ते जमाव सामान्यतः टिकाव धरितात आणि पसरतात. तद्वतच, एकाच्या इच्छेच्या धोरणानें काम चालल्यास जी क्रियाविषयक चपलता आणि सुसंबद्धता उत्पन्न होते, तिच्यावर लढाईत जय येणें हें पुष्कळ अंशीं अवलंबून असल्यामुळें, जेथें लढाई नेहमींच होत असेल, तेथें शास्त्या समूहाच्या घटकांनीं आपल्या मुख्याचें ज्यास्त ज्यास्त आज्ञाधारक बनत जावें हें साहाजिकच असतें; कारण, एरवीं समान असलेल्या टोळ्यांमध्यें जीवनार्थ कलहामध्यें मागें पडणें हा अनाज्ञाधारकपणाचा परिणाम होत असतो. शिवाय अशी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची कीं, समाजांनीं एकमेकांच्या प्रदेशांत अतिक्रम करून जाणें हें वरचेवर चाललेंच असल्यामुळें, त्या देशांत मूळ घटनेचे जे मागमोस राहिलेले असतील ते अगदीं पुसट करून टाकणें

किंवा अगदीं नाहींसेही करणें हेंही काम चालूच असतें.

तथापि, राजकीय उत्क्रमण चाललें असतां हे तीन मूलघटक अनेक रीतींनीं व प्रमाणांनीं आपलीं प्रमाणें इतकीं बदलतात कीं त्यांपैकीं कांहीं केवळ बीजभूत होतात किंवा अजीबाद नष्टही होतात ही गोष्ट ध्यानांत ठेवून, आपण हें जर लक्षांत आणिलें कीं सर्व राजकीय स्वरूपें ह्या मूलस्वरूपापासून उत्पन्न झालीं आहेत—म्हणजे, एकछत्रीसत्ता, किंवा अल्पछत्रीसत्ता किंवा बहुछत्रीसत्ता म्हणजे अशा प्रकारची राज्यव्यवस्था कीं जिच्यांत एक घटक दुसऱ्या दोघांची वाढ कमी करून आपलीच वाढ फारकरून घेतां झाला आहे; आणि हें जर ध्यानांत ठेविलें कीं राज्यव्यवस्थेचे जे अनेक संमिश्रप्रकार आहेत त्यांची जी मांडणी करावयाची ती मूलघटकांपैकीं ह्या किंवा त्या घटकाच्या ठिकाणीं ज्यास्त सत्ता ज्या प्रमाणानें असेल त्याबरहुकूम करावयाची; तर ह्या (राजकीय) स्वरूपांबद्दलची जी आपली रूढ कल्पना ती बरीच बदलून जाणार आहे.

२३. राजकीय स्वरूपांमध्यें हें जसें मूळांत एकस्वरूप दृष्टीस पडतें, त्यासारखेंच राजकीय शक्तींमध्येंही मूळांत एकच स्वरूप आहे कीं काय ? राजकीय रचनांचा उद्गम एकच आहे ही गोष्ट जशी आपल्या ध्यानांतून निघून गेलेली आहे, तशी त्यांच्या शक्तीचाही उगम एकच आहे हीही गोष्ट आपल्या लक्षांतून कांहीं अंशीं तरी निघून गेलेली नाहीं काय ? नजीकच्याचा विचार करीत असतां दूरच्याचा आपणास विसर पड-

ण्याचा किती संभव असतो हें लक्षांत आणण्यासाठीं एथें क्षणभर थांबणें इष्ट दिसतें.

वादळामध्यें जहाज फुटून त्याचे तुकडे कसे होतात, किंवा समुद्रकांठचा धक्का कसा ढांसळतो, हें जो लक्षपूर्वक पाहतो त्याला लाटांची शक्ति केवढी मोठी आहे असा अचंबा वाटतो. वारा नसेल तर असें कांहीं व्हावयाचें नाहीं हें त्याच्या कोणीं लक्षांत आणून दिलें म्हणजे मग त्याला हें कळून येतें कीं, स्वतः समुद्राच्या अंगीं असें करण्याची शक्ति नाहीं, तर वाऱ्याच्या योगानें समुद्राचा पृष्ठभाग खवळून जाऊन तारवें फुटतात व धक्के मोडतात. पण तो जर एथेंच थांबला, तर हे विलक्षण फेरबदल करणारी शक्ति कोणती हें त्याला नक्की कळावयाचें नाहीं. अंतःस्वरूपीं, हवा ही पाण्याइतकीच निष्क्रिय आहे. सूर्याच्या उष्णतेचे पृथ्वीच्या पृष्ठाच्या निरनिराळ्या भागांवर निरनिराळे परिणाम न झाल्यास वारे मुळींच उत्पन्न व्हावयाचे नाहींत. पण ज्या शक्तीमुळें खडक फुटून रेवा बनतो तिचा त्यानें एथवर मागमोस लाविला तरी, तिच्या उगमाला तो पोंहोंचत नाहीं; कारण सूर्याच्या निरनिराळ्या भागांच्या गुरुत्वाकर्षणामुळें त्याच्या एकंदर गोळ्याचें जें घनीभवन होतें, तें झालें नसतें तर सूर्याकडून उष्णतादान मुळींच झालें नसतें.

जो दृश्यकर्ता एकादी शक्ति चालवीत असेल त्याचीच ती आहे असें समजावयाचें, आणि तिचा जो अदृश्य उगम असेल तिकडे जावयाचें नाहीं, ही जी प्रवृत्ति सर्वांच्याच ठिकाणीं कांहीं तरी असते, आणि बहु-

तेकांच्या ठिकाणीं पुष्कळ असते, तिच्या योगानें आपल्या सर्वच कल्पना दूषित होत असतात, आणि राजकीयविषयक कल्पना तर विशेषच दूषित होत असतात. सरकारचे अधिकार हे त्याच्यांत स्वयंभूच आहेत असें मानण्याची जी पूर्वीची सामान्य संवय ती लोकाधिष्ठित संस्थांच्या वाढीमुळें जरी बरीच बदललेली आहे, तरी सरकारें हीं स्वतःच शक्तिमान् नाहींत, तर शक्तीचीं द्वारें आहेत, ही गोष्ट अद्यापि लोकांच्या लक्षांत स्पष्टपणें आलेली नाहीं. ही शक्ति सरकारें उत्पन्न होण्याच्या पूर्वी अस्तित्वांत होती; खुद्द सरकारें तिच्याचकडून उत्पन्न झालीं; आणि तीच शक्ति, कमज्यास्तरीत्या पूर्णपणें झांकली गेलेली अशी सरकारांच्या द्वारा स्वकार्य करीत असते. हें पाहण्यासाठीं आपण अगदीं ह्या गोष्टीच्या प्रारंभाकडे जाऊं या.

ग्रीनलंदर लोकांवर राजकीय आवरण मुळींच नाहीं; ते इतकेंच करितात कीं सील मासे पकडण्यांत आणि हवेचीं चिन्हें ओळखण्यांत जो कोणी एकादा वृद्ध माणूस त्यांच्यांत कुशल असेल त्याच्या मतास ते कांहींसा मान देतात. म्हणून त्यांच्यापैकीं एकानें दुसऱ्याचा अपराध केल्यास तो त्याच्याशीं " संगीत युद्ध " ज्यास म्हणतात तें करितो. म्हणजे, तो एक त्याजवर थट्टेचें कवन करितो, आणि टोळींतील सर्व लोकांसमक्ष थट्टारूप द्वंद्वयुद्धास त्यास आव्हान करितो; आणि थट्टेमध्यें जो शेवटची कडी करील त्यानें जिंकिलें म्हणून समजतात. क्रान्ट्झ् आणखी असें सांगतो कीं, लोकांत आपली बेअब्रू होईल ह्या भीतीमुळें हे लोक दुराचरणापासून

जितके पराङ्मुख राहतात तितके दुसऱ्या कशामुळेंच रहात नाहींत. लोकमताचा जो नियामक प्रभाव इतर सर्व विशिष्ट नियामक प्रभावांच्या अगोदरचा आहे त्याचें या ठिकाणीं अगदीं शुद्धरीतीनें कार्य झालेलें आपल्या दृष्टीस पडतें. कोठें कोठें लोकांच्या नापसंतीच्या भीतीला समाजांतून हांकून लावण्याच्या भीतीचा दुजोरा दिलेला असतो. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियन लोकांत चोरीसारख्या अपराधांबद्दल ते एकमेकांस छावणींतून घालवून देत असतात. कोलंबियामधील सालिश नांवाच्या टोळीबद्दल आपण असें वाचितों कीं, " त्यांच्यांत नियमित सरकार असें मुळींच नाहीं "; पण आणखी असेंही वाचितों कीं, " गुन्हेगारांस कधीं कधीं टोळींतून हांकून देण्याची शिक्षा ते करीत असतात ". हिंदुस्थानांतील डोंगरी लोकांपैकीं कांहीं लोक ह्या कोलंबियन लोकांहून जात आणि रहाणी या बाबतींत फार भिन्न असून, त्यांच्यांत देखील अपक्व असें राजकीय नियंत्रण आणि सर्वांच्या मताचें नियंत्रण ह्यांच्यांमधील हा संबंध दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाल ह्या लोकांत गांवनाईक केवळ संमानित असे वृद्धगृहस्थ असून त्यांच्या हातीं नियामकसत्ता मुळींच नसते; म्हणून जे रूढीविरुद्ध आचरण करतील " त्यांच्या अपराधाप्रमाणें लोक त्यांची निर्भर्त्सना करितात, त्यांस दंड करितात, किंवा त्यांस जातीबाहेर टाकितात ". पण ज्या जमावांचे ठिकाणीं संघटना फारच अल्प किंवा मुळींच नसते, त्यांच्या ठिकाणीं सार्वजनिक मताचें नियंत्रण केवढें मोठें असतें, हें खुनाबद्दल सूड उगविण्या-

चें-जे आपलें कर्तव्य म्हणून समजतात त्यांच्यांत उत्तमरीतीनें दिसून येतें. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियांतील मूळ लोकांबद्दल सर जॉर्ज ग्रे लिहितोः–" तेथील लोकांचें अत्यंत पवित्र कर्तव्य म्हटलें म्हणजे आपल्या अगदीं जवळच्या नातलगाबद्दल सूड उगवावयाचा हें आहे; हे कर्तव्य बजावीपर्यंत वृद्ध बाया त्या माणसास टोंचून बोलत राहतात; त्याचें लग्न झालें असेल तर त्याच्या बायका त्यास सोडून जातात; त्याचें लग्न झालेलें नसेल तर कोणीही तरुणी त्याच्याशीं बोलावयाची नाहीं; असल्या नीच पुत्रास आपण व्यर्थ प्रसवलें म्हणून त्याची आई सारखी रडत व ओरडत राहील; आणि त्याचा बाप त्याचा नेहमीं तिरस्कार करून त्याच्या कानांत सारख्या शिव्या कोंबीत राहील."

दुसरी गोष्ट आपण ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, राजकीय नियंत्रण दिसूं लागल्यानंतर पुष्कळ काळपर्यंत ह्या लोकमताच्या नियंत्रणापेक्षां त्याचें महत्त्व कमी रहातें; ह्याचें एक कारण हें कीं त्यावेळीं पक्क अशी सरकाररूप रचना नसल्यामुळें मुख्याच्या अंगीं आपली इच्छा अमलांत आणण्याचें फारच अल्प सामर्थ्य असतें, आणि दुसरें कारण हें कीं, त्याच्या अंगीं जें सामर्थ्य असेल त्याचा जर त्यानें फाजील उपयोग केला तर लोक त्यास सोडून जातात. ह्याचीं उदाहरणें जगाच्या सर्व भागांत दृष्टीस पडतात. अमेरिकेंत स्नेक इंदियन लोकांमध्यें " प्रत्येकजण आपला स्वतःचा मालक असतो, आणि त्याच्या वर्तनावर नियंत्रण टोळींतील लोकमताचा ज्यास आश्रय आहे अशा नायकाच्या उपदे-

शाचेंच कायतें असतें". "डाकोटा लोकांपैकीं एकाद्यास कांहीं खोडी करावीशी वाटली, तर त्यास कांहीं तरी देणें एवढाच त्यास त्यापासून पराङ्मुख करण्याचा त्याच्या नायकाच्या हातीं उपाय असतो. सगळ्या टोळीच्या वतीनें कोणतीही गोष्ट करण्याचा त्यास अधिकार नसतो, आणि म्हणून तो तसें करण्यास धजत नाहीं". आणि क्रीक लोकांमध्यें राजकीय संघटना जरी ह्याहून ज्यास्त पुढें गेलेली आहे तरी निवडलेल्या नायकांचा अधिकार ते चांगल्या रीतीनें वागतील तोंपर्यंत चालतो. एशियाखंडाकडे पाहतां, किरगीझ लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, "त्यांच्या नायकांच्या हातीं त्यांचें बरेंवाईट करण्याचें सामर्थ्य फारच अल्प असतें. त्यांचें वय व वंश हीं लक्षांत आणून त्यांच्या मतांना ते लोक कांहींसा मान देतात एवढेंच; पण ह्यापलीकडे कांहीं नाहीं". ऑस्टियाक लोक "आपल्या नायकांस पूर्ण मान देतात, पण तो केवळ स्वेच्छेनें देतात, आणि त्यांना तो मोठा वाटतो म्हणूनच देतात". नाग लोकांमधील नायकांबद्दल बटलर असें म्हणतो कीं, "लोकांना त्यांचे हुकूम जितपत इष्ट व सोईवार वाटतील तितपतच ते ते मानितात". आफ्रिकाखंडामध्येंही कांहीं कांहीं ठिकाणीं अशीच स्थिति आढळून येते.

एवंच, मूळ स्वरूपीं पाहतां, राजकीय सत्ता म्हणजे समाजाची एक मनोवृत्ति असते, आणि ती ज्या कार्यकर साधनाच्या द्वारा स्वव्यापार करिते त्याची स्थापना तिनें मुद्दाम किंवा सहजगत्या केलेली असते. प्रारंभापासून नायकाची सत्ता कांहीं अंशीं त्याची स्वताचीच अ-

सते हें खरें आहे, कारण इतरांपेक्षां त्याची ज्यास्त शक्ति, ज्यास्त धैर्य, आणि ज्यास्त चातुर्य हीं त्यास आपली इच्छा अमलांत आणण्यास कांहीं अंशीं समर्थ करीत असतात. पण, पुराव्यावरून दिसतें त्याप्रमाणें, त्याची स्वताची इच्छा हें एक अल्प कारण असतें; आणि त्याच्य हातीं जी सत्ता असते ती ज्या मानानें त्यांची इच्छा इतरांच्या इच्छेशीं जुळत असेल, त्या मानानेंच असते.

३४. ही जी सार्वजनिक मनोवृत्ति प्रथम स्वताच स्वव्यापार करीत असते, आणि मागाहून कांहीं अंशीं एका गुमास्त्याच्या द्वारा स्वव्यापार करीत असते, ती मनोवृत्ति कांहीं अंशीं जरी त्या त्या लोकांनीं स्वताच स्वेच्छेनें बनविलेली असते, तरी बऱ्याच ज्यास्त अंशीं ती इतर कोणी त्यांच्यावर लादलेली किंवा त्यांना लावून दिलेली अशी असते. पहिली गोष्ट ही कीं, वर्तनविषयक सामान्य सरणी लावून देणारी मनोवृत्तिविषयक घटना पूर्वजांपासून प्राप्त झालेली असते. म्हणजे ती पूर्वजांच्या एकंदर चापल्यापासून उत्पन्न झालेली असते; आणि दुसरी गोष्ट ही कीं, ज्या विशिष्ट इच्छांवरून, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या, वर्तनविषयक क्रम निश्चित होत असतात, त्या लहानपणीं वडील माणसें लावून देत असतात, आणि जे विश्वास व रूढी टोळीमध्यें वंशपरंपरा येत असतात त्यांना अनुकूल अशा केल्या जात असतात. एवंच नियामक असा जो मनोभाव तो मुख्यत्वेंकरून गतकालामध्यें संचित व संघटित झालेला असतो.

सुंता करून घेणें, दांत पाडून घेणें, अंगाचें मांस काढून टाकूं देणें, किंवा गोंदून घेणें, इत्यादि जे दुःख-

दायक विधि वयाच्या विशिष्टवर्षीं टोळींतील प्रत्येक घटकास करून घ्यावे लागत असतात ते ध्यानांत आणिले, आणि ह्या जबरीच्या रूढीपासून टोळींपैकीं कोणाचीच सुटका नसते हेंही ध्यानांत आणिलें, म्हणजे हें सहजच लक्षांत येईल कीं, राजकीय घटना उत्पन्न होण्यापूर्वीं जी नियामक शक्ति अस्तित्वांत असते, आणि जी मागून राजकीय घटनेस आपलें साधन बनविते, ती अगण्य अशा पूर्वतर पिढ्यांचें हळू हळू बनत गेलेलें जें मत तेंच होय; किंवा कदाचित् मत म्हणणें बरोबर नाहीं, कारण तें वास्तविकरीत्या पाहतां, बौद्धिक फल असल्यामुळें अगदींच निःसत्व असतें; तर त्या मताबरोबर येणारी जी जोरदार मनोवृत्ति ती ती शक्ति होय. प्रारंभीं हीच मुख्य नियामक शक्ति आपणास सर्वत्र आढळून येते.

तुपी लोकांची अशी समजूत आहे कीं, आपण आपल्या पूर्वजांच्या रूढी मोडिल्यास आपला नाश होईल; यावरून वंशपरंपरा संक्रान्त झालेलें हें मत स्वव्यापार कसें करितें, हें स्पष्टरीत्या व्यक्त होतें. जुआंग नांवाची या देशांतील जी अत्यन्त रानटी टोळ्यांपैकीं एक डोंगरी टोळी आहे, आणि जिच्यांतील लोक आडाम आणि ईव्ह यांच्यापेक्षांही ज्यास्त दिगंबर असतात, त्यांतील बायका झाडांच्या पानांचा जो (इंद्रियाच्छादक) झुबका तो टाकून देणें चुकीचें आहे असें समजून तो अजून देखील टाकून देत नाहींत (आणि वस्त्रपरिधान करीत नाहींत). कोरान्ना नामक हाटेंटाट लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, “ प्राचीन रूढी जेथें आड येत नस-

तील तेथें त्यांच्यांतील प्रत्येकजण त्याला स्वताला जें बरोबर वाटेल त्याप्रमाणें वागत असतो ". डामारा लोकांतील नायकांना " पाहिजे तसें वागण्याचा जरी अधिकार आहे,तरी ते आपल्या पूर्वजांच्या रूढींना व दंतकथांना मान देतात ". मालागासी लोकांपैकीं कांहीं टोळ्यांचा असा समज आहे कीं, " नवीन कांहीं करणें म्हणजे नुकसान करून घेणें होय; म्हणून त्यांच्या मनाला सुधारणेची कल्पना कशी ती शिवतच नाहीं ".

वंशपरंपरा आलेल्या रूढीचें हें नियंत्रण पुढें गेलेल्या टोळ्यांत व राष्ट्रांत जितकें बळकट असतें, तितकेंच राजकीय दृष्ट्या असंघटित किंवा अल्पसंघटित मनुष्यसमूहामध्यें असतें असें नाहीं, तर ज्यास्त बळकट असतें. सर जॉन लबक म्हणतो त्याप्रमाणें, " कोणताही रानटी माणूस स्वतंत्र नसतो. जगामध्यें सर्वत्र त्याचें जीवित घोंटाळ्याच्या व बाह्यतः तरी अत्यन्त गैरसोईच्या अशा विधिनिषेधपर विचित्र रूढींनीं नियंत्रित असतें ". जरी हे रानटी समाज रचनाविहीन दिसतात, तरी त्यांच्या कल्पना आणि रूढी ह्यांचा त्यांच्याकरितां एक अदृश्य सांगाडा बनलेला असतो, आणि तो त्यांच्या कांहीं प्रकारच्या कृतींना अगदीं कडक नियंत्रण करीत असतो. आणि हा अदृश्य सांगाडा, फार फार प्राचीन पिढ्यांपासून तेव्हां तेव्हांच्या विचारां व विकारांनुरूप त्या त्या लोकचे जे रोजचे व्यवहार ते चालले असतां हळूहळू आणि न समजतां, आकारास येत असतो.

सारांश, समाजनियंत्रण करण्याकरितां कोणतीही निश्चित संघटना उत्पन्न होण्यापूर्वीं अशा प्रकारचें एक

नियंत्रण अस्तित्वांत असतें कीं, तें कांहीं अंशीं जिवंताच्या सार्वजनिक मतांपासून पण ज्यास्त अंशीं मृतांच्या सार्वजनिक मतापासून उत्पन्न झालेलें असतें.

३५. पण वर दिलेल्या कांहीं उदाहरणांत गर्भित झालेलें एक सत्य आतां आपण निश्चितपणें लक्षांत आणूं या; तें सत्य हें कीं जेव्हां एकादी राजकीय संघटना उत्क्रान्त होते तेव्हां तिची सत्ता जरी बऱ्याच अंशीं प्रस्तुत सार्वजनिकमतावर अवलंबून असते, तरी एरवीं बहुतेक सर्वांशीं ती गत सार्वजनिकमतावर अवलंबून असते. म्हणजे राजा हा जरी कांहीं अंशीं सभोंवतालच्या लोकांच्या इच्छेचा कार्यसाधक असतो, तरी त्याहूनही ज्यास्त अंशीं तो मृतांच्या इच्छेचा साधक असतो; आणि त्याच्या स्वताच्या इच्छेवर जिवंतांचें जरी बरेंच नियंत्रण असतें, तरी मृतांचें त्याहूनही ज्यास्त असतें.

कारण शास्ता ह्या नात्यानें त्याचें मुख्य कर्तव्य हें असतें कीं पूर्वजांचे मनोभाव व कल्पना ज्यांमध्यें गोंविल्या आहेत असें जे वंशपरंपरेनें आलेले वर्तननियम ते अमलांत आणावयाचे. याचा प्रत्यय सर्वत्र दृष्टीस पडतो. आराफूरा लोकांमध्यें वडीलधोर लोक जे न्याय करीत असतात ते "त्यांच्या पूर्वजांच्या रूढींना अनुसरून असतात आणि ह्या रूढींबद्दल त्यांच्यामध्यें अत्यंत पूज्यबुद्धि असते". खिरगीझ लोकांचेंही असेंच आहे. सुमात्रामध्यें निकाल सांगतांना नाईक लोक "असा कायदा आहे" असें म्हणत नाहींत, तर "अशी रूढी आहे" असें म्हणतात.

रूढीस जसजसें कायद्याचें स्वरूप येत जाईल, तस-

तसा राजकीय मुख्य जिंवतांच्या कृतींचें मृतांच्या मनोवृत्तींप्रमाणें नियमन करणारा गुमास्ता ज्यास्त ज्यास्त स्पष्टपणें बनत जातो. तो जी सत्ता चालवीत असतो ती त्याची स्वताची नसून मुख्यत्वेंकरून त्याच्या द्वारा स्वव्यापार करणारी स्वतंत्र सत्ता आहे हें ध्यानांत आणावयाचें असल्यास, तिला विरोध करण्याची त्यास इच्छा झाल्यास तसें करण्याचें त्यास किती अल्प सामर्थ्य असतें हें लक्षांत आणावें. मृत पिढ्यांचे स्पष्ट किंवा ध्वनित हुकूम ज्या बाबतींत त्यास बद्ध करीत असतील त्या बाबतींत त्याची स्वतःची इच्छा वस्तुतः अगदीं निष्क्रियच राहते. उदाहरणार्थ, मादागास्कार बेटामध्यें ज्या बाबतींत कायदा, रूढी किंवा पूर्वींचा दाखला असेल तेथें राजाचा शब्द चालत नाहीं. पूर्व आफ्रिकन लोकांत, राजाच्या सत्तेस पूर्वींच्या दाखल्याची मर्यादा असते. जाव्हा बेटांतही असेंच आहे. सुमात्रामध्यें पूर्वींच्या रूढी बदलण्याचा अधिकार राजास आहे असें समजत नाहींत; व त्या रूढींस लोक फारच चिकटून राहतात. आशान्टीमध्यें ओसाई कामीना ह्या राजानें राष्ट्रिय रूढीचें उल्लंघन केल्यामुळें लोकांनीं त्यास पदच्युत केलें. ह्यावरून पूर्वीं व हल्लींही राजे गादीवर बसतांना आहे ती व्यवस्था आपण बदलणार नाहीं अशीं वचनें कशीं देत असतात ह्याची आपल्यास आठवण होते.

३६. आतां हें खरें आहे कीं, सरकार म्हणजे मुख्यत्वेंकरून प्रस्तुत व गत अशा सार्वजनिक मनोवृत्तींचें सामर्थ्य ज्याच्या द्वारा स्वव्यापार करितें असें एक

साधन आहे हा सिद्धान्त, राज्य करणाऱ्या माणसाचा स्वताचा अधिकार केवढा मोठा असूं शकतो हें दाखविणाऱ्या गोष्टींशीं विरुद्ध दिसतो. जुलमी राजाच्या अंगीं नांवाच्या कारणांसाठीं किंवा विनाकारणही लोकांचे जीव घेण्याचें, विनाकारण त्यांची मालमत्ता खालसा करण्याचें, द्रव्य आणि श्रम हे लोकांकडून पाहिजेत तितके जबरीनें घेण्याचें, लोकांस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं घालविण्याचें सामर्थ्य असतें; पण त्याविषयीं विचार न केला तरी हजारों लोक ज्या लढायांत बळी पडतात अशा लढाया सुरू करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं जें असतें त्यावरून देखील असें उघड उघड दिसतें कीं, त्याची एकट्याची इच्छा बाकीच्यांच्या सर्वांच्या संयुक्त इच्छांस धाब्यावर बसवूं शकते. असें जर आहे, तर, पूर्वीं जो आपण सिद्धान्त केला त्यामध्यें काय फेरफार केला पाहिजे ?

ह्यास उत्तर असें आहे:—माणसांच्या अव्यवस्थित जमावांमध्यें सार्वजनिक मताच्या रूपानें जो मनोभाव व्यक्त होत असतो तो जसें विधिविषयक व धर्मविषयक वर्तनाचें नियंत्रण करीत असतो तसेंच राजकीय वर्तनाचेंही करीत असतो असें जरी आमचें मत आहे; आणि शिवाय, प्रारंभींप्रारंभींच्या पायऱ्यांवर नियामक संस्था सर्वांच्या मनोभावावरून उत्पन्न झालेल्या असतात, त्यांचे अधिकार त्यांस त्या मनोभावापासूनच प्राप्त झालेले असतात, आणि त्यांचें नियंत्रणही तोच मनोभाव करीत असतो, असेंही जरी आमचें म्हणणें आहे; तरी हीही गोष्ट आह्मास कबूल करणें भाग आहे कीं,

लढाईच्या योगानें लहान जमावांचे संयोग आणि पुनः-संयोग होऊन जेव्हां मोठाले जमाव बनतात, तेव्हां ह्या प्राथमिक संबंधांमध्यें संमिश्रता उत्पन्न होते. जेथें समाज बऱ्याच अंशीं श्रेष्ठशक्तीच्या जोरावर चिमट्यांत धरिलेल्या जित लोकांचाच बनलेला असतो, तेथें वर सांगितलेला मूळ संबंध कायम रहात नाहीं. जी शासनपद्धति आंतून वाढलेली आहे तिचे गुणविशेष बाहेरच्या जेत्यानें जबरीनें स्थापिलेल्या शासनपद्धतींत दृष्टीस पडतील अशी अपेक्षा आपणास करतां कामा नये. जय मिळवून बनविलेले जे समाज ते बहुधा दोन समाजांचे बनलेले असून ते बहुतकरून सर्वांशीं नाहीं तरी बऱ्याच अंशीं एकमेकांस अगदीं परके असतात; आणि त्यांच्या ठिकाणीं सर्वांच्या इच्छेवरून एकादी राजकीय शक्ति उत्पन्न होऊं शकत नाहीं. अशा परिस्थितींत राजकीय धुरीणाची सत्ता एक प्रबल वर्गाच्याच इच्छेवरून उत्पन्न झालेली असते, किंवा, वरच्या व खालच्या वर्गांमध्यें उत्पन्न झालेले जे विरोधी मनोभाव त्यांची लढाई लावून तो स्वताच्या इच्छेस मुख्यस्थान देऊं शकतो.

मुख्य सिद्धान्ताला असणारे हे अपवाद कबूल केले तरी असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं कीं, सामान्यतः नियामक संस्था जी सत्ता चालवीत असते तिच्यापैकीं बहुतेक सगळी, सगळ्या समाजाच्याच मनोभावावरून जरी उत्पन्न झालेली नसली, तरी त्या समाजाच्या ज्या भागाच्या अंगीं स्वमनोवृत्तिप्रदर्शन करण्याचें सामर्थ्य असतें त्या भागाच्या मनोभावापासून उत्प-

न्न झालेली असते. जित आणि शस्त्रहीन अशा खाल-च्या समाजभागाचें मत जरी राजकीय कारणांत बहुतेक कुचकामाचें ठरतें, तरी प्रबल आणि शस्त्रयुक्त असा जो समाजाचा वरचा भाग त्याचें जें मत तें राजकीय कृतीचें मुख्य कारण म्हणून कायमच राहतें. उदाहरणार्थ, काँगो लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, " त्यांचा राजा त्यांच्यावर जरी स्वेच्छाचारी अंमल करीत असतो, तरी त्याचे दुय्यम असे जे राजपुत्र ते त्याच्या हुकुमांच्या अंमलबजावणींत वरचेवर ढवळाढवळ करीत असतात. डाहोम लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, " त्यांचा राजा त्यांच्यांतील प्रधान, सेनापती, उपाध्ये, इत्यादिकांना व्यक्तिशः जरी शिक्षा करूं शकतो, तरी समुदायेंकरून ते त्याच्याहून प्रबल असतात; आणि म्हणून त्यांनीं त्यास मनःपूर्वक साहाय्य न केल्यास त्याची सत्ता लवकरच लयास जाते." हीच स्थिति प्राचीन रोमन बादशहांपासून हल्लींच्या रशियांतील झारापर्यंत सर्व स्वेच्छाचारी राजांची दिसते.

एकट्या स्वेच्छाचारी राजाच्या इच्छेच्या सत्तेच्यां मानानें सगळ्यांच्या इच्छेची सत्ता केवढी मोठी असते हें आपल्या लक्षांत बरोबर आणावयाचें असल्यास कित्येक गोष्टी ध्यानांत घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही कीं, गत लोकांचे मनोभाव आणि कल्पना ह्यांपासून उत्पन्न झालेल्या अनेक संस्था व कायदे ह्यांना मान देणें व ते कायम ठेवणें स्वेच्छाचारी राजास भाग पडत असतें; कारण त्या संस्थांस व कायद्यांस धर्माचा आधार प्राप्त झालेला असतो; म्हणून ईजिप्त देशाप्रमा-

णें असल्या राजांच्या अनेक पिढ्या होऊन गेल्या तरी देशांतील सामाजिक व्यवस्था बहुतेक जशीच्या तशीच राहते. दुसरी गोष्ट ही कीं, सामान्य मनोभावाशीं विरुद्ध असा एकादा फेरबदल एकाद्या राजानें समाजव्यवस्थेंत केला, तर तो मागाहून उलथून पडण्याचा संभव असतो; उदाहरणार्थ, ईजिप्त देशांतच चवथा आमेनहॉटेप ह्या राजानें लोकांनीं केलेल्या बंडास न जुमानतां जरी एका नव्या धर्माची स्थापना केली, तरी तो त्याच्या पुढच्या राजाला रद्द करावा लागला. तिसरी गोष्ट ही कीं, असला राजा जरी सर्वांत श्रेष्ठ असून तो देवाचा अंश आहे असें जरी मानितात, तरी त्याच्यावर रूढींचीं अशीं कांहीं बंधनें असतात कीं त्याचा रोजचा आयुःक्रम केवळ गुलामगिरीचा बनलेला असतो; म्हणजे, जिवंताच्या मतावरून त्यास मृतांच्या मतांना मान देणें भाग पडत असतें. चवथी गोष्ट ही कीं, त्यानें जर जुन्या रूढींचें अनुसरण केलें नाहीं, किंवा एरवीं आपल्या कृतींनीं जर त्यानें विरुद्ध मनोभाव उत्पन्न केला, तर त्याचे दिवाणी व लष्करी नोकर त्याची नोकरी करीत नाहींसे होतात किंवा त्याच्या विरुद्ध उठतात; आणि कधीं कधीं त्याचा खूनही करितात. आणि शेवटची गोष्ट ही कीं, ज्या समाजांत लोकांच्या इच्छेविरुद्ध जाणारा स्वेच्छाचारी राजा काढून टाकिला जातो, तेथें दुसरा एक तसलाच राजा त्याच्याबद्दल उभा केला जातो; म्हणजे, ह्याचा अर्थ असा कीं, त्या समाजाच्या सामान्य मनोभावाला असला राजा चालतो इतकेंच नाहीं, तर हवा असतो. जीस कांहीं

लोक राजनिष्ठा म्हणतात, आणि कांहीं गुलामगिरी म्हणून म्हणतात, त्या दोन्ही मनोवृत्ती स्वेच्छाचारी राजास निर्माण करितात, व तो चालवितो ती सत्ताही त्याला देतात.

पण मुख्य सत्य ध्यानांत आणावयाचें तें हें कीं, प्रत्येक समाजाचीं स्वरूपें व कायदे हीं एकंदर गतकालामध्यें जे लोक त्या समाजांत होऊन गेले त्यांच्या मनोवृत्तींचीं व कल्पनाचीं सुपक्क झालेलीं जरी फलें असतात, तरी प्रस्तुत कालच्या मनोवृत्ती व कल्पना त्यांच्या आधीन झाल्यामुळेंच तीं स्वव्यापार करूं शकतात. प्रत्येक देशांत, मग तेथील राज्यव्यवस्था स्वेच्छाचारी असो किंवा इतर कसलीही असो, राजकीय व्यवहार चालण्यास अत्यंत आवश्यक असा लोकांचा आज्ञाधारकपणा जो सारखा उत्पन्न करितो तो, दंतकथेमुळें पवित्र झालेल्या वंशपरंपरागत संस्थेबद्दल लोकांच्या मनांत संचित झालेला व खिळलेला असा जो मनोभाव, तोच करितो. म्हणून राजकीय सत्तेचा वास्तविकरीत्या एकच उगम आहे; आणि तो समाजाचा एकंदर मनोभाव हाच होय. ही गोष्ट निःसंशय खरी आहे; ज्या समाजांवर परक्यांचा अंमल नाहीं, त्यांच्या संबंधानें तरी ती निःसंशय खरी आहे. सामाजिक जीविताच्या आरंभीं अशी स्थिति होती, आणि अद्यापिही वस्तुतः तीच स्थिति सुरू आहे.

३७. शास्त्राची अशी एक म्हणच बनून गेलेली आहे कीं, हल्लीं जीं कारणें स्वव्यापार करतांना दृष्टीस पडत आहेत त्यांमध्येंच हल्लीं असलेली वस्तुस्थिति ज्यांनीं

बनवून आणिली आहे, अशीं जीं गतकालामध्यें स्वव्यापार करीत असलेलीं कारणें तीं सांपडतात. ही म्हण मान्यकरून तिच्यावरून सुचलेल्या दिशेनें चवकशी केल्यास आतांपर्यंत सांगितलेल्या सिद्धान्ताचा ताळा सांपडतो.

कारण हल्लीं जी जी सार्वजनिक सभा भरते तिजवरून मूळच्या राजकीय घटनेचें वैशेषिक असें जें हें विभिन्नीकरण त्याचेंच नवें निदर्शन होत असतें; आणि त्या घटनेच्या निरनिराळ्या भागांची जी क्रिया तिचेंही नव्यानें निदर्शन होत असतें. कारण अशा सभेंत मोठा भरणा कमी प्रसिद्ध लोकांचा असा असून त्यांचें श्रोतृमंडळ बनलेलें असतें; तेथें जीं भाषणें होतील त्यांबद्दल पसंती किंवा नापसंती दर्शविणें, आणि पुढें आणलेल्या ठरावांना अनुमोदन देणें किंवा न देणें, एवढाच त्यांचा त्या सभेच्या कामांत भाग असतो. त्या सभेचा दुसरा एक लहान भाग असतो, आणि तो बहुतकरून प्लाटफार्मवर (उच्चस्थानीं) बसलेला असतो; तो संपत्ति, पदवी, किंवा योग्यता यांच्या योगानें वजनदार अशा माणसांचा बनलेला असतो; म्हणजे, ते स्थानिक पुढारी असून सभेपुढें असलेल्या प्रश्नांची चर्चा करीत असतात; आणि शिवाय निवडलेला सभेचा अध्यक्ष असतो; तो बहुतकरून जो सर्वांत मोठा माणूस तेथें मिळण्यासारखा असेल तो असतो, आणि तो सभेंत भाषणें करणारे आणि तीं ऐकणारे ह्या दोघांवर स्पष्ट असा अधिकार चालवीत असतो; म्हणजे, तो त्यांचा तात्पुरता राजाच असतो. सहजगत्या बोलावलेल्या जमावास देखील ह्या तीन विभागांचें कमज्यास्त स्पष्ट असें स्व-

रूप येतें; आणि त्या जमावास कायमच्या मंडळाचें— उदाहरणार्थ, एकादी व्यापारी कंपनी, किंवा परोपकारी मंडळी, किंवा क्लब ह्यांचें स्वरूप आलें म्हणजे या तीन विभागांस निश्चित असें स्वरूप येतें; म्हणजे, एक अध्यक्ष, एक व्यवस्थापक कमिटी, आणि सामान्य सभासद किंवा भागीदार, असें स्वरूप येतें. ह्यासंबंधानें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, स्वेच्छेनें बनविलेल्या असल्या मंडळामध्यें प्राथमिक जमावाच्या सभेप्रमाणें किंवा आधुनिक सभेप्रमाणें मुख्य आणि त्याच्या हाताखालचे थोडेसे निवडक लोक ह्यांनीं सगळ्याच्या जमावाच्या धोरणानें वागावें अशी जरी प्रथम व्यवस्था असते, तरी पुढें परिस्थिति असेल त्याप्रमाणें हा सत्ताविभाग कमज्यास्त रीतीनें बदलून जातो. जेथें एकंदर सभासद मंडळाच्या कामांत लक्ष घालीत असून सहक्रिया करतां येईल असे एकमेकांसन्निध असतील, तेथें ते मंडळाचा मुख्य आणि त्याच्या हाताखालील ह्यांजवर आपला पगडा कायम ठेवूं शकतात; पण जेथें आगगाडीच्या कंपनीच्या भागीदारांप्रमाणें ते लांब लांब पसरलेले असल्यामुळें त्यांस संयुक्तक्रिया करतां येत नसेल, तेथें ते निवडक थोडे बहुतेक सत्ता बळकावून बसतात, आणि मग त्यांच्यांतूनच एकादा स्वेच्छाचारी मुख्य वर डोकें काढितो; म्हणजे त्या मंडळाची व्यवस्था बिनजबाबदारीची बनून जाते.

राजकीय संस्थेच्या अंगीं जी सत्ता असते ती सर्वांच्या मनोभावापासून उत्पन्न झालेली असते याबद्दल घटकोघटकीं प्रत्यय येतात, ह्याविषयीं आणखी पुरावा

पाहिजे असल्यास पुढील गोष्टी ध्यानांत आणाव्या. एक गोष्ट अशी कीं, द्वंद्वयुद्धाला अनुकूल असें जोंपावेतों लोकमत असेल तोंपावेतों कायदा तीं युद्धें बंद करूं शकत नाहीं; आणि दुसरी गोष्ट अशी कीं, लोकांच्या मुलखावर विनाकारण हल्ला करण्यापासून पाप लागतें असें धर्मग्रंथ सांगत असतांही लोकांची मनोवृत्ति तशी असेल तोंपावेतों तसले हल्ले चालू राहतात. ह्या उदाहरणांवरून असें स्पष्ट होतें कीं, कायद्याचीं बाडें किंवा धर्माचीं बाडें ह्यांचें प्रतिकूल लोकमताविरुद्ध कांहीं चालत नाहीं. लोकांपासून शाबासकी मिळावी ह्या उत्सुकतेनें लोक कार्योत्सुक कसे होतात, आणि लोक नापसंती दर्शवतील ह्या भीतीनें ते दाबांत कसे राहतात, हें ध्यानांत आणिलें, म्हणजे रोजची गरज भागण्यापलीकडे लोक जे उद्योग करितात ते लोकमतास आवडतील असेच करितात ह्याबद्दल कोणास संशय वाटणार नाहीं. गंध कसें लावावें एथपर्यंत जे लोक लोकमतास मान देत असतात, तेच नाक्यावरचा गाडीचा कर चुकविण्यास कचरत नाहींत, हें ध्यानांत आणिलें म्हणजे लोकमताचें ज्यास पाठबळ आहे अशा अलिखित कायद्याची भीति, असें पाठबळ ज्यास नाहीं अशा लिखित कायद्याच्या भीतीपेक्षां ज्यास्त कशी असते हें चांगलें लक्षांत येतें. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी अशी आहे कीं, जे लोक कर्जाऊ घेतलेले पैसे परत देण्याचें मनांत आणीत नाहींत, तेच खेळांत गमावलेले पैसे मुकाट्यानें देतात. म्हणजे काय, तर, धर्म आणि कायदा ह्यांना लोकमताचें ज्या बाबतींत तितकें पाठबळ नसेल, त्या बा-

चतींत लोक जितका त्यास मान देतात, त्याहून कायदा व धर्म ह्यांचें पाठबळ नाहीं अशा पण लोकमताचें आहे अशा गोष्टीस ज्यास्त मान देतात. सारांश, ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां म्हणावें लागतें कीं, सामाजिक जीविताच्या प्रारंभीं माणसांचे व्यवहार जसे जमावाच्या मनोभावाच्या धोरणानें चालले असतात, तसे अद्यापिही चालतात; आणि राजकीय व्यवस्था हीही ह्याच मनोभावापासून उत्पन्न झालेली असल्यामुळें, लोकांच्या कांहीं प्रकारच्या व्यवहारास त्या मनोभावाच्या कांहीं विशिष्ट भागाच्या जोरावर वळण लावण्यास ती अद्यापिही द्वारभूत होते.

ह्या सामान्य सत्याचें येथें विवरण करण्याचें एक कारण राजकीय क्लृप्तीचा तो एक महत्त्वाचा भाग आहे हें होय. पण दुसरें कारण हें कीं, हें सत्य नांवानें जरी पुष्कळ लोक कबूल करितात, तरी वास्तविकरीत्या फारच थोडे करितात. साहेब म्हणतात, आमच्या ह्या देशांत देखील अराजकीय अशा संस्था पुष्कळ व मोठाल्या असून त्या लोकांनीं जरी स्वेच्छेनेंच स्थापन केलेल्या व चालविलेल्या आहेत, तरी राजकीय संस्था जें काम करीत आहेत तें काम, त्या संस्था नसल्यास, ज्या संयुक्त मनोभावांनीं राजकीय संस्था उत्पन्न केल्या आहेत ते मनोभाव दुसऱ्या संस्था उत्पन्न करून त्यांकडून करवतील हें सत्य लोकांच्या लक्षांत यावें तितकें बरोबर रीतीनें आलेलें नाहीं; मग इतर देशांची गोष्ट कशास पाहिजे? राजकारणांत लक्ष घालणारे पुरुष अशा रीतीनें बोलतात व लिहितात कीं, राजकीय संस्थांच्या अं-

गीं कांहीं स्वताचें सामर्थ्य आहे, पण खरोखर त्यांच्या अंगीं तसें नाहीं आहे; आणि त्यांस असेंही वाटतें कीं, ज्या मनोभावानें त्यांस निर्माण केलें त्याच्या अंगींकांहीं स्वताचें सामर्थ्य नाहीं, पण तसें त्याच्या अंगीं आहे. आतां अशा जर त्यांच्या विपरीत कल्पना आहेत, तर त्यांचा पगडा त्यांच्या कृतीवर बराच मोठा बसलाच पाहिजे.

प्रकरण सहावें

राजकीय मुख्य–नाईक, राजे, इत्यादि

३८. "एकांत तीन" अशा प्रकारच्या राजकीय रचनेचे आरंभींच लक्षांत येणारे जे तीन घटक त्यांपैकीं पहिल्याची वाढ कशी होत जाते हें आपणास प्रस्तुत प्रकरणांत पाहणें आहे. एक कोणतरी मुख्य स्थापन होण्यामध्यें ज्याचें पर्यवसान होतें असें जें अत्यन्त महत्त्वाचें विभिन्नीकरण त्याबद्दल गेल्या दोन प्रकरणांत थोडेंसें सांगितलेंच आहे, आणि त्याहूनही ज्यास्त ध्वनित केलें आहे. तेथें ज्याचें सामान्यस्वरूपीं दिग्दर्शन केलें त्याचें येथें विशिष्टस्वरूपीं सविस्तर विवेचन करणें आहे.

निकोबार बेटांतील लोकांना रिंकनें जेव्हां विचारिलें कीं, "तुमच्यांत मुख्य कोण ?" तेव्हां त्यांनीं हंसून उत्तर दिलें, "**एकाला** इतक्या पुष्कळ माणसांवर अधिकार चालवितां येईल असें तुम्हास कसें वाटतें ?" हें एथें नमूद करण्यांत आमचा हेतु ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत आणून देण्याचा आहे कीं, जमावांतील एकानें बाकींच्यावर श्रेष्ठपणा धारण करावा ह्या गोष्टीस लोक विरुद्ध असतात; आणि हा विरोध कांहीं प्रकारच्या माणसांमध्यें जरी अल्प असतो, तरी पुष्कळांमध्यें बराच असतो; आणि थोड्याशा लोकांमध्यें फारच असतो. वस्तुतः नायकविहीन अशा कांहीं टोळ्यांचीं उदाहरणें अगोदर दिलेलींच आहेत; त्यांत अमेरिकेंतील

हैदा लोकांच्या उदाहरणाची भर घालावी; ते लोक सर्वांस सारखे गणितात आणि क्यालिफोर्नियन लोकांत प्रत्येकजण वाटेल तसा वागतो. एशिया खंडांतील अंगामी लोक जरी एक आपला वकील म्हणून निवडितात, तरी त्यांच्यांत सर्वसंमत असा मुख्य किंवा नाईक म्हणून कोणीच नसतो; कारण ह्रा वकील वस्तुतः अधिकारविहीन आणि जबाबदारीविना असा असतो.

रानटी जमावांमध्यें जें अल्पस्वल्प कह्यांत राहणें उत्पन्न होतें तें, संयुक्तक्रियेची आवश्यकता अनिवार्य उत्पन्न झाली, आणि ती क्रिया फलदायक होण्यास नियंत्रणाची जरूरी भासूं लागली, म्हणजे उत्पन्न होतें. तत्पुरत्या मुख्याचीं मागचीं उदाहरणें एथें पुनः सांगण्यापेक्षां नवींच कांहीं सांगूं. उदाहरणार्थ, लोअर कालिफोर्नियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, "पारध किंवा लढाई करतांना त्यांचें अग्रणीत्व पत्करण्यास ते एक किंवा अधिक नाईक नेमितात, पण तेवढ्याचपुरते नेमितात". फ्लाटहेड लोकांच्या नायकांबद्दल असें म्हणतात कीं, "लढाई संपली कीं त्याची सत्ताही संपते". सौंडइंदियन लोकांमध्यें "मुख्याच्या हातीं सत्ता नसते, आणि लढाईमध्यें तेवढें तो अग्रणीत्व करितो".

दुसऱ्या एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, परिस्थिति आणि संवई ह्या ज्या मानानें नियंत्रणास अनुकूल किंवा प्रतिकूल असतील त्या मानानें ही प्राथमिक कह्यांत राहण्याची विमुखता कमी किंवा ज्यास्त असते. उदाहरणार्थ, मुख्यविहीन म्हणून जे वर लोअर-क्यालिफोर्नियन नांवाचे लोक सांगितले, त्यांबद्दल बीजर्ट असें

म्हणतो कीं, "ते डुकरांच्या कळपांसारखे दिसतात; कारण ते वाटेल तसे इकडे तिकडे भटकत असतात; आज इकडे तर उद्यां तिकडे". फ्रांकलिन म्हणतो, "चिपिवायन लोकांमधील नाईक हल्लीं अगदीं सत्ताविहीन झाले आहेत; आणि त्यांच्या लहान अशा भटकणाऱ्या टोळ्या आहेत". आबिपोन व बेडुइन ह्या लोकांचेंही असेंच आहे.

आणि आतां, प्रारंभीं राजकीय नियंत्रणाचा अभाव कसा असतो, त्यास प्रतिरोध काय होतो, आणि तो टाळण्यास कोणती परिस्थिति अनुकूल असते, हें पाहिल्यानंतर, आपण असा प्रश्न करूं कीं, त्याच्या (राजकीय नियंत्रणाच्या) वाढीस कोणतीं कारणें अनुकूल होतात? तीं अनेक आहेत; आणि त्यांची ज्या मानानें सहक्रिया होईल त्या मानानें नायकी स्थाईक होते.

३९. प्राथमिक जमावाच्या, अनेक रीतींनीं व अंशांनीं परस्परांपासून अल्प प्रमाणानें भिन्न अशा घटकांमध्यें, असा एक कोणी तरी असलाच पाहिजे कीं जो इतरांहून स्पष्टपणें श्रेष्ठ आहे. हें श्रेष्ठत्व अनेक प्रकारचें असूं शकेल. त्या प्रकारांकडे आपण आतां नजर फेंकूं.

ज्यांमध्यें बाहेरून आलेल्या माणसाची श्रेष्ठता आहे अशीं उदाहरणें जरी एका अर्थीं अपवादरूप आहेत, तरी तीं लक्षांत घेतलींच पाहिजेत. खोंड लोकांचा नाईक बहुधा हिंदू जातीचा कोणी धाडसी माणूस असतो. मध्यएशियांतील बहुतेक नाईक अशाच प्रकारचे (परकी जातीचे) असतात असें फार्सिथ म्हणतो. चिबचा

लोकांपैकीं बोचिका, टामानाक लोकांपैकीं आमानिव्हाका, आणि इतर कांहीं लोक, ह्यांचें असेंच आहे. पण एथें जो आपणास विचार कर्तव्य आहे तो मुख्यत्वेंकरून टोळींतल्या टोळींत उत्पन्न होणारे जे श्रेष्ठपणा त्यांचा होय.

पहिला श्रेष्ठपणा म्हटला म्हणजे वडीलपणाचा होय. वृद्ध माणसें दुर्बल झालीं म्हणजे रानटी लोक त्यांजबद्दल जरी इतके बेपर्वा होतात कीं ते त्यांस मारितात किंवा त्यांची विचारपूस कांहीं न करतां त्यांस मरूं देतात, तरी जोंपर्यंत त्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे तोंपर्यंत ते जास्त अनुभवी म्हणून त्यांचा ज्यास्त पगडा त्यांजवर बहुधा बसत असतो. “ नायकविहीन एस्किमोलोक वडील माणसें व बळकट माणसें यांना नमून वागतात ”. बर्चेल म्हणतो, बुशमेन लोकांमध्यें वृद्ध माणसें कांहीं अंशीं नायकांचा अधिकार चालवितात; आणि आस्ट्रेलियांतील लोकांचेंही असेंच आहे. फ्यूजिअन लोकांत वृद्धाचें वचन तरुणलोक कायद्याप्रमाणें मानतात. डायाक लोकांचे कायमचे नाईक नसतात, पण ज्या वृद्ध माणसाशीं त्यांचें नातें असेल त्याच्या सल्ल्यानुरूप ते वागतात; आणि शासनविहीन क्यारिब लोकांबद्दल एडवर्ड असें म्हणतो कीं, ते आपल्यांतील वृद्धांना कांहीं सत्ता आहे असें समजत.

रानटी समाजांत, सहजच, शरीरसामर्थ्यावरून श्रेष्ठत्व प्राप्त होतें. उदाहरणार्थ, बुशमेन लोकांत वृद्ध वयाखेरीज शरीरसामर्थ्यावरून मानमान्यता उत्पन्न होते. तास्मेनियन लोकांचे पुढारी उंच आणि बळकट, म्हणून नाईक निवडण्याबद्दल किंवा वंशपरंपरा नेमण्याबद्दल,

टोळींत जो दणकट असेल त्यास ते मुख्यस्थान देत असत. आस्ट्रेलियन व दक्षिण अमेरिकन लोकांचेंही असेंच असे; आणि प्राचीन ग्रीक लोक व मध्ययुगांतील इतर यूरोपस्थ लोक यांच्यांतही तीच स्थिति आढळते.

केवळ मानसिक श्रेष्ठत्व किंवा तें व इतर गुण हीं प्राबल्याचीं सामान्य कारणें आहेत उदाहरणार्थ, क्रीक लोकांत ज्याची बुद्धि विशेष असेल आणि राजकीय कामांत जो हुशार असेल त्यास ते आपला नाईक समजतात. कोमांची लोकांत जो ज्यास्त लुच्चा, माहीतगार व लढवय्या असेल तोच मुख्य नेमितात. कोरोआडो व ओस्टिआक या लोकांतही असेंच आहे.

रानटी लोकांत राजकीय सत्ता हातीं येण्याचा आणखी एक मार्ग म्हटला म्हणजे जवळ मालमत्ता पुष्कळ असणें हा होय. टाकुली लोकांत जो कधीं कधीं गांवजेवण घालूं शकेल तो नाईक होतो. टोलेवा लोकांत पैसा नायकी देतो. स्पोकानी, नोव्हाजो, वगैरे लोकांमध्येंही हीच स्थिति आढळते.

आतां असल्या समाजांना राजकीयदृष्ट्या पक्कदशा आलेली नसल्यामुळें दुसरा एकादा कोणी ज्यास्त हुशार किंवा ज्यास्त बळकट वगैरे निघाला म्हणजे पहिल्या नायकाची सत्ता डळमळूं लागते हें सांगावयास नकोच. उदाहरणार्थ, आरब, सुमामन, टाँगन व डायाक ह्या लोकांत अशी स्थिति आढळते.

ह्यावरून, तर मग, वर ज्यास आपण कार्यसामर्थ्याचें तत्त्व म्हणून म्हटलें तेंच प्रारंभीं संघटनेचें मुख्य तत्त्व असतें: अशा वेळीं जी कांहीं राजकीय नायकी अ-

सते ती, ज्यास्त वय, श्रेष्ठ शौर्य, प्रबलतर इच्छा, ज्यास्त ज्ञान, ज्यास्त बुद्धि, किंवा विशेष वित्त, यांच्या रूपानें जो आपली योग्यता दाखवील, त्यास प्राप्त होते. पण अशा रीतीनें माणसाच्या आंगच्या गुणांवरच अवलंबून असणारी जी श्रेष्ठता ती उघडच क्षणभंगुर असते. दुसरा एकादा ज्यास्त प्रबल माणूस निघाला म्हणजे तो ती बळकावण्याचा संभव असतो; आणि अशा रीतीनें एकाद्याची श्रेष्ठता कदाचित् बळकावली न गेली तर तो मेला म्हणजे ती संपते. म्हणून स्थाईक नायकी कशी स्थापन होते ह्याचा विचार आतां आपणास केला पाहिजे. तथापि तसें करण्यापूर्वी, मुख्य नायकी प्राप्त होण्यास जी दोन प्रकारची श्रेष्ठता विशेषेंकरून साह्यभूत होते त्या दोन प्रकारांचा आणि त्यांच्या व्यापारसरण्यांचा, विशेष सविस्तररीतीनें विचार केला पाहिजे.

४०. शरीरसामर्थ्य हें टोळींमध्यें नेहमींच उत्पन्न होणाऱ्या प्रसंगीं वरचढपणा स्थापन होण्याचें कारण असल्यामुळें, त्यांत जर शौर्याची भर पडलेली असेल, तर लढाईच्या प्रसंगीं वरचढपणा स्थापन होण्यास तें साहाय्यभूत होतें. म्हणून अशा प्रकारची जी सत्ता बीजभूत असेल ती ठळक करण्यास लढाई कारणीभूत होते. आपल्यापैकीं एकाद्याची नायकी मान्य करण्याबद्दल टोळींतील इतरांची जी कांहीं नाखुशी असेल ती त्याची नायकी मान्य करून जर त्यांच्या सुरक्षिततेस मदत होत असेल तर तिच्याबद्दलची जी त्यांची इच्छा तेणेंकरून ती नाखुशी निघून गेली पाहिजे.

सर्वांत बळकट व धैर्यवान् अशा लढवय्याला जी हीं

अधिकारप्राप्ति होते ती प्रथम आपोआप होते, आणि नंतर लोकांच्या कमजास्त निश्चित अशा अनुमतीनें होते; आणि कधीं कधीं असें करतांना लोक त्यास कसास लावून पाहतात. उदाहरणार्थ, कोमांची लोकांत जो कोणी पुष्कळ घोडे पकडून किंवा डोकीं उडवून आपल्यास प्रसिद्ध करून घेईल, त्याला नायकी मिळण्याचा संभव उत्पन्न होतो, आणि हळू हळू लोकांच्या गर्भित अनुमतीनें तो ती जागा पटकावतो. पण पुष्कळ ठिकाणीं लोक अशा माणसाची मुद्दामच निवड करितात. उदाहरणार्थ, फ्लाटहेड लोकांमध्यें लढाईतील अग्रणी तेवढेच मुख्य सत्ता चालवितात. कोठें कोठें चातुर्य, बळ, धैर्य आणि काटकपणा ह्यांची मुद्दाम पारख करितात. उदाहरणार्थ, टॉंगाच्या राजाची अशी परीक्षा करितात; म्हणजे तीन भाले त्याच्या अंगावर फेंकितात, आणि ते तिन्ही त्यानें चुकविले पाहिजेत. सीडायाक लोकांमध्यें चरबीनें मढवलेल्या मलखांबावर चढून वर जाण्याचें सामर्थ्य हें लढवय्या बायकांमध्यें असलेंच पाहिजे; आणि सेंट जॉन असें म्हणतो कीं, जेथें नाईक होण्याबद्दल दोघांत चढाओढ लागेल तेथें त्यांस कधीं कधीं एकाचें डोकें मारून आणण्यास सांगतात; आणि जो तें प्रथम आणील त्यास नाईक समजतात.

शिवाय, लोकांस चांगल्या हुशार पुढाऱ्याची नेहमीं जरूर असल्यामुळें एकाद्याची नायकी जर दुर्बल किंवा नांवाची झालेली असेल, तर ती पुनः जोरावर येण्यास लढाई कारण होते. उदाहरणार्थ, क्यारिब लोकांबद्दल एडवर्ड असें म्हणतो कीं, “ लढाईमध्यें त्यांच्या असें अ-

नुभवास आलें होतें कीं कोणाच्या तरी कह्यांत राहणें हें धैर्याइतकेंच महत्त्वाचें आहे; म्हणून ते सामान्य सभा भरवून आपले नाईक मोठ्या विधिपूर्वक निवडीत असत, आणि त्या जाग्याला जे उमेदवार आलेले असतील त्यांची फार कडक अशी परीक्षा घेत असत". तद्वतच, आबिपोन लोक आपल्यांतील मुख्य लढवय्याला न्यायाधीश या नात्यानें जरी भीत नाहींत, किंवा धनी या नात्यानें जरी सन्मानीत नाहींत, तरी इतर लढवय्ये लढाईंत त्याच्या धोरणानें वागतात, आणि शत्रूवर हल्ला करितात किंवा त्यास मागें हटवितात.

हीं आणि इतर उदाहरणें ह्यांवरून तीन परस्परसदृश गोष्टी ध्वनित होतात. एक गोष्ट ही कीं, लढाई सारखी सुरू राहिल्यास नायकी कायम होण्यास ती अनुकूल होते. दुसरी गोष्ट ही कीं, यशस्वी लष्करी मुख्य या नात्यानें नायकाचें वजन जसें वाढत जाईल तसें दिवाणी मुख्य या नात्यानेंही त्याला वजन प्राप्त होऊं लागतें. तिसरी गोष्ट अशी कीं, अशा रीतीनें लष्करी श्रेष्ठत्व आणि राजकीय श्रेष्ठत्व यांच्यामध्यें संयोग उत्पन्न होऊन सामाजिक उत्क्रमणाच्या पुढच्या पायऱ्यांवर तो कायम राहतो. नाईक किंवा राजा सेनेचा मुख्य अधिपति असलेला असुधारलेल्या हाटेंटाट, मालागासी, व इतर लोकांतच आढळून येतो असें नाहीं, किंवा प्राचीन पेरूव्हियन, मेक्सिकन वगैरे अर्धवट सुधारलेल्या लोकांतच राजा व सेनापति एकच म्हणून आढळून येतात असें नाहीं, तर विनष्ट झालेल्या व अस्तित्वांत असलेल्या सर्वच राष्ट्रांचा इतिहास तीच साक्ष देतो. ईजि-

स देशांत प्रारंभीं राजा व सेनापति एकच असत. हीब्र्यू व आसीरियन लोकांच्या लेखांवरून व चित्रांवरून तीच गोष्ट व्यक्त होते. प्राचीन रोमन लोक व ग्रीकलोक, आणि अर्वाचीन सर्व यूरोपियन लोक, ह्यांच्या इतिहासावरूनही तेंच दिसतें, आणि तशी स्थिति अजूनही कित्येक देशांत आहे.

लष्करी आधिपत्याच्या मागोमाग राजकीय आधिपत्य कसें येतें हें ज्या समाजांचे इतिहास उपलब्ध नाहींत, त्यांच्या संबंधानें चटकन लक्षांत येत नाहीं; त्या ठिकाणीं आपणास केवळ एवढेंच अनुमान करतां येतें कीं यशस्वी मुख्य लढवय्यास इतरांवर नियंत्रण करण्याचें जें सामर्थ्य प्राप्त होतें तेणेंकरून सहजच दिवाणी कामांतही त्यास ज्यास्त जोराचा अंमल करतां येत असेल. आतां ही गोष्ट ज्यांचे इतिहास उपलब्ध आहेत त्यांच्या संबंधानें खरी आहे ह्याबद्दल पुरावाच सांपडतो. उदाहरणार्थ, मूळ जर्मन लोकांविषयीं बोलतांना सॉम असें म्हणतो कीं रोमन लोकांनीं त्यांच्यावर स्वाऱ्या केल्याचा एक परिणाम असा झाला कीं त्यामुळें सेनापतित्व आणि राजसत्ता हीं एकत्र संयुक्त झालीं, आणि राजाची सत्ता हल्लीं दिसते तशा प्रकारची बळकट झाली. तद्वतच फ्रेंच लोकांच्या इंग्रजांशीं पंधराव्या शतकांत ज्या लढाया झाल्या त्यांसंबंधानें रांके असे म्हणतो कीं, फ्रेंच राजे ह्याप्रमाणें आपल्या अस्तित्वासाठींच झगडत असतां त्या झगड्याचा एक परिणाम असा झाला कीं त्यांच्या सत्तेस ज्यास्त जोरदार संघटना प्राप्त झाली. लढाई सुरू ठेवण्यासाठीं ज्या योजना त्यां-

नीं केल्या, त्या कायमच्या संस्था बनून गेल्या. आतां, यशस्वी लढवय्यी कारकीर्द आणि राजकीय सत्तेची वृद्धि यांचीं अर्वाचीन उदाहरणें पाहिजे असल्यास नेपोलियनाचा इतिहास, आणि त्याच्याही आलीकडच्या जर्मन साम्राज्याचा इतिहास, ह्यांजकडे पहावें.

एवंच, समाजाच्या नायकीला अत्यन्त प्रबल शूर आणि हुशार अशा लढवय्यानें स्थापिलेल्या स्वकीय वजनानें सुरवात होऊन, जेथें लढाई सुरू राहून त्यास आपलें श्रेष्ठत्व व्यक्त करण्यास, आणि इतरांस आपले अंकित करून घेण्यास संधि सांपडते, तेथें ती स्थापन होते; आणि त्यानंतर त्याच्या दिवाणी अधिकाराची जी वृद्धि होत जाते ती मुख्यत्वेंकरून त्याचा जो लष्करी कामांतील अंमल त्याच्याशीं संबद्ध अशी असते.

४१. पण राजकीय नायकीचा आणखी उगम न सांगितल्यास वाचकांची त्यासंबंधानें फार चुकीची समजूत बनणार आहे. आणखी एकप्रकारचें अत्यन्त महत्त्वाचें वजन असून तें कधीं कधीं स्वव्यापार एकटेंच करीत असतें, आणि कधीं कधीं वर सांगितलेल्या वजनाबरोबर करीत असतें. तें वजन वैदूचें होय.

आतां हें वजन पहिल्याइतकेंच लवकर उत्पन्न होतें असें कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं; कारण पिशाचकल्पनेस आकार येई तोंपावेतों त्याचा उगमच उत्पन्न होत नाहीं. पण मृतांच्या आत्म्यांवरील विश्वास जेव्हां रूढ होतो, तेव्हां वैदूमाणूस त्यांना कह्यांत ठेवण्यास आपण समर्थ आहों असा बहाणा करून आणि आपल्या सामर्थ्याबद्दल लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न क-

रून त्यांच्या ठिकाणीं भीति व पूज्यबुद्धि ह्यांची प्रेरणा करितो, आणि मग ते त्याच्या हुकुमांत वागूं लागतात. उदाहरणार्थ, फ्यूजियन लोकांमधील वैदू जादूगाराबद्दल फिट्झराय असें म्हणतो कीं तो सर्व टोळीमध्यें अतिशय लुच्चा व फसव्या माणूस असतो, आणि त्याचें इतरांवर फार वजन असतें. थ्लिंकिट लोक असें समजतात कीं त्यांच्यांतील चेटूकवाल्याच्या सामर्थ्याबद्दल कोणी शंका घेतल्यास तो आपल्या हाताखालच्या एका भुतास त्याच्या शरीरांत प्रवेश करण्याची आज्ञा करितो, आणि नंतर तो माणूस निश्चेष्ट पडतो. तास्मेनियन लोक राजांच्या जुलुमापासून जरी मुक्त असतात तरी वैदूंना ते फार मानितात, त्यांस भितात, आणि त्यांच्या सल्लचाप्रमाणें चालतात. आमाझूलू लोकांत एक नाईक दुसऱ्याशीं लढाईस जावयाच्या पूर्वीं त्याच्यावर जादू करितो, आणि त्याची जादूगार ह्या नात्यानें फार प्रसिद्धि असल्यास त्याच्या लोकांना त्याचा मोठा भरंवसा वाटतो. अशा रीतीनें हे लोक राजकीय वर्चस्व कसें संपादितात हें ओबोच्या राजाच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसतें. कारण अवर्षण पडलें म्हणजे तो आपल्या प्रजेस एकत्र जमवून असें सांगतो कीं, तुमच्या वर्तनावरून मला अवर्षण उत्पन्न करावें लागलें ह्याचें मला वाईट वाटतें; पण ह्यांत वांक तुमचाच आहे; तुम्ही मला बकरें व धान्य आणून द्या; नाहीं तर मी पाऊस पाडणार नाहीं. लोआंगोमधील लोकही पाऊस पाडणें राजाच्या हातीं आहे असें समजतात.

दोन्ही अर्धगोलांतील हल्लीं नष्ट झालेल्या अनेक लो-

कांच्या इतिहासांवरून हीच गोष्ट दिसून येते. प्राचीन मेक्सिकोचा राजा मोठा जादूगार म्हणून समजत, आणि गादीवर बसावयाच्या वेळीं त्यास अशी शपथ घ्यावी लागे कीं, मी सूर्यास त्याच्या मार्गानें जावयास लावीन, ढगांकडून पाऊस पाडवीन, नद्यांस वाहण्यास लावीन, आणि फळें पिकवीन. चिबचा लोकांच्या एका राजानें त्यांच्या आज्ञाभंगाबद्दल त्यांस दोष देऊन असें म्हटलें कीं देवी, ताप, वगैरे सांथी आणणें, आणि गवत, झाडें, वगैरे वाढविणें हें माझ्या हातांतील आहे हें तुम्हांस माहीत आहे. प्राचीन ज्यू व इजिप्शन लोकांच्या इतिहासांवरून हीच गोष्ट व्यक्त होते; आणि युरोपांतही अशा समजुती नव्हत्या असें मुळींच नाहीं. उदाहरणार्थ, फ्रान्सांतील कांहीं ब्रेटन सरदारांच्या संबंधानें अशी समजूत असे कीं त्यांच्या थुंकीच्या व स्पर्शाच्या योगानें रोग बरे होतात.

एवंच राजकीय नायकी उत्पन्न करणाऱ्या एका कारणास पिशाचविषयक कल्पनेपासून सुरवात होते. सामान्यतः नाईक व वैदू हे भिन्न असतात; आणि असें असलें म्हणजे त्यांच्यांत कांहीं विरोध असतो; म्हणजे, अधिकार चालविण्याच्या बाबतींत ते परस्परांशीं स्पर्धा करीत असतात. पण जेथें स्वाभाविकरीत्या मिळविलेल्या सत्तेबरोबर राजा ही कल्पनिक दैविकशक्तिही प्राप्त करून घेतो, तेथें अर्थात् त्याचा अधिकार ज्यास्तच वाढतो. त्याच्या टोळींतल्या कांहीं शूर वीरांच्या मनांत त्यास विरोध करण्याचें आल्यास तो आपल्या ताब्यांतील एकादें भूत आपल्या अंगावर घालील ह्या भीतीनें

तसें करण्यास ते कचरतात. म्हणून राजे हा गुणही आपल्या अंगीं असावा अशी सहजच इच्छा करितात, ह्याबद्दल स्पष्ट पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ क्यानन क्यालोवे असें सांगतो की, आमाझूलू लोकांत नाईक वैदूची विद्या त्याच्यापासून काढून घेऊन पुढें त्यास ठार करण्याच्या खटपटींत असतो.

४२. तथापि असा प्रश्न पुनः उद्भवतोच कीं, कायमची नायकी कशी उत्पन्न होते? शारीरिक शक्ति किंवा शौर्य किंवा शहाणपणा, ह्यांच्याशीं काल्पनिक दैविकसामर्थ्याचाही संयोग झाला असतां, त्यांजपासून जी नायकी उत्पन्न होते ती ज्या रानट्यानें ती संपादिली असेल त्याच्याबरोबरच संपते. शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्याचें जें तत्त्व त्याच्या योगानें शास्ता व शासित असें तत्पुरतें विभिन्नीकरण जरी उत्पन्न होऊं शकतें, तरी कायमचें विभिन्नीकरण उत्पन्न होऊं शकत नाहीं. तसें होण्यास आणखी एका तत्त्वाची मदत लागते; त्याचा आतां विचार करूं.

हें आपल्या अगोदरच लक्षांत आलें आहे कीं अत्यन्त रानटी समूहांत देखील वयाच्या योगानें कांहीं वर्चस्व प्राप्त होत असतें. फ्यूजियन व आस्ट्रेलियन, ह्या दोन्ही लोकांमध्यें वृद्ध पुरुषच केवळ नव्हे तर वृद्ध स्त्रियाही अधिकार चालवीत असतात. रानट्यांहून सुधारलेल्या, आणि अगदीं जुलुमी कारभाराच्या देशांत देखील केवळ वयासच दिलेल्या ह्या मोठेपणाचीं उदाहरणें आढळून येतात. उदाहरणार्थ, पर्शिया, ज्यूडिया, आणि ईजिप्त ह्या देशांत राजाच्या आईस त्याच्या रा-

णीहून ज्यास्त मान असे. चीन व जपान येथें असेंच आहे. आईबापांच्या कह्यांत राहिल्यानें शास्त्यांच्या कह्यांत राहण्याची तयारी कशी होते ह्याचें दृष्टान्तीकरण उलट उदाहरणांनेंही करतां येतें. उदाहरणार्थ, कोरोआडो लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं त्यांच्यामध्यें जसें मुख्याचें वजन लोकांवर नाहीं, तसें वृद्धांचें तरुणांवरही नाहीं. मंत्र, क्यारिब, क्यालिफोर्नियन, कोमांची, इत्यादि लोकांतही असेंच आहे.

पण ज्या समाजांत राजकीय अंकितपणा फार आहे अशा समाजांत वडिलांचा मान इतका ठळक जो होतो, तो कोणत्या परिस्थितींत होतो ? पारधीच्या स्थितींतून निघून माणसें जेव्हां धनगरी स्थितींत जातात, आणि आपल्या पाळलेल्या जनावरांकरितां चाऱ्यासाठीं भटकूं लागतात, तेव्हां पितृशासित असे त्यांचे समूह बनण्यास अनुकूल अशी स्थिति उत्पन्न होते. कारण बापाच्या अधिकारांत हात घालणारीं जीं कारणें तत्पूर्वींच्या टोळींत उत्पन्न झालेलीं असतील तीं आतां नष्ट होऊन गेलेलीं असल्यामुळें त्यास एका सुसंबद्ध समूहाची नायकी प्राप्त होण्याची स्थिति प्राप्त होते; म्हणजे, बाप हा बायको, मुलें, आणि त्याच्या कुटुंबांत असणारीं इतर सर्व, ह्यांचा मणगटाच्या जोरावर पुढारी, धनी, मालक, बनतो. ह्या सर्व गोष्टी प्रस्तुत शास्त्राच्या तिसऱ्या भागांत स्पष्ट करून सांगितल्याच आहेत. शिवाय, सर्वांत वडील असा पुरुष मुख्य पितृशास्ता कसा बनतो हेंही तेथें दाखविलेंच आहे.

तद्वतच,ह्या गोष्टीबद्दल आपणास विपुल पुरावा सांपडतो

कीं, धनगरी स्थितींतील आणि शेतकीस्थितींतील लोकांमध्यें सामान्य अशी जी सर्वांत वडील पुरुषाची कौटुंबिक श्रेष्ठता, तिची वाढ होऊन तीस राजकीय श्रेष्ठत्वाचें स्वरूप येतें. उदाहरणार्थ, सांताळ लोकांबद्दल हंटर असें म्हणतो कीं, त्यांचें ग्राम-सरकार अगदीं पितृशासनपद्धतीवर रचलेलें असतें. प्रत्येक खेड्याचा एक मूळ स्थापक असून तो सगळ्या वस्तीचा बाप म्हणून गणिला जातो. त्याला पवित्र अशा आंबराईंत दैविक सन्मान मिळतो, आणि त्याचा अधिकार त्याच्या वंशजांकडे जातो. खोंड लोकांमधील संयुक्तकुटुंबाबद्दल मॅकफर्सन म्हणतो कीं, त्यांच्यांत बापाची सत्ता अनिर्बंध असते. ते आपल्या बापास देव समजतात, आणि त्याच्या आज्ञा मोडणें म्हणजे गुन्हा समजतात; कुटुंबांतील सर्व माणसें आमरणान्त त्याच्या अगदीं कह्यांत राहतात. बरें, साध्या समूहांचे संयुक्तसमूह बनणें, त्यांचे पुनःसंयुक्तसमूह बनणें, आणि ज्याच्या ठिकाणीं कौटुंबिक नायकी व राजकीय नायकी ह्यांचा संयोग झाला आहे अशा माणसाची त्या सगळ्यांनीं आज्ञा मानणें, ह्या गोष्टी रोमन, ग्रीक, टयूरन ह्या लोकांत प्राचीनकाळीं, आणि हिंदू व स्क्लाव्ह ह्या लोकांत हल्लींही, कशा दिसतात, हें सर हेन्री मेन ह्यानें आपल्या ग्रंथांत दाखविलेलेंच आहे.

राजकीय अधिपतित्व कायम होण्यास अनुकूल असें एक कारण, ह्या ठिकाणीं, तर मग, आपल्यास दृग्गोचर होतें. मागल्या एका प्रकरणांत असें दाखविलेंच आहे कीं सामर्थ्यावरून नायकी प्राप्त झाल्यास समाजसंघटनेस जसा लवचीकपणा येतो, तसा वंशपरंपरेव-

रून ती प्राप्त झाल्यास त्या घटनेस स्थाईकपणा येतो. जोंपर्यंत एकाद्या प्राथमिक समाजांतील प्रत्येक अधिकाराची प्राप्ति केवळ योग्यतेवर अवलंबून राहील, तोंपर्यंत त्या समाजांत स्थाईक अशी कोणतीच व्यवस्था उत्पन्न होऊं शकणार नाहीं; कारण योग्य तो नाईक मेला म्हणजे त्या व्यवस्थेचा तो जितका भाग होता तितकी तरी ती व्यवस्था पुनः सुरू केली पाहिजे. त्या जाग्यावरचा ज्याचा हक्क समाजास कबूल आहे असा एकादा जेव्हां त्याच्या मागोमाग ती भरून काढूं लागेल तेव्हांच पिढ्यानुपिढ्या कायम राहणारें असें विभिन्नीकरण त्या जाग्याच्या संबंधानें सुरू होईल. आणि हें उघडच आहे कीं, सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर, जेव्हां सुसंबद्धता अल्प असते आणि रचनाऽभाव मोठा असतो, तेव्हां विशेषतः राजकीय नायकीच्या संबंधानें, ही गोष्ट आवश्यकच आहे कीं वंशपरंपरेचें जें तत्त्व तें सामर्थ्य किंवा हुशारी यांच्या तत्त्वाहून ज्यास्त प्रबल असावें. हें सत्य तद्विषयक गोष्टी ध्यानांत आणिल्यानें स्पष्ट होणार आहे.

४३. वंशपरंपरा अधिकारप्राप्तीचे दोन प्रकार आहेत; व त्या दोहोंचाही विचार केला पाहिजे. स्त्रियांच्या द्वारा नातें लेखण्याची जी चाल रानटी लोकांत सामान्य आहे तिच्यामुळें सत्ता आणि संपत्ति हीं वंशपरंपरा भावांस किंवा बहिणींच्या मुलांस मिळत असतात; आणि पुरुषांच्या द्वारा तें लेखण्याची चाल सुधारलेल्या लोकांत सामान्य असून तिजमुळें तीं मुलगे व मुली ह्यांस मिळत असतात. ह्यासंबंधानें पहिली गोष्ट आपण ध्यानांत

अशी आणावयाची कीं, स्थाईक राजकीय अधिपतित्व स्थापन होण्यास पुरुषद्वारा संक्रान्तीपेक्षां स्त्रीद्वारा होणारी संक्रान्ति कमी अनुकूल असते.

कौटुंबिक संबंधाचा (तिसऱ्या भागांत) विचार करतांना असें सांगितलें होतें कीं, जेथें स्त्रीपुरुषसंयोग तत्पुरते किंवा अस्थाईक असतील, तेथें स्त्रियांच्या द्वारा नातें गणण्याची पद्धति सुरू होते; त्यावरून असें अनुमान निघतें कीं, ही पद्धति राजकीय व इतर सर्व दिशांनीं जे समाज मागसलेले असतील, त्यांच्यांत दृष्टीस पडते. त्या ठिकाणीं आपल्या असें नजरेस आलेंच आहे कीं, अनियमित स्त्रीपुरुषसंबंधापासून दुर्बल व अल्पज्ञात अशीं नातीं उत्पन्न होतात; आणि अशा प्रकारचा कुटुंबनमुना उत्पन्न होतो कीं, त्याच्या पुढच्या पुढच्या कड्या त्याच्या बाजूबाजूला कड्या उत्पन्न होऊन बळकट होत नाहींत. ह्याचा एक सामान्य परिणाम असा होतो कीं, स्त्रियांच्या द्वारा वंशपरंपरा इतर संक्रांतीबरोबर नाईकाची संक्रांत होत नाहीं, किंवा झाल्यास ती योग्यतेवरून स्थापन झालेली असते, किंवा वंशपरंपरा असल्यास बहुधा डळमळीत असते. आस्ट्रेलियन व तास्मेनियन लोकांत ह्या गोष्टीचीं नमुनेदार उदाहरणें आढळून येतात. कोलंबियांतील हैदा व इतर रानटी लोकांत पदवी ही नांवाची वंशपरंपरागत असून बहुतकरून स्त्रियांच्या द्वारा ती संक्रान्त होत असते; आणि प्रत्यक्ष नायकी संपात्ति आणि लढाईंत दाखविलेलें शौर्य ह्यांच्यावरच बऱ्याच अंशीं अवलंबून असते. उत्तर अमेरिकेंतील चिपिवाज, कोमांची, आणि स्नेक ह्या टोळ्यांमध्येंही स्त्रियांकडून नातें गण-

ण्याची पद्धति असून स्थाईक नायकी मुळींच नसते, किंवा असल्यास फार दुर्बल असते. दक्षिण अमेरिकेंत आरावाकु, वारा, आणि क्यारिब ह्या लोकांत ती स्थिति दृष्टींस पडते.

एथें कांहीं बऱ्याच अर्थप्रचुर गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. संपत्ति आणि पदवी ह्यांची संक्रान्ति ज्यांच्यामध्यें स्त्रियांच्या वंशावळींत होते अशा पुष्कळ समाजांत राजकीय मुख्याच्या संबंधानें तेवढा अपवाद दृष्टीस पडतो; आणि हा अपवाद जो दृष्टीस पडतो तो जेथें राजकीय नायकी बरीच स्थाईक झालेली आहे तेथेंच दृष्टींस पडतो. उदाहरणार्थ, फीजी बेटांत जरी नातें स्त्रियांकडून गणीत असतात, तरी राजा जो निवडावयाचा तो राजकीय कुटुंबांतील असून बहुधा गत राजाचा मुलगा असतो. ताहिती बेटांत सर्वांत श्रेष्ठ अशा दोन पदव्या स्त्रियांच्या वंशांत संक्रान्त होत असूनही शास्त्याची जागा पुरुषांच्या वंशांत जावयाची हा नियम इतका कडक आहे कीं, राजास पहिला मुलगा झाल्याबरोबर राजा केवळ त्याच्या वतीनें कारभार करणारा प्रतिनिधि बनतो. आणि मालागासी लोकांमध्यें सामान्यतः नातें स्त्रियांकडूनच लेखीत असून राजा आपल्या मागून कोणीं गादीवर बसावें हें ठरवितो किंवा त्याचे सरदार ठरवितात, आणि कांहीं विशेष वैगुण्य नसल्यास राजाच्या वडील मुलास बहुधा निवडितात. ह्याबद्दल आफ्रिका खंडांत नानाप्रकारचा पुरावा सांपडतो. कांगोमधील लोक आणि किनाऱ्यावरील व आंतील नीग्रोलोक ह्यांचे साधारणपणें बरेच मोठे व संमिश्र असे समाज

बनलेले आहेत, आणि गादीवर बसवितांना त्यांच्यांत स्त्रियांकडून जरी नातें गणितात तरी त्यांपैकीं पहिल्या लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत राजनिष्ठा अनिश्चित व अस्पष्ट आहे; दुसऱ्यांबद्दल असें वाचितों कीं तेथें सरकार असुरक्षित असून अल्पकालिक असतें; आणि तिसऱ्याबद्दल असें वाचितो कीं, तेथें असुरक्षित अशी जुलमी सत्ता आहे. बरें, आशान्टी व डेहामी हीं जीं तेथील अत्यन्त बलिष्ठ दोन राज्यें त्यांमध्यें स्त्रियांच्या द्वारा सत्तासंक्रान्ति व्हावयाची बंद झाल्यामुळें किंवा होऊं घातल्यामुळें,राजाचा अधिकार स्थाईक झालेला आहे. उदाहरणार्थ, आशान्टीमध्यें गादीवर बसण्याच्या हक्काचा क्रम असा आहे:—भाऊ, बहिणीचा मुलगा, मुलगा; आणि डेहामीमध्यें वडील मुलगाच.

नष्ट झालेल्या अमेरिकन लोकांत ह्या संक्रमणाचीं आणखी उदाहरणें सांपडतात. मेक्सिको देशाच्या आझटेक नामक विजेत्यांनीं आपल्याबरोबर स्त्रियांच्या द्वारा नातें गणण्याची चाल आणिली होती, आणि त्याप्रमाणें गादीचा वारस ठरत असे; पण ही चाल पुढें अंशतः किंवा सर्वांशीं बदलून जाऊन पुरुषांपैकीं वारस ठरवूं लागले. पेरू देशांत राजकुलांत भावाबहिणींचीं लग्नें होत असून त्यांचे मुलगे गादीचे वारस होत असत; आणि राजकुलाचा उद्गम देवांकडून झालेला आहे म्हणून समजत. ईजिप्त देशांतही असेंच असे; आणि सीलोनमध्येंही राजकुलांत भावाबहिणींचीं लग्नें होत.

एका पद्धतीकडून दुसऱ्या पद्धतीकडे जाण्याची जी हा परणी तिच्याशिवाय आणखी कांहीं तसल्याच स-

रण्या आहेत, त्यांचें आतां दिग्दर्शन करूं. न्यूक्यालिडोनियामध्यें चालू नाईक आपल्या नंतरच्या नायकाची नेमणूक स्वतः करून ठेवीत असतो, आणि शक्य असेल तर आपला मुलगा किंवा भाऊ यांस नेमीत असतो; आतां मुलगा नेमणें हें पुरुषांच्या द्वारा वित्तसंक्रान्तीस अनुसरून आहे, आणि भाऊ नेमणें हें दोन्ही द्वाराही होणें शक्य आहे. मादागास्कारमध्येंही बायकांकडून नातें गणीत असून राजा गादीचा पुढील वारस नेमीत असे, आणि सहजच आपल्या मुलास पसंत करी. बरें, अशा ठिकाणीं जेव्हां राजानें वारस न ठरविल्यामुळें त्याच्या उमरावांवर तें काम पडत असे, आणि ते योग्यता पाहून राजकुलांतून पुढील राजा नेमीत, तेव्हांही सहजच मुलीपेक्षां मुलास पसंत करीत; आणि स्त्रियांकडून वारस ठरविण्याच्या पद्धतींत एकदां अशा रीतीनें भंग पडला म्हणजे तो कायम होण्याचा फार संभव उत्पन्न होतो. दुसरी एक पद्धति कांहीं ठिकाणीं आपल्या नजरेस येते; कारण तेथें नाईक अमुक कुलांतील असावा इतकाच नायकीस कायमपणा आलेला असतो, पण तो अमुक असवा इतका आलेला नसतो. याचीं आफ्रिकेंत बरींच उदाहरणें नजरेस येतात. आबिसिनियामध्यें गादी वंशपरंपरा एकाच कुटुंबांत जात असते, पण त्यांतला विशेष माणूस मात्र निवडला जातो, असें ब्रूस म्हणतो. टिमानी व बुलाम या लोकांत असेंच असून देशांतील ज्या मुख्य माणसांकडे विशिष्ट कुलांतील राजा निवडण्याचा अधिकार आहे ते त्या कुलांतील एकाद्या दूरच्या कुटुंबांतील माणसास देखील निवडूं शकतात,

आणि काफिर लोकांत असा कायदा आहे कीं, राजा निवडावयाचा तो लहान लहान राजपुत्रांपैकीं एकादा निवडावा. जाव्हा व सामोआ एथें असेंच असे; आणि स्पेन देशांतही बाराव्या शतकापर्यंत हीच स्थिति होती.

या आमच्या एकंदर म्हणण्याचा अर्थ असा समजावयाचा नाहीं कीं पुरुषवंशांत वारसदारीची संक्रान्ति व्हावयास लागली म्हणजे राजकीय नायकी स्थिर होते. आमच्या म्हणण्याचा भाव इतकाच आहे कीं, इतर पद्धतींपेक्षां ह्या पद्धतीनें संक्रान्ति होणें नायकीच्या स्थैर्यास ज्यास्त अनुकूल आहे. याचें एक कारण बहुधा असें असावें कीं, ज्या धनगरी जातींपासून मुख्य मुख्य सुधारलेलीं राष्ट्रें उत्पन्न झालेलीं आहेत त्यांमधील पितृशासित समूहांमध्यें कुटुंब व ज्ञाति यांमध्यें वर्धन पावलेला जो मुख्यपुरुषाच्या संबंधानें अंकितपणाचा मनोभाव तो सरतेशेवटीं ज्ञातीहून मोठ्या जमावामध्येंही हा अंकितपणा वाढवण्यास कारणीभूत होतो. दुसरें एक असें कारण बहुधा असावें कीं, पुरुषवंशांत अधिकारसंक्रान्ति झाली म्हणजे बहुधा श्रेष्ठत्व आणि सामर्थ्य यांचा संयोग दृष्टीस पडत असतो. शास्त्याचे जे विशिष्ट गुण ते त्याच्या बहिणीच्या मुलापेक्षां त्याच्या मुलामध्यें उतरण्याचा संभव ज्यास्त आहे; आणि असें असलें म्हणजे राजाचा अधिकार बळजबरीनें हिसकावून घेणें ज्यास्त दुर्धर झाल्यामुळें तो स्थाईक होण्याचा ज्यास्त संभव उत्पन्न होतो.

पण राजकीय नायकीला स्थैर्य येण्यास आणखी एक ह्याच्याहून प्रबल असें कारण होत असतें, आणि तें स्त्रियांच्या द्वारा संक्रान्तीऐवजीं पुरुषद्वारा संक्रान्ति झा-

त्यानें ज्यास्त उपकारक होत असतें. तें इतर सर्व कारणांहूनही कदाचित् ज्यास्त प्रबल असल्यामुळें त्याचें कथन पुढील कलमांत करूं.

४४. पुरुषांकडून जेथें वंशगणन होत असेल तेथें वयाबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन पितृशासन कसें स्थापन होतें, हें (४२ व्या कलमांत) दाखवितांना त्यापासून उत्पन्न होणारी आणखी एक गोष्ट दाखविली होती; ती ही कीं, मृत पितृशास्त्याची त्याचे वंशज पूजा करूं लागल्यामुळें तो कुटुंबदेवता बनतो. भुतांपासून देवांची जी ही उत्पत्ति होत असते तिची प्रस्तुत शास्त्राच्या पहिल्या भागांत अनेक काळचीं, ठिकाणचीं, व लोकांचीं उदाहरणें दिलीं आहेत. पण ह्या समजामुळें राजकीय नायकीस अवश्यमेव कसा जोर येतो हें एथें दाखवावयाचें आहे.

ज्या शास्त्यानें आपल्या श्रेष्ठत्वाचें वजन लोकांवर पाडिलें होतें, आणि ज्याच्या भुतास लोक विशेषतः भीत असल्यामुळें इतर पूर्वजांच्या भुतांहून ज्याची विशेष पूजा व्हावयास लागली आहे, त्याच्यापासून उत्पन्न झालेला जो शास्ता त्याला दोन रीतींनीं उच्चत्व आणि मदत हीं होत असतात. त्याच्या त्या मोठ्या पूर्वजाचें जें दैविक म्हणून मानिलेलें सामर्थ्य तें त्याच्या अंगीं कमज्यास्त प्रमाणानें आलेलें आहे असें लोक समजत असतात; आणि त्या पूर्वजाला तो नैवेद्य अर्पण करीत असल्यामुळें त्याची त्यास मदत आहे असेंही समजत असतात. आमाझूलू लोकांबद्दल **कयानन कयालोवे** यानें जी हकीकत लिहिली आहे त्यावरून ह्या समजाचा प्रभाव

केवढा पडतो हें स्पष्ट दिसतें. ते लोक असें समजत कीं इहाँगो (मूळपुरुषाचें भूत) राजापाशीं रहात असतें, आणि त्याच्याशीं बोलतें.

कुकी लोकांचे नाईक साहसी अशा हिंदू लोकांचे वंशज असून ते सर्व एकाकाळीं देवापासून उद्भवले असें ते लोक समजतात. म्हणून ते त्यांस अत्यन्त मान देतात, आणि त्यांचा शब्द म्हणजे कायदाच म्हणून समजतात. ताहितियन लोकांचीही आपल्या राजांच्या संबंधानें अशीच समजूत आहे; आणि प्राचीन पेरूमध्यें इन्का (राजा) आपल्या लोकांस असें सांगे कीं, मी जें कांहीं करितों तें माझा बाप जो सूर्य त्याच्या हुकुमाप्रमाणें व स्फूर्तीप्रमाणेंच करितों.

जेथें शास्ता देवांचा वंशज असून शिवाय स्वताही देव असतो तेथें स्वाभाविकशक्तीची जी ही दैविकशक्तीमुळें होणारी वृद्धि तीस ज्यास्त जोर येतो; आणि जे लोक दैविक आणि मानुष ह्यांमध्यें भेद करीत नाहींत त्यांमध्यें हा संयोग दृष्टीस पडतो. वर सांगितलेले पेरूव्हियन लोक आणि प्राचीन ईजिप्शन लोक ह्यांचें असेंच असे. ते राजा म्हणजे देवाचा पृथ्वीवरील प्रतिनिधि मानून त्याचाच अंश म्हणून समजत. पुष्कळ वेळां तो मेल्यावरच देव बनत नसे, तर जिवंतपणींही त्याची देव म्हणून लोक पूजा करीत. चीनचा बादशहा आणि जपानचा मिकाडो ह्यांचें स्वर्गांत इतकें वजन आहे म्हणून समजतात कीं ते स्वर्गांतील लोकांना पाहिजे तेव्हां पाहिजे त्या पदवीस चढवूं शकतात.

प्राचीन ग्रीक लोकांमध्यें असल्याच समजुतीमुळें रा-

जकीय नायकीस जोर येत असे हें इतिहासज्ञांस विदितच आहे. उत्तर यूरोपांतील आर्यन लोकांतही हीच गोष्ट दृष्टीस पडे. त्यांच्या तेव्हांच्या (ख्रिस्ती धर्माच्या पूर्वींच्या) धर्माप्रमाणें ते असें समजत कीं, साक्सन, आंग्लियन, ड्यानिश, नार्वेजन आणि स्वीडिश राजे ओडिनपासून (त्यांच्या देवाचें नांव) किंवा त्याच्या निकट सोबत्यांपासून किंवा शूर पुत्रांपासून उत्पन्न झालेले आहेत.

दुसरी एक गोष्ट ध्यानांत अशी ठेवावयाची कीं, जो देवोत्पन्न शास्ता देवांचा मुख्य उपाध्यायही असेल (आणि तसा तो बहुधा असतोच), त्यास ज्या राजाला केवळ जादूचीच तेवढी विद्या येते म्हणून समजत असतील त्या राजापेक्षां ज्यास्त उत्तम अशी दैविक मदत मिळत असते, म्हणून समजतात. ह्याचें पहिलें कारण हें कीं जादूगार ज्या अदृश्यशक्तींना आव्हान करीत असतो त्या अत्यन्त उच्च दर्जाच्या म्हणून समजल्या जात नसतात; पण देवकुलोत्पन्न राजाला श्रेष्ठ अशा अदृश्यशक्तीची मदत मिळते अशी कल्पना असते. आणि दुसरें कारण हें कीं, राजाचे जादूगार ह्या नात्यानें जे गुण ते तो आपल्या वंशजांमध्यें संक्रान्त करितो म्हणून समजत नाहींत; आणि म्हणून देवकुलोत्पन्न राजा जसा दैविक कुलाची स्थापना करितो तसा हा करीत नाहीं.

४५. राजकीय नायकीची स्थापना करण्यास ज्या अनेक कारणांचें सहकार्य होत असतें, त्यांचा विचार एथवर केला. आतां ह्या सहकार्याची जी सरणी तिच्या

उच्चतर उच्चतर पायऱ्यांचा विचार करूं. ह्यासंबंधानें जें सत्य ध्यानांत आणावयाचें आहे तें हें कीं, जे चमत्कार अगदीं सरल अशा समूहांत कांहीं विशिष्ट क्रमानें होत असतात, तेच चमत्कार त्याच क्रमानें संयुक्तसमूहांत आणि पुनःसंयुक्तसमाजांतही होत असतात.

ज्याप्रमाणें सरल समूहांत नायकी मुळींच नाहीं अशी प्रथम स्थिति असते, तशीच थोडासा अधिकार असलेले राजकीय मुख्य ज्यांस प्राप्त झालेले आहेत असे साधे समूह जेव्हां एकत्र होतात, तेव्हां त्या सगळया संघाची मिळून नायकी उत्पन्न झालेली नसते. ह्याचें उदाहरण चिनूक लोकांत दृष्टीस पडतें. त्यांचें वर्णन करतांना ल्युइस व क्लार्क हे म्हणतातः—“ ह्या कुटुंबांची वृद्धि होऊन त्यांच्या जशा जमाती किंवा टोळया किंवा राष्ट्रें बनतात, तसा प्रत्येक मंडळाचा मुख्य कुटुंबपित्याची सत्ता चालवूं लागतो. पण हा मुख्य आनुवंशिक नसतो, आणि निरनिराळ्या गांवाचे मुख्य अगदीं स्वतंत्र असतात.” म्हणजे, सर्वांचा सामान्य मुख्य असा कोणी नसतो.

साध्या समूहामध्यें नायकी प्रथम तत्पुरती असून ज्या लढाईमुळें ती उत्पन्न झाली असेल ती बंद झाल्याबरोबर जशी ती संपते, तद्वतच ज्यांचे निरनिराळे सर्वसंमत मुख्य आहेत अशा समूहाच्या संघामध्येंही सामान्य नायकी लढाईपासून उत्पन्न होऊन तिच्याबरोबरच संपते. उदाहरणार्थ, पाटागोनियन लोकांबद्दल फॉकनर असें म्हणतो कीं, जेव्हां समुदित लढाई होऊन पुष्कळ राष्ट्रें सामान्य शत्रूशीं झगडत असतील तेव्हां ते लोक आपल्या मुख्यांपैकीं जो अत्यन्त वृद्ध किंवा प्रसिद्ध अ-

सेल त्यास सेनापति करीत. वरच्या ओरिनोको नदीवरील इंदियन लोक चाळीस चाळीस किंवा पन्नास पन्नास माणसांचे जमाव करून कौटुंबिक शासनाखालीं रहात असतात, आणि लढाईच्या वेळीं तेवढेंच सर्वसामान्य नायकास ओळखितात. बोर्निओमध्येंही असेंच आहे, आणि यूरोपामध्यें जर्मनी वगैरे देशांत असेंच होतें.

ह्यावरून राजकीयसंकलनाचा विचार करतांना सांगितलेल्या एका गोष्टीची आठवण होते; ती ही कीं, साध्या समूहामध्यें असणाऱ्या स्निग्धतेपेक्षां संयुक्तसमाजांत स्निग्धता कमी असते, आणि संयुक्तापेक्षां पुनःसंयुक्तांत कमी असते. तेथें ह्या स्निग्धभावाबद्दल म्हटलें तें एथें त्याला उत्तेजक जो अंकितपणा किंवा कोणाच्या तरी कह्यांत राहण्याचा गुण त्याच्यासंबंधानें म्हणतां येईल. कारण आपल्यास असें आढळून येतें कीं जेव्हां सारखी लढाई चालू राहून संयुक्तसमूहाची कायमची नायकी उत्पन्न होते, तेव्हां ती साध्या समूहांच्या नायकीपेक्षां कमी स्थिर असते. पुष्कळ वेळां ती ज्यानें संपादिली असेल तो जिवंत असेल तोंपर्यंतच ती टिकते. उदाहरणार्थ, क्यारेन किंवा मागांगा किंवा डायाक लोकांमध्यें. जेथें संयुक्तसमूहाची नायकी तिच्या स्थापकाच्या मरणानंतरही चालू राहते तेथें देखील घटकसमूहांच्या नायक्यांहून ती कमी स्थाईक असते. कालमक व मोंगल लोकांचें वर्णन करतांना पालास असें म्हणतो कीं, त्यांच्यांतील नायकांची त्यांच्या आश्रितांवर जरी अमर्याद सत्ता चालते, तरी त्यांच्यांतील खानांची ह्या नायकांवर अनिश्चित आणि दुर्बल अशीच सत्ता चालते. ऑरॉकेनियन

लोकांविषयीं टामसन असेंच म्हणतो. काफिर लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, ते सर्व म्हणजे नाईक व त्यांच्या हाताखालचे सर्व, राजाचे आश्रित असतात; पण सामान्य लोकांची आपल्या नायकांवर इतकी आंधळी भक्ति असते कीं ते राजाविरुद्ध देखील त्यांचे हुकूम मानितात. होमरनें वर्णिलेल्या ग्रीक लोकांबद्दल ग्लाडस्टन असेंच लिहितो; आणि फ्यूडल पद्धतीच्या पहिल्या पहिल्या अमदानींत पश्चिम यूरोपांतही असेंच होतें.

साध्या समूहांप्रमाणें संयुक्तसमूहांमध्यें देखील निवड करून घेऊन गादीवर बसण्याची चाल जाऊन वंशपरंपरेनें गादीवर बसण्याची चाल उत्पन्न झाल्यानें नायकी स्थाईक होत जाण्यास मदत होत असते. स्वतंत्र टोळीच्या पहिल्या पहिल्या अमदानींत जेथें नायकी एकाद्यास त्याच्या श्रेष्ठपणावरून मुकाट्यानें लोकांनीं वश होऊन प्राप्त झालेली नसते, तेथें ती निवडीवरून प्राप्त होत असते. उत्तर-अमेरिकेंत आल्यूट, कोमांची वगैरे पुष्कळ लोकांत ही स्थिति आढळते; पालिनिशियामध्यें जमिनीवरील डायाक लोकांत असेंच आहे; आणि मुसलमानांनीं जाव्हा बेट जिंकलें त्यापूर्वीं तेथेंही असेंच होतें. हिंदुस्थानांतील नाग वगैरे डोंगरी लोकांतही असेंच आढळतें. कांहीं ठिकाणीं निवड आणि वंशपरंपरा हीं दोन्ही तत्त्वें एकाच जातीच्या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांत आढळून येतात. उदाहरणार्थ, क्यारेन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्या पुष्कळ प्रांतांत नायकी वंशपरंपरा आहे, पण दुसऱ्या पुष्कळ प्रांतांत निवडीचीही आहे. चिनूक लोकांच्या निरनिराळ्या

खेड्यांत अशीच निरनिराळी स्थिति आढळते. ह्याप्रमाणेंच प्रथम संयुक्तसमूहाचा मुख्य निवडलेला असतो. ह्याचीं आफ्रिकाखंडांत बरींच उदाहरणें सांपडतात; उदाहरणार्थ, कांगो देशापैकीं बऱ्याच भागांत राजाची निवड लहान लहान संस्थानिक करीत असतात; यारीबामध्येंही नाईक लोक आपल्यापैकीं सर्वांत शहाणा व धूर्त असेल त्यास राजा निवडितात. एशियाखंडांत कुकी लोकांत असेंच आहे; आणि यूरोपांतही अशींच स्थिति होती; उदाहरणार्थ, प्राचीन ग्रीक व रोमन लोकांत. पुढें दहाव्या शतकापर्यंत पश्चिम यूरोपांतही अशीच स्थिति होती; उदाहरणार्थ, फ्रान्सांत व इंग्लंदांत.

चांगल्या रीतीनें लढाईंत सेनापतीचें काम करून, आणि वंशपरंपरेच्या तत्त्वाची स्थापना करून वृद्धिंगत झालेली जी संयुक्त नायकीची स्थिरता तीस तिच्यांत नायकाच्या दैविक कुलोत्पत्तीची किंवा देवसंमततेची भर पडली म्हणजे ज्यास्तच जोर येतो. ह्याचीं उदाहरणें सर्वत्र दृष्टीस पडतात; आणि क्वचित् कोठें राजा जेव्हां आपणाला जादूगार किंवा देवकुलोत्पन्न असें म्हणून घेत नसेल, तेथें तो आपली उत्पत्ति कांहीं विलक्षण रीतीनें झाली आहे असा तरी बहाणा करितो. उदाहरणार्थ, दक्षिण आरबस्थानांत फोदली नांवाचे जे राजे १५० वर्षें राज्य करीत होते त्या सर्वांस हाताचीं सहा सहा बोटें असत, आणि त्यामुळें लोक त्यांस वचकून रहात. यूरोपांत व प्रत्यक्ष इंग्लंदांतही राजांचा अधिकार देवदत्त आहे ही कल्पना सतराव्या शतकापर्यंत रूढ होतीच.

एवंच संयुक्त समूहाची नायकी लढाईच्या वेळीं तत्पु-

रती उत्पन्न होऊन, नंतर घटकसमूहांचें वरचेवर सहकार्य झाल्यामुळें ती निवडीची व आजन्म टिकणारी बनून, नंतर लवकरच तीस वंशपरंपरेचें स्वरूप येऊन, आणि वंशपरंपरा संक्रान्तीच्या कायद्यास स्पष्ट व अविवाहित स्वरूप येत जाईल तशी ती स्थाईक होत जाऊन, राजा जेव्हां देवप्रतिनिधि म्हणून किंवा देवादिष्ट म्हणून मानिला जाऊं लागतो, तेव्हां तीस अत्यन्त स्थैर्य येतें.

४६. दैविक घटना, किंवा उत्पत्ति, किंवा संमतता राजकीय मुख्याच्या अंगीं लाविल्यानें सहजच त्याला अमर्यादित सत्ता प्राप्त होते; आणि तो आपल्या प्रजेचा व तिनें व्यापिलेल्या प्रदेशाचा मालक म्हणून समजला जाऊं लागतो, आणि पुष्कळ ठिकाणीं बऱ्याच अंशीं खराखुराच मालक बनतो.

रानटी लोकांत जेथें युद्धशीलता जोरावर असून जेत्यानें आपले पूर्ण हक्क स्थापिलेले असतात, तेथें लोकांनीं आपले राजे देववंशीय म्हणून न मानिले, तरी वरच्यासारखी बऱ्याच अंशीं स्थिति असते. उदाहरणार्थ, झुलू-काफिर लोकांत मुख्य नाईक आपल्या लोकांच्या जीवितांचा पूर्ण मालक असतो. भिलांच्या नायकांची त्यांच्या जीवितांवर व मालमत्तेवर पूर्ण मालकी असते; आणि फीजी बेटांत प्रजा म्हणजे मालमत्ताच समजली जाते. पण जेथें शास्ता दैविक समजला जातो तेथें ही स्थिति ज्यास्तच प्रमाणावर असते. आस्ट्ले साहेब आपणांस असें सांगतो कीं लोआंगोमध्यें राजास ‘सम्बा’ व ‘पोंगो’, म्हणजे देव, असें म्हणतात, आणि प्रोयाट म्हणतो कीं लोआंगो लोक सांगतात कीं आमचीं

जीवितें व वित्तें राजाचीं आहेत. पूर्व-आफ्रिकेंत वासोरोमध्यें, कांहीं टोळ्यांमध्यें राजाच्या हातीं लोकांचे जीव घेण्याचीही सत्ता असून ते त्याची बहुतेक देवासारखी पूजाच करितात. सांबारामधील लोक म्हणतात कीं, आह्मी " झुंबी"चे (राजाचे) गुलाम असून तो आमचा " मुलुंगू " (देव) आहे. डेहामी व बेनिन येथील सरकारी कायद्याप्रमाणें सर्व लोक राजाचे गुलाम असून बहुतेक स्त्रिया त्याच्या बायका असतात; आणि डेहामीमध्यें राजास " भूत " म्हणून म्हणतात. मालागासी लोक राजास " आपला देव " म्हणून म्हणतात. आणि तो जमिनीचा, एकंदर मालमत्तेचा, आणि प्रजेचा मालक असतो. त्यांचा वेळ आणि श्रम ह्यांचा त्यास पाहिजे तेव्हां उपयोग करून घेतां येतो. सांडविच बेटांत असेंच असून राजा भविष्यें सांगत असतो. एशियाखंडांत सयाम, ब्रह्मदेश, चीन आणि जपान या देशांत असेंच आहे.

आतां हें उघडच आहे कीं जेथें राजकीय मुख्याच्या हातीं अमर्याद सत्ता असते, जेथें तो स्वारी करून विजयी झालेला असल्यामुळें त्याची प्रजा त्याच्या अगदीं ताब्यांत असते, किंवा जेथें तो देवकुलोत्पन्न म्हणून मानिला जात असल्यामुळें त्याच्या इच्छेविरुद्ध वागणें म्हणजे अपवित्र समजलें जातें, किंवा जेथें तो देव व विजेता म्हणून समजला जातो, तेथें तो सहजच सर्व प्रकारचा अधिकार आपल्याकडे ओढून घेतो. तो एकसमयावच्छेदेंकरून लष्करी मुख्य, कायदेकानूविषयक मुख्य, न्यायविषयक मुख्य, आणि धर्मविषयक मुख्य असतो. पू-

र्णपणें बनलेला; राजा प्रत्येक सामाजिक रचनेचा मध्यबिंदु असून प्रत्येक सामाजिक क्रियेचा सूत्रधार असतो.

४७. लहान टोळीमध्यें मुख्यास आपल्या अधिकारासंबंधी सर्व कामें स्वतःच करणें शक्य असतें. लढाईमध्यें सेनापतीचें काम करून आपल्या लोकांचे तंटे मोडण्यास, पूर्वजांपुढें बळी नेऊन ठेवण्यास, गांवांत व्यवस्था राखण्यास, ती मोडणारांस शिक्षा करण्यास आणि व्यापारधंद्याचें नियमन करण्यास, त्यास वेळ असतो. कारण त्याची प्रजा अल्प असून ती लहानशाच प्रदेशांत राहत असते. पण जेव्हां तो पुष्कळ संयुक्त टोळ्यांचा मुख्य बनतो, तेव्हां त्याचें काम वाढल्यामुळें, आणि त्याची प्रजा जास्त मोठ्या प्रदेशावर पसरलेली असल्यामुळें, स्वतःच सर्व कारभार करण्यास त्यास पंचाईत पडूं लागते. म्हणून माहिती मिळविणें, हुकूम पोंचविणें, आणि ते अमलांत आले किंवा नाहींत ते पाहणें, ह्या कामांवर इतरांस लावणें त्यास जरूर पडूं लागते; आणि कालान्तरानें अशा रीतीनें लाविलेले जे मदतनीस ते ज्यांच्याकडे निरनिराळे अधिकार सोंपून दिलेले आहेत अशा खात्यांचे कायमचे मुख्य होऊन बसतात.

शासनविषयक रचनांची अशा रीतीनें वृद्धि झाल्यामुळ; शास्त्यास पूर्वींहून ज्यास्त कामें करतां यावयास लागून जरी एका रीतीनें त्याची सत्ता वाढते, तरी दुसऱ्या रीतीनें ती कमी होते; कारण ज्या खातेमुख्यांच्या द्वारा तो तीं कामें उरकून घेत असतो ते त्याच्या कृत्यांमध्यें जास्तजास्त हात घालूं लागतात. कोणत्याही प्रकारच्या कारभाराची व्यवस्था कशी लागत असते हें

ज्यांनीं स्वतः लक्षपूर्वक पाहिलें आहे त्यांच्या ही गोष्ट अवश्यमेव लक्षांत येतेच येते कीं, पोटशास्ते मुख्य शास्त्यास मदतही करितात आणि विघ्नही करीत असतात. परोपकारासाठीं स्थापिलेली एकादी संस्था असो, किंवा एकादी शास्त्रीय सभा असो, किंवा एकादा क्लब (मित्रमंडळ) असो, त्याचे जे मुख्य चालक असतात त्यांना वरचेवर असें आढळून येतें कीं, आपण जें व्यवस्थित असें कामगारमंडळ निर्माण केलें आहे तें वरचेवर आपल्या उद्देशास अडथळा करितें आणि कधीं कधीं तर ते अगदीं निष्फळ करून टाकितें. आतां सरकारचीं जीं ह्याच्याहून फारच मोठीं कारभारी मंडळें त्यांची तर अशी स्थिति ज्यास्तच मोठ्या प्रमाणावर होत असते. कारण मुख्य शास्त्यास जी बातमी मिळते ती त्याच्या अधिकाऱ्यांकडूनच मिळते, आणि त्याचे हुकूमही तेच अमलांत आणीत असतात; आणि म्हणून त्याचा सरकारी कामाशीं असलेला संबंध जसजसा अप्रत्यक्ष होत जातो, तसतसा त्यांजवरील त्याचा ताबा कमी होत जातो, आणि शेवटीं, ही गोष्ट अगदींच निकरास जाईल तेथें, असा परिणाम होतो कीं, तो आपल्या मुख्य प्रधानाच्या हातांतील बाहुलें बनतो, किंवा तो प्रधान त्याचें स्थान बळकावितो.

विलक्षण गोष्ट अशी आहे कीं ज्या दोन कारणांमुळें राजकीय नायकीस प्रथम कायमपणा येतो, त्याच कारणांमुळें, पुढें, राजकीय मुख्य केवळ दुसऱ्यांनीं हालविण्याचें बाहुलें बनतो, आणि नंतर तो त्यानेंच निर्मिलेल्या मुनीमांच्या इच्छा अमलांत आणूं लागतो. ह्याचें पहिलें कारण हें कीं जेव्हां गादी कोणत्या वंशांतील पु-

रुषांस मिळावयाची हें अगदीं नक्की ठरून जातें, तेव्हां राजा नेहमींच आपलें काम करण्यास लायक असतो असें नाहीं. कधीं कधीं नवा राजा वयानें अगदीं लहान असतो, किंवा बुद्धीनें मंद असतो, किंवा शक्तीनें दुबळा असतो, किंवा चैनींमध्यें गुंग झालेला असतो. ह्याचा परिणाम असा होतो कीं, राजप्रतिनिधि किंवा मुख्यप्रधान हाच वास्तविक शास्ता होऊन बसतो. दुसरी गोष्ट अशी कीं, तो देवोत्पन्न समजला गेल्यामुळें त्याच्या अंगीं जो पवित्रपणा आलेला असतो त्यामुळें तो आपल्या प्रजेस दुर्गम होतो. त्यामुळें त्यांच्या व त्याच्यामधील सर्व व्यवहार त्याच्या गुमास्त्यांच्या द्वारा चालूं लागतो. म्हणून ते त्यास माहिती देतील त्यापलीकडे त्यास कांहीं कळत नाहींसें होतें, किंवा कळण्यास फार कठीण पडतें; त्यामुळें जरूर त्या आज्ञा करण्यास, किंवा त्यांची बजावणी होते किंवा नाहीं तें पाहण्यास, तो असमर्थ होतो. मग त्याचे गुमास्ते त्याच्या अधिकाराचा उपयोग आपले हेतू साधण्याच्या कामीं करावयास लागतात.

टाँगासारख्या अगदीं सरल समाजामध्यें देखील ह्याचें उदाहरण आपणास सांपडतें. तेथें वंशपरंपरेचा पवित्र नाईक असून तो प्रारंभीं एकटाच मुख्य असे, आणि तो देवकुलोत्पन्न समजला जाऊन त्याच्या हातीं ऐहिकसत्तेप्रमाणें पारलौकिक सत्ता असे, पण तो हल्लीं सत्ताहीन बनला आहे. आबिसिनियामध्यें अशा प्रकारचें कांहीं दिसून येतें. तेथील राजा प्रजेशीं प्रत्यक्ष दळणवळण मुळींच ठेवीत नसून, कौन्सिलामध्यें देखील तो

आपला पवित्रपणा राखण्यासाठीं अदृश्य बसत असल्यामुळें, केवळ बाहुलें बनलेला आहे. त्याच देशाचा एक भाग जो गोंडार तेथील राजा सॉलोमनच्या राजकुलांतील असलाच पाहिजे; पण एकाद्या गडबड्या नायकानें शस्त्रांच्या जोरावर वर्चस्व मिळविलें असल्यास तो रास (म्हणजे मुख्य प्रधान किंवा वास्तविक राजा) बनतो. नेपाळ व भूतान या देशांत राजा धर्माचा मुख्य समजला जाऊन त्याच्या हातीं राजकीय सत्ता मुळींच नसते; आणि त्यासाठीं भूतानांत देवराज म्हणून निराळाच मुख्य असतो. जपानामध्यें तर पूर्वीं राजा नांवाचा असून सर्व सत्ता त्याच्या चार प्रधानांच्याच हातीं असे.

यूरोपांतही, प्रथम प्रथम, इतक्या ठळक रीतीनें नाहीं तरी, असलीच स्थिति सामान्यतः असे. मेरोव्हिन्जियन राजे देवकुलोत्पन्न समजले जात असून त्यांच्यांत वंशपरंपरा इतकी ठराविक होती कीं, लहान मुलगेही गादीवर बसवीत; आणि त्यामुळें मुख्य सत्ता मुख्य प्रधानांच्या हातीं गेलेली होती.

४८. अशा रीतीनें ज्या संस्था निरपेक्षदृष्ट्या हितकर नाहींत, त्यांचा उत्क्रान्तिदृष्ट्या सापेक्ष उपकारकपणा आपल्या नजरेस येतो; आणि म्हणून जें नित्य असेल तर आपण तिरस्कार्य समजूं तें तत्पुरतें म्हणून आपण पसंत करण्यास तयार होतों. सारांश, एकंदर पुराव्यावरून आपणांस असें कबूल करणें भाग पडतें कीं, स्वेच्छाचारी राजांच्या तंत्रानें वागणें हें सुधारणेची प्रगति होण्यास बऱ्याच अंशीं कारण झालेलें आहे. हें अनुभवदृष्ट्या आणि तर्कदृष्ट्या दोन्ही रीतींनीं सिद्ध होतें.

एकीकडे, पृथ्वीवर कांहीं कांहीं ठिकाणीं जे मुख्यविहीन भटकणारे मनुष्यसमूह दृष्टीस पडतात ते जर आपण एका वर्गांत घातले, तर त्यांवरून असें दिसतें कीं, राजकीय संघटना नसली म्हणजे प्रगति बहुतेक मुळींच होत नाहीं; आणि ज्या स्थाईक व सरल समूहांचे केवळ नांवाचे नाईक आहेत त्यांजकडे पाहतां असें दिसतें कीं त्यांच्यांत जरी औद्योगिक कलांची आणि सहक्रियेची कांहींशी वाढ झालेली असते, तरी त्यांचीही प्रगति एकंदरींत अल्पच असते. बरें, दुसरीकडे, ज्या प्राचीन समाजांमध्यें सुधारणेची मजल बरीचशी गेलेली प्रथम दृष्टीस पडली त्यांजकडे पाहतां ते स्वेच्छाचारी राजांच्या अंमलाखालीं होते असें दृष्टोत्पत्तीस येतें. अमेरिकेंत मेक्सिको, मध्यअमेरिका आणि चिबूचा या देशांत केवळ स्वेच्छाचारीच राजे असून त्यांना बंधन कायतें रूढींचेंच असे; आणि पेरूदेशांत तर राजा दैविक असून त्याच्या स्वेच्छाचारी कारभारास मर्यादाच नसे. स्वैच्छिक सत्ता आणि सामाजिक उत्क्रमण ह्यांच्यामधील हा संबंध आफ्रिकेंत ईजिप्त देशांत फार ठळकरीतीनें दिसून येत असे. एशिया खंडांत प्राचीनकाळीं तो दिसत असून हल्लींही सयाम, ब्रह्मदेश, चीन व जपान ह्यांमध्यें दृग्गोचर होतो. प्रारंभींच्या यूरोपियन समाजामध्यें देखील जरी एका मुख्य राजाची स्वेच्छाचारी सत्ता नसे, तरी कुटुंबाधिपत्यांची असे. एकाच्या स्वेच्छाचारी सत्तेस नमून राहणें आणि सुधारणा होणें ह्या दोहोंमधील संबंध जो तुटलेला दिसतो तो अर्वाचीन राष्ट्रांतच दिसतो.

टोळ्यांटोळ्यांमध्यें आणि राष्ट्रांराष्ट्रांमध्यें झगडे चालले असतां जे लोक आपले नाईक व राजे ह्यांच्या आज्ञा ज्यास्त चांगल्या रीतीनें मानितात तेच, इतर गोष्टी समान असल्यास विजयी होतात, हें लक्षांत आणिलें म्हणजे स्वेच्छाचारी अमलाची आवश्यकता कशी उत्पन्न होते हें लक्षांत येतें. आणि समाजप्रगतीच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर लष्करी अंकितपणा आणि सामाजिक अंकितपणा हे एकत्रच वास करीत असल्यामुळें असें होतें कीं, जे समाज विजयी असतात ते पुष्कळ कालपर्यंत स्वेच्छाचारी अमलाखालींच राहतात. ह्या नियमास इतिहासांत अपवाद म्हणून जे कांहीं दिसतात त्यांवरून वास्तविकरीत्या त्या नियमाचीच सिद्धता होते. इराण व ग्रीस ह्यांमध्यें जो झगडा झाला त्यांत ग्रीक लोकांतील एक छत्री कारभाराच्या अभावामुळें उत्पन्न झालेला जो मतभेद त्यामुळें त्या लोकांचा पराभव झालाच असता, पण तो एका आकस्मिक गोष्टीमुळें टळला. आणि रोमन लोक शत्रूंपासून मोठें भय उत्पन्न झालें म्हणजे एक "डिक्टेटर" किंवा अनियंत्रित मुख्य अधिकारी नेमीत ह्यावरून लढाईत यश येण्यास एकछत्री नियंत्रणाची जरूरी कशी असते हें त्या लोकांच्या ध्यानांत आलें होतें असें स्पष्ट दिसतें.

एवंच, लढाई मुळींच नसती तर भटकणारे प्राथमिक समूह वृद्धि पावून त्यांचे स्थाईक सुधारलेले समाज बनले असते किंवा नाहीं हा प्रश्न तसाच ठेवून, आपण असा सिद्धान्त करितों कीं, जी वस्तुस्थिति आजपर्यंत होऊन गेली आहे त्या स्थितींत, ज्या जीवनार्थकलहांमुळें, ल-

हान लहान समूहांचे मोठाले समूह बनून अखेरीस मोठाली राष्ट्रें बनलेलीं आहेत त्या कलहांकरितां कडक स्वेच्छाचारी अंमल ज्याच्यांत आहे अशा सामाजिक नमुन्याची आवश्यकता उत्पन्न झालेली आहे.

४९. ह्या प्रधान राजकीयसंस्थेची घटना स्पष्टपणें लक्षांत यावी एतदर्थ ती बनवून आणण्यास जीं अनेक कारणें झालेलीं आहेत त्यांचें आणि ज्या पायऱ्या चढून जाव्या लागल्या आहेत त्यांचें संक्षेपानें कथन करूं.

अत्यन्त रानटी समूहांत कोणत्याही एका व्यक्तीनें श्रेष्ठ अधिकार हातीं घेण्यास विरोध होत असल्यामुळें स्थाईक नायक्या बहुधा उत्पन्न होत नाहींत, तथापि बळ, किंवा धैर्य, किंवा शहाणपणा, किंवा मालमत्ता, किंवा वृद्धवयांबरोबर येणारा अनुभव, ह्यांच्या श्रेष्टपणामुळें कांहींसें वर्चस्व एकादा मनुष्य बहुधा संपादन करीत असतो.

असल्या समूहांत आणि याहून अंमळ पुढें गेलेल्या टोळ्यांत, इतर सर्व प्रकारच्या श्रेष्ठपणांहून दोन प्रकारचे श्रेष्ठपणा वर्चस्व मिळवून देण्याच्या कामीं ज्यास्त उपयोगीं पडतात. एक लढवय्याचा आणि दुसरा वैदूचा. हे दोन प्रकारचे श्रेष्ठपणा जरी नेहमीं भिन्नभिन्न व्यक्तींत असतात, तरी कधीं कधीं एकाच व्यक्तीमध्यें असल्यामुळें, आणि त्याजवरून त्या माणसास फार प्राबल्य प्राप्त झाल्यामुळें, प्रथम राजकीय नायकी उत्पन्न करण्यास, आणि नंतर ती बळकट करण्यास ते फार उपयोगीं पडतात.

तथापि प्रथम खऱ्या स्वाभाविक सामर्थ्यामुळें, किंवा काल्पनिक दैविक सामर्थ्यामुळें, किंवा दोन्हींवरून सं-

पादन केलेला श्रेष्ठपणा क्षणभंगुर असतो—म्हणजे, तो ज्यानें संपादिला असेल त्याच्याबरोबरच त्याची समाप्ति होते. एकटें हुशारीचें तत्त्वच जोंपर्यंत अमलांत असतें, तोंपर्यंत राजकीय नायकी स्थाईक बनत नाहीं. तर वरच्या तत्त्वांत वंशपरंपरेच्या तत्त्वाची जेव्हां भर पडते, तेव्हांच ती स्थाईक बनतें.

स्त्रियांकडून वंशपरंपरा गणण्याची जी चाल पुष्कळ रानटी समाजांत दिसत असते आणि जी बऱ्याच पुढें गेलेल्याही कांहीं समाजांत कायम राहते, ती पुरुषांकडून वंशपरंपरा गणण्याच्या चालीपेक्षां स्थाईक राजकीय नायकीच्या स्थापनेस कमी अनुकूल आहे; आणि ज्यांच्यांत स्थाईक राजकीय नायकी स्थापन झालेली आहे अशा कांहीं अर्धवट सुधारलेल्या समाजांत, इतरत्र जरी स्त्रियांकडून वंशपरंपरा गणीत असले तरी राजकुलांत ती पुरुषांकडून गणितात.

पुरुषांकडून वंशपरंपरा गणिल्यानें कुटुंब ज्यास्त सुसंबद्ध बनतें, अंकितपणा ज्यास्त होतो, आणि वंशपरंपरेनें आलेल्या अधिकाराबरोबर वंशपरंपरा योग्यतेचा मिलाफ होण्याचा संभव वाढतो; ह्या गोष्टींखेरीज त्यासंबंधानें आणखी एक ज्यास्त महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं तेणेंकरून पूर्वजपूजेस उत्तेजन येतें, आणि त्यामुळें स्वाभाविक अधिकारास दैविक अधिकाराचा दुजोरा मिळतो. पिशाचकल्पनेची वाढ होऊन प्रबलमाणसांच्या पिशाचाबद्दल विशेष भीति वाटूं लागल्यामुळें, जेथें एक विजेता अनेक टोळ्यांचें एक राष्ट्र बनवितो, तेथें त्याच्या पिशाचास देवाची थोरवी प्राप्त होऊन त्यापासून

हान लहान समूहांचे मोठाले समूह बनून अखेरीस मोठाली राष्ट्रें बनलेलीं आहेत त्या कलहांकरितां कडक स्वेच्छाचारी अंमल ज्याच्यांत आहे अशा सामाजिक नमुन्याची आवश्यकता उत्पन्न झालेली आहे.

४९. ह्या प्रधान राजकीयसंस्थेची घटना स्पष्टपणें लक्षांत यावी एतदर्थ ती बनवून आणण्यास जीं अनेक कारणें झालेलीं आहेत त्यांचें आणि ज्या पायऱ्या चढून जाव्या लागल्या आहेत त्यांचें संक्षेपानें कथन करूं.

अत्यन्त रानटी समूहांत कोणत्याही एका व्यक्तीनें श्रेष्ठ अधिकार हातीं घेण्यास विरोध होत असल्यामुळें स्थाईक नायक्या बहुधा उत्पन्न होत नाहींत, तथापि बळ, किंवा धैर्य, किंवा शहाणपणा, किंवा मालमत्ता, किंवा वृद्धवयांबरोबर येणारा अनुभव, ह्यांच्या श्रेष्टपणामुळें कांहींसें वर्चस्व एकादा मनुष्य बहुधा संपादन करीत असतो.

असल्या समूहांत आणि याहून अंमळ पुढें गेलेल्या टोळ्यांत, इतर सर्व प्रकारच्या श्रेष्ठपणांहून दोन प्रकारचे श्रेष्ठपणा वर्चस्व मिळवून देण्याच्या कामीं ज्यास्त उपयोगीं पडतात. एक लढवय्याचा आणि दुसरा वैदूचा. हे दोन प्रकारचे श्रेष्ठपणा जरी नेहमीं भिन्नभिन्न व्यक्तींत असतात, तरी कधीं कधीं एकाच व्यक्तीमध्यें असल्यामुळें, आणि त्याजवरून त्या माणसास फार प्राबल्य प्राप्त झाल्यामुळें, प्रथम राजकीय नायकी उत्पन्न करण्यास, आणि नंतर ती बळकट करण्यास ते फार उपयोगीं पडतात.

तथापि प्रथम खऱ्या स्वाभाविक सामर्थ्यामुळें, किंवा काल्पनिक दैविक सामर्थ्यामुळें, किंवा दोन्हीवरून सं-

पादन केलेला श्रेष्ठपणा क्षणभंगुर असतो—म्हणजे, तो ज्यानें संपादिला असेल त्याच्याबरोबरच त्याची समाप्ति होते. एकटें हुशारीचें तत्त्वच जोंपर्यंत अमलांत असतें, तोंपर्यंत राजकीय नायकी स्थाईक बनत नाहीं. तर वरच्या तत्त्वांत वंशपरंपरेच्या तत्त्वाची जेव्हां भर पडते, तेव्हांच ती स्थाईक बनते.

स्त्रियांकडून वंशपरंपरा गणण्याची जी चाल पुष्कळ रानटी समाजांत दिसत असते आणि जी बऱ्याच पुढें गेलेल्याही कांहीं समाजांत कायम राहते, ती पुरुषांकडून वंशपरंपरा गणण्याच्या चालीपेक्षां स्थाईक राजकीय नायकीच्या स्थापनेस कमी अनुकूल आहे; आणि ज्यांच्यांत स्थाईक राजकीय नायकी स्थापन झालेली आहे अशा कांहीं अर्धवट सुधारलेल्या समाजांत, इतरत्र जरी स्त्रियांकडून वंशपरंपरा गणीत असले तरी राजकुलांत ती पुरुषांकडून गणितात.

पुरुषांकडून वंशपरंपरा गणिल्यानें कुटुंब ज्यास्त सुसंबद्ध बनतें, अंकितपणा ज्यास्त होतो, आणि वंशपरंपरेनें आलेल्या अधिकाराबरोबर वंशपरंपरा योग्यतेचा मिलाफ होण्याचा संभव वाढतो; ह्या गोष्टींखेरीज त्यासंबंधानें आणखी एक ज्यास्त महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं तेणेंकरून पूर्वजपूजेस उत्तेजन येतें, आणि त्यामुळें स्वाभाविक अधिकारास दैविक अधिकाराचा दुजोरा मिळतो. पिशाचकल्पनेची बाढ होऊन प्रबलमाणसांच्या पिशाचाबद्दल विशेष भीति वाटूं लागल्यामुळें, जेथें एक विजेता अनेक टोळ्यांचें एक राष्ट्र बनवितो, तेथें त्याच्या पिशाचास देवाची थोरवी प्राप्त होऊन त्यापासून

दोन परिणाम घडून येतात. पहिला परिणाम हा कीं, त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसणारा जो त्याचा वंशज त्याच्या अंगींही ती दैविक घटना आलेली आहे असें लोकांस वाटूं लागतें; आणि दुसरा परिणाम हा कीं, त्याला संतर्पणार्थ बळी दिल्यानें त्यास (वंशजास) त्याची (दैविक मानिलेल्या मूळ विजेत्याची) मदत प्राप्त होते असें लोकांस वाटूं लागतें. म्हणून त्याच्या (वंशजाच्या) विरुद्ध बंड करणें हें जसें दुष्टपणाचें कृत्य म्हणून त्यांस वाटूं लागतें, तसेंच निष्फळ म्हणूनही वाटूं लागतें.

ज्या सरण्यांनीं राजकीय नायक्या प्रथम स्थापन होतात त्या राजकीय सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर पुनःपुनः दृष्टीस पडतात. सरलसमूहांत नायकी प्रथम तत्पुरती असते म्हणजे ज्या लढाईमुळें तिची उत्पत्ति झाली तिजबरोबर तीही खलास होते. ज्या साध्या समूहांना कायमचे राजकीय मुख्य प्राप्त झालेले आहेत ते जेव्हां लढाईकरितां एकत्र होतात, तेव्हां सर्वांची मिळून जी नायकी तीही प्रथम तत्पुरतीच असते. साध्या समूहांत नायकी जशी प्रथम बहुधा निवडीची असते, आणि नंतरच्या पायरीवर ती वंशपरंपरेची बनते, तद्वतच संयुक्तसमूहाची नायकी प्रारंभीं निवडीची असून नंतरच्या पायऱ्यांवरच ती वंशपरंपरा बनते. जेथें क्वचित् दुबार संयुक्तसमाज बनला असेल तेथेंही असेंच होतें. शिवाय, एका श्रेष्ठ शास्त्याची मागून स्थापिलेली जी ही सत्ता, जी प्रथम निवडीनें प्राप्त होऊन मागून वंशपरंपरेनें मिळूं लागते, ती स्थानिक शास्त्यांच्या

त्या त्या स्थानाच्या सत्तेपेक्षां बहुधा कमी असते; आणि जेव्हां ती जास्त होते, तेव्हां ती बहुधा तो देवकुलोत्पन्न आहे किंवा देवनियुक्त आहे, अशी त्याच्या संबंधानें लोकांची समजूत झाल्यामुळें होते.

राजाची उत्पत्ति किंवा अधिकार दैविक कल्पिला गेल्यामुळें जेथें तो पूर्ण स्वेच्छाचारी बनलेला आहे, आणि प्रजा व मुलूख ह्या दोहोंचाही मालक बनल्यामुळें सर्व प्रकारचे अधिकार चालवीत आहे, तेथें कार्यवैपुल्यामुळें त्याला आपले अधिकार दुसऱ्यांच्या हातीं देणें भाग पडतें. नंतर त्यानेंच निर्मिलेल्या राजकीय संस्थांचें प्रतिक्रियेनें त्याजवर नियंत्रण होऊं लागतें, आणि हें संस्थाजाल त्याच्याहून सारखें प्रबल होऊं पाहतें. मुख्यत्वेंकरून जेथें वंशपरंपरा अधिकार-संक्रान्तीच्या नियमाचें अबाधित अनुसरण केल्यामुळें अयोग्य पुरुष गादीवर येऊं लागतात, किंवा राजा दैविक समजल्यामुळें प्रजेस तो त्याच्या गुमास्त्यांच्या द्वाराच प्राप्य होऊन जातो, किंवा जेथें ह्या दोन्ही गोष्टी दिसूं लागतात, तेथें राजाची सत्ता त्याच्या प्रतिनिधींच्या हातांत जाते. कायदेशीर राजा दुसऱ्यांनीं हालविण्याचें बाहुलें बनतो, आणि त्याचा मुख्य मुनीम वास्तविक शास्ता बनतो; आणि कांहीं ठिकाणीं हा मुनीमही असल्याच पायऱ्या आक्रमून जाऊन स्वतः बाहुलें बनतो आणि त्याच्या हाताखालचे अधिकारी वास्तविक शास्ते बनतात.

शेवटीं, एकंदर गोष्टी एकत्र मांडून त्यांची तुलना करून पाहतां, स्वेच्छाचारी व्यक्तिसत्तेपासून होणाऱ्या प्रत्यक्ष नुकसानांबरोबर अप्रत्यक्ष फायदे काय होतात तें

आपल्या लक्षांत येतें. ज्या राजकीय संकलनाव्यतिरिक्त सामाजिक उत्क्रमणाची कोणतीही उच्च पायरी बहुधा मुळींच प्राप्त झाली नसती त्या संकलनाची, विजेत्या मुख्याची नायकी ही सर्वत्र सहचारीणी दिसून येते. युद्धामध्यें एकत्र होणें अगदीं अनिवार्य रीतीनें आवश्यक झाल्यामुळेंच रानटी लोक प्रथम सहकार्याचा स्वीकार करिते झाले. सत्तीचे हुकूम मानिल्यामुळें असल्या सहक्रियेपासून इष्ट कार्य होऊं लागलें; आणि, सुधारलेल्या जीवितामध्यें सहक्रियेचे जे इतर प्रकार दिसून येतात, ते अशा रीतीनें प्रारब्ध झालेल्या सहक्रियेमुळेंच झाले.

प्रकरण सातवें

संयुक्त राजकीय मुख्य

५०. "एकांत तीन" अशा प्रकारची जी राजकीय रचना प्रारंभीं सर्वत्र दृष्टीस पडते, त्यांतील पहिल्या घटकाचा आपण गतप्रकरणांत विचार केला. आतां आपण दुसऱ्या घटकाचा विचार करूं; म्हणजे, ज्या पुढारी माणसांच्या समूहापैकीं मुख्य नाईक प्रथम केवळ अत्यन्त ठळक माणूस असतो त्या समूहाचा आतां विचार करूं. दुसरे दोन घटक गौण बनतील इतकें ह्या घटकाचें उत्क्रमण कशानें होतें, कोणत्या कारणांनीं तो आकुंचित होत जातो, आणि कोणत्या कारणांनीं तो विस्तृत होऊन त्यास तिसऱ्याचें स्वरूप येतें, ह्या गोष्टींचा एथें आपणास विचार कर्तव्य आहे.

एकाद्या जातीच्या लोकांचे जे सामाजिक समूह बनतात, त्यांचे आकार आणि स्निग्धभाव हे त्या जातीच्या मनोविकारांवर आणि योग्यतेवर पुष्कळ अंशीं जर अवलंबून असतात, तर असल्या समूहांच्या घटकांमध्यें जे संबंध उत्पन्न होतात ते त्या विकारांवर व योग्यतांवर ज्यास्तच अवलंबून असतात. ही किंवा ती राजकीय घटना उत्पन्न होणें जसें त्यांच्या जीवितसरणीवर अवलंबून असतें, तसे त्या घटनेचे परिणाम नेहमीं त्या लोकांमध्यें वंशपरंपरा संक्रान्त झालेली जी स्वभावघटना तिच्या परिणामांनीं संकीर्ण होत असतात. रानटी स्थितींत नियामक सत्ता जी सर्व लढवय्यांमध्यें किंवा वडील

माणसांमध्यें सारखी विभागलेली असते ती स्थिति जाऊन ज्या स्थितींत ती सत्ता एकट्याच्याच हातीं जाते ती स्थिति प्राप्त होणें किंवा न होणें हें कांहीं अंशीं समूहाच्या जीवितावर—म्हणजे तें लुटालुटीचें आहे किंवा शांततेचें आहे ह्याजवर, अवलंबून असतें, आणि कांहीं अंशीं त्या समूहांतील लोकांच्या स्वभावांवर—म्हणजे त्यांस दुसऱ्यांच्या हुकुमांना ज्या कमज्यास्त जोरानें विरोध करावासें वाटत असेल त्याजवर, अवलंबून असतें. ही गोष्ट थोड्याशा उदाहरणांवरून व्यक्त होणार आहे.

पापुआ बेटांतील आराफूरा लोक शांततेनें व बंधुप्रेमानें रहात असून त्यांजमध्यें वडील माणसांच्या ठरावांव्यतिरिक्त दुसरी मुळींच सत्ता नाहीं. निरुपद्रवी टोडा लोकांत सर्व तंट्यांचा व खऱ्याखोट्याचा निकाल तिऱ्हाईतांकडून किंवा पंचांकडून होत असतो. बोडो व ढिमाल लोक लष्करी खात्यांत शिरण्यास नाराज असून, बढाई, असूया, आणि क्रौर्य ह्यांपासून मुक्त आहेत; म्हणून त्यांजबद्दल असें वाचण्यांत येतें कीं, त्यांच्या लहान लहान ज्ञातींपैकीं प्रत्येकीचा जरी नांवाचा नाईक असून तो तिच्या वतीनें जरी खंडणी भरतो, तरी त्याच्या हातीं सत्ता नाहीं, आणि त्यांचे तंटे पंचलोक तोडितात.

ह्या उदाहरणांमध्यें श्रेष्ठत्व प्राप्त करून देणाऱ्या कारणांचा अभाव दिसत असून, शिवाय त्याला प्रत्यक्ष अडथळा आणणारीं कारणें नजरेस येतात. कारण पापुअन लोकांस नियंत्रण मुळींच खपत नाहीं. तद्वतच बोडो व ढिमाल यांना कोणीं भलतेच हुकूम केल्यास ते

मुळींच ऐकत नाहींत. लेप्चा लोकांचेंही ह्या दोन्ही बाबतींत अगदीं असेंच आहे.

जेथें नियंत्रणाचा तिटकारा फार असतो तेथें लोक लढवय्ये असल्यामुळें नायकीची उत्पत्ति होण्यास अनुकूल स्थिति असली तरी अनेकस्थ अशी राजकीय घटना कायम राहते. उदाहरणार्थ, नाग लोक आपल्यामध्यें कोणास राजा म्हणून कबूल करीत नाहींत, आणि दुसरे लोक करितात त्याबद्दल ते त्यांस हंसतात; त्यांच्या गांवागांवांमध्यें नेहमीं तंटे सुरू असतात; आणि त्यांच्यापैकीं प्रत्येक स्वताचा धनी असल्यामुळें त्याचे मनोविकार आणि मनोवृत्ती ह्या त्याच्या अंगची जी कमज्यास्त शारीरिक शक्ति तिच्याच कह्यांत असतात. उत्तरअमेरिकेंतील लढवय्या टोळ्यांची स्थिति अशीच आहे. त्यांजविषयीं स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्या सर्वांची इच्छा अधिकार चालवण्याची असते, व चालवून घेण्याची नसते. प्रत्येक इंडियनास वाटतें कीं आपणास वाटेल तें करण्याचा हक्क आहे, आणि आपल्याहून चांगला असा कोणीच नाहीं; आणि त्याला जें बरोबर वाटतें तें तो त्याच्याशीं लढल्याशिवाय करावयाचें सोडण्यास तयार होणार नाहीं. त्यांपैकीं कोमांची लोकांबद्दल तो असें म्हणतो कीं, त्यांच्यांत लोकसत्ताकाचें तत्त्व इतकें बिंबलेलें आहे कीं, राज्यकारभार चालविण्यासाठीं वर्षांतून नियमित वेळां त्यांच्या सार्वजनिक सभा भरत असतात. मध्यअमेरिकेंतील प्रांतांत प्राचीनकाळीं अशीच स्थिति होती. त्यांच्यांत निवडिलेल्या वृद्ध माणसांची एक सभा असून ती एक लढवय्या मुख्य ने-

मीत असे, आणि तो लढवय्या लोकसत्ताकाविरुद्ध किंवा आपल्या हातीं मुख्य सत्ता येण्यासाठीं कट करीत आहे असा संशय आल्यास, ती सभा त्यास निक्षून ठार करी.

ज्या स्वभावविशेषांमुळें कांहीं प्रकारच्या लोकांस संयुक्त राजकीय मुख्य नेमावेसें वाटतें, आणि लढाईच्या प्रसंगीं देखील एकच राजकीय मुख्य नेमण्यास विरोध करावासा वाटतो, ते स्वभावविशेष जरी जन्मजात आहेत, तरी ते तसे कशा परिस्थितींत होतात हें समजण्यास आपणास मार्ग नाहीं असें नाहीं; आणि एतद्विषयक जी उपपत्ति आपण आतांच लावणार आहों तिच्याकरतां त्या परिस्थितीकडे नजर फेंकल्यास फायदा होईल. कोमांची व तसलेच इतर लोक लहान लहान जमाव करून इकडे तिकडे भटकत असल्यामुळें, आणि ते घोड्यावर बसण्यांत फार चपळ व पटाईत असल्यामुळें, पुष्कळ काळपावेतों अशा परिस्थितींत राहतात कीं, त्या काळांत त्यांपैकीं एकानें दुसऱ्याचें नियंत्रण करणें कठीण होऊन जातें. नाग लोकांचीही स्थिति अन्यतऱ्हेनें परंतु अशीच झालेली आहे. बर्टन म्हणतो कीं, आफ्रिकेमध्यें बेडुइन लोक, डोंगरी लोक, आणि जंगली लोक, ह्यांजमध्यें रानटी अशी लोकसत्ताक व्यवस्था आढळते. आतां 'डोंगरी' व 'जंगली' ह्या नांवांवरूनच ते अशा मुलखांत राहतात असें व्यक्त होतें कीं, तेथें एकस्थित राज्यकारभारास अनुकूल स्थिति नाहीं, आणि अनेकस्थ कारभारास आहे, आणि लोक अधिकाऱ्यांचे फारसे अंकित नाहींत.

ह्या गोष्टी अगोदरच सांगितलेल्या कांहीं गोष्टींशीं

संबद्ध अशा आहेत. प्रस्तुतशास्त्राच्या पहिल्या भागाच्या १७ व्या कलमांत आणि प्रस्तुत भागाच्या १६ व्या कलमांत आपण असें पाहिलेंच आहे कीं, जो देश असा असेल कीं त्याच्या बाहेर पडण्यास मुष्कील पडावी, पण आंतल्या आंत दळणवळणाचे मार्ग चांगले असावे, अशा देशांत मोठा जमाव बनवणें इतर देशाच्या मानानें सुलभ पडतें; आणि उलटपक्षीं, ज्या देशांत दळणवळणमार्ग अल्प असतील आणि बाहेर जाण्याचे मार्ग सुलभ असतील, तेथें मोठी वस्ती बनण्यास पंचाईत पडते, निदान फार विलंब लागतो. ह्या ठिकाणीं त्या संबंधानें आपल्या लक्षांत असें येतें कीं, परिस्थिति शेवटीं सांगितली तशी असल्यास वस्ती वाढणें हें जें राजकीय संकलनाचें पहिलें स्वरूप त्यासच तेणेंकरून प्रतिबंध होतो असें नाहीं, तर ज्यास्त संकलित अशा शासनसरणीच्या उत्पत्तीस देखील तेणेंकरून प्रतिरोध होतो. म्हणजे, जी परिस्थिति सामाजिक संकलनास प्रतिकूल होते, तीच राजकीय सत्तेच्या घनीभवनासही प्रतिकूल होते.

तथापि एथें ज्या सत्याचा आपणास विशेषतः विचार कर्तव्य आहे तें हें कीं, वरच्या दोन परिस्थितींपैकीं ही किंवा ती सारखी कायम राहिल्यानें असा एकस्वभावनमुना बनतो कीं, त्यास एकस्थ किंवा अनेकस्थ राजकीय व्यवस्था योग्य असते. ज्या प्रदेशांत एकाची स्वेच्छाचारी सत्ता उत्पन्न झाली आहे त्या प्रदेशांत पिढ्यानुपिढ्या राहिल्यानें त्या शासनपद्धतीला योग्य असा स्वभावनमुना उत्पन्न होतो; ह्याला एक कारण रो-

जची संवय हें होतें, आणि दुसरें कारण अशा शासन-पद्धतीखालीं राहण्यास अत्यन्त योग्य असेच लोक टिकाव धरून राहतात हें होतें. उलटपक्षीं, जो प्रदेश लहान समूहांना आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्यास अनुकूल असतो, तेथें पिढ्यानुपिढ्या नियंत्रणास प्रतिकूल असे मनोभाव बळकट होत जातात; आणि ह्यासही कारणें वरचींच दोन होतात.

अंतर आणि बाह्य कारणांच्या साध्या टोळ्यांमध्यें दिसणाऱ्या परिणामांचें अशा रीतीनें दिग्दर्शन केल्यामुळें ह्या टोळ्या अन्य प्रदेशीं जाऊन किंवा अन्य कारणांनीं जेव्हां मोठाले समाज बनण्यास अनुकूल अशा परिस्थितींत पडतात, तेव्हां त्यांची सहक्रिया कशी होते हें आपल्या लक्षांत येणार आहे.

५१. वर वर्णिल्यासारखें एक असुधारलेलें राष्ट्र असून, लहान लहान जमाव एकत्र होऊन मोठाले जमाव बनूं लागले म्हणजे काय होतें हें त्यांच्यांत आलीकडेच दिसून आलें आहे; म्हणून त्याचेंच उदाहरण प्रथम देणें इष्ट दिसतें. तें हें:—

इरॉक्वॉइस नामक राष्ट्रं, प्रत्येकीं पूर्वीं परस्परांशीं वैर करणाऱ्या अनेक टोळ्यांचीं बनलेलीं असून, त्यांना युरोपियन लोकांच्या स्वाऱ्यांपासून स्वसंरक्षण करावें लागलें. ह्या कामासाठीं त्या पांच (आणि अखेरीस सहा) राष्ट्रांना एकमेकांस मिळावें लागून त्यांस परस्परांचें बरोबरीचें नातें कबूल करणें भाग पडलें; कारण अमक्यांनीं अमक्यांच्या कह्यांत राहावें असें म्हटलें असतें तर तीं राष्ट्रं एकमेकांशीं मिळून वागण्यास कबूल झालीं न-

सतीं. म्हणून सर्वांचें मोठें कौंसिल जें बनविलें त्यांत त्या निरनिराळ्या राष्ट्रांचे कायमचे व वंशपरंपरा सभासद जरी कमज्यास्त होते, तरी सगळ्यांना मतदानाचा अधिकार सारखाच होता. ह्या सभेनें जरी कित्येक पिढ्या सारख्या लढाया चालविल्या तरी तिची घटना कायमच राहिली; म्हणजे, सर्वांत वरचढ असा एकादा सभासद त्यांच्यांत कधीं उत्पन्न झाला नाहीं. आणि त्या निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांच्या हातीं सरकारी अधिकार जरी मुळींच नसे, तरी त्या राष्ट्रांचें जें एकमेकांशीं बरोबरीचें नातें तें कायमच राहिलें.

प्राचीन इतिहासामध्यें जे संयुक्त मुख्य आपल्यास दृष्टीस पडतात त्यांची उत्पत्ति कशी झाली ह्याचा उलगडा करण्याचें साधन अशा रीतीनें आपल्या नजरेस येतें. एकाच समाजांत कांहीं संस्था स्वेच्छाचारी तऱ्हेच्या आणि कांहीं संस्था समतेच्या तत्त्वावर स्थापन केलेल्या म्हणून दिसणाऱ्या आणि अतएव स्वतंत्र संस्था म्हणून वाटणाऱ्या, एकत्र कशा उत्पन्न झाल्या हें यावरून आपल्या ध्यानांत येतें. अशा प्रकारच्या शासनसरण्या ज्या प्राचीन यूरोपस्थ लोकांत वृद्धिंगत झाल्या त्यांचा पूर्व इतिहास आपण लक्षांत आणूं या.

भटकण्याच्या अशा प्रारंभींच्या धनगरी स्थितींत एकाच नायकाला नमून राहणें हें लोकांच्या आंगवळणींच पडलेलें होतें. एकाद्या समूहापैकीं एकादा मनुष्य जर हट्टास आला तर त्याला एक त्या नायकास पुनः शरण जावें लागे, किंवा तो समूह सोडून, रानांत संरक्षणाविरहित असलें म्हणजे जीवितास जे धोके येतात, त्यांत

पडावें लागे. हा अंकितपणा स्थापन होण्यास आणखी एक कारण असें होई कीं ज्या समूहांत तें इतरांहून ज्यास्त असे, ते इतरांपेक्षां बहुधा ज्यास्त टिकाव धरीत; कारण समूहासमूहांत कलह माजले म्हणजे ज्या समूहांचे घटक आपल्या नायकास नमून वागणारे नसतील ते बहुधा लहान असल्यामुळें, आणि त्यांस सहक्रिया इतरांइतकी चांगली करतां न आल्यामुळें, ते नष्ट होण्याचा संभव ज्यास्त असे. पण अशा रीतीनें कुटुंबांतल्या कुटुंबांत किंवा टोळींतल्या टोळींत बापास किंवा ज्येष्ठशास्त्यास नमून राहण्याचा मनोविकार परिस्थितीवरून जसा वृद्धिंगत होई, तसाच टोळ्याटोळ्यांचे जे परस्परसंबंध त्यांच्या संबंधानें स्वातंत्र्याचा मनोभाव वृद्धिंगत होई. एका टोळीनें दुसरीवर सत्ता चालविणें त्यांच्या दूर दूर फांकणीमुळें आणि फार चपलतेमुळें दुर्धर होई; आणि इतर टोळ्यांच्या नियंत्रणाचा प्रतिकार किंवा टाळणी पिढ्यानुपिढ्या केल्यामुळें तशा नियंत्रणाबद्दल राग येणें आणि त्यास विरोध करणें हे मनोभाव बळकट होण्याचा संभव सहजच उत्पन्न होत असे.

अशा रीतीचा संस्कार ज्यांस प्राप्त झाला आहे असे समूह जेव्हां एकत्र होतात, तेव्हां त्यांनीं ह्या किंवा त्या प्रकारची राजकीय घटना स्वीकारावयाची, हें ते ज्या परिस्थितींत पडतील तिजवर अवलंबून राहतें, हें अगोदर ध्वनित केलेंच आहे. फार फार प्राचीन काळीं आपणास माहीत नाहीं अशा कारणांनीं मोंगल, सीमाइट आणि आर्यन या लोकांमध्यें जे भेद उत्पन्न झाले ते झाले नसते तरी, आणि पुष्कळ काळपर्यंत धनगरी स्थि-

तींत राहिल्यानें पूर्ण असें स्वभावसादृश्य त्यांजमध्यें उत्पन्न झालें असतें तरी, त्यांचे लहान लहान समुदाय एकत्र होऊन बनलेले जे मोठाले समाज, ते सारख्या परिस्थितींतच सारख्या नमुन्याचे बनले असते. मोंगल लोक जेथें स्थाईक होऊन वृद्धिंगत झाले आहेत, तेथें त्यांचे संयोग बनल्यावर त्यांस आपलें स्वातंत्र्य जें कायम राखतां आलें नाहीं, आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या संस्था ज्या उत्क्रान्त करतां आल्या नाहींत, त्यास कारण परिस्थितीची प्रतिकूलता हीच समजली पाहिजे. ज्या आर्यन लोकांमध्यें मुख्यत्वेंकरून कमी घनीभूत असे राजकीय शासनाचे प्रकार उत्पन्न झालेले आहेत, त्यांच्या उदाहरणावरून देखील असें दिसून येतें कीं, बहुतेक सर्व गोष्टी अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीवर अवलंबून असतात. हिंदूकुश आणि त्याच्या सभोंवतालचा प्रांत एथें ते असतांना जे मानसिक विशेष उत्पन्न झाले, ते त्या जातीच्या निरनिराळ्या भागांमध्यें जरी प्रारंभीं वंशपरंपरेनें आलेले होते, तरी त्यांच्यांत निरनिराळ्या संस्था आणि स्वभाव उत्पन्न झालेले आहेत. त्यांच्यापैकीं जे हिंदुस्थानच्या मैदानांतून पसरले ते आपलें स्वभावस्वातंत्र्य गमावून बसले, आणि त्यांच्या यूरोपियन बंधूंमध्यें अनुकूल परिस्थितींत जसल्या राजकीय शासनसरणी उत्पन्न झाल्या, तसल्या त्यांस उत्पन्न करतां आल्या नाहींत; कारण हिंदुस्थानदेश सुपीक असल्यामुळें तेथें त्यांची वृद्धि झाली, आणि त्यांचें नियंत्रण करण्यास भौतिक अडचणी फारशा नव्हत्या.

ह्या सगळ्याचा मथितार्थ असा निघतो कीं, जेथें पि-

तृशासनविशिष्ट नमुन्याचे लोकसमूह संख्यावृद्धीस अनुकूल पण सत्ताघनीभवनास प्रतिकूल अशा प्रदेशांत पडतात, तेथें संयुक्त राजकीय मुख्य उत्पन्न होतात, आणि कांहींकाळपावेतों आपल्यास कायम राखितात; आणि यास कारणें दोन होतात—एक स्थानिक समूहांचें स्वातंत्र्य, आणि दुसरें लढाईचे वेळीं सर्वांनीं एकत्र मिळण्याची आवश्यकता. याच्या कांहीं उदाहरणांचा आतां विचार करूं.

५२. क्रीटी बेटांत उंच डोंगरांतून पुष्कळ दऱ्या असून त्यांमध्यें गवत विपुल उगवतें, आणि किल्ले बांधण्यास तेथें पुष्कळ जागा आहेत; आणि तेथें जे त्यांचे मोडके भाग हल्लीं दृष्टीस पडतात त्यांवरून या अनुकूल परिस्थितीचा प्राचीन काळच्या तेथील लोकांनीं उपयोग केला होता असेंही दिसतें. ग्रीसच्या मुख्य भागाची स्थिति अशीच आहे. त्यामध्यें डोंगर फार व संकीर्ण असल्यामुळें त्याचे निरनिराळे भाग परस्परांपासून वेगळे झालेले आहेत, आणि तेथें जाण्यास मुष्कील पडते. त्या देशाचा दक्षिणभाग जो पिलॉपानीसिस त्याला, आणि त्यांतल्या त्यांत स्पार्टन लोक रहात असत त्या भागाला, ही गोष्ट विशेषतःच लागू आहे.

त्या देशांतील पूर्वींच्या लोकांवर हेलेनिक विजेत्यांच्या जेव्हां एकामागून एक लाटा आल्या, तेव्हां त्या लोकांनीं आर्यन लोकांचा सामान्य स्वभाव व संघटनानमुना बरोबर आणिला; त्या नमुन्यांत वर वर्णिलेले विशेष एकत्र दिसत होते. असल्या लोकांनीं असला प्रदेश आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें, त्या देशांतील डोंगरांचे ओळींमुळें त्याच्या जितक्या दऱ्या व प्रांत पडले होते,

तितक्या त्यांच्या सहजच कालान्तरानें स्वतंत्र टोळ्या बनल्या. ते एकमेकांपासून वियुक्त झाल्यामुळें एकमेकांपासून परकी झाले; आणि त्यामुळें त्यांच्यापैकीं जे एकमेकांपासून फार दूर होते ते एकमेकांचे शत्रू बनले. म्हणून प्रारंभीं प्रारंभीं ते एकमेकांवर इतके हल्ले करीत कीं तेथें लाविलेलीं झाडें देखील टिकत नसत. म्हणजे, हल्लीं नाग नांवाच्या हिंदुस्थानांतील डोंगरी टोळ्यांत जशी स्थिति दृष्टीस पडते, तशी त्यांच्यांत दृष्टीस पडे.

आतां आपण असा प्रश्न करूं कीं, एकाच मूळ वंशापासून निघून स्वतंत्र आणि परस्परांच्या शत्रू झालेल्या टोळ्यांवर जर अगदीं निराळ्या जातीचे किंवा फार दूरच्या संबंधाचे शत्रू एकदम चाल करून आले, तर ते काय करतील? बहुतकरून आपसांतील वैमनस्यें विसरून जाऊन ते स्वसंरक्षणासाठीं एकमेकांस मदत करतील.पण कोणत्या अटींवर ते अशा प्रकारचें सहकार्य करण्यास कबूल होतील? अर्थात् सर्वांच्या बरोबरीच्या नात्यानें तसें करण्यास ते कबूल होतील. कारण एकमेकींशीं मित्रत्वानें वागणाऱ्या टोळ्या देखील कोणाचें श्रेष्ठत्व कबूल करणार नाहींत; मग ह्या तर शत्रुत्वानें वागणाऱ्या. म्हणून सामान्यसंरक्षणाचें काम ह्या निरनिराळ्या टोळ्यांचे जे मुख्य त्यांचें एकमंडळ बनून तें आपल्या हातांत घेईल; आणि संरक्षणाचें हें काम लांबल्यास किंवा त्यास इतरांवर हल्ला करण्याच्या सहक्रियेचें स्वरूप आल्यास हें तत्पुरतें बनवलेलें मंडळ कायमचें होऊन जाईल, आणि तेणेंकरून ते सर्व लहान समाज एका धोरणानें वागूं लागतील. ह्या संयुक्तमुख्याचे (मंडळाचे) विशिष्ट गुणविशेष निरनिराळ्या

परिस्थितींत अर्थात् निरनिराळे असतील. निरनिराळ्या मुख्यांपैकीं एकजण प्राचीनकाळच्या पितृशास्त्याचा किंवा वीराचा प्रतिनिधि म्हणून जर दंतकथेवरून मानिला जात असेल, तर त्याला सर्वांत पहिली पदवी व थोडासा ज्यास्त अधिकार देण्यास इतर मुख्य कबूल होतील. बरें, ह्या गोष्टीबद्दल वाद असल्यास कांहीं नैसर्गिक श्रेष्ठता किंवा निवड यांवरून सगळ्यांचें अग्रणीत्व कोणीं करावें हें ठरेल. प्रत्येक टोळींत मुख्याचा अधिकार अनियंत्रित असल्यास ह्या मंडळाचा अधिकारही अनियंत्रित होईल; आणि ज्या मानानें टोळ्यांच्या मुख्यांचा अधिकार नियंत्रित असेल, त्या मानानें ह्या मंडळाचा अधिकार नियंत्रित होईल. आणि घटक-टोळ्यांपैकीं कोणत्याही टोळीच्या मुख्याचा अधिकार न मानणारे असे पुष्कळ परकी लोक त्या मंडळांत मिळालेले असतात, त्या मंडळाचा अधिकार ज्यास्तच नियंत्रित होईल.

ऐतिहासिक कालाच्या प्रारंभीं ग्रीक संस्थानांमध्यें ज्या संयुक्त नायक्या होत्या त्यांची उत्पत्ति अशाच रीतीनें झाली असली पाहिजे. उदाहरणार्थ, क्रीटी, कॉरिंथ, मेगारा आणि स्पार्टा या ठिकाणच्या नायक्यांची.

रोमकडे पाहतां हीच स्थिति दृष्टीस पडते. म्हणजे, तेथेंही लहान लहान अशा अनेक स्वतंत्र वस्त्यांचा जमाव असून ते जरी नात्यानें एकमेकांशीं संबद्ध होते तरी कांहीं अंशीं एकमेकांच्या विरुद्ध होते; आणि कोणी सामान्य शत्रु आला म्हणजे त्यांस कांहीं ठराविक अटींवर एकमेकांशीं मिळून वागावें लागत असे. प्रारंभीं ग्रीस देशांत हल्ल्यापेक्षां संरक्षणाचींच साधनें जशीं ज्यास्त

असत, तशीं प्रारंभींच्या रोममध्येंही असत. म्हणून एकेऱ्या कुटुंबांत आणि आप्तकुटुंबसमूहांत जुलमी सत्ता जरी सहजरीत्या चालवितां येई, तरी असल्या पुष्कळ समूहांवर तसली सत्ता चालविणें कठीण जाई; कारण त्यांनीं एकमेकांविरुद्ध बंदोबस्त केलेले असत. शिवाय एका सरकारच्या मुलखांतून दुसरीकडे पळून जाण्याची सवड असल्यामुळें सरकारच्या शासनाचा कडकपणा कमी होत असे. कारण कडकपणा फार असला म्हणजे लोक पळून जातात, आणि तेणेंकरून आपली टोळी दुर्बल होऊन शेजाऱ्याची सबळ होते हें सर्वांस ठाऊक असे. शहररूपी सरकाराच्या संरक्षणाकरितां सर्वांच्या सहक्रियेची जरूरी उत्पन्न होई तेव्हां त्याच्या निरनिराळ्या भागांतील टोळ्यांचे मुख्यांना वस्तुतः सारखे अधिकार प्राप्त होत असत. मूळचें सेनेट म्हटलें म्हणजे टोळ्यांतील वडील माणसांचा समुच्चय असे; आणि ह्या समुच्चयाच्या हातीं मुख्य शासनसत्ता असे; सारांश, तीं राजांची सभा असे. त्याबरोबरच प्रत्येक टोळीमधील कुटुंबांचे जे मुख्य त्यांची मिळून " नागरिकांची सभा " बनलेली असून त्यांचेही सर्वांचे अधिकार सारखे असत. मुख्यत्वेंकरून लढाईमध्यें आधिपत्य करण्याकरितां एक निवडलेला मुख्य असून तो मुख्य माजिस्ट्रेटही (राजा) असे. त्याच्या हातीं जरी काल्पनिक दैविक उत्पत्तीपासून प्राप्त होणारा अधिकार नसे, तरी त्याला देवाची पसंती आहे अशी कल्पना असेच; आणि तो स्वतः देवाचीं सर्व चिन्हें धारण करीत असून मरेपर्यंत देवासारखाच स्वेच्छाचारी अधि-

कार चालवीत असे. पण राजाची निवड प्रारंभीं सेनेटानें केलेली असून त्याची जागा एकाएकीं रिकामी पडल्यास ती वस्तुतः सेनेटानेंच भरावी लागत असे; आणि शिवाय पुढें राजा कोण व्हावयाचा हें जरी गादीवर असलेला राजा ठरवून ठेवी, तरी नागरिकांच्या सभेनें त्यानें नेमलेला राजा पसंत करणें जरूर असे; आणि दुसरी गोष्ट अशी कीं राजाचा अधिकार केवळ राज्यकारभार पाहण्यापुरताच असे. नागरिकांच्या सभेचा अधिकार त्याच्याहूनही कायद्यानें ज्यास्त असे. शिवाय नागरिक आणि राजा यांनीं मिळून ठरविलेल्या एखाद्या गोष्टीस " खो " घालण्याचा अधिकार सेनेटाकडे असे. एवंच रोमच्या शासनपद्धतीची घटना वस्तुतः कुटुंबाच्या मुख्यांच्या मंडळांत समाविष्ट झालेल्या टोळ्यांच्या मुख्यांच्या मंडळाची असे; म्हणजे, ती संयुक्त सत्ताधारकसंस्था असून राजा नसला म्हणजे तिचा अधिकार अबाधितच असे. एवंच राजाची सत्ता नष्ट झाल्यावर जें रोमन लोकसत्ताक राहिलें, तें आधुनिकलोकसत्ताकांपासून घटनेनें अगदीं भिन्न होतें. टोळ्यांच्या ज्या मुख्यांचें सेनेट बनलें होतें ते, आणि कुटुंबांच्या
ज्या मुख्यांचें सेनेट बनलें होतें ते, आणि कुटुंबांच्या
ज्या मुख्यांचें नागरिकमंडळ बनलें होतें ते, एकमेकांच्या अधिकाराबद्दल मत्सर करीत हें खरें आहे; आणि त्यांच्यामध्यें व आलीकडील स्वतंत्र देशांतील नागरिकांमध्यें तेवढ्यापुरतें साम्य होतें हेंही खरें आहे. पण हे मुख्य आपल्या कुटुंबांच्या आणि टोळ्यांच्या घटकांवर आणि आश्रितांवर अमर्यादित सत्ता चालवीत अ-

सत. तात्पर्य रोमन लोकसत्ताक म्हणजे लहाल लहान जुलमी मुख्यांचेंच एक मंडळ होतें. ह्या मुख्यांपाशीं गुलाम असून शिवाय ते आपल्या बायकापोरांचे जीव देखील घेऊं शकत इतका अनियंत्रित अधिकार त्यांचे हातीं असे. तेव्हां अशा लोकांच्या बनलेल्या संस्थांस स्वतंत्र संस्था म्हणावयाचें, म्हणजे अंतर्रचनेकडे न पाहतां केवळ बाह्य स्वरूपाच्या साम्यावरूनच गोंधळून जावयाचें, असें म्हटलें पाहिजे.

५३. यानंतरच्या काळांत संयुक्त राजकीय मुख्याच्या घटनेकडे पाहतां, ती बारीकसारीक प्रत्येक गोष्टींत नाहीं तरी ठोकळरीत्या ह्याच तऱ्हेनें झालेली आढळून येते. सर्वांना सारखी जरूरी उत्पन्न होऊन जेव्हां सहक्रिया करणें भाग पडतें तेव्हां ह्या किंवा त्या रीतीनें ही नायकी उत्पन्न होते; कारण सर्वांच्या स्वैच्छिक अनुमतीविना सहक्रियेचें दुसरें साधनच नसतें.

ह्याबद्दल प्रथम व्हेनिसचें उदाहरण घेतां प्रथमदर्शनीं असें दृष्टीस पडतें कीं, व्हेनिश्यन लोक ज्या मुलखांत रहात असत तो मुलख आड्रियातिक समुद्राच्या कांठीं नद्यांतून आलेल्या गाळाचा बनलेला असून त्याचे नद्या, ओहोळ, आणि पाणथळी ह्यांनीं अनेक भाग पडलेले होते. तात्पर्य, तेथें माहीतगाराखेरीज इतरांस जाण्याची मोठी मुष्कील पडे; म्हणून सीझर बादशाहा होई तोंपावेतों, रोमन लोकांनीं त्यांस जिंकण्याकरितां जरी पुष्कळ खटपटी केल्या, तरी त्यांनीं आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें होतें. पुढें खुद्द व्हेनिस शहराच्या लोकसत्ताकामध्यें हीच गोष्ट विशेष ठळक रीतीनें दिसून

आली. कारण ज्या लहान बेटांवर किंवा चिखलाच्या थरांवर व्हेनिस शहर वसलेलें आहे तेथें पूर्वींपासून खलाशी लोकांची वस्ती असे. ह्या प्रत्येक छोट्या बेटासभोंवतीं सारखें पाणी असल्यामुळें त्यास भीति नसे, आणि त्यामुळें दरवर्षीं निवडलेल्या लोकप्रतिनिधींचें त्यांचें स्वतंत्र सरकार सुरक्षित असे आणि ह्मण लोकांच्या स्वाऱ्या होऊन जेव्हां हजारों लोक तिकडे आश्रयाकरितां पळून गेले तेव्हांही हीं मूळ-सरकारें अस्तित्वांत असून त्यांनीं एक ओबडधोबड संयुक्त-सरकार बनवून आपलें अस्तित्व कायम राखिलें. आतां असें झालें तरी त्यांचे आपापसांत तंटे चालत असत हें सांगावयास नकोच. आणि पुढें जेव्हां एकीकडून लॉंबर्ड लोक आणि दुसरीकडून स्क्लाव्हॉनिक चांचेलोक यांनीं त्यांजवर हल्ले सुरू केले, तेव्हांच निरुपाय होऊन सरदार, उपाध्ये आणि नागरिक ह्यांच्या एका सभेनें सगळ्यांच्या सैन्याचें आधिपत्य करण्यास आणि आपसांतील बखेडे मोडण्यास एका ड्यूकाची किंवा डोजाची नेमणूक करून टाकिली. तो ड्यूक निरनिराळ्या छोट्या बेटांच्या मुख्य प्रतिनिधींहून श्रेष्ठ असून ह्या सभेच्या तेवढ्याच कह्यांत असे. एवंच एथें देखील हीच गोष्ट दृष्टीस पडते कीं; निरनिराळीं घटक-सरकारें आपापलें स्वातंत्र्य कायम राखण्यास अनुकूल अशा स्थितींत प्रथम असून, पुढें शत्रूविरुद्ध सर्वांनीं एकत्र होण्याची अनिवार्य जरूरी जेव्हां उत्पन्न झाली, तेव्हां त्यांनीं एकप्रकारची संयुक्त नायकी उत्पन्न केली, आणि अधिकाराचें घनीभवन करावयाचें हा जो लढाईचा साहजिक परिणाम तो झाला.

तरी, ही संयुक्त नायकी कोणत्या तरी रूपानें पुष्कळ काळपर्यंत कायम राहिली.

निराळ्या जातीच्या पण असलाच प्रदेश व्यापणाऱ्या दुसऱ्या एका लोकांमध्यें असलेच परिणाम झालेले पाहून, ह्या कार्यकारणसरणीबद्दल जर कांहीं संशय असले तर ते साफ निघून गेले पाहिजेत. ऱ्हाईन व शेजारच्या नद्या ह्यांनीं वाहून आणिलेल्या गाळाच्या अर्धवट पाणी व अर्धवट जमीन अशा क्षेत्रावर प्राचीनकाळीं विखरलेलीं कांहीं कुटुंबें रहात असत. अगदीं एकेऱ्या अशा वाळूच्या टेंकाडांवर, किंवा वाळूंच्या राशीवर उभारलेल्या झोंपड्यांमध्यें ते लोक रहात असल्यामुळें, ते त्यांच्या सभोंवतालच्या खाड्या, चिखलाचे बांध, आणि पाणथळी ह्यांमध्यें इतके सुरक्षित असत कीं, त्यांनीं रोमन लोकांकडून आपणास कधींही जिंकून घेतलें नाहीं. प्रथम ते लोक मासे धरून, आणि कोठें कोठें अल्पशी शेतकी करून, आपला निर्वाह करीत असत; पण पुढें ते खलाशी व व्यापारी लोक बनून कालान्तरानें समुद्रास बांध घालून त्यांनीं आपला देश वस्तीस ज्यास्त योग्य असा बनविला; आणि पुष्कळ काळपावेतों पूर्ण नाहीं तर अर्धवट स्वातंत्र्याचा तरी त्यांनीं उपभोग घेतला. पुढें जरी फ्राङ्क लोकांनीं त्यांच्यापैकीं अगदीं समुद्रकांठच्या लोकांवर स्वाऱ्या केल्या व त्यांस जिंकिलें, तरी त्यांनीं आपल्यावर जुलूम करूं नये म्हणून यांनीं राजकीय सभा स्थापन केल्या. इकडे त्यांच्यापैकीं जे फ्रिशियन लोक त्यांनाही जरी शेंकडो वर्षें विरोध केल्यावर शेवटीं फ्रेंचांस हार जावें लागलें आणि जरी

ते त्यांस थोडीशी खंडणी देत, तरी त्यांचें अंतःस्वातंत्र्य त्यांनीं कायमच राखिलें. त्यांनीं आपल्या समुद्रकांठच्या सात प्रांतांचें एक संयुक्तमंडळ बनविलें. त्या प्रांतांपैकीं प्रत्येक भागाचा कारभार निवडिलेले मुख्य व त्यांचें कौन्सिल ह्यांच्या ताब्यांत असून, सर्व राज्याचा कारभार एका सर्वसामान्य निवडलेल्या मुख्याच्या व कौन्सिलाच्या हातीं असे.

आधुनिक उदाहरणांकडे पाहतां डोंगराळ प्रदेशाचे परिणाम ज्यांमध्यें दिसतात तीं प्रथम सांगितलीं पाहिजेत. पैकीं स्वित्सर्लंदाचें उदाहरण मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या देशामध्यें आणि त्याच्या सभोंवतीं पाणथळी, खडक, बर्फाच्छादित प्रदेश आणि रानें असल्यामुळें, प्राचीन काळापासून धनगरांच्या टोळ्यांना तेथें आश्रय सांपडला. तेथें कोणास न समजतां त्यांना आपलीं गुरेंढोरें चारतां येत असत; आणि कोणीं लुटारू टोळ्यांनीं हल्ला केल्यास त्यांस आपलें संरक्षण सहज करतां येई. ह्या प्रांतांचेच शेवटीं कित्येक क्यान्टन किंवा इलाखे बनले, आणि प्रथम जरी त्यांची राजकीय घटना एकच होती, तरी शेवटीं लोकसंख्या वाढत गेली तशा तीन निरनिराळ्या घटना झाल्या; आणि अशा रीतीनें त्यांनीं पुष्कळ काळ पावेतों आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें. पुढें सर्व यूरोपभर जेव्हां फ्यूडल पद्धति पसरून सर्व लोक बादशहाच्या कह्यांत गेले, तेव्हां हेही त्याची नांवाची प्रजा बनले. पण त्यांच्यावर नेमिलेल्या अधिकाऱ्यांचे हुकूमास न जुमानून त्यांनीं एकमेकांत शपथपूर्वक दोस्ती केली, आणि बाह्य शत्रू आला म्ह-

णजे तिचा ते उपयोग करीत असत. सारांश, ह्या लोकांचीं जरी कित्येक स्वतंत्र राज्यें होतीं, तरी ते स्वसंरक्षणासाठीं एकत्र होत असत; आणि त्यांच्यांत आपसांत जरी वैमनस्यें असत, तरी ते तीं अशा वेळीं एकीकडे गुंडाळून ठेवीत. ह्या त्यांच्या दोस्तीस किंवा संयोगास त्याचें तत्पुरतें व अनिश्चित स्वरूप जाऊन जें नित्याचें व निश्चित स्वरूप आलें तें हळूहळूच आलें. ह्यासंबंधानें एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, वर सांगितलेल्या अनेक क्यान्टनांपैकीं जे कमी डोंगराळ होते त्यांना इतर क्यांटनांच्या इतक्या लवकर किंवा इतक्या पूर्णपणें स्वातंत्र्य प्राप्त झालें नाहीं; आणि दुसरी ही कीं, त्यांच्या अंतर्व्यवस्था कमी स्वतंत्रस्वरूपाच्या होत्या. उदाहरणार्थ, बर्न, लूसर्न आणि फ्रिबर्ग एथील सरदारविशिष्ट लोकसत्ताकें, आणि रानांतील इलाखे व ग्रिसन यांच्यांतील शुद्ध लोकसत्ताकें ह्यांच्यांत ठळक भेद दृष्टीस पडत असे. ह्या दुसऱ्या क्यान्टनांमध्यें प्रत्येक खेडें स्वतंत्र असून त्याचे स्वताचे कायदे, अधिकार व विशिष्ट हक्क असत; आणि कित्येक खेड्यांचा मिळून एक कम्यून किंवा संयुक्त तालुका, कित्येक कम्यूनांचे मिळून जिल्हे, आणि कित्येक जिल्ह्यांची मिळून लीग किंवा दोस्तमंडळ बनत असे.

स्वित्सर्लंदासारखेंच दुसरें उदाहरण म्हटलें म्हणजे सान्मारीनो नांवाच्या आणि नाइन पर्वतांतील छोट्या लोकसत्ताकाचें होय. त्याचें मुख्य राजधानीचें स्थान हजार फूट उंचीवरच्या खडकावर असून त्यानें आज पंधरा शतकेंपर्यंत आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें आहे.

तेथें आठ हजार लोकवस्ती असून त्यांचा कारभार साठ प्रतिनिधींचें सेनेट आणि प्रत्येक सहामाहीस निवडलेले क्यापटिन हे चालवीत असतात; आणि महत्त्वाच्या प्रसंगीं सगळ्या लोकांच्याच सभा बोलाविल्या जातात. तेथें कायमची फौज अठराजणांची आहे; कर बहुतेक मुळींच नाहींत, आणि हपीसरांना पगार म्हटला म्हणजे नोकरी करण्याचा जो मोठा मान तोच होय.

आतां वरच्यासारख्या भौतिक परिस्थितींत उत्पन्न होणाऱ्या संयुक्त नायक्यांमध्यें एक लक्षांत ठेवण्यासारखा भेद उत्पन्न होत असतो, त्याच्याकडे दुर्लक्ष करतां कामा नये; तो भेद त्या नायकीचें सरदारी स्वरूप आणि लौकिक स्वरूप ह्यांमधील होय. लष्करी सहक्रियेमुळें संयुक्त झालेल्या समूहांपैकीं प्रत्येक जर पितृशासनपद्धतीवर बनविलेला असेल, किंवा कल्पिलेल्या दैविक उत्पत्तीचीं माणसें त्यांचा कारभार करीत असतील, तर जो संयोग बनतो त्यांत सामान्य लोकांचें कांहींच अंग नसतें. पण आधुनिक उदाहरणांप्रमाणें जेथें पितृशास्त्याचा अधिकार नष्ट झाला असेल, किंवा राजांच्या दैविक उत्पत्तीवरील विश्वास उडालेला असेल, किंवा शांतता उत्पन्न झाल्यामुळें लढाईच्या वेळचा जुलमी कारभार सइलावला असेल,तेथें संयुक्तमुख्य म्हणजे छोट्या स्वेच्छाचारी राजांची सभा असत नाहीं; तर लोकांनीं नेमलेल्या प्रतिनिधींची असते.

५४. कायमच्या नाहीं तर तत्पुरत्या संयुक्त नायक्या उत्पन्न होण्यास आणखी कारणें होत असतात; तीं पूर्वींच्या व्यवस्था नष्ट होतेसमयीं जीं उत्पन्न होतात तीं होत. जे लोक पुष्कळ शतकेंपर्यंत स्वेच्छाचारी अमला-

ला रुळलेले असतात, आणि ज्यांचे मनोभाव त्या अमलाला योग्य असे बनलेले असतात, आणि ज्यांना दुसऱ्या एकाद्या शासनपद्धतीची कल्पनाच नसते, अशा लोकांत एक स्वेच्छाचारी राजा पदभ्रष्ट झाल्यास लागलाच दुसरा उत्पन्न होतो; किंवा एकादें मोठें स्वेच्छाचारी साम्राज्य विस्कळित झालें, तर त्याच्या निरनिराळ्या भागांत तसलेच छोटे स्वेच्छाचारी राजे उत्पन्न होतात. पण इतक्या नीचावस्थेस न पोंचलेल्या लोकांत एकटा मुख्य असलेल्या शासनपद्धती विस्कळित झाल्यास त्यांच्याऐवजीं संयुक्त मुख्य असलेल्या शासनसरण्या उत्पन्न होण्याचा संभव असतो.

याचें पहिलें उदाहरण म्हटलें म्हणजे इटालींतील लोकसत्ताकांचें देण्यासारखें आहे. जेव्हां नवव्या आणि दहाव्या शतकांत जर्मनीच्या बादशहांचा त्यांजवरील अंमल डळमळूं लागला, तेव्हां त्या देशांतील शहरांस आपापल्या राजकीय घटना उत्पन्न करणें शक्य झालें व आवश्यकही झालें. ह्या शहरांतून पूर्वींच्या रोमन बादशाहीच्या वेळच्या व्यवस्थेचे जरी कांहीं भाग अवशिष्ट होते, तरी ती व्यवस्था कामांतून गेलेली होती. म्हणून शहरांतील शस्त्र धरण्यास क्षम अशा लोकांच्या प्रसंगोपात सभा भरण्याचा प्रघात सुरू झाला; आणि त्यांस पुढें ज्यास्त नियमित स्वरूप येऊन त्यांपासून संयुक्त राजकीय नायक्यांची उत्पत्ति झाली.

कोणत्या तरी रीतीनें क्षीण किंवा दुर्बल झालेलें जुनें सरकार कोसळून खालीं आलें म्हणजे लढायांच्या किंवा अन्य मार्गांनीं अशा प्रकारची मूळची राजकीय घटना

तेथें उत्पन्न होते, हें आधुनिक अशीं जीं अमेरिकेचीं व फ्रान्साचीं उदाहरणें त्यांवरून देखील चांगलें व्यक्त होतें.

५५. मागच्या प्रकरणांत आपल्या असें नजरेस आलेंच आहे कीं, परिस्थिति असेल त्या मानानें "एकांत तीन" अशा राजकीय संघटनेचा जो पहिला घटक तो दुसऱ्या घटकापासून अनेक प्रमाणांनीं भिन्न स्वरूप होऊं शकतो; कारण तो प्रथम इतर योद्ध्यांहून अंमळसा श्रेष्ठ असा लढवय्या मुख्य असून अखेरीस दैविक व अनिर्बंध असा राजा होऊं शकतो; आणि मग त्याच्या खालच्या प्रतीचे जे थोडेसे निवडक सरदार त्यांपासून फारच भिन्न होऊन जातो. वरील उदाहरणांवरून आपल्या असें नजरेस येतें कीं, परिस्थिति असेल त्या मानानें दुसरा घटकही तिसऱ्यापासून अशाच रीतीनें अनेक प्रमाणांनीं भिन्नस्वरूप होऊं शकतो; म्हणजे कधीं कधीं तो तिसऱ्यापासून अत्यन्तच भिन्न असा दिसतो, आणि कधीं कधीं त्याच्यांत बहुतेक मिसळलेला दिसतो.

ह्या ठिकाणीं ह्यापुढेंच सांगण्यासारख्या एका सत्याशीं आपण येऊन भिडतों. तें सत्य हें कीं, संयुक्त नायक्यांना निरनिराळीं स्वरूपें येणें एवढेंच परिस्थितीवर अवलंबून असतें असें नाहीं, तर त्यांमध्यें निरनिराळे फेरबदल होणें हेंही त्याजवर अवलंबून असतें. अशा प्रकारच्या फेरबदलांचे दोन मुख्य प्रकार आहेत: ज्या फेरबदलांमुळें संयुक्तमुख्यास अल्पलोकघटित स्वरूप येतें तो प्रकार, आणि ज्यामुळें त्यास भूरिलोकघटित स्वरूप येतें तो प्रकार. या दोन प्रकारांकडे आपण आतां याच क्रमानें नजर फेंकूं या.

लढाया सारख्या होत राहिल्या म्हणजे संयुक्तमुख्य सारखा आकुंचित किंवा अल्पजनघटित होत जात असतो. ह्याबद्दल पहिलें उदाहरण स्पार्टाचें देण्यासारखें आहे. तेथें प्रसिद्ध कायदे करणाऱ्या लायकर्गसच्या कालानंतर एका शतकानें, मुख्य अधिकार थोडक्या लोकांच्या हातांत देण्याची प्रवृत्ति प्रथम आढळून येऊं लागली; कारण त्या वेळेस असा कायदा झाला कीं, लोकांनीं एकाद्या गोष्टीचा निकाल वांकडातिकडा केल्यास सेनेट व राजा यांनीं तो निकाल फिरवावा; आणि पुढें जेव्हां संपत्ति थोडक्यांच्याच हातांत आली, तेव्हां कायदे करण्यास हक्क असलेल्या नागरिकांची संख्या हळूहळू कमी होत गेली. अशा रीतीनें सरदारवर्गाची सत्ता हळूहळू वाढत गेली असली पाहिजे एवढेंच ध्वनित होत नाहीं तर त्या वर्गामध्यें देखील श्रीमान् सरदारांचें वजन वाढत गेलें असलें पाहिजे. रोमच्या राज्यामध्येंही सारख्या लढाया सुरू असून त्यासंबंधानें असें दृष्टीस पडतें कीं, तेथील सेनेट हें हळू हळू सरदारांचेंच मंडळ बनलें; आणि सेनेटचा एक सभासद मेला म्हणजे त्याच्या मागून त्याचा मुलगाच त्या जागीं येऊं लागला, व सेनेट आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं लागलें. नंतर कांहीं काळानें या सरदारांपैकीं कांहीं विशिष्ट घराण्यांनीं ती सत्ता आपल्या हातीं ओढून घेतली. इटालींतील लोकसत्ताकेंही नेहमीं एकमेकांशीं लढत असून त्यांच्यामध्येंही शास्तेमंडळ ह्याप्रमाणेंच आकुंचन पावत गेलें. सरदारांनीं आपले किल्ले सोडून शहरांची स्थानिक व्यवस्था हातीं घेण्यास सुरवात केली, आणि अशा रीतीनें

तो कारभार कांहीं श्रेष्ठ कुळांच्या हातीं गेला. नंतर कांहीं काळानें श्रीमान् असा व्यापारीवर्ग बनला तेव्हां त्या लोकांनीं ती सत्ता सरदारांच्या हातांतून हिसकावून घेतली, आणि तोच क्रम सुरू केला. म्हणजे विशेष श्रीमान् व्यापारी मंडळांनीं कमी श्रीमानांच्या हातून अधिकारी निवडण्याचा अधिकार काढून घेतला; विशेष हक्कदारवर्ग हळूहळू आकुंचित होऊं लागला; आणि नवीन उदयास आलेल्या कुटुंबांना जुनीं कुटुंबें अधिकार देत नाहींशीं झालीं. एवंच सिसमाँडी म्हणतो त्याप्रमाणें पंधराव्या शतकाच्या शेवटीं ह्या लोकसत्ताकांचा कारभार एकाच जातीच्या हातीं गेला; म्हणजे त्यांचा लोकसत्ताक कारभार नष्ट झाला. डच लोकांमध्यें असेंच झालें. तेथील शहरांच्या सरदारांशीं आणि आपापसांत ज्या लढाया झाल्या, त्यांमध्यें त्यांचीं जीं बरींचशीं लोकसत्ताक सरकारें तीं आकुंचित झालीं. मोठाल्या व्यापारी ज्ञातींनीं धाकटाल्यांना शास्त्यामंडळांतून काढून टाकिलें, आणि ते व्यापारी सरदारांप्रमाणें कारभार करूं लागले. स्वित्सर्लंडांतील बर्न, ल्यूसर्न, फ्रिबर्ग, इत्यादि जे क्यान्टन कमी डोंगराळ असल्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्यास कमी अनुकूल होते, त्यांनाही कमज्यास्त प्रमाणानें सरदारघटित अशाच राजकीय व्यवस्था प्राप्त झाल्या; आणि बर्नमध्यें तर सरदारांची सत्ता नेहमींच वरचढ असल्यामुळें, तेथील सर्व कारभार कांहीं विशिष्ट कुटुंबांच्या हातीं जाऊन तो तीं वंशपरंपरा चालवूं लागलीं.

संयुक्त नायक्यांमध्यें सारखे फेरबदल होत जाण्यास आणखी असें एक कारण होतें कीं, सरल मुख्यांप्रमाणें

हेही मुख्य आपल्या गुमास्त्यांच्या कह्यांत जावयाचा संभव असतो. याचें अगदीं प्राचीन उदाहरण म्हणजे स्पार्टाचें होय. त्या ठिकाणीं मागच्या रकान्यांत सांगितलेल्या परिणामाबरोबर हाही परिणाम झालेला दिसून येतो. तेथील ईफॉर (Ephor) नामक अधिकारी प्रथम लावून दिलेलीं कामें करण्यास नेमिलेले असून, पुढें त्यांनीं राजांस आपलें अंकित बनविलें, आणि शेवटीं सेनेटासही बनविलें; एतावता तेच वास्तविक शास्ते बनले. व्हेनिसमध्येंही असेंच झालें. तेथें पूर्वीं लोकांच्या हातीं असलेली सत्ता हळू हळू त्यांनीं नेमिलेल्या कामगारमंडळाच्या हातांत गेली; कारण ते कामगार पुनः पुनः नेमिले गेल्यामुळें, आणि त्यांच्या पश्चात् त्यांचे मुलगे त्या कामावर येऊं लागल्यामुळें, ते सरदारच बनले; शेवटीं त्यांचें एक दहाजणांचें कौन्सिल बनलें; आणि त्यास स्पार्टातील ईफॉर लोकांप्रमाणेंच कायद्यापेक्षांही उच्चतर असा अधिकार प्राप्त झाला, आणि एतावता तेच वास्तविक शास्ते बनले. फ्लारेन्समध्यें ज्या अनेक राजक्रान्त्या व घडामोडी झाल्या, त्यांचेंही एकंदर धोरण हेंच होतें. तेथें नेमलेले कारभारी राज्यव्यवस्था एकीकडे गुंडाळून ठेवून स्वताचेंच हित पाहूं लागले, आणि या गोष्टीस लोकांच्या सभेचीही संमति मिळवूं लागले; कारण तिच्या भोंवतीं ते सशस्त्र लोकांचा गराडा घालीत असत. सरतेशेवटीं कास्मोडिमोडिसाय (Cosmo de medici) हा जो मुख्य कारभारी तो जरी बाहेरून वरचेवर निवडिला जात असे तरी वास्तविक कायमचाच असल्यामुळें त्याच्या वंशांत नायकी कायमचीच स्थापन झाली.

पण संयुक्त राजकीय मुख्य आपल्या दिवाणी कारभाऱ्यांना वश होण्यापेक्षां तो आपल्या लष्करी कारभाऱ्यांचा अंकित होण्याचा संभव ज्यास्त असतो. उदाहरणार्थ, ग्रीक लोकांकडे पाहतां आपणास असें आढळून येतें कीं, ज्या जुलमी माणसांनीं तेथील सरदारी राज्यमंडळे उलथून टाकिलीं, त्यांच्या मदतीस सशस्त्र सैन्यें होतीं. हा जुलमी माणूस प्रथम राज्यकारभार पाहणारा म्याजिस्ट्रेट असून त्याला महत्त्वाचे अधिकार त्या सरदारमंडळांनींच स्वतः दिलेले असत, किंवा तो सामान्य लोकाग्रणी असून आपल्याला सशस्त्र संरक्षकांचें साहाय्य मिळविण्याकरितां लोकांच्या हिताची म्हणून तरफदारी करणारा असे; आणि तो जो अधिकार बळकावी तो सैन्याच्या मदतीनेंच बळकावी. आतां रोमकडे पाहतां तेथेंही हीच गोष्ट विजयी सेनापतीनें केलेली आढळून येते. कारण म्याकिआव्हेली असें म्हणतो कीं, एकादा मुख्य सेनापति पुष्कळ दिवसपर्यंत त्याच कामावर राहिला म्हणजे त्यास सैन्याला लांच देऊन आपल्याला इतकें वश करून घेतां येत असे कीं, तें (सैन्य) सेनेटला मुळींच जुमानीनासें होई, आणि त्या मुख्य सेनापतीच्या हुकुमाखेरीज दुसऱ्या कोणाचाच हुकूम मानीनासें होई. सिला आणि मेरियस यांना आपलीं सैन्यें बिघडवून स्वदेशाविरुद्ध जीं लढवितां आलीं त्याचें कारण हेंच होय; आणि ज्यूलियस सीझर रोममध्यें अगदीं स्वेच्छाचारी जो बनला तो ह्याच रीतीनें होय. इटालींतील लोकसत्ताकांकडे पाहतां तेथेंही असलीं पुष्कळ उदाहरणें आढळून येतात. उदाहरणार्थ, चवदाव्या शतका

च्या प्रारंभाला लॉंबर्डीमधील सगळीं लोकसत्ताकें कोणत्या तरी सरदारांना वश होऊन गेलेलीं होतीं; त्या सरदारांना त्यांनीं आपल्या फौजांचें आधिपत्य दिलेलें होतें. आणि त्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य त्यांनीं गमावून घेतलें. याच्या पुढेंही असलीं उदाहरणें सांपडतातच. उदाहरणार्थ, इंग्लंदात क्रॉमवेलानें विजयी सेनापति स्वेच्छाचारी राजा कसा बनतो हें निदर्शनास आणून दिलें. नेंदर्लंदांत व्हन आर्टाव्हेल्ड नांवाच्या पितापुत्रांनीं आणि पुनः नॉसा येथील मॉरिसानें हीच गोष्ट प्रत्ययास आणून दिली. नेपोलियनचें उदाहरण तर सर्वश्रुतच आहे. ह्या ठिकाणीं हें सांगणें इष्ट दिसतें कीं, सेनापति मुख्यसत्ता जी बळकावूं शकतो ती केवळ सैन्याच्या आधारानें बळकावूं शकतो असें नाहीं, तर लढाईत यशस्वी झाल्यानें त्याला जी लोकप्रियता प्राप्त होते तिच्या योगानें देखील तो तसें करूं शकतो. उदाहरणार्थ, कांहीं वर्षांपूर्वीं स्वतःचा पूर्वींचा अनुभव आणि इतर देशांचा अनुभव यांस एकीकडे गुंडाळून ठेवून फ्रेंचांनीं मार्शल म्याक मेहॉब यास आपल्या लोकसत्ताकाचा प्रेसिडेंट किंवा अध्यक्ष नेमिलें होतें; आणि अमेरिकन लोकांनीं जनरल ग्रांट यास जें एकाहून अधिक वेळां आपला प्रेसिडेंट निवडिलें त्यावरून असें स्पष्ट झालें कीं, त्यांचा समाज जरी उद्यमशील आहे, तरी यादवीयुद्धामुळें युद्धविषयक जी चळवळ त्यांजमध्यें उत्पन्न झाली, तेणेंकरून त्यांचा झोंका युद्धशीलतेकडे थोडासा गेलाच; कारण दिवाणी नायकी आणि लष्करी नायकी एकाचकडे देणें हें युद्धशीलतेचें एक मुख्य चिन्ह आहे.

संयुक्त राजकीय नायक्या आकुंचित करणाऱ्या कारणांचा एथवर विचार केला; आतां त्या विस्तृत करणाऱ्या कारणांचा करूं. यासंबंधानें आथेन्सचें उदाहरण, अर्थात्, प्रथम सांगितलें पाहिजे. तें समजण्यासाठीं प्रथम ही गोष्ट आपण लक्षांत आणिली पाहिजे कीं, सोलनच्या काळापावेतों लोकसत्ताक राज्यव्यवस्था ग्रीस देशांत मुळींच नव्हती. तोंपावेतों एकछत्री आणि सरदारवर्गनिहित अशा दोनच प्रकारच्या राज्यव्यवस्था तेथें होत्या. म्हणून आथेन्समध्यें लोकसत्ताक राज्यव्यवस्था कांहीं पूर्वनिश्चित कल्पनेच्या धोरणानें उत्पन्न झाली ही समजूत आपण बाजूस ठेविली पाहिजे. दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, वरील काळीं सरदारी व्यवस्था आथेन्समध्यें असल्यामुळें सोलननें केलेल्या कायद्यांनीं एवढीच सुधारणा केली कीं, ती व्यवस्था अमळ विस्तृत केली, आणि धडधडीत अन्यायाच्या गोष्टी नाहींशा केल्या. सोलननें जी नवी व्यवस्था सुरू केली ती अमलांत येण्याचीं कारणें पाहूं लागल्यास व्यापारधंद्याच्या वृद्धीचे जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम त्यांमध्यें तीं आढळून येतात. लहानपणीं सोलन स्वतः व्यापारी होता; आणि त्यानें आपल्या कायद्यांनीं आथेन्समध्यें व्यापारी व कारागीर ह्यांच्यासाठीं एका विशिष्ट गृहाची योजना केली, आणि शहरवासी प्रजेला पहिलें उत्तेजन दिलें. आटिकाप्रांतांत सुरक्षितपणा ज्यास्त असल्यामुळें बाहेरून तेथें जे लोक येऊन राहूं लागले त्यांनीं शेतीचा धंदा न करितां कारागिरीचा करावा अशी त्याची इच्छा होती; कारण तेथील

जमीन फारशी सुपीक नव्हती. याचा एक परिणाम असा झाला कीं, लोकांचा खेड्यांतून राहण्याचा कल कमी होऊन शहरांत राहण्याचा वाढला, आणि दुसरा असा झाला कीं पितृशासनपद्धतीनें न राहणाऱ्या लोकांची संख्या वाढत चालली. तद्वतच वरच्या लोकवर्गांत प्रवेश होण्याला जो कुलाचा गुण लागत असे त्याचेऐवजीं त्यानें संपत्तीचा गुण अमलांत आणिला; येणेंकरून व्यापार करून किंवा अन्य मार्गांनीं जे श्रीमान् होतील त्यांचा सरदारवर्गांत प्रवेश होऊं लागला, आणि अशा रीतीनें सरदारी राज्यव्यवस्था आकुंचित होती ती रुंदावली. शिवाय, कर्जदार लोकांनीं स्वतास गुलाम करून घेण्याची चाल त्यानें बंद केली, आणि पूर्वीं तसे गुलाम झालेले होते त्यांस पुनः स्वतंत्र नागरिक बनविलें; अशा रीतीनें गुलामांचा वर्ग आकुंचित होऊन स्वतंत्र नागरिकांचा विस्तृत झाला. कर्जाऊ दिलेल्या रकमांचें व्याज घेऊं नये अशी जी मनाई होती ती त्यानें काढून टाकिली, आणि त्यामुळें लोक व्यापारासाठीं लोकांस पैसे कर्जाऊ देऊं लागले, आणि तेणेंकरून व्यापारास उत्तेजन मिळालें. शिवाय शहरांतील लोकसंख्या अशा रीतीनें वाढल्यामुळें त्यांच्यांतील सहाक्रिया वाढली; आणि दररोज व्यापारासंबंधानें केलेले ठराव स्वतः पाळावयाचे आणि लोकांस पाळावयास लावावयाचें, अशी त्या लोकांस संवय लागल्यामुळें इतरांचे हक्क कबूल करणें आणि आपले संभाळून धरणें ह्या गोष्टी ते शिकले आणि अशा रीतीनें त्यांची शीलसुधारणा होऊन गेली. ही सुधारणा स्वतः सोलनमध्येंच दिसून

आली; कारण त्याचें वजन जेव्हां फार वाढलें, तेव्हां त्याला स्वेच्छाचारी राजा करण्यास लोक तयार झाले; पण ती गोष्ट त्यानें साफ नाकारिली; आणि उतारवयां; त असली सत्ता स्थापन करणारास विरोध करण्याच्यां कामीं त्यानें आपले प्राण देखील गमाविले. एवंच व्यापारविषयक चळवळ वाढल्यामुळें मूळची सरदारी राज्यव्यवस्था अनेक तऱ्हांनीं विस्तृत किंवा बहुजननिहित झाली; आणि हेंच पुढें पुष्कळ काळानें आथेन्समध्यें लोकसत्ताकाची स्थापना होण्यास एक कारण झालें.

हींच कारणें कांहीं अंशीं रोममधील सरदारी राज्यव्यवस्था उदारतर करण्यास कारणभूत झालीं. रोम व इतालींतील अन्य शहरें ह्यांमध्यें जो एवढा फरक पडला त्यास कारण रोम एथील व्यापार हें होय; कारण रोम हें त्या देशांतील सर्व व्यापाराचें अग्रस्थान होतें. शिवाय, आथेन्सप्रमाणें तेथेंही व्यापारामुळें तितके नाहींत तरी बरेच लोक बाहेरून रहावयास आले; आणि ते व मुक्त झालेले गुलाम, वगैरे मिळून तेथील कारागीरवर्ग बनला; आणि त्यांना शेवटीं नागरिकवर्गामध्यें समाविष्ट केल्यामुळें, सर्व्हियस ट्युलियसच्या वेळीं राज्यपद्धतीस जें विस्तृत स्वरूप आलें, त्यास तो वर्ग कारण झाला.

याच्यानंतरचीं जीं इटालियन लोकसत्ताकें त्यांच्यामध्यें देखील व्यापारी चळवळ आणि ज्यास्त लोकांचा राज्यकारभारांत समावेश, ह्या दोहोंचा संबंध दृग्गोचर होतो. कारण तेथेंही शहरांतून उद्योगधंद्याची भरभराट असे. उदाहरणार्थ, जिनोआ, पीसा, फ्लारेन्स, व्हेनिस एथूनच पूर्वेकडील भूमध्यसमुद्रामधील जिनसांचा पुरव-

ठा यूरोपखंडास होत असे. लॉंबर्डीमध्यें मोठमोठ्या सावकारांच्या पेढ्या असून तेथूनच यूरोपांतील इतर लोक स्वदेशीं ती विद्या घेऊन गेले. लोखंड, पोलाद, रेशीम, कांच, दागिने, वगैरे तयार करण्याच्या कला इतर यूरोपस्थ लोक इतालियन कारागिरांपासूनच शिकले. आतां त्यांच्या इतिहासाकडे पाहतां असें दिसतें कीं त्यांच्या राजकीय संघटना कारागिरांच्या मंडळांच्या पायावरच रचलेल्या होत्या. कांहीं ठिकाणीं सरदार लोकांना वगळून वरचे व्यापारी वर्ग शास्ते बनलेले होते; आणि बाहेरच्या लढाया आणि आपसांतील तंटे यांचा कल जरी नेहमीं स्वेच्छाचारी सत्ता स्थापन करण्याकडे असे, तरी कधीं कधीं उद्योगधंदेवाल्या वर्गांचीं जीं बंडें होत त्यांचा कल लोकांची सत्ता पुनः स्थापन करण्याकडे असे.

नेदर्लंदांत आणि हान्स शहरांमध्यें जे असेच संबंध दृष्टीस पडतात ते ध्यानांत आणिले, खुद्द इंग्लंदांत उद्यमशीलतेच्या वृद्धीबरोबरच तेथील राजकीयसंस्थाही ज्यास्त ज्यास्त लोकायत झाल्या आहेत हें लक्षांत घेतलें, आणि ह्या फेरबदलांना खेड्यांपेक्षां शहरें, आणि लहानसहान उद्यमस्थानांपेक्षां मोठालीं उद्यमस्थानें ज्यास्त कारणीभूत झालीं आहेत ही गोष्ट ध्यानांत आणिली, म्हणजे असें स्पष्ट होतें कीं लष्करी चळवळ वाढली म्हणजे जरी संयुक्त नायक्या आकुंचित होतात, तरी ज्या मानानें औद्योगिक चळवळी प्रबल होत जातील त्या मानानें त्या विस्तृत होत जातात.

५६. गत प्रकरणांतून स्थापन झालेल्या सिद्धान्तांप्रमाणें ह्या प्रकरणांत स्थापन झालेल्या सिद्धान्तांवरून-

ही असें स्पष्ट होतें कीं, राजकीय घटनेचे नमुने हे कोणी मुद्दाम निवडून बनवीत नसतो. समाजांच्या संबंधानें सामान्यतः असें म्हणत असतात कीं, समाजांनीं प्रथम कोणती राज्यशासनपद्धति घ्यावयाची हें ठरवून मागून ती अमलांत आणिलेली असते. ग्रीसचा इतिहास लिहिणारा **ग्रोट** साहेब ह्यानें प्राचीन ग्रीस व मध्यकालीन यूरोप यांच्यांतील संस्थांमध्यें केलेल्या तुलनेंत असें ध्वनित केलें आहे कीं, अमुक एक व्यवस्था फायदेशीर किंवा गैरफायदेशीर अशी जी तिच्याबद्दलची कल्पना तिच्या जोरावरच ती ग्रीसदेशांत स्थापन झाली व संभाळली गेली. पण पूर्वींच्या रकान्यांतून गोळा केलेल्या गोष्टींवरून असें दिसतें कीं, साध्या राजकीय नायक्यांप्रमाणें संयुक्त राजकीय नायक्यांचीही उत्पत्ति परिस्थितीवरून ठरत असते, आणि माणसांनीं मनांत धरिलेल्या उद्देशांवरून नव्हे. असो. आतां प्रस्तुत प्रकरणाची गोळाबेरीज काय येते तें पाहूं.

शीलाचें स्वातंत्र्य हें एक कारण आहे ही गोष्ट ध्यानांत आणून, पण हें स्वातंत्र्य जो प्रदेश नियंत्रण टाळण्यास अनुकूल असेल त्या ठिकाणीं पुष्कळ दिवस राहिल्यानें उत्पन्न होतें ही गोष्ट ध्यानांत घेऊन, आपण असें लक्षांत आणिलें कीं, अशा परिस्थितींत असा स्वभाव असला म्हणजे, लढाईंत अनेक समूहांची सहक्रिया झाल्यानें त्यांचा सारख्या अटींवर संयोग बनत असतो; आणि त्या समूहांचे मुख्य चालक सभा बनविण्यासाठीं एकत्र जमत असतात. आणि ज्या मानानें संयुक्त समूहांचा कारभार कमज्यास्त स्वेच्छाचारी असेल त्या

मानानें तें चालककौन्सिल कमज्यास्त सरदारी स्वरूपाचें बनत असतें. प्रस्तुत प्रकरणांत आपल्या दृष्टीस असें पडलें कीं, डोंगराळ प्रदेश, पाणथळी किंवा चिखली बेटें आणि जंगलें, असल्या परस्परांहून फार भिन्न अशा मुलखांतून निरनिराळ्या जातींच्या लोकांनीं असल्या संयुक्त प्रकारचे राजकीय मुख्य उत्पन्न केलेले आहेत. आणि हे सर्व मुलख इतर बाबतींत जरी परस्परांहून इतके भिन्न आहेत, तरी त्यांचे भाग तेथें जाण्यास दुर्घट आहेत. या बाबतींत ते परस्परसदृश आहेत ही गोष्ट लक्षांत आणतां असें स्पष्ट होतें कीं, त्यांतील रहिवासी ज्या सरकारसरणीखालीं एकत्र होतात, ती सरणी मुख्यत्वेंकरून ह्या कारणावरून बनलेली आहे.

अनुकूल ठिकाणीं आपोआप उत्पन्न होणाऱ्या संयुक्त राजकीय नायक्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कांहीं तसल्या नायक्या, पूर्वींच्या राजकीय घटना मोडूं लागल्या म्हणजे उत्पन्न होत असतात. तेथें लोक एकाद्या मोठ्या प्रदेशांत पसरलेले नसून एकाद्या शहरांतच एकत्र गोळा झालेले असतील, आणि म्हणून जेथें त्या सर्वांस प्रत्यक्ष एकत्र जमतां येत असेल, तेथें ह्या नायक्या उत्पन्न होण्याचा संभव ज्यास्त असतो. अशा ठिकाणीं सर्व प्रकारचें नियंत्रण नाहींसें झाल्यामुळें असें होतें कीं, सर्वांच्या इच्छेस पाहिजे तें करण्याची मुभा सांपडते, आणि मग पहिल्या मानानें ज्या लोकायत स्वरूपानें सर्वच प्रकारच्या सरकारांना सुरवात होत असते तें कांहीं कालपर्यंत स्थापन होतें; पण नियमित किंवा अनियमित रीतीनें तेथील थोडेसे श्रेष्ठजण बहुजनांहून

ज्यास्त प्रबल होतात; आणि ह्या प्रबल लोकांपैकीं कोणीतरी एकजण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या अत्यंत प्रबल बनतो.

कालांतरानें संयुक्त नायक्या ज्यास्त आकुंचित किंवा ज्यास्त विस्तृत बहुधा होत असतात. युद्धशीलतेनें त्या आकुंचित होतात, कारण तिचा कल नेहमीं मुख्य सूत्रधारित्व थोडक्यांच्या हातांत देण्याचा असतो; आणि ती जर चालू राहिली तर त्यांस ती बहुतेक निश्चितपणानें सरळ नायक्यांचें स्वरूप आणून देत असते. उलट पक्षीं, उद्यमशीलतेनें त्या विस्तृत होतात. ही उद्यमशीलता पितृशासन, फ्यूडल पद्धति, वगैरेच्या बंधनापासून मुक्त अशा परकी लोकांस एकत्र जमवून, नियंत्रण करणारांपेक्षां नियंत्रितांची संख्या वाढवून, ह्या ज्यास्त संख्येस संगत-क्रिया करतां येईल अशा अनुकूल स्थितींत ठेवून, दररोज जबरीनें अमलांत येणाऱ्या आज्ञाधारकत्वाच्या ऐवजीं, स्वेच्छेनें अंगावर घेतलेल्या गोष्टी दररोज करावयास लावून आणि दुसऱ्यांच्या हक्कांची दररोज बजावणी करून, नागरिकांचे समानहक्क स्थापन करण्याकडे आपला कल नेहमीं राखीत असते.

प्रकरण आठवें

सल्लामसलतगार मंडळें

५७. मूळच्या " एकांत तीन " अशा राजकीय घटनेच्या दोन भागांचा गेल्या दोन प्रकरणांत पृथक् पृथक विचार केला आहे; अथवा, अगदीं वास्तविक रीत्या बोलावयाचें असल्यास, पहिल्याचा विचार दुसऱ्यापासून स्वतंत्ररीत्या, आणि दुसऱ्याचा पहिल्यापासून स्वतंत्ररीत्या केला आहे; आणि जातां जातां तिसऱ्याशीं त्याचे जे संबंध त्यांचा उल्लेख केला आहे. ह्या ठिकाणीं आपणास त्या दोहोंचा (पहिल्या व दुसऱ्या भागाचा) एकत्र विचार करणें आहे. इतरांहून फारच अल्पप्रमाणानें श्रेष्ठ अशा नायकापासून, कांहीं विशिष्ट परिस्थितींत स्वेच्छाचारी शास्ता कसा उत्क्रान्त होतो, आणि तो निवडक थोडे आणि इतर पुष्कळ, यांस पूर्णपणें आपले अंकित कसे बनवितो, ह्याचें अवलोकन करण्याच्या ऐवजीं, आणि दुसऱ्या कांहीं परिस्थितींत निवडक थोड्यांची सरदारी राज्यव्यवस्था कशी बनते आणि ते कोणाही माणसास सर्वांत श्रेष्ठ बनावयास न देतां जनसमूहास आपल्या वचकांत कसें राखितात हें ध्यानांत आणण्याच्या ऐवजीं, आपणास एथें ज्या उदाहरणांमध्यें पहिला व दुसरा भाग ह्यांमध्यें सहक्रिया उत्पन्न होते त्यांचा विचार करणें आहे.

नायकी स्थाईक झाल्यानंतर नायकास पुढारी माणसांच्या सल्ल्यानें वागण्यास अनेक कारणें होत असतात.

त्यांस सुप्रसन्न ठेवणें आवश्यक असतें; त्यांचा सल्ला आणि आपखुशीची मदत हीं मिळविणें जरूरीचें असतें; आणि त्यांच्या अंगावर कांहीं जबाबदारी टाकणें इष्ट असते. ह्यामुळें सल्लामसलतगार मंडळाची उत्पत्ति होते. सामोआ बेटांत गांवचा मुख्य आणि कुटुंबाचे मुख्य यांचें मिळून तेथील कायदे करणारें मंडळ बनलेलें असे, आणि अद्यापिही बनलेलें आहे. फुल्ला लोकांत कांहीं महत्त्वाचीं गोष्ट करण्याच्या पूर्वीं किंवा लढाईस जावयाचें ठरविण्यापूर्वीं राजास मल्लम आणि मुख्य लोक यांचें कौन्सिल भरावें लागतें. माण्डिगो संस्थानांबद्दल आपण असें वाचितों कीं सर्व महत्त्वाच्या कामांत तेथील राजा मुख्य लोकांचें कौन्सिल भरवीत असतो, आणि त्यांच्या सल्लयानें वागतो. आणि अशीं उदाहरणें पाहिजेत तितकीं देतां येतील.

या संस्थेचें खरें अंतःस्वरूप आपल्या लक्षांत यावें आणि तें उत्क्रान्त होईल तसें त्यास जें विशेषस्वरूप येतें तें कां येतें हें आपल्यास कळावें, यासाठीं आणखी एकदां आपणास मूळाकडे वळलें पाहिजे.

५८. सर्व काळच्या पुष्कळ प्रकारच्या लोकांकडून येणाऱ्या पुराव्यावरून असें दिसतें कीं, आरंभीं सल्लामसलतगार मंडळ म्हणजे केवळ युद्धसंबंधी कौन्सिल असते. जी विचारक्रिया मागाहून इतर कामांच्या संबंधानें सुरू होते, ती प्रथम लोकाग्रणींचा समूह लष्करी गोष्टींच्या संबंधानें करतांना दिसून येतो; आणि त्या समूहाच्या विचारास ज्यास्त व्यापक स्वरूप येऊन

पुष्कळ काळ लोटल्यानंतरही ह्या त्याच्या मूळ उत्पत्तीच्या खाणाखुणा दिसत असतात.

रोममध्यें राजा विशेषतः सेनापति असून सेनेटचे सभासद, निरनिराळ्या टोळ्यांचे किंवा जमातीचे मुख्य म्हणून, प्रारंभीं युद्धाग्रणीही असत; आणि म्हणून नागरिकांना एकत्र जमविलें म्हणजे त्यांस "भालेवाले लोकहो" अशा रीतीनें संबोधीत असत; म्हणजे काय, तर, प्रारंभीं लढाईचें कौन्सिल भरे तेव्हां ते श्रोते म्हणून जमले म्हणजे त्यांस जें संबोधन लावीत तेंच मागून कायम राहिलें होतें. पुढें, इटालीमध्यें जेव्हां लहान लहान लोकसत्ताकें उत्पन्न झालीं, तेव्हां तेथेंही असेंच असे. एक मोठी घंटा वाजवून सर्वांच्या संरक्षणाकरितां काय करावयाचें हें ठरवण्यासाठीं जी नागरिकांची सभा जमत असे, तिचें वर्णन करतांना सिसमाँडी असें म्हणतो कीं, शस्त्र धारण करण्यास समर्थ अशा लोकांच्या या सभेस पार्लमेंट म्हणत असत. पोल लोकांमध्यें प्राचीन काळीं जे मेळे जमत त्यांसंबंधानें आपण असें वाचितोंः—सेनेटची स्थापना होण्यापूर्वीं, आणि राजांची सत्ता मर्यादित असे तेव्हां असल्या प्रकारचे जमाव वरचेवर भरत असत, आणि त्यांत शस्त्र धरणारे तेवढे सर्व हजर असत; आणि पुढें, राजा नसेल तेव्हां, याप्रमाणेंच सशस्त्र सरदारांची सभा भरत असे. हंगारीमध्यें असेंच असे, आणि मूळच्या जर्मन लोकांबद्दल स्टब्स् असें म्हणतो कीं,त्यांचे श्रेष्ठ राष्ट्रीय कौन्सिल म्हटलें म्हणजे सशस्त्र राष्ट्र हेंच असे. अजून देखील कांहीं ठिकाणीं असल्या सभांमध्यें लोक सशस्त्र येत असतात.

आतां कोणी कदाचित् असें म्हणेल कीं, प्रारंभींच्या अस्थाईक काळीं प्रत्येक माणसानें सशस्त्र असणें हें त्याच्या स्वताच्या संरक्षणासाठीं आवश्यकच असे; आणि जेथें सभा जमावयाचें ठिकाण त्याच्या घरापासून दूर असेल, तेथें तर विशेषच आवश्यक असे. पण सभेस सशस्त्र जाणें ह्यास हें एक कारण असे हें जरी खरें आहे तरी तेवढेंच कारण बस्स नव्हतें. कारण प्राचीन स्कांडिनेव्हियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्या राष्ट्रीय सभेस जाण्यास शस्त्र धारण करण्यास समर्थ अशा सर्व लोकांस जरी मुभा असे, तरी स्वतः राजा देखील सभेस सशस्त्र जात नसे.

पण सल्लामसलतगार मंडळाचा उद्भम लढाईच्या कौंसिलापासून झाला, आणि त्यावरून त्या मंडळाची ठोकळच रचना ठरली, असें म्हणण्यास ह्याशिवायही आणखी पुरावा आहे. सर्वांनीं मिळून विचार करण्याच्या पद्धतीस जी प्रथम सुरवात झाली, ती शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याच्या आवश्यकतेवरूनच सर्वत्र झाली. बाकीच्या कामांसाठीं एकेकट्यानें किंवा थोडक्या लोकांनीं मिळून कोणतीही गोष्ट केल्यानें भागण्याचा संभव असे; पण सर्वांच्या सुरक्षिततेसाठीं सगळ्या जमावानें किंवा टोळीनें मिळून कोणतीही गोष्ट करणें आवश्यक असे; आणि असली सहक्रिया साधणें हाच राजकीय संमेलनाचा मूळ हेतु असला पाहिजे. शिवाय प्रारंभींच्या संमेलनांच्या कांहीं घटनाविशेषांकडे पाहतां, लढाईच्या कौन्सिलांपासूनच त्यांची प्रथम उत्पत्ति झाली असावी असें दिसतें. एकाद्या टोळींतील प्रमुख लोक इतरांच्या देखत लष्करी

उपायाचा विचार करूं लागले म्हणजे काय झालें पाहिजे असा आपण प्रश्न केल्यास त्यास असें उत्तर मिळतें कीं, एक अशी राजकीय घटना उत्पन्न झाली नाहीं तोंपावेतों, जी गोष्ट करावयाची म्हणून ठरविली असेल ती करावयास लागण्यापूर्वीं तिला सर्वांची संमति घेतलीच पाहिजे; आणि पुष्कळ टोळ्या एकत्र झाल्या असतील तेथेंही असेंच झालें पाहिजे. उदाहरणार्थ, टार्टार लोकांच्या टोळ्यांतील मुख्यांच्या आणि त्यांच्या परिवारांच्या सभांसंबंधानें गिबन असें म्हणतो कीं, राजा जेव्हां त्यांचा कसा काय जोम आहे हें पाहण्यासाठीं त्यांची पाहणी करी, तेव्हा त्यांचा मानस कसा काय आहे हेंही तो अवश्य विचारी. शिवाय असल्या स्थितींत शास्त्या थोड्यांना शासित पुष्कळांवर आपली इच्छा जबरीनें लादतां आली तरी तसें करणें अदूरदर्शिपणाचें होईल; कारण लढाईंत येणाऱ्या जयास मतभेदानें धोका येईल. म्हणून मुख्यांच्या कौन्सिलानें जी गोष्ट करण्याचें ठरविलें आहे तीस तुमची संमति आहे काय असें जमलेल्या योद्ध्यांस विचारण्याचा प्रघात सुरू होईल. असली पद्धति सर्वच गोष्टींच्यासंबंधानें रोममध्यें प्रारंभीं सुरू झालेली होती. शिवाय असल्या प्रश्नास ' होय ' किंवा ' नाहीं ' एवढेंच संक्षिप्त उत्तर द्यावयाचें असे; आणि तेंही स्वाभाविकच होतें. स्पार्टन लोकांमध्येंही असाच निर्बंध असे. तेथें सेनेट आणि समानाधिकारी राजे यांव्यतिरिक्त " इक्लिसिया " किंवा नागरिकांची सार्वजनिक सभा असून तिच्यापुढें ठेविलेले ठराव पसंत किंवा

नापसंत करण्याची तेवढीच तीस परवानगी असे, त्यां-वर वाद करण्याची नसे.

एवंच राजकीय गोष्टींचा कित्येकांनीं मिळून विचार करण्याच्या पद्धतीस लढाईपासून सुरवात होते, आणि जी निवडक मंडळी हा विचार विशेषकरून करिते, तीस सार्वजनिक बचावाची तरतूद करावयाची असली म्हणजे आकार येतो, असा सिद्धान्त ठरल्यामुळें, सल्लामसलत-गार मंडळीस पुढें जे स्वरूपविशेष प्राप्त होतात, ते समजण्याची आपली ज्यास्त चांगली तयारी होणार आहे.

५९. ही गोष्ट अगोदरच आपल्या लक्षांत आलेली आहे कीं प्रारंभीं लढवय्या वर्ग अवश्यच जमीनदार-वर्ग असे. रानटयाच्या टोळींतील जे लोक वसाहत केलेल्या प्रदेशाचा सर्व मिळून पारध करण्यासाठीं उप-योग करितात, त्यांव्यतिरिक्त त्या प्रदेशाचे दुसरे कोणी मालक नसतात. धनगरी स्थितींत गुरें चारण्याला जे चांगले प्रदेश असतील ते सगळे धनगर मिळून परकी-यांपासून शस्त्रांच्या जोरावर संभाळून धरीत असतात. आणि ज्या ठिकाणीं शेतकीची स्थिति आली असेल, त्या ठिकाणीं जमातीच्या जमिनी, कुटुंबाच्या जमिनी, आणि व्यक्तीच्या जमिनी ह्यांचें संरक्षण वेळोवेळीं तर-वारीच्याच जोरावर करावें लागत असतें. म्हणून पूर्वीं दाखविल्याप्रमाणें, प्रारंभीं प्रारंभीं शस्त्रें धारण करणें आणि जमीन धारण करणें, हीं बहुधा एकत्र वास क-रीत असतात.

पारधीलोकांमधल्याप्रमाणें जोंपावेतों जमिनीवर सर्वांची सामान्य मालकी असेल; तोंपावेतों निवडक थोडे

आणि इतर पुष्कळ यांमध्यें जे फरक उत्पन्न व्हावयाचे ते ह्या किंवा त्या प्रकारची खरी किंवा काल्पनिक जी श्रेष्ठता तिजपासून तेवढेच उत्पन्न होत असतात. आतां हें खरें आहे कीं, पूर्वी दाखविल्याप्रमाणें, सामानसुमान, होड्या, गुलाम, इत्यादि संपत्तीच्या भेदामुळें कांहीं वर्गभेद उत्पन्न होत असतात, आणि यामुळें खासगत जमीन धारण करणें सुरू होण्यापूर्वींही, मालमत्तेच्या संचयावरून शासितांपासून भिन्न म्हणून शास्ते ओळखले जाऊं लागतात. जेव्हां धनगरी स्थिति येऊन पितृशासित मनुन्याची स्थापना होते, तेव्हां जी कांहीं मालकी असेल ती सर्वांत वडील पुरुषाच्या वडील मुलामध्यें अधिष्ठित होत असते; किंवा सर हेन्री मेन म्हणतो त्याप्रमाणें, तो जर सगळ्या कुटुंबाचा ट्रस्टी (विश्वासु मुनीम) समजावयाचा असेल, तरी त्याची लष्करी नायकी आणि त्याचें ट्रस्टीचें नातें ह्या दोहोंच्या योगानें त्यास श्रेष्ठत्व येत असतें. यानंतरच्या पायरीवर जेव्हां जमीन स्थाईक झालेलीं कुटुंबें व ज्ञाती हीं व्यापूं लागतात, आणि जमिनीच्या मालकीस निश्चितता येते, तेव्हां प्रत्येक मुख्याच्या ठिकाणीं ह्या दोन विशेषांचा संयोग ज्यास्त ठळक होतो; आणि केवळ स्वतंत्र नागरिकांपासून सरदारांच्या विभिन्नीकरणाचें स्पष्टीकरण करीत असतां दाखविल्याप्रमाणें, वडील पुरुषाच्या वडील मुलास जमिनीच्या मालकीचा विस्तार आणि सत्तेचा आवांका ह्या बाबतींत श्रेष्ठत्व देण्यास अनेक कारणें एकत्र जुळत असतात. पुढें जेव्हां कुळावरूनची सरदारी जाऊन कामगिरीवरूनची सरदारी होते, आणि जेव्हां पुढें लवकरच स्वारी करून

विजयी होणाराच्या अनुयायांस जिंकून घेतलेल्या मुलुखाचे भाग बक्षिशीदाखल मिळूं लागतात, तेव्हां देखील हा मूलसंबंध बदलत नाहीं. तर मोठाले जमीनदार आणि श्रेष्ठ लढवय्ये हे दोन वर्ग एकच असण्याचा कल ह्या सर्व कालांत कायम राहतो.

ह्यावरून, तर मग, असें सिद्ध होतें कीं, अशा व्यक्तिशः किंवा समुदायेंकरून जमीन धारण करणाऱ्या सशस्त्र स्वतंत्र नागरिकांच्या सभेपासून सुरवात होऊन सर्वांत ज्यास्त हुशार लढवय्ये एवढाच ज्यांचा मोठेपणा आहे अशा (ज्यांच्या अग्रणींचें कौन्सिल बाकीच्यांच्या समक्ष वादविवाद करीत असतें), वरचेवर होणाऱ्या लढायांमुळें आणि वाढत जाणाऱ्या समाजाच्या पक्वपणामुळें अशी स्थिति प्राप्त होते कीं, त्या स्थितींत ह्या अग्रणींच्या कौन्सिलामध्यें आणखी एक विशेष उत्पन्न होतो. तो असा कीं, त्यांचीं इस्टेटें ज्यास्त मोठालीं होतात, आणि त्यांवरून त्यांच्या सत्ताही ज्यास्त वाढतात. स्वतंत्र नागरिकांपासून ज्यास्त ज्यास्त विभिन्न होत जाऊन ही सल्लामसलतगार मंडळी हळू हळू त्या नागरिकांना आपल्या कह्यांत घेऊं लागते आणि सरतेशेवटीं आपल्यास पृथक् करून, स्वातंत्र्य संपादन करिते.

लढाईच्या ज्या ह्या तात्पुरत्या कौन्सिलामध्यें राजा सेनापतीच्या नात्यानें आपल्या फौजेच्या अग्रणींना त्यांचा सल्ला घेण्याकरितां बोलावीत असतो, त्याची वाढ होऊन ज्या कायमच्या सल्लामसलतगार मंडळांचें तें सामान्य सार्वजनिक कामांचा विचार करीत असतां त्याचें अध्यक्षपण करितो, त्या मंडळाची उत्पत्ति कशी होते

ह्याचीं उदाहरणें जगाच्या अनेक भागांत सांपडतात. जिकडे तिकडे सल्लामसलतगारमंडळ लहान लहान नायकांचें, किंवा टोळ्यांच्या मुख्यांचें, किंवा जमीनदारांचें दृष्टीस पडतें; आणि या लोकांचे ठिकाणीं पुष्कळशी जमीनजुमीन आणि तेथील लोकांवर दिवाणी व लष्करी अधिकार, या दोहोंचा बहुधा संयोग झालेला आढळून येतो; आणि हा संयोग लहान प्रमाणावर आणि मोठ्या प्रमाणावर, स्थानिक रीत्या आणि सामान्य रीत्या दोन्ही प्रकारांनीं झालेला पुष्कळ उदाहरणांवरून दिसून येतो. ह्याचें ओबडधोबड आणि प्रारंभींचें असें एक स्वरूप आफ्रिकेंत आढळतें. उदाहरणार्थ काफिर लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांतील प्रत्येक नाईक आपल्या अत्यन्त श्रीमान् प्रजेपैकीं पांच सहा असामींना आपले मसलतगार म्हणून निवडतो. बेचुआना लोकांच्या टोळींचे कित्येक गांव किंवा शहरें असून त्यांपैकीं प्रत्येकाचा स्वतंत्र मुख्य असतो, आणि त्याच्याखालीं कित्येक दुय्यम मुख्य असतात, आणि ते त्याचा श्रेष्ठ अधिकार कबूल करितात; तथापि त्याच्या कारभारांत कांहीं व्यंग असल्यास ते आपलें पार्लमेंत भरवून त्यास अगदीं स्पष्टपणें सांगतात. वान्यंवेझी लोकांबद्दल बर्टन असें सांगतो कीं, त्यांच्या सुलतानाच्या सभोंवतीं दोन ते वीस नायकांचें किंवा वडील माणसांचें कौन्सिल असून ते त्याच्या अधिकाराचें नियंत्रण करीत असतात; कारण त्याच्या इतकेच लढवय्ये ते कदाचित् रणांत आणूं शकतात. आशान्टीमध्येंही अशीच स्थिति आहे. प्राचीन अमेरिकन राष्ट्रांतही असलीं उ-

दाहरणें नजरेस येतात. मेक्सिकोमध्यें प्रत्येक ऐंशी दिवसांनीं राजा सामान्यसभा भरवीत असे; त्यांत लोक देशाच्या प्रत्येक भागांतून येत असत. मध्यअमेरिकेंतील व्हेरापाझ देशामध्यें असेंच असे; राजाच्या हाताखालीं त्याला मदतनीस म्हणून सरदार असून त्यांचें राजकीय कौन्सिल बनलेलें असे. यूरोपाकडे पाहतां प्राचीन पोलंदचें उदाहरण प्रथम नजरेस येतें. हें राष्ट्र प्रारंभीं कित्येक स्वतंत्र टोळ्यांचें बनलेलें असून त्यांपैकीं प्रत्येकीवर तिच्या "नियाझाचा" किंवा न्यायाधीशाचा अंमल असे; आणि लढाईमध्यें प्रत्येकाचा एकेक तत्पुरता सेनापति असून, लढाईमध्यें जें त्यांचें संमेलन होई तेणेंकरून त्यांचे सरदार व शेतगुलाम असे दोन भिन्न वर्ग बनले, आणि त्या दोघांवरही एक निवडलेला राजा असे. प्रथम हा राजा सरदारांचा विचार लढाईच्या कामीं तेवढाच घेत असे; पण पुढें तो विनयानें, किंवा संशयानें, किंवा आपली जबाबदारी कमी करण्यासाठीं, जेव्हां कांहीं दुसऱ्या बाबतींत त्यांचा सल्ला घेऊं लागला, तेव्हां ते त्या बाबतींतही आपणास सल्ला देण्याचा हक्कच आहे असें सांगू लागले. जर्मनीमध्येंही अशीच स्थिति दृष्टीस पडते. तेथील सर्व संस्थानांमध्यें एकप्रकारची नियंत्रित राजसत्ता असे, आणि तेथेंही एकंदर सम्राज्याचीच व्यवस्था लहान प्रमाणावर दृष्टीस पडे. उदाहरणार्थ, बादशाह जसा कायदे या संस्थानिकांच्या सभेच्या विचारानें करीत असे, तसे हे संस्थानिक आपापल्या हाताखालचे लष्करी जमीनदार आणि नगरवासी ह्यांच्या विचारानें आपापल्या संस्थानांपुरते कायदे करीत. फ्रान्सांतही प्रां-

तांच्या व्यवस्थेसाठीं प्रांतिक सरकारें असून सर्वसामान्यहिताच्या गोष्टींचा विचार करण्यासाठीं सरदार आणि मोठाले माणूस ह्यांचें सल्लामसलतगार मंडळ असे, असें तेराव्या शतकाच्या इतिहासावरून देखील दिसून येतें.

यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं धर्माधिकाऱ्यांचा समावेश सल्लामसलतगारमंडळांत होत असून त्यांबद्दल आह्मीं वर कांहीं उल्लेख केलेला नाहीं. तर यावर असें उत्तर आहे कीं, प्रारंभीं धर्माधिकारीवर्ग लढवय्यावर्गापासून भिन्न नसे. लढवय्या समाजामध्यें राजा जसा मुख्य सेनापति असून मुख्य धर्माधिकारीही असे, आणि ह्या दोन्ही नात्यांनीं जसा तो आपल्या देवतेचे हुकूम अमलांत आणीत असे, तद्वत् त्याच्या हाताखालचा धर्माधिकारी लढायांची प्रेरणा देवच करितो ह्या समजुतीवर लढाईच्यावेळीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या मदत करीत असे. उदाहरणार्थ, मादागास्कारचा राजा रादम्मा लढाईस जाण्याच्या अगोदर सेनापति व धर्माध्यक्ष या नात्यानें एक कोंबडा व वांसरूं बळी देत असे, आणि त्याचा अत्यन्त प्रसिद्ध पूर्वज जो आण्ड्रिया मसिना त्याची प्रार्थना करीत असे. ह्यावरून राजा धर्माधिकारीही कसा असे हें स्पष्ट दिसतें. आतां वर सांगितलेल्या दुसऱ्या गोष्टीच्या पुष्टीकरणार्थ असें सांगतों कीं, हीब्रू लोकांमध्यें धर्माधिकारी सेनेबरोबर लढाईस जात असून त्यांचा एक धर्मोपाध्याय साम्युएल याच्याविषयीं आपण असें वाचितों कीं, त्यानें सॉलकडे अमालेक ह्याला मारण्याबद्दल देवानें केलेला हुकूम नेऊन पोहोंचविला होता. धर्मोपाध्यायांनीं

अशा प्रकारचें लढाईंत कमज्यास्त अंग घातलेलें रानटी व अर्धवट सुधारलेल्या समाजांतून सर्वत्र आढळून येतें; उदाहरणार्थ, डाकोटा, मंद्रूकस, आबीपोन, आणि खोंड लोकांमध्यें. ह्या लोकांचे उपाध्ये लढाई केव्हां द्यावी हें ठरवितात किंवा लढाई सुरू करण्याबद्दल खूण देतात. तद्वतच ताहितियन लोकांमध्यें उपाध्ये शस्त्रें धारण करीत, आणि लढवय्यांसमवेत रणांगणांत जात; मेक्सिकन लोकांत उपाध्येच लढाईची चिथावणी देणारे असून आपले देव बरोबर घेऊन सैन्याच्या अग्रभागीं चालत आणि प्रथम जे शत्रू हातीं लागतील त्यांस लागलेच बळी देत. ईजिप्शन लोकांमध्येंही उपाध्या वरचेवर सेनेचा किंवा आरमाराचा अधिपति असे. लष्करी व धार्मिक पेशांमधील हा संबंध स्वाभाविक होता ही गोष्ट ख्रिस्ती राष्ट्रांमध्येंही त्याचें पुनरुज्जीवन झाल्यानें दिसून येते. उदाहरणार्थ, फ्रान्सांत आठव्या शतकामध्यें धर्मोपाध्ये पक्के लढवय्ये बनलेले होते. तद्वतच फ्यूडलपद्धति सुरू झाल्यावर बिशप, आब्ट, प्रायर, वगैरे धर्माधिकारी त्या पद्धतीप्रमाणें जमीनदार बनले, आणि तसल्या जमीनदारांची सर्व जबाबदारी त्यांनीं आपल्या शिरावर घेतली. ते आपल्या पदरीं फौजा ठेवीत, शहरें व किल्ले काबीज करीत, वेढे देत, आणि राजांच्या मदतीस सैन्यें नेत किंवा पाठवीत. हल्लीं धर्माधिकारी जरी लढाईस स्वतः जात नाहींत, तरी त्याबद्दलचा सल्ला देण्याचा आपला अधिकार त्यांनीं अद्यापि कायमच राखिला आहे, आणि तो सल्ला बहुधा नकारार्थी नसून होकारार्थीच असतो. उदाहरणार्थ, स्पे-

न्सर साहेब म्हणतात, आफगाणिस्थानावर स्वारी करण्याचा (१८७८–७९ मध्यें) जेव्हां (लार्डांच्या सभेपुढें) प्रश्न निघाला, तेव्हां एक खेरीज बाकीच्या सर्व बिशपांनीं ती करावी असेंच आपलें मत दिलें.

एवंच सल्लामसलतगारमंडळांत बहुधा धर्माधिकाऱ्यांचा समावेश होत असतो ह्या गोष्टीनें, त्या मंडळास लढाईचें कौन्सिल म्हणून सुरवात होऊन त्यास दुय्यम लष्करी मुख्यांच्या कायमच्या सभेचें स्वरूप येतें, या विधानास बाध येत नाहीं.

६०. सरदारी राज्यव्यवस्थांचा विचार करीत असतां जें कांहीं म्हटलें होतें तेंच निराळ्या रूपानें येथें कांहीं अंशीं पुनः म्हटलें आहे; आणि हा निराळेपणा उत्पन्न होण्याचें कारण ह्या ठिकाणीं राजाचा समावेश केला आहे हें होय. शिवाय, वरील राज्यव्यवस्थांस आकुंचित करण्यास लढाया कारण होत असतात यासंबंधानें पूर्वीं जें म्हटलें होतें त्यापैकीं बरेंच, प्रारंभींच्या सल्लामसलतगारमंडळाच्या ज्या आकुंचनानें जमीनदार लढवय्या सरदारांचा वर्ग उत्पन्न होतो, त्या आकुंचनास लागू आहे. परंतु लढाईच्या योगानें अनेक लहान समाज एकत्र होऊन जे मोठाले समाज बनत असतात, त्याच्यायोगानें वरील परिणाम उत्पन्न करण्यास आणखी कांहीं कारणें होत असतात.

सारखीं शस्त्रास्त्रें धारण करणाऱ्या माणसांच्या प्रारंभींच्या संमेलनामध्यें पुष्कळ असे जे कनिष्ठ लोक ते, लढाईमध्यें अग्रेसरत्व केल्यामुळें टोळीचे मुख्य असल्यामुळें, किंवा दैविक अंश म्हणून समजले गेल्यामुळें थो-

ह्या श्रेष्ठ लोकांना येणारा अधिकार जरी कबूल करिती-ल, तरी ते थोडे श्रेष्ठ लोक आंगलढाईंत आपण पुष्कळ कनिष्ठांच्या बरोबरीचे नाहीं हें जाणून त्यांच्या मताला कांहीं तरी मान देण्यास तयार होतील; म्हणजे, सगळी-च सत्ता आपल्या हातीं घेण्यास ते समर्थ होणार नाहीं-त. पण पूर्वीं वर्णिलेलें वर्गविभिन्नीकरण जसें वाढत जातें, किंवा थोड्या श्रेष्ठ लोकांना पुष्कळ कनिष्ठ लो-कांपेक्षां जशीं ज्यास्त चांगलीं शस्त्रें मिळूं लागतात, किंवा प्राचीन काळच्या पुष्कळ लोकांप्रमाणें जेव्हां त्यांस रथ प्राप्त होतात, किंवा मध्ययुगांतील यूरोपांतल्याप्रमाणें जेव्हां ते चिलखतें घालूं लागतात व घोड्यावर बसूं ला-गतात, तेव्हां आपली ज्यास्त सामर्थ्याची स्थिति लक्षां-त आणून ते त्या पुष्कळांच्या मताला पूर्वींहून कमी मान देऊं लागतात. आणि त्यांच्या मताकडे दुर्लक्ष करण्याच्या संवईच्या मागून त्यांनीं मत देणें म्हणजे फाजीलपणा करणें होय असें मानण्याची संवय त्यांस लागते.

थोडे श्रेष्ठ लोक आपल्या पदरीं जे सशस्त्र लोक ज-मवितात, आणि जे भाडोत्री व इतर प्रकारचे असल्या-मुळें सामान्य नागरिकांपासून भिन्न असून मालकांशीं इमानानें वागण्यास बांधलेले असतात, त्यांच्या योगानें ह्या सत्ताबळकावणीस ज्यास्त मदत होते. कारण हे लोकही बहुजनाहून ज्यास्त चांगलीं शस्त्रें व इतर संर-क्षक साधनें त्यांचेजवळ असल्यामुळें बहुजनास तुच्छ मानितात, आणि त्यांस कह्यांत ठेवण्यास आपल्या ध-न्यांस मदत करितात.

अशा रीतीनें वृद्धिंगत झालेली सरदारांची जी सत्ता ति-

च्यायोगानें नागरिक लोक त्यांचे ज्यास्त ज्यास्त आश्रित बनण्याच्या पंथास लागावे ही गोष्ट त्यांची मोगलीं संमेलनें जमण्याच्या प्रसंगींच घडून येईल असें नाहीं, तर त्यांच्या त्यांच्या गांवीं ती गोष्ट रोज व्हावयास लागेल; आणि तेराव्या शतकांत डेनमार्कांत झालें त्याप्रमाणें ज्या ठिकाणीं असल्या सरदारांनीं राजास मदत करावयाची चाल बंद झाली असेल, तेथें तर ही गोष्ट विशेषतःच घडून येईल.

समाजांचे संयोग आणि पुनःसंयोग झाल्यामुळें ते जेव्हां ज्यास्त ज्यास्त विस्तीर्ण प्रदेश व्यापूं लागतात, तेव्हां सशस्त्र नागरिकांची सत्ता कमी होण्यास आणि सल्लामसलतगारमंडलघटक सशस्त्रमुख्यांची सत्ता वाढण्यास आणखी एक कारण होतें. तें हें कीं, दूरदूरचे लोक सर्व लोकांच्या सभेस येऊं शकत नाहींसे होतात; सभास्थानाच्या जवळचेच तेवढे सर्व लोक येऊं शकतात. उदाहरणार्थ, मादागास्कारमधील सर्वांत मोठें राष्ट्रीय कौन्सिल म्हटलें म्हणजे राजधानींतील लोक आणि प्रांत, जिल्हे, शहरें, खेडीं, इत्यादिकांचे मुख्य, यांचें संमेलन असतें. म्हणजे काय, तर, राजधानीखेरीज इतर ठिकाणचे लोक सभेस सर्व येऊं शकत नाहींत. यास एक कारण प्रवासाचा खर्च हें असतें; दुसरें कारण खासगी कामाचें वेळ मोडून नुकसान होतें हें होय; तिसरें कारण सशस्त्रशिपायांव्यतिरिक्त प्रवास करणें धोक्याचें असतें हें होय.

या गोष्टीस आणखी एक कारण होत असतें. एकाद्या मोठ्या समाजांतील सर्वच सशस्त्र नागरिक एकत्र जमा करितां आले तरी त्यांच्या मोठ्या संख्येमुळें आणि व्यव-

स्थेच्या जमावामुळें त्यांस सर्वांस सभेच्या कामांत वास्तविक अंग घालतां येणार नाहीं. शिवाय ते दूरदूरच्या गांवांतील असल्यामुळें परस्परांशीं त्यांच्या ओळखी नसणार, पूर्वीं त्यांचा एकमेकांशीं विचार झालेला नसणार, आणि त्यामुळें काय करावयाचें आणि पुढारीपणानें कोणीं बोलावयाचें हेंही त्यांचें उरलेलें नसणार; आणि यामुळें एकमतानें वागणारी व व्यवस्थित अशी जी लहानशी सल्लागारमंडळी तिच्यापुढें त्यांचें फारसें चालणार नाहीं.

दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, अशी रीतीनें दूरच्या सशस्त्र माणसांची संख्या सभेस कमी येऊं लागली आणि त्यांच्यापैकीं ज्यास्त वजनदार लोकांस तेवढा बलावण्याचा प्रघात सुरू झाला, म्हणजे साहजिकरीत्या असें होऊं लागतें कीं, कालान्तरानें बलावणें येईल तेव्हांच सभेस हजर राहण्याचा हक्क उत्पन्न होऊं लागतो, आणि तसें बलावणें न येणें म्हणजे तसला हक्क नसणें असा अर्थ होऊं लागतो.

एवंच, लढाईमुळें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या उत्पन्न झालेलीं जीं हीं अनेक कारणें तीं ज्या सशस्त्र लोकांच्या समुदायापासून सल्लागारमंडळ उत्पन्न होतें, त्यापासून तें भिन्न करण्यास एकत्र होत असतात.

६१. असो. आतां मुख्य शास्ता आणि अशा रीतीनें बनणारी सल्लागारमंडळी ह्यांबद्दलचा विचार पुरा झाल्यामुळें असा प्रश्न निघतो कीं, त्यांचे अधिकारामध्यें जो फेरबदल होतो त्याला काय कारणें होतात? ह्या दोन अधिकाऱ्यांमध्यें नेहमीं चढाओढ असलीच पाहिजे, आणि

प्रत्येकाचा प्रयत्न दुसऱ्यास अंकित करण्याचा असलाच पाहिजे. तर, मग, काय परिस्थिति असली म्हणजे राजा सल्लागारमंडळास धाब्यावर बसवूं शकतो ? आणि काय परिस्थिति असली म्हणजे तें मंडळ राजाहून ज्यास्त प्रबळ बनतें.

राजा दैविक आहे ह्या लोकविश्वासाचा श्रेष्ठत्वासाठीं झगडण्यांत त्यास (राजास) अत्यन्त फायदा होतो. तो जर देववंशीय असेल तर त्याचे सल्लागार त्याच्या इच्छेविरुद्ध उठड जातील ही तर गोष्ट बोलावयासच नको; म्हणून नम्रपणें सल्ला देण्याव्यतिरिक्त कांहींही करण्याचा त्याच्या कौन्सिलाच्या सभासदांस धीरच व्हावयाचा नाहीं. शिवाय कोणीं कोणामागून गादीवर यावें हा क्रम जर इतका ठरलेला असेल कीं, त्यास निवडण्याचा प्रसंग मुख्य माणसांस क्वचितच यावा किंवा कधींच येऊं नये, तर त्यांना आपल्याकडे अधिकार घेण्यास आणखी एक अडथळा उत्पन्न होतो. म्हणून प्राच्यभागांतील स्वेच्छाचारी राजांनीं शासित अशा प्राचीन किंवा अर्वाचीन राष्ट्रांमध्यें स्वतंत्र अधिकार असलेली सल्लागारमंडळी आपल्यास बहुधा आढळत नाहींत. उदाहरणार्थ, इजिप्शन राजे जरी लढाईस जातांना बरोबर तिसांचें कौन्सिल घेत असत असें दिसतें, तरी राजा त्यांना देईल तेवढेच अधिकार ते चालवीत असत; म्हणजे, ते सल्लागार नसून कार्यकर असत. तद्वतच बाबिलोनिया व असीरियामध्यें आश्रित वगैरे लोक देववंशीय राजाचे प्रधान असून जरी त्यास सल्ला देत, तरी त्या विचार करणाऱ्या सभा नव्हत्या. प्राचीन इराणा-

मध्येंही अशीच स्थिति असे. तेथील आनुवंशिक राजा पवित्र मानिला असून त्याला विलक्षण पदव्या असत, आणि जे सरदार व राजपुत्र राजकीय घराण्यांतील असून सैन्याचे अग्रणी असत ते जरी त्यास कांहीं आळाबंदा घालीत, तरी त्यांचें व्यवस्थित असें कौन्सिल बनलेलें नसे. जपानांत परवांपर्यंत हीच स्थिति होती, आणि चीनमध्यें अद्यापिही आहे. यूरोपमध्यें देखील असला पुरावा मिळत नाहीं असें नाहीं. उदाहरणार्थ, रशियामध्येंच अशी स्थिति होती असें नाहीं, तर, फ्रान्सांतही जेव्हां राजसत्ता अनियंत्रित झाली, तेव्हां तेथेंही असेंच होतें. उदाहरणार्थ, चवदाव्या लुईच्या वेळीं राजा म्हणजे देवानें पाठविलेला आहे असें धर्माधिकारी सांगावयास लागले होते, आणि पार्लमेंटाचा वगैरे सर्व अधिकार नष्ट झाला होता.

उलट पक्षीं, असें दाखविणारीं उदाहरणें आहेत कीं जेथें राजाला काल्पनिक देववंशीयत्वाचा हक्क मुळींच नाहीं, किंवा संभाळून धरतां येत नाहीं; किंवा जेथें राजा निवडलेलाच असून सल्लागारमंडळानें त्याचा अधिकार प्रथम धाब्यावर बसवून मागून मुळींच नाहींसा केलेला आहे. याचें पहिलें उदाहरण रोमचें होय. प्रारंभीं त्या ठिकाणीं राजाला देवाची संमति आहे असें जरी मानीत, तरी तो देववंशीय आहे असें मानीत नसल्यामुळें, आणि जरी तो बहुधा पूर्वींच्या राजानें नेमिलेला असे तरी कधीं कधीं सेनेटच त्याला वस्तुतः निवडीत असल्यामुळें, सेनेट ही सल्लागारमंडळी लवकरच सर्वांत श्रेष्ठ बनली. पोलंदच्या इतिहासाकडे पा-

होतां याचें दुसरें उदाहरण दृष्टीस पडतें. साध्या रीतीनें शासित टोळ्यांच्या संयोगानें लहान लहान राज्यें बनून सरदारवर्ग उत्पन्न झाल्यावर, आणि ह्या लहान लहान राज्यांचा पुनःसंयोग झाल्यावर, तेथें राजेशाही उत्पन्न झाली. राजेशाया प्रथम सामान्यतः जशा निवडीच्या असतात तशी हीही निवडीचीच होती, आणि ती आनुवांशिक कधींच झाली नाहीं. प्रत्येक निवडणुकीच्या वेळीं तेथील बंडखोर सरदार आपल्या हेतूंच्या सिद्ध्यर्थ राजकुलांतील जो सर्वांत योग्य वाटेल तो निवडीत असत; आणि ह्यामुळें राजाची सत्ता क्षीण होत चालली; आणि शेवटीं तो सेनेटाचा केवळ अध्यक्ष आणि लोकसत्ताकाचा मुख्य न्यायाधीश बनला. शेवटचें उदाहरण स्कांण्डिनेव्हियाचें होय. तेथील, म्हणजे स्वीडन, नॉर्वे व डेन्मार्क एथील राजे प्रथम निवडलेले असत; आणि कांहीं प्रसंगीं जरी आनुवंशिक राजे गादीवर बसविण्याची रूढी तेथें उत्पन्न झाली, तरी पुनःपुनः निवडीची चाल पुनः सुरू होई, आणि याचा परिणाम असा झाला कीं, सल्लागारमंडळघटक असे जे जमीनदार आणि धर्माधिकारी त्यांचे हातीं प्रबल सत्ता गेली.

६२. एवंच "एकांत तीन" अशा राजकीय संघटनेचा दुसरा घटक, पहिल्या घटकाप्रमाणेंच युद्धशीलतेमुळें वृद्धिंगत होत असतो. तिच्याच योगानें शास्ता खालच्या दर्जाच्या सर्वांपासून अखेरीस पृथक् होऊन जातो; आणि तिच्याच योगानें श्रेष्ठ असे जे थोडे

त्यांचें संकलन होऊन सल्लागारमंडळ बनतें, आणि तें कनिष्ठ अशा बहुजनापासून पृथक् होतें.

आपल्या अनुयायांसमक्ष चर्चा करणाऱ्या प्रमुख योद्ध्यांचें बनलेलें जें युद्धाचें कौन्सिल त्यापासूनच सल्लागारमंडळाची उत्पत्ति होते हें, राजकीय संमेलन प्रारंभीं सशस्त्र माणसांचें बनलेलें असतें असें ज्या रूढींवरून दिसतें त्याच रूढींवरून व्यक्त होतें. ह्या अनुमानाशीं जुळणाऱ्या दुसऱ्या गोष्टी दृष्टीस पडतात त्या ह्या:— पहिल्या मानानें समाजास ज्यास्त स्थाईक अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे जमलेल्या लोकांचा अधिकार त्यांच्या पुढें आणलेल्या सूचना पसंत करणें किंवा नापसंत करणें एवढ्यापुरताच राहतो; आणि सल्लागारमंडळाचे घटकांस सेनापति असलेला शास्ता जेव्हां बलावील तेव्हां तेव्हां ते येतात, आणि आपलें मत कळवा असें त्यानें म्हटलें तरच आपलीं मतें देतात.

बरें, मूळचें युद्धविषयक कौन्सिल कसें वाढतें, प्रबल होतें आणि पृथक् होतें, हें आपणास समजत नाहीं असें नाहीं. जो वर्ग लढवय्या असेल तोच जमीनदार वर्गही असल्यामुळें, त्या वर्गांत लढाईमुळें पदवीभेदाप्रमाणें संपत्तिभेदही ज्यास्त ज्यास्त होत जातात; आणि ह्यामुळें, लढाईच्या कारणानें समूहांचे जे संयोग बनत जातात, त्यांबरोबर जे युद्धाग्रणी असतील ते मोठाले जमीनदार आणि स्थानिक शास्ते म्हणून देखील प्रसिद्धीस येऊं लागतात. एवंच सल्लागारमंडळाचे घटक सामान्य नागरिकांपासून प्रमुख लढवय्ये ह्या नात्यानेंच भिन्न दिसूं लागतात असें नाहीं, तर संपत्तिमान् आणि अधिका-

रयुक्त ह्या दृष्टीनेंही त्यांच्यापासून भिन्न दिसूं लागतात.

राजकीय घटनेच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांमध्यें हा जो वाढत जाणारा भेद त्याचा अखेर परिणाम असा होतो कीं, कालान्तरानें लढाईमुळें मोठाले प्रांत बनले म्हणजे ते दोन भाग अगदीं पृथक् होऊन जातात. कारण तेथील लोक आतां विस्तीर्ण मुलखावर विखरलेले असल्यामुळें प्रवासाचा खर्च, वेळेचा खर्च, आणि रस्त्याची भीति ह्यांमुळें संमेलनांस हजर रहावयाचें टाळूं लागतात. शिवाय त्यांच्या अनुभवास असें येऊं लागतें कीं, आपल्याबरोबर पुष्कळ अनुयायी घेऊन संमेलनास आलेले जे थोडेसे श्रेष्ठ लोक त्यांपुढें आपण पुष्कळ असलों तरी आपलें कांहीं चालत नाहीं; ह्यामुळेंही ते संमेलनास हजर राहण्याची टाळाटाळ करूं लागतात. म्हणून कांहीं काळपर्यंत संमेलन व्हावयाचें असेल त्याच्या आसपासचे लोक तेवढे या प्रसंगीं हजर राहूं लागतात; आणि यानंतर असा काळ येतो कीं, ह्या लोकांनाही हजर राहण्याबद्दल निमंत्रण न मिळाल्यामुळें त्यांना हजर राहण्याचा हक्कच नाहीं असें समजलें जाऊं लागतें. अशा रीतीनें सल्लागारमंडळ सामान्यजनापासून पूर्णपणें विभिन्न होऊन जातें.

आतां शास्ता आणि सल्लागारमंडळ यांच्या अधिकारांमध्यें जे फेरबदल होतात तेही उघड उघड कारणांवरूनच होत असतात. दैविकवंशीयत्वाबद्दलची किंवा अधिकारासंबंधाची आपली प्रसिद्धि राजानें जर कायम ठेविली किंवा संपादन केली, आणि निवडणुकीला जागा राहूं नये अशा रीतीनें गादीवर बसण्याचा

आनुवंशिक क्रम ठरलेला असला, तर एरवीं ज्या सल्लागारमंडळाची सत्ता त्याच्या इतकीच असावयाची तें केवळ त्याचें नेमलेलें सल्लागारमंडळ बनतें. पण काल्पक दैविक उत्पत्ति किंवा आदेश ह्यांचा आधार जर राजास नसेल, तर सल्लागारमंडळाची सत्ता कायम राहते; आणि राजा निवडीचाच राहिल्यास एकंदर राज्यव्यवस्था सरदारी बनण्याचाच संभव उत्पन्न होतो.

आतां हें उघडच आहे कीं सर्वच सल्लागारमंडळांची उत्पति वर वर्णिलेल्या रीतीनें होते असें नाहीं, किंवा सर्वांचीच घटना वरच्यासारखीच असते असेंही नाहीं. लढायांमुळें विस्कळित झालेले किंवा राज्यक्रान्त्यांनीं मोडून गेलेले जे समाज त्यांची मूळची राजकीय घटना इतकी अल्प कायम राहिलेली असेल कीं, वर वर्णिलेल्यासारखें मंडळ ज्यांच्यांतून निष्पन्न व्हावें अशा प्रकारचे लोकवर्गच तेथें राहिलेले नसतील. किंवा इंग्लिश वसाहतींप्रमाणें समाज अशा रीतीनें बनून आले असतील कीं जमीनदार असे लढवय्ये अग्रणी उत्पन्न होण्यास ते अनुकूल नसतील, आणि त्यामुळें सल्लागारमंडळें मूळस्वरूपीं ज्यांचीं बनलेली असतात ते घटक त्यांजमध्यें उत्पन्न होत नसतील. अशा प्रकारच्या स्थितींत स्थिति आणि कृति ह्यांनीं होतील तितकीं वरच्यासारखीं मंडळें दंतकथेवरून किंवा दुसऱ्यांच्या उदाहरणावरून उत्पन्न होत असतात; आणि मूळच्यासारख्या माणसांच्या अभावीं अन्यप्रकारच्या माणसांचीं बनतात; पण सामान्यतः जे लोक सामान्यलोकसभेच्या घटकांहून पदवी, वय किंवा पूर्वीचा सरकारी कामाचा

अनुभव ह्या बाबतींत ज्यास्त श्रेष्ठ असतील, त्यांचीं तीं बनतात. आतांपर्यंत केलेलें वर्णन जें लागू पडलें तें जीं सल्लागार मंडळें लढाईमुळें समाजांचे संयोग व पुनःसंयोग चालले असतां उत्पन्न होतात, त्यांनाच होय; आणि जीं सेनेटें किंवा श्रेष्ठ कौन्सिलें त्यानंतरच्या आणि ज्यास्त संकीर्ण अशा स्थितींत उत्पन्न होतात, तीं जीं वरच्या मंडळांशीं कृति व रचना ह्यांनीं समानस्वरूप असतात, तीं नवीन परिस्थिति त्यांस होऊं देईल तितकींच असतात.

प्रकरण नववें

प्रतिनिधिमंडळें

६३. राजकीयसंघटनेच्या नानाविध आणि संकीर्ण प्रकारांमध्यें, साधे राजकीय मुख्य आणि संयुक्त राजकीय मुख्य कशा रीतींनीं उत्पन्न होतात, आणि कांहीं परिस्थितींत ते दोघे मिळून शास्ता आणि सल्लागार मंडळ हीं कशीं बनतात, हें ओळखण्यास फारशी पंचाईत पडली नाहीं. पण प्रतिनिधिमंडळ कसें उत्पन्न होतें हें लक्षांत आणण्यास ज्यास्त कठीण जातें; कारण असलें मंडळ आणि तें उत्पन्न होण्याची तऱ्हा हीं दोन्ही पूर्वींहून ज्यास्त विविध आहेत. म्हणून ह्या ठिकाणीं वरच्याप्रमाणें निश्चित उत्तर मिळण्याची आशा करतां येत नाहीं.

मागच्याप्रमाणें, आतांही, इष्टोत्तराचा माग लागण्यास आपण मुळाकडे धांव घेतली पाहिजे. रानटी समूहाच्या ज्या अगदीं प्रारंभींच्या स्थितींत बळ, शौर्य, किंवा धूर्तपणा ह्या गुणांनीं प्रबल असलेल्या माणसाच्या श्रेष्ठत्वाव्यतिरिक्त अन्य श्रेष्ठत्व मुळींच नसतें, त्या स्थितींतून पहिली वरची पायरी म्हटली म्हणजे, निवडणुकीचा प्रघात सुरू होणें—म्हणजे लढाईमध्यें कोणी तरी अग्रणी मुद्दाम निवडणें, ही होय. रानटी टोळ्यांतून निवडणुकी कशा होतात ह्याबद्दल प्रवासी फारशी माहिती देत नाहींत; ह्याचें कारण कदाचित् त्यांच्यांत निवड करण्याच्या पद्धती अनेक आहेत हें असावें. पण प्राचीन काळीं यूरोपांतील लोकांमध्यें निवडणुकी कशा करीत

असत ह्याच्या हकीकती आपल्यास सांपडतात. उदाहरणार्थ, प्राचीन स्कान्डिनेव्हियामध्यें जमलेल्या लोकांनीं निवडलेल्या प्रांताच्या मुख्यास शस्त्रांच्या खणखणाटांत आणि जमलेल्या मंडळाच्या आरोळ्यांत स्थानापन्न करीत असत, आणि प्राचीन जर्मन लोकांत त्यास ढालीवर बसवून स्थानापन्न करीत. ह्या विधीवरून परवांपर्यंत नव्या निवडलेल्या पार्लमेंतीय सभासदास खुर्चीवर बसवून कसा उचलीत असत ह्याची सहजच आठवण होते; आणि प्रारंभीं निवड हात वर करून होत असे ह्याचीही आठवण होते; आणि ह्यावरून आपल्या असें लक्षांत येतें कीं, एका कालीं प्रतिनिधीची निवड आणि मुख्याची निवड हा दोन्ही एकच असत. ज्या स्थानिक संमेलनांमध्यें असुधारलेले लोक आपले मुख्य योद्धे निवडितात तसल्या संमेलनांमध्यें इंग्लिश कामन्ससभेचा उद्गम झालेला आहे.

रानटी लोकांत जाणून केलेल्या निवडीव्यतिरिक्त सोडतीच्या तत्त्वावरही निवड होत असते. उदाहरणार्थ, सामोअन लोकांत एक नारळ घेऊन तो वाटोळा फिरवितात, आणि तो थांबला म्हणजे सभोंवतालच्या ज्या मनुष्याकडे त्याचें टोंक होईल त्यास निवडितात. आथीनियन लोकांत राजकीय कामासाठीं आणि रोमन लोकांत लष्करी कामासाठीं अशाच निवडी होत असत. ह्यांत हेतु असली निवड देव करून देतो असा विश्वास हा असावा; तद्वतच श्रीमान् व गरीब ह्यांना निवडून येण्याची सारखीच संधि देणें, किंवा जोखमीचें वा भयाचें काम वादविवाद न करतां एकाद्यावर संपवणें, हाही कदाचित् एक हेतु असेल, आणि कदाचित् मुख्यही असे-

ल. तें कसेंही असो; प्रतिनिधि निवडण्याची ही जी एक सरणी ती रानटी लोकांमध्येंही आढळून येते ही गोष्ट एथें ध्यानांत आणावयाची आहे.

आपला अधिकार दुसऱ्यास देण्याची, म्हणजे डेलिगेट निवडण्याचीही, पद्धति बीजरूपानें त्या लोकांत आढळून येते. तहाचें बोलणें सुरू करणारे, किंवा खंडणी देणारे, किंवा शरण जाणारे,लोक बहुधा आपल्या वतीनें इष्ट गोष्ट करण्यास आपल्यापैकीं कांहींजणांस नेमीत असतात. आतां असें करणें आवश्यकच असतें, कारण सगळ्याच्या सगळ्या टोळीसच असली गोष्ट नीट करतां येणें शक्य नाहीं. यावरून असेंही दिसतें कीं, पुढें ज्या कारणांवरून प्रतिनिधि पाठविण्याचा प्रधात सुरू होतो, तसल्याच कारणांवरून तो प्रारंभींही सुरू होतो. कारण टोळीची इच्छा जमलेल्या संमेलनामध्यें जरी तिच्या घटकांस सहज दर्शवितां येते तरी ती जशी इतर टोळ्यांस दर्शवितां येत नाहीं,पण एकाद्या प्रतिनिधीच्या किंवा वकीलाच्याच द्वारा कळवावी लागते, तद्वतच एकाद्या मोठ्या राष्ट्रांत प्रत्येक ठिकाणचे लोक जरी कारभार आपणच स्वतः पाहूं शकतात, तरी सर्वच ठिकाणच्या लोकांना सामान्य अशा प्रश्नांचा विचार करण्यास त्यांस दूर ठिकाणच्या लोकांना स्वतः सर्वांनाच जाऊन मिळतां येत नाहीं, आणि म्हणून आपली इच्छा कळविण्याकरितां एक किंवा दोन माणसें पाठवावीं लागतात. एवंच या दोन्ही उदाहरणांत, फार अंतरामुळें लोकांच्या प्रत्यक्षमतप्रदर्शनास अप्रत्यक्षप्रदर्शनाचें रूप येत असतें.

विशिष्ट कामांसाठीं ह्या किंवा त्या रीतीनें व्यक्तीस

हें जें निवडून काढणें त्याचा प्रतिनिधिमंडळ बनवण्याच्या कामीं कोणत्या परिस्थितींत उपयोग होऊं लागतो हें लक्षांत आणण्यापूर्वी, ज्या प्रकारच्या उदाहरणांचा आमच्या प्रस्तुत विवेचनाशीं संबंध नाहीं तसले प्रकार आपण एकीकडे काढिले पाहिजेत. सरकारचें स्वरूप लोकसत्ताक असलें म्हणजे तेथें प्रतिनिधी निवडितात अशी जरी सामान्य समजूत आहे, तरी ह्या दोहोंमध्यें आवश्यकच संबंध आहे असें नाहीं. कांहीं ठिकाणीं लोकांच्या हातीं सत्ता मुळींच नसून प्रतिनिधि निवडण्याची चाल आहे. उदाहरणार्थ, पोलंदामध्यें मुख्य कौन्सिल प्रांतांतील सरदारांच्या सभांनीं निवडिलेल्या सभासदांचें बनविलेलें होतें; आणि सामान्य लोकांच्या हातीं सत्ता मुळींच नसून ते बहुधा जमीनगुलाम असत. हंगारीमध्यें देखील १८४८ सालापर्यंत कांहीं विशिष्ट हक्क असलेल्या लोकवर्गासच प्रतिनिधि निवडण्याचा हक्क होता, आणि ते सगळ्या लोकसंख्येचे एकविसांशच काय ते होते. म्हणजे ह्या दोन देशांतील प्रतिनिधिमंडळें केवळ सरदारी होतीं.

ह्याशिवायही कांहीं प्रतिनिधिमंडळें अशा तऱ्हेचीं आहेत कीं, तींही ह्या प्रकरणाच्या आवांक्यांत येत नाहींत. उदाहरणार्थ, रोम, फ्रान्स, स्पेन आणि ग्रीस ह्या देशांत प्राचीन काळीं जीं सामान्यसंमेलनें भरत तीं प्रस्तुत प्रकरणांत आपण निरूपीत आहों तशा प्रकारचीं नव्हतीं असें अनुमान करण्यास फारशी हरकत दिसत नाहीं. तद्वतच एकाद्या शहरवस्तीच्या निरनिराळ्या भागांकडून जीं सेनेटें व कौन्सिलें निवडलीं जात असत (उदाहर-

णार्थ, निरनिराळ्या इतालियन लोकसत्ताक शहरांत) तींही या विवेचनांत येत नाहींत; कारण जमलेल्या सर्व नागरिकांचीं तीं केवळ गुमास्तेवजा असून त्यांचीं कृत्यें पसंत किंवा नापसंत करण्याचा त्या नागरिकांस हक्क असे. येथें आपण ज्या प्रतिनिधिमंडळाचा विचार करीत आहों तीं हीं कीं, जीं समाजानें व्यापलेला प्रदेश मोठा असल्यामुळें त्याच्या घटकांना आपले अधिकार प्रतिनिधिद्वारा बजावणें भाग पडून उत्पन्न होतात; आणि शिवाय आपणास ज्या मंडळांचा विचार करावयाचा तीं हींच कीं,जीं पूर्वींच्या राजकीय संस्थाच्या ऐवजीं उत्पन्न न होतां त्यांच्याशीं सहकार्य करण्यास उत्पन्न झालेलीं आहेत.

अशा प्रकारचें प्रतिनिधिमंडळ मूळच्या राजकीय घटनेच्या कोणत्या भागापासून उत्पन्न होतें हें पूर्वीपेक्षां ज्यास्त स्पष्ट रीतीनें लक्षांत आणून प्रस्तुत विवेचनास सुरवात केल्यास बरें असें वाटतें. म्हणून त्या कामास आतां लागूं.

६४. ठोकळ रीत्या पाहतां, ह्या प्रश्नाचें उत्तर मागच्या एकंदर प्रकरणांतील विवेचनामध्यें गर्भितरीत्या आलेलेंच आहे. कारण सार्वजनिक कामाचा विचार करण्याच्या प्रसंगीं रानटी लोकांच्या समूहाचा ज्यांतील एक अत्यंत वजनदार आहे असे श्रेष्ठ थोडे आणि कनिष्ठ पुष्कळ असा जर आपोआप विभाग होत आहे; आणि लढाईमुळें उत्पन्न होणारे समूहांचे संयोग व पुनःसंयोग चालले असतां जर सर्वमान्य सेनापति राजा होतो आणि श्रेष्ठ थोडे त्याच्या हाताखालचे सेनाग्रणी बनून सल्लागार मंडळ बनवितात;तर यावरून असें निष्पन्न होतें कीं, यांच्याशीं समानाधिकार जर एकादें तिसरें राजकीय

मंडळ असेल, तर तें कनिष्ठ पुष्कळांचा जो समुदाय तोच असला पाहिजे, किंवा त्याच्या वतीनें काम करणारी दुसरी कांहीं घटना असली पाहिजे. ही गोष्ट जरी अगदीं उघड उघड आहे, तरी ती येथें नमूद करणें जरूर आहे. कारण लोकसत्तेची वृद्धि झाली म्हणजे कोणत्या तरी परिस्थितींत प्रतिनिधिमंडळ निवडण्याची सरणी उत्पन्न होते या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वीं त्या दोहोंमधील संबंध लक्षांत घेणें जरूर आहे.

राजकीय दृष्ट्या व्यवस्थित स्वरूप अद्यापि ज्यास प्राप्त झालें नाहीं अशा साध्या समाजांत सामान्य जनसमूह त्याच्यांत लढाईच्या योगानें आज्ञाधारकत्व जसें स्थापन होत जाईल आणि विजयांच्या योगानें वर्गभेद उत्पन्न होत जातील तसा जरी नियंत्रणाखालीं येतो, तरी संधि सांपडेल तेव्हां आपला अधिकार पुनः चालविण्याकडे त्याचा कल असतो. कारण जे मनोभाव व समज हल्लीं भिनून व वंशपरंपरेनें संक्रान्त होऊन, सामाजिक उत्क्रमणाच्या कांहीं पायऱ्यांवर, कनिष्ठ पुष्कळांस श्रेष्ठ थोडच्यांचे अंकित करितात, त्यांच्या उलट मनोभाव व समज कांहीं परिस्थितींत उत्पन्न होतात. त्यांस जातां जातां कित्येक ठिकाणीं उल्लेख आलेले आहेत; पण एथें त्यांचा क्रमवार आणि ज्यास्त सविस्तर विचार केला पाहिजे.

धनगरी स्थितींत पितृशासित समूहाच्या वाढीचें एक कारण लढाईमुळें समूहांत जो आज्ञाधारकपणा वाढत जातो तो होय असें पूर्वीं दाखविलें आहे; कारण ज्या समूहांत तो सर्वांत ज्यास्त असेल तेच नेहमीं तगाव धरून रहात असतात. पण हें जर खरें असेल तर त्या-

पासून असें गर्भित होतें कीं, उलटपक्षीं, लढाई बंद झाल्यानें हा अंकितपणा कमी व्हावयास लागला पाहिजे. संयुक्तकुटुंबाचे जे घटक प्रारंभीं एकत्र रहात असतात व लढत असतात, त्यांना आपल्या नायकाच्या हाताखालीं सर्वांच्या संरक्षणाकरितां सहक्रिया करण्याचे जसे कमी प्रसंग येतील तसें त्यांजवरील अंकितपणाचें बंधन ढिलें होत जातें. म्हणून राष्ट्र जसें ज्यास्त शांतिशील होत जाईल, तसे त्याचे ज्ञाती, बंधुवर्ग, आणि टोळ्या इत्यादि वाढत जाणारे विभाग ज्यास्त स्वतंत्र होत जातात. औद्योगिक जीविताची जशी वाढ होत जाईल तसें क्रियास्वातंत्र्य वाढत जातें, आणि विशेषतः सगळ्या समूहाचे जे दूरदूरच्या नात्याचे घटक त्यांचें वाढत जातें.

फ्यूडल किंवा लष्करी जमीनदारीच्या पद्धतीवर ज्या देशाचें राज्य चाललें आहे तेथेंही असेंच असलें पाहिजे. शेजाऱ्यांशीं कायमच्या तंट्यामुळें स्थानिक लढाया जोंपावेतों चालतात, जोंपर्यंत सशस्त्र माणसांचे ताफे नेहमीं तयार ठेविले जातात आणि हाताखालील जमीनदारांस लढाईत मदत करण्यासाठीं निमंत्रणें पाठविलीं जातात, जोंपावेतों राजेलोक लढाईत मदत मागत असून त्याबरोबर अंकितपणाच्या कृती हक्कानें करून घेत असतात, तोंपावेतों सगळा समूह रेजिमेंटाप्रमाणें राजाच्या हुकुमांत रहात असतो. पण हल्ले आणि प्रतिहल्ले जसजसे कमी व्हावयास लागतील, तसतसें शस्त्रें धारण करून राहणें लोकांस कमी आवश्यक होऊं लागतें; कालाकालानें राजनिष्ठा दाखविण्याचे प्रसंग कमी येऊं लागतात; रोजचे व्यवहार एकाद्या वरिष्ठाच्या

हुकुमाव्यतिरिक्त ज्यास्त ज्यास्त होऊं लागतात; आणि ह्यामुळें शीलस्वातंत्र्यास उत्तेजन येतें.

स्थानिक आणि सर्वसामान्य मुख्यांच्या दैविक घटनेच्या संबंधानें जे देवभोळे समज ते कमी झाल्यानें ह्या फेरबदलांस आणखी उत्तेजन येतें. मागें दाखविल्याप्रमाणें दैविक उद्गम किंवा दैविक सत्ता राजाच्या अंगीं लाविल्यानें त्याच्या हुकमतीस फार जोर येत असतो; आणि जेथें घटकसमूहांचे मुख्य सर्वांना पूज्य अशा अर्धदैविक पूर्वजाचे जवळचे आप्त असल्यामुळें पवित्र समजले जातात, किंवा ते देवकुलोत्पन्न अशा जेत्या जातीचे घटक असतात, तेथें आश्रितांवरच्या त्यांच्या अधिकारास ज्यास्तच जोर आलेला असतो. ह्यावरून, तर मग, असें गर्भित होतें कीं ज्याच्या ज्याच्या योगानें पूर्वजपूजेस आणि आनुषंगिक इतर समाजास धक्का बसतो त्याच्या त्याच्या योगानें लोकसत्तेच्या वाढीस उत्तेजन मिळतें. म्हणून, **साहेब** म्हणतात, युरोपांत जो ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला तेणेंकरून लहानमोठ्या शास्त्यांची प्रजेवरील छाप कमी होऊन तिच्या अधिकाधिक स्वातंत्र्याचा मार्ग खुला झाला.

पण जेथें लोक विखरलेले असतील तेथें ह्या कारणांचा फारसा परिणाम होत नाहीं. गांवढ्या प्रांतांत राजकीय श्रेष्ठांचा अधिकार शहरप्रांतांच्या मानानें मंदरीत्याच क्षीण होत असतो. शांततेनें राहणें संवयींतलें बनून गेल्यावर आणि मुख्यांची अर्धवट दैविक घटना नाहींशी झाल्यावर देखील त्यांच्याबद्दलची अशा प्रांतांतील लोकांची पूज्यबुद्धि त्यांच्या मनाला चिकटून राहते;

म्हणजे, ते सामान्य रक्तामांसाचे आहेत असें तेथील लोकांस वाटत नाहीं. पुष्कळ काळपावेतों संपत्ति ही सरदाराच्याच हातीं राहिल्यामुळें त्याला तिजपासून प्रत्यक्ष अधिकार आणि भपक्यापासून उत्पन्न होणारी सत्ता हीं दोन्ही प्राप्त होत असतात. दळणवळण-मार्ग बनले नसतील तोंपावेतों कनिष्ठ लोकांच्या डोळ्यांपुढें मोठ्या माणसाचा नमुना तोच कायतो असतो. इतरांबद्दल लोकांना काय माहिती ती कर्णोपकर्णी असते, पण त्याच्याबद्दल प्रत्यक्ष अनुभवावरून असते. त्याचे आश्रित आणि त्या आश्रितांचे आश्रित यांजवर त्याला सहज देखरेख ठेवतां येत असते; आणि त्याचा जे अपमान किंवा आज्ञाभंग करितील त्यांना त्यास प्रत्यक्ष शिक्षा करतां न आल्यास त्यांचा उद्योग काढून घेऊन किंवा अन्य तऱ्हेनें अप्रत्यक्षरीत्या करतां येते. कुणबी आणि लहानसान शेतकरी यांची खोतांशीं किंवा जमीनदारांशीं अगदीं मिनतवारीची वागणूक कशी असते हें लक्षांत घेतल्यास, मूळचीं नियंत्रणें नष्ट झाल्यावर देखील गांवढे लोक अर्धवट दासस्थितींत कसे राहतात हें स्पष्ट होतें.

आतां उलट परिस्थितींत उलट परिणाम होत असतील असा सहजच अंदाज करतां येतो; म्हणजे, ज्या ठिकाणीं पुष्कळ लोक दाट वस्ती करून राहिले असतील तेथें. असल्या मोठाल्या लोकवस्त्या टोळ्यांच्या मुख्यांस किंवा लष्करी पद्धतीप्रमाणें जमीनदार सरदारांस वश असलेल्या अनेक समूहांच्या बनलेल्या असल्या, तरी त्यांचें अंकितत्व कमी करण्यास कित्येक कारणें जुळून येतात. जेथें एकाच ठिकाणीं निरनिराळ्या आश्रि-

तांचे निरनिराळे यजमान असतात, तेथें ते यजमान एकमेकांचें महत्त्व कमी करूं लागतात. सारखाच भपका करणारे अनेक श्रेष्ठ लोक एकेठिकाणीं असल्यानें सामान्य लोकांस त्यांजपैकीं कोणाचाच अधिकार तितका बाऊदार वाटत नाहीं. आणि अशा रीतीनें नियंत्रणास विघ्न आलें म्हणजे नियंत्रितांस एकत्र जुळण्यास सुलभ जातें; म्हणजे, त्यांच्यांत कट सहज होऊं शकतात, आणि ते उमगून काढणें कठीण होऊन जातें. शिवाय, हे एकत्र राहणाऱ्या समूहांचे मुख्य एकमेकांचा सहजच हेवा करीत असल्यामुळें ते आपापल्यास ज्यास्त बलवान् करूं पाहत असतात; आणि ह्या उद्देशानें आपणास इतरांहून ज्यास्त लोकप्रिय करून घेण्यासाठीं आपल्या आश्रितांवरचीं बंधनें सईल करूं लागतात, आणि इतरांनीं वाईट रीतीनें वागविलेल्या आश्रितांस आपल्यापाशीं ठेवून घेण्यास तयार होतात. शिवाय, त्या समूहांतून परकीयांचा समावेश बराच झालेला असल्यास तेणेंकरून त्या मुख्यांची सत्ता आणखीच डळमळीत होते. पूर्वीं ध्वनित केल्याप्रमाणें लोकसत्तेची वृद्धि होण्यास हेंच सर्वांत विशेष कारण होत असतें. कारण हे परकीय लोक ज्या लोकविभागांतून रहात असतील त्यांच्या घटना ते डळमळीत करूं लागतात, आणि ह्याचा परिणाम सभोंवतालच्या घटनांवरही होऊं लागतो.

ह्या ठिकाणीं पुनःएक महत्त्वाचें सत्य आपल्या लक्षांत येतें; तें हें कीं, लौकिकसत्तेची वृद्धि सर्व रीतींनीं व्यापारधंदेविषयक उद्योगावर अवलंबून असते व त्या उद्योगाच्या वृद्धीबरोबर होत असते. कारण व्यापारामुळेंच

पुष्कळ लोकांचा एकमेकांशीं निकट संबंध येऊं लागतो. गांवढ्या लोकवस्तीस भौतिक गरजा भागविण्यासाठीं दूर दूर विखरलेलें रहावें लागत असतें, पण जे लोक व्यापारांत गुंतलेले असतात, त्यांस त्या हेतूनेंच एकत्र गोळा होणें जरूरीचें होतें. निरनिराळ्या काळच्या व देशाच्या पुराव्यावरूनच असें दिसतें कीं, धर्मविधि करण्यासाठीं किंवा इतर सार्वजनिक कार्यासाठीं जेव्हां लोक कालाकालानें एकत्र जमतात, तेव्हां ते क्रयविक्रयही चालवीत असतात; आणि हा जो ह्या दोन गोष्टींमध्यें संबंध कांहीं कांहीं कालावधीनें प्रथम दिसूं लागतो, तो पुढें नित्य होतो; म्हणजे बरेच लोक एकाद्या ठिकाणीं कायमचेच जमून शहर वसतें; तें बहुधा देवळाचे शेजारीं, किंवा किल्ल्याच्या लगत, किंवा एकादा कारागिरीचा जिन्नस पैदा होत असेल तेथें वसतें, आणि तेथें कायमचीच देवघेव सुरू होते.

औद्योगिक उन्नतीमुळें, पदवीनें जे सत्ताधारी असतील त्या लोकांशीं वरचढ करण्यास संपत्तीनें प्रबल लोक तयार होऊन लोकस्वातंत्र्यवृद्धीस आणखी एका प्रकारें मदत होते. कारण ह्या विरोधानें जमीनदार किंवा पितृशासित सरदारांचें महत्त्व कमी होऊन त्यामुळें लोकांच्या अंकितपणालाही एकप्रकारचें नरम स्वरूप येतें. श्रीमान् व्यापारी बहुधा सामान्य वर्गांतूनच उत्पन्न झालेला असल्यामुळें त्याच्या हाताखालच्या लोकांचा जो त्याच्याशीं संबंध असतो, त्यांत शारीरिक अंकितपणाच्या कल्पनेचा (धन्यासाठीं जीव देण्याच्या कल्पनेचा) समावेश होत नसतो. ज्या मानानें उद्योगधंदे जो-

रावर येऊं लागतील,त्या मानानें धनी आणि चाकर यांमध्यें जो संबंध उत्पन्न होतो, तो गुलाम आणि त्याचा मालक, किंवा जमीनदार आणि त्याचें कुळ, ह्यांमधील संबंधापासून भिन्न असतो, कारण त्यांच्यांत स्वामीनिष्ठेची कल्पना येत नाहीं. याच्या अगोदरच्या स्थितींत टोळीचा मुख्य किंवा श्रेष्ठ जमीनदार ह्यांव्यतिरिक्त ज्यांचें संरक्षण होतें आणि जे आज्ञाधारकत्वाविना राहूं शकतात असे लोकच मुळीं नसतात. पण नंतरच्या स्थितींत शहरवस्त्यांमधून बाहेरून आश्रयासाठीं आलेले बरेच लोक असल्यामुळें, ते लहानसान उदमी बनत असतात, किंवा मोठ्या व्यापाऱ्यांच्या हाताखालीं राहतात; आणि त्यामुळें पहिल्यापेक्षां स्वतंत्र जीविताचा अनुभव लोकांना परिचित होऊन तद्विषयक त्यांची कल्पना स्पष्ट होऊन जाते.

आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या औद्योगिक स्थितींत जो सहकार्याचा प्रकार सुरू होत असतो, तो लोकसत्तेस अनुकूल अशा मनोभावांना आणि विचारांना पोषक होतो. कारण अशा स्थितींत नेहमींच्या व्यवहारांत निरनिराळ्या हक्कांचें समतोलन होत असतें आणि त्यामुळें पिढ्यानुपिढ्या समतेची कल्पना ज्यास्त ज्यास्त निश्चितस्वरूप होत जाते. कामास लावणारा व लागणारा, आणि माल विकणारा व विकत घेणारा, यांच्यामधील संबंध कायम राहण्यास त्यांच्यापैकीं प्रत्येकानें आपापले करार पुरे केलेच पाहिजेत. ते जेथें पुरे होत नसतील तेथें तो संबंध तुटतो, आणि जेथें पुरे होत असतील तेथें कायम राहतो. एवंच व्यापारांत यश येणें

आणि त्याची वृद्धि होणें ह्या गोष्टींच्या, त्यांत संबंध येणाऱ्या लोकांचे हक्क कायम राखणें, आणि त्यांबद्दलचें ज्ञान बळकट करणें, ह्या दोन गोष्टी अवश्य सहचारी बनल्या आहेत.

तात्पर्य, वृद्धिंगत होणाऱ्या उद्यमशीलतेमुळें पूर्वीचा ठराविक स्थितिरूप संबंध नाहींसा होऊन कराररूपी नवा संबंध उत्पन्न होतो, आणि पुष्कळ लोक एकत्र गोळा होऊं लागतात; आणि त्यांची परिस्थिति व त्यांस मिळणारें शिक्षण अशा प्रकारचें असतें कीं, त्यायोगानें त्यांस पूर्वीच्या युद्धशीलतेपासून प्राप्त झालेली जी राजकीय संघटना तिच्यांत फेरफार करण्याचें सामर्थ्य येतें आणि स्फूर्तिही होते.

६५. सामान्यतः असें म्हणत असतात कीं सरकारी व्यवस्थेचे स्वतंत्र प्रकार सुदैवानें कांहीं अनुकूल अशा गोष्टी अकस्मात् घडून उत्पन्न होत असतात. राष्ट्रांतील निरनिराळ्या अधिकारी संस्था किंवा निरनिराळे तट यांच्यामध्यें विरोध उत्पन्न होऊन त्यांनीं लोकांच्या पाठिंब्यासाठीं खटपटी केलेल्या आहेत, आणि त्यामुळें लोकसत्ता वृद्धिंगत झालेली आहे. उदाहरणार्थ, राजास सरदारवर्गाचा मत्सर उत्पन्न होऊन त्यानें लोकांची सहानुभूति आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं त्यांजवर मेहरबानी केलेली आहे; किंवा, उलट, लोकांनीं सरदारांशीं संगनमत करून राजाचे जुलूम व अन्यायाच्या मागण्या यांस प्रतिबंध केलेला आहे. आतां, इतिहासान्तर्गत गोष्टींस अशा प्रकारचें स्वरूप देतां येतें हें खरें आहे. झगडा सुरू झाला म्हणजे दोस्त मिळविण्याची इच्छा सहजच

उत्पन्न होते; आणि मध्ययुगांतील एकंदर यूरोपांत राजे व सरदार यांच्यामध्यें कलह सारखे चालले असतां शहरांची मदत त्यांस फार महत्त्वाची असे. ह्याचीं उदाहरणें जर्मनी, फ्रान्स, स्पेन व हंगारी या देशांत सांपडतात.

पण असल्या प्रकारच्या गोष्टी लोकसत्तेचीं कारणें असतात असें मानणें ही चूक आहे. तीं त्या गोष्टींचीं कारणें न मानतां ज्या स्थितींत त्यांचीं कारणें स्वकार्य करितात ती स्थिति तीं होत असें मानणें अधिक बरोबर होईल. कारण पूर्वीं अस्तित्वांत असलेल्या संस्था कांहीं कारणानें डळमळीत झाल्या म्हणजे त्या डळमळण्यामुळें, राजकीय फेरबदल उत्पन्न करण्यास तयार अशी जी कोंडलेली शक्ति असते, तिला स्वकार्य करण्यास संधि सांपडते. ह्या शक्तीचे तीन निरनिराळे घटक नजरेस येतातः—जुन्या प्रकारच्या समाजांच्या मानानें औद्योगिक समाजांचा ज्यास्त जाडा आकार; त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या राहणीमुळें त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेले कायमचे मनोभाव आणि कल्पना; आणि जुलमाचीं विशिष्ट कृत्यें किंवा विपत्ति ह्यांच्या योगानें त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या तात्कालिक मनोवृत्ती. असो. आतां ह्या तीन घटकांचें सहकार्य कसें होतें तें पाहूं.

ह्याचीं पहिलीं दोन उदाहरणें आथीनियन लोकांच्या लोकसत्ताकांत आढळून येतात. सोलनचे कायदेकानू होण्याच्या पूर्वीं तेथें निरनिराळ्या राजकीय तटांमध्यें फार तंटे असत; आणि विपत्ति व जुलूम ह्यांला त्रासून सर्व गरीब लोकांनीं सर्व श्रीमान् माणसांविरुद्ध बंड केलें होतें. यानंतर क्लिस्थेनिसनें राज्यक्रान्ति घड-

वून आणिली; तिच्या योगानें राजकीय सत्ता जी पूर्वींपेक्षांही जास्त लोकांमध्यें वांटली गेली, ती वांटणी असल्याच परिस्थितींत बनून आली. बाहेरून आलेल्या व्यापाऱ्यांची मूळच्या संस्थांनीं बांधलीं गेलेली अशी वस्ती सोलन व क्लिस्थेनिस या दोघांच्या अमदान्यांच्या दरम्यान इतकी पुष्कळ वाढली होती कीं, आटिकांतील (हें आथेन्सच्या राज्याचें नांव) वस्तीच्या पूर्वीच्या ज्या चार टोळ्या होत्या त्यांच्या ऐवजीं आतां दहा टोळ्या झाल्या होत्या. आणि वाढलेल्या लोकवस्तीपैकीं बरेच जण ज्ञातिबंधनाखालीं नसल्यामुळें आणि म्हणून शास्तेवर्गाकडून बाकीच्या लोकांइतकें सोप्या रीतीनें ते नियंत्रित होत नसल्यामुळें, शास्त्या वर्गामध्यें जेव्हां दुफळ्या उत्पन्न झाल्या, तेव्हां ते आंगच्या जोरावर पुढें आले आणि त्यांच्या सहानुभूतीनें क्लिस्थेनिसला लोकसत्ताक संस्थांची स्थापना करतां आली, आणि त्यांनीं त्यांचें पुढें संरक्षण केलें. आतां इटालीकडे पाहतां तेथें सरदारवर्ग व बादशाह यांजमध्यें भांडणें चाललेली असतांच लॉंबर्डी, पीडमॉंट, व्हेनिशिया, रोमाग्ना व टस्कनी येथील लोकसत्ताकें स्थापण्यास तेथील लोकांस संधि सांपडली. पुढें फ्लोरेन्समध्येंही साधारण असेंच झालें कारण त्यावेळीं तेथें तीन तट झालेले असून सव्हानरोला ह्यानें ती संधि साधिली, आणि लोकांस असें सुचविलें कीं तुम्ही आपली राजकीय सत्ता आपल्याच हातीं ठेवा, आणि लोकांनीं ती गोष्ट मान्य केली. स्पेनदेशाकडे पाहतां तेथेंही चवथा फर्डिनंड लहान असतां जे घोंटाळे उडाले त्यांत लोकांची सत्ता वृद्धिंगत झाली पुढें

अकराव्या आल्फान्सोच्या लहान वयांत जे आपल्यास राजप्रतिनिधी बनवूं पाहत होते, त्यांनींही म्युनिसिपल अधिकाऱ्यांचीं मतें आपणांस मिळावीं एतदर्थ त्यांचीं मर्जी संपादन करण्याची खटपट केली. आतां ह्या सर्व गोष्टी औद्योगिक वाढीमुळें कशा झाल्या हें पाहणें असल्यास ही गोष्ट ध्यानांत आणावी कीं, ही म्युनिसिपल शहरें पूर्वींच्या शतकांत मूर व ख्रिस्ती ह्यांच्या मधील दीर्घकालिक तंटयांत ओसाड झालेल्या प्रदेशांत पुनः वसाहती होऊन बनलेलीं होतीं; आणि ते लोक शेतगुलाम व कारागीर असून राजानें त्यांस स्थानिकसरकाराचे वगैरे अनेक अधिकार सनदेनें दिलेले होते. आतां इंग्लंदच्या इतिहासाकडे पाहतां त्या देशांत तेराव्या शतकांत राजा व त्याचे सरदार ह्यांजमध्यें जेव्हां कलह सुरू असून निरनिराळ्या तटांचें सामर्थ्य सरासरी सारखें झालें होतें, आणि शहरवस्त्या व्यापारवृद्धीनें जेव्हां वाढून त्यांची मदत घ्यावी इतकें त्यांचें महत्त्व वाढलें होतें, तेव्हांच त्यांना लढाईमध्यें मदतनीस म्हणून प्रथम घेतलें गेलें, आणि मागाहून सरकारी अधिकाराचा कांहीं भाग त्यांस दिला गेला. सन १२६५ त सायमन् आव्ह-मॉन्टफर्ट यानें जिल्ह्यांतील छोटया सरदारांव्यतिरिक्त शहरांचे प्रतिनिधींस पार्लमेंटाच्या सभेस येण्यास जेव्हां निमंत्रण केलें, तेव्हां त्याचा हेतु पोपाचा आश्रय असलेल्या राजपक्षाविरुद्ध आपला पक्ष बळकट करावा हाच असला पाहिजे. आणि हें जर खरें असेल, तर शहरवासी लोकांस ह्या वेळीं बरेंच महत्त्व आलेलें होतें हेंही त्यावरून व्यक्त होतें. शिवाय ही गोष्ट पुढच्या इतिहासा-

वरूनही सिद्ध होतें. कारण शहरांचा प्रतिनिधि पाठविण्याचा हा हक्क जरी ह्यावेळीं कायम झाला नाहीं, तरी पुढें १२९५ सालीं तो कायमचा स्थापन झाला.

ह्याच्या उलट स्थितींत उलट गोष्ट घडून येते हें स्पेनच्या इतिहासावरून दिसून येतें. कारण तेथें ओसाड जमिनींची वसाहत चालली असतां व्यापारी वस्त्यांना जे राजकीय हक्क दिले होते, ते पुढें तेथें उद्योगवृद्धि न झाल्यामुळें लवकरच नष्ट झाले.

६६. ज्या सहक्रियोत्तेजक मूलकारणापासून सामान्य सामाजिक संयोगाची उत्पत्ति होते त्याच कारणामुळें पुढें त्या सामान्य संयुक्तसमूहांत विशिष्ट संयुक्तसमूह कसे उत्पन्न होतात हें लक्षांत आणणें मोठें बोधप्रद आहे. कारण ज्याप्रमाणें बाह्ययुद्धशीलतेमुळें सगळ्याच समाजाची संघटना उत्पन्न होऊन वृद्धिंगत होत जाते, त्याप्रमाणें अंतर्युद्धशीलतेमुळें त्या समाजाच्या भागांची संघटना उत्पन्न करून ती वृद्धिंगत होते. आणि जेव्हां ते भाग उद्यमशील असल्यामुळें स्वभावतः युद्धपराङ्मुख असतील, तेव्हां देखील त्यांच्या संबंधानें असेंच होतें. वाढत जाणारे जे लोकसंघ शहरांतून राहत असून, करारप्रमाणें कामें करून द्यावयाचीं अशा रीतीचा ज्यांचा आयुःक्रम असतो, त्यांच्या इतिहासाकडे पाहतां असें दिसतें कीं, त्यांच्या देखील नियामक रचनांची जी वाढ होते ती सभोंवतालच्या युद्धशील संघांशीं जेव्हां त्यांचा सारखा झगडा चाललेला असतो, तेव्हांच होते. कशी ती पहा.

ह्यासंबंधानें पहिली गोष्ट आपल्या दृष्टीस अशी पडते कीं, व्यापाऱ्यांच्या ह्या वसाहती महत्त्वाच्या बनून

त्यांस राजाकडून सनदा मिळाल्यानें त्यांस अर्धवट युद्ध-शील अशी स्थिति प्राप्त झाली. कारण लष्करी जमीन-दारांचीं कुळें जसले कर देत तसले हे लोक देऊं लागले; आणि त्यांच्याप्रमाणें लढाईच्या वेळीं लढण्यास जाण्याची जबाबदारी ह्यांच्यावरही असे. स्पेनमधील सनदी शहरांत असें करण्याची जबाबदारी प्रत्येक रहिवाशावर असे. फ्रान्सांतही तसेंच असे. आणि स्काटलंदांत प्रत्येक नागरिक राजाचें प्रत्यक्ष लष्करी कूळ म्हणून समजला जाई.

ह्यासंबंधानें दुसरी गोष्ट अशी दृष्टीस पडते कीं, हीं उद्योगधंद्याचीं शहरें सभोंवतालच्या लष्करी जमीनदारी असलेल्या ग्रामसमूहांप्रमाणेंच बाहेरचे लोकांस येऊन राहण्यास लालची दाखवूं लागलीं, आणि आपल्या सभोंवतीं तटबंद्या उभारूं लागलीं. फ्रान्सांत तेराव्या शतकांत झालें त्याप्रमाणें हीं शहरें कधीं कधीं स्वतंत्र राज्येंच बनलीं, आणि लढाई करण्याचा हक्क चालवूं लागलीं. उदाहरणार्थ, इंग्लंदांत प्रारंभीं प्रारंभीं समुद्रकांठचीं शहरें एकमेकांशीं लढाया करीत असत.

त्यांच्यासंबंधानें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ही कीं, त्यांस राजाच्या सनदेनें किंवा अन्य रीतीनें स्वताचा स्थानिक कारभार करण्याचा हक्क आलेला असून तीं आपापसांत स्वसंरक्षणार्थ संयोग बनवीत असत. इंग्लंद, फ्रान्स, स्पेन व जर्मनी या देशांत कधीं राजाच्या संमतीनें, कधीं तो नाखुश असतांही, आणि कधीं त्यास न जुमानतां, गिल्ड किंवा लोकांचे जमाव उत्पन्न झाले, आणि ते आप्तांआप्तांमध्येंच असल्यामुळें त्यांस लवकरच स्वसंरक्षणार्थ बनवलेल्या शेजा-

ऱ्याशेजाऱ्यांच्या जमावांचें आणि व्यापारी जमातींचें स्वरूप आलें, आणि ते स्वसंरक्षणार्थ असल्यामुळें त्यांसच पुढें म्युनिसिपल संघटनांचें स्वरूप येऊन त्या संघटना शहरांचें त्यांजवर हल्ले करणाऱ्या सरदारांपासून संरक्षण करूं लागल्या.

आणखी एक गोष्ट अशी कीं, जेथें ह्या उद्यमशील जमातींमध्यें आणि त्यांच्या सभोंवतालच्या युद्धशील लोकांमध्यें जोराचे तंटे वारंवार होत असतील, तेथें असल्या अनेक जमाती स्वसंरक्षणार्थ एकत्र होऊं लागल्या. ह्याचीं उदाहरणें स्पेन, जर्मनी, हालंद व फ्रान्स ह्या देशांच्या इतिहासांत सांपडतात. एवंच असें दिसून येतें कीं, सगळ्याच्या सगळ्या राष्ट्राला इतर राष्ट्रांपासून स्वसंरक्षणार्थ जसल्या व्यवस्था व चळवळी कराव्या लागतात तसल्याच राष्ट्रामध्यें इकडे तिकडे जे औद्योगिक समूह उत्पन्न होत असतात त्यांना स्थानिक कलहापासून स्वसंरक्षणार्थ कराव्या लागतात.

ह्या ठिकाणीं ह्यापासून गर्भित होणाऱ्या ज्या गोष्टीकडे आपणास विशेष लक्ष द्यावयाचें आहे ती ही कीं, युद्धशीलतेकडे पुनः पीछेहाट झाल्यानें उद्यमशीलतेस जर अशा रीतीनें धक्का बसला, तर लोकसत्तेची वाढ खुंटून जाते. विशेषतः, इटालींतील लोकसत्ताकांत झालें त्याप्रमाणें, स्वसंरक्षणार्थ चाललेल्या लढायांस जर इतरांचा अतिक्रम करण्याच्या लढायांचें स्वरूप आलें, आणि इतर प्रांत व शहरें जिंकून घेण्याची महत्त्वाकांक्षा जर उत्पन्न झाली, तर औद्योगिक जीविताला योग्य अशी जी स्वतंत्र सरकाररचना तिला युद्धशील जीविताला योग्य अ-

शा जुलमी सरकारी पद्धतीचें स्वरूप येतें, किंवा तिची तिच्यांत भेसळ तरी होते. अथवा स्पेनदेशांतल्याप्रमाणें जेथें शहरें व सरदार ह्यांच्यामध्यें पुष्कळ काळपर्यंत तंटे चालतात, तेथें स्वतंत्र संस्थांच्या वृद्धीस टाळा बसतो; कारण अशा परिस्थितींत शहरांतून मोठी लोकसंख्या उत्पन्न करणारी व्यापारविषयक भरभराट उत्पन्न होऊं शकत नाहीं, किंवा तिजबरोबर येणारी जी मनःस्थिति ती उत्पन्न होत नाहीं. यावरून असें अनुमान निघतें कीं, इंग्लंदांत औद्योगिक भरभराटीबरोबर जी लोकसत्तेची वृद्धि झाली ती ह्यामुळें बऱ्याच अंशीं झाली कीं औद्योगिक समूह आणि त्यांच्या सभोंवतालचे फ्यूडल समूह यांच्यामध्यें इतर देशांच्या मानानें लढाया कमी होत असत. त्यामुळें व्यापारी जीविताच्या परिणामांमध्यें तेथें कमी विघ्न आलें; आणि शहरांतील व खेडेगांवांतील सरकारांना मुख्य सरकारास आळाबंदा घालण्यासाठीं जुळण्यास बंदी होत नसे.

६७. आतां लोकांना राजकीय सत्ता कशी प्राप्त होत असते ह्याचा आपण ज्यास्त विस्तृत रीतीनें विचार करूं. कोणत्याही संघटनेच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, एकाद्या व्यवस्थेपासून प्रारंभीं जें कार्य होत असतें, तेंच शेवटींही होतें असें नाहीं. प्रस्तुत संघटनेच्या संबंधानेंही असेंच आहे. लोकसत्तेच्या वृद्धीस जो प्रारंभ झालेला दिसतो तो हक्कांच्या प्रतिपादनापासून न होतां कर्तव्य करण्यास अनुमति दिल्यापासून झालेला दिसतो. आथेन्समध्यें क्लिस्थेनिसच्या राज्यक्रान्तीनें जें रूपान्तर घडून आलें, तें कर लादणें आणि लष्करी नोकरी क-

रून घेणें, ह्यांसाठीं टोळ्या व ज्ञाती ह्यांच्या नव्या मांडणीच्या रूपानें घडून आलें. रोममध्यें देखील सर्वियस टुलियसच्या कारकीर्दींत सरदारीसत्तेस जें विस्तृत स्वरूप आलें, तें सामान्यपणें अशाच स्वरूपानें आलें. पण "जबाबदारी मूळ आणि सत्ता तिजपासून उत्पन्न झालेली" हा जो त्या दोहोंमधील मूळ संबंध तो उत्तमरीतीनें समजण्यास पुनः एकदां आपल्यास मूळाकडे गेलें पाहिजे.

कारण मूळचें राजकीय संमेलन म्हटलें म्हणजे तत्त्वतः युद्धाचें कौन्सिल असतें, आणि तें अग्रणींचें बनलेलें असून ते आपल्या अनुयायांच्या समक्ष चर्चा करीत असतात, ही गोष्ट ध्यानांत आणिली, आणि शिवाय, प्रारंभीं प्रारंभीं, वयांत आलेले सगळे नागरिक लढवय्ये असल्यामुळें, त्यांस संरक्षणाच्या व हल्ल्याच्या दोन्ही कामीं आव्हान केलें जातें ही गोष्ट ध्यानांत आणिली, म्हणजे, आपल्या लक्षांत असें येतें कीं, प्रारंभीं सशस्त्र नागरिक जे युद्ध-कौन्सिलाच्या ठिकाणीं हजर राहतात ते जी लष्करी नोकरी करणें त्यांस भाग असतें त्या नोकरीसाठींच हजर असतात, आणि ते अशा रीतीनें एकत्र जमल्यावर जी सत्ता चालवितात ती आनुषंगिक असते. हा क्रम नियमित आहे ह्याबद्दलचा पुरावा पुढच्या पायऱ्यांवर सांपडतो; कारण जेथें राजकीय विघटना झाल्यानंतर राजकीय संघटना नव्यानें सुरू होते, तेथें हाच क्रम दिसून येतो. उदाहरणार्थ, इटालियन शहरांत मूळचीं पार्लमेंटें शहराच्या संरक्षणार्थ बलावीत असून त्यांत शस्त्र धरण्यास क्षम अशा सर्व

लढवय्यांचा समावेश होत असे, म्हणजे, लढण्याची जबाबदारी प्रथम येत असे, आणि मत देण्याचा अधिकार मागून येत असे. बरें, संमेलनाचे ठिकाणीं हजर राहण्याचें हें कर्तव्य एकदां स्थापन झालें, म्हणजे मग तें इतर कामासाठीं जमणाऱ्या संमेलनाला देखील लागू पडतें; आणि ह्याचीं उदाहरणें इंग्लंद, हालंद, स्वीडन, आणि नॉर्वे या देशांच्या इतिहासांत सांपडतात.

लोकांचें कर्तव्य आणि लोकांची सत्ता ह्यांमधील हा मूळचा संबंध ध्यानांत घेतल्यावर, पुढें उद्यमशीलतेच्या उन्नतीबरोबर लोकसत्ता जेव्हां पुनः जिवंत होऊं लागते, तेव्हां हा संबंध पुनः कसा दृष्टीस पडतो हें आपल्या ध्यानांत ज्यास्त स्पष्टपणें येतें. कारण ह्या ठिकाणीं देखील, "जबाबदारी प्रथम आणि सत्ता मागून" हा क्रम आपल्या दृष्टीस पडतो. शहरांचे प्रतिनिधि जे सार्वजनिक कामांत अंग घालूं लागतात, ते राजाला मदत करण्यासाठीं म्हणून, आणि सामान्यतः लढाईसाठीं मदत करण्यासाठीं म्हणून, घालूं लागतात. म्हणजे पूर्वी जें सरलस्वरूपानें दिसत असतें तें आतां पुनः संमिश्रस्वरूपानें दिसूं लागतें. हें रूपान्तर कसें होतें तें पाहण्यासाठीं आपण एथें क्षणभर थांबूं या.

शास्त्यांना जीं उत्पन्नें मिळत असतात तीं प्रथम सर्वांशीं आणि मागून कांहीं अंशीं नजराण्याच्या रूपानें मिळत असतात. सार्वजनिक कामांची चर्चा करण्याकरितां जेव्हां संमेलनें भरतात तेव्हांच साहजिकरीत्या हे नजराणे देण्याचें व घेण्याचें काम चालतें, आणि प्रथम प्रथम लढाईच्या कामासाठींच असलीं संमेलनें भरत अ-

सून हे नजराणे लढाईच्या खर्चासाठीं असतात. लढायांत यश आल्यामुळें जेव्हां युद्धशील राजा लहान लहान समाजांचा मिळून एक मोठा समाज बनवितो, म्हणजे, जेव्हां राज्याचा विस्तार होऊन राजाचा अधिकार ज्यास्त जोरदार होतो, आणि त्यामुळें जेव्हां अर्धवट आपखुशीनें दिलेल्या देणग्यांस जबरीच्या देणग्यांचें स्वरूप येतें, तेव्हां सामान्यतः ह्या जबरीच्या मागण्या मर्यादेबाहेर जाऊन लोक त्यांस विरोध करूं लागतात; तो विरोध सामान्यतः अप्रत्यक्ष असून तशाच प्रसंगीं अप्रत्यक्ष बनतो. त्यायोगानें दंगे होऊन राजाची सत्ता फारच दुर्बल झाल्यास, पुनः जेव्हां शांतता उत्पन्न होते तेव्हां ती बहुधा अशा करारावर होते कीं, पूर्वींची स्वेच्छेनें देणग्या देण्याची जी चाल ती पुनः स्थापन करावी. उदाहरणार्थ, स्पेनदेशांत पहिल्या **सां**कोच्या मृत्यूनंतर जेव्हां राजकीय तंटे झाले, तेव्हां व्हालाडॉलिड एथें जे बत्तीस ठिकाणचे प्रतिनिधी जमले, त्यांनीं असें ठरविलें कीं राजानें नेहमींच्याहून ज्यास्त मागणी केल्यास मागावयास येणाऱ्या जासुदास ठार करावें; आणि राजाविरुद्ध एक तोतया त्यावेळीं उत्पन्न झाला असल्यामुळें त्याच्या विरुद्ध शहरांची मदत मिळविण्यासाठीं ह्या गोष्टीस तो कबूल झाला. असल्याच प्रसंगीं फ्रान्सांत असेंच झालें. इंग्लंदांत **जॉन** राजाच्या कारकीर्दींत राजापासून 'माग्नाचार्टा' नामक ज्या प्रसिद्ध सनदेवर तेथील लोकांनीं सही करवून घेतली, तिचें एक कलम प्रजेच्या संमतिवांचून राजानें कर बसवूं नयेत असें होते.

सारांश, पाहिजे तशा मागण्या करण्यास राजांस जे-

व्हां प्रतिबंध होऊं लागला, तेव्हां पैशाचा पुरवठा मिळविण्यासाठीं म्हणून राजे हीं संमेलनें मुख्यत्वेंकरून भरवूं लागले; आणि अशा रीतीनें प्रमुख लोक आणि लोकांचे प्रतिनिधि एकत्र जमण्याचा मुख्य उद्देश पैसे गोळा करण्याबद्दल किंवा कर बसविण्याबद्दल संमति द्यावयाची हा होऊन बसला.

६८. कोणत्या अटींवर कर द्यावयाचे हें ठरविण्याचें सामर्थ्य आलें म्हणजे मग कायदे करण्यासाठीं एकत्र जमण्याचें सामर्थ्य आणि हक्क हीं अनुक्रमें येतात. हा संबंध समाजोत्क्रमणाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर देखील अर्धवट रीत्या दिसून येतो. देणग्या द्यावयाच्या आणि दाद लावून घ्यावयाची ह्या दोन गोष्टींचें पहिल्यापासून साहचर्य आढळून येतें. उदाहरणार्थ, काश्मीरचा राजा गुलाबसिंग ह्याच्याबद्दल असें सांगतात कीं, मोठ्या गर्दींत देखील हातांत रुपया घेऊन, " महाराज अर्ज करावयाचा आहे " असें ओरडलें म्हणजे तिकडे त्याची नजर जात असे. इंग्लंदांत देखील राजाचा दरबार जरी न्यायाचें मुख्य कोर्ट म्हणून समजलें जाई, तरी जो नजराणा आणणार नाहीं त्यास तेथें प्रवेश मिळत नसे. यूरोपांतील इतर देशांतही ही चाल पूर्वीं नजरेस येई. राजकीय मुख्याला मदत करावयाची आणि त्याच्याकडून स्वसंरक्षण करून घ्यावयाचें ह्यांमध्यें अशा प्रकारचा मूळसंबंध असल्यामुळें, पार्लमेंतीय संस्था उत्पन्न झाल्या म्हणजे त्या ज्या गोष्टी करितात त्यांची उपपत्ति कशी लावावयाची हें स्पष्ट होतें. स्वार्थबुद्धि ही प्रत्येकाच्या अंगीं खिळलेळीच असल्यामुळें ह्या संस्था आणि

राजे लोक ह्या दोघांचाही असा प्रयत्न चालत असतो कीं, साधेल तितकें थोडें द्यावयाचें आणि मिळेल तितकें ज्यास्त मिळवावयाचें. ह्याचीं उदाहरणें फ्रान्स, स्पेन, आणि इंग्लंद या तिन्ही देशांच्या इतिहासांत सांपडतात.

फ्रान्स देशांत १३५७ सालीं पांचव्या चार्लस राजानें आपल्या हक्कांचे स्टेट्स जनरल नामक तेथील पार्लमेंतानें अतिक्रमण केलें ह्या सबबीवर जेव्हां तीस हांकून लाविलें आणि नाण्यांत पूर्वींपेक्षांही ज्यास्त भेसळ घालून पैसे उत्पन्न केले, तेव्हां पारीसमध्यें बंड उद्भवून त्याचा जीव देखील धोक्यांत आला; त्यावरून त्यानें पार्लमेंट पुनः बलावून पूर्वींच्या सर्व मागण्या कबूल केल्या, आणि मग पार्लमेंतानें त्यास लढाईसाठीं रकम देण्याचें कबूल केलें. पुढें १३६६ त पार्लमेंतानें असा ठराव केला कीं, नाण्यांतील भेसळ राजा काढील तरच त्यास आह्मी कर बसविण्याची परवानगी देऊं. स्पेन देशांतही अशीच स्थिति आढळून येते. तेथील राजे ठराविक करापेक्षां ज्यास्त कर लादावयास नेहमीं पहात आणि त्यामुळें त्यांस वरचेवर विरोध करणें लोकांस भाग पडे. शेवटीं १३२८ सालीं ११ व्या आलफान्सो राजानें कोर्टिस नामक तेथील पार्लमेंटच्या संमतीशिवाय कर वाढवावयाचे नाहींत अशी कबुली दिली; पण ती फारशी पाळलेली दिसत नाहीं. कारण १३९३ सालीं त्या सभेला तिसऱ्या हेन्रीपासून तसलीच कबुली पुनः करून घ्यावी लागली. इंग्लंदांतही असेंच चाललें होतें हें सर्वांस महशूरच आहे. राजांनीं लोकांचीं गऱ्हाणीं न ऐकतां कर बसवावे, आणि पार्लमेंतानें “ प्रथम अ-

न्यायाची दुरुस्ती आणि मागून पैसे" असें नेहमीं म्हणत असावें, असें सारखें चाललें होतें.

लोकसत्तेची स्थापना होणें हें ह्या कलहांच्या परिणामावर अवलंबून होतें; आणि ही गोष्ट फ्रान्स व स्पेन एथील पार्लमेंताच्या इतिहासांची इंग्लंदीय पार्लमेंताच्या इतिहासाशीं तुलना करतां दिसून येते. कोर्टिसच्या इतिहासावरून असें दिसतें कीं त्या सभेनें राजाच्या पैशाबद्दलच्या विनंत्या मान्य किंवा अमान्य करण्याचा आणि त्याच्यावर अटी लादण्याचा हक्क प्रथम स्थापिला आणि मागून कांहीं काळपर्यंत कायम राखिला; पण शेवटीं राजा त्यांच्या अटी मान्य करीनासा झाला. ही गोष्ट पहिल्या चार्लस राजाच्या वेळीं घडली. तो त्यांच्या विनंत्यांस उत्तरें देण्याचें टाळूं लागला; म्हणून १५२३सालीं प्रतिनिधींनीं असा हट्ट धरिला कीं, राजाकडून उत्तरें मिळाल्याखेरीज त्याला पैसे द्यावयाचे नाहींत. पुढें १५२५ त तसें त्यानें करावें असा सामान्य कायदाही त्यांनीं पास केला; पण राजानें त्यांस जुमानिलें नाहीं; आणि त्यानंतर कोर्टिसचा अधिकार कमी होत चालला. फ्रान्सांतही सामान्यतः असेंच झालें. तेथें १४३९ सालीं सातव्या चार्लस राजानें स्टेट्स् जनरल कडून असें कबूल करून घेतलें कीं कांहीं विशिष्ट कर राजास त्यांच्या संमतीखेरीज नेहमीं बसवितां यावे; आणि नंतर अकराव्या लुईच्या कारकीर्दींत ह्या करांच्या रकमा वाढूं लागल्या. तेव्हां अर्थात् ती सभा बलावणें अनावश्यक होऊं लागलें, आणि बलाविलीच तरी तिचा अधिकार चालेनासा झाला. आतां इंग्लंदच्या इतिहासाकडे पाहतां

पार्लमेंताची स्थापना झाल्यानंतरच्या शतकांत राजाच्या टाळाटाळीवरून, लबाड्यांवरून, आणि खोडसाळपणामुळें जे त्याचे व पार्लमेंताचे वरचेवर झगडे झाले, तेणेंकरून राजा पार्लमेंताच्या अर्जांची दाद घेईपर्यंत त्यास पैसे न देण्याचा अधिकार त्या सभेकडे ज्यास्त ज्यास्तच येत गेला.

आणि इंग्लंदांत जे निरनिराळे राजकीय तट असत त्यांच्यामुळें वरील गोष्ट घडून येण्यास मदत झाली ही गोष्ट जरी खरी आहे, तरी ह्याठिकाणीं ज्या सत्यावर विशेष जोर द्यावयाचा तें हें कीं, वरील गोष्टीला मुख्य कारण स्वतंत्र अशी औद्योगिक लोकसंख्या वाढली हें झालें. प्रथम लहान लहान जमीनदारांस जेव्हां राजा कित्येक प्रसंगीं बलावूं लागला तेव्हां त्यावर्गाचें महत्त्व वाढत आहेसें दिसू लागलें; आणि मागून १२९५ च्या पार्लमेंतांत हजर राहण्याविषयीं शहरांच्या प्रतिनिधींस जें निमंत्रण त्यानें केलें त्या निमंत्रणांतील मजकुरावरून ते बरेच श्रीमान् झाले असून त्यांच्यापासून पैसे मिळविण्याच्या उद्देशानें त्यानें तें केलें असें दिसतें. याच्या अगोदरच राजानें लढायाकरितां पैसे मिळविण्यासाठीं शहरांतून व प्रांतांतून आपले गुमास्ते पाठविलेले होते. ह्याच्याच अगोदर पैसे मागण्यासाठीं मोठालीं शहरें, बाजार असलेलीं शहरें, आणि खेडींपाडीं, यांचीं प्रांतिक कौन्सिलें बलाविलेलीं होतीं. आणि जेव्हां १२९५ सालीं मोठें पार्लमेंत बलाविलें तेव्हां त्याबद्दल असें कारण दाखविलें होतें कीं वेल्स, स्काटलंद, आणि फ्रान्स ह्यांच्याशीं चाललेल्या लढायांमुळें राज्याला भीति उत्पन्न झाली आहे.

ह्याचा तात्पर्यार्थ असा कीं, ज्यास्त पैसे मिळविण्यासाठीं जिल्ह्याप्रमाणेंच शहरांचाही प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क राजाकडून कबूल करण्यांत आला.

स्काटलंदांतही असेंच झालें. शहरांचे प्रतिनिधी जे तेथें प्रथम बोलाविले, ते १३२६ सालीं ब्रूसला जेव्हां लढाईच्या खर्चासाठीं पैसे गोळा करण्याचा प्रसंग आला तेव्हां बोलाविले.

ह्या एकंदर हकीकतीवरून दोन गोष्टी व्यक्त होतात. एक ही कीं, कर्तव्य मूळचें असून सत्ताही तज्जन्य आहे; आणि दुसरी ही कीं, जी वाढत जाणारी लोकसंख्या जबरीच्या सहक्रियेच्या ऐवजीं स्वैच्छिक सहक्रियेनें आपलें जीवित चालविते तिच्या हातून, म्हणजे, कांहीं अंशीं लहान लहान जमीनदार आणि त्याच्याहूनही ज्यास्त अंशानें शहरांतील व्यापारी वर्ग, ह्यांच्या हातून प्रतिनिधिसत्तेची उत्पत्ति होते.

६९. तथापि हा प्रश्न राहतोच कीं, प्रतिनिधिसभा ही सल्लागारमंडळापासून भिन्न कशी होते? युद्धाचीं कौन्सिलें हें जें मूळ स्वरूप तें कायम राहिल्यामुळें राष्ट्रीय संमेलनें प्रारंभीं संमिश्र असत. उदाहरणार्थ, स्पेन देशांत सरकारच्या निरनिराळ्या शाखांची मिळून एकच सभा बनलेली असे. जिल्ह्यांचे सरदार राजाच्या अनेक लहान लहान कुळांच्या वतीनें सभेस येत असून ते मोठाल्या कुळांसमवेत एकत्र बसून मतेंही एकत्र देत असत. फ्रान्स देशांतही असेंच असे; आणि ह्याचें कारण हें कीं, शहरांची आणि प्रांतांची स्थिति पूर्वीं कायद्याच्या दृष्टीनें सारखीच असे. तर, मग, प्रतिनिधिसभा

आणि सल्लागारमंडळें हीं कोणत्या परिस्थितींत परस्पर भिन्न होतात ? ह्या प्रश्नास फारसें समाधानकारक उत्तर मिळत नाहीं.

अगदीं प्रारंभींच हीं दोन मंडळें भिन्न होण्याच्या कलाचा रंग दिसून येतो, आणि त्यास कारण कार्यवैचित्र्य हें दिसून येतें. उदाहरणार्थ, क्यारोलिंजियन घराण्याच्या वेळीं फ्रान्सांत दोन वार्षिक संमेलनें होत असत त्यांपैकीं मोठ्यासंमेलनाला सशस्त्र नागरिकांना हजर राहण्याचा हक्क असून, धाकटें संमेलन मोठाल्या लोकांचें बनलेलें असे, आणि तें विशेष महत्त्वाच्या कामाचा विचार करीत असे. स्काटलंदांतही अशाच कारणावरून हीं दोन मंडळें पृथक् झाल्याचा पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, १३६७-६८ सालीं राष्ट्राच्या तीन शाखांचे लोक जमल्यावर त्यांनीं काटकसर व सोय हीं साधण्यासाठीं पार्लमेंत भरवावें एतदर्थ कांहीं लोकांस निवडिलें आणि त्याच्या दोन शाखा केल्या. एक राजाच्या व राज्याच्या सामान्य कामांची व्यवस्था लावण्यास, आणि दुसरी लहानशी शाखा अपिलांचा निकाल करण्यास. आतां इंग्लंदच्या इतिहासाकडे पाहतां सायमन आव्हमांटफर्टच्या पार्लमेंताबद्दल केलेल्या नियंत्रणांत बडे लोक आणि प्रतिनिधी ह्यांमध्यें भेद केलेला जरी आढळून येत नाहीं, तरी नंतर एका पिढीनें पार्लमेंत कायमचें स्थापन झालें तेव्हां असा भेद केलेला आढळतो; त्यांत बड्यांच्या निमंत्रणांत "सल्ल्यासाठीं" असें म्हटलेलें आढळतें, आणि प्रतिनिधींच्या निमंत्रणांत "कामें करणें आणि संमति देणें यांसाठीं" असे शब्द आढळतात. हे दोन प्रकार-

चे लोक पृथक् पृथक् होण्यास कारणेंही होतीं. एक कारण भाषाभेद; बड्यांची भाषा नार्मन आणि छोट्यांची साक्सन. दुसरें वर्गभेद; बड्यांस छोट्यांच्या बरोबर बसणें कमीपणाचें वाटे, आणि छोट्यांसही त्यांच्या समोर बसणें कसेंसेंच वाटे. शिवाय निरनिराळ्या दर्जाच्या लोकांवर करांचें प्रमाण निरनिराळें असे, आणि त्यामुळें त्यांनीं आपापल्या बोजाचा पृथक् पृथक् विचार करणें सोईवार पडे. शिवाय असें वाचण्यांत येतें कीं, आपल्यावरच्या करांस संमती दिल्यावर त्यांचें काम राहिलें नसल्यामुळें बाकीचें पार्लमेंत राष्ट्रीय कामांचा विचार करण्यासाठीं तसेंच बसून राहिलें तरी ते निघून जात. या शेवटच्या गोष्टीवरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, प्रतिनिधिमंडळ आणि सल्लागारमंडळ हीं पृथक् होण्यास जरी अन्य कारणें होत असलीं तरी मुख्य कारण कर्तव्यभेद हेंच झालेलें आहे.

एवंच प्रतिनिधिमंडळ प्रथम फारसें महत्त्वाचें नसून, आणि समाजांतील स्वतंत्र लोकवर्ग संख्येनें व महत्त्वानें वाढत जाऊन त्याच्या अर्जास ज्यास्त ज्यास्त मान मिळाल्यामुळें, ते ज्यास्त वरचेवर मान्य होऊं लागल्यामुळें आणि त्याप्रमाणें कायदे होऊं लागल्यामुळें त्या मंडळाची सत्ता वाढत जाऊन, अखेरीस उद्यमशील लोकवस्तीच्या कल्पना व मनोभावना ज्यास्त ज्यास्त व्यक्त करून दाखविणारा असा तो नियामकसंस्थेचा भाग होऊन बसला म्हणजे, राजा आणि पार्लमेंताची वरची शाखा हीं जबरीच्या सहक्रियेचें जें प्राचीन साम्राज्य त्यापासून उत्पन्न झालेलीं असून पार्लमेंताची जी

खालची शाखा ती स्वैच्छिकसहक्रियेचें जें आधुनिक साम्राज्य त्यापासून उत्पन्न झालेली आहे; आणि ही शाखा ज्या लोकांचें जीवित ठराविक किंवा जन्मतःसिद्धस्थितीच्या ऐवजीं ठरवलेल्या कराराबरहुकूम चालतें अशा लोकांच्या इच्छा ज्यास्त ज्यास्त प्रमाणावर अमलांत आणीत असतें.

ह्या प्रकरणाची गोळाबेरीज करण्यापूर्वीं कोणाचा गैरसमज होऊं नये एतदर्थ असें सांगणें जरूर दिसतें कीं आलीकडे जीं प्रतिनिधिमंडळें एकदम निर्माण केलेलीं आहेत त्यांचा इतिहास एथें देण्याची आवशकता नाहीं. मूळ देशांतून आणिलेल्या दंतकथांस अनुसरून जाणून बुजून बनवलेलीं जीं वसाहतींतील कायदेकानू करणारीं मंडळें त्यांवरून सेनेटें व प्रतिनिधिमंडळें ह्यांची उत्पत्ति अगदीं मर्यादित अर्थानें उदाहृत होत असते; कारण सामग्री आणि परिस्थिति अनुकूल असेल त्या मानानें जनकसमाजांतील रचना जन्यसमाजांत कशा पुनरुत्पादित होतात एवढेंच त्यावरून दिसतें; पण ह्या रचना मुळीं कशा उत्पन्न झाल्या हें कांहीं दिसत नाहीं. जेथें राज्यक्रान्ति होऊन जुलमी अमलाखालीं राहिलेले लोक, दुसऱ्यांचें अनुकरण करून, प्रतिनिधिसंस्था स्थापन करण्यास प्रवृत्त होतात त्यांचाही एथें उदाहरणादाखल उपयोग नाहीं; कारण एथें आपणास विचार कर्तव्य आहे तो केवळ असल्या मंडळांच्या हळूहळू होणाऱ्या उत्क्रमणाचा होय. असो. आतां प्रस्तुत प्रकरणाची गोळाबेरीज करूं.

"एकांत तीन" अशा प्रकारच्या राजकीय घटनेचें जें

तिसरें अंग तें प्रारंभीं निष्क्रिय असलें तरी श्रेष्ठ असून, यौद्धिक चळवळीला अनुरूप अशी संघटना वाढत जाईल तसें जरी तें ज्यास्त ज्यास्त अंकित होत जातें, तरी लढाई नेहमींच व्हावयाची बंद झाली म्हणजे त्यास पुनः सत्ता प्राप्त होऊं लागते. म्हणजे, अंकितपणा कमी कमी आवश्यक होत जाईल तसा तो सैलावत जातो. स्थानिक किंवा सामान्य शास्त्याबद्दलची पूज्यबुद्धियुक्त भीति आणि त्याबरोबर होणारीं राज्यनिष्ठेचीं प्रदर्शनें, हीं कमीं होऊं लागतात; आणि दैविक-उत्पत्तिविषयक कल्पनेपासून उत्पन्न होणारा दरारा जेथें नष्ट होतो तेथें तर ही गोष्ट विशेषतःच घडून येते. जेथें जीवित गांवढळ असेल तेथें जुनीं नातीं कांहीं अंशीं बदलेल्या स्वरूपांनीं पुष्कळ काळपावेतों कायम राहतात. पण ज्या ज्ञाती किंवा शेतकरीसमूह शहरांत एकत्र येऊन राहतात, त्यांच्यांत बाहेरच्या लोकांची भेसळ झाल्यामुळें ते अनेक तऱ्हांनीं पूर्वीहून कमी नियम्य होतात, आणि त्यांना त्यांच्या जीवितक्रमावरून स्वतंत्रपणाचें वळण ज्यास्त ज्यास्त लागूं लागतें. युद्धशीलतेनें व्यवस्थित व घनीभूत झालेल्या राष्ट्रांत अशा रीतीनें वाढणारे लहान औद्योगिक समूह इतरांपासून स्वभावानें भिन्न व्हावयाचे ते हळूहळूच होतात. पुष्कळ काळपर्यंत त्यांच्या घटना आणि तेथील लोकांच्या इतर भागांशीं जे त्यांचे संबंध ते कांहीं अंशीं युद्धशीलच राहतात. प्रथम सनदी शहरें वस्तुतः सरदारी गांवांसारखींच असतात, कारण तीं जमिनीबद्दल लष्करी कर देऊन लढाईचे मदतीसही जातात. शिवाय तीं आपल्यांतच स्वसंरक्षणासाठीं कम-

ज्यास्त प्रमाणानें जुलमी असे संघ बनवीत असतात. तद्वतच तीं वरचेवर शेजारच्या सरदारांशीं आणि एकमेकांशींही लढाया करीत असतात. सर्वांच्या संरक्षणासाठीं पुष्कळ शहरें मिळून सख्येंही कधीं कधीं बनवीत असतात. आणि ज्या ठिकाणीं शहरांची अर्धवट युद्धशील घटना कायम राहिली असेल, तेथें औद्योगिक वाढ आणि त्याबरोबरच होणारी लोकसत्तेची वृद्धि ह्या दोहोंसही धक्का बसतो.

पण जेथें कारागिरी आणि व्यापार ह्यांस उत्तेजक अशी परिस्थिति असेल, आणि त्यांत गढून गेलेली लोकवस्ती वाढत जात असेल, त्याठिकाणीं ही वस्ती एकंदर वस्तीचा जसा भाग बनत जाईल तशी आपलें वजन चालवूं लागते. राष्ट्राच्या मुख्यास द्रव्य देण्याचें आणि त्याच्या उपयोगीं पडण्याचें जें मुख्यकर्तव्य तें ते लोक पुष्कळ वेळां न खुशीनें करीत असून, त्याच्या मागण्या मोठाल्या येऊं लागल्या म्हणजे त्या मुळींच नाकारूं लागतात, आणि तसें ते करूं लागले म्हणजे राजा त्यांस खुश करण्याचे उपाय करूं लागतो. म्हणजे, त्यांजवर जबरदस्ती करण्याच्या ऐवजीं तो त्यांची संमति घेऊं लागतो. ज्या प्रसंगीं राजा अन्याय करून लोकांस क्षुब्ध करितो, आणि त्यामुळें त्याच्याकडून त्याचे लोक निघून जाऊन तो दुर्बल होतो, त्या प्रसंगीं हे लोक जुलमानें त्रासून गेलेल्या इतर लोकांबरोबर संगनमत करितात. लादलेल्या ओझ्यांस संमति देण्यासच प्रथम नेमिलेले प्रतिनिधी, लोकांचे पाठबळ वाढत जाईल त्या मानानें, राजानें आपल्या कांहीं तरी अटी कबूल करा-

ऱ्या म्हणून ज्यास्त ज्यास्त जोर धरूं लागतात; आणि त्यांची मदत मिळविण्यासाठीं त्याच्या विनंत्या मान्य करण्याचा परिपाठ वाढत गेल्यानें, कायदे करण्याच्या कामांत हातभार लावूं देण्याच्या प्रघातास सुरवात होते.

शेवटीं, क्रियावैसदृश्यामुळें त्या (क्रिया) करणाऱ्या भागांचें विभिन्नीकरण आणि विभजन अवश्यमेव होतें हा जो संघटनेचा सामान्य नियम त्यास अनुसरून पृथग्भवन उत्पन्न होतें. निवडलेले सभासद मध्यम राष्ट्रीय सभेस कांहीं अंशीं इतर सभासदांच्या कामांसारख्याच आणि कांहीं अंशीं त्यांहून भिन्न अशा कामासाठीं बलाविलेले असून ते इतरांपासून भिन्न होण्याचा कल दाखवीत असतात; आणि ज्या ठिकाणीं लोकवस्तीचा औद्योगिक भाग ज्यास्त ज्यास्त सत्ता मिळवीत राहील, त्या ठिकाणीं अखेरीस ह्या कलामुळें मूळच्या सल्लागार मंडळापासून भिन्न असें प्रतिनिधिमंडळ बनून जातें.

प्रकरण दहावें

प्रधानमंडळें

७१. शास्त्यानें आपल्यास मदत व्हावी एतदर्थ निवडलेले लोक सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवरच आढळून येतात; पण त्यावेळीं त्यांचे अधिकार आणि कर्तव्यें हीं अनिश्चित असून तीं बदलतही असतात. प्रथम ह्या मदतनीसांची निवड ठरविण्यास सुरक्षितता, किंवा सोय, किंवा आवड ह्यांबद्दलच्या विचाराव्यतिरिक्त कांहींच नसतें. म्हणून अगदीं भिन्न भिन्न रीतींनीं उत्पन्न झालेले प्रधान आपल्या नजरेस येतात.

कांहीं ठिकाणीं व काळीं नात्यावरून ही निवड होत असते; उदाहरणार्थ बचासी लोकांमध्यें नायकाचा भाऊ त्याचे हुकूम लोकांस कळवून त्यांची अंमलबजावणी करून घेत असतो; जपानमध्येंही बादशहाचा मुलगा त्याचा मुख्य प्रधान बनत असे; ईजिप्तमध्येंही दरबारांतील मुख्य कामगार राजाचे आप्त असत. जरी कांहीं ठिकाणीं कौटुंबिक मत्सरामुळें नातेवाईकांस असले अधिकार देत नाहींत, तरी इतर ठिकाणीं कौटुंबिक मनोभाव आणि भरंवसा, आणि कुटुंबाचें वर्चस्व राहावें अशी जी इच्छा असते तिच्यामुळें आप्त राजनिष्ठेनें वागतील असा बनलेला समज, ह्यांमुळें भाऊ, पुतणे, आणि इतर आप्त ह्यांस अधिकार द्यावासें राजास वाटतें.

राजाची स्वताची नोकरी करणारे किंवा त्याच्या वाड्यांत खपणारे नोकर लोक हळू हळू आणि मुकाट्यानें

दरबारी नोकर बनावे ही प्रवृत्ति वरच्याहून ज्यास्त सामान्य दिसते. जे शास्त्याच्या संनिध नेहमींच असतात त्यांना त्याच्याशीं इतरांस दळणवळण ठेवूं देणें किंवा न देणें, कांहीं तरी सांगून त्याचें मन दूषित करणें, आणि त्याच्या हुकुमांची बजावणी करण्याच्या कामीं मदत करणें किंवा विघ्न आणणें, ह्या गोष्टी करण्यास संधी सांपडतात; अशा रीतीनें त्यांच्या हातीं सत्ता येते आणि ते राजाचे सल्लागार किंवा कारभारी बनतात. ह्याचीं उदाहरणें अगदीं प्राचीन काळापासून नजरेस येतात. उदाहरणार्थ, प्राचीन ईजिप्त देशांत राजाच्या पंखेवाल्यांचा हुद्दा मोठा मानाचा असे, आणि तो राजपुत्र किंवा बड्या सरदारांचे मुलगे यांखेरीज इतर कोणास मिळत नसे. ते राजाचे मुख्य नोकर समजले जात, आणि समरांगणांत ते एक त्याचे हुकूम घेण्यास त्याजपाशीं हजर असत, किंवा सैन्याच्या एकाद्या भागाचें आधिपत्य करण्यास दूर जात. आसीरिया प्रांतात अशा रीतीनें उच्चपदास चढणारे नोकर राजाचे आप्त नसून त्याचे कंचुकी असत, आणि इराणांतही तसेंच असे. तेथें सरकारी मुख्य कामें त्यांच्याकडेच असत. आणि राजमंत्र्यांचें किंवा सेनापतींचें काम तेच करीत. पश्चिमेकडेही जर्मनी, फ्रान्स व इंग्लंद या देशांत प्राचीन काळीं कांहींअंशीं अशासारखीच स्थिति असे, आणि इंग्लंदांत अजूनही कांहीं अंशीं आहेच.

आप्त आणि नोकर यांव्यतिरिक्त राजा कधीं कधीं बातमी काढणें, सल्ला देणें आणि हुकूम अमलांत आणणें या कामीं मित्रांची योजना करीत असतो. याचें पु-

राणकालीं हीब्रयू लोकांत उदाहरण नजरेस येतें. उदाहरणार्थ, डेव्हिडच्या वेळीं अशी स्थिति असे. रोमन साम्राज्याच्या पहिल्या अमदानींतही ती आढळून येते. उदाहरणार्थ, आगस्टसच्या वेळीं त्याला मसलत देण्यास त्याचे मित्र असत; पुढें तो त्यांजकडे सरकारी महत्त्वाचीं कामें वांटून देऊं लागला, आणि त्यांचें त्यानें एक कौन्सिलच बनविलें.याच्या पुढें अशी स्थिति आढळून येते कीं,या "राजमित्रांपैकीं" कोणा तरी एकावर राजाचा मुख्य विश्वास जडूं लागला, आणि तो त्याच्या हातीं मुख्य सत्ता देऊं लागला. रशियामध्यें पीतर धि ग्रेत आणि लेफर्ट यांमधील संबंध, स्पेनमध्यें डॉन पीड्रो आणि अलबुकर्क यांच्यामधील नातें, आणि इंग्लंदांत दुसरा एडवर्ड आणि गाव्हेस्टन यांच्यांतील संबंध, यांवरून मित्रत्वापासून मुख्य अधिकार हातीं कसा येतो हें स्पष्ट दिसतें. कोठें कोठें स्त्रीपुरुषांचें प्रेमच या गोष्टीस कारण होत असतें. उदाहरणार्थ, स्पेन देशांत अलबुकर्क अधिकारभ्रष्ट झाल्यावर दरबारांतील सर्व हुद्दे राजाच्या राखेच्या आप्तांना मिळूं लागले. फ्रान्सांत पंधराव्या लुईच्या कारकीर्दींत सर्व अधिकार त्याच्या दोन राखांच्याच हातीं असे; आणि रशियांत दुसऱ्या क्याथराइन राणीच्या वेळीं तिचे एकामागून एक बनलेले जे जार तेच राजकीय सत्ता बळकावीत असत, त्यांतील कांहीं तर तिचे मुख्य प्रधान बनून वस्तुतः अनियंत्रित सत्ताधारी बनले.

स्वाभाविक रीत्या आणि दैविक रीत्या धर्मोपाध्याय हा राजास मदत करण्यास समर्थ मानला गेल्यामुळें तोही त्याचा मुख्य प्रधान होण्याचा संभव उत्पन्न होतो.

उदाहरणार्थ, ताहितियन लोकांत मुख्य प्रधान व मुख्य उपाध्याय एकच माणूस असे. आफ्रिकेंत एघारा नामक नीग्रो लोकांत उपाध्याय सेनापति असे. मेक्सिकोमध्यें उपाध्यायांच्या सल्ल्याविना राजे कोणतीच गोष्ट करीत नसत. ते सेनापतित्व करीत, राज्यकारभार पहात, राजास दुराचरणाबद्दल दोष देत, आणि तो न सुधारल्यास दुष्काळ, प्लेग, लढाई इत्यादिकांचा त्यास धाक घालीत. ग्वाटिमाला, व्हेरापाझ इत्यादि अन्य अमेरिकन स्थळीं असलींच उदाहरणें नजरेस येतात. प्राचीन ईजिप्त देशांत राजाचे मंत्री बहुधा उपाध्यायवर्गापैकींच असत. रोमन बादशहांच्या कारकीर्दींत उपाध्ये प्रधान आणि गुप्त सल्लागार बनत. मध्ययुगांत यूरोपामध्यें डॉमिनिकन आणि फ्रान्सिस्कन जोगी मोठालीं राजकीय कामें करीत. पुढें कार्डिनल लोक राजाचे कारभारी बनूं लागले. धर्माधिकाऱ्यांनीं अशा रीतीनें राष्ट्रीय अधिकार मिळविण्यास कोठें कोठें विशेष कारण असे. तें हें कीं प्राचीनकाळीं तेच लोक शिकलेले असत.

हे कारभारी, त्यांच्या अंगीं इतर कांहींही गुणविशेष असले तरी, प्रारंभीं बहुधा लढवय्ये असतातच आणि मूळच्या सल्लागार मंडळांत त्यांचा समावेश झालेला असतो, ही गोष्ट ध्यानांत घेऊन त्यांच्याबद्दल आपणास सामान्यतः असें म्हणतां येईल कीं ते राजाचे आप्त, स्नेही, नोकर, किंवा उपाध्ये असून त्यांचे त्याच्याशीं निकटसंबंध येत असतात; आणि कामाचा ताण पडला म्हणजे त्यास त्यांच्यापैकीं कोणी तरी मदतनीस म्हणून निवडणें भाग पडतें; आणि त्यांच्या नेमणुका व कामें हीं

प्रथम अनिश्चित आणि अनियमित असून त्यांस हळू-हळूच निश्चित स्वरूप येऊं लागतें.

७२. प्रधानांच्या आणि प्रधानमंडळांच्या संबंधानें पुष्कळ गोष्टी फार अनिश्चित असल्यामुळें त्यांजबद्दल सामान्य नियम जरी कांहींच बांधतां येत नाहींत, तरी त्यांच्यामध्यें बरेच नित्य असे कांहीं विशेष असून ते एथें थोडक्यांत सांगणें इष्ट दिसतें.

एकादा मुनीम विश्वासांतील असला म्हणजे तो आपल्या यजमानावर आपलें वजन बसवितो ही गोष्ट सर्वत्र दिसून येते. घरांतील देखील एकादा पुष्कळ वर्षांचा नोकर घराच्या मालकावर कधीं कधीं इतकें वजन पाडितो कीं तो बहुधा पुष्कळ बावतींत त्याच्याच धोरणानें चालतो; त्याच्याच कह्यांत राहतो म्हटलें तरी चालेल. राष्ट्रांतील जे मुख्य अधिकारी त्यांचेंही बहुधा असेंच असतें; आणि जेथें आनुवंशिक परंपरा स्थापन झालेली असते, तेथें विशेषच असतें. जो राजा लहान, किंवा आळशी, किंवा चैनी असून आपलीं कामें इतरांकडून करवितो, जो खाजगी आवडीमुळें किंवा पूर्ण भरंवशामुळें आपला अधिकार दुसऱ्याच्या हातीं देतो, तो कांहीं कालानें सरकारी कामासंबंधानें इतका गैरमाहीत बनतो किंवा तीं कामें करण्याच्या पद्धती इतक्या विसरून जातो कीं त्याचें त्याच्या प्रधानाच्या पुढें कांहीं चालेनासें होतें.

आनुवंशिकपरंपरेचें तत्त्व जेथें समाजांत सर्वत्र चालू असून त्यावरून त्याची संघटना ठरलेली असते, तेथें हे प्रधान किंवा राजप्रतिनिधि देखील वंशपरंपरेनें नेमीत असतात. इंग्लंदांत आणि स्काटलंदांत नार्मन विजया-

च्यापूर्वी व मागून मुख्य कोटावळा, फौजदार, बुटलेर, इत्यादिकांचे हुद्दे वंशपरंपरा असत. जपानांत प्रधानकीची आनुवंशिक परंपरा इतकी ठरलेली होती कीं त्यामुळें प्रधानाचें वर्चस्व खात्रीनेंच कायम रहात असे. राज्याचा अधिकार ज्या रीतीनें वंशपरंपरेचा ठरतो त्याच रीतींनीं ही गोष्ट बनून येत असते; आणि जेथें राजा एकांतांत राहत असल्यामुळें त्याचा सरकारी कामावरील ताबा ढिला होतो तेथें ती सहजच बनून येते.

आतां राजांप्रमाणें प्रधानही वंशपरंपरा अधिकारापन्न होऊं लागले म्हणजे कधीं कधीं त्यांजमध्यें मत्सर व तंटे उत्पन्न होऊं लागतात; आणि असें झालें म्हणजे राजांस सहजच अशी इच्छा उत्पन्न होते कीं प्रधान नेमावयाचे ते वंशपरंपरा अधिकार चालवूं शकणार नाहींत असेच नेमावे. ह्यावरून कधीं कधीं अविवाहित राहणारे उपाध्येच प्रधान म्हणून नेमिलेले आढळांत येतात. कधीं कधीं असल्याच हेतूवरून म्हणजे प्रधानाचें वर्चस्व आपल्यावर चालूं नये म्हणून, राजांनीं सरदार किंवा उपाध्ये यांस प्रधानकी न देतां सामान्य नागरिकांसच दिलेली आढळते. उदाहरणार्थ, फ्रान्सांत पंधराव्या आणि सतराव्या शतकांत जमीनदार वर्गाविरुद्ध नागरिकांवर मेहेरबानी दाखविण्याचें धोरण ठेविलें होतें.

पण असले मोठाले हुद्दे महत्त्वाकांक्षी आणि आपस्वार्थी अशा लोकांचे हातीं जाण्याचें राजास बंद करतां येण्यास त्याचें स्वताचें प्राबल्य बरेंच असलें पाहिजे; नाहींतर त्यास तशी बंदी करतां येत नाहीं. उदाहरणार्थ, प्राचीन ईजिप्त देशांत उपाध्यायवर्ग फार प्रबल अस-

त्यामुळें त्यांच्याच हातीं बहुतेक मोठाले राजकीय हुद्दे असत. युरोपांतही क्याथलिक धर्म प्रबल होता तोंपावेतों असेंच असे. इतर ठिकाणीं लढवय्येवर्गाचें प्राबल्य दिसून येतें. उदाहरणार्थ जपानांत आणि इंग्लंदांत लष्करी जमीनदारीच्या अमदानींत. आतां इतर अधिकाराच्या जाग्यांप्रमाणें ह्या राज्यकारभाराच्या जाग्यांबद्दलही लढवय्ये वर्गाचे मुख्य आणि उपाध्ये वर्गाचे मुख्य ह्यांमध्यें सहजच स्पर्धा चाललेली असते; कारण एका वर्गांतील लोक ऐहिक शास्त्याचे गुमास्ते म्हणून पुढें येत असतात आणि दुसऱ्यांतील पारलौकिक शास्त्याचे गुमास्ते म्हणून पुढें येत असतात; आणि त्यांपैकीं ज्या वर्गांतील लोकांच्या हातीं मुख्य मुख्य जागा बऱ्याच असतील तो वर्ग प्रबल बनतो.

ह्या विषयाचें ज्यास्त सविस्तर विवेचन करणें इष्ट असतें, आणि त्याला जरूर ती आधाररूपी सामग्री गोळा करण्याचें काम कमी कठीण असतें, तर प्रधानमंडळांची वाढ कशी होत जाते ह्याबद्दल एथें बरेंच सांगतां आलें असतें.

आतां हें खरें आहे कीं प्रधानमंडळांस सरलस्वरूपीं सुरवात होऊन तीं संयुक्त कशीं होतात—म्हणजे, नायकांचा जो एकच मदतनीस असून त्याला सर्व प्रकारची मदत करीत असतो त्याच्या ऐवजीं राजाचे अनेक मोगले हपीसर कसे उत्पन्न होतात, आणि राजाचीं विस्तृत व संमिश्र बनलेलीं कर्तव्यें ते आपल्यांत कशीं वांटून घेतात, हें पुष्कळ ठिकाणीं स्पष्ट करून दाखवितां येईल. प्रधानमंडळाच्या विभिन्नीकरणाबरोबर कां-

हीं प्रकारच्या परिस्थितींत त्यांचें जें संकलन चाललेलें असतें तें कसें होतें—म्हणजे, निरनिराळ्या खात्यांचे अधिकारी शास्त्यापासून पृथक् पृथक् हुकूम न घेतां ते एकत्र मिळून कसे घेऊं लागतात, हेंही दाखवितां येण्यासारखें आहे. तद्वतच, ह्या संयुक्तप्रधानमंडळास अधिकार आणि जबाबदारी हीं कोणत्या परिस्थितींत प्राप्त होतात ह्याबद्दलही विचार करतां येण्यासारखा आहे; आणि त्यावरून बहुधा असें दिसेल कीं राजाची जी सत्ता कमी होते आणि प्रधानमंडळाची वाढते ती औद्योगिक समाजाला योग्य अशी जी प्रतिनिधिसत्ताक राज्यव्यवस्था तिच्या अमदानींत वाढते. पण असल्या विवेचनापासून निष्पन्न होणारे सिद्धान्त निश्चित किंवा महत्त्वाचे असण्याचा संभव नसून त्यांसाठीं करावी लागणारी चवकशी मात्र त्रासदायक आणि असमाधानकारक होण्याचा संभव आहे.

एथें जे उद्देश आपणास साध्य करावयाचे आहेत त्यांकरितां वर निरूपिलेल्या सामान्य गोष्टी ध्यानांत आणणें पुरे आहे. प्रथम ज्याप्रमाणें राजकीय मुख्य लोकसमूहापैकीं जरासा विशिष्ट असा घटक असतो—म्हणजे कधीं कधीं त्याचें खासगी जीवित आणि जीवनसाधनें हीं इतर लढवय्यांच्या सारखींच असतात, आणि कधीं कधीं तो पितृशास्ता किंवा लष्करी जमीनदार असून इतर तसल्याच शास्त्यांपेक्षा किंवा जमीनदारांपेक्षां ज्यास्त प्रबल होऊन त्यांच्याप्रमाणेंच खासगी मालमत्तेच्या उत्पन्नावर रहात असतो,—त्याप्रमाणेंच त्या मुख्याचे मदतनीस त्याचे आप्त, मित्र व नोकर यांपासून उत्पन्न हो-

तात; म्हणजे, वंश आवड. किंवा नोकरी एतद्विषयक ज्यांचे खासगी संबंध त्याच्याशीं आहेत अशा प्रकारचे ते असतात. राज्यांतील मुलूख विस्तृत होत जाईल, कामें वाढत जातील, आणि ज्यांचीं विशिष्ट हिताहितें आहेत असे लोकवर्ग वाढत जातील, तशीं सार्वजनिक कामें पाहणारे जे अधिकारी त्यांस राजाचे घरगुती नोकर आणि कुटुंबांतील लोक ह्यांपासून भिन्न करणारीं कांहीं कारणें उत्पन्न होतात. आणि कोणत्या प्रकारचीं सार्वजनिक माणसें अधिकारापन्न व्हावीं हें ह्या कारणांवर आणि विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहतें. जेथें राजकीय मुख्याचा स्वेच्छाचारी सत्तेस मुळींच आळाबंद नसतो, किंवा फारच अल्प असतो, तेथें तो पदवी, धंदा, किंवा कुल हें कांहींच न पाहतां वाटेल त्यास प्रधान करितो. बरें, तो प्रबल असूनही ज्यांचा तो मत्सर करितो असे कांहीं लोकवर्ग असल्यास त्यांस अधिकारावर येऊं द्यावयाचें नाहीं असें तो धोरण ठेवितो; पण त्यांचें प्राबल्य अपुरें असल्यास तसल्या वर्गांचे प्रतिनिधी जोरानें अधिकारापन्न होतात. आणि राजाची सत्ता क्षीण होत चालली असतां, लोकांची इच्छा अमलांत आणावयाची हेंच ज्याचें स्पष्ट कर्तव्य असें संयुक्त प्रधानमंडळ कसें उत्पन्न होतें, ह्याचें दिग्दर्शन ह्या गोष्टीवरून होतें.

प्रकरण अकरावें

स्थानिक कारभार पाहणाऱ्या संस्था

७४. "स्थानिक सरकारें" ह्या सदराखालीं जेवढ्या निरनिराळ्या प्रकारच्या गोष्टींचा समावेश होतो त्यांहून ज्यास्त क्षेत्र व्यापणाऱ्या गोष्टींचें एथें विवेचन करावयाचें असल्यामुळें प्रस्तुत प्रकरणास वरील नांव सकारणच दिलें आहे.

एथें आपल्यास, प्रारंभीं एक पण हळूहळू भिन्न होणाऱ्या, अशा दोन प्रकारच्या नियमनसाधनांचा विचार कर्तव्य आहे. बायकांकडून नातें गणणाऱ्या लोकांमध्यें आणि पुरुषांकडून तें गणणाऱ्या लोकांमध्यें नात्यावरून ठरलेली जी नियमनसरणी तिजमध्यें लष्करी आधिपत्यावरून ठरलेल्या नियमनसरणीची भेसळ होण्याचा आणि पहिली दुसरीपेक्षां कमी महत्त्वाची बनण्याचा संभव असतो. लढाईंत जय मिळवून स्थापिलेल्या अधिकाराचा वंशपरंपरेनें प्राप्त झालेल्या अधिकाराशीं वरचेवर झगडा होत असतो, आणि अशा रीतीनें कौटुंबिक नायकीपासून लष्करी नायकी विभिन्न होण्यास सुरवात होते. माणसांच्या सामाजिक पदव्या ठरविण्याच्या कामीं सामर्थ्याचें तत्त्व आणि वंशपरंपरेचें तत्त्व ह्या दोहोंचाही उपयोग होत असतो, हें आपल्या अगोदर लक्षांत आलेलेंच आहे;आणि जेथें वंशपरंपरेचा मुख्य असूनही प्रसंगीं लढाईचा मुख्य नेमितात, तेथें सामर्थ्यागत अधिकाराकडून वंशपरंपरागत अधिकार तु-

डविला जाण्याचा संभव असतो. एवंच, प्रारंभापासून कौटुंबिक सरकाराहून भिन्न असें एक सरकार उत्पन्न होण्याचा संभव उत्पन्न होतो; आणि जेथें पुष्कळ कौटुंबिक समूह एकत्र होऊन लढाया चालवीत असतात तेथें ह्या संभवास सिद्धच गोष्टीचें स्वरूप येऊन जातें. कुटुंबाची वृद्धि होऊन ज्ञाति उत्पन्न होणें, ज्ञातीची वृद्धि होऊन बंधुजनसमूह उत्पन्न होणें, आणि त्याची वृद्धि होऊन टोळी उत्पन्न होणें, ह्याचा अर्थ एकमेकांचे दूर दूरचे संबंधी असे लोकसमूह उत्पन्न होणें असा होतो, आणि त्यामुळें नांवाच्या अग्रणी अशा समूहमुख्याच्या कह्यांत राहण्यास ते ज्यास्त ज्यास्त मारामार करूं लागतात. आणि जेव्हां स्थानिक संकलन होऊन एकाच खुंटापासून मूळ उत्पन्न झालेल्या पण पिढ्या तुटलेल्या अशा टोळ्यांचा संकर होतो, तेव्हां कौटुंबिक समूहाच्या नायक्यांहून भिन्न अशी कांहीं तरी नायकी उत्पन्न होण्याच्या अगदीं बेतांत येते. आतां अशा प्रकारची राजकीय नायकी, निवडीच्या पायरीवरून पुढें जाऊन, जरी स्वतः मूळच्या कौटुंबिक नायक्यांप्रमाणें वंशपरंपरेची बनते, तरी ती नव्या प्रकारची नायकी असते.

लोकसमूह संयुक्त आणि पुनःसंयुक्त होत जातील तशा कौटुंबिक नायक्या आणि राजकीय नायक्या यांपासून ज्या स्थानिक शासनसंस्था उत्पन्न होतात त्यांपैकीं राजकीय संस्थांचा आपण प्रथम विचार करूं; कारण आतांपर्यंत ज्या मुख्य शासनसंस्थांचा आपण विचार केला त्यांच्याशीं त्यांचा अत्यन्त निकट संबंध आहे.

७५. जेते आणि जित यांच्या परस्परसापेक्ष साम-

ष्यांच्या मानानें लढाईपासून अनेक प्रकारचे कमज्यास्त अंकितपणा उत्पन्न होत असतात. कांहीं ठिकाणीं जेत्यांना खंडणी देणें आणि कधीं कधीं त्यांचें वर्चस्व कबूल करणें ह्यापलीकडे जितांच्या राजकीय स्वातंत्र्यास सांगण्यासारखा धक्का बसत नसतो; आणि कांहीं ठिकाणीं जितांचें हें स्वातंत्र्य बहुतेक किंवा सर्वांशीं नष्ट होऊन जातें. तथापि सामान्यतः जित समाजांच्या मुख्य मुख्य जुन्या संस्था कायम ठेवणें जेत्यांस आवश्यक म्हणून दिसून येतें किंवा इष्ट म्हणून दिसून येतें. म्हणून फारसें संकलन होण्याच्या पूर्वीं निरनिराळ्या भागांचीं स्थानिक राज्यें, म्हणजे ते भाग जुळून जाण्यापूर्वीं त्यांच्या व्यवस्था असतील त्या, बहुधा कायम असतात.

अनिश्चित अंकितपणाचीं उदाहरणें आपणास सर्वत्र आढळतात. ताहितीमध्यें गर्विष्ट आणि स्वेच्छाचारी अशा जिल्हाधिपतींवर राजाचें वर्चस्व फारसें जबर नसे किंवा कायमही नसे. इंग्लंदांतही प्राचीन काळीं एकंदर राज्यकारभारमंडळ म्हटलें म्हणजे तें एक सरदारांचें महामंडळच होतें, आणि त्यांतील अमीरउमराव त्याचे सभासद असून राजा केवळ त्याचा अध्यक्ष असे. फ्रान्सांतही प्राचीन काळीं सर्व देशासाठीं कायदे करण्याची व्यवस्था मुळींच नव्हती; तर प्रत्येक गोष्ट स्थानिक असे, आणि स्थानिक राजे आपल्यासाठीं कायदे करीत. कित्येक लोकसमूह संकलित झालेले असून जेथें त्यांपैकीं एक इतरांवर सत्ता चालवूं लागला आहे तेथें प्रारंभीं प्रारंभीं त्या समूहांमध्यें असल्या प्रकारचा संबंध दिसून येतो.

जेथें विजेता समूहसंघाच्या आंतील नसून बाहेरचा

असतो आणि त्या सर्व समूहांस पुरे जित करण्या इतका बलवान् असतो, तेथें देखील पूर्वींच्या स्थानिक व्यवस्था बहुधा कायम राहतात. याचीं उदाहरणें जुन्या अमेरिकन राष्ट्रांतून आढळून येतात. मेक्सिको, टेझ्कूको आणि टाकूबा येथील राजे जेव्हां एकादा प्रांत जिंकीत तेव्हां ते तेथील सर्व स्वाभाविक मुख्यांस त्यांच्या त्यांच्या अधिकारांवर कायम ठेवीत. चिब्चा नामक लोकांपैकीं कांहींचे राजे जरी बोगोटच्या राजाचे अंकित झाले होते तरी त्या राजानें त्यांचे कारभार त्यांच्याचकडे ठेविले होते, आणि त्यांची वंशपरंपराही कायम ठेविली होती. पेरू देशांतील इन्का नामक राजांनीं जीं लहान लहान राज्यें जिंकिलीं होतीं त्यांची व्यवस्थाही त्यांनीं अशीच केली होती. आणि असें करणें हेंच वास्तविक रीत्या अत्यन्त सोईचें असतें. खरोखरच एकादी जुनी स्थानिक घटना मोडून तिच्या ऐवजीं एकाएकीं एकाद्या नव्या घटनेची स्थापना करणें इतकें कठीण असतें कीं जुनी घटना बऱ्याच अंशांनीं जशीच्या तशीच राखणें हें बहुतेक आवश्यकच असतें.

स्थानिक सरकारांच्या स्वतंत्र संस्था ज्या कायम राहतात त्या मुख्यत्वेंकरून ह्या होत. त्यांचे स्थानिक देव, धर्मविषयक संस्था, आणि धार्मिक उत्सव तद्वतच लढाईच्या वेळीं त्यांनीं रणांगणांत पाठविलेलीं सैन्यें पृथक् पृथक् लढतात; ह्याचीं उदाहरणें ईजिप्त, ग्रीस व इंग्लंद या तिन्ही देशांच्या इतिहासांत सांपडतात.

७६. ह्या स्थानिक संस्थांचा जो हळू हळू विलय होत जातो, तो मुख्य सरकार आणि हीं स्थानिक सर-

कारें ह्यामध्यें, अनुक्रमें, ह्या संस्था हाणून पाडण्यासाठीं व कायम राखण्यासाठीं जो झगडा चाललेला असतो त्यामुळें होतो.

मुख्यत्वेंकरून युद्धांत आलेल्या जयांनीं मुख्य शास्त्याचे हात बळकट होत जातील त्या मानानें तो धाकट्या शास्त्यांवरचीं नियंत्रणें वाढवीत जातो; प्रथम त्यांच्यामधील आपसांतील लढाया बंद करून, नंतर त्यांच्यामध्यें न्याय तोडण्यासाठीं हात घालून, आणि शेवटीं त्यांच्यावर अपीलें ऐकण्याचा अधिकार संपादन करून, तो हीं नियंत्रणें वाढवितो. ज्या ठिकाणीं स्थानिक शास्ते एकमेकांशीं झगडून, किंवा आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं व्यर्थ खटपटी करून, किंवा परराष्ट्राशीं लढाया करण्यासाठीं पैसे व माणसें देऊन, दरिद्री झाले असतील,—आणि शिवाय जेथें मुख्य शास्त्याच्या अनुयायांचा नवा सरदारवर्ग बनून जाऊन त्यांस काबीज केलेल्या किंवा बळकावलेल्या जमिनी त्यांच्या कामगिऱ्यांबद्दल बक्षीस म्हणून दिल्या असतील,—तेथें मुख्य शास्त्यानेंच नेमिलेले स्थानिक शास्ते येण्यास मार्ग खुला होतो. या रीतीनेंच फ्रान्सांत जेव्हां राजा प्रबल झाला, तेव्हां स्थानिक शास्त्यांचा कायदे करण्याचा अधिकार त्यानें हळूहळू कमी केला. त्यांनीं केलेल्या गोष्टी कायदेशीर ठरण्यास राजाच्या संमतीची जरूर पडूं लागली; आणि सनदा देणें, सरदारी देणें, आणि नाणीं पाडणें, हे हक्क एकट्या राजाकडेसच आले. अशा रीतीनें मूळच्या स्थानिक शास्त्यांची सत्ता क्षीण झाल्यावर त्याजवर देखरेख ठेवण्यास राजाचे प्रतिनिधी येऊं लागले; म्हणजे,

राजाची खुशी असेल तोंपावेतों अधिकारावर राहणारे प्रांतिकशास्ते नेमले जाऊं लागले. इंग्लंदच्या इतिहासांतही निरनिराळ्या काळीं ह्याचीं अनेक उदाहरणें नजरेस येतात. लहान लहान कित्येक राज्यें एकत्र होऊन जेव्हां मर्सिया हें राज्य बनलें, तेव्हां स्थानिक राजे केवळ " एल्डर मेन " किंवा वडीलधारे बनले; म्हणजे त्यांच्याकडे केवळ म्याजिस्ट्रेटाचा अधिकार राहिला. पुढें "वॉर्स् आव्ह धि रोझेस" ह्या लढायांमध्यें सरदारवर्ग जेव्हां दुर्बल झाला, तेव्हां सरदारांचे वंशपरंपरेचे अधिकार काढून घेऊन ते चालविण्यास लार्ड लेफटेनंट म्हणून अधिकारी नेमिले. अशा रीतीनें व्यक्तिस्थित अधिकारच कमी होतात असें नाहीं, तर लोकस्थितही कमी होतात. उदाहरणार्थ, दुसऱ्या एडवर्डाच्या राज्यांत शेरिफ निवडण्याचा लोकांचा हक्क काढून घेऊन राजा त्यांस नेमूं लागला. आणि तिसरा एडवर्ड त्याचप्रमाणें न्यायाधीश नेमूं लागला.

ह्या व असल्या उदाहरणांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, जेथें एकादा बाहेरचा माणूस स्वारी करून लहान लहान राज्यांच्या संघास जित करितो तेथें झपाट्यानें, आणि त्यांच्यापैकींच जेथें एक राज्य इतरांवर प्राबल्य चालवूं लागतें तेथें हळूहळू, स्थानिक शास्त्यांचे हुकूम सोडण्याचे अधिकार जाऊन केवळ ते बजावण्याचे अधिकार शिल्लक राहूं लागतात; आणि त्यांच्या हातीं जे अधिकार राहिले असतील ते ते नवीन नेमिलेल्या स्थानिक अधिकाऱ्यांचे नोकर म्हणून बजावितात. म्हणजे, राजकीय संकलन चालेलें असतां, राज्याच्या घटक-

भागांचे मूळचे शास्ते पहिल्या मानानें स्वकर्तव्य करणारीं बाहुलींच बनत जातात.

७७. आणखी एक सत्य एथें लक्षांत आणिलें पाहिजे; तें हें कीं, मुख्य सरकार आणि स्थानिक सरकारें ह्यांजमध्यें एकप्रकारचें रचनासाम्य असतें. हें साम्य उत्पन्न करण्यास अनेक कारणें जुळत असतात.

जेथें समूहसंघापैकीं एकाच्या शास्त्यानें इतरांना जिंकून प्रत्यक्ष रीतीनें, किंवा युद्धामध्यें सगळ्याचें अग्रणीत्व पत्करून जय मिळवून अप्रत्यक्ष रीतीनें, त्यांजवर आपलें वर्चस्व स्थापिलें असेल, तेथें अशा प्रकारचें साम्य असावें हें स्वाभाविकच आहे. कारण असल्या ठिकाणीं सामान्य किंवा मुख्य सरकार जें बनतें तें एका स्थानिक सरकाराची वाढ होऊनच बनतें. ह्याचें उदाहरण जुन्या इंग्लंदच्या इतिहासांत सांपडतें. तेथें शतसभा (hundred moot) म्हणून जी लहान स्थानिक शास्ती सभा असे तिचें साम्य जिल्हासभा किंवा "शायर मूट" इच्याशीं असे; कारण ती वरच्या सभेसारखीच बनलेली असून तिला लष्करी, न्यायविषयक आणि करविषयक ज्यास्त विस्तृत अधिकार असत, व तिचा अध्यक्षही प्रथम निवडलेलाच असे; शिवाय तिचें साम्य "विटनेजिमॉट" किंवा राष्ट्रसभा हिच्याशीं असे; कारण तिचा अध्यक्ष राजा असून तोही प्रथम निवडलेला असे, आणि तिचे सभासद वरच्याच वर्गांतील असून त्यांचे अधिकार वरच्याहूनही अधिक विस्तृत असत. पुढें फ्यूडल पद्धतीच्या वेळींही तशीच स्थिति असे; कारण फ्यूडल राज्य म्हणजे फ्यूडल जमीनदारीचा नमुना असे; आणि याचें

कारण दोन्हीही आप्त समजलेल्या लोकांचीं मंडळें असून तीं त्या जमिनीवर किंवा प्रांतावर येऊन स्थाईक झालेलीं असत. फ्रान्सांतही प्रारंभींच्या फ्यूडल काळांत हीच स्थिति दृष्टीस पडते; आणि तेथेंही नोकरांचेच प्रधान बनलेले असत. अशाच प्रकारचा पुरावा जपान, कित्येक आफ्रिकन राज्यें, कित्येक पालिनिशयन बेटें, प्राचीन मेक्सिको, मध्ययुगीन हिंदुस्थान, इत्यादि ठिकाणीं आढळून येतो; कारण तेथें फ्यूडल पद्धतीच्या नमुन्यावरचेच समाज पूर्वीं होते किंवा हल्लीं आहेत.

जेथें निराळ्या प्रकारची व्यवस्था असलेली प्रबल जात बाहेरून येऊन विशिष्ट लोकांस जिंकून टाकिते व तेथील व्यवस्था बहुतेक किंवा सर्वांशीं मोडून टाकिते, तेथेंही हीच गोष्ट दिसून येते; कारण असल्या त्या जातीचाही कल तेथील सामान्य संस्थांप्रमाणें स्थानिक संस्थांचाही करण्याचा असतो. ही गोष्ट प्राच्य देशांमध्यें प्राचीन काळापासून दिसून येते. उदाहरणार्थ, पर्शिया ऊर्फ इराण देशांतील प्रांतिक शास्ते जोंपर्यंत कामावर असतील तोंपर्यंत स्वेच्छाचारी असत.—म्हणजे ते बादशाहाचे प्रतिनिधी असून त्याच्याच मोठ्या अधिकाराचा कांहीं अंश त्यांजकडे आलेला असे. त्याच्या हातीं प्रजेचें जीवित व मृत्यु हीं दोन्ही असत. मुख्य स्वेच्छाचारी राजा आणि स्थानिक स्वेच्छाचारी शास्ते यांच्यामधील हा संयोग तेथें अद्यापिही दृष्टीस पडतो. अगदीं निराळ्या प्रकारच्या प्राचीन राष्ट्रांतही ही गोष्ट दिसून येते. उदाहरणार्थ, ग्रीसमध्यें सरदारी राज्यव्यवस्था असलेलें स्पार्टाचें राज्य जिंकलेल्या मुलखांवर तीच व्यवस्था लादण्याचा यत्न करी,

आणि लोकसत्ताक व्यवस्था असलेलें अथेन्स आपण जिंकलेल्या मुलखावर लोकसत्ताक व्यवस्था लादण्याची खटपट करी. तद्वत् रोमही आपण जिंकलेल्या किंवा वसवलेल्या मुलखांत आपली म्युनिसिपल व्यवस्था सुरू करी.

ह्या शेवटच्या उदाहरणावरून आपणास ह्या गोष्टीची आठवण होते कीं मुख्य सरकाराची घटना जशी बदलत जाईल तशी स्थानिक सरकाराचीही बदलत जाते. उदाहरणार्थ, रोममध्यें सारख्या लढायांमुळें जेव्हां शासनपद्धति विशेष घनीभूत अशी झाली तेव्हां ती मुख्य सरकारापासून तों स्थानिक सरकारांपर्यंत पसरली. तेथें लोकसत्ताकव्यवस्था असतां रोमप्रमाणें इतर प्रत्येक शहरीं एक लोकसभा असून तिला कायदे करण्याचा आणि म्याजिस्ट्रेट नेमण्याचा पूर्ण अधिकार असे; पण पुढें जेव्हां सरदारी व व्यक्तिस्थित अशी राज्यव्यवस्था रोममध्यें चालू झाली, तेव्हां प्रांतांतूनही लोकांची सत्ता कमी होत चालली. म्हणजे, म्युनिसिपल संघटना लोकायत होती ती सरदारायत झाली. फ्रान्सांत राजाची सत्ता जशी अनियंत्रित होत चालली, तसे असलेच फेरफार निराळ्या रीतीनें उत्पन्न झाले. सरकारानें म्युनिसिपल हुद्दे वंशपरंपरा करून टाकून ते सर्वांत ज्यास्त पैसे देतील त्यांस देण्याचा क्रम सुरू केला; त्यामुळें मेयर वगैरे लोक राजांचा आव आणूं लागले. इंग्लंदच्या इतिहासांतही सामान्यतः आणि ठिकठिकाणीं कधीं कधीं ज्यास्त स्वतंत्र आणि कधीं कधीं कमी स्वतंत्र अशा संस्थांच्या संबंधानें चळवळी झालेल्या आढळून येतात. उदाहरणार्थ, जॉन राजाच्या वेळीं जेव्हां मुख्य सरकारास ज्यास्त स्वतंत्र

स्वरूप आलें, तेव्हां शहरांना आपले म्याजिस्ट्रेट निवडण्याचा अधिकार मिळाला. उलट, दुसऱ्या चार्लसाच्या वेळीं राजाची सत्ता जेव्हां वाढली तेव्हां म्युनिसिपालिट्यांनाही पूर्वींहून ज्यास्त सरदारी स्वरूप आलें. त्यानंतर व्हिक्टोरिया राणीच्या अमदानींत दोन्ही प्रकारच्या संस्था जास्त ज्यास्तं स्वतंत्र होत गेल्या हें सर्वविश्रुतच आहे.

७८. आतां ज्या शासनसंस्थांना राजकीय स्वरूप आलेलें आहे त्यांवरून नजर काढून ज्यांचें कौटुंबिक स्वरूप कायम राहिलें आहे अशा संस्थांकडे लावूं. लोकसमूह जसे एकत्र होत जातात तशीं राजकीय संघटना व शासन हीं जरी स्थानतः व सामान्यतः कौटुंबिक संघटना व शासन ह्यांच्याहून ज्यास्त प्रबल होतात, तरी कौटुंबिक संघटना व शासन हीं अगदींच नाहींशीं होत नाहींत; तर कांहीं ठिकाणीं तीं होतीं तशींच कायम राहतात, आणि कांहीं ठिकाणीं त्यांपासून अन्य स्थानिक शासनसंस्था उत्पन्न होतात. राजकीय समाजाचा घटक ह्या दृष्टीनें कुटुंबसंघ कितीतरी पसरलेला आहे हें प्रथम लक्षांत आणूं.

असुधारलेल्या बेडुइन लोकांत कुटुंबसंघ पृथक् असलेलाच दृष्टीस पडतो; कारण त्यांच्यांत प्रत्येक मोठें कुटुंब व त्याचे आप्त मिळून एक लहानशी टोळीच बनलेली असते. पण सुधारलेल्या आरब लोकांत ही कौटुंबिक संघटना जरी कायम राहते, तरी तिच्यांत आणखी कांहींची भर पडलेली दिसते. प्राचीन काळच्या सेमिटिक व हीब्र्यू लोकांचेंही असेंच असे. आर्य लोकांमध्यें सर्वत्र

तीच स्थिति दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, आयरिश, रोमन व हिंदु लोकांत; आपल्यांतील संयुक्त अविभक्त कुटुंबपद्धति प्रसिद्धच आहे. बरें, कुटुंबापासून ज्ञाति, बंधुवर्ग, आणि टोळी यांची जी उत्पत्ति क्रमाक्रमानें वाढ होऊन होते ती जेथें पुरुषांकडून वंशपरंपरा गणतात तेथेंच होते असें नाहीं, तर जेथें स्त्रियांकडून गणतात तेथेंही होते. अमेरिकेंत प्राचीन युकाटन लोकांत असेंच होतें. आणि अर्वाचीन इरोक्कोइस व व्यान्डॉटी लोकांत असेंच आहे.

कुटुंबसमूह राजकीय समुदायांत समाविष्ट होण्याच्या पूर्वीं आणि मागूनही त्याच्यापासून अर्धवट राजकीय अशी शासनपद्धति उत्क्रान्त होत असते. जातीचा नमुना आणि वंशपरंपरेची पद्धति ह्यांस अनुसरून ही कुटुंबशासनपद्धति कोठें पूर्णपणें पितृशासनपद्धतिच असते. उदाहरणार्थ, आर्य व सेमेटिक लोकांत; किंवा कोठें समूहांतील मुख्य कुटुंबापैकीं कोणी तरी एक मुख्य निवडलेला असून तो आपला अधिकार चालवीत असतो; उदाहरणार्थ हिंदु लोकांत; किंवा कोठें ज्ञातींचें कौन्सिल असून तें आपला अध्यक्ष निवडीत असतें व तो मुख्य अधिकार चालवीत असतो, उदाहरणार्थ, वर सांगितलेल्या अमेरिकन टोळ्यांत. म्हणजे काय, तर, कोणत्याही व्यवस्थित मंडळांत " एकांत तीन " अशा प्रकारची जी संघटना उत्पन्न होत असते ती राजकीय समूहाप्रमाणें संयुक्त कुटुंबसमूहामध्येंही आढळून येते. मात्र त्याच्या निरनिराळ्या अवयवांची वाढ त्या त्या लो-

कांचे स्वभाव व परिस्थिति यांस अनुसरून निरनिराळ्या प्रमाणांवर होत असते.

प्रत्येक आप्तसमूहाचें सरकार राजकीय समूहाच्या सरकारासारख्याच क्रिया लहान प्रमाणावर करीत असतें. दुसऱ्या समाजानें आपल्या एकाद्या घटकास इजा केल्यास सगळा समाज जसा त्याच्या विरुद्ध सूड घेतो, तसा एक कुटुंबसंघ दुसऱ्या संघाविरुद्ध घेतो. ही गोष्ट इतकी परिचित आहे कीं, तिचीं उदारणें द्यावयास नको. पण याप्रमाणें कुटुंबांतील एका माणसाकरितां सूड घेण्याचा जसा इतरांस हक्क असतो तशी त्यानें कोणास इजा केल्यास त्याबद्दल सर्वांवर जबाबदारीही असते; व हीही गोष्ट समाजास लागू आहेच. ही जबाबदारी जीव व मालमत्ता ह्या दोहोंच्याही संबंधानें असते. उदाहरणार्थ, इंग्लंदांत प्राचीन काळीं असा कायदा असे कीं, चोरी, जादूटोणा, वगैरे गोष्टींसाठीं एकादा माणूस कैदेंत पडल्यास त्याजबद्दल दंड भरणें, व त्याची सुटका झाल्यावर तो पुनः असें करणार नाहीं अशी हमी देणें ह्या गोष्टींची जबाबदारी कुटुंबांतील इतर माणसांवर असे.

अशा रीतीनें राजकीय समूहांतील प्रत्येक संयुक्त कुटुंबसंघाचे इतर पोटसंघांशीं अर्धवट राजकीय संबंध असून तो त्या संघांचें आंतून नियंत्रण करीत असे. वर सांगितलेल्या अमेरिकन लोकांतील ज्ञातींचीं कौन्सिलें त्यांचे कारभार पहात असत. रोमन वगैरे लोकांतील ज्ञातिविभागांवर त्यांच्या पितृशास्त्यांचा अंमल असे; आणि हिंदु लोकांत अद्यापिही आहे. आणि ह्या न्यायविषयक संघटनेखेरीज आप्तसंघामध्यें धर्मविषयक संघटना असे,

आणि ती एकाच मूळपुरुषाची वर्षांतून ठराविक काळीं सर्वांनीं मिळून विधिपूर्वक पूजा केल्यापासून उत्पन्न होई. एवंच पुराव्यावरून असें दिसतें कीं लढाईच्या योगानें अनेक समूह एकत्र झाल्यानें आप्तसमूहांच्या संघटनांवर प्राबल्य चालविणाऱ्या राजकीय संघटना जरी उत्पन्न होतात, तरी हे आप्तसंघ पुष्कळ काळपर्यंत कायम राहतात, आणि आपल्या स्वतंत्र व्यवस्था व घटना कांहीं अंशीं कायम राखितात.

७९. तथापि सामाजिक प्रगतीमुळें हे संघ कित्येक रीतींनीं बदलून जातात, म्हणजे, त्यांचे असे निरनिराळे समूह बनतात कीं त्यांचे कौटुंबिकविशेष हळूहळू नष्ट होतात. ह्याचें एक कारण भटकणारें जीवित जाऊन त्याबद्दल स्थाईक जीवित उत्पन्न होतें हें होय; कारण त्यामुळें लोकांचे जमिनीशीं निश्चित संबंध उत्पन्न होतात, आणि त्यावरून कुटुंबसंख्या वाढून तीं एकमेकांत संमिश्र होऊन जातात.

ह्याचें पहिलें उदाहरण म्हटलें म्हणजे प्राचीन मेक्सिकन लोकांतील " कालपुली " चें होय; त्याचा अर्थ " पुराणकालीन कुटुंब ज्यांत वसलें आहे असा प्रांत " असा असे; आणि त्या कुटुंबांतील लोकांच्या ताब्यांतील जीं इस्टेटें तीं त्यांचीं नसून सगळ्या प्रांताचीं असत; त्यांचे नाईक टोळींतून निवडलेले असत, आणि ते सर्वांच्या हिताहिताच्या गोष्टी, करांची वांटणी, सार्वजनिक उत्साह, वगैरे गोष्टींचा विचार करण्यास एकत्र जमत असत. दुसरें उदाहरण रशियन मीर किंवा ग्रामसमुदाय यांचें होय; हे समुदाय एकाच कुटुंबसमूहांतील लोकांचे बनलेले असून

ते न्याय करितात, आणि जमिनीवर मालकी चालवितात. कारण त्यांतील व्यक्तींचा हक्क केवळ जमिनींतील उत्पन्न घेण्याचाच असतो. तिसरें उदाहरण ट्यूटन लोकांमधील "मार्कचें" होय. हे मार्क मोठाले कुटुंबसमूह असून त्यांच्यांत अनेक कुटुंबांचा संयोग झालेला असे. ह्या कुटुंबांपैकीं कांहीं एका मूळपुरुषापासून उत्पन्न झालेलीं असून कांहीं लग्नांमुळें किंवा दत्तक घेऊन किंवा दास्यमुक्त करून त्यांत सामील केलेलीं असत; परंतु सर्व कुटुंबें परस्पर बंधुभाव कबूल करीत; त्यांचे सर्वांचे कारभारी व न्यायाधीश एकच असत; धर्मविधी सारखेच असत आणि त्यांचें सर्वांचें मिळून एकच सामान्य नांव किंवा आडनांव असे. आणि शिवाय प्रत्येकाच्या कृत्याबद्दल सगळा "मार्क" जबाबदार असून, व्यक्तींस कोणीं दुखविल्यास सूड घेण्याचीही जबाबदारी त्याजवर असे.

आतां स्थानीं स्थानीं व सगळ्या देशांत आप्तसमूह बदलून राजकीय समूह बनण्यास जीं अनेक कारणें एकवट होत असतात त्यांचा विचार करूं. पहिलें कारण कुटुंब, ज्ञाति, किंवा टोळी यांच्यांत परकी लोकांचा जो समावेश रानटी स्थितीपासून सारखा होत असतो तें होय. उदाहरणार्थ, बाकवाइन लोकांबद्दल लिव्हिंग्टन असें म्हणतो कीं, "त्यांचें सरकार पितृशासनविशिष्ट असून त्यांच्यांतील प्रत्येक मुख्य माणसाच्या झोंपडीसभोंवतीं त्याचे आप्त, बायका, व आश्रित यांच्या झोंपड्या असतात, आणि सगळे मिळून एक "कोट्‌ला" बनतो; गरीब माणूस असेल तो श्रीमान् माणसाच्या कोटल्यांत जाऊन मिळतो, आणि तो त्याचा मुलगा समजला

जातो". तात्पर्य, रोमनलोकांतील कुटुंब आणि ट्यूटन लोकांतील मार्क ह्यांमध्यें जी गोष्ट मुद्दाम करीत असत ती एथें सहजगत्या झालेली दृष्टीस पडते. हे दत्तक घेतलेले परकीय लोक जसे वाढत जातील, आणि दास्यमुक्त झालेले आश्रित आपल्यांत घेऊन संघ जसा संमिश्र होत जाईल, तसे त्याच्या घटकांमधील दुवे सईल होत जातात, आणि त्यांचे स्वभावविशेष बदलत जातात. शिवाय, घनीभवन आणि संख्यावर्धन ह्यांच्या योगानें परस्परसंनिध वसलेले आप्तसंघ एकमेकांत जसे मिसळून जातात, आणि विशिष्ट स्थान व विशिष्ट आप्तसंघ यांच्यांतील प्रत्यक्ष संबंध नष्ट होऊन जातो, तसे कुटुंबबंध आणि ज्ञातिबंध आणखी सईल होतात. आणि शेवटीं लष्करी व वसुलीच्या दोन्ही कामांसाठीं नात्याच्या ऐवजीं स्थानानुरूप लोकसंघ बनविण्याची जरूरी उत्पन्न होते. ह्याचें पहिलें उदाहरण ग्रीसमधील आटिकाप्रांतांत झालेल्या क्लिस्थेनियन राज्यक्रान्तीचे ठिकाणीं दिसून येतें; कारण त्या वेळीं टोळ्यांचे बनलेले लोकवर्ग मोडून स्थानिक वर्ग बनविले, आणि प्रत्येक ठिकाणच्या लोकांना कारभार पाहण्याचे अधिकार देऊन त्यांबद्दल जबाबदारीही त्यांजवर प्रथम टाकिली.

आतां टायदिंग्ज् व हंड्रेड्स म्हणजे दशकुटुंब्या व शतकुटुंब्या कशा उत्पन्न होतात ह्याचा विचार करूं. प्राचीन पेरूदेशीय लोकांत दिवाणी व लष्करी दोन्ही कामांसाठीं असले विभाग असत हें मागें सांगितलेंच आहे. चीन देशांतही ज्ञातिविभागांच्या ऐवजीं सरकार हेच विभाग ओळखितें; आणि ह्यावरून हे विभाग कौटुंबिक

नसून राजकीय असतात हें उघड दिसतें. जपानांतही असेंच असून त्यांचे मुख्य सर्वांच्या व प्रत्येकाच्या वर्तनाबद्दल जबाबदार धरले जातात. रोममध्यें ज्ञातिसमूहाच्या ऐवजीं राजकीय कामांसाठीं असलेच विभाग केलेले होते आणि जर्मन लोकांतील अशाच रीतीनें ह्या विभागांची उत्पत्ति झाली असें दिसतें.

आतां कुटुंबें जशीं त्यांतील घटकांच्या अपराधाबद्दल जबाबदार धरिलीं जातात, तशा ह्या दश व शत कुटुंब्याही त्यांतील व्यक्तींच्या अपराधांबद्दल जबाबदार धरल्या जात असत; आणि असें केल्याशिवाय गत्यन्तरच नव्हतें. ह्याचीं उदाहरणें इंग्लंदच्या प्राचीन इतिहासांत सांपडतात.

एवंच असें दिसतें कीं मूळच्या कौटुंबिक घटनेच्या ऐवजीं स्थानिक कारभार पाहण्यासाठीं ही जी घटना उत्पन्न झाली ती स्थाईक स्थितीमध्यें जें लोकसंख्यावर्धन व संमिश्रण होत गेलें त्याबरोबर सहजगत्याच अवतीर्ण झाली.

८०. आतां हिच्याशींच प्रथम संबद्ध असलेल्या पण मागाहून हिजपासून विभिन्न झालेल्या अशा एका स्थानिक कारभार पाहणाऱ्या घटनेचा विचार कर्तव्य आहे. ती कोणती म्हणाल तर गिल्ड् किंवा धंदेजमात ही होय.

ह्या संस्थेबद्दल रानटी समाजांतून पुढील पुरावा सांपडतो. पेरूव्हियन लोकांमधील कळाकुसरीच्या धंद्यांबद्दल प्रेस्कॉट असें म्हणतो कीं, हे धंदे इतर सर्व धंद्यांप्रमाणें बापाकडून मुलाकडे येत असत. मेक्सिकन लोकांत असेंच असे; आणि अशी चाल पडण्याचें कारण बापाला

आपला धंदा मुलास शिकविण्यास खर्च पडत नसल्यामुळें गरीबांना तसें करणें सोईवार पडे. इजिप्शन लोकांत बापाचा धंदा मुलानें चालविला पाहिजे असा कडक निर्बंध असे. ग्रीकलोकांत अमुक कुटुंबांनींच अमुक धंदे करावे असा निर्बंध असून मुलगा व शिष्य यांना एकच शब्द असे. चीन देशांत अजूनही असेंच आहे. तेथें ह्या जमातीवर त्या त्या शहरीं शांतता ठेवण्याची व पोलिसाचा खर्च देण्याची जबाबदारी असते. प्रत्येक जमातीचा एकत्र जमण्याचा एक दिवाणखाना असून तेथें तिचे घटक आपल्या रक्षणकर्त्या साधूचा उत्सव करीत असतात. जपानांत पूर्वीं अशीच स्थिति असे; आणि हिंदुस्थानांत अमुक जातीनें अमुकच धंदा करावा असा निर्बंध पूर्वीं कडक असून हल्लींही पुष्कळ आहे हें प्रसिद्धच आहे.

युरोपांतील गिल्डांच्या इतिहासाकडे पाहतां ते देखील प्रारंभीं आप्तांचेच संघ असत असें दिसतें. कारण मूळच्या संयुक्त कुटुंबांत एकाच मूळ पुरुषास बळी अर्पण करणें व त्याची पूजा करणें ह्या गोष्टी जशा दृष्टीस पडतात, तशाच युरोपांतील गिल्डांमध्येंही दिसतात. शिवाय तसल्या कुटुंबांत जीवास जीव घेऊन आप्तांबद्दल सूड उगविण्याची जशी चाल असे, तशी गिल्डामधील घटकांबद्दल तसलाच सूड उगविण्याची असे; तसल्या कुटुंबांत व्यक्तींच्या अपराधांबद्दल सगळ्या कुटुंबाची जशी जबाबदारी असे तशीच गिल्डामध्येंही असे. संयुक्त कुटुंबांतील सगळ्या व्यक्तींना जसा अन्नवस्त्र मागण्याचा हक्क असे, तसा गिल्डामधील दुबळ्या घटकांनाही असे. आणि संयुक्त कुटुंबांतील माणसांना जसें मुख्य यजमा-

नाच्या धोरणानें आपलें खासगी वर्तन ठेवावें लागे, तसें गिल्डांतील घटकांनाही जमातीच्या नियमांप्रमाणें वागावें लागे. संयुक्तकुटुंब आणि गिल्ड ह्यांमध्यें शेवटचें साम्य दिसतें तें हें कीं, कुटुंब किंवा ज्ञाति जशी अपराध्यास बहिष्कार घालूं शकते, तसा गिल्ड अपराध्यास गिल्डाबाहेर घालवूं शके.

ह्यावरून, तर मग, असें अनुमान निघतें कीं गिल्डाची उत्क्रान्ति कुटुंबापासून झाली असावी. एखादा उद्योग, धंदा किंवा कला पिढ्यानुपिढ्या चालू ठेवणें हें प्रारंभीं प्रारंभीं बहुतेक अनिवार्यच असतें. कारण लहानपणीं अभ्यास केल्यानें त्यांत सहजगत्या नैपुण्य प्राप्त होतें; तें शिकविण्याचा खर्च फारच अल्प पडतो; आणि विशिष्ट उद्योग किंवा कसब कुटुंबांतल्या कुटुंबांत ठेवणें इष्ट असतें. पण कांहीं काळानें आप्तांचा संघ असें जें गिल्डाचें स्वरूप तें बदलण्यास कारणें होतात. पहिलें कारण परकी मुलांस कुटुंबांत घेणें हें होय. धंदा चांगला चालून सख्या मुलांच्या हातून पुरा पडत नाहींसा झाला म्हणजे ही दत्तकाची चाल सुरू होते. यूरोपांत आप्रेंटिस किंवा शिष्य घेण्याची जी चाल ती ह्यासारखीच होय. कारण शिष्याच्या कामाप्रमाणें त्याच्या वर्तनाकडेही त्याच्या यजमानास लक्ष द्यावें लागत असे. असे शिष्य फार घेऊं लागले तेव्हां गिल्डांची कुटुंबरूपी जी मूळची घटना ती बदलूं लागली. पुढें जेव्हां नव्या वसाहती व शहरें बनूं लागलीं तेव्हां एकच धंदा करणारे पण एकाच कुटुंबांतील नसलेले लोक बाहेरून येऊन तेथें राहूं लागले असावे आणि पूर्वींच्या नमुन्यावर नवे गिल्ड

मुद्दाम बनवूं लागले असावे;—अशा नव्या वसाहतींतून जुन्या नमुन्याच्या पार्लमेंत वगैरे नव्या राजकीय संस्था बनत असतात.

गिल्डांच्या ह्या रूपान्तराबद्दल जर कोणास संशय वाटत असेल तर त्यानें असल्याच प्रकारचें जें ह्याच्या-हूनही मोठें रूपान्तर झालें आहे तिकडे नजर द्यावी. तें कोणतें म्हणाल तर लंडनांतील गिल्डांचें. हे गिल्ड प्रथम सोनारांचे, कोळ्यांचे, असेच निरनिराळ्या धंद्यांच्या लोकांचे असत. पण ह्या मंडळांतून इतर धंद्यांच्या किंवा कांहींही धंदा न करणाऱ्या अशा लोकांचा इतका समावेश होत गेला आहे कीं, त्यांच्यांत त्यांच्या नांवांवरून व्यक्त होणारा धंदा करणारे लोक फारच थोडे राहिलेले आहेत. ह्यावरून पाहतां पूर्वीं एकादा धंदा करणाऱ्या सरल किंवा संयुक्त कुटुंबांत बाहेरचे लोक दत्तक म्हणून घेतल्यानें त्या संघाचें "आप्तांचा समुदाय" हें स्वरूप जाऊन "मुख्यतः परस्परांशीं नातें नसलेल्यांचा समुदाय" असें त्यास स्वरूप कसें आलें असेल हें स्पष्ट दिसतें.

८१. एवंच स्थानिक शास्त्या संस्थांच्या उत्क्रमणाची सरणी जरी घोंटाळ्याची आणि दुर्बोध अशी आहे, तरी ती बऱ्याच रीतीनें ध्यानांत येते. ह्या संस्थांचे आपण दोन वर्ग करितों; आणि त्यांची उत्पत्ति जरी एकाच मुळापासून झालेली आहे, तरी लहान लहान समाजांचें संकलन होऊन ते जसजसे मोठाले होत गेलेले आहेत, तसतशा त्या परस्परभिन्न होत गेलेल्या आहेत.

ह्या संकलनाच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर पूर्वीं पृथक्

असलेल्या भागांचे मुख्य स्वतंत्र असतात ते परतंत्र होतात, आणि शेवटीं ते प्रांतिक सुभेदार बनतात; प्रारंभीं ते खंडणी देणारे जित मुख्य असतात; नंतर पूर्णपणें जित आणि हुकुमांत वागणारे असे मुख्य ते बनतात; नंतर मुख्य शास्त्यानें नेमलेले, व त्याला पसंत पडेल तोंपावेतों अधिकार चालविणारे, असे स्थानिक शास्ते ते बनतात; आणि शेवटीं, केवळ हुकूम अमलांत आणणारे अंमलदार बनतात.

देशांतील सर्व लोक एकाच जातीचे असल्यास, भागाभागांच्या नियामक संस्था आणि सगळ्यांची नियामक घटना, ह्यांमध्यें बहुधा सारखवटपणा असतो, आणि त्याचें कारण त्या एकाच व्यक्तिघटनेवरून अखेरीस उत्पन्न झालेल्या असतात हें होय. मुख्य शास्ता स्वेच्छाचारी असल्यास स्थानिक शास्तेही स्वेच्छाचारी असतात; मुख्य सरकार ह्याच्याहून स्वतंत्र-स्वरूप असल्यास स्थानिकसरकारेंही ज्यास्त स्वतंत्र-स्वरूप असतात; आणि ह्या किंवा त्या दिशेनें ह्यांच्यपैकीं एकांत फरक झाला म्हणजे त्यामागून दुसऱ्यांतही होतो.

लहान लहान समाज संयुक्त होऊन मोठाले समाज बनत असतांना स्थानिक व सामान्य अशा राजकीय शास्त्या घटना कौटुंबिक शास्त्या घटनांपासून जरी पृथक् व प्रबळ होत असतात, तरी कौटुंबिकघटना कांहीं नष्ट होत नाहींत; तर मूळच्या स्वरूपानें कायम राहून त्यांना निरनिराळीं स्वरूपेंही उत्पन्न होऊं लागतात. आप्तसंघाच्या हातीं पुष्कळ काळपर्यंत अर्धवट राजकीय असा एकप्रकारचा स्वतंत्र अधिकार राहत असून, त्याबरोबर

त्या संघाचें आंतून नियमन करण्याचा हक्क व त्याच्या बाहेरच्या जबाबदाऱ्या संभाळण्याचा बोजा हीं दोन्हीही कायम राहत असतात. आणि एकीकडे कुटुंबसंघ एकमेकांत मिश्रित होऊन आपलें स्पष्ट स्वरूप गमावून " पृथक् स्वतंत्रसमाज " या दृष्टीनें जे त्यांचे विशेष तेही हळूहळू गमावीत असतां, त्यांच्यापासून असे कांहीं संघ उत्पन्न होतात कीं, ते कांहीं ठिकाणीं स्थानैक्यामुळें आणि अन्यत्र धंदैक्यामुळें संयुक्त बनून त्यांचे स्वभावविशेष आपल्या ठिकाणीं उतरून घेतात, आणि निवळ राजकीय अशा शास्त्या घटनांचे पूरक बनून जातात.

ह्या पूरक शास्त्या घटनांच्या संबंधानें असें सांगणें इष्ट दिसतें कीं त्या युद्धशील समाजस्वरूपास योग्य असल्यामुळें, समाजास जसें विशेष उद्योगशील असें स्वरूप येत जाईल, तशा त्या नष्ट होऊं लागतात. घटकांचें संरक्षण करणें, त्यांच्या अपराधांबद्दल जाब देणें, आणि त्यांना कह्यांत ठेवणें, हीं त्यांचीं कामें असल्यामुळें जेव्हां नेहमीं कलह होत असतील त्या काळीं त्यांची जरूरी असून त्या काळाचे विशेषही त्यांजमध्यें आलेले असतात, आणि म्हणून तो काळ गेला म्हणजे त्यांचें कारणही नाहींसें होतें. शिवाय या घटना प्रत्येक घटकाच्या क्रियांवर कृत्रिम बंधनें घालीत असल्यामुळें, आणि त्याच्या कृत्यांव्यतिरिक्त कृत्यांबद्दल त्यास जबाबदार धरीत असल्यामुळें, वाढत जाणाऱ्या उद्योगशीलतेबरोबर जें व्यक्तिस्वातंत्र्य प्रत्येकास चालवावेंसें वाटूं लागतें त्या स्वातंत्र्याशीं त्या विरुद्ध असतात.

प्रकरण बारावें

लष्करी व्यवस्था

८२. ह्या ठिकाणीं ज्या विषयाचें विवेचन आह्मी करणार आहों त्याच्या संबंधानें बऱ्याच गोष्टी अप्रत्यक्षरीत्या अगोदरच सांगण्यांत आल्या आहेत. प्रारंभीं राजकीय घटना व लष्करी घटना ह्या दोन्ही एकत्र असल्यामुळें दुसरीस उल्लेख केल्याविना पहिलीचा विचार करणें अशक्यच होतें. आतांपर्यंत प्रकृत गोष्टींचें एका स्वरूपानें विवेचन झाल्यामुळें आतां त्यांचें अन्यस्वरूपीं विवेचन करणें आहे; आणि त्याबरोबरच आतांपर्यंत तत्संबंधी ज्या गोष्टी लक्षांत घेतल्या नव्हत्या त्या घेणें आहे. पण तसें करण्यापूर्वीं, प्रारंभीं ह्या दोन घटना एकच असतात असें जें म्हटलें, त्याबद्दल क्षणभर विचार करूं.

रानटी समाजांत वयांत आलेले सर्व पुरुष लढवय्ये असतात; आणि म्हणून फौज म्हणजे मोहिमेवर निघालेली सगळी वस्तीच असते, आणि वस्ती म्हणजे जाग्यावर तळ दिलेली फौज असते; हें मागें सांगितलेंच आहे.

ह्या सत्याबरोबर दुसरें एक सत्य ध्यानांत आणावयाचें तें हें कीं, प्रारंभींचें जें लष्करी संमेलन तें राजकीय संमेलनही असतें. म्हणजे स्वसंरक्षण आणि परातिक्रम ह्यांकरितां ज्या सभा बलाविलेल्या असतात, त्याच एकंदर सार्वजनिक प्रश्नांचा विचार करीत असतात.

दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, सामाजिक उत्क्रमणाच्या नेहमींच्या क्रमामध्यें लष्करी मुख्या-

चाच राजकीय मुख्य बनत असतो. मुख्य लढवय्या आणि दिवाणी शास्ता असें जें त्याचें दुबार स्वरूप प्रारंभीं-प्रारंभींच उत्पन्न होतें, तें बहुधा समाजोत्क्रमणाच्या बऱ्याच पायऱ्यांवर कायम राहतें; आणि जेथें लष्करी नायकी कांहीं अंशीं राजकीय नायकीपासून पृथक् होईल, तेथें सारखी लढाई होत राहिल्यास दिवाणी शास्ता व मुख्य लढवय्या हे पुनः एक बनतात.

समाज जसे संयुक्त व पुनःसंयुक्त होत जातील, तसें लष्करी व राजकीय अधिकाराचें हें ऐक्य सामान्यतः आणि विशेषतः म्हणजे समाजाच्या भागाभागांमध्यें आणि सर्व समाजामध्यें दोन्ही ठिकाणीं दिसून येतें. दुय्यम प्रतीचे सेनापती आपापल्या ठिकाणचे दिवाणी शास्तेही असतात; आणि स्वस्थानीं आपापल्या आश्रितांवर त्यांचा ज्या तऱ्हेचा अंमल चालत असतो, त्या तऱ्हेचाच समरांगणांत शिपायांवर चालत असतो.

आणखी एक सामान्य गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ती ही कीं, रानटी समाजांच्या खाद्योत्पादक व्यवस्था आणखी लष्करी व्यवस्था एकच असतात. रानटी टोळ्यांतून लढाई आणि शिकार हीं एकच माणसें करीत असतात; आणि त्यांच्या बायका, व असतील तेथें गुलाम घरचीं कष्टाचीं कामें करीत असतात. आणि, ह्याच प्रमाणें, जे रानटी समाज स्थाईक बनले असतील, त्यांच्यामध्यें लष्करी माणूस आणि उत्पादक माणूस एकच असतो. म्हणजे, जो लढवय्या तोच जमीनदारही असतो.

अशा रीतीनें प्रारंभीं लष्करी घटना आणि राजकीय घटना ह्या एकच असल्यामुळें, त्या विभिन्नस्वरूप कशा

होत जातात हें प्रस्तुत प्रकरणांत आपणास पाहणें आहे.

८३. ह्या विवेचनास आरंभ करावयाचा तो, सामाजिक उत्क्रमण चाललें असतां लष्करविषयक जवाबदारीचा प्रत्येकावर पडणारा जो बोजा त्यामध्यें जो कमज्यास्तपणा होत असतो तो लक्षांत आणून, आणि त्याबरोबरच लढवय्या वर्ग इतर समाजापासून भिन्न कसा होतो हें ध्यानांत आणून, करणें अत्यंत सोईचें दिसतें.

कोमांची, डाकोटा, चिपिवाज, इत्यादि कांहीं टोळ्यांतून दुसऱ्यावर हल्ला करण्याकरितां लढाईच्या कामीं मदत करणें हें जरी प्रत्येकास आवश्यक नसतें, तरी सामान्यतः जेथें राजकीय अंकितपणा स्थापन झालेला आहे तेथें प्रत्येकानें आव्हान गेल्याबरोबर लढाईच्या कामीं मदत करण्यास आलेंच पाहिजे असा नियम असतो. बऱ्याच पुढें गेलेल्या पुष्कळ समाजांतून ही स्थिति कायमच राहते. प्राचीन पेरू देशांत सामान्यतः सर्व पुरुष प्रत्यक्ष फौजेंत असत किंवा लागेल तेव्हां बलवावयाचे म्हणून राखून ठेविलेले असत; तोंपावेतों ते नेहमींचे धंदे करीत; आणि अर्वाचीन सयाममध्यें सर्व लोक लढवय्ये असून प्रत्येक वर्षीं त्यांनीं सहा महिने सैन्यांत रहावें असा नियम आहे. पण बहुतकरून सामाजिक प्रगति होत जाईल तशी लष्करांत शिरण्याची जबाबदारी मर्यादित होत जात असते.

जेथें लढाईत पकडलेल्यांस गुलाम करून त्यांच्या मुलांसही गुलामांप्रमाणेंच वाढवितात, आणि जेथें गुन्हेगार व कर्जबाजारी ह्यांसही गुलाम करून शिवाय जेथें शेतगुलाम असतात, तेथें समाजाचे दोन भाग होऊन

एकावर मात्र शिपाईगिरीचा बोजा पडत असतो. म्हणजे ह्यापूर्वी सर्व पुरुष लढवय्ये , व बायका तेवढ्या कामकरी, असा जो विभाग असतो, तो बदलून कांहीं पुरुषही कामकरी बनतात; आणि एकंदर पुरुषवस्तीमध्यें त्यांचा वर्ग वाढत जाऊं लागतो आशान्टी, राबा, वगैरे कांहीं ठिकाणीं जरी गुलामांस लढवय्ये बनवितात, तरी सामान्यतः गुलामांवर लढण्याची जबाबदारी नसते;ह्याचें एक कारण त्यांच्यावर गैरविश्वास हें होय, दुसरें कारण त्यांजबद्दलचा तिरस्कार हें होय, आणि तिसरें कारण नेहमींचीं कष्टाचीं कामें इतरांवर लादण्याची जी माणसाची इच्छा ती होय. कारणें कांहींही असोत; ह्या प्रारंभींच्या काळीं स्वतंत्र लोकांचा वर्ग तोच लढवय्या वर्ग आणि तोच जमीनदार वर्गही असतो असा सर्वत्र पुरावा सांपडतो. पंचविसाव्या कलमांत सांगितल्याप्रमाणें ईजिप्त, ग्रीस, रोम आणि जर्मनी ह्या देशांत अशीच स्थिति होती. लष्करी जबाबदारीची ही वांटणी किती स्वाभाविक आहे हें, प्राचीन जपान आणि मध्यकालीन हिंदुस्थान यांमध्यें यूरोपांतील मध्ययुगांतल्या सारख्या लष्करी जमीनदाऱ्या होत्या, आणि ताहिती व सामोआ यांमधील समाजांमध्यें देखील असल्या व्यवस्था उत्पन्न झालेल्या होत्या, यावरून स्पष्ट दिसतें.

जमिनींच्या विस्तारानुरूप बोजा वाहण्याचें तिच्या मालकास सामर्थ्य असतें अशा समजुतीवर जमीन कमज्यास्त असेल त्या मानानें प्रत्येक जमीनदारानें कमज्यास्त लष्करी मदत करावी असा संबंध उत्पन्न होतो. म्हणून ग्रीसदेशांत सोलनच्या कारकीर्दींत ज्यांच्या

जमिनीचें उत्पन्न कांहीं विशिष्ट उत्पन्नाहून कमी असेल त्यांच्यावर विशेष अडचणीच्या प्रसंगाविना लढाईत मदत करण्याची जबाबदारी नसे. रोममध्यें सामर्थ्य आणि जबाबदारी यांचा ताळा नेहमीं बसावा म्हणून कांहीं कांहीं काळानें जमिनींची पुनः वांटणी करीत असत. एकंदर मध्ययुगांत यूरोपांत सर्वत्र हेंच तत्त्व दृष्टीस पडतें.

जमिनीव्यतिरिक्त संपत्तीचीं साधनें उत्पन्न झालीं म्हणजे जमीनदारी आणि शिपाईगिरी ह्यांमधील संबंध त्या साधनांशींही जडूं लागतो. सारांश, व्यापार करून संपत्ति मिळवणारा वर्ग उत्पन्न झाला म्हणजे त्याजवरही लढण्याचा व लढवय्ये पुरविण्याचा बोजा पडूं लागतो. उदाहरणार्थ, रोममध्यें समृद्ध आणि भरवस्तीच्या शहरांनीं असुक असुक घोडदळ किंवा पायदळ पोसलें पाहिजे असा नियम असे.

यानंतर या गोष्टीमध्यें आणखी एक फेरबदल उत्पन्न होतो. म्हणजे, स्वतः लढण्याच्या ऐवजीं किंवा लढवय्यांस पोसण्याच्या ऐवजीं लष्करासाठीं असुक असुक खर्च अमक्या अमक्यानें द्यावा असें ठरूं लागतें. ह्यास प्रथम लढाईस न येण्याबद्दल दंड असें स्वरूप येत असतें, आणि मागाहून कांहीं नियमित कराचें येतें. आतां उद्यमवृद्धि झाल्यानेंच हा फेरबदल शक्य होतो हें उघडच आहे. कारण तेणेंकरून जमीनदार व व्यापारी ह्यांच्या बदलीं इतर लढवय्ये मिळतील इतकी लोकवस्ती वाढते, आणि लष्करी नोकरी करण्याच्या ऐवजीं पैसा देतां यावा इतकें त्यांचें भांडवल वाढतें.

एवंच पूर्ण रानटी आणि अर्धवट सुधारलेल्या समा-

जांतून लष्करी बोजाची वांटणी जरी अशा रीतीनें होत असते कीं, प्रत्येक नागरिकानें स्वतः लढलेंच पाहिजे आणि स्वताचींच हत्यारें आणि खाणें पिणें आणिलें पाहिजे अशी स्थिति असते, तरी ही नेहमींच्या लढाईची व कधीं कधीं उद्योगधंदे करण्याची स्थिति जाऊन नेहमीं उद्योगधंदे करण्याची व कधीं कधीं लढावयाची स्थिति जशी प्राप्त होत जाईल, तसतसा लष्करी कर्तव्य आणि नागरिकत्व ह्यांच्यामधील निकट संबंध तुटूं लागतो; आणि त्यास कोणत्याही प्रकारची ज्याची जितकी संपत्ति असेल त्या मानानें त्यानें द्रव्यरूपी कर तितका द्यावा, अशा बोजाचें स्वरूप येतें. आतां हें खरें आहे कीं जेव्हां युद्धशीलतेस जोर येईल, तेव्हां प्रत्येकानें लष्करांत कांहीं काळ नोकरी केलीच पाहिजे असा कायदा सुरू होतो; जसा युरोपांतील कित्येक राष्ट्रांत हलीं झालेला आहे.

८४. ह्या फेरबदलाचें आणखी एक स्वरूप सांगितलें पाहिजे; तें हें कीं, हळूहळू देशांतील एकंदर लोकवस्तीच्या मानानें लढवय्यांचें संख्यामान कमी होऊं लागतें. भटकण्याच्या संवयी जाऊन जशा स्थाईक राहण्याच्या संवयी लागतील तसे उद्यमशील लोक लढाईस प्रतिबंध करूं लागतात, हा प्रतिबंध उद्योगधंदे वाढतील तसा वाढूं लागतो, आणि तेणेंकरून लढवय्यावर्ग एकंदर लोकसंख्येच्या मानानें लहान होऊं लागतो.

पारधी टोळ्यांतील लोक जरी लढाईस नेंहमीं तयार असतात, तरी शेतीसमाजांतून नेहमीं लढाई करीत राहणें अर्थात् सोईचें नसतें. स्पार्टन लोक शेतकी करू-

नही नेहमीं लढाईची कवाईत शिकत हें खरें आहे; पण हा अपवाद होय. सामान्यतः धान्य पेरण्याच्या व कापण्याच्या वेळीं लढाईकारितां लोकांस एकत्र जमविणें शक्य नसतें. म्हणून कालेंकरून शेतकऱ्यांना लढाईसाठीं पहिल्यापेक्षां कमी वेळां निमंत्रणें येऊं लागतात. उदाहरणार्थ आल्फ्रेडानें असें ठरविलें होतें कीं, एका सालीं कांहीं शेतकऱ्यांनीं लढाईस यावें, आणि पुढच्या सालीं दुसऱ्यांनीं यावें. पुढें फ्यूडल पद्धति सुरू झाली तेव्हां जमीनदार व त्यांचीं कुळें यांनीं वर्षांतून अमुक दिवस व अमुक माणसांची अमुक मर्यादेपर्यंत मदत करावी असें ठरूं लागलें. अशा रीतीनें उद्योगशीलता वाढत जाईल तशी लढवय्यांची संख्या एकंदर लोकवस्तीच्या मानानें कमी होऊं लागते.

ह्या गोष्टीस आणखी दोन कारणें होत असतात. एक कारण हें कीं, उद्यमशीलता वाढेल त्याप्रमाणें सामाजिक प्रगति होत जाऊन शिपाई आणि लढाईचीं हत्यारें हीं दोन्ही पहिल्यापेक्षां ज्यास्त खर्चाचीं होतात. रानटी स्थितींत प्रत्येक शिपाई आपलींच हत्यारें आणीत असतो; आणि लढाईस बाहेर गेला म्हणजे पोटाची तजवीज स्वतःच करतो. पण ह्याच्यावरच्या पायरीवर ही स्थिति बदलते. लढाईचे रथ, चिलखतें, आणि वेढाघालण्याची साधनें ह्यांचा उपयोग जेव्हां होऊं लागतो, तेव्हां त्याच्या अगोदरच विशिष्ट धंदे करणाराच वर्ग समाजांत उत्पन्न झालेला आहे असें व्यक्त होतें; म्हणजे, लढवय्या वर्गाशीं धंदेवाल्या वर्गाचें प्रमाण पूर्वींहून वाढलेलें आहे असें स्पष्ट होतें. आणि पुढें ह्यांच्याही नंतर जेव्हां बंदुका,

तोफा, लोखंडी जहाजें, कुलपी गोळे, इत्यादि शस्त्रास्त्रें प्रचारांत येतात, तेव्हां तीं उत्पन्न करण्यास आणि त्यांचा खर्च सोसण्यास समर्थ असा मोठा व मोठा व्यवस्थित उत्पादक आणि विभाजक (जिन्नस इकडून तिकडे नेणारा) लोकवर्ग उत्पन्न झाला आहे असें स्पष्ट होतें. एवंच लढाईची सजीव व निर्जीव यंत्रसामग्री पूर्वीहून ज्यास्त मजबूत करण्यास ती मजबूत करणाऱ्या ज्या पोषक घटना त्यांच्याशीं तिचें प्रमाण कमी करणें आवश्यकच असतें.

आणखी एक कारण जें उत्पन्न होतें तें समाजांचें संयुक्तीभवन व पुनःसंयुक्तीभवन यांपासूनच प्रत्यक्ष रीत्या उत्पन्न होतें. जसजशीं राष्ट्रें ज्यास्त मोठीं होत जातील, आणि त्यांना ज्यास्त ज्यास्त दूरच्या प्रदेशीं लढाया कराव्या लागूं लागतील, तसतसा लढाईचा खर्च वाढूं लागतो. ह्या बाबतींत एकाद्या अवयवाचें आणि एकाद्या समाजाचें सारखेंच आहे; म्हणजे, क्रिया करणारा भाग मुख्य सांठ्याच्या स्थानापासून जितका ज्यास्त दूर तितका त्याला खर्च ज्यास्त मोठा. आतां, गमनसाधनांत सुधारणा झाल्यानें हा खर्च कमी होतो हें खरें आहे; परंतु सामान्य सिद्धांत असा करण्यास हरकत नाहीं कीं, इतर गोष्टी जशाच्या तशाच राहिल्यास, समाजाचें संकलीभवन जितकें ज्यास्त अधिक होईल तितका दूरवर लढाया करण्याच्या खर्चाचा समाजांतील उद्योगशील लोकांवर ज्यास्त ताण पडतो.

एवंच स्थाईक जीवित आणि सुधारणेची वृद्धि यांचे योगानें युद्धरूप क्रियेस तीन तऱ्हांनीं असा कांहीं प्रति-

बंध होतो कीं, तेणेंकरून युद्धशील भागाचें जें अयुद्धशील भागाशीं असलेलें प्रमाण तें कमी होत जातें.

८५. युद्धविषयक कर्तव्यामध्यें होणाऱ्या ह्या दोन प्रकारच्या फेरबदलांबरोबर आणखी कांहीं फेरबदल होऊन तेणेंकरून त्यास आणखी भिन्न स्वरूप येत असतें. ह्यांपैकीं पहिला फेरबदल म्हटला म्हणजे लष्करी नायकी राजकीय नायकीपासून भिन्न होणें हा होय.

मुख्य योद्ध्याचा दिवाणी सुभेदार बनणें म्हणजे समाजघटनेस प्रारंभ होणें हें आपल्या अगोदर लक्षांत आलेंच आहे. ह्याला उदाहरण म्हटलें म्हणजे हेन्जिस्ट नांवाच्या एका प्राचीन इंग्लिश राजास " हर्टोडा " (शब्दशः सेनानायक) अशी पदवी असे; आणि ब्रिटनमध्यें स्थाईकपणा आल्यावरच त्यास राजा ही पदवी प्राप्त झाली. राजकीय नायकी वंशपरंपरेनें जाण्याचा प्रघात स्थापन झाला म्हणजे राष्ट्राच्या नायकास सेनानायकापासून पृथक् करण्यास एक कारण उत्पन्न होऊं लागतें. तें हें कीं, सेनानायक नेहमीं कर्तृत्ववान् असावाच लागतो, आणि वंशपरंपरेनें येणारा राजा नेहमींच तसा असतो असा नेम नाहीं. त्यामुळें निवड करून सेनानायकाची जागा भरावी असा कल अशा ठिकाणीं उत्पन्न होऊं लागतो. उदाहरणार्थ, बेट्झ् म्हणतो कीं, गुराणी लोकांत नायकी बहुधा बापाकडून वडील मुलाकडे जात असते, पण युद्धाग्रणी बहुधा निवडलेला असतो. प्राचीन निकाराग्वामध्यें असेंच असून वंशपरंपरेचा नाईक सैन्याबरोबर जात असे. न्यूझीलंदर लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, वंशपरंपरेचे नाईक बहुतकरून सेना-

अग्रणी असत, पण कधीं कधीं शौर्यावरून इतरांची निवड करीत. साकारान डायाक लोकांत असेंच असे; पण बेडुइन लोकांत मात्र या गोष्टीस अगदीं उलट स्वरूप आलेलें होतें, कारण ते समजत कीं, एरवीं आपल्यास युद्धांत यश यावयाचें नाहीं.

कधीं कधीं या गोष्टीस अन्य कारणें होत असतात. एक हें कीं, राजा स्वतःच लढाईमध्यें गेल्यास कदाचित् येणारा धोका टाळण्यासाठीं दुसऱ्या कोणास सेनापति नेमितो; आणि कधीं कधीं राजाच्या जीवास धोका आल्यास जें अरिष्ट यावयाचें तें टाळण्यासाठीं प्रजाच कधीं कधीं राजास लढाईस जाऊं नको म्हणून सांगते; उदाहरणार्थ, फ्रान्सांत ९२३ सालीं.

परंतु सैन्याच्या आधिपत्यापासून सेनापतीच्या हातीं मोठी सत्ता येत असते, हें ध्यानांत घेऊन राजा बहुतकरून आपल्या मुलास किंवा जवळच्या आप्तास त्या जाग्यावर नेमीत असतो, आणि अशा रीतीनें आपली सत्ता दुसऱ्या कोणीं बळकावली जाण्याचा धोका टाळितो. ग्रीक राजे असें करीत हें इलियडावरून स्पष्ट दिसतें. युरोपांत मेरोव्हिन्जियन व क्यारोलिन्जियन राजांच्या वेळीं हीच चाल असे. प्राचीन जपानांतही तीच स्थिति होती; प्राचीन पेरूंत तसेंच असे; म्हणजे, राजा जेव्हां सैन्याचें अग्रणीत्व स्वतः करण्यास समर्थ नसेल, तेव्हां तो राजघराण्यांतील कोणास तरी कामावर पाठवी.

राजकीय मुख्याचीं दिवाणी कर्तव्यें विस्तृत होत गेल्यामुळें देखील लष्करी कामें दुसऱ्यावर संपविण्यास तें एक कारण सहजगत्या होतें. पण राज्य वाढत जाईल

तशीं दोन्ही कामें करणें जरी अवघड होतें, तरी त्यां-जपैकीं एकादें दुसऱ्याच्या स्वाधीन करणें हेंही धोक्याचें असतें. म्हणून लष्करी नायकी राजकीय नायकीपासून भिन्न होण्याकडे जरी सहजच कल असतो, तरी हा पृ-थक्पणा कांहीं विशिष्टपरिस्थितींतच कायमचा बनत असतो.

सामान्य स्थिति अशी दिसते कीं, जोंपावेतों लष्क-री चळवळ जोरावर असेल, आणि सर्व समाजास ती चालविण्यास योग्य अशी संघटना असेल, तोंपावेतों राजकीय मुख्य तोच लष्करी मुख्य कायम राहतो; उद्य-मशील जीविताबरोबर दिवाणी कारभारापासून भिन्न असा राजकीय कारभार जसा वाढत जाईल, तशीं रा-जकीय मुख्याचीं कर्तव्यें ज्यास्त ज्यास्त दिवाणी स्वरू-पाचीं होऊं लागतात, आणि तो कोठें कोठें कधीं कधीं, व कोठें कोठें वरचेवर, आपलीं लष्करी कर्तव्यें इतरांवर संपवूं लागतो; पुढें जर लष्करी चळवळीस पुनः जोर आला, आणि त्यामुळें समाजास लष्करी घटना पुनः प्राप्त होऊं लागली, तर जो सेनापति युद्धांत विजयी झाला असेल तो बहुधा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या मुख्य सत्ता बळकावितो आणि अशा रीतीनें पहिल्या-सारखी नायकी पुनः कदाचित् स्थापन होते; पण जेथें लष्करी चळवळ जशी कमी होत जाईल तसें दिवाणी जीवित व कारभार हीं वाढत जातात, तेथें सैन्याची नायकी राजकीय नायकीपासून कायमची विभिन्नस्वरूप होऊन तिच्यापेक्षां गौण दर्जाची बनते.

८६. सामाजिक उत्क्रमणाच्या सरणींत लढवय्या वर्ग

ह्याप्रमाणें इतर लोकवस्तीपासून पृथक होत असतां, त्याचा आकार एकंदर समाजाच्या मानानें लहान होत असतां, आणि त्याची नायकी पृथक् स्थापिली जात असतां, त्यामध्यें एकप्रकारची अंतर्घटना होत असते.

लढवय्या मंडळांत प्रथम व्यवस्था म्हणून मुळींच नसते. रानटी लोकांत लढाई ही दोघां दोघां माणसांतील अनेक झगडे ह्याच स्वरूपाची असते; कारण त्यांच्यांत मुख्य असल्यास तो फार हुशार लढवय्या म्हणूनच केवळ समजला जातो, आणि तो इतरांसारखाच लढतो. हा वियुक्त संग्राम-प्रकार पुष्कळ पायऱ्या क्रमून जाई तोंपावेतों कायम राहतो. ईलियडमध्यें व भारतामध्यें असलेल्या एकेऱ्या लढायांचींच वर्णनें आढळतात, आणि ग्रीक व रोमन लोकांच्या वेळीं लढाईच्या कलेंत जरी फार सुधारणा झाली होती, तरी मध्ययुगांत पुनः एकेऱ्या संग्रामांचाच प्रकार सुरू झाला होता. पण राजकीय प्रगतीबरोबर अनेक व्यक्ती एका मुख्याच्या कह्यांत कशा जातात हें लढाईत झालेल्या सुधारणेवरून चांगलें व्यक्त होतें. कारण तेव्हां सगळे शिपाई एका सेनापतीच्या धोरणानें सारख्या क्रिया करीत असतात; म्हणजे, त्यांच्या इच्छा त्याच्या एकट्याच्या इच्छेंत विलीन होत असतात.

अशाच प्रकारचा फेरबदल लवकरच आणखी मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. कारण सैन्याच्या पोटभागांतील व्यक्ती अशा रीतीनें ज्यास्त ज्यास्त संयुक्तक्रिया करावयास लागल्या म्हणजे ते सगळे पोटभाग देखील तशाच संयुक्तक्रिया करूं लागतात. जेव्हां अनेक लहान

समाज संयुक्त होऊन एक मोठा समाज बनतो, तेव्हां त्यांचे लढवय्ये समूह म्हटले म्हणजे कुटुंबसंघ व ज्ञातिसंघ यांचेच बनलेले असतात, आणि ते जरी एकत्र जमा झाले तरी आपलें व्यक्तित्व कायमच राखितात. हाटेंटांट लोकांत प्रत्येक गांवचा मुख्य आपल्या राष्ट्राच्या मुख्याच्या हाताखालीं त्याच्या गांवानें पुरविलेल्या शिपायांचें आधिपत्य करीत असतो. तद्वतच मालागासी लोक आपापल्या ज्ञातीस धरून रहात, आणि प्रत्येक ज्ञातीचा स्वताचा पुढारी असे. त्रिबूचा लोकांत प्रत्येक टोळी आपल्या तंबूंवर निरनिराळ्या खुणा घालून लढाईस येत असे. प्रारंभीं प्रारंभीं रोममध्यें अशीच स्थिति होती, आणि जर्मनीमध्येंही तसेंच असे. ही व्यवस्था किंवा व्यवस्थाभाव सगळ्या फ्यूडल काळांत चालू होता, आणि त्यामुळें रणांत लढणाऱ्या निरनिराळ्या समूहांमध्यें एकमेकांबद्दल इतकें अज्ञान असे कीं, मुख्य फौजेचा पराभव झाला तरी तें त्यांस समजत नसे.

राजकीय घटना चालली असतां स्थानिक मुख्यांचा सामान्य मुख्याच्या संबंधानें जो अंकितपणा वाढत जात असतो त्याखेरीज, लष्करी क्रिया केंद्रीभूत आणि संयुक्त होत जाण्यास, आणखी दोन विशेष कारणें होत असतात.

त्यांपैकीं एक कारण म्हटलें म्हणजे उपयोगांत आणिल्या जाणाऱ्या शस्त्रांचा भिन्नपणा हें होय. कधीं कधीं सहक्रिया करणाऱ्या टोळ्यांस निरनिराळ्या प्रकारच्या शस्त्रांचा उपयोग करण्याची संवय लागलेली असल्यामुळें त्या लढाईला ज्या येतात त्या एकमेकांपासून भिन्न दिसतील अशाच रीतीनें येतात. अशा ठिकाणी शस्त्रांप्रमाणें

होणारे विभाग हे टोळ्यांनीं होणाऱ्या विभागांशीं सहजच जुळत असतात; उदाहरणार्थ, हीब्रचूलोकांत बेंजामिनचे लोक, ज्यूडाचे आणि ग्याडचे लोक यांजमध्यें कांहींअंशीं असला भेद असे. पण बहुतकरून शस्त्रभेद जे होतात ते पदवीभेदांवरून होत असतात, आणि टोळ्यांच्या भेदावरून होणाऱ्या विभागांना ते दुभांगून टाकीत असतात. प्राचीन इजिप्शन लोकांच्या सैन्यांत रथी, घोडेस्वार आणि पायदळ असे विभाग असून त्यांचीं शस्त्रास्त्रें निरनिराळीं असत, आणि तीं त्यांच्या सामाजिक स्थितीस अनुसरून कमज्यास्त किमतीचीं असत. आसीरियन लोकांतही असेंच होतें. स्पार्टन लोकांचें श्रेष्ठत्व जें ग्रीसमध्यें स्थापन झालें त्यास कारण लैकर्गसानें दिवाणी विभागांपासून अगदीं भिन्न असे लष्करी विभाग स्थापन केले हें होय; तसले विभाग ग्रीसमधील इतर संस्थानांत नव्हते. रोमन लोकांची लष्करी सुधारणा होत गेली तसे तेथें असलेच फेरबदल होत गेले; म्हणजे तेथील सैन्यांतील विभाग टोळीमधील पदवीवरून न होतां संपत्तीच्या योगानें येणाऱ्या सामाजिक योग्यतेवरून होऊं लागले. आतां आधुनिक कालामध्यें लष्करी संघटनेंत स्थान आणि पदवी ह्यांनीं होणारे भेद समूळ नाहींसे झाले आहेत हें सांगावयास नकोच.

ह्या फेरबदलाचें दुसरें कारण फौजेची संख्या मोठी झाल्यामुळें तिचे विभाग करणें भाग पडूं लागलें हें होय. ते विभाग अर्थात् ज्ञाति किंवा टोळी यांस अनुसरून न पाडतां कांहीं विशिष्टसंख्येची एक तुकडी अशा धोरणानेंच पाडावे लागूं लागले. उदाहरणार्थ, हीब्रचू लो-

कांत दहा, पन्नास, शंभर, हजार, असे सैन्याचे विभाग असत, आणि रानटी अशा ऑराकेनियन लोकांतही हजाराहजारांचीं रेजिमेन्टें असून त्यांच्या शंभराशंभरांच्या कंपन्या बनविलेल्या असत. एवंच संख्येप्रमाणें भाग पाडणें हें कारण शस्त्रांप्रमाणें वर्ग करणें ह्या कारणास प्राथमिक भेद मोडून टाकण्याच्या कामीं साहाय्यभूत झालेलें आहे.

हा फेरबदल होत असतां त्याबरोबर सहजच आणखी एक फेरबदल होत असतो. तो कोणता म्हणाल तर सगळ्या सैन्याचें मुख्य आधिपत्य एकाच्या हातीं जाणें हा होय. रानटीसमूह आपल्या मुख्याच्या आज्ञा जसजशा ज्यास्त पूर्णपणें ऐकत जाईल तसतसा तो लढाईमध्यें जसा ज्यास्त ज्यास्त कर्तृत्ववान् होत जातो, त्याप्रमाणें एकत्र जमा झालेल्या अनेक समूहांचे मुख्य एका श्रेष्ठ मुख्याच्या धोरणानें जसजसे ज्यास्त वागूं लागतील तसतशी त्या समूहांची मिळून बनलेली जी सेना ती ज्यास्त कार्यकर बनते. म्हणून सगळ्या सैन्याचे जसे विभाग व पोटविभाग होत जातील तसे सेनापतींचेही निरनिराळ्या हुद्यांचे निरनिराळे वर्ग बनतात, आणि खालचे खालचे अधिकारी वरच्या वरच्या हुद्याच्या सेनापतींच्या तंत्रानें चालूं लागतात. अशा प्रकारची नियंत्रणसरणी ऑराकेनियन, झुलू व उगांडामधील लोक, ह्या लोकांत दिसून येते; त्यांच्यामध्यें प्रत्येकीं तीन दर्जांचे सेनापती आहेत; प्राचीन मेक्सिकन व पेरूव्हियन लोकांत ह्यांहून ज्यास्त दर्जांचे असत; आणि प्राचीन हीब्रयू लोकांतही असत.

८७. आणखी एक सामान्य फेरबदल सांगावयाचा राहिला आहे, तो हा कीं, जरूर पडेल तेव्हां सेनेनें जमावें आणि नसेल तेव्हां फांकून जावें, ही स्थिति जाऊन ती कायमची स्थापना झाल्याची स्थिति प्राप्त होणें.

रानटी लोकांत वयांत आलेले सर्व पुरुष लढवय्ये असून ते लढाईच्या वेळीं एकत्र जमत असतात, आणि नंतर आपला शिकारीचा वगैरे धंदा करण्यास फांकून जातात; समाजास स्थाईकपणा आल्यावर सशस्त्र नागरिक पृथक् किंवा संयुक्तपणें जमीनदार असून लढाईच्या वेळीं एकत्र जमून ती संपली म्हणजे पुनः आपल्या शेतावर जातात; म्हणजे काय, तर, त्यांच्यांत स्थाईक सैन्य नसतें. आतां लहान लहान समाजांचे संयोगानें मोठाले समाज बनून एक मुख्य अधिकारी उत्पन्न झाल्यावर असलीच व्यवस्था जरी पुष्कळ काळपर्यंत चालते, तरी एका नव्या व्यवस्थेचे अंकूर दिसूं लागतात. आतां हें उघडच आहे कीं, वरचेवर लढाया व्हावयास लागल्या म्हणजे कसलेंही सरकार असलें तरी कायमचें सैन्य उत्पन्न होतेंच; उदाहरणार्थ, प्रारंभीं स्पार्टन लोकांत, नंतर आथीनियन लोकांत, आणि त्यानंतर रोमन लोकांत, आणि ह्याचें कारण मुलूख वाढल्यामुळें वरचेवर बंडें होऊन तीं मोडण्याचा प्रसंग येई. कायमचें सैन्य बनण्याचें हें एक कारण असून दुसरें कारण म्हटलें म्हणजे राजासभोंवतीं जे सशस्त्र नोकर असतात ते होत. कायम फौजेचें हें बीज प्रारंभीं प्रारंभींच्याही पायऱ्यांवर नजरेस येतें. उदाहरणार्थ, ताहितीमध्यें राजाचे किंवा मुख्याचे हुजरे लढवय्ये असत; आणि

आशांटीच्या राजाचे संरक्षक चित्त्या, बिबळ्या वगैरे हिंस्र पशूंचीं कातडीं पांघरलेले असत. राजकीय विभिन्नीकरणाच्या सरणीचा विचार करतांना दाखविलेंच आहे कीं इतर मुलखांतून आश्रयार्थ पळून आलेले लोक प्रबल नायकापाशीं जमत असतात, आणि लढाईत नोकरी करण्याचे कबूल करून त्याच्यापाशीं राहतात; आणि अशा रीतीनें प्रबल नायकास आणखीच प्रबल करितात. ह्या सशस्त्र मनुष्याचे ठिकाणीं कायमच्या सैन्याचे अल्पसे गुणविशेष दृष्टीस पडतात; कारण ते कायमचे संयुक्त असतात इतकेंच नाहीं, तर त्याची स्वताची नोकरी जीव देऊन देखील करावयाची अशा शपथा घेऊन ते त्याचे स्वताचेच बनलेले असतात, आणि सशस्त्र नागरिकांना लागू असलेला जो लष्करी कायदा त्याहून त्यांना निराळा कायदा लागू असतो. उदाहरणार्थ, न्यूट राजापाशीं असले सहा हजार शिपाई गोळा झालेले होते.

ह्या उदाहरणावरून असल्या लोकांपासून पगाराकरितां लढणाऱ्या फौजेची उत्पत्ति कशी होते हें लक्षांत येतें. असले शिपाई लावण्याची चाल अगदीं प्रारंभापासून नजरेस येते; कारण इजिप्शन लोकांच्या इतिहासांत असलीं उदाहरणें एकसारखीं दृष्टीस पडतात; आणि जेथें जेथें राजास करांचें उत्पन्न बरेंच होत असेल तेथें ही चाल नजरेस येते. हे शिपायांचे मोठाले समूह देशांतील असोत किंवा बाहेरचे असोत, राजास बरेंच उत्पन्न असेल तरच ते त्यास बाळगतां येतील; आणि असें उत्पन्न असलें म्हणजे लोकांकडून दंड वगैरे वसूल

करण्याचें राजास बहुधा सामर्थ्य आलेलें असतेंच. प्रारंभीं प्रारंभीं लढाईस बलाविलेल्या लोकांस केवळ आपापलीं शस्त्रास्त्रेंच आणावीं लागत असतात असें नाहीं, तर सर्व प्रकारचे जरूर ते इतर जिन्नसही आणावे लागतात; कारण त्या वेळीं राजकीय घटना पुरी वाढलेली नसल्यामुळें त्या जिनसांचा पुरवठा करण्याला राजापाशीं पैसेही नसतात आणि व्यवस्थाही नसते. पण शेतकी वगैरे उद्योग वाढत जातील तसे लोक कधीं कधीं लढाईस हजर राहत नाहींसे होतात, त्यामुळें कधीं कधीं त्यांच्या जमिनी सरकार काढून घेतें, किंवा त्यांस जबर दंड करितें. पुढें लढाईस येणें नसेल तर अमुक पैसे द्यावे असें ठरूं लागतें, आणि अशा रीतीनें जमीनदार लढवय्यांच्या ऐवजीं लढाईचा धंदा करणारे लोक ठेवण्यास राजापाशीं पैसे तयार होतात. राजे ह्या लोकांस प्रथम कांहीं काळपर्यंत ठेवून नंतर कायमचे ठेवूं लागतात, आणि अशा रीतीनें हुजऱ्ये वगैरे रूपाचें जें कायम फौजेचें बीज त्यांत आणखी भर पडते. पुढें राजाची पैसे वसूल करण्याची शक्ति जसजशी वाढत जाईल तसतसें हें सैन्य वाढूं लागतें; उदाहरणार्थ, फ्रान्साच्या संबंधानें इतिहासकार रांके असें म्हणतो कीं, तेथें कायमचीं सैन्यें, कर, आणि कर्जें ह्या सर्वांची एकदम उत्पत्ति झाली.

आतां सर्व नागरिकांची शिपायाचें काम करण्याची जी मूळची जबाबदारी ती कायम सैन्यें अस्तित्वांत आल्यावर देखील पुष्कळ काळपर्यंत भिन्न भिन्न स्वरूपांनीं चालू राहते. उदाहरणार्थ, इंग्लंदांत असे अनेक कायदे

वेळोवेळीं केलेले होते कीं, माणसांनीं आपापल्या उत्पन्नाप्रमाणें, घोडे, हत्यारें, वगैरे अमुक अमुक सामान आपल्या व इतरांसाठीं त्यांच्यावर मागणी येईल तेव्हां पुरवावें. पुढें मिलिशिया किंवा हंगामी फौजेबद्दल कायदे झाले; आणि त्यांत असें ठरलें कीं माणसांनीं आपल्या उत्पन्नांप्रमाणें अमुक अमुक घोडेस्वार किंवा शिपाई सशस्त्र असे पुरवावे, आणि त्यांस नेमलेल्या वेळीं नेमके दिवसपर्यंत बरोबर शिधासामग्री देऊन कवायतीस पाठवावें. त्याप्रमाणेंच फ्रान्सांत पंधराव्या शतकांत असे कायदे असत कीं, प्रत्येक ग्रामसमूहानें एकेक घोडेस्वार पुरवावा. हल्लींही सैन्यामध्यें प्रत्येक नागरिकानें अमुक एक दिवस नोकरी करावी असे कायदे कांहीं देशांतून आहेतच. सारांश, सर्वत्र, नागरिक जेव्हां प्रत्यक्ष शिपाईगिरी कायमची करीत नसतील, तेव्हां प्रसंगीं ती करण्याची जबाबदारी त्यांजवर असतेच.

८८. एवंच राष्ट्राच्या ज्या समस्वरूप स्थितींत सैन्य म्हणजे सर्वच पुरुषसमाजाचें बनलेलें असतें तेथून सुरवात करतां असें दिसतें कीं, ज्या उत्क्रमणाच्या योगानें तें समाजाचा एक विशिष्टभाग किंवा अंग बनतें तें उत्क्रमण अनेक तऱ्हांनीं बनून येतें.

प्रथम सैन्याचा आकार एकंदर समाजाच्या मानानें कमी होतो, आणि त्यास पहिलें कारण लढाईच्या ऐवजीं काबाडकष्ट करणारा गुलामवर्ग उत्पन्न होतो हें होय, आणि दुसरें कारण शेतकी स्थाईक होऊन तिच्यांत ज्यास्त नागरिक गुंतूं लागतात हें होय. तद्वतच शस्त्रास्त्रें, व इतर सामग्री ह्यांमध्यें सुधारणा होऊन प्र-

त्येक शिपायाला लागणारा खर्च वाढत जातो हें आणखी एक कारण होतें. आणि शिवाय लढाई जसजशी दूर दूर अंतरावर चालवावी तसा तिच्या खर्चाचा बोजा राष्ट्राच्या उत्पन्नावर ज्यास्त ज्यास्त पडूं लागून तेंही सैन्याचा आकार एकंदर समाजाच्या मानानें आकुंचित होण्यास आणखी एक कारण होतें.

एवंच लढवय्या भाग सामान्य समाजापासून पृथक झाला म्हणजे त्यास स्वतंत्र मुख्य प्राप्त होतो. लढाईची चळवळ जोरांत असेल तोंपावेतों दिवाणी व लष्करी मुख्य हे बहुधा एकच राहत असतात, आणि पूर्वीं पृथक् झालेले असले तरी पुनः एक होतात. परंतु प्रारंभीं जेव्हां दिवाणी रचना लष्करी रचनांपासून विशिष्ट होत असतात तेव्हां त्यांचे शास्तेही पृथक होण्याचा कल सामान्यतः उत्पन्न होत असतो. लढाया वारंवार होत असतील तेव्हां अधिकारबळकावणीमुळें ह्या कलास जरी विरोध येत असतो, तरी त्या थांबल्या म्हणजे त्यास पुनः जोर येतो; आणि नंतर दिवाणी मुख्याचा अंकित असा लष्करी मुख्य उत्पन्न होतो.

बाकींच्यापासून सैन्य विभिन्नस्वरूप होऊन सर्व समाजाला पक्क स्वरूप येत असतां खुद्द सैन्यालाही पक्क स्वरूप येत असतें. मूळच्या जमावांत सुधारणा जी होते ती जशी व्यक्तींचें असंयुक्त लढणें जाऊन त्याबद्दल एका मुख्याच्या धोरणानें संयुक्त लढणें उत्पन्न होऊन होते, तद्वतच लहान समाज जेव्हां संयुक्त होतात, तेव्हां टोळ्याटोळ्यांच्या व स्थानिकसमूहांच्या पृथक् पृथक् लढण्याच्या ऐवजीं एका सामान्य अधिपतीच्या धोरणानें सर्वांचें ल-

ढणें उत्पन्न होतें. आणि केंद्रस्थित शासन अंमलांत आणण्याकरितां मूळच्या समूहमुख्यांच्या ऐवजीं खालच्या खालच्या दर्जाचे अंमलदार उत्पन्न होतात, आणि पूर्वींचे समूहविभाग आडवे विभागून टाकणारे चांगले व्यवस्थित आणि निरनिराळीं कामें करणारे, असे सैन्यविभाग उत्पन्न होतात.

ह्या रीतीनें लढणाऱ्या संघाची घटना पक्क होत जाईल तसा तो संघ कायमचा होत जातो. जोंपावेतों माणसांस लहान लहान लढायांपुरते गोळा करून नंतर त्यास रजा देत असतात, तोंपावेतों त्यांच्यांत चांगली घटना उत्पन्न होणें अशक्य असतें. लढाईकरितां किंवा तिच्या तयारीकरितां माणसें नेहमीं एकत्र ठेविलीं जाऊं लागलीं,तरच ती शक्य होते; म्हणून कधींकधीं चलवावयाच्या सैन्याच्या संघांबद्दल असे संत्र उत्पन्न होऊं लागतात.

सैन्याच्या संबंधानें शेवटची गोष्ट ध्यानांत घ्यावयाची ती ही कीं, तें इतर रीतीनें सामान्य समाजापासून विभिन्न होत असतां, मूळच्या पदव्या ओळखण्याची सरणी कायम ठेवून आणि तीस ज्यास्त व्यवस्थित स्वरूप देऊन इतर समाजापासून विशेषरीत्या विभिन्न होत असतें; जरी इकडे बाकीचा समाज प्रगति पावत जाईल तशी त्याच्यांत कराराप्रमाणें वागण्याची सरणी पसरत जाऊन ती निश्चितस्वरूप होत असतेच. म्हणजे, समाजाच्या दिवाणी भागामध्यें स्वैच्छिक साहचर्याचें तत्त्व कितीही पसरलें तरी लष्करी भागांत जबरीच्या साहचर्याचें तत्त्व कायमच राहतें.

प्रकरण तेरावें

न्यायविषयक आणि विधायक व्यवस्था

८९. न्यायदानाच्या संस्था आणि लष्करी संस्था ह्या मुळांत एकच असतात हें लक्षांत आणण्याची आपली तयारी व्हावी एतदर्थ, बाह्य अतिक्रमण आणि अंतरतिक्रमण ह्यांचा समाचार घेण्याच्या सरण्यांमध्यें किती निकट नातें आहे इकडे आपण नजर देऊंया.

आम्हीं एकाहून अधिक वेळां ह्या गोष्टी जोरानें प्रतिपादिल्या आहेत कीं, समाजांच्या ज्या एकमेकांच्या संबंधानें जबाबदाऱ्या असतात त्या प्रत्येक समाजांतील कुटुंबसमूहांच्या ज्या एकमेकांच्या संबंधाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यासारख्याच असतात, आणि सारख्याच हक्कांची बजावणी सारख्याच मार्गांनीं होत असते. अनेक रानटी टोळ्यांकडे पाहतां असें दिसतें कीं, प्रारंभीं, बाह्य लढाईचा उद्देश इजांची समता उत्पन्न करण्याचा असतो, मग ही समता तशाच इजा शत्रूस करून प्रत्यक्षरीत्या उत्पन्न होवो, किंवा त्यांबद्दल नुकसान भरून घेऊन अप्रत्यक्षरीत्या उत्पन्न होवो. उदाहरणार्थ, चिनूक लोकांत एका बाजूस मृतांची संख्या दुसऱ्या बाजूपेक्षां ज्यास्त झाल्यास ते त्या दुसऱ्या बाजूकडून नुकसान भरून घेतात, आणि न दिल्यास लढाई सुरू ठेवितात; आरब लोकांतही तहाचे वेळीं दोन्ही पक्ष आपापलें किती लोक मेले ते मोजतात, आणि ज्याचे ज्यास्त मेले असतील त्यास तेवढ्यांबद्दल दुसऱ्या पक्षाकडून पैसे मिळ-

तात. ह्या उदाहरणांवरून असें दिसतें कीं, प्रारंभींच्या कुटुंबकलहांप्रमाणेंच नंतरच्या टोळयांटोळयांमधील युद्धांत जीवासाठीं जीव द्यावा लागतो, किंवा नुकसान भरून द्यावें लागतें; आणि हें नुकसान, जर्मनींत व इंग्लंदांत एकवेळीं देत त्याप्रमाणें, अमुक एक मेंढ्या किंवा गुरेंढोरें ह्यांच्या रूपानें किंवा द्रव्यरूपानें द्यावें लागतें.

व्यक्तींव्यक्तींमध्यें होणाऱ्या तंट्यांमध्यें पहिल्याप्रथम इजेबद्दल इजा करण्याची जी चाल असते तिच्या पुढची पायरी म्हटली म्हणजे त्या इजेबद्दल शास्त्यास न्याय करावयास सांगावयाचें हीच असते. ही प्रवृत्ति आपल्यास सांडविच बेटांत दृष्टीस पडते. कारण तेथें इजा झालेला मनुष्य स्वतः सूड घेण्यास असमर्थ असेल तर तो राजाकडे किंवा मुख्य नायकाकडे आपली फिर्याद नेतो; आणि आपणास इजा करणारास स्वतः इजा करावी किंवा फिर्याद करावी ही मोकळीक अगदीं उन्नत पायऱ्यांवरही कायम राहते. कारण पुष्कळ काळपर्यंत लोकांस असें वाटत असतें कीं, कोणीं आपलें नुकसान केल्यास त्याबद्दल स्वतः सूड न घेतां राजाकडे जाणें हें लाजिरवाणें काम आहे. ह्याचीं उदाहरणें फ्रान्स, इंग्लंद व इटाली ह्या देशांच्या इतिहासांत सांपडतात. फ्रान्सांत न्यायविषयक द्वंद्वयुद्धें चवदाव्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू होतीं, आणि इंग्लंदांत तीं १८१९ सालापर्यंत कायद्यानें रद्द झालेलीं नव्हतीं.

शिवाय ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे कीं, स्वताबद्दल स्वतः सूड उगविण्याची पद्धति जाऊन सरकाराकडे फिर्याद करण्याची चाल जी हळूहळू सुरू होते

तीस कारण सार्वजनिक जरूरी, आणि विशेषतः लष्क-री जरूरी, हें असतें. कारण अशा रीतीनें लोक एक-मेकांस शिक्षा करावयास लागल्यास दंगेधोपे वाढतात, आणि राजा बाहेर लढाईत गुंतला असतां राष्ट्रांत अ-सली बंडाळी झाल्यास त्यापासून मोठी भीति असते. हें १२९६ तील फ्रान्सच्या राजाच्या एका हुकमावरून स्पष्ट दिसतें. कारण त्यांत असें लिहिलेलें आहे कीं, राजा लढाईत गुंतला असतां कोणीं खासगी लढाया किंवा न्यायविषयक द्वंद्वयुद्धें करूं नये.

शिवाय कायदा जो लोकांचें रक्षण करितो त्याचें स्वरूप लष्करी आहे हें ह्यावरून नजरेस येतें कीं, सर-कारानें न्यायपद्धति हातीं घेणें म्हणजे खासगी सशस्त्र लोकांच्या ऐवजीं सरकारी सशस्त्र लोकांची योजना करणें होय; आणि ह्या लोकांचा उपयोग सरकारास जरी ने-हमीं करावा लागत नाहीं, तरी ते नेहमीं तयार अस-तातच. सार्वजनिक शत्रूविरुद्ध क्रिया आणि खाजगी शत्रूविरुद्ध क्रिया ह्या मुळांत एकच आहेत हें सत्य "न्यायाची तलवार" (Sword of Justice) अ-मक्या अमक्याच्या डोक्यावर लोंबत आहे असें जें म्हणतात, त्यावरून देखील बऱ्याच स्पष्ट रीतीनें लक्षांत येण्यासारखें आहे.

एवंच हे दोन व्यापार मुळांत एकस्वरूप आहेत हें आपल्या लक्षांत आल्यामुळें, ते चालविणाऱ्या रचना-ही मुळांत एकच असतात हें लक्षांत घेण्याची आपली तयारी होणार आहे.

९०. कारण सशस्त्र माणसांचें जें प्राथमिक संमेलन

लढाईचें कौन्सिल असून राजकीय मंडळही असतें म्हणून अगोदरच आपल्या लक्षांत आलेलें आहे, तेंच प्रथमचें न्यायविषयकही मंडळ असतें.

हल्लीं अस्तित्वांत असलेल्या रानट्यांपैकीं हाटेंटॉट लोकांच्या उदाहरणावरून हें आपल्यास दिसून येतें. "त्यांच्यामध्यें न्यायाचें कोडत गांवनाईक आणि गांवांतील सर्व लोक यांचें बनलेलें असतें. तें उघड्या ठिकाणीं भरत असतें, आणि लोक जमिनीवर वेटाळें करून बसत असतात. सर्व प्रश्नांचा निकाल बहुमतानें होत असतो. आरोपी दोषी ठरल्यास, आणि त्यास ठार करावा असें कोर्टास वाटल्यास ती शिक्षा तेथेंच अमलांत आणितात. गांवांतील नाईक हाच मुख्य शिरच्छेदक असतो, आणि पहिला घाव तोच मारितो; आणि नंतर बाकीचे मारितात". दुसऱ्या अनेक ऐतिहासिक लोकांच्या बखरींवरून असाच पुरावा उपलब्ध होतो. उदाहरणार्थ, होमर कवीनें वर्णिलेल्या ग्रीक लोकांत कधीं कधीं राजा स्वतः आणि कधीं कधी नाईक तंटे तोडीत असत, असें सांगितलेलं आढळतें; आणि हे निकाल सार्वजनिक रीतीनें करीत असून, ज्या सभांमध्यें लढाई व तह यांचा विचार करीत त्याच सभांत करीत, असेंही सांगितलेलें आढळतें. रोमन लोकांमध्येंही असेंच होतें हें यावरून दिसतें कीं, त्यांच्यांत गुन्हा माफ करण्याचा अधिकार राजाकडे नसून सगळ्या समाजाकडेच असे. प्राथमिक जर्मन लोकांच्या संमेलनांचें वर्णन करतांना टासिटस म्हणतो:—" या लोकांचा जमाव सशस्त्र असून योग्य वाटेल त्या क्रमानें

बसतो. त्यांच्या पुढें खटले आणीत असतात, आणि प्रांतांतून व खेड्यांतून खटले तोडण्यासाठीं नाईक निवडितात. हे खटले प्रत्येक नाईक शंभर लोक समवेत घेऊन तोडीत असतो, आणि तेणेंकरून त्यास न्याय करण्याच्या कामीं सहाय्य होऊन जोरही येतो ". पोल व स्लाव्ह या लोकांत अशीच व्यवस्था असे असें लेव्हेल म्हणतो. डेन्स लोकांमध्येंही असेंच असें; आणि आयरीशलोकांबद्दल स्पेन्सर असें म्हणतो कीं, ते शहराशहरांमधील आणि व्यक्तींमधील तंटे तोडण्यास डोंगरावरून मोठाल्या सभा भरवीत असतात. इंग्लिश लोकांतही " विटेनाजिमॉट" वगैरे लोकसभा न्यायदानाचें काम करीत असत.

सभेंतून गैरहजर राहिल्याबद्दल नागरिकांस शिक्षा करण्याचा जो प्राचीनकाळचा प्रघात त्यावरून देखील लष्करी संमेलन आणि न्यायविषयक संमेसन हीं प्रारंभीं एकच असत ह्याबद्दल पुरावा सांपडतो. लढाईस प्रत्येकानें मदत करणें आवश्यक असल्यामुळें लष्करी संमेलनास जे हजर नसतील त्यांस दंड करणें भागच असे; आणि हा प्रघात एकदां सुरू झाल्यावर, न्यायविषयक कामासाठीं जरी सर्वांनीं हजर राहणें आवश्यक नसे तरी, तो कायमच राहिला.

ह्या संबंधानें हेंही सांगणें इष्ट दिसतें कीं, कांहीं ठिकाणीं दोन्ही संमेलनांचें हें एकस्वरूप जरी कायम राहिलेलें दिसतें, तरी त्यांच्यांत भेद उत्पन्न होण्याचेंही बीज दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, क्यारोलिन्जियन राजांच्या अमदानींत न्यायविषयक सभा उघड्यावर न भर-

तां मंडपांतून भरूं लागल्या, आणि तेथें नागरिकांस शस्त्रें आणण्याची बंदी असे. स्कान्दिनेव्हियन लोकांतही असेंच असे, हें अगोदर सांगितलेंच आहे. ऐसलंद बेटाच्या संबंधानें आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत ह्या वार्षिक संमेलनास हजर न राहणें लाजिरवाणें समजत, पण त्याबद्दल शिक्षा होत नसे. ह्यावरून, संमेलनांस दिवाणी कामांचें जसें प्राबल्य होऊं लागलें तसें हजर राहणें कमी आवश्यक कसें होऊं लागलें, हें स्पष्ट दिसतें.

९१. प्रथम न्यायविषयकमंडळ राजकीय व लष्करी मंडळाशीं समस्वरूपच असल्यामुळें अर्थातच त्याची ही घटना "एकांत तीन" ह्याच स्वरूपाची असते; म्हणून त्याच्या घटकांच्या वाढीस अनुसरून त्यास जीं निरनिराळीं स्वरूपें येतात तीं आतां आपणास पाहिलीं पाहिजेत. हीं स्वरूपें आणि त्याबरोबरच येणारीं राजकीय स्वरूपें ह्यांमध्यें सारखवटपणा असलाच पाहिजे असा अंदाज प्रथमदर्शनींच करतां येतो.

जेथें लष्करी घटनेची वृद्धि होऊन बायकांवरील आणि लोकांवरील सत्ता बरीच प्रबल झाली आहे, तेथें त्याचें श्रेष्ठत्व राजकीय आणि लष्करी कामांत त्याच्या स्वेच्छाचारी अधिकारावरून जसें व्यक्त होतें, तसेंच न्यायविषयक कामांतही त्याच्या तसल्या वर्तनावरून व्यक्त होतें. म्हणून खटल्याची चौकशी करण्यांत वडील माणसें आणि जनसमूह यांचें पूर्वीं जें अंग असतें, तें आतां सर्वांशीं किंवा बहुतेकांशीं नष्ट होतें. पण अशा रीतीनें ह्या बाबतींत राजाची सत्ता जरी नियंत्रित झाली, तरी पूर्वींच्या व्यवस्थेचीं कांहीं चिन्हें कायम राहतात. कारण तो ब-

हुतकरून खटल्यांचे निकाल प्रसिद्धपणें आणि उघड्या मैदानांत सांगत असतो. तो आपल्या परिचारकांसह आणि इतर लोकांसह जेव्हां दरवाजाबाहेर पडेल, तेव्हां लोक त्याच्याकडे न्याय मागण्यासाठीं येत असतात. काश्मीर प्रांतांत ही चाल अद्यापिही आहे हें आह्मीं पूर्वीं सांगितलेंच आहे. हीब्र्यू राजे देखील न्यायाचें काम शहराच्या वेशीपाशीं करीत असत; कारण प्राच्य देशांत तेथेंच लोक जमा होत असतात. प्रारंभींच्या रोमन लोकांमही राजे रथावर बसून सार्वजनिक संमेलनाच्या ठिकाणीं न्यायदान करीत. जर्मन लोकांत हें काम हिरव्याचार मैदानांत होई किंवा शहरवेशीजवळच्या दगडी पायऱ्यांवर होई; आणि फ्रेंच लोकांत बहुधा झाडाखालीं होई. जॉइनव्हिलच्या म्हणण्याप्रमाणें हा प्रघात फ्रान्सांत पुष्कळ काळपर्यंत सुरू होता असें दिसतें; कारण तो म्हणतो, " नववा लुई प्रार्थना झाल्यावर व्हिन्सेनिसच्या रानांत जाऊन वरचेवर एकाद्या ओक वृक्षास पाठ लावून बसे, आणि आपल्या सभोंवतीं आह्मास बसवून स्वतः विचारी कीं, कोणाची कांहीं फिर्याद आहे काय? कधीं कधीं उन्हाळ्यांत ह्या कामासाठीं पारीसच्या बागेंत तो आलेला म्यां पाहिलेला आहे ". स्कॉटलंदमध्यें पहिल्या डेव्हिडच्या वेळीं असेंच कांहीं असे. ह्या सर्व चालींवरून असें स्पष्ट दिसतें कीं, मूळची न्यायदानपद्धति, पुढाऱ्यांचा व लोकांचा अधिकार तेवढा जाऊन व राजाकडे तो सर्व येऊन, कायम राहते.

• ' एकांत तीन ' अशा रीतीच्या राजकीय घटनेचा दुसरा घटक जेथें प्रबल बनतो, तेथें तोच न्यायविषय-

क अधिकार बळकावून बसतो. उदाहरणार्थ, स्पार्टन लोकांत हा अधिकार सरदारघटित सेनेटाकडेच असे. तद्वतच आथेन्समध्यें सरदारांची बनलेली जी " आरिओपेगस " नामक सभा ती हा अधिकार चालवी. आणि त्यानंतरच्या काळीं व्हेनिसमध्यें दहांचें कौन्सिलच राजकीय कारभाराबरोबर न्यायविषयक कारभार पाही. मध्ययुगांत अशाच रीतीनें न्याय करण्याची सत्ता एकंदर नागरिकांपासून एका लहान व ज्यास्त सधन अशा वर्गाच्या हातीं गेलेली दिसते.

पण इतर ठिकाणीं, आणि जेथें विशेषतः लोकवस्ती शहरांतून भरल्यामुळें न्याय करण्याचें काम कमी त्रासदायक होईल तेथें, तिसऱ्या घटकानें राजकीय सत्तेबरोबर न्यायदानसत्ता पुनः संपादिलेली किंवा पूर्वीची कायम राखिलेली आपल्या दृष्टोत्पत्तीस येते ह्याचें अत्यन्त प्रसिद्ध उदाहरण म्हटलें म्हणजे आथेन्समध्यें सरदारी सत्ता जाऊन लोकसत्ता उत्पन्न झाली तेव्हांचें होय. क्लिस्थेनियनक्रान्तीमुळें, दरवर्षी नेमिलेल्या म्याजिस्ट्रेटांना न्याय करण्यासाठीं जमलेले लोकसमूह व्यक्तिशः जबाबदार धरूं लागले; आणि पुढें जेव्हां पेरिक्लिसच्या कारकीर्दींत डायकॅस्टरी, किंवा चिठ्ठ्या टाकून निवडलेल्या पगारी ज्यूररांचीं कोर्टें, स्थापन झालीं, तेव्हां तर न्यायदानसत्ता वस्तुतः सगळ्याच नागरिकांच्या हातीं गेली. फ्रीस्लंडर लोकांचा देश स्वतंत्र राजकीय सत्ता कायम राहण्यास योग्य असल्यामुळें तेथेंही न्यायदानाधिकार लोकांच्याच हातीं असे; आणि हालंदांत ट्यूटानिक " मार्को "चें वर्णन करतांना लाव्हेलेयी असें म्हणतो

कीं, ते लोक कांहीं कांहीं कालानें सशस्त्र होऊन एकत्र जमत असत आणि कोणी गैरहजर असल्यास त्यास दंड करीत, आणि राजकीय व न्यायविषयक सर्व कामांची व्यवस्था लावीत.

सरकारचें राजकीय स्वरूप आणि न्यायविषयक स्वरूप ह्यांच्यामधील हें सादृश्य, जेथें तें (सरकार) स्वेच्छाचारी, किंवा सरदारी किंवा लोकसत्ताक नसून संमिश्र असेल, तेथें देखील दिसून येतें. यास उदाहरण इंग्लंदचेंच होय. कारण तेथें राजकीय व्यवस्थेमध्यें कोणासही जबाब द्यावयास नको अशा बऱ्याच राजाधिकाराशीं लोकाधिकाराचें जसें मिश्रण झालेलें आहे, तसेंच न्यायव्यवस्थेमध्येंही झालेलें आहे. प्राचीनकाळीं तेथें स्थानिक किंवा पोटकायदे करण्याची कांहीं सत्ता शहरांना असे; आणि शतमंडळ व जिल्हामंडळ हीं न्यायविषयक व अंमलबजावणीच्या संबंधानें ह्याच्याहून ज्यास्त महत्त्वाचा अधिकार चालवीत; आणि शिवाय त्यांचे अंमलदार निवडलेले असत. पण पुढें जेव्हां लष्करी जमीनदारीच्या संस्था सुरू झाल्या, आणि त्यामुळें राजांची सत्ता वाढली, तेव्हां न्यायदानाच्या कारभारांतील लोकांचें अंग कमी झालें, आणि शास्तेवर्ग व राजाचे गुमास्ते यांचें वाढलें. आणि हल्लीं ह्या पद्धतींत ज्यूरीच्या पद्धतीचा समावेश झालेला असल्यामुळें ती कांहीं अंशीं लोकायत्त झालेली आहे; बिनपगारी म्याजिस्ट्रेट मुख्य सरकारानें नेमिलेले असले तरी ते श्रीमान् व मुख्यत्वेंकरून जमीनदार वर्गापैकीं असल्यामुळें, ती कांहीं अंशीं सरदारवर्गांतच आहे; पगारी न्यायाधीश राजा नेमीत

असल्यामुळें ती राजायत्त आहे; तथापि एकंदरींत लोकांची इच्छा अंमलांत आणणाऱ्या प्रधानमंडळाकडून न्यायाधीश व म्याजिस्ट्रेट यांची निवड होत असल्यामुळें, न्यायदान करण्याच्या कामीं राजसत्ता आणि उच्चवर्गसत्ता ह्या लोकनियंत्रणाखालीं चालत असतात असें म्हटलें पाहिजे.

९२. वरच गर्भित झालेलें आणि आतां निश्चितपणें सांगावयाचें एक सत्य असें कीं, लढाईमुळें लहान समाचें घनीभवन होऊन मोठाले समाज बनत असतां, न्यायविषयक कामें राजानें स्वताचे अधिकार चालविण्याकरितां नेमिलेल्या अधिकाऱ्यांकडून ज्यास्त ज्यास्त चालूं लागतात.

प्राथमिक राजा ज्या अर्थी बहुधा स्वताच मुख्य सेनापति व उपाध्याय असतो, त्या अर्थी न्याय करण्याचा आपला अधिकार तो सहजच उपाध्ये व लढवय्ये यांच्या हातीं देत असतो. शिवाय, जेथें सल्लागार मंडळ स्थापन झालेलें असून जनसमूहापासून पृथक् झालेलें असेल, तेथें त्यांत ह्या दोन्ही वर्गांतील घटक सामान्यतः असल्यामुळें तें मंडळ जे न्यायविषयक अधिकार चालवीत असेल ते ह्या वर्गांपैकीं कोणत्याही एका वर्गास पूर्णपणें बळकावतां येत नाहींत. शिवाय पुष्कळ ठिकाणीं धर्मोपाध्यायांच्या हातीं धर्माधिकाराबरोबर लष्करी अधिकारही असल्यामुळें त्यांचें न्यायाच्या कामींही अंग असावें हें किती साहजिक आहे हें स्पष्ट दिसतें. आतां लष्करी व धर्मोपदेशक ह्या दोन वर्गांपैकीं कोणत्या वर्गाच्या हातीं ज्यास्त न्यायाधिकार

जावयाचा हें लोक कोणांस ज्यास्त मानतात ह्याच्यावर अवलंबून राहतें.

झुलू लोकांत मोठाले देव, किंवा धर्मग्रंथ, आणि व्यवस्थित उपाध्यायवर्ग नसून, राजा आपला अधिकार दोन निवडक लढवय्यांबरोबर वांटून घेत असतो. आणि तेच सगळ्या देशांत वरिष्ठ न्यायाधीश असतात. इगार किंवा आंतील नीग्रो या लोकांमध्येंही त्यांच्या पुजाऱ्यांचें फारसें प्राबल्य नसून पहिला व दुसरा न्यायाधीश हे लढाईच्या वेळचे जे सेनापति तेच असतात. सोलनच्या वेळीं आथेन्समध्यें असेंच असे रोममध्यें लोकसत्ताकाची स्थापना होण्यापूर्वीं उपाध्यायांच्या हातीं जरी न्यायाधिकार असे, तरी नंतर तो मूळचा जो शिपाईवर्ग त्याच्या हातीं गेला. युरोपांत मध्ययुगांत सर्वत्र लष्करी जमीनदार हेच त्या त्या ठिकाणचे न्यायाधीश असत. याचें अगदीं स्पष्ट उदाहरण म्हटलें म्हणजे कदाचित् जपानचेंच होय. कारण तेथें लष्करी प्राबल्य फार दिवसांचें व फार व्यवस्थित असें असून न्यायाधिकार लष्करी वर्गाचेच हातीं आहे. ह्याचें कारण असें दिसतें कीं, देवकुलोत्पन्न जो मिकाडो तो पृथ्वीवर आणि स्वर्गांत दोन्ही ठिकाणीं श्रेष्ठ असल्यामुळें, तेथील मूळचा जो शिंटो धर्म त्याला राजाशीं स्पर्धा करणारा असा उपाध्यायवर्ग बनवतां आला नाहीं.

पण बहुतेक ठिकाणीं उपाध्यायवर्गाच्या हातीं न्यायसत्ता पुष्कळच लावून दिलेली आढळून येते. उदाहरणार्थ, कालमक्र लोकांसारख्या हल्लीं अस्तित्वांत असलेल्या रानटी लोकांत ती दृष्टीस पडते; त्यांचे उ-

पाध्ये सर्वांत श्रेष्ठ अशा न्यायमंडळांत प्रबल असून शिवाय ते स्थानिक न्यायाधिकारही चालवितात; म्हणजे प्रत्येक दुय्यम नायकाच्या कोटींत एक महोपाध्याय मुख्य न्यायाधीश असतो. गत अशा असुधारलेल्या किंवा अर्धवट सुधारलेल्या लोकांपैकीं उदाहरण द्यावयाचें असल्यास तें यूकाटनमधील इंदियन लोकांचें देण्यासारखें आहे; कारण ते लोक कांहीं प्रसंगीं उपाध्यायास न्यायाधीश नेमीत असत, आणि ते न्यायाधीश आपण दिलेल्या शिक्षा स्वताच अमलांत आणीत. प्राचीन ईजिप्तमध्यें मागून नसलें तरी प्रथमतः न्याय करणें हें काम उपाध्यायांचें असें;आणि हीब्रयू लोकांत ते मुख्य न्यायाधीश असत ही गोष्ट तर प्रसिद्धच आहे; शिवाय तेथें असा कायदा असे कीं त्यांनीं केलेला निकाल जो अमान्य करील त्यास देहान्ताशिक्षा द्यावी. जर्मन लोकांबद्दल टासिटस असें म्हणतो कीं, लढाईमध्यें गुन्हेगारांची चवकशी करण्याचा व त्यांस फटके मारण्याचा अधिकार उपाध्यायांखेरीज कोणास नसे;सारांश ही शिक्षा लढाईचे ठिकाणीं हजर म्हणून समजलेला जो देव त्यानें केलेली असे. प्राचीन ब्रिटनबद्दल सीझर असें म्हणतो कीं दिवाणी व फौजदारी खटल्यांची चवकशी करून शिक्षा करण्याचा अधिकार तेथील ड्रुइड किंवा उपाध्ये यांसच असे; आणि त्यांचें कोणीं न ऐकिल्यास त्यास बहिष्कार घालीत. स्कांडिनेव्हियन लोकांत असेंच होतें म्हणून ग्रिम्म आपल्यास सांगतो. मध्ययुगांत यूरोपांत सर्वत्र धर्माधिकाऱ्यांनाच न्यायाधीश नेमीत, आणि त्यांना दैविक अधिकार आहे असें समजत. मेरोव्हिन्जियन

राजांच्यावेळीं व नंतर स्वर्गाची आशा आणि नरकाची भीति यांनीं प्रोत्साहित होऊन लोक मृत्युपत्रांतून धर्म-संस्थेस जेव्हां इतक्या देणग्या देऊं लागले कीं बरीच जमीन त्या संस्थेच्या हातीं जाऊं लागली—जेव्हां विशप-लोक आपल्या हाताखालचे भट व आश्रित यांजवर न्याय करण्याचा अधिकार चालवूं लागले—जेव्हां धर्माधिकाऱ्यांचें बंड इतकें माजलें कीं त्यांच्यावर गृहस्थांचा न्यायाधिकार जाऊन ते उलट गृहस्थवर्गावर तो अधिकार चालवूं लागले-तेव्हां ह्या देवनियुक्त समजलेल्या वर्गाचा अधिकार इतका वाढला कीं राजे देखील त्यांच्यापुढें माना वांकवूं लागले. इंग्लंदांतही असेंच झालें. नार्मन विजयाच्यापूर्वी बिशपलोक न्यायाच्या कामीं पंच होत असत, आणि अनेक दिवाणी खटले तोडीत असत. पण पुढें हा त्यांचा अधिकार ज्यास्त ज्यास्तच वाढत चालला;आणि त्यांनीं घातलेले बहिष्कार दिवाणी म्याजिस्ट्रेट अमलांत आणूं लागले. शिवाय, हे लोक लष्करी जमीनदार ह्या नात्यानें आपापल्या मुलखांतील न्यायाधीशच असत;आणि ह्याशिवाय मुख्य सरकार त्यांस अनेक लहान-मोठे न्याधाशीशाचे अधिकार देत असे. त्यामुळें न्यायाचें काम मुख्यत्वेंकरून नाहीं तरी बऱ्याच अंशांनीं त्यांच्या हातीं जाऊन बसलें.

न्यायाचें काम अशा रीतीनें जें लष्करी धार्मिक वर्गाच्याच हातीं राहिलें, आणि कधीं हा व कधीं तो वर्ग जो त्या कामीं प्रबल होऊन राहिला, तो जोंपर्यंत संपत्तिमान् व वजनदार असा अन्य वर्ग उत्पन्न झाला नाहीं तोंपावेतोंच राहिला. पण शहरें व उदमी ह्यांची जशी वृद्धि होऊं

लागली, आणि ते जसे संपत्ति व शिक्षण हीं संपादन करूं लागले, तसतसा न्यायाधिकार त्यांच्या हातीं ज्यास्त ज्यास्त जाऊं लागला. ही अधिकारसंक्रांति होण्यास अनेक कारणें जुळून आलीं. एक कारण सरदारलोक सुशिक्षित नसत हें होय; त्यामुळें सारखे वाढत जाणारे व ज्यास्त घोंटाळ्याचे होणारे जे कायदे कानू त्यांची अंमलबजावणी त्यांच्यानें होईना. दुसरें कारण धर्माधिकाऱ्यांची राजकीय अपात्रता हें होय; कारण ते जसे आपले देवदत्त म्हणून समजलेले अधिकार ज्यास्त ज्यास्त चालवूं लागले, तसतसे ते राज्यांत ज्यास्त ज्यास्त अप्रिय होऊं लागले. ह्या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं रचनाविशिष्टीकरण ज्यास्त वाढलें; म्हणजे, पूर्वीं जे न्यायाधिकार लढवय्ये किंवा धर्माधिकारीही असलेले लोक चालवीत असत, ते आतां केवळ त्याच कामाला वाहिलेले लोक चालवूं लागले.

९३. वरील संक्रान्ति होत असतांनाच न्यायसंस्थांचें उत्क्रमण आणखी कित्येक मार्गांनीं चाललेलें असतें. त्यांपैकीं एक मार्ग हा कीं पूर्वींचे जे बैठे न्यायाधीश त्यांच्यांत आतां फिरत्या न्यायाधीशांची भर पडूं लागते.

प्रारंभीं जेव्हां राजा स्वतःच न्यायाचें काम करीत असतो तेव्हां तो तें कधीं ह्या ठिकाणीं आणि कधीं त्या ठिकाणीं करीत असतो; कारण लष्करी व न्यायविषयक कामांसाठीं त्यास राज्यांतून इकडे तिकडे फिरावें लागत असतें. या संबंधानें निरनिराळ्या काळच्या निरनिराळ्या प्रकारच्या समाजांचा पुरावा सांपडतो. प्राचीन पेरूचे इतिहासकार आपणास असें

सांगतात कीं " इन्का हा (तेथील राजा) अपराधाप्रमाणें शिक्षा करीत असे, कारण तो जेथें जेथें राहील तेथें तोच न्यायाधीश असे, आणि ज्यांची आगळीक झाली असेल ते त्याच्याकडे धांव घेत ". बाराव्या शतकांतील जर्मन बादशाहाबद्दल आपण असें वाचितों कीं तो अपिलें ऐ-कत असे इतकेंच नाहीं, पण तो एकाद्या जिल्ह्यांत गे-ल्याबरोबर तेथील न्यायाधीशाचा अधिकार त्याच्याकडे जाई. पंधराव्या शतकांत फ्रान्सांत अशीच स्थिति होती. तेथील राजा चार्लस हा देशांत सर्वत्र फिरून लोकांचे न्याय तोडीत असे. स्काटलंदांत पहिला डेव्हिड सरासरी असेंच करी; कारण, रानाविषयींचे व चारणीचे हक्क हे तो ठरवी. इंग्लंदांत एडगर व कान्यूट हे स्वतः न्याय करण्यासाठीं फिरतीवर जात; आणि जॉन राजाची मोठी सनद होई तोंपावेतों हा प्रघात सुरू होता अशाबद्दल चांगला पुरावा सांपडतो.

राजकीय संकलन जसें वाढत जाईल आणि मुख्य शास्त्याची सत्ता जशी वाढत जाईल, तशीं त्याच्याकडे स्थानिक शास्त्यांनीं दिलेल्या निकालांविरुद्ध ज्यास्त ज्यास्त अपिलें येऊं लागतात, आणि राष्ट्राचें काम जसें वाढत जाऊन घोंटाळ्याचें होत जाईल तसें हें काम त्यास झेंपेनासें होऊन तें तो आपल्या प्रतिनिधींकडे सं-पवूं लागतो. ह्याचीं उदाहरणें फ्रान्सांत शार्लमेन राजा-च्यावेळीं आणि इंग्लंदांत दुसऱ्या हेन्रीच्या वेळीं आढ-ळून येतात; आणि पुढें त्यांच्यापासूनच फिरत्या न्या-याधिशांची उत्पत्ति झाली.

व्यक्तीचे हक्क संभाळण्यासाठीं हें जें व्यवस्थांचें उ-

त्क्रमण होत असतें त्यामध्यें देखील कर्तव्यें हीं मूळ असतात, आणि हक्क हे दुय्यम असतात, ही गोष्ट सांगणें अवश्य दिसतें. कारण जें राजाचें दरबार या फिरत्या न्यायाधिशांची नेमणूक करी त्या दरबाराप्रमाणेंच ह्यांचें मुख्य काम कर वसूल करण्याचें असे, आणि दुय्यम काम न्याय करण्याचें असे. आपल्याकडील कलेक्टर, मामलेदार, इत्यादिकांचेंही उदाहरण एथें लागू पडण्यासारखेंच आहे; कारण ते मुख्यत्वेंकरून वसुली कामगार असतात, आणि गौणत्वेंकरून न्यायाधीश असतात. सारांश, शास्त्या वर्गापासून समाजास संरक्षण मिळण्याच्या अगोदर त्यास (समाजास) त्याच्या शास्त्या वर्गाच्या पोटाची तजवीज करावी लागत असते.

९४. लहान समाजांचें संकलन होऊन मोठाले समाज बनत असतां, मुख्य सरकाराची वाढ होत असतां, आणि त्याबरोबरच त्याच्या कामाची वाढ होऊन तें प्रतिनिधींकडे संपवावें लागत असतां, इतर घटनांप्रमाणेंच न्यायविषयक घटनेमध्येंही विशिष्टीकरण वाढत जातें. ह्याविषयींचा पुरावा अत्यन्त संकीर्ण आहे. ह्याचें एक कारण हें कीं विजेत्यानें नव्या न्यायविषयक संस्था स्थापिल्या म्हणजे तेथील मूळच्या संस्था अजीबाद नाहींशा न होतां केवळ त्यांच्या खालच्या दर्जाच्या बनत असतात, आणि अशा रीतीनें नव्या-जुन्यांचा घोंटाळा उत्पन्न होतो. दुसरें कारण हें कीं अधिकारप्रमाणांप्रमाणें अधिकारजातींचेंही विशिष्टीकरण होऊं लागतें; म्हणजे, निरनिराळ्या प्रकारचे अधिकार निरनिराळ्या कामवर्गांच्या किंवा खात्यांच्या हातीं जाऊं लागतात.

हें कशा रीतीनें होतें ह्याबद्दल थोडेसें दिग्दर्शन करूं.

सर्वांत ज्यास्त ठळक विशिष्टीकरण किंवा विभिन्नीकरण म्हटलें म्हणजे गृहस्थी, भिक्षुकी, आणि लष्करी कोर्टें बनणें हें होय. हें विभिन्नीकरण जेव्हां लोकसंमेलन आपल्या नायकासहित व वडिलधाऱ्या माणसांसहित, लष्करी कामांत चुकवाचुकव करणारांस शिक्षा करी, धर्मविषयक प्रश्नांचा निकाल लावी, आणि गुन्ह्यांची चवकशी करी, तेव्हांपासून सुरू झालेलें आहे, आणि कोणाचा अधिकार कोणत्या बाबतींत चालावयाचा ह्याबद्दल तंटे व झगडे होऊन हीं तीन प्रकारचीं कोर्टें एकमेकांपासून निरनिराळीं झालेलीं आहेत. आतां ह्या तीन घटनांपैकीं शेवटच्या घटनेंत जीं आणखी विभिन्नीकरणें होतात त्यांचा तेवढाच एथें विचार करूं.

प्रारंभीं राजा जमलेल्या लोकांच्या संमतीनें किंवा संमतिविना केवळ निकाल करितो एवढेंच नाहीं, तर तो तो निकाल अंमलांत आणितो किंवा आणवितो. उदाहरणार्थ, शिक्षा करतांना, डेहामीमध्यें राजा नजीक उभा राहतो, आणि शिक्षा करणारा हपीसर त्यास पसंत न पडल्यास त्याच्या हातांतून तरवार घेतो, आणि शिरच्छेद कसा करावा तें त्यास दाखवितो. बेडुइन लोकांत असेंच आहे. इंग्लिश लोकांतही खुद्द असेंच असे. आणि हल्लीं देखील शिक्षा अमलांत आणण्यास शेरिफाची किंवा प्रधानांची परवानगी लागते ह्यावरून तेंच व्यक्त होतें. सारांश, राजानें आपलें न्याय करण्याचें काम न्यायाधीशांकडे संपविलें तरी न्यायदानाचा अखेरचा अधिकार राजापाशींच राहतो. तो कसा राहतो हें त्या वि-

भिन्नीकरणाचा इतिहास पाहिल्यानें लक्षांत येणार आहे.

तक्रारी ऐकण्यासाठीं आणि दाद लावण्यासाठीं राजा जेव्हां प्रतिनिधी नेमितो तेव्हां सहजच तो त्यांस त्या बाबतींत अगदीं पूर्ण अधिकार देत नाहीं; तर त्यांच्या निकालांची दुरुस्ती करण्याचा अधिकार आपल्याकडे ठेवितो. ही गोष्ट सांडविच बेटांतल्यासारख्या रानटी समाजांतून देखील दिसून येते; कारण तेथें ज्यास आपल्या नायकानें केलेला ठराव पसंत नसेल त्यास सुभेदाराकडे, आणि सुभेदाराविरुद्ध राजाकडे, आपील करण्याची मोकळीक आहे. तद्वतच प्राचीन मेक्सिकोमध्यें न्यायाधीशांना राजास विचारल्याखेरीज देहान्तशिक्षा देतां येत नसे; व ती शिक्षा राजा सांगे. आणि जेथें नायकी सरल नसून संयुक्त असेल, तेथेंही हेंच तत्त्व लागू आहे. आटिकामध्यें जेव्हां अनेक लहान संस्थानांचें मिळून एक संयुक्त राज्य बनलें तेव्हां मुख्य न्यायाधिकार मुख्य शास्त्याच्या हातीं गेला आणि गौण अधिकार तेवढे शहरांकडे राहिले. न्यायाधीशांच्या अधिकारामध्यें जाती व प्रमाण ह्यांच्या संबंधानें जे कमज्यास्तपणा उत्पन्न होतात ते असल्या फेरबदलांनींच होतात. राजकीय अंकितपणा जसा पसरत जाईल तसे जीं स्थानिक संमेलनें प्रथम सर्वच प्रकारच्या बाबतींत न्याय करून तो अमलांतही आणीत असत, त्यांचे कांहीं अधिकार कमी होतात; उदाहरणार्थ, त्यांच्या अधिकाराचें क्षेत्र आकुंचित होतें, किंवा त्यांच्या निकालांवर देखरेख सुरू होते, किंवा अंमलांत आणण्याचा त्यांचा अधिकार जातो. ह्याचीं विशेष उदाहरणें देण्याची जरूरी नाहीं व शक्यताही नाहीं. पण अशा

रीतीनें लहान व स्थानिक अधिकारीसंस्थांची सत्ता जशी कमी होत जाईल, तशी मोठाल्या व मुख्य ठिकाणच्या अधिकारीजालांची वाढत जाते.

ही वाढ होण्यास दोन कारणें होत असतात; एक कारण लोकांची जरूरी, आणि दुसरें कारण राजाची इच्छा. जोंपावेतों राजा जेथें जेथें असेल तेथेंच त्याचें कोर्ट भरत असतें, तोंपावेतों फिर्यादी ऐकण्यास मोठी अडचण पडत असते, आणि वेळ व द्रव्य ह्यांचा मोठाच व्यय फिर्यादींना करावा लागत असतो. म्हणून सामान्य खटले, राजाच्या फिरत्या कोर्टांत न ऐकतां कोणत्या तरी एका नियमित स्थळीं ऐकावे असा नियम प्रथम अंमलांत येतो. इंग्लंदांत जॉन राजाच्या सनदेंत अशी एक तरतूद केलेली होती, आणि वेस्टमिन्स्टर येथील राजवाडा हें ठिकाण त्या कामासाठीं नेमिलें होतें. फ्रान्सांत पार्लमेंत देखील पूर्वीं राजाबरोबर फिरत असे; पण १३०२ सालीं तें पारीस येथेंच कायमचें भरावें असा फिलिप राजानें कायदा केला. असो, पण अशारीतीनें राजाचा कांहीं कामाचा न्यायदानाधिकार दुसऱ्याच्या हातीं जातो. शिवाय, कामाचा बोजा वाढल्यामुळें, किंवा मेहनतीचा कंटाळा येऊन, राजा न्यायाचीं लहान लहान कामें स्वतः होऊनच दुसऱ्यांच्या हातीं देतो. उदाहरणार्थ, फ्रान्सांत पांचवा चार्लस न्यायदानासाठीं कौन्सिलांत जरी आठवड्यांतून दोनदां आणि सहावा चार्लस एकदां बसे, तरी १३७० सालापासून राजा लहान लहान फिर्यादी स्वतः ऐकेनासा झाला असें आपण वाचितों. शिवाय न्यायाचें काम इ-

तरांनीं करावयाचें असा एकदां प्रघात पडला म्हणजे असें मत उत्पन्न होतें कीं निदान कांहीं प्रकारच्या खटल्यांत राजांनीं स्वतः हात घालूं नये. उदाहरणार्थ १३७८ सालीं ब्रिटनीच्या ड्यूकाची चवकशी चालली असतां, फ्रान्सच्या सरदारानीं राजानें तेथें हजर असणें गैर आहे असें आपलें मत दिलें. तद्वतच इंग्लंदांत पहिल्या जेम्सला न्यायाधिशांनीं असें कळविलें कीं, राजास न्यायाच्या कोर्टांत अध्यक्ष म्हणून बसण्याचा अधिकार आहे, पण मत देण्याचा नाहीं. अशा रीतीनें न्यायदानाशीं असलेला राजाचा संबंध तुटतो. पण राजकीय मुख्याचें न्यायदानाचें काम त्यानें नेमलेल्या इतर संस्थांच्या हातीं जात असतां ह्या संस्थाही आपले कांहीं अधिकार इतरांस देऊन विशिष्टीभवन पावतात. उदाहरणार्थ, इंग्लंदांत वर सांगितलेला राजाच्या फिरत्या कोर्टाचा सामान्य खटल्यांच्या स्थाईक कोर्टापासून विभक्तपणा होण्यापूर्वींच राजाच्याच कोर्टांत एक बीजभूत विभिन्नभाव उत्पन्न झाला होता. तो हा कीं वसुलासंबंधाचे खटले एका निराळ्या खोलींत ऐकूं लागले, आणि ही चाल स्थापन झाल्यामुळें विभाग उत्पन्न झाला; आणि सामान्य खटले ऐकण्याचें कोर्ट आणि वसुलाबद्दलचे खटले ऐकण्याचें कोर्ट अशीं दोन नवीं कोर्टें होऊन राजाचें कोर्ट " किंग्स बेंच " ह्या नांवानें स्वतंत्रच राहिलें. आणि ह्या निरनिराळ्या कोर्टांत फीचे दर निरनिराळे असल्यामुळें जरी कांहीं वेळपावेतों त्यांच्यामध्यें कामासंबंधानें एकप्रकारची चढाओढ व घोंटाळा दृष्टीस पडे, तरी अखेरीस त्यांचीं कामें

कायमचीं ठरून गेलीं. ह्यानंतर अशा प्रकारचें पण निराळें असें एक विभिन्नीकरण उत्पन्न झालें. आपल्या पूर्वी हें नजरेस आलेंच आहे कीं, राजा जेव्हां न्यायाचें काम करण्यासाठीं आपल्याबद्दल आपले प्रतिनिधी नेमितो, तेव्हां ज्या खटल्यांची तरतूद कायद्यानें केलेली नसेल ते ऐकण्याचा आणि प्रतिनिधींचे निकाल फिरविण्याचा अधिकार तो आपल्याकडे ठेवीत असतो. ह्यामुळें सहजच जे निकाल शब्दशःकायद्यास धरून असले तरी तत्त्वतःगैर असतील, ते फिरविण्याच्या कामीं तो हा अधिकार मुख्यत्वेंकरून चालवीत असतो. म्हणजे, ज्यास इंग्रजीत "एक्विटीचा" (समतेचा) अधिकार म्हणतात तो अशा रीतीनें उत्पन्न होतो. हाही अधिकार कालेंकरून राजा दुसऱ्याच्या हातीं देत असतो, आणि इंग्लंदांत अशीच गोष्ट झालेली आहे. तेथें चान्सेलर नांवाचा एक प्रधान असून त्याचें काम असलीं प्रकरणें राजापुढें मांडण्याचें असे. पुढें कालेंकरून त्यास त्या प्रकरणांचा निकाल करण्याचा अधिकार प्राप्त झाला, आणि अशा रीतीनें चान्सरी नामक कोर्टाची स्थापना झाली. शिवाय, राजाच्या मूळ कोर्टास आणखीही फांटे फुटत गेले. कारण त्या कोर्टांत राजाचे खासगीकडील मुख्य हपीसर असून त्यांस आपापल्या कामांसंबंधानें खटले ऐकण्याचा अधिकार असे. म्हणून कालेंकरून चेंबर्लेनचें कोर्ट, कोठावळ्याचें कोर्ट, अर्लमार्शलचें कोर्ट, आडमिरलचें कोर्ट, अशी निरनिराळ्या कोर्टांची स्थापना झाली.

एवंच असें दिसतें कीं इंग्लंदांत हल्लीं जी न्यायविषयक फार संकीर्ण सरणी दृष्टीस पडते, तिच्या सर्व जा-

लाची उत्पत्ति, हल्लींच्या तिच्या रचनेवरून जरी फार-शी लक्षांत येत नाहीं तरी, लोक, नाईक, आणि मुख्य ह्यांचें जें मूळचें संमेलन त्यापासूनच क्रमाक्रमानें फेरबद-ल होऊन, सर्वांशीं झालेली आहे.

९५. ह्या विषयाचा आणखी विस्तृत विचार करणें इष्ट असतें तर निरानिराळ्या पोलीस पद्धतींच्या उत्पत्ती-चाही अशाच रीतीनें विचार करतां आला असता; आणि ह्या व गत प्रकरणांतून वर्णिलेल्या संघटनांचा ज्या 'एकांत तीन' अशा मूळच्या मंडळापासून उत्पत्ति झाली त्या-पासून ह्यांचीही झाली असें दाखवितां आलें असतें. बा-हेरून अतिक्रमण करणारांची खोडकी मोडण्यासाठीं ज्या-प्रमाणें सैन्य आपल्या शक्तीचा उपयोग करीत असतें, त्याप्रमाणें पोलीस आंतून अतिक्रमण करणारांची खोड-की मोडण्यासाठीं स्वशक्तीचा उपयोग करीत असतें. ह्या-मुळें ह्या दोहोंमध्यें साम्य असून हीं दोन कर्तव्यें पूर्वीं एकच असत; आणि अद्यापिही त्यांची पूर्णपणें फाळणी झालेली नाहीं. कारण कांहीं देशांत त्यांचीं शस्त्रास्त्रें सा-रखीं असून कधीं कधीं सैन्य पोलीसास त्याचें कर्तव्य करण्याच्या कामीं मदतनीसही होत असतें. ह्याबद्दल पु-रावा देण्याचें कांहीं एक कारण नाहीं; कारण ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. म्हणून ह्या प्रकरणांत एथवर जे सि-द्धांत स्थापन केले त्यांची आतां गोळाबेरीज सांगूं.

निरनिराळ्या प्रकारच्या पुराव्यावरून असें दिसतें कीं न्यायसंबंधी कृति आणि लष्करी कृति ह्यांचा सामान्य हेतु खऱ्या किंवा अंगीं लावलेल्या चुकांची दुरुस्ती क-रावयास लावण्याचा असल्यामुळें, त्या प्रारंभीं फारच प-

रस्परसदृश असतात. ह्या दोन्ही कृतींत तरवार हें शेवट-चें साधन असतें, फरक इतकाच कीं तिचा उपयोग करण्याच्या पूर्वीं ह्यांपैकीं एका प्रकारच्या कृतींत तोंडाची लढाई चालते.

अशा रीतीनें हीं दोन्ही कृत्यें प्रथम परस्परसदृश असल्यामुळें प्रथम तीं सहजच एकच मंडळ करीत असतें; तें मंडळ मुख्य, पुढारी लोक, आणि सामान्य जनसमूह ह्या तिघांचें बनलेलें होय. हें मंडळ ज्याप्रमाणें लढाईच्या व सार्वजनिक नीतीच्या प्रश्नांचा निकाल लावीत असतें, तसेंच व्यक्तींनीं केलेल्या अपराधांची चवकशी करून त्यांचाही लावीत असतें.

समाजांतील चळवळींवरून ह्या त्रयघटित मंडळांपैकीं जशी ह्या किंवा त्या घटकाची विशेष वाढ होईल, तसें कायद्याचा कारभार करण्यासाठीं ह्या किंवा त्याप्रकारचें मंडळ उत्पन्न होतें. सारखी लढाई चालल्यामुळें शास्ता माणूस सर्वशक्तिमान् बनल्यास तो इतर बाबतींप्रमाणें न्यायाच्या बाबतींतही पूर्ण स्वेच्छाचारी बनतो; म्हणजे, न्याय देण्याच्या कामांतील लोकांचें अंग अगदीं नष्ट होतें, आणि पुढारी लोकांनीं केलेले निकाल तो धाब्यावर बसवूं लागतो. बरें, पुढाऱ्यांची मिळून सरदारी सत्ता बनण्यास अनुकूल अशी परिस्थिति असल्यास, तीच मंडळी इतर कारभाराप्रमाणें न्यायविषयक कारभारही करूं लागते; आणि तिच्या कृतीवर जनसमूहाचें वजन बहुतेक मुळींच पडत नाहींसें होतें. आतां एकाच माणसाचें किंवा कित्येक पुढाऱ्यांचें श्रेष्ठत्व स्थापन होण्यास परिस्थिति व जीवितसरणी हीं प्रति-

कूल असल्यास नागरिकांची जी मूळची न्यायविषयक सत्ता ती कायम राहते, किंवा गेलेली असल्यास ते पुनः प्रबल होतील तेव्हां ती पुनः त्यांस प्राप्त होते. आणि जेथें राजकीय घटनेंत ह्या तीन घटकांच्या सत्ता मिसळलेल्या असतील, तेथें न्यायविषयकघटनेंतही असतात.

पण पुष्कळ ठिकाणीं नेहमीं लढाई करावी लागून लोक कांहीं अंशीं किंवा सर्वांशीं परतंत्र होत असतात. अशा ठिकाणीं राजकीय व न्यायविषयक सत्ता निरनिराळ्या दर्जांचे जे मुख्य लोक तेच चालवीत असतात; आणि त्यामुळें न्यायविषयक संघटना जी उत्पन्न होते तिचे अंमलदार समाज जसा मोठा व संकीर्ण होत जाईल तसे धर्मोपाध्यायवर्गांतील किंवा लष्करी वर्गांतील, किंवा ह्यांतील कांहीं व त्यांतील कांहीं, असे बनतात; आणि हे त्यांचे वांटे, लोक समजून उमजून मानवी शास्त्याला किंवा दैविक शास्त्याला (ज्याचे हुकूम धर्मोपाध्याय आपणास सांगतात अशी समजूत असते) ज्या मानानें नमून असतील, त्या मानानें कमजास्त असतात. पण उद्यमशीलता वाढत जाईल, आणि ज्ञान व संपत्ति हीं मिळवून आपलें वजन चालविणारा एक नवा वर्ग उत्पन्न होत जाईल, तसे न्यायाधीश प्रथम बरेच, व मागाहून बहुतेक सर्वच, ह्या वर्गांतील येऊं लागतात; आणि हे लोक एका निराळ्या वर्गांतील म्हणूनच पूर्वींच्या न्यायाधीशांपासून भिन्न म्हणून ओळखले जातात असें नाहीं, तर केवळ न्यायाच्याच कामाला वाहिलेले म्हणूनही भिन्न म्हणून ओळखले जाऊं लागतात.

ह्या प्रकारचे फेरबदल एकीकडे होत असतां, दुसरी-

कडे दुसऱ्या एका प्रकारचे फेरबदल होऊन, प्रारंभींची सरल आणि नंतरच्या मानानें एकसारखी अशी जी न्यायदानसरणी ती हळूहळू संमिश्र होत जाते. जेथें सामान्यतः राजा श्रेष्ठत्व संपादन करील तशी न्यायदानसत्ताही आपल्या हातीं बळकावितो, तेथें पुढें लवकरच त्याच्यावर कामाचा फार बोजा पडावयास लागून तो खटल्यांची चवकशी करून निकाल लावण्याचा अधिकार दुसऱ्यांस देतो, व ते निकाल पसंत किंवा नापसंत करण्याचा अधिकार तेवढा आपल्याकडे ठेवितो. स्वतः तो, त्याचें प्रमुख माणूस, आणि त्याच्या सभोंवतालचे सामान्यजन ह्यांचे बनलेलें जें कोर्ट तें अशाच पद्धतीवर बनलेल्या स्थानिक पुढाऱ्यांच्या व लोकांच्या मिळून बनलेल्या कोर्टांच्या वरचें म्हणून अगोदरच ठरलेलें असतें; आणि अशा रीतीनें विभिन्नीकरणास सुरवात झालेली असते. आतां आपल्या कांहीं अंमलदारास किंवा न्यायाधीशांस ठिकठिकाणीं जाऊन अपिलें ऐकण्याचा अधिकार तो देतो ह्यामुळें, आणि पुढें लवकरच त्यांस कायमचे फिरते न्यायाधीश बनवितो ह्यामुळें, आणखी एक विभिन्नीकरण उत्पन्न होतें. पुढें विशिष्ट कोर्टांचे विशिष्ट न्यायाधीश नेमिले जाऊन त्यांनीं न्यायाचीं निरनिराळीं कामें वांटून घेतल्यामुळें आणखी विभिन्नीकरणें उत्पन्न होतात. आणि ही एकंदर गोष्ट जरी एकाच देशास लागू असली, तरी मूळच्या सरल न्यायदान करणाऱ्या मंडळापासून कोणत्या तरी रीतीनें संकलित आणि विविधस्वरूप अशी न्यायविषयक घटना कोणत्या सामान्य तत्त्वावर उत्पन्न होते हें त्यावरून चांगलें उदाहृत होतें.

प्रकरण चवदावें

कायदे

९६. पुनः एकदां मूळच्या जमावावर दृष्टि फेंकून, त्यांतील माणसांची संख्या वाढून त्यांच्यापैकीं कांहींना दुसरीकडे निघून जाण्याचा प्रसंग आला म्हणजे काय होतें असा प्रश्न केला, आणि हे दुसरीकडे रहावयास गेलेले लोक मूळच्या लोकांच्याच ज्या सामाजिक व्यवस्था तसल्याच नव्या ठिकाणीं कां उत्पन्न करितात म्हणून विचारिलें, तर त्यास उघडच असें उत्तर द्यावें लागतें कीं, त्यांनीं तेथें आपले पूर्वजांकडून आलेलेच स्वभावविशेष व कल्पनाविशेष आणिलेले असतात, आणि म्हणून तसें होतें. रूढीप्रमाणें चालावयाचें हा जो मार्ग रानटी लोकांत आपणांस सर्वत्र दृष्टीस पडतो तोच मार्ग प्रारंभीं अनुसरणें शक्य असतें.

अगदीं रानटी लोक आपल्या पूर्वजांच्या रूढींप्रमाणें चालतात ह्याबद्दल ३४ व्या कलमांत जें निरूपण केलेलें आहे त्याची वाचकांस चांगली आठवण व्हावी एतदर्थ एथें तद्विषयक आणखी कांहीं उदाहरणें सांगतों. उदाहरणार्थ, सांडविच बेटवाले व बेचुआना लोक आपलें वर्तन पूर्वीपासून चालत आलेल्या वहिवाटीस अनुसरून ठेवीत असत. क्यारेन्स लोकांबद्दल मेसन असें सांगतो कीं, त्यांचे नैतिक व राजकीय, दिवाणी आणि फौजदारी, सर्व कायदे त्यांच्यांतील वडीलधाऱ्यांना ठाऊक असतात, आणि ते त्यांना पूर्वजांकडू-

न आले असतील तसे सांगतात. पण ह्या ठिकाणीं आपण विशेषतः लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, हें रूढीप्रमाणें चालणें प्रगतीच्या पुष्कळ पायऱ्यांवर सुरू राहतें, आणि न्यायविषयक कारभारांत त्याचा अजूनही बराच पगडा दिसून येतो. दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ही कीं, परवां चवदाव्या शतकांत फ्रान्सांत एका कायद्याच्या द्वारानें असें जाहीर करण्यांत आलें कीं "ह्या सगळ्या राज्याचा कारभार रूढीस अनुसरून चाललेला आहे, आणि आमची कांहीं प्रजा लेखी कायद्याचा जो उपयोग करिते तो रूढी म्हणून करिते". तद्वतच इंग्लंदचा जो "कॉमन लॉ" किंवा सामान्य कायदा म्हणून आहे, तो मुख्यत्वेंकरून राज्यांतील रूढींचा बनलेला आहे, व त्या रूढी हळूहळू स्थापन झालेल्या आहेत. त्याचा जो जुना भाग आहे तो मुद्दाम बनवलेल्या कायद्याच्या रूपानें कोठेंच दिसत नाहीं, तर केवळ कायद्याच्या पुस्तकांतून आढळतो; आणि व्यापारविषयक कायद्यासारखे जे त्याचे अर्वाचीन भाग आहेत, ते देखील पूर्वींच्या रूढीस अनुसरून न्यायाधीशांनीं केलेले जे ठराव त्यांच्यांतच सांपडतात. अजून कोर्टांतून रूढीस मान देतात हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे; कारण न्यायाधीश व वकील लोक पूर्वींच्या न्यायाधीशांनीं केलेल्या ठरावांचा आधार नेहमीं दाखवीत असतात, आणि अशाच रीतीनें नव्या कायद्यांचा अर्थ कायम होतो. एवंच सुधारणेच्या प्रगतीबरोबर लेखी कायदा जरी पूर्वापार रूढीस सारखा मागें सारीत जातो, तरी त्या रूढीचा पगडा अजीबाद कमी असा कधींच होत नाहीं.

आणि ह्या ठिकाणीं पुनः आपल्यास ह्या गोष्टीचें स्मरण होतें कीं, कायदा लेखी असो वा तोंडी असो, त्यामध्यें मृताचा जिवंतावरचा अंमल उदाहृत होतो. गतपिढ्या प्रस्तुत पिढ्यांच्या ठिकाणीं आपले शारीरिक व मानासिक स्वभाव आणि खाजगी संवयी व जीवितसरण्या संक्रान्त करून त्यांजवर जो अधिकार चालवीत असतात, त्याखेरीज, त्या पिढ्या सार्वजानिक व्यवहारनियामक असे लेखी व तोंडी कायदे नव्या पिढ्यांस लावून देऊन आणखी अधिकार चालवीत असतात. रानटी लोकांत व समाजांत अशा कायद्यांचा अंमल अगदीं पूर्ण असतो; आणि सुधारणेच्या अगदीं पुढच्या पुढच्या पायऱ्यांवर जुन्या कायद्यांतून जरी बराच फेरबदल झालेला असतो, आणि नवे कायदे जरी बरेच झालेले असतात, तरी जिवंतांनीं केलेल्या कायद्यांपेक्षां पूर्वजांकडून आलेल्या कायद्यांचाच माणसाच्या वर्तनावर ज्यास्त पगडा बसत असतो.

हीं उघड सत्यें एथें जोरानें सांगण्यांत, **स्पेन्सर** साहेब म्हणतात, माझा उद्देश हें दाखविण्याचा आहे कीं, त्यांवरून पूर्वजपूजा गर्भित होते. कोणत्याही गोष्टीच्या संबंधानें कायदा काय आहे असा जेव्हां आपण प्रश्न करितों तेव्हां, आमच्या पूर्वजांचा त्या बाबतींत काय हुकूम होता असाच आपण प्रश्न करीत असतों, हें वाचकांच्या स्पष्टपणें लक्षांत आलें पाहिजे. आणि ह्यावरून आणखी असें दाखविण्याचा आमचा उद्देश आहे कीं, प्रारंभीं प्रारंभीं लोक जसे हे हुकूम न जाणतां मानीत असतात, तसेच जाणून बुजूनही मानीत असतात.

९७. कारण पिशाचक्लृप्तीच्या वाढीबरोबर रूढींत समाविष्ट झालेल्या सामान्य हुकुमांव्यतिरिक्त, विशेष प्रसंगीं विशेष हुकूम मागण्यासाठीं, पिशाचांकडे आणि त्यांपासून उत्क्रान्त केलेल्या देवांकडे, जाण्याचा प्रघात रानटी लोकांत उत्पन्न होतो. आपला पूर्वज, किंवा मृत नाईक, किंवा तदुद्भूत देवता, ह्यांची इच्छा काय आहे ती ताडण्याच्या पद्धती त्या लोकांत उत्पन्न होतात; आणि त्या देवतेपासून जें उत्तर मिळेल तें जरी सामान्यतः त्या विशेष प्रसंगास लागू असेंच असतें, तरी त्यावरून कधीं कधीं एक नवा कायदाच उत्पन्न होतो, आणि त्याची तत्पूर्वीं मृतांपासून प्राप्त झालेल्या कायद्यांत भर पडते.

पिशाचांपासून माहिती आणि सल्ला मिळविण्याचा जो हा उद्योग त्यास कोठें मनधरणीचें आणि कोठें जबरीचें स्वरूप येतें. उदाहरणार्थ, वेड्डालोक आपल्या पूर्वजांच्या भुतांपाशीं मदत मागत असून त्यांची अशी समजूत आहे कीं, आपण पारधीस कोठें जावें हें तीं भुतें आपल्यास स्वप्नांत येऊन सांगतात. उलटपक्षीं, स्कांडिनेव्हियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, ते " मृतांचीं भुतें थडग्यांतून ओढून काढीत, आणि पुढें काय होईल तें त्यांजकडून जबरीनें वदवीत ". हीब्रू लोकांत देखील स्वप्नांत येऊन देव सांगतात असें समजत, आणि भुतें उभारून त्यापासून माहिती काढीत. इंग्रजांत देखील मुलें आपला मृत बाप काय म्हणाला असता ह्याचा विचार करून त्याप्रमाणें वागतात; म्हणजे, त्याची काल्पनिक जी इच्छा किंवा आज्ञा ती

एकप्रकारचा मुलांनीं वागण्याचा जादा कायदाच होऊन बसते.

पण एथें जो आपणास मुख्यत्वेंकरून विचार करावयाचा आहे तो जेथें नामांकित लोकांचीं भुतें देवता बनलीं असतील, आणि त्यांजबद्दल लोकांस भीति व भरंवसा दोन्ही वाटत असतील, तेथें जे विशिष्ट वर्तननियम तीं घालून देतात त्यांबद्दल होय. ईजिप्शन व पेरूव्हियन लोकांत ह्याबद्दल पुरावा सांपडतो. ताहितियन लोकांत देव उपाध्याच्या अंगांत शिरत असे आणि नंतर उपाध्या देवाची इच्छा काय आहे तें सांगत असे. टोंगा व सामोआ एथें असेंच असे. टोडा लोकांत त्यांच्या बायकांबद्दल किंवा म्हशींबद्दल जेव्हां तंटा उत्पन्न होतो, तेव्हां उपाध्या आपल्या अंगांत देव आणितो आणि त्याचा हुकूम काय आहे तें सांगतो.

ह्यावरून ऐतिहासिक लोकांत जो पुरावा आपणास सांपडतो त्याचा अर्थ आपल्या ध्यानांत नीट रीतीनें येणार आहे. उदाहरणार्थ, हीब्र्यू लोक असें समजत कीं, सामान्यवर्तनाचे जे नियम आहेत ते देवानें आपणांस घालून दिलेले आहेत; आणि शिवाय ते देवास विशिष्टप्रसंगीं काय करावयाचें म्हणून विचारीतही असत. लढाईच्यावेळीं उपाध्या फौजेबरोबर नेहमीं रहात असून कांहीं महत्त्वाची गोष्ट करावयाची झाली म्हणजे सेनापति त्यास विचारीत असे. ग्रीक लोक सर्व कायदे आपणांस देवापासून प्राप्त झाले आहेत असें समजत. त्यांच्यांतील प्रसिद्ध कायदे करणारा जो लैकर्गस त्यास डेल्फिक देवानेंच तो अधिकार दिला, व त्याच्याक-

ऊन कायदे वदविले असें ते समजत. शिवाय, तदनंतर प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगीं ते त्या देवाला कौल लावून पहात हेंही प्रसिद्धच आहे. रोमन लोकांत इगेरिया नामक देवतेपासून न्यूमा यास कायदे प्राप्त झाले, आणि देवांच्या आज्ञा ताडण्यासाठीं तो भविष्यवादी नेमीत असे अशा समजुतीबद्दल पुरावा सांपडतो.

यानंतरच्या काळीं दिव्य करून किंवा द्वंद्युद्ध खेळून जे न्याय तोडीत त्यांचाही अर्थ असाच असे कीं, अशा ठिकाणीं देव अप्रत्यक्ष रीत्या हजर राहून त्या कामीं तो प्रेरणा करितो. ह्या सर्व पुराव्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, प्रारंभीं कायदा म्हणजे मृतांनीं जिवंतास दिलेले हुकूम असतात; मग ते रूढीच्या रूपानें प्राचीन पूर्वजांपासून प्राप्त झालेले असोत, किंवा देव या पदवीस चढलेल्या प्राचीन पूर्वजांचे किंवा त्याच्या अलीकडील नायकांचे वगैरे असोत.

९८. सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्या पायऱ्यांवर धार्मिक कायदा आणि लौकिक कायदा यांमध्यें भेद कसा मुळींच समजत नाहीं, हें या ठिकाणीं आपल्या लक्षांत येतें. कोणत्याही प्रकारचे ठरीव हुकूम जे पाळतात ते कोणत्या तरी प्रकारच्या दैविक सत्त्वांबद्दल जी पूज्यबुद्धि तिनें प्रेरित होऊन पाळितात; म्हणून प्रारंभीं ह्या सर्व हुकुमांचा अधिकार सारखाच चालतो.

इजिप्शन लोकांतील भिंतीवरील कोरींव लेख व चित्रें आणि ताडपत्रावरील लेख ह्या सर्वांवरून प्रस्तुतचे लोक गतलोकांना नमून असल्याचें दिसत असल्यावरून, वर्तननियमांना सर्वत्र धर्माचा आधार असतो हें स्पष्ट

दिसतें. आसिरियन लोकांबद्दल लायार्ड असें म्हणतो कीं, " त्यांच्यांत सार्वजनिक व खासगी जीवित आणि धर्म यांमध्यें निकट संबंध असे. ही गोष्ट त्यांच्या कोरींव कामावरून चांगली व्यक्त होते. सर्व प्राच्य देशांप्रमाणें एकंदर सार्वजनिक व सामाजिक कर्तव्येंच केवळ नव्हत, तर व्यवहारांतील अगदीं किरकोळ गोष्टी व च चाली देखील, त्या लोकांत धर्मानें बद्ध असत. लढाई व तह यासंबंधाच्या राजाच्या सर्व कृती त्यांच्यांत धर्माच्या अनुरोधनानें चालत, आणि देवांची त्यांजवर विशेष देखरेख व नजर आहे असें तें समजत." हीब्रचू लोकांत विशिष्ट आज्ञांखेरीज, आणि भोजनें व बळी उपाध्याचीं कर्तव्यें, बळी द्यावयाचा बकरा शुद्ध करून घेण्याचा विधि, इत्यादिकांबद्दल विशिष्ट नियम असून, रोज कसें वागावें, कोणते पदार्थ खावे व ते कसे तयार करावे, कोणतीं धान्यें पेरावीं, व तीं केव्हां आणि कशीं पेरावीं, स्त्री व पुरुष-गुलाम आणि मजूर यांस कसकसें वागवावें, व्यापार कसा करावा, घरें आणि शेतें कशीं विकावीं, आणि वस्त्रांचे घेर व हनवटीवरील दाढचा कशा राखाव्या, एथपर्यंत नियम घालून दिलेले आहेत. आर्य लोकांमध्येंही असेंच असे, उदाहरणार्थ, मनुस्मृतींतील आज्ञा. ग्रीक लोकांत पिथियन देवाच्या कौलाशिवाय नव्या राजकीय संस्था, किंवा नवी शेती, किंवा नवा खेळ प्रचारांत, आणतां येत नसे.

कायद्याची उत्पत्ति अशा रीतीनें झाल्यानें त्यास स्थिरता प्राप्त होते. कारण त्याचे नियम अशा रीतीनें देवानें घालून दिलेले समजल्यामुळें माणासानें घालून दि-

लेल्या नियमांपेक्षां माणसाच्या वर्तनावर त्यांचा ज्यास्त पगडा बसून त्यांस जोर येतो. म्हणून त्यांपासून सामाजिक व्यवस्थांस कायमपणा येतो; कारण राजाचाही अधिकार तेणेंकरून मर्यादित होतो. राजास धर्मांत सांगितलेल्या गोष्टी धर्माप्रमाणेंच कराव्या लागतात; मग त्याचा स्वेच्छाचारी अधिकार त्यांत न सांगितलेल्या गोष्टींच्या संबंधानें तेवढा चालतो. अजून इंग्रजांत देखील पार्लमेंताचे वगैरे सभासद कांहीं राजकीय रचना आहेत तशा ठेवूं म्हणून शपथा घेत असतात.

समाजोत्क्रमणाच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर जोराचीं नियंत्रणें फार आवश्यक असल्यामुळें, दैविक म्हणून समजलेल्या कायद्याचा ताठरपणा जरी समाजांत व्यवस्था राहण्यास फार कारणीभूत होतो. तरी नवी परिस्थिति जेव्हां उत्पन्न होईल तेव्हां तीस तो योग्य नसल्यामुळें तेणेंकरून प्रगतीस अडथळा होतो, म्हणून मग कायदा वस्तुतः मोडण्यास आणि नांवाचा मानण्यास समर्थ करणाऱ्या अशा कायद्याच्या क्लृप्त्या Leagal fictions म्हणून ज्यांस म्हणतात, त्या उत्पन्न होऊं लागतात. सर हेन्री मेन यानें दाखविल्याप्रमाणें ह्या क्लृप्त्याच एरवीं कधींही न बदलणारा इंग्लिश व रोमन कायदा बदलण्यास कारणीभूत झालेल्या आहेत.

९९. कायद्याची उत्पत्ति व घटना अशा प्रकारची असल्यामुळें अज्ञाधारकत्व ही त्याच्या संबंधाची मुख्य गोष्ट असली पाहिजे. कोणत्याही घालून दिलेल्या नियमाप्रमाणें वागणें म्हटलें म्हणजे तो घालून देणाऱ्याबद्दल मनांत निष्ठा असलीच पाहिजे; आणि म्हणून त्यास न-

मून वागणें ही गोष्ट अत्यन्त आवश्यक असून मुख्य आहे.

तेव्हां राजाविरुद्ध बंड करणें व त्याचा द्रोह करणें हीं जीं अनाज्ञाधारकपणाचीं स्पष्ट कृत्यें, तीं अपराधांच्या मालिकेंत अग्रस्थानीं येतात हें उघड आहे. हें सत्य हल्लीं दक्षिण आफ्रिकेंत दिसून येतें. झुलू लोकांच्या स्वेच्छाचारी राजांचा असा क्रूर कायदा आहे कीं, एकाद्या नायकास त्याच्या बंडाळीबद्दल ठार केला म्हणजे त्याच्या प्रजेचाही संहार करून टाकावयाचा. प्राचीन पेरूव्हियन लोकांमध्येंही एकाद्या शहरानें किंवा प्रांतानें बंड केल्यास तो उध्वस्त करून टाकीत असत, आणि तेथील लोकांचीं पाळेंमुळें खणून काढीत. तद्वतच प्राचीन मेक्सिकन लोकांत जो कोणी राजद्रोह करील त्यास व त्याच्या चार पिढ्यांच्या वंशजांस ठार करीत. प्राचीन जपानांत राजाचा अपराध करणाराच्या सर्व जातीस शिक्षा करीत. मेरोव्हिन्जियन राजा गुन्थ्राम यानें एका बंडवाल्याचे नऊ पिढ्यांचे वंशज ठार करावे म्हणून हुकूम केलेला होता. सारांश, समाजोत्क्रमणाच्या ज्या पायऱ्यांवर शास्त्याचा अधिकार कायम राखणें अत्यन्त आवश्यक असतें त्या पायऱ्यांवर प्रत्यक्ष राजद्रोह हा अत्यन्त मोठा गुन्हा समजला जातो, हें जें सत्य तें नंतरच्या कालींही उदाहृत होत असतें; उदाहरणार्थ, फ्यूडल पद्धतीच्या अमदानींत लहान जमीनदार मोठ्या जमिनदाराशीं निष्ठावंतरीतीनें राहिल्यास त्याच्या इतर गुन्ह्यांकडे बहुधा दुर्लक्ष केलें जात असे.

बंड आणि राजद्रोह ह्यांच्या खालोखालचा गुन्हा म्हटला म्हणजे राजाच्या आज्ञा न पाळणें हा जो अप्रत्यक्ष

अनाज्ञाधारकपणा तो होय. हा गुन्हाही राजाची आज्ञा मोडण्यानें त्याचा अवमान केला जातो ह्या दृष्टीनें विशेष अक्षम्य समजला जातो. म्हणून पेरुव्हियन लोकांत त्याच्याबद्दल देहान्तशिक्षा असे. गुन्हे केल्यानें राष्ट्राच्या पवित्र कायद्यांचें उल्लंघन होतें ह्या दृष्टीनें जपानांतही पुष्कळ गुन्ह्यांना मरणाची शिक्षा सांगितलेली असे. शिवाय, जेथें राजाची प्रजा व त्यांची कार्यशक्ति हीं सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं राजाचींच समजलीं जातात, तेथें प्रजेस इजा करणें म्हणजे राजाच्या मालमत्तेसच इजा करणें म्हणून समजतात. उदाहरणार्थ, जपानांत राजाच्या नोकराच्या शरीरास कोणीं इजा केल्यास राजासच इजा केल्याप्रमाणें मानीत. म्हणूनच एका माणसानें दुसऱ्याचा गुन्हा करणें म्हणजे मुख्यत्वेंकरून किंवा बऱ्याच अंशीं राष्ट्राचा गुन्हा करणें हें सामान्य तत्त्व यूरोपच्याही कायदेकानूंत पहिल्यापासून आढळून येतें. प्राचीन रोममध्येंही असेंच असे, आणि म्हणून जो सार्वजनिक शांततेचा भंग करील त्यास देहान्तशिक्षा देत. इंग्लंदांतही राजाची (सार्वजनिक) शांतता मोडण्याबद्दल विशेष शिक्षा असे. सारांश, गुन्ह्याबद्दल खासगी रीतीनें सूड उडविण्याची चाल जशी बंद होत जाईल, स्थानिक अधिकाऱ्यांचे अधिकार जसे दुय्यम प्रतीचे समजले जाऊं लागतील, आणि अशा रीतीनें मुख्य सरकाराचा अधिकार जसा बळावत जाईल, तसे कायद्याविरुद्ध केलेले गुन्हे राजाविरुद्ध गुन्हे म्हणून समजले जातात; आणि कायद्याची आज्ञा उल्लंघिणें म्हणजे राजाचा अपमान म्हणून समजला जाऊन त्याबद्दल विशेष शिक्षा होऊं ला-

गते. ह्यावरून जेथें राजाची सत्ता अगदीं अनियंत्रित बनलेली असेल, आणि विशेषतः जेथें तो देवकुलांतील म्हणून समजला जात असेल, तेथें ह्या गुन्ह्यास त्याच्या अंतःस्वरूपाहून ज्यास्तच शिक्षार्ह असें स्वरूप येतें.

एथें दुसरें एक सत्य सांगण्यासारखें आहे. पेरू व जपान या देशांमध्यें राजाचा आज्ञाभंग म्हणजे अत्यंत मोठा गुन्हा समजत असून तेथें समाजव्यवस्था अगदीं लष्करी व्यवस्थेच्या नमुन्यावर असते ही गोष्ट ध्यानांत आणतां, इंग्लिश लोकांमध्येंही फौजेमध्यें शिरजोरपणा हा मुख्य गुन्हा कसा समजतात हें लक्षांत येतें. म्हणून हुकूम कसलाही असो, किंवा तो मोडणाराचा उद्देश कांहींही असो, हुकूम मोडणें हें लष्करांत शिक्षार्ह समजतात. ह्याकरितां जी कृति वस्तुतः निरुपद्रवी असेल ती जर हुकुमाविरुद्ध कोणी शिपाई करील तर त्यास देहान्त शिक्षा देखील होते.

एवंच असें दिसून येतें कीं, राजाची सत्ता जशी वाढत जाईल तसे त्यानें केलेले कायदे किंवा दिलेले हुकूम मानणें—मग ते महत्त्वाचे असोत किंवा हलके सलके असोत—हें लोकांचें मुख्य कर्तव्य होऊन बसतें.

१००. वरच्या कलमांतून जें सांगितलें आहे त्यावरून असें स्पष्ट होतें कीं, वर्तनाचें नियमन करणारे जे नियम त्यांचे चार उगम आहेत. अगदीं प्रारंभींच्या पायऱ्यांवर देखील असें दिसतें कीं, ज्या पिढ्यानुपिढ्या आलेल्या रूढींस अर्धवट धार्मिक आधार असतो, आणि मृत पुढाऱ्यांच्या ज्या विशेष हुकुमांस ज्यास्त स्पष्ट असा धार्मिक आधार असतो, त्यांखेरीज प्रबल माणसाच्या इच्छे-

वरून उत्पन्न झालेले असे थोडेसे वर्तननियम असतातच; आणि शिवाय, सार्वजनिकमताचा अस्पष्ट पण जोराचा असा प्रभाव लोकांच्या वर्तनावर पडतच असतो. ह्यांपैकीं पहिल्याप्रकारचें नियमन बाकीच्या नियमनांतून हळू हळू भर पडून वाढत असतें; दुसऱ्यामध्यें ज्यास मागून दैविक कायदा म्हणून नांव मिळतें त्याचें बीज दृष्टीस पडतें; तिसऱ्यामध्यें जिवंत राजावर निष्ठा ठेविल्यापासून ज्यास आधार प्राप्त होतो त्या कायद्याचें बीज दृष्टीस पडतें; आणि चवथ्यांत जो शेवटीं सार्वजानिक इच्छेचें प्रतिबिंब म्हणून समजला जातो त्या कायद्याचें बीज दृग्गोचर होतें.

जे कायदे एकाद्या माणसापासून, म्हणजे ज्याच्याबद्दल लोकांस भीति वाटते अशा दृश्य किंवा अदृश्य शास्त्याच्या आज्ञा म्हणून, उत्पन्न होतात, त्यांचीं उदाहरणें आधींच पुष्कळ दिलेलीं आहेत. पण पुढें जाण्यापूर्वीं, जे कायदे माणसापासून नव्हत तर लोकांत प्रबल असलेल्या मनोभावांपासून व कल्पनांपासून उत्पन्न होतात, आणि जे वर सांगितलेले दोन प्रकारचे कायदे प्रबल होण्यापूर्वीं रानटी स्थितींत स्पष्टपणें दृष्टीस पडतात, त्यांजबद्दल आणखी उदाहरणें देणें इष्ट दिसतें. म्हणून त्यासंबंधानें थोडेसे उतारे देतों. चिपिवायन लोकांबद्दल स्कूलक्रॅफ्ट म्हणतोः—"त्या लोकांत नियमित सरकार म्हणून जरी मुळींच नाहीं, आणि प्रत्येक माणूस जरी आपल्या कुटुंबाचा राजा असतो, तरी त्यांचा सामान्यतः फायदा होईल अशा कांहीं सामान्य तत्त्वांस अनुसरून ते वागत असतात". ज्यांच्यांत राजव्यवस्था उत्पन्न झालेली

नाहीं अशा शोशोनलोकांबद्दल बँक्राफ्ट म्हणतो:—" त्यांच्यांत प्रत्येकजण वाटेल तसा वागतो. खून करणाराचा अर्थात् कधीं कधीं खाजगी रीतीनें सूड उगविला जातो, किंवा खून पडलेला माणूस टोळीचा आवडता असेल तर खुन्यास प्रसिद्धपणें फांशींही देतात; परंतु असल्या अपराधांबद्दल ठरीव कायदे म्हणून मुळींच नाहींत". हाच लेखक हैदालोकांबद्दल असें म्हणतो:—"त्यांच्यांत अपराधांबद्दल कायद्यांत सांगितलेल्या शिक्षा नाहींत. खून करणारापासून खून पडलेल्याचें कुटुंब पुष्कळ पैका घेतें, किंवा त्याचा जीवही घेतें; आणि कधीं कधीं सामान्य व प्रसिद्ध अशा गुन्हेगारांस, आणि विशेषत: वैदूस पुढारी लोक आपसांत एकमत करून ठार करितात".

ज्या ठिकाणीं सरकार बरेंच प्रौढदशेस असेल, त्या ठिकाणीं देखील सार्वजनिक मत हा एक कायद्याचा स्वतंत्र उद्गम असतोच. एलिस म्हणतो कीं, " सांडविच बेटांत कोणीं चोरी केल्यास, ज्यांची चोरी झाली असेल ते चोराचा सांपडेल तो माल घेऊन जात; आणि ह्या पद्धतीस लोकमताचा इतका दुजोरा असे कीं चोर जरी बलिष्ठ असला तरी तो त्यांस विरोध करण्यास धजावत नसे". ह्या उदाहरणांवरून असें दिसतें कीं, जेथें मुख्य शास्ता आणि राज्यकारभाराची व्यवस्था हीं दुर्बल असतील तेथें सर्वांच्या मनोवृत्तींस अनुसरून सहजगत्या ठरलेले जे हे कायदे ते अपराधाबद्दल सूड उगविणें ह्यास सामाजिक कर्तव्याचें रूप देऊन, अमलांत आणिले जातात, आणि सूड घ्यावयास चुकणें हें मोठें लज्जास्पद आणि भीतिकारक समजलें जाऊं लागतें.

प्राचीन स्कांडिनेव्हियामध्यें "एकटच्या माणसाच्या नातेवाईकांनीं आणि मित्रांनीं त्याच्या मरणाबद्दल सूड न घेतल्यास अन्न हें जें मुख्य संरक्षणसाधन तें लागलेंच नष्ट होत असे ". एवंच त्रयघटित राजकीय रचनेचें लोकाविषयक अंग अगदीं गौण झालें म्हणजे कायद्याचा हा उगम जरी लक्षांत येईनासा होतो, तरी प्रारंभीं तो फार ठळक असतो, आणि अगदीं बंद असा तो कधींच होत नाहीं. असो. आतां हे जे कायद्याचे निरनिराळे उद्गम, आणि त्यांपासून उत्पन्न झालेले जे निरनिराळे कायदे, ते हळूहळू एकमेकांपासून भिन्नस्वरूप कसे होत जातात तें पाहूं.

वर सांगितल्याप्रमाणें आरंभीं सर्व कायदे धर्मजन्य असल्यामुळें पहिला जो भेद उत्पन्न होतो तो धार्मिक कायदे व लौकिक कायदे अशा रूपानें होतो. ह्याचें उदाहरण ग्रीस देशाच्या इतिहासांत सांपडतें. ग्रोट म्हणतो, होमर कवीनें वर्णिलेल्या काळीं तेथें सर्व कायदा झीअस देवानें घालून दिलेला असे; पण ऐतिहासिक आथेन्सकडे पाहतां तेथें " कायदे " म्हणून कांहीं अपौरुषेय दृष्टीस पडतें; आणि धार्मिक कायद्याचा भंग आणि लौकिक कायद्याचा भंग हींही भिन्न झालेलीं आढळून येतात, आणि दुसऱ्या भंगाबद्दल ताबडतोब शिक्षा केली पाहिजे असा समज उत्पन्न झालेला दृग्गोचर होतो. रोममध्येंही असलेंच विभिन्नीकरण लवकरच झालेलें आढळून येतें. प्रारंभीं राष्ट्राचा जो मुख्य तोच राजा व मुख्य धर्मोपाध्यायही असल्यामुळें, आणि धर्मोपाध्याय म्हणून त्याचा देवासारखा पोषाक असल्यामुळें, धार्मिक व लौ-

किक कायद्यांचा तोच उगम असे; पण पुढें जेव्हां हे दोन अधिकार भिन्न झाले, तेव्हां धार्मिक कायद्याचे भंग आणि लौकिक कायद्याचे भंग ह्यांमध्यें फरक उत्पन्न झाला. हीब्रू लोकांमध्येंही असेंच दिसून येतें; आणि ख्रिस्तीधर्म सुरू झाल्यावर यूरोपांतही तीच स्थिति उत्पन्न झाली. पुढें धर्मसंस्था जेव्हां फार प्रबल झाली तेव्हां कित्येक ऐहिक कायद्याविरुद्ध केलेल्या अपराधांस धर्माधिकारी देवाविरुद्ध केलेल्या अपराधांचें स्वरूप देऊं लागले; आणि म्याजिस्ट्रेटाकडे ज्या अपराधांचा निकाल करण्याचा अधिकार असे, त्यांच्या संबंधाचा तो अधिकार देखील देवानेंच त्यांच्याकडे मेहेरबानीनें दिला आहे म्हणून म्हणूं लागले. पुढें कांहीं प्रकारचे अपराध दोन्हीही कायद्यांविरुद्ध आहेत असें समजून त्यांबद्दल दोन्हीही प्रकारच्या शिक्षा होऊं लागल्या; नंतर हे दोन कायदे परस्परभिन्न होऊन धर्माविरुद्ध अपराधांचा प्रदेश आकुंचित झाला, आणि राष्ट्र व व्यक्ति ह्यांविरुद्ध अपराधांचा वाढला.

ह्याच्यापुढें जें विभिन्नीकरण होतें तें राजाधिकाऱ्यांच्या इच्छेनें झालेले कायदे आणि सर्व व्यक्तींच्या हिताच्या जोरावर बनलेले कायदे ह्यांच्यामध्यें होतें; म्हणजे, जे कायदे अधिकारसंरक्षणासाठींच प्रत्यक्ष केलेले असून अप्रत्यक्ष समाजकल्याण साधीत असतात, आणि जे कायदे प्रत्यक्षरीत्याच समाजहितकारी असतात, मग त्यांस अधिकाराचें पाठबळ असो व नसो, त्यांच्यामध्यें होतें; आणि हल्लीं ज्यास कायदा म्हणून म्हणतात तो ह्या शेवटच्या प्रकाराचाच विस्तार होऊन बनलेला आहे. ह्या प्रकारच्या कायद्यामध्यें आणि पूर्वीच्या दोन प्रका-

रांमध्यें एक फार मोठा भेद असतो. दैविक कायदे आणि शास्त्याच्या स्वताच्या अधिकारावर बनलेले कायदे ह्यांचें सामान्य तत्त्व असमता हें असतें, आणि जे कायदे सर्व व्यक्तींचें हित साधणारे म्हणून असतात, त्यांचें मूलतत्त्व समता हें असतें. "डोळ्याला डोळा आणि दांताला दांत" ही न्यायाची सर्वत्र मूळची कल्पना असते. ह्याचीं रानटी लोकांच्या इतिहासांत कांहीं विलक्षण उदाहरणें नजरेस पडतात. उदाहरणार्थ आबिसीनियामध्यें खून करणारास खून पडलेल्या माणसाच्या आप्तांच्या हवालीं केला म्हणजे, त्यांच्यापैकीं मृताचा जो अगदीं जवळचा आप्त असेल तो त्या खुन्यानें जसल्या शस्त्रानें खून केलेला असेल तसल्याच शस्त्रानें त्यास मारितो. सुमात्रामध्यें दोन कुटुंबांच्या भांडणांत दोन्ही पक्षांचीं सारखीं माणसें जाया झालेलीं नसल्यास तीं सारखीं करणें हेंच न्यायाधीशाचें काम असतें; मग संख्या बरोबर करावयास मारिले जाणारे लोक अपराधी असोत वा नसोत. जीविताच्या संबंधाचा जो हा न्याय तोच वित्तालाही लावितात. उदाहरणार्थ, डाकोटा लोकांबद्दल स्कूलक्राफ्ट आपणास असें सांगतो कीं, त्यांच्यांत एकाद्याच्या कांहीं मालमत्तेचा कोणीं नाश केल्यास त्याच्या तितक्या मालमत्तेचा कधीं कधीं तितका नाश कारितात, आणि आराकेनियन लोकांमध्यें कुटुंबें कधीं कधीं आपलीं नुकसानें बरोबर करण्यासाठीं एकमेकांस लुटितात. पुढें अपराधांबद्दल जेव्हां देणग्या किंवा रकमा घेऊं लागतात तेव्हां वरील तत्त्वाचें रूप बदललें तरी मुळांतील कल्पना तीच राहते. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील

कांहीं इंदियन लोक खुनाबद्दल मोबदला म्हणून घोडे किंवा दुसरे कांहीं त्यांनीं मोलवान् मानिलेले जिन्नस घेत असत. डाकोटा व आराकेनियन लोकांतही असेंच करीत. मूळच्या यूरोपस्थ लोकांत वर्गभेद उत्पन्न झालेले असल्यामुळें निरनिराळ्या वर्गांमध्यें ह्या मोबदल्याचे दर निरनिराळे असत. म्हणजे, त्यांच्यामध्यें मूळच्या कायद्यांत एकप्रकारचा भेद उत्पन्न झाला होता.

परंतु आतां जें सत्य ध्यानांत आणावयाचें तें हें कीं, राजाची किंवा सरदारांची सत्ता जशी दुर्बल होत जाईल आणि लोकांची सत्ता जशी वाढत जाईल, तसा सर्वांच्या व्यक्तिहितापासून उत्पन्न झालेला कायदा पुन:जोरावर येतो,आणि हाच कायदा पुढें इतर सर्व प्रकारच्या कायद्यांस मागें सारितो. कारण,हल्लींच्या कायदेकोर्टाचें मुख्य काम हें आहे कीं,समाजांतील व्यक्ति जेव्हां एकमेकांचें आतिक्रमण करितील, तेव्हां त्या उच्च आहेत किंवा नीच आहेत हें न पाहतां, त्यांस अगदीं सारख्या रीतीनें वागगवावयाचें. सूड घेऊन नुकसानें बरोबर करण्याची जरी हल्लीं व्यक्तीस कायद्याची परवानगी नाहीं, तरी कायद्याच्या दृष्टीनें सर्व लोक सारखे आहेत ह्या तत्त्वास अनुसरून सरकार प्रत्येक वर्गांतील गुन्हेगारांस एकच शिक्षा करीत असतें.तद्वतच कोणीं केलेला करार मोडल्यास किंवा देण्याघेण्याबद्दल तक्रारकेल्यास सर्व लहानमोठ्या कोर्टांचा रोंख सर्व लहानमोठ्यांचे हक्क व जबाबदाऱ्या ह्यांजकडे सारख्या दृष्टीनें पाहण्याकडे असतो. आतां हल्लींचा काळ संक्रमणाचा असल्यामुळें हा रोख पूर्णपणें स्थापन झालेला नाहीं. तथापि एकंदरींत तिकडे कल

आहे; आणि जन्मतःसिद्ध स्थितीचें (status) राज्य कमी होऊन करारी (contract) स्थितीचें राज्य जसें वाढत चाललें आहे, तसा पौरुषेय कायद्याचा जोर कमी होऊन अपौरुषेय कायद्याचा वाढत आहे; कारण पहिल्यामध्यें असमता गर्भित होत असून दुसऱ्यांत समता गर्भित होत असते.

एवंच मानवकृत कायदे देवकृत म्हणून मानलेल्या कायद्यांपासून प्रथम विभिन्न होऊन, पुढें शास्त्यांच्या इच्छेवरून म्हणून बनलेले, आणि एकंदर समाजहितसाधक म्हणून बनलेले, असे मानवकृत कायद्यांचे दोन आणखी भेद झालेले आहेत; आणि समजोत्क्रमण वाढत जाईल त्याप्रमाणें ह्या शेवटच्या दोन प्रकारांपैकीं दुसरा प्रकार पहिल्यास आपल्या पोटांत ज्यास्त ज्यास्त घेत गेलेला आहे. तथापि, युद्धशीलता जोंपर्यंत चालू राहील तोंपर्यंत हा निगीलन-व्यापार अपुराच राहतो; कारण कांहीं प्रसंगीं शास्त्याच्या इच्छेस अनुसरून वागणें आवश्यक राहतें.

१०१. हा विषय बरोबर लक्षांत येणें इतकें महत्त्वाचें आहे कीं त्यासाठीं ह्या फेरबदलांच्या आणखी दोन स्वरूपांचें वर्णन करणें इष्ट दिसतें; एक, ह्या फेरबदलांबरोबर येणाऱ्या मनोभावांच्या संबंधानें; आणि दुसरें, त्याबरोबर येणाऱ्या कृत्यांच्या संबंधानें.

ज्या अर्थीं कायदे हे कांहीं अंशीं सामान्य अशा मृतांपासून वंशपरंपरेनें आलेल्या रूढीवरून उत्पन्न झालेले असतात, कांहीं अंशीं नामांकित अशा मृतांच्या विशेष हुकूमांवरून उत्पन्न झालेले असतात, कांहीं

अंशीं सामान्य अशा जिवंतांच्या सामान्य इच्छेवरून उत्पन्न झालेले असतात, आणि कांहीं अंशीं ठळक अशा जिवंतांच्या इच्छेवरून उत्पन्न झालेले असतात, त्या अर्थी त्यांना अनुकूल असे मनोविकार परस्परसंबद्ध असले तरी भिन्न भिन्न असून, त्यांचें मिश्रण ज्या प्रमाणांनीं झालेलें असतें तीं प्रमाणें निरनिराळ्या परिस्थितींस अनुसरून निरनिराळीं असतात.

समाजस्वरूपाप्रमाणें ह्या किंवा त्या प्रकारच्या कायद्याचें त्या त्या समाजांत विशेष प्राबल्य असतें; आणि त्यामुळें त्याला योग्य अशा मनोभावाच्या योगानें इतर प्रकारच्या कायद्यास योग्य असे मनोभाव झांकले जात असतात, तरी ते नष्ट होत नाहींत. म्हणून देव हाच मुख्य राजा होय असें समजणाऱ्या समाजांत खुनाच्या गुन्ह्याबद्दल जी शिक्षा होते ती मुख्यत्वें तें देवाविरुद्ध पाप होय ह्याच मुद्यावर होते; तथापि त्यामध्यें देवाचा कायदा अमलांत आणणाऱ्या राजाचा आज्ञाभंग केल्यानें, आणि त्याप्रमाणेंच एका कुटुंबाचें, आणि म्हणून सर्व समाजाचें नुकसान केल्यानें त्यास गुन्ह्याचें स्वरूप आलेलें आहे ही गोष्ट मुळींच लक्षांत घेतलेली नसते असें नाहीं. बेडुइन किंवा सुमात्रन इत्यादि ज्या लोकांत असे दैविक कायदे नसतात, आणि त्यामुळें ते मोडल्याबद्दल दोष नसतो, तेथें खून पडलेल्या माणसाच्या कुटुंबाचें जें झालेलें नुकसान तेंच लक्षांत घेतात; आणि म्हणून केवळ मनुष्यवध (मत्सराविना मारणें) आणि खून यांच्यामध्यें तेथें भेद समजत नाहींत. बरें, जपान व पेरू या देशांत जिवंत शास्त्याच्या अधिकारास मर्यादा

बिलकूल नसल्यामुळें खून करण्यांत जो गुन्हा होतो तो मुख्यत्वेंकरून राजाचा आज्ञाभंग केल्यानें होतो असें समजतात किंवा समजत. प्राचीन रोममध्यें, खून केल्यानें समाजाचें नुकसान केल्यासारखें होतें ही ज्ञानवत्ता स्पष्ट असे; म्हणून सार्वजनिक शांततेला अनुकूल असा जो मनोविकार तोच मुख्यत्वेंकरून खुन्यास शिक्षेस पात्र करीत असे. आतां इंग्लंदांत जेव्हां एकादा खून झालेला ऐकण्यांत येतो, तेव्हा ऐकणारास जें वाईट वाटतें तें देवाच्या हुकमाचा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग झाल्याबद्दल नव्हे, तर मुख्यत्वेंकरून जीव घेतल्याबद्दलच होय, आणि गौणत्वेंकरून त्यावरून लोकसुरक्षितता कमी झालेली जी ध्वनित होते त्याबद्दल होय. तात्पर्य, निरनिराळ्या सामाजिक स्थितींमध्यें निरनिराळे मनोभाव कायद्यांस प्राधान्येंकरून आधारभूत होत असतात.

ह्याबरोबरच एतद्विषयक क्रुप्तींतही फेरबदल होत जातो. जेथें शासनपद्धति मुख्यत्वेंकरून देवदत्त म्हणून समजली जात असेल तेथें लोकांचा गर्भित किंवा स्पष्ट समज असा असतो कीं, विहित किंवा निषिद्ध क्रिया ज्याबरोबर किंवा चुकीच्या बनतात, त्या देवाच्या आज्ञेवरून होत; पुढें समाजोत्क्रमणाच्या पुढच्या पायऱ्यांवर हा समज जरी चालू राहिला तरी त्यावरील विश्वास नांवाचा बनावयास लागतो. ज्याठिकाणीं एकाधिष्ठित किंवा अल्पाधिष्ठित अशी अनियंत्रित मानवी सत्ता स्थापन झालेली असते, तेथें अशी कल्पना उत्पन्न होते कीं, कायद्यास ह्या सत्तेविना दुसरा कोणताही उगम नाहीं; म्हणून ज्या एक किंवा थोडच्या सत्ताधीशांच्या हुकुमांस अनुसरून अस-

तील त्याच क्रिया योग्य समजल्या जातात, आणि नसतील त्या अयोग्य समजल्या जातात. पुढें प्रगति होऊन राज्यपद्धतीस जसें लोकाधिष्ठित स्वरूप येत जाईल, तसा ह्या कल्पनेंत एवढा फेरबदल होतो कीं, कोणतीही गोष्ट करणें वा न करणें हें कर्तव्य जरी सरकारच्याच कानूवरून उत्पन्न होतें, तरी त्या कानूला जो जोर येतो तो लोकेच्छेनेंच येत असतो. तथापि हीही गोष्ट ह्या ठिकाणीं लक्षांत येते कीं, अशा स्थितींत सर्व व्यक्तींचें हित हाच कायद्याला आधार होय असें जरी मुकाट्यानें ध्वनित होत असतें, तरी उघड उघड असें म्हणत असतात कीं, बहुजनाची जी व्यक्त करून दाखविलेली इच्छा तीच कायद्याला मुख्य आधार होय. सारांश, अधिकारापन्नाचा हुकूम हाच कायद्याचा उगम ही जी प्राचीन कल्पना ती ह्या ठिकाणीं कायम राहिलेली दिसते; मात्र ह्या ठिकाणीं अधिकारापन्न एक किंवा अल्प नसून बहुजन असतात.

पण हीही कृति सांक्रमिकच आहे. तिजवरून अखेरची धेवट रीत्या लक्षांत येणारी जी कृति तीच अखेरची होय; आणि ती ही कीं, सर्व व्यक्तींचें हित हाच खुद्द कायद्याचा उगम आहे, आणि त्या हितासंबंधी जो बहुजनाचा समज तो नव्हे; कारण हा समज बरोबर असेल किंवा चुकीचा असेल. सृष्टीचा कायदा हाच ग्रथित कायद्याचा किंवा मानवकृत कायदेकानूचा उगम होय ही गोष्ट कायदेशास्त्रज्ञ, आणि विशेषतः फ्रेंच शास्त्रज्ञ, कबूल करूं लागले आहेत. इंग्लंदांतही सामान्य कानू किंवा "कॉमन लॉ" ह्याचें पूरीकरण जें समतेच्या

किंवा एकिटीच्या कायद्यानें होत आहे त्यामध्यें मुद्दा हाच आहे कीं, माणसें हीं सर्व सारख्याच घटनेचीं असल्यामुळें त्यांना सर्वांना कांहीं सारखे हक्क आहेत, आणि ते त्यांचे हक्क संभाळून धरणें हें त्यांस व्यक्तिशः प्रत्यक्ष फायद्याचें असून समाजास तें अप्रत्यक्ष फायद्याचें आहे; म्हणून समतेच्या तत्त्वावर दिलेले जे निकाल त्यांस रूढ कायदा किंवा पार्लमेंतांतील मतें ह्याव्यतिरिक्त स्वतंत्रच आधार आहे. धर्ममतांच्या संबंधानें तर बहुजनसंमत अशा कायद्याचा देखील आज्ञाभंग करण्याचा व्यक्तीस हक्क आहे ही गोष्ट आधींच कबूल झालेली आहे. कायदा मोडणारा म्हणून असल्या माणसाबद्दल जी कांहीं नापसंती लोकांस वाटत असेल ती तो आपलें मतस्वातंत्र्य प्रतिपादीत आहे म्हणून त्याजबद्दल वाटणारी जी सहानुभूति तिच्यामध्यें जिरून जात असते. म्हणजे काय, तर, राजा किंवा लोकमत ह्याच्या आधारावर बनलेला जो सरकारी कायदा त्याच्याहून श्रेष्ठ असा कायदा आहे ही गोष्ट लोक मुकाट्यानें लक्षांत घेऊं लागले आहेत. ह्या ज्या कल्पना व मनोवृत्ती त्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, परिपक्व झालेल्या उद्यमशीलतेस अनुरूप असें जें मत तिकडे लोकांची प्रगति होत आहे. तें मत हें कीं, जो कायदा सुसंगत असें सामाजिक सहकार्य होण्यास लागणारी ही किंवा ती आवश्यक गोष्ट घडवून आणीत असेल, तोच कायदा योग्य होय, आणि ह्या गोष्टींच्या जो कायदा विरुद्ध असेल तो अयोग्य होय; मग तो केवढ्याही मोठ्या अधिकाऱ्यानें पास केलेला असो, किंवा त्यास केवढ्याही मोठ्या लोकमताचें पाठबळ असो.

ह्याचा अर्थ असा कीं, पुरुषकृत कायदा जसा क्षीण होत जाईल तसा जो अपुरुषकृत कायदा जोरावत जातो, आणि ज्यांत सर्व व्यक्तींचें हित व्यक्त होत असतें, त्याला अखेरचें स्वरूप जें येतें तें नीतीचें एक व्यावहारिक अंग असेंच येतें; आणि तें अंग माणसांचे एकमेकांशीं आणि समाजाशीं असलेले जे न्यायसंबंध तद्विषयक असतें.

१०२. ही प्रसंगोपात्त केलेली चर्चा आतां पुरी करून कायद्यांची, सामान्यतः नव्हे तर विशेषतः, वाढ कशी होते ह्या प्रश्नाचा एथें आह्मास विचार करतां येईल; म्हणजे, त्यांचा एकंदर संचय कसा वाढत जातो, त्यांचे विभाग व पोटविभाग कसे पडत जातात, ते ज्यास्त ज्यास्त निश्चित, ज्यास्त ज्यास्त सुसंबद्ध, व ज्यास्त ज्यास्त संमिश्र कसे होत जातात, आणि नव्या नव्या परिस्थितीयोग्य कसे बनत जातात हें दाखवितां येईल. पण त्यास जागा फार लागून, शिवाय तें आमच्या प्रस्तुत आवांक्याच्या बाहेरही जाईल. वर निरूपिलेले सिद्धान्त प्रस्तुत जरूरीला पुरेसे आहेत; म्हणून त्यांची आतां गोळाबेरीज करूं.

माणसें आपल्या आईबापांपासून शिकून ज्या कल्पना मुलांस शिकवितात, जे मनोभाव त्यांच्या मनावर ठसवितात, आणि जे व्यवहार घालून देतात, त्यांपासूनच, अखेर, बदलण्यास फार कठीण अशा रूढी उत्पन्न होतात, ह्या अगदीं रानटी टोळ्यांतून देखील उदाहृत होणाऱ्या सत्यापासून सुरवात करतां, ही गोष्ट आपल्या लक्षांत येते कीं, ज्याप्रमाणें अखेरपावेतों, त्या-

प्रमाणें प्रारंभींही, कायदा हा मुख्यत्वेंकरून पूर्वजदत्त हुकुमांचाच बनलेला असतो.

कोणतीही राजकीय संघटना उत्पन्न होण्यापूर्वीं अप्रसिद्ध मृतांच्या ज्या आज्ञा त्या, आणि ज्या बाबतींत त्यांच्या आज्ञा नसतील त्या बाबतींत जिवंतांचें सार्वजनिक मत, ह्यांचें मिळून नीतिनियमांचें बाड बनलेलें असतें. पण पुढें जेव्हां नामांकित नाईक उत्पन्न होतात तेव्हां लोक त्यांस जिवंतपणीं कांहीं अंशीं भ्यावयास लागून त्यांच्या आज्ञा पाळीत असतात, आणि ते मेले म्हणजे त्यांच्या भुतांस ज्यास्तच भितात आणि त्यांचे हुकूम ज्यास्तच मानितात; म्हणून वरील हुकुमांत ह्या हुकुमांची भर पडून जाते. आणि पुढें जेव्हां लढाईमुळें समाज संयुक्त होऊन ह्या नायकांचे राजे बनतात, तेव्हां पूर्वींच्या आठवत असलेल्या आज्ञा, आणि त्यांच्या भुतांनीं केलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या आज्ञा, ह्यांचें वर्तनविषयक पवित्र बाड बनून जातें; त्यांत कांहीं अंशीं नव्या आज्ञा असून कांहीं अंशीं रूढीनें स्थापन झालेल्या जुन्या आज्ञाही समाविष्ट झालेल्या असतात. मग जिवंत शास्त्यास ज्या बाबतींत जुनी रूढी नाहीं त्या बाबतींत नवा कायदा करावयास येत असून, बाकीच्या बाबतींत ह्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध मृतांच्या आज्ञा मानाव्या लागत असतात; मात्र तो शास्ताच जर दैविक म्हणून मानला जात असेल तर त्याच्या आज्ञांस पवित्र कायद्याचेंच स्वरूप येतें. सर्व समाजांमध्यें पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर सर्व प्रकारच्या वर्तननियमांना जो धर्माचा आधार असतो त्याचें कारण हेंच होय. यज्ञ-

विषयक विधी, सार्वजनिक कर्तव्यें, नैतिक आज्ञा, सामाजिक विधी, जीवितविषयक संवयी, औद्योगिक नियम, आणि पोषाकाच्या देखील सरणी, ह्या सर्वांची उभारणी त्यावेळीं एकाच पायावर केली जात असते.

प्रारंभीच्या पायऱ्यांवर मनुष्यस्वभाव सुसंगत सामाजिक सहक्रिया करण्यास फारसा योग्य बनलेला नसल्यामुळें वर्तनाचे अशा रीतीनें उत्पन्न झालेले हे नियम कायम राखणें आवश्यक असून, तसे ते राहण्यास आज्ञाधारकपणाची आवश्यकता असते; आणि म्हणून आज्ञाभंग हा त्या वेळेस अत्यन्त मोठा गुन्हा समजला जात असतो. त्यामुळें ऐहिक किंवा दैविक शास्त्याविरुद्ध द्रोह किंवा बंड केल्यास त्याबद्दल अत्यन्त कडक शिक्षा होत असते. कायदा मोडल्याबद्दल जी शिक्षा होते ती ती कृति निसर्गतःच गुन्ह्याची आहे म्हणून नव्हे, तर त्यावरून जो अनाज्ञाधारकपणा व्यक्त होतो त्याबद्दल होय. आणि समाजोत्क्रमणाच्या पुढच्या पायऱ्यांवरही सरकारच्या अधिकाराविषयीं बेगुमानपणा हेंच कायद्याच्या अतिक्रमाचें मुख्य तत्त्व म्हणून कायदे शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें समजलें जात असतें.

जे समाज मोठाले व संकीर्ण बनतात त्यांच्यामध्यें धार्मिक कायद्यानें ज्यांच्याबद्दल तरतूद केली नाहीं असे उद्यमप्रकार व व्यवहार उत्पन्न होतात; आणि त्यांच्या संबंधानें शास्त्यास कायदे करण्याची मुभा असते. असले कायदे जसे वाढत जातील तसे मानवकृत म्हणून माहीत असलेल्या कायद्यांचेंच एक बाड उत्पन्न होतें; आणि ज्या लोकांनी ते केले व ज्या पिढ्यांनीं ते मानि-

ले त्यांजबद्दल लोकांच्या मनांत असलेल्या पूज्यबुद्धीवरून जरी त्यांस एकप्रकारचा अधिकार येतो, तरी देवदत्त कायद्यांचा जो पवित्रपणा तो त्यांच्या अंगीं नसतो; म्हणजे काय, तर, मानवी कायदा दैविक कायद्यापासून विभिन्नीकरण पावतो. पण जे समाज मुख्यत्वेंकरून युद्धशीलच राहतात, तेथें हे दोन्ही प्रकारचे कायदे ह्या बाबतींत परस्परसदृश राहतात कीं त्यांना पौरुष आधार असतो. म्हणजे, ते पाळण्याबद्दल लोक असें कारण उघड रीतीनें देतात कीं त्यांच्या ठिकाणीं दैविक शास्त्याची इच्छा, किंवा मानवी शास्त्याची इच्छा, किंवा, कधीं कधीं, कोणास जबाबदार नसणाऱ्या सरदाररूपी शास्त्या मंडळाची इच्छा व्यक्त झालेली आहे.

पण उद्यमशीलतेची प्रगति होत जाईल, आणि हळू हळू राजकीय सत्ता संपादन करणाऱ्या स्वतंत्र लोकवस्तीची वाढ होत जाईल, तसे मानवजन्य जो कायदा त्याचे पोटभाग पडूं लागतात; आणि जो भाग सर्व व्यक्तींच्या हितापासून उत्पन्न होतो तो, जो भाग शास्त्याच्या अधिकारावरून उत्पन्न झाला असेल त्याच्याहून वरचढ होऊं लागतो. जोंपर्यंत समाज जबरीच्या सहक्रियेच्या तत्त्वावर बनलेला राहील, तोंपर्यंत कायद्यास ही सहक्रिया संभाळून धरावयाची असल्यामुळें, मुख्यत्वेंकरून त्यास जन्मतःसिद्ध स्थितीचें नियमन करावें लागत असतें; म्हणजे, असमता कायम राखावी लागत असते, आणि अधिकार अमलांत आणावा लागत असतो. पण जसजसें स्वैच्छिक सहक्रियेचें तत्त्व समाजांत ज्यास्त ज्यास्त दिसूं लागेल, तसतसे करार

पुरे करविणें व त्याबरोबरच माणसांचे हक्क सारखे आहेत असें मुकाट्यानें प्रतिपादणें, आणि सर्व व्यक्तींचें हित साधणें, हाच कायद्याचा मुख्य उगम बनून जातो; आणि इतर रीतीनें उत्पन्न झालेल्या कायद्याचा जो कांहीं अधिकार असेल, तो गौण म्हणून समजला जाऊं लागतो; आणि त्यास जो अमलांत आणितात तो एवढ्यासाठींच कीं, कायदा म्हणूनच कायद्याचें रक्षण करणें हें सार्वजनिक कल्याणास अप्रत्यक्षरीत्या उत्तेजनकारक होत असतें.

शेवटची गोष्ट लक्षांत घ्यावयाची ती ही कीं, ह्या पुढच्या पुढच्या पायऱ्यांवरच्या ज्या कायदेसरण्या असतात त्यांच्याबरोबर त्यांना योग्य असे मनोभाव व क्लृप्त्या उत्पन्न होत असतात; आणि हल्लीं ज्या तद्विषयक कल्पना रूढ आहेत त्या हल्लींच्या उद्यमशीलतेच्या व युद्धशीलतेच्या तडजोडीस योग्य असून, अखेरची जी तद्विषयक कल्पना तिजकडे चढून जाण्यास त्या मधल्या पायऱ्याच आहेत. त्या कल्पनेप्रमाणें कायदा जो न्याय्य ठरेल, तो सामाजिक स्थितींत पूर्ण जीविताचा उपभोग घेतां येण्यास आवश्यक अशा ज्या गोष्टी त्यांचा संभाळता म्हणूनच ठरेल.

प्रकरण पंधरावें

स्वामित्व

१०३. मूळ माणसाला व्यक्तीच्या स्वामित्वाची कल्पना नसे असें जें कांहीं म्हणतात तें खरें दिसत नाहीं; कारण हुशार जनावरांमध्यें देखील तसली एकप्रकारची बुद्धि दिसून येते. कुत्र्यास त्याच्या धन्यानें आपल्या जिनसांवर देखरेख करावयास ठेविलें तर तो तें कोणी न्यावयास आल्यास त्याच्या अंगावर जातो. अशी स्थिति असल्यामुळें आपलेपणाची कल्पना उत्पन्न करणारे मनोभाव व विचार अगदीं रानटी स्थितींतील माणसामध्यें नसतील हें संभवनीय दिसत नाहीं. म्हणून त्याच्या संबंधानें एवढेंच म्हणतां येईल कीं ते मनोभाव व विचार हल्लींपेक्षां कमी पक्क झालेले असे त्याजमध्यें असले पाहिजेत.

कांहीं अत्यन्त रानटी लोकजमावांत स्वामित्वाच्या हक्कांना फारसा मान मिळत नाहीं हें खरें आहे. लिव्हिंग्स्टन आपणास असें सांगतो कीं, बुशमेन लोकांत दुर्बल असेल त्यास आपला जीव संभाळण्यासाठीं प्रबलाच्या स्वाधीन आपलीं शस्त्रें, आपली बायको, आणि आपलीं मुलेंही करावीं लागतात; आणि कांहीं नीचतेस पोहोंचलेल्या उत्तर अमेरिकन टोळ्यांमध्यें प्रबलानें दुर्बलापासून त्याचें वित्त घेऊं नये असा निर्बंधच नाहीं; तर बळीचें कृत्य यशस्वी होईल तर तें बरोबर म्हणून समजलें जातें. पण मोठ्या शाळूसोबत्यानें धाकट्याचें

खेळणें हिसकावून घेतलें म्हणून त्याजवरून मालकीची कल्पना आणि तत्सहचारी मनोभाव ह्यांचा अभाव जसा मुलांमध्यें ठरत नाहीं, तसा वरील उदाहरणांवरून रानटी लोकांतही तो सिद्ध होत नाहीं. जेथें असल्या बळजबरीचा उपयोग कोणी करीत नाहीं तेथें देखील कधीं कधीं व्यक्तींचे हक्क जितके मानावे तितके मानीत नाहींत किंवा धाब्यावर बसवितात हेंही खरें आहे. उदाहरणार्थ, चिपिवायन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्या कायद्याप्रमाणें यशस्वी पारध्यास मिळालेल्या शिकारीची वांटणी हजर असतील त्या सर्वांस द्यावी लागते; आणि आरावाक लोकांबद्दल हिलहौस असें म्हणतो कीं, त्यांच्यांत व्यक्तिवित्ताची कल्पना जरी स्पष्टपणें आढळते, तरी ते एकसारखे कर्जें देत असतात व घेत असतात, पण तीं फेडण्याबद्दल मुळीच काळजी बाळगीत नाहींत. पण असल्या उदाहरणांवरून एवढेंच व्यक्त होतें कीं, प्रारंभीं खासगी स्वामित्वाची कल्पना अनिश्चित अशी असते, आणि तशी ती असेल ही कल्पना आपणास पुराव्याच्या अभावींही होण्यासारखी आहे.

एकादा प्राणी आपलें भक्ष्य पंजांनीं पकडितो तशासारखी कोणतीही जिन्नस आपल्या ताब्यांत घेण्याची जी कृति आहे तिजबरोबर जे विचार व मनोभाव येत असतात, त्यांनाच स्वामित्वाच्या कल्पनेनें निश्चित असें स्वरूप येत असतें. " जवळ असणें आणि धरणें " (to have and to hold) , " एकादी वस्तू बाळगून असणें " (to be seized of a thing) असले जे

शब्द बेचनपत्रांतून वगैरे सांपडत असतात त्यांवरून, आणि एकादें शेत वगैरे विकत घेतलें म्हणजे सगळ्या शेताचें दर्शक म्हणून त्यांतील एकादें मातीचें ढिकूळ विकणारानें विकत घेणाराच्या हातीं देण्याची जी रूढी बहुतेक पर्वापर्यंत कित्येक देशांत होती त्यावरून, प्रारंभीं, प्रत्यक्ष ताब्यांत घेणें म्हणजे मालक बनणें अशी मालकीविषयींची कल्पना होती असें दिसतें. म्हणून एकादी वस्तु मालकीची होण्यास ती अमक्या रीतीनेंच घेतली पाहिजे व ठेविली पाहिजे ही जी तद्विषयक जास्त सुधारलेली कल्पना आहे तेणेंकरून त्या हकास जसा निर्बंध उत्पन्न होतो तसाच त्यास स्पष्टपणाही येतो हें उघड आहे. आणि व्यक्तीच्या स्वामित्वविषयक हकांना अशा रीतीनें आलेला जो मर्यादितपणा तो जेथें मर्यादा ठरविणें एकंदरींत सोपें असेल तेथें प्रथम उत्पन्न झाला असला पाहिजे, आणि जेथें तसें करणें कठीण असेल तेथें मागाहून उत्पन्न झाला असला पाहिजे हेंही उघडच आहे. आणि तशी प्रत्यक्ष स्थितिही दिसून येते.

१०४. प्रारंभींच्या पायऱ्यांवर, भक्ष्यार्थ रानटी लोक ज्या प्रदेशावर भटकत असतात त्याच्या निरनिराळ्या भागांवर व्यक्तींचे हक्क स्थापणें आणि ते भिन्नभिन्न म्हणून स्पष्टपणें दाखविणें अशक्य नसलें तरी दुर्घट असतें; तथापि जंगम वस्तू व घरें यांजवरचे हक्क भिन्नभिन्न म्हणून दाखविणें कठीण नसतें; आणि म्हणून हे हक्क बहुधा त्या लोकांनीं ओळखलेले आढळांत येतात. उत्तर अमेरिकेंतील कांहीं रानटी लोकांबद्दलच्या बॅंक्राफ्ट-

च्या ग्रंथांतील उताऱ्यांवरून ही गोष्ट स्पष्ट दिसते. आहाट लोकांमध्यें क्यापटिन कुकला असें कळून आलें कीं, आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवर आपला पूर्ण मालकीचा हक्क आहे असें ते समजत, आणि म्हणून लांकूड, गवत व पाणी यांबद्दल ते पैसे मागत. टोळीच्या स्वामित्वाच्या मर्यादा त्यांच्यांत स्पष्टरीतीनें ठरलेल्या असतात, पण व्यक्ती जमिनीवर आपलें स्वामित्व कचितच सांगतात. जीं माणसें एकत्र होऊन कांहीं घरें बांधतील त्यांजवर त्यांची सगळ्यांची मालकी असते. त्यांच्यांत खासगी मिळकत म्हटली म्हणजे होड्या, भक्ष्य मिळविण्याचीं साधनें, घरगुती भांडीं, गुलाम आणि घोंगड्या, इत्यादिकांची बनलेली असते. कोमांची लोकांतही असलीच स्थिति दृष्टीस पडते. " खासगी मिळकतीखेरीज इतरत्र ते स्व व पर ह्याबद्दलचे भिन्न हक्क ओळखीत नाहींत; ते राहत असतील तो प्रदेश व त्यावर निर्वाह करणारी पारध ही ते सर्व टोळीची मिळकत म्हणून समजतात; आणि पारध जो धरील त्याची ती बनते ". बरें, इतर लोकांप्रमाणें ह्या कोमांची लोकांतही लढाईत जो कोणी कैदी करील त्याचे ते गुलाम म्हणून समजतात, व ते त्यांस स्वेच्छेप्रमाणें विकतां किंवा सोडतांही येतात; ह्यावरून असें दिसतें कीं, जेथें मालकीचा हक्क सहजगत्या अमुक म्हणून सांगतां येण्यासारखा असेल तेथें तो प्रतिपादिला जातो. ब्राझिलमधील इंदियन लोकांबद्दल व्हॉनमार्टयस आपणास असें सांगतो कीं, त्यांच्यांत झोंपड्या आणि भांडींकुंडीं खासगी मिळकत म्हणून समजतात; पण त्यांच्यासंबंधानें देखील सार्वजनिक

मालकीच्या कांहीं कल्पना त्यांच्यांत रूढ दिसतात. एकाच झोंपडींत पुष्कळ वेळां एकाहून ज्यास्त कुटुंबें रहात असतात; आणि त्यांतील पुष्कळ भांडीं सगळ्यांचीं मिळून असतात. शस्त्रें, लढाईचा सरंजाम, चिलमी, आणि बसावयाचा झोंपाळा एवढीच कायती त्यांच्यांत खासगी मालमत्ता म्हणून समजली जाते. एस्किमो लोकांबद्दल डॉ॰ रिंक जी हकीकत सांगतो तिजवरून असें दिसतें कीं, त्यांच्यामध्यें देखील असेंच आहे. ह्यावरून असें उघड दिसतें कीं, जेथें खासगी हक्क पूर्णपणें ओळखणें सुलभ असेल, म्हणजे तो एकट्याचाच असेल, तेथें तो तसा ओळखला जातो, आणि जेथें तो कांहीं अंशींच ओळखणें शक्य असेल, म्हणजे जेथें इतरांच्या खासगी हक्कांची त्या हक्कांत गुंतागुंत झालेली असेल, तेथें तो तसा ओळखला जातो.

सारांश प्रारंभींच्या पायऱ्यांवर, खासगी मिळकत ओळखण्याचें तत्त्व जें कांहीं मर्यादेपर्यंतच अमलांत आलेलें दिसतें व त्याच्यापलीकडे दिसत नाहीं, त्याचें कारण तसें करण्यास परिस्थिति अनुकूल नसते हें होय.

१०५. हें सत्य ध्यानांत आणिल्यानें प्रारंभींचें जें जमिनीच्या मालकीचें तत्त्व तें लक्षांत येण्यास एकदम मार्ग खुला होतो; आणि ज्ञाति व कुटुंब ह्यांच्या ज्या जमीन धारण करण्याच्या पद्धती इतक्या दृष्टीस पडत आलेल्या आहेत, त्यांच्या उत्पत्तीवर प्रकाश पडतो.

जोंपर्यंत रानटी माणसाचा जमाव रानांत मिळालेल्या भक्ष्यावर निर्वाह करीत असतो, तोंपर्यंत तो ज्या प्रदेशावर रहात असेल त्याचा उपभोग त्यानें संयुक्तरी-

त्याच घेतला पाहिजे; ह्याचें एक कारण त्यांच्यापैकीं कोणालाही त्या प्रदेशाच्या कोणत्याही विशिष्ट भागावर आपला हक्क दाखवितां येत नाहीं, आणि दुसरें कारण त्याचे लहान लहान विभाग करून वांटून घेण्याचें त्यांनीं मनांत आणिल्यास, तसें त्यांस करतां येणार नाहीं. जेथें धनगरी जीवित उत्पन्न झालेलें असतें तेथें टोळीनें व्यापलेल्या प्रदेशांत इकडे तिकडे कळप नेण्याची मुभा टोळींतील सर्व धनगरांस असलीच पाहिजे. नाहीं तर त्यांचा निर्वाह होणार नाहीं; म्हणजे, एका बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशाची संयुक्त मालकी असणें हेंच अशा ठिकाणीं इष्ट असतें. बरें, पुढें जेव्हां संक्रमण होऊन शेतकीची स्थिति प्राप्त होते, तेव्हां देखील जमिनीच्या खासगी मालकीची उत्पत्ति न होण्यास कित्येक कारणें एकत्र जुळत असतात.

पहिलें कारण पूर्वीपासूनची संयुक्त मालकीची रूढी. संयुक्त मालकी आवश्यक करणारी परिस्थिति नाहींशी झाल्यावर देखील ती चालू राहते; कारण पूर्वजांचें जें पवित्र उदाहरण त्यांत फेरबदल करणें लोकांस आवडत नाहीं. कधीं कधीं ही अडचण दुर्लंघ्यच असते; उदाहरणार्थ, रेचाबाइट लोक व पेट्राचे लोक यांना अशी शपथ असे कीं त्यांनीं शेतें किंवा द्राक्षवेलींच्या बागा, किंवा घरें करूं नये, तर भटकत रहावें. बरें, जेथें स्थाईक स्थिति प्राप्त झाली असेल, तेथें भटकण्याच्या स्थितींत असतां स्थापन झालेल्या ज्या संवयी व मनोवृत्ति त्या व्यक्तींनीं जमीन धारण करण्याच्या आड आल्याच पाहिजेत. शिवाय, ही गोष्ट होण्यास भौतिक अडचणी असतातच. अर्धवटरीत्या स्थाईक झालेल्या धनगरी जमावापैकीं एका

भागावर आपलाच एकटयाचा हक्क स्थापन केला, तरी बाकीच्यांचीं जनावरें तेथें येऊं नयेत असा बंदोबस्त त्यास करतां आल्याविना त्याचा फारसा फायदा व्हावयाचा नाहीं. विशिष्ट व्यक्तींची व विशिष्ट कुटुंबांची मालकी जमिनीवर स्थापन होण्यास दुसरी एक अडचण अशी असते कीं प्रत्येक जमिनीच्या तुकडयाची किंमत तत्पुरतीच असते. कारण जमीन लवकरच निःसत्व होऊन जाते, आणि म्हणून खतें वगैरे घालण्याची कला माहीत नसल्यास निरुपयोगी बनते. म्हणून रानटी शेतकऱ्यांमध्यें असा प्रघात नेहमीं असतो कीं, एकाद्या जमिनींतून ती साफ करून, दोन तीन पिकें काढावयाचीं, आणि मग ती सोडून द्यावयाची; आणि दुसरीकडे जावयाचें; तात्पर्य, अशा लोकांत सर्व जमीन सर्वांचीच असते, व एका विशिष्ट व्यक्तीचा म्हणून तिचा कोणताही भाग असूं शकत नाहीं.

एवंच बीजभूत सुधारणेच्या बऱ्याच पायऱ्यांवर जमिनीवर खासगी मालकी स्थापन होण्यास अडचणी फार असतात, आणि साधनें अल्प असतात. शिवाय असें असतें कीं रानटी माणसें मेहनतीनें केलेल्या वस्तूवर मेहनत करणाराची मालकी असते असें समजत असल्यामुळें जमिनीवर व्यक्तीची मालकी समजत नाहींत; कारण ती व्यक्तीच्या मेहनतीनें उत्पन्न झालेली नसते. म्हणून सहजगत्याच जमिनीवर सगळ्या टोळीची किंवा ज्ञातीची मालकी चालू राहते, आणि जो जेव्हां ज्या भागाची लागवड करीत असेल त्याची तेवढ्यापुरती त्या जमिनीवर खासगी मालकी राहते.

कोठें कोठें निरनिराळ्या लोकांमध्यें जमिनीचें उत्पन्न वांटून घेण्याच्या निरनिराळ्या चाली आढळून येतात. उदाहरणार्थ टोडा लोकांमध्यें जमीन जरी सगळ्या गांवकऱ्यांच्या मालकीची म्हणून समजतात, तरी तिच्यावर चरणारीं गुरें तेथील पुरुषांची खासगी मिळकत म्हणून समजली जाते. सगळ्या गुरांचें जें दूध निघेल त्यांतलें सगळीं माणसें आपल्यास पाहिजे तेवढें प्रथम घेतात, आणि राहील तें सगळे पुरुष आपल्या गुरांच्या संख्येप्रमाणें वांटून घेतात. जेथें जमिनीची लागवड सामाईक रीतीनें करितात तेथें उत्पन्नाची वांटणीही अशाच तऱ्हेवर करितात. उदाहरणार्थ, कांगोमधील लोक पीक काढलें म्हणजे त्याचे निरानिराळे प्रकार निरानिराळे करितात; नंतर आपल्या नायकास पुरेसें धान्य देतात; आणि पुढच्या पेरणीसाठीं जरूर तें बीं एकीकडे काढून ठेवून, बाकीच्याची प्रत्येक झोंपडींत माणसें असतील त्यामानानें सर्व झोंपड्यांतून वांटणी करून देतात. नंतर गांवांतील सर्व बायका मिळून जमिनीची नांगरणी करून पुढच्या पिकासाठीं पेरणी करितात. युरोपांत दक्षिणेकडील स्लाव्ह लोकांत अशासारखीच व्यवस्था आढळून येते. "शेतावरील मेहनतीचें उत्पन्न ते सर्व मिळून खातात, किंवा विवाहित जोडप्यांना वांटून देतात; पण प्रत्येकजण उद्योग धंदा करून जें उत्पन्न करील तें ज्याचें त्याचें खासगीच्या मालकीचें समजलें जातें". स्वित्सर्लंदमध्येंही कांहीं गांवांत असलीच चाल अद्याप कांहीं अंशीं दृष्टीस पडते. कारण तेथें पुष्कळ जमिनी खासगी मालकीच्या बनलेल्या असून कांहीं द्राक्षांचे

मळे सगळ्या गांवाचे मिळून आहेत; आणि धान्याचीं शेतेंही तशींच आहेत; आणि त्यांचें जें उत्पन्न येईल त्याचीं ते सर्वजण मिळून गांवजेवणें करीत असतात.

एवंच आपल्यास असें दिसून येतें कीं, जमिनीच्या संबंधानें ज्ञातीची मालकी व कुटुंबाची मालकी प्रथम उत्पन्न होऊन नंतर पुष्कळ काळपावेतों चालू राहिली ह्याचें कारण तिच्या संबंधानें अन्य तऱ्हेची मालकी स्थापन करणें कठीण होतें. सुधारलेल्या लोकांच्या इतिहासाकडे पाहतां असें दिसतें कीं, हल्लीं जशी असुधारलेल्यांमध्यें स्थिति आहे त्याप्रमाणेंच खासगी मालकीस जंगम वस्तूपासून सुरवात होऊन, ती स्थावर मिळकतीलाही कांहीं विशिष्ट परिस्थितींतच लागू होऊं लागते. हीब्रयू भाषेंत " स्थावर मालमत्ता " यास शब्द नाहीं असें जें मेयर सांगतो, आणि रोमन लोकांत स्थावर मिळकत म्हणजे प्रथम जमीन समजत नसून गुलाम व गुरें समजत असत असें जें मॉन्सेन सांगतो, त्यावरून या गोष्टीचा पुरावा आपल्यास मिळतो. आतां पितृशासित जमाव धनगरी जीवितावरून उत्पन्न होतो हें ध्यानांत आणतां ज्ञाति व कुटुंब ह्यांनीं जमीन धारण करण्याच्या ज्या पद्धती यूरोपस्थ मूळसमाजांतून दृष्टीस पडत त्या कशा उत्पन्न झाल्या असतील हें आपल्या लक्षांत येतें. रोमन लोकांत अगदीं प्रारंभींच्या काळीं गांवांतील सगळ्या जमिनी निरनिराळ्या ज्ञाती कां लावीत असत, आणि ज्ञातींतील सगळीं कुटुंबें कां वांटून घेत असत हें ध्यानांत येतें. आणि परिस्थिति व मनोभाव यांस अनुसरून कोठें कोठें निरनिराळ्या ज्ञाती वांटणीस आलेल्या जमिनीचा वर्ष वर्ष उप-

योग कां करीत, कोठें कोठें कांहीं कांहीं काळानें त्या पुनः चांटून कां घेत, आणि कोठें कोठें ह्याच्याहून ज्यास्त काळपर्यंत कां धारण करीत, हें आपल्या ध्यानांत येतें.

१०६. एवंच अनुमान व पुरावा ह्या दोन्ही रीतींनीं जमीन ही प्रथम सर्वांच्या मालकीची असते असें सिद्ध झाल्यावर, लगेच असा प्रश्न उद्भवतो कीं ह्यापासून व्यक्तींच्या मालकीची उत्पत्ति कशी झाली ? ह्या प्रश्नाचें उत्तर सामान्यतः कशा प्रकारचें असणार ह्याबद्दल फारसा संशय नाहीं. ज्या प्रदेशावर एकादा समाज बसला असेल त्या समाजाच्या घटकांनीं त्या जमिनीवरील आपला संयुक्त हक्क टाकून द्यावा हें कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें जबरीचाच उपयोग होऊन झालें पाहिजे. आतां ही जबरी एकादा बाहेरून स्वारी करणारा करूं शकेल; किंवा देशांतल्या देशांतच उत्पन्न झालेला जबरदस्त करूं शकेल; पण कोणींही केली तरी तिच्या मुळीं लष्करी चळवळ असलीच पाहिजे.

ह्याबद्दलचा पहिला पुरावा आपणास मिळतो तो हा कीं, जेथें परिस्थिति युद्धास अगदीं प्रतिकूल असेल तेथें ही मूळची जमिनीच्या मालकीची पद्धति सर्वांत ज्यास्त काळ राहिलेली आहे. ह्याचें उदाहरण म्यूस नदीच्या पलीकडे क्यांपाइन प्रांतांत आर्डेनिस नामक प्रदेशांत सांपडतें. तेथें जाण्यास मार्ग नाहींत, आणि तेथील जमीन फारशी सुपीक नाहीं, आणि त्यामुळें त्यावर स्वारी करावीसें कोणास वाटतही नाहीं; म्हणून त्या ठिकाणीं जमिनीवर तेथील लोकांची संयुक्त मालकी राहिलेली आहे. स्वित्सर्लंद देशामध्येंही कांहीं ठिकाणीं, आणि विशेषतः आ-

ल्पस पर्वतावरील भागांत, अशीच स्थिति आहे. लॉंबर्डी-च्या डोंगराळ भागांत जमिनीची संयुक्त मालकी अद्यापि आढळते. तात्पर्य, जे प्रदेश अत्यंत रानवट आणि सामान्य वस्तीपासून दूर आहेत तेथें ही स्थिति आढळते ह्यास उदाहरण, ग्रेटब्रिटननजीकचीं बेटें शेटलंद व आर्कने हींही आहेतच.

उलटपक्षीं, एकाद्या देशावर स्वाऱ्या झाल्यानें प्रत्यक्ष-रीत्या, आणि त्या स्वाऱ्या करणारास विरोध करून युद्ध-शील नमुना उत्पन्न झाल्यानें जे वर्गभेद उत्पन्न होतात तेणेंकरून अप्रत्यक्षरीत्या, जमिनीची मालकी कोणत्या ना कोणत्या रीतीनें व्यक्तींच्या हातीं जाऊं लागते. कोठेंही झालें तरी एकादा प्रदेश जिंकल्यानें जेत्यास त्या प्रदे-शाचा ताबा मिळतो, तो अनिर्बंध असतो, कारण त्या-च्याशीं वाद घालण्यास तेथें कोणी समर्थच नसतो. ल-ढाईंत मिळालेल्या इतर जिनसाप्रमाणें जमीनही जेत्या-चीच बनते; आणि मग तो आपल्या स्वभावानुरूप ती स्वतः आपल्याचकडे सगळी ठेवितो, किंवा कांहीं आ-पल्या अनुयायांस वांटून देतो. पहिल्या प्रकाराचीं उदाहरणें फार सांपडतात. " आबिसिनियाचे राजे को-णत्याही कायद्यानें बांधलेले नसतात....त्यांच्या प्रजेची जमीन व देह दोन्ही त्यांच्याच मालकीचीं असतात ". " कांगोमध्यें माल आणि जमीन ह्या दोहोंचाही माल-क राजाच असतो, व तीं त्यास खुशी वाटेल त्यास देतां येतात ". ह्याचीं आणखी उदाहरणें ४६ व्या कलमांत दिलेलींच आहेत. दुसऱ्या प्रकाराचींही उ-दाहरणें १५ व्या कलमांत दिलेलीं आहेत, पण आणखी

कांहीं एथें देऊं. " प्राचीन मेक्सिकोमध्यें मांटेझूमा बहुतेक गांवांमध्यें आणि विशेषतः जिंकलेल्या गांवामध्यें जमिनी आपल्या शूर शिपायांस देत असे. ऐसलंद बेटांत नॉर्समेन लोकांनीं स्वाऱ्या केल्या तेव्हां त्यांच्यांतील एकाद्या नायकानें एकादा प्रांत काबीज केला म्हणजे आपल्याबरोबर आलेल्या शिपायांस त्यांतला कांहीं भाग तो वांटून देत असे, तेथें एक देऊळ बांधी, आणि नॉर्वेप्रमाणें तेथला तो नाईक, धर्मोपाध्याय, व न्यायाधीश बने ".

पण राजकीय विभिन्नीकरणांचा विचार करतांना दाखविल्याप्रमाणें, सर्व नागरिकांची वसलेल्या प्रांतावरील संयुक्त मालकी बाहेरून स्वारी करणारेच नाहींशी करितात असें नाहीं, तर आंतून हल्ला करणारे देखील करितात, आणि समाजामध्यें युद्धशीलता वाढत जाईल तशी ह्या हल्ला करणारांची शक्ति प्रबल होत जाते. लढाईमुळें लोक जसे स्थानिक नायकाचे अंकित होत जातील, तशी त्यांची मालकीही अंकित इतकी होत जाते कीं, पूर्वींच्या जमिनी सर्व समाजाच्या पूर्णपणें असतील त्यांजवर त्याचा कांहीं हक्क उत्पन्न होतो; असें होतां होतां कालान्तरानें व्याप्त प्रदेशापैकीं बराच भाग त्याच्याच पूर्णमालकीचा बनून जातो, आणि लहानसाच भाग सगळ्यांचा मिळून राहतो.

आतां कधीं कधीं, पण फारच क्वचित् प्रसंगीं, जमीन खासगी व्यक्तीच्या हातांत सर्वांच्या संमतीनें जाते. उदाहरणार्थ, जेथें जमिनीची वांटणी कांहीं कांहीं काळानें पुनःपुनः होत असेल, तेथें एकादे वेळीं तशी

वांटणी न झाल्यास जमिनीची मालकी व्यक्तींच्या हातीं जाते. ही नवी वांटणी न होण्याचें कारण असें होतें कीं कांहीं लोक आपल्या वांटणीस आलेल्या जमिनीची हेळसांड करितात, आणि त्यामुळें इतर लोक आपल्या वांटणीची जमीन देऊन ती घेण्यास नाखुश असतात, आणि मग जमिनी असतील तशाच त्या त्या व्यक्तीकडे राहतात, आणि खासगी मालकीची उत्पत्ति होते.

१०७. स्थावर व जंगम दोन्ही प्रकारची मालमत्ता व्यक्तींची बनविण्यास आतांपर्यंत न सांगितलेलें असें आणखी एक महत्त्वाचें कारण झालेलें आहे; तें कारण संचय व किंमत ह्यांच्या मापांची स्थापना हें होय. मापें व वजनें प्रचारांत येण्यापूर्वीं निरनिराळ्या लोकांचीं जीं एकमेकांपासून देणीं घेणीं तीं सारखीं करावयाचीं म्हणजे अगदींच ठोकळ किंवा ओबडधोबड रीतीनें केलीं जाणार. प्रारंभीं एकाद्याची जी मालकी उत्पन्न होते ती त्यानें आपल्या श्रमांनीं केलेल्या किंवा मिळविलेल्या वस्तूंवरच उत्पन्न होते; आणि म्हणून ती फारच थोडच्या पदार्थांवर उत्पन्न होते. पण जेव्हां विनिमयाची प्रथम अदलाबदलीच्या अनिश्चित स्वरूपानें, आणि मागून एकाद्या ठराविक किंमतीच्या मापाच्या (नाण्याच्या वगैरे) द्वारा क्रयविक्रयरूपी निश्चित स्वरूपानें, उत्पत्ति होते व प्रसृति होते, तेव्हां ही मालकी पुष्कळ पदार्थांवर उत्पन्न होऊं शकते. उद्योगशीलतेच्या वृद्धीवर ही मालकीची वाढ कशी उघडपणें अवलंबून असते हें आतां लक्षांत आणा.

धनगरी स्थितीमध्यें कुटुंबाचा प्रत्येक घटक किंवा

प्रत्येक आश्रित यास त्याच्या श्रमानुसार उत्पन्नाचा किंवा अन्य मालमत्तेचा वांटा लावून देणें शक्य म्हणून अशा स्थितींत एकाद्यानें स्वतंत्र श्रम करून कांहीं पैदा केल्यास तेवढीच त्याची खासगी मालमत्ता होऊं शकते. पण त्याचे बहुतेक श्रम इतरांबरोबर होत असल्यामुळें त्याचें जें उत्पन्न तें सगळ्यांचें मिळूनच असतें. पण कुटुंबाच्या आश्रयाची जरूरी व्यक्तींस जसजशी कमी भासूं लागेल, व्यापारविषयक दळणवळणाच्या वाढीबरोबर, कुटुंबसमूह सोडून जाणारास जशीं निर्वाहाचीं साधनें खुलीं होऊं लागतील, आणि पैसा व मापें ह्यांचा उपयोग सुरू झाल्यामुळें विनिमयास जसजसा ज्यास्त निश्चितपणा येत जाईल, तशा खासगी मालमत्ता जमविण्याच्या संधी व्यक्तींस ज्यास्त ज्यास्त येऊं लागतात; आणि कुटुंबसमूहामध्यें जे ज्यास्त चपळ किंवा हुशार असतील त्यांस मालमत्तेचीही सारखी वांटणी न आवडून ते ह्या संधीचा उपयोग करून घेऊं लागतात.

जन्मतःसिद्ध स्थितीची सरणी जाऊन कराराच्या स्थितीच्या सरणीच्या वाढीबरोबर ही जी खासगी मालकीची वाढ होत जाते, ती सहजच जंगम मालमत्तेकडून स्थावर मिळकतीकडे जाऊं लागते. कारण व्यापारविषयक व्यवहारांची वृद्धि होऊन कुटुंबसमूहाच्या प्रत्येक घटकव्यक्तीस जेव्हां खासगी मिळकत जमवीत जाणें शक्य होतें, आणि स्वतः निराळें कुटुंब करून राहण्याची इच्छा बळावत जाऊन जेव्हां बरेच लोक संयुक्त मालकीची जमीन विकूं लागतात, तेव्हां त्या जमिनीचे निरनिराळे भाग कुटुंबांतील व्यक्तींनीं विकत घेतले काय

किंवा तिऱ्हाइतांनीं विकत घेतले काय, ते खासगी मालकीचे बनतात, आणि जमिनीच्या खासगी मालकीस इतर जिनसांच्या खासगी मालकीसारखेंच स्वरूप येऊं लागतें.

उद्योगशीलता वाढत जाईल तशी ही गोष्ट बनण्यास आणखीही कारणें होत असतात. कारण युद्धशीलता जशी कमी होईल तशीं लष्करी पद्धतीवर जमीन धारण करण्याचीं जीं बंधनें तीं कमीं होऊं लागतात, आणि शेतगुलामगिरीची पद्धति नष्ट होत जाईल तसे जमिनीच्या खासगी मालमत्तेस कमीपणा आणणारे जे इतर हक्क तेही नाहींसे होऊं लागतात. ह्या रीतीनें जमिनींची मालकी व्यक्तींकडे जाण्यास मदत होते.

प्रथमदर्शनीं असें अनुमान करणें सयुक्तिक दिसतें कीं, जमिनीची खासगी मालकी ही जी उद्यमशीलतेमुळें प्राप्त झालेली स्थिति तीच शेवटची होय. पण हीच स्थिति शेवटची आहे किंवा नाहीं ह्याबद्दल संशय वाटतो. करारानें स्थापन केलेली मालकी आणि जबरीनें स्थापिलेली मालकी ह्या दोन्ही एकाच प्रकारच्या नाहींत; आणि दोन्ही प्रकार सारखेच समजून जमिनीचे जे विगुणित क्रयविक्रय झालेले आहेत त्यांनीं जरी त्यांस मुकाटच्यानें एकस्वरूप केलेलें आहे, तरी अखेरीस हें एकस्वरूप नाकबूल केलें जाण्याचा संभव आहे. माणसावरील मालकीच्या हक्काची काय स्थिति झालेली आहे हें पाहतां आह्मी म्हणतों ही गोष्ट शक्य आहे हें ध्यानांत येतें. कारण लढाईंत केलेले कैदी जबरीनें पकडलेले असून प्रथम ते मालमत्ता म्हणून अनिश्चित रीतीनें ठेवले जात असत; आणि मागून जेव्हां त्यांचा गुलाम म्हणून क्र-

यविक्रय सुरू झाला, तेव्हां त्यांस मालमत्तेचें स्वरूप उघड उघड आलें. म्हणून एका माणसानें दुसऱ्यावर मालकी चालविणें ही गोष्ट कायमचीच स्थापिली जाणार असें जर त्यावेळीं कोणीं अनुमान केलें असतें तर तें चुकीचें झालें असतें. कारण नंतरच्या सुधारणेच्या पायरीवर गुलामगिरी नष्ट झालेली आहे. त्याचप्रमाणें ह्याच्यानंतरच्या एकाद्या पायरीवर जमिनींची खाजगी मालकी कदाचित् नष्ट होईल. युद्धशीलता प्रबल होण्यापूर्वींची व्यक्तीची स्वतंत्रता, ती क्षीण झाल्यावर जशी पुनः स्थापन झाली, तद्वतच जमिनीवरील सर्व समाजाची मालकी, उद्योगशीलता जशी ज्यास्त ज्यास्त वाढत जाईल, तशी कदाचित् पुनः स्थापन होईल. जंगम वस्तूंची मालकी हल्लीं जशी केवळ क्रयविक्रयरूपी करारानेंच किंवा आपखुशीच्या देणगीनेंच उत्पन्न होते म्हणून समजतात, तशी जमिनीच्या उत्पन्नावरील मालकी, समाज जमीनदार असून व्यक्ती ह्या केवळ धारण करणाऱ्या असें समजलें जाऊन, त्यांच्यामधील करारानेंच ती व्यक्तींच्या ठिकाणीं राहूं लागेल. हल्लीं देखील जमिनीवरील खासगी मालकी खुद्द इंग्लंदांत देखील अगदीं पूर्ण नसते. कायद्याच्या दृष्टीनें जमीनदार हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या गादीचीं कुळें आहेत; आणि गादी म्हणजे वस्तुतः राष्ट्र किंवा समाज. शिवाय नुकसान भरून देऊन सरकार कोणाचीही जमीन पुनः आपल्याकडे घेतें हेंही प्रसिद्धच आहे. म्हणून अशा रीतीनें जमिनीवर समाजानें मुकाटयानें सांगितलेला जो हक्क तो तो कदाचित् कालान्तरानें उघड उघड रीतीनें सांगू

लागेल, आणि जमिनींत सुधारणा केल्यामुळें तिची वाढलेली जी किंमत ती व्यक्तीस देऊन ती तो आपल्याकडे परत घेऊं लागेल.

१०८. एवंच ज्या व्यवस्थांच्या योगानें खासगी मालकीची उत्पत्ति व वाढ ह्यांची स्थापना व नियमन हीं होतात, त्यांचें चित्र आपणास बऱ्याच स्पष्ट रीतीनें रेखाटतां येतें.

आपलेंसें करणें आणि जें आपलेंसें करून घेतलें असेल तें आपल्याच ताब्यांत राखणें ही इच्छा केवळ मनुष्यस्वभावामध्येंच खोल गेलेली दिसते असें नाहीं, तर इतर प्राण्यांच्या स्वभावांत देखील दिसते; आणि जगांत टिकाव लागण्यास ती आवश्यकच आहे. जें दुसऱ्याच्या ताब्यांत असेल तें घेण्याचा यत्न केल्यास भांडण होईल आणि कदाचित् दुखापतही होईल हें सर्वांस माहीत असल्यामुळें प्रत्येकानें जें श्रमानें मिळविलें असेल तें त्याच्याकडेच राहूं देण्याची चाल उत्पन्न होते; आणि रानटी लोकांमध्यें ह्या चालीस स्पष्टपणें कबूल केलेल्या हक्काचें स्वरूप येतें.

खासगी मालकीचा हा हक्क माणसानें स्वताच्या श्रमानें केलेल्या वस्तूंच्या संबधानें पूर्णपणें, आणि त्याच्या टोळींतील माणसें ज्या प्रदेशावर भटकतात त्यामध्यें मारलेल्या पारधीच्या संबंधानें पूर्णपणें किंवा अंशतः, जरी ओळखला जातो, तरी त्या प्रदेशाच्या किंवा त्यांतील भागांच्या संबंधानें ओळखला जात नाहीं. व्यक्तीचे हक्क जितके कांहीं तरी निश्चितपणानें एकमेकांपासून भिन्न म्हणून करतां येण्यासारखे असतील तितक्यापुरती

प्रथम खासगी मालकी उत्पन्न होते; पण जमिनीच्या-संबंधानें व्यक्तीची मालकी तेव्हां उत्पन्न होत नाहीं; कारण तेव्हांच्या स्थितींत जमिनीवर व्यक्तींचे हक्क दाखवितां येत नाहींत; किंवा दाखवतां आले तर स्पष्टरीत्या एकमेकांपासून भिन्न करतां येत नाहींत.

पण भटकण्याची स्थिति जाऊन जशी स्थाईक स्थिति येत जाईल, तशी समाजाची जी जमिनीवरील मालकी ती, व्यक्तींची जमिनीवर मालकी उत्पन्न होऊन, वैगुण्य पावूं लागते; पण इतक्यापुरतीच कीं जे तिचे तुकडे साफ करून लावतील त्यांना त्यांतील उत्पन्न, कोणी उपद्रव न करतां, घेतां येतें. तथापि त्या जमिनीवरील जो सार्वजनिक हक्क तो कायमच राहतो; आणि जेव्हां थोडींशीं पिकें काढून घेतल्यावर तो साफ केलेला भाग साफ करणारा सोडून जातो, किंवा त्याच्या वंशजाकडे तो गेल्यावर ते जेव्हां त्याचा उपयोग करीत नाहींसे होतात, तेव्हां तो तुकडा पुनः समाजाकडे येतो. आणि तत्पुरत्या मालकीची जी ही पद्धति ती भटकणाऱ्या पूर्वजांपासून वंशपरंपरेनें आलेल्या मनोभावांशीं व रूढींशीं जशी सुसंगत आहे तशी शेतकीच्या अर्धवट स्थितीस सोईची आहे; कारण अशा स्थितींत थोडक्या वर्षांत जमीन निःसत्त्व होत असते.

ज्या ठिकाणीं पितृशासित घटना धनगरी स्थितींतून स्थाईक स्थितीमध्यें गेलेली असेल, आणि दंतकथेनें तीस पवित्रता आलेली असेल, आणि एकमेकांच्या संरक्षणासाठीं कायम राखिलेली असेल, त्या ठिकाणीं कांहीं अंशीं ज्ञातीची आणि कांहीं अंशीं कुटुंबाची

जमिनीवरील मालकी पुष्कळकाळपर्यंत कायम राहते; पण त्याबरोबरच पृथक् पृथक् श्रम करून उत्पन्न केलेल्या वस्तूंची मालकी पृथक् पृथकच राहते. आणि एकीकडे कांहीं ठिकाणीं ज्ञातीची किंवा कुटुंबाची जमिनीवरील मालकी कायम राहिली असतां, दुसरीकडे, इतर ठिकाणीं, तीस वैगुण्य येऊन खासगी मालकीचे कांहीं प्रकार उत्पन्न होतात, पण ते तत्पुरते असतात, आणि समाजाची मालकी सर्वांत श्रेष्ठ असते.

पण लढाईच्या योगानें प्रत्येक समाजांत वर्गभेद उत्पन्न होऊन, आणि एक समाज दुसऱ्या समाजाकडून जिंकला जाऊन, जमिनीवरील जी समाजाची मालकी ती डळमळीत किंवा नष्ट होते; आणि तिच्या ऐवजीं सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं पूर्ण विजेत्याची पूर्ण मालकी उत्पन्न होते, किंवा कांहीं अटींवर ती जमीन धारण करणाऱ्या कुळांच्या हक्कांनीं मिश्रित अशी उत्पन्न होते; आणि ह्या कुळांची मालकीही जमिनीस चिकटून राहिलेल्या आश्रितांच्या हक्कांनीं मिश्रित झालेली असते. म्हणजे काय, तर, युद्धशीलतेमुळें जी दुसऱ्यानें लादलेली स्थिति उत्पन्न होते, तिच्या योगानें माणसांच्या मालकीप्रमाणें जमिनीच्या मालकीचेही निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात.

पूर्णपणें व्यक्तींची मालकी बनणें ही गोष्ट उद्योगशीलतेच्या वृद्धीबरोबर उत्पन्न होत जाते. ज्या वस्तू एकाद्यानें स्वतःच्या श्रमांनीं उत्पन्न केलेल्या म्हणून ओळखल्या जात असतात त्या त्याच्याच होत ही समजूत पहिल्यापासूनच असते, आणि समाजाची व कुटुंबा-

ची संयुक्त मालकी इतर वस्तूंच्या संबंधानें असली तरी असल्या ह्या वस्तूंच्या संबंधानें व्यक्तींचीच मालकी असते. अशा रीतीची जंगम वस्तूंवरील ही मालकी, उद्योगशीलतेनें युद्धशीलता दबली जाईल तशी वाढत जाते; कारण अशावेळीं श्रमांनीं उत्पन्न केलेल्या जिनसांचा विनियम करणें सुलभ होत असतें; शिवाय, त्यावेळीं संचय व किंमत ह्यांचीं मापनसाधनें उत्पन्न होऊन विनिमय सुलभ होत असतो, आणि शिवाय यावेळीं पूर्वींपेक्षां ज्यास्त शांतता उत्पन्न झालेली असल्यामुळें माणसें स्वसंरक्षणासाठीं ज्या समूहांत रहात असतील त्यांपासून पृथक् होण्यापासून त्यांस आतां धोका नसतो. करार करून त्याप्रमाणें व्यापारविषयक व्यवहार ज्यास्त ज्यास्त होऊं लागल्यामुळें व्यक्तींच्या वस्तुविषयक मालकीस अधिक विस्तृत व अधिक निश्चित स्वरूप येऊन शेवटीं जमिनीच्या मालकीवरही व्यक्तींचा पगडा बसूं लागतो. जमीनही मोजून आणि पैसे घेऊन विकली व विकत घेतली जाऊं लागल्यामुळें ती ह्या बाबतींत श्रमांनीं उत्पन्न केलेल्या खासगी मालकीच्या जंगम वस्तूंसारखी होऊं लागते; आणि त्यामुळें लोकांस ती त्या वस्तूंसारखीच भासूं लागते. तथापि असें मानण्यास जागा आहे कीं श्रमांनीं उत्पन्न केलेल्या वस्तूंची खासगी मालकी ह्यापुढें हल्लींपेक्षांही जरी ज्यास्त निश्चित व पवित्र अशी होऊन जाईल, तरी जमीन श्रमांनीं उत्पन्न करणें शक्य नसल्यामुळें ती कोणीं खासगी मालकीची करूं नये असा तिजबद्दल शेवटीं समज उत्पन्न होईल. जसा माणूस मूळचा स्वताचा मालक असूनही युद्धशीलतेच्या अ-

मदानींत ती मालकी सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं गमा-वितो, आणि उद्योगशीलतेचें राज्य उत्पन्न होईल तशी पुनः संपादन करितो, त्याप्रमाणें जमिनीची जी सामा-जिक मालकी ती युद्धशील नमुन्याचें उत्क्रमण चालूलें असतां जरी सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं प्रबल माणसां-च्या मालकीमध्यें बुजून गेलेली आहे, तरी उद्योगशील नमुना जसा पूर्णपणें उत्क्रान्त होत जाईल तशी कदा-चित् ती पुनः आपलें डोकें वर काढील.

प्रकरण सोळावें

जमाबंदी

१०९. माणूस श्रमांनीं ज्या वस्तू उत्पन्न करितात त्यांतील कांहीं भाग त्यांच्याकडे खासगी उपयोगासाठीं रहात असतो, आणि कांहीं सार्वजनिक कामासाठीं त्यांस द्यावा लागतो, असा जर त्यांनीं उत्पादित वस्तूंचा आपण ठोकळ विभाग केला, आणि सार्वजनिक संघटना जशी वाढत जाईल तसा ह्यांपैकीं दुसरा भाग वाढत जातो हें उघड सत्य जर ध्यानांत आणिलें, तर समाजाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर सरकारी जमाबंदीसारखें कांहींच कसें नसतें ही गोष्ट आपल्या ध्यानांत येणार आहे.

समाजाचा राजकीय मुख्य प्रारंभीं त्याच्या आंगच्या कांहीं श्रेष्ठत्वामुळें इतरांपासून भिन्न म्हणून ओळखला जात असल्यामुळें, त्याचें सामर्थ्य त्या काळीं बहुधा युद्धाच्या वेळींच ओळखीत असतात, आणि म्हणून तें इतकें अल्प असतें कीं त्यास त्यापासून द्रव्यदृष्ट्या कांहींच फायदा होत नसतो. रानटी टोळ्यांमध्यें तो बहुधा आपली खाण्यापिण्याची वगैरे तरतूद आपणच करीत असतो. कधीं कधीं, तर, त्याच्या मोठेपणामुळें त्याचा फायदा न होतां तोटाच होत असतो. डाकोटा लोकांत "दिवाणी मुख्य व लष्करी मुख्य हे इतरांहून गरीब असतात, हाच त्यांच्यांत व इतर लोकांत भेद असतो. त्यांचा पोषाक बहुतकरून इतरांपेक्षां ज्यास्त कंगाल असतो", आणि असें कां असतें हें आबिपोन लोकांबद्दलच्या

पुढील वर्णनावरून स्पष्ट होतें:—"गांवचा नाईक व इतर लोक ह्यांच्यांत फरक एवढाच असतो कीं त्याचे कपडे जुने आणि मळके असतात; कारण तो जर नवे कपडे घालून रस्त्यांतून जाईल, तर जो माणूस त्यास प्रथम भेटेल तो ते त्याच्यापाशीं मागेल; आणि त्यानें नाहीं म्हटल्यास सर्व लोक त्याची चिकू म्हणून निंदा करूं लागतील". पाटागोनियन लोकांत गरीबांस मदत करण्याचें हें ओझें नायकावर इतकें पडतें कीं, तो आपल्या जाग्याचा राजीनामा देण्यास तयार होतो; आणि पुष्कळ पिढीजादे नाईक आपली जागा पत्करण्यास कबूल होत नाहींत; कारण तिजपासून त्यांचा फायदा इतका अल्प असून तोटा इतका फार होतो.

तथापि जेथें लढाईमुळें मुख्य योद्ध्याचें महत्त्व वाढतें तेथें त्यास बहुधा अनेक तऱ्हांनीं संपत्ति मिळूं लागते; ह्याचें एक कारण तो इतरांपेक्षां बहुधा ज्यास्त हुशार व ज्यास्त मेहनती असतो. पुढें जेव्हां टोळीस स्थाईकपणा उत्पन्न होतो, आणि टोळीच्या जमिनी तिच्यांतील ज्यास्त प्रबल लोक आपल्याशा करूं लागतात, तेव्हां मुख्य शास्त्याच्या वांटणीस बहुधा पुष्कळ जमिनी येतात. उदाहरणार्थ, प्राचीन ईजिप्तमध्यें राजाच्या जमिनी असत. मूळच्या ग्रीक लोकांतही असेंच असे. अर्वाचीन राजांमध्येंही असेंच दिसतें. अशा रीतीनें जो वसूल त्यास येतो तोच राजाचा अगदीं मूळचा वसूल होय.

पुढें लढायांमध्यें यश येऊन जशी ज्यास्त ज्यास्त लूट मिळूं लागते तसा तिचा ज्यास्त ज्यास्त भाग मुख्याच्या वांटणीस येऊं लागून त्याची संपत्ति ज्यास्त

वाढूं लागते. प्रारंभीं अशी चाल असते कीं ज्याला जें लढाईत मिळेल तें त्याचें त्यानेंच ठेवावें; आणि तें पुष्कळांस मिळून मिळालें असल्यास त्यांनीं तें सारखें वांटून घ्यावें. पण नायकास सहजच ज्यास्त वांटा मिळत असतो; ह्याचें कारण तो ज्यास्त मिळवितो, किंवा त्यास इतर लढवय्ये खुशीनें ज्यास्त देतात, किंवा तो जबरीनें घेतो. आणि त्याची सत्ता जशी वाढत जाईल तसे ह्या जबरीस इतर लढवय्ये कधीं मुकाट्यानें कबूल होतात, आणि कधीं नाहीं होय म्हणून होतात. समाजोत्क्रमणाच्या पुढच्या पायऱ्यांवर लुटीचा राजास मिळण्याचा जो हा भाग तोच राजाच्या उत्पन्नाचा एक उगम असतो. आणि जेव्हां तो अगदीं स्वतंत्र बनतो तेव्हां लुटींपैकीं तो इतरांस आपखुशीनें जो भाग देईल तो वजा करून बाकीचा त्याच्याचकडे जातो, व तेणेंकरून तो आपलें श्रेष्ठत्व कायम राखितो आणि आपल्या आश्रितांस पोषितो.

उत्पन्नाच्या ह्या अनित्य बाबींखेरीज त्याला कांहीं नित्य बाबी प्राप्त होऊं लागतात. त्याला लोक भिऊं लागतील इतकें त्याचें प्राबल्य वाढलें म्हणजे लोक त्यास प्रथम कधीं कधीं आणि नंतर ठराविक मुदतीनंतर नजराणे आणून देऊं लागतात. होमरनें वर्णिलेल्या ग्रीकलोकांमधील राजाचें **ग्रोट** असें वर्णन करितो कीं, त्याची मर्जी प्रसन्न करण्याकरितां, त्यानें शत्रुत्व करूं नये म्हणून, किंवा त्यानें लुटूं नये म्हणून, लोक त्यास नजराणे आणून देत. तद्वतच मूळच्या जर्मन लोकांबद्दल **टासीटस** असें सांगतो कीं, त्यांची चाल आपल्या

नायकांना गुरें किंवा धान्य यांचे नजराणे आपण होऊन पाठविण्याची असे, आणि तेणेंकरून त्यांचा (नायकांचा) मानमरातब राहून निर्वाहही होत असे. अशा रीतीच्या ह्या खुशीच्या देणग्या बऱ्याच काळपर्यंत चालत असतात. उदाहरणार्थ, इंग्लंदांत वर्षप्रतिपदेस असे नजराणे इलिझाबेथ व पहिला जेम्स ह्यांच्या कारकीर्दीपर्यंत चालू होते.

द्रव्य आणि मालमत्ता ह्यांच्या नजराण्यांबरोबर मेहनतीचेही नजराणे होत असतात. रानटी समाजांत पुष्कळ वेळां बरेच लोक आपल्यापैकीं एकाकरितां एकादें घर बांधण्यांत, किंवा एकादी जमीन साफ करण्यांत, एकत्र जमत असतात, आणि ही गोष्ट परस्पर असते. आतां राजकीय मुख्याचें प्राबल्य वाढूं लागलें म्हणजे असली मदत त्यालाच विशेष होऊं लागते हें उघडच आहे, आणि अशाच रीतीनें ही चाल पडते. उदाहरणार्थ, ग्वाराणी लोकांच्या गांवनायकाबद्दल आपण असें वाचितों कीं, " त्याच्या गांवांतील लोक त्याच्याकारितां त्याचें शेत लावीत, आणि पारधीचा त्यास विशेष वांटा देत; एरवीं त्याच्यांत व इतर लोकांत कांहीं भेद नसे". प्राचीन रोममध्येंही राजाला असेच विशेष हक्क असत.

११०. अनियमित आणि अनिश्चित ह्यांजपासून नियमित व निश्चित ह्यांची जी वाढ पूर्व प्रकरणांतून अनेक रीतींनीं उदाहृत झालेली आहे, ती एथें पुनः एकदां फार स्पष्ट रीतीनें उदाहृत होते. कारण, अगोदर सांगितल्याप्रमाणें, अमुक वेळां अमुक रकमेनें द्यावयाच्या करांची

जी उत्पत्ति अखेरीस होते ती ह्या स्वैच्छिक व प्रसंगोपात्त अशा नजराण्यांपासूनच होते.

लग्नाच्या वेळच्या अहेर करण्याच्या चालीस कांहीं अंशीं जबरीचें स्वरूप कसें आलें आहे हें ध्यानांत आणिल्यास, अशा प्रकारचे नजराणे करण्यास एकदां सुरवात झाली म्हणजे तो प्रघातच पडण्याचा संभव कसा उत्पन्न होतो, हें लक्षांत येईल. एकानें असें केलें व त्यापासून त्यास फायदा झाला म्हणजे सहजच दुसरा तसें करितो. असें पुष्कळ लोक करूं लागले म्हणजे जे थोडे न करितील त्यांचें नुकसान होऊं लागतें; आणि म्हणून मग सगळेच करूं लागतात. मग ह्या नजराण्यांस हळू हळू कांहीं ठराविक काळानें पाठविण्याच्या भेटींचें स्वरूप येतें; आणि नंतर मग असली भेट नियमितवेळीं न पाठविल्यास तिजबद्दल मागणी येऊं लागते. उदाहरणार्थ, लोआंगोमध्यें राजास सर्वांनींच नजराणे पाठविण्याची चाल असून, एकाद्यानें पुरेसा पाठविला नाहीं असें त्यास वाटल्यास तो त्याजकडे आपले गुलाम पाठवितो. टोंगन लोकांत राजाकडे किंवा नायकाकडे कधीं कधीं सुके मासे, जिवंत पक्षी, चटया वगैरे भेट म्हणून पाठविण्याची चाल आहे, आणि ही भेट जो तो आपल्या ऐपतीप्रमाणें पाठविण्याबद्दल खबरदारी घेत असतो, कारण कोणी कमी पाठवील तर राजा त्याजपासून सगळेंच घेईल अशी त्यास भीति असते. काश्मीरमध्यें अशी चाल आहे कीं, वसंतोत्सवाचे वेळीं राजाच्या नोकरांनीं त्यास नजराणा पाठवावा. हा नजराणा हल्लीं इतका ठरून गेला आहे कीं, प्रत्येकास आपल्या पगाराचा दहावा किंवा

बारावा हिस्सा द्यावा लागतो. प्रत्येक नोकराचें नांव वाचून त्यानें अमुक नजराणा द्यावा म्हणून त्याच्या नांवापुढें लिहून ठेवितात; आणि जे नजराणा आणणार नाहींत त्यांच्या पगारांतून तो कापून घेतात. अशा स्वैच्छिक भेटीस जबरीच्या नजराण्याचें स्वरूप येण्याचीं) उदाहरणें रोमच्या इतिहासांत व खुद्द इंग्लंदच्या इतिहासांतही सांपडतातच.

अंगमेहनतीच्या संबंधानेंही असेंच होतें; म्हणजे, प्रथम ती स्वैच्छिक असून मागाहून जबरीची बनते. हें कसें होत जातें हें पुढील उताऱ्यांवरून लक्षांत येईल. "काफिर नाईक आपल्या बागा लावण्यास, शेत कापण्यास, आणि कुंपणें घालण्यास आपल्या लोकांस बोलावितो; परंतु इतर गोष्टींप्रमाणें हीही गोष्ट त्यास लोकांच्या कलानें घ्यावी लागते; आणि म्हणून लोकांपासून अशा रीतीची मेहनत तो फारच बेतानें घेतो ". "सांडविच बेटामध्यें नायकास घर बांधावयाचें असलें म्हणजे तो आपल्या सर्व कुळांस बलावितो; आणि प्रत्येक टोळीस तिच्या संख्येप्रमाणें त्यांतील कामाचा भाग लावून देतो ". "प्राचीन मेक्सिकोमध्यें नायकांना रोज पाणी व सर्पण पुरविण्याचें काम गांवच्या लोकांमध्यें 'अमक्या दिवशीं अमक्यांनीं' अशा रीतीनें वांटलेलें असे ". "यूकाटनमध्यें तसेंच असे. सर्व लोक मिळून नायकाच्या शेतांची पेरणी करीत, बीं उगवेपर्यंत त्यांजवर नजर ठेवीत, आणि अखेरीस कापणी करीत ". ग्वाटीमाला व सान्‌साल्व्हेडॉरमध्यें असेंच असे. आणि मादागास्करमध्यें सर्व लोकांना मजुरीविना सरकारी काम पाहिजे तितके दिवस करावें लागतें.

हीं उदाहरणें निरनिराळ्या प्रकारच्या व सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असलेल्या लोकांचीं घेतलेलीं असल्यामुळें, लष्करी जमीनदारीच्या अमदानींत सर्व युरोपभर जबरीच्या वेठीची जी चाल होती ती सहजगत्या कशी उत्पन्न झाली असेल, आणि फ्रान्सांतील शेतकऱ्यास अठराव्या शतकांतील राज्यक्रान्तीच्या अगोदर वर्षांतून कांहीं दिवस सरकारासाठीं फुकट कसें खपावें लागे, ह्या गोष्टींचा त्यांवरून उलगडा होतो.

अशा रीतीनें स्वेच्छेनें दिलेल्या देणग्यांस अपेक्षित देणग्यांचें आणि शेवटीं मागण्यांचें स्वरूप आलें, आणि स्वेच्छेनें केलेल्या मदतीस जबरीनें घेतलेल्या मदतीचें किंवा वेठीचें स्वरूप आलें, म्हणजे पुढची एक पायरी उत्पन्न होण्यास मार्ग खुला होतो. कारण स्वैच्छिकांस जेव्हां जबरीच्याचें स्वरूप येतें तेव्हां त्याबरोबरच, किती जिन्नस द्यावयाचा किंवा किती मदत करावयाची हें ठरून जाऊं लागतें, आणि मग त्याबद्दल पैसे देण्याची चाल उत्पन्न होऊं लागते. जोंपावेतों नाणें उत्पन्न झालें नसेल तोंपावेतों स्थानिक किंवा सामान्य शास्त्यास वसूल जिन्नसाच्या रूपानें देत असतात. उदाहरणार्थ, फीजीबेटांत नायकाच्या घरीं त्याचे अनुयायी रोज शिधासामग्रीचा पुरवठा करीत असतात; आणि नाईक मुख्य राजास कापड, धान्य, जनावरें, इत्यादि रूपानें खंडणी देतात. ताहितीमध्यें तर लोक राजाकडे शिजविलेलें अन्नच पोहोंचवीत. युरोपांतील देशांतही नाण्याचा प्रघात पडल्यानंतर देखील बराच काळपावेतों राजास देणग्या द्यावयाच्या त्या कांहीं अंशीं जिन्नस,

जनावरें, वस्त्रें आणि अलंकार ह्या रूपानें देत. परंतु देणग्यांच्या किंमती एकदां ठरून गेल्या म्हणजे त्यांच्याबद्दल पैसे देणें हें देणारास व घेणारास दोघांनाही सुलभ वाटूं लागतें आणि असल्याच कारणावरून, एका मागच्या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें, लष्करी नोकरी व इतर प्रकारची नोकरी ह्यांच्या ऐवजीं ही पैसे देण्याची चाल उत्पन्न होते. एवंच जें जें कांहीं राजास देत असतात तें कोणत्याही प्रकारचें असो; तें प्रथम स्वैच्छिक असून, त्यास अखेरीस, जरूर पडल्यास जबरीनें घेतली जाण्याच्या रकमेचें, म्हणजे कराचें, स्वरूप येतें.

१११. ह्याबरोबर राजकीय मुख्याची सत्ता वाढत जाऊन तो इतर पुष्कळ प्रकारच्या मागण्या वसूल करण्यास समर्थ होऊन जातो. ह्याचीं उदाहरणें यूरोपियन राष्ट्रांच्या इतिहासांतून पुष्कळ सांपडतात.

बाराव्या शतकांत नार्मंडीचे डयूकांच्या उत्पन्नाच्या नियमित बाबींखेरीज आणखी इतक्या बाबी असतः— सरदारलोक संततिविहीन मेल्यास त्यांच्या जमिनी त्यांच्याकडे येत; मयत सरदारांचे मुलगे वयांत येतील तोंपावेतों त्यांचे पालक म्हणून यांस कांहीं मिळे; मृतधर्माधिकारी, भारी व्याजानें पैसे देणारे, बहिष्कृत लोक, आत्मघातकी, आणि कांहीं प्रकारचे गुन्हेगार, ह्यांच्या इस्टेटी त्यांच्याकडे जात; आणि कोठें ठेव सांपडली तर तीही त्यांच्याकडे जाई. शिवाय, न्याय करतेवेळीं ते लांच खात; आणि ज्यास आपली मिळकत आपल्या ताब्यांत रहावी अशी इच्छा असेल, किंवा ज्यास कांहीं हक्क चालविण्याची इच्छा असेल, ते त्यांस त्याबद्दल दं-

ड देत. इंग्लंदांत, नॉर्मन राजांच्या कारकीर्दींत पुढील जादा उत्पन्नाच्या बाबी असत. मृताचे वारसदार त्याच्या मालमत्तेचा ताबा घेण्यापूर्वीं कांहीं रकम राजांस देत; लहान वारसदारांचे पालक नेमण्याचे वेळेस ते त्याजपासून पैसे घेत; पुरुष वारसांस आपल्यासाठीं बायको निवडण्याचा हक्क पैसे भरून मिळवावा लागे; शहरांस ते सनदा विकीत; व्यापार करण्याचे हक्क लोकांस विकत घ्यावे लागत; आणि शिवाय, राजानें नाण्यांत भेसळ घालूं नये म्हणून तीन वर्षांनीं प्रत्येक घरटीस त्यास एक शिलिंग द्यावा लागे. शिवाय, ते पैसे काढण्याची प्रत्येक संधि साधून घेत; उदाहरणार्थ एकाद्या कामगारास काढून टाकल्यास त्याचा पगार ते कापून घेत; आणि पहिल्या रिचर्ड राजानें " आपल्या बापाच्या नोकरांस आपले हुद्दे पुनः विकत घ्यावयास लाविलें होतें ".

राजास अधिकारनियंत्रण जितकें कमी असेल तितक्या ह्या अन्यायाच्या मागण्या ज्यास्ती असतात व ज्यास्त जड असतात असें ज्याअर्थीं वरील उदाहरणांवरून व्यक्त होतें, त्याअर्थीं जेथें सामाजिकघटना अत्यंत युद्धशील असेल तेथें ह्या मागण्या अत्यन्त दांडग्या असल्या पाहिजेत. ह्याबद्दलचा पुरावा दहाव्या कलमांत दिलेलाच आहे आणि पुढच्या प्रकरणांत आणखी दिला जाणार आहे.

११२. वरील कलमांतून सांगितलेल्या तऱ्हांनीं प्रत्यक्ष करांची उत्पत्ति होत असतां, त्याबरोबर ज्यांस आपण अप्रत्यक्ष कर म्हणून शेवटीं नांव देतों त्यांची उत्पत्ति होऊन ते प्रत्यक्ष करांपासून भिन्न होत असतात. ज्याचा बराचसा माल एके ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जात

असेल किंवा कोठें विकावयास ठेविलेला असेल, त्याजवर मागण्या केल्यानें ह्या करांस सुरवात होत असते; आणि त्या मालापैकीं कांहीं प्रथम बक्षीस दिला जात असून, मागाहून जकात म्हणून मागितला जाऊं लागतो.

रानटी लोकांमधून जे प्रवास करितात ते त्यांस प्रसन्न ठेवण्याकरितां त्यांस नजराणे देतात ही गोष्ट प्रसिद्ध आहे; आणि असें वरचेवर झालें म्हणजे ते लोक हे नजराणे हक्कानेंच मागूं लागतात. पोर्चुगीज व्यापाऱ्यांबद्दल लिव्हिंग्स्टन असें सांगतो कीं, " ते कांगालोकांना मोठाले नजराणे करितात; कारण त्यांनीं तसें न केल्यास त्यांचे गुलाम माल घेऊन रानांतून चालले असतां, ते व माल दोघेही चोरले जाण्याचा संभव असतो". शिवाय तो एका बालोंडा नायकाबद्दल असें सांगतो कीं, " हे नजराणे घेणें आपला हक्कच आहे असें तो समजत असे, आणि कोणाचा माल आला म्हणजे आपला वांटा घेण्यासाठी तो त्याच्या घरांत शिरे ". लढाई करून सर्वच माल घेण्याच्या ऐवजीं रानटी टोळ्यांचे नाईक करार करून थोडासा घेण्यास तयार होतात. उदाहरणार्थ, बेडुइन लोकांच्या टोळ्यांचे नाईक प्रवासी लोकांशीं असले करार बहुधा करितात. इकडील भिल्ल लोकांमध्येंही असेंच आहे. ते त्यांच्या डोंगरांतून जाणाऱ्या मालावर जकात घेतात, आणि जे देणार नाहींत त्यांजवर हल्ला करितात. जेथें व्यक्तींचें संरक्षण मुख्यत्वेंकरून कुटुंबाच्या किंवा टोळीच्या संघटनेवर अवलंबून असेल तेथें त्यांस घरापासून किंवा गांवापासून दूर गेल्यावर असलेच जबरीचे कर द्यावे लागतात. मग ते

कधीं स्थानिक शास्त्यास द्यावे लागतात आणि कधीं मुख्य शास्त्यास द्यावे लागतात. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकोमध्यें " बाजारांत जो जो माल येईल त्याचा कांहीं भाग राजास खंड म्हणून द्यावा लागे; आणि त्याबद्दल राजा व्यापाऱ्यांच्या मालाचें व जीविताचें रक्षण करी व त्यांचे तंटे तोडी ". प्राचीनकाळच्या यूरोपियन राष्ट्रांमध्येंही असलाच पुरावा सांपडतो. मूळच्या ग्रीक राजांच्या उत्पन्नाची एक बाब व्यापार करण्यास परवानगी मिळण्यासाठीं केलेला नजराणा ही असे; आणि हा नजराणा प्रारंभीं तरी बहुधा व्यापारी मालाचाच असला पाहिजे. पुढें मार्किटांवरील म्याजिस्ट्रेटांस असाच कांहीं नजराणा तेथें व्यापार करणारांस द्यावा लागे. पश्चिम यूरोपामध्यें देखील अप्रत्यक्ष करांची उत्पत्ति अशाच रीतीनें झाली. व्यापारी ज्या राजाच्या मुलखांत जाईल त्यास प्रसन्न ठेवण्यासाठीं आपला कांहीं माल नजराणा म्हणून देई, आणि त्यास प्रवास करण्यास मनाई नसे. इंग्लंदांत दारूनें भरून आलेल्या गलबतावर जो कांहीं बाटल्यांचा कर असे त्याचा उद्गम बहुधा अशाच रीतीनें झालेला असावा. इंग्रजीमध्यें बाहेर देशच्या मालावरील जकातीला जो " कस्टम्स " म्हणून शब्द आहे त्याचा सामान्य अर्थ " रूढी " हा असल्यामुळें हा कर पूर्वीं केव्हां तरी रूढीवरून स्थापन कसा झाला असावा हें त्यांवरून स्पष्ट होतें. एका काळीं हा कर देशांतल्या देशांत व्यापार करणारांपासून देखील घेत असत ह्यावरून वरील अनुमान खरें ठरतें. कारण १३०९ सालीं अशी तक्रार केलेली आढळते कीं,

" जत्रा व बाजार ह्यांचे ठिकाणीं राजाकरितां जिन्नस घेण्यास नेमिलेले कामदार ध्यावा त्याहून ज्यास्त माल घेतात, आणि तो आपल्या घशांत टाकितात ".

ह्या अप्रत्यक्ष करांच्या संबंधानें सामान्यतः आपणास असें म्हणतां येईल कीं, खुशीच्या देणग्यांस जबरीच्या मागण्यांचें स्वरूप देतां येईल इतकी शासनकर्त्याची सत्ता वाढली म्हणजे ते प्रथम उत्पन्न होत असून, इतर जबरीच्या मागण्यांत व त्यांच्यांत प्रथम एवढाच भेद असतो कीं, प्रजाजन जेव्हां राजाच्या कह्यांत विशेषच असतात तेव्हां ह्या मागण्या अमलांत आणिल्या जातात, म्हणजे, जेव्हां माल विकावयास बाजारांत आला असेल, आणि म्हणून त्यांतील कांहीं अंश सहज घेतां येईल अशा वेळीं. किंवा तो देशाच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत जात असेल, आणि म्हणून जेव्हां सहज अडवितां येईल अशा वेळीं; किंवा जेव्हां व्यापारी बाहेर देशाहून स्वदेशीं नियमित मार्गानेंच माल आणीत असेल अशा वेळीं, हा राजास मिळणारा अंश प्रथम मालाच्याच रूपानें घेतला जात असून, जेथें अंतर किंवा संचय ह्यांच्यामुळें तो माल राजास उपयोगांत आणतां येण्यासारखा नसेल तेथें त्याऐवजीं तो पैसे घेऊं लागतो; उदाहरणार्थ, प्राचीन इंग्लिश राजे खाणीच्या तोंडाशीं आणलेल्या कोळशाच्या प्रत्येक गाडीमागें एक पेनी घेत असत. आणि व्यापार वाढत जाऊन नाण्याचा संचय जसा वाढत जाईल, आणि ज्यास्त ज्यास्त माल उत्पन्न होत जाईल, तसतशी मालाऐवजीं पैसाच घेण्याची चाल ज्यास्त पडूं लागते, कारण इतका माल आपल्या राज-

धानींत आणणें आणि त्याचा उपयोग करणें हें राजास ज्यास्त ज्यास्त कठीण जाऊं लागतें.

११५. ह्या विषयाच्या संबंधानें एथें सविस्तर रीतीनें प्रतिपादन करण्यापासून कांहीं फायदा होईलसें वाटत नाहीं. आतांपर्यंत त्याच्या संबंधाच्या ज्या सामान्य गोष्टी सांगितल्या तेवढ्या ध्यानांत ठेविल्या म्हणजे पुरे.

जमाबंदीची वाढ राजकाय नायकीच्या वाढीबरोबर होत असून, तिच्यासारखीच हिचीही उत्पत्ति प्रारंभीं लढाईपासून होत असते. जित शत्रूंची मालमत्ता प्रथम जिन्नस, गुरें, व कैदी ह्या रूपानें, आणि नंतर जमिनीच्या रूपानें, मुख्य लढवय्याच्या हातीं येऊन त्याचें महत्त्व वाढतें. मग त्याची मर्जी संपादन करणें ही गोष्ट महत्त्वाची बनून लोक त्यास नजराणे व अंगमेहनत देऊं लागतात; आणि त्याची सत्ता जशी ज्यास्त वाढत जाईल तशा ह्या देणग्या ठराविक काळानें दिल्याच पाहिजेत असें होऊन जातें. ह्यामुळें त्याची स्वेच्छाचारी सत्ता व राज्य हीं दोन्ही ज्यास्तच वाढून त्याची मूळची प्रजा व मांडलिक ह्यांपासून असल्या मागण्या जबरीनें वसूल करण्याचें त्याचें सामर्थ्य ज्यास्तच होतें; इकडे, स्वताच्या राज्याचें रक्षण व इतरांच्या मुलखांवर हल्ले करण्यासाठीं पैसे पाहिजेत, ह्या मिषानें तो जुन्या मागण्या वाढवूं लागतो, आणि नव्या करूं लागतो. ह्या गरजा भागविण्यासाठीं म्हणून, लोकांनीं आपला माल विकावयास बाहेर काढिला म्हणजे त्याचा अंश राजा घेऊं लागतो. आणि मूळच्या मालमत्तारूपी व श्रमरूपी देणग्या प्रथम स्वैच्छिक व कमज्यास्त होणाऱ्या असून मागाहून जब-

रीच्या व नियमितकालिक बनून शेवटीं त्यांजबद्दल अप्रत्यक्ष कर घेऊं लागतात, तद्वतच, व्यापाऱ्याच्या मालाचे हे जे अंश प्रथम व्यापाराच्या परवानगीसाठीं दिलेले असून मागाहून हक्कानें घेतले जाऊं लागतात, त्यांस अखेरीस त्या मालाच्या किंमतीच्या मानानें शेंकडा अमूक अशा जकातीचें किंवा नाक्यावरील कराचें स्वरूप येतें.

पण पहिल्याप्रमाणेंच अखेरपावेतों, आणि स्वेच्छाचारी सरकाराप्रमाणेंच स्वतंत्र सरकाराच्या अमदानींत, नवे कर बसविण्यास किंवा जुने वाढविण्यास, लढाई हेंच बहुधा नेहमींचें कारण असतें; आणि गतकालीं युद्धाच्या समयीं पक्क केलेली जी जुलमी राज्यव्यवस्था तिच्याच जोरावर हे कर नेहमीं वसूल केले जातात.

प्रकरण सतरावें

समाजाचा युद्धशील नमुना

११६. युद्धशील जीवित आणि उद्यमशील जीवित ह्यांस अनुक्रमें योग्य असे राजकीय घटनेचे जे मुळांतून परस्परविसदृश दोन प्रकार त्यांच्याविषयींच्या कल्पना बनविण्याचा मार्ग आतांपर्यंतच्या विवेचनावरून तयार झालेला आहे. म्हणून आतांपर्यंत युद्धशील नमुन्याचे जे विशेष सहजगत्या सांगितले आहेत ते संगतवार लावणें, आणि त्यांवर अवलंबून असणारे अन्य विशेष सांगणें, हें मोठें बोधप्रद होणार आहे. करितां तें काम प्रस्तुत प्रकरणांत करूं, आणि पुढील प्रकरणांत उद्यमशील नमुन्याच्या विशेषांचा त्याच पद्धतीनें विचार करूं.

सामाजिक उत्क्रमणामध्यें ह्या दोहोंचें नेहमीं संमिश्रण झालेलें असतें. तरी त्यांची पूर्ण वाढ झाली म्हणजे जे परस्परविरुद्ध विशेष त्यांजमध्यें ठळक दिसून येतात त्यांचा पृथक् पृथक् मागमोस लावणें हें युक्तिदृष्ट्या व वस्तुस्थितिदृष्ट्या अगदीं शक्य आहे असें आपल्यास दिसून येईल. नेहमींच्या युद्धशीलतेबरोबर जी संघटना येत असते तिचें स्वरूप तर विचारदृष्ट्या अनुमित करण्यासारखें, आणि अनुभवदृष्ट्या पुष्कळ उदाहरणांनीं सिद्ध करण्यासारखें, विशेषतःच आहे. आतां शुद्ध उद्यमशीलतेबरोबर येणाऱ्या संघटनेचें स्वरूप हल्लीं फारसें अनुभूत नसल्यामुळें तें विरोधानें स्पष्ट होणार आहे आणि नंतर त्या स्थितीकडे होणाऱ्या प्रगतीचीं जीं कांहीं

उदाहरणें सध्यां दृष्टीस पडतात तीं लक्षांत येणार आहेत.

ह्या ठिकाणीं चूक होण्याचे दोन संभव आहेत ते टाळले पाहिजेत. एथें आपणास अनेक प्रमाणांनीं संयुक्त व पुनःसंयुक्त झालेल्या समाजांचा विचार कर्तव्य आहे; आणि ज्यांचें शिक्षण निरनिराळ्या पायऱ्यांवर गेलेलें असल्यामुळें ज्यांच्या रचना निरनिराळ्या अंशांनीं परिपक्व झाल्या आहेत अशा समाजांचा विचार कर्तव्य आहे. म्हणून निरनिराळ्या समाजांच्या एकमेकांशीं तुलना करतांना आकार आणि सुधारणा ह्या दोहोंच्या संबंधाचे भेद जर आपण लक्षांत घेतले नाहींत, तर आपली चूक होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, एकादें युद्धशील असें मोठें राष्ट्र असलें, आणि तितकीच युद्धशील अशी एकादी लहानशी रानटी टोळी असली, तर युद्धशील नमुन्याचे जे विशेष पहिल्याच्या ठिकाणीं दिसतील ते उघडच दुसऱ्याच्या ठिकाणीं दिसणार नाहींत. शिवाय, संस्थांना त्यांचीं पूर्ण स्वरूपें येण्यास पुष्कळ काळ लागत असल्यामुळें, सर्वच युद्धशील समाजांचे ठिकाणीं त्यांना योग्य अशी संघटना अगदीं पूर्ण स्वरूपानें दृष्टीस पडेल असें नाहीं; उलट ती अपूर्णस्वरूपानेंच दृग्गोचर होण्याचा संभव विशेष आहे.

अशा अडचणी असल्यामुळें उत्तम मार्ग म्हटला म्हणजे युद्धशीलतेपासून कोणते विशेष अवश्यमेव उत्पन्न होण्याचा संभव असतो ह्याचा विचार प्रथम करावयाचा, आणि नंतर गत आणि प्रस्तुतकालीं युद्धशील म्हणून प्रसिद्ध असलेल्या समाजांमध्यें त्यांपैकीं किती विशेष संयुक्तपणें दृष्टीस पडतात हें पहावयाचें. युद्धासाठीं उ-

त्तमरीत्या बनलेला समाज कसा असला पाहिजे ह्याची कल्पना केल्यानंतर, प्रत्यक्ष अस्तित्वांत असलेल्या समाजांमध्यें लढाईमुळें कोणते विशेष आलेले आहेत हें ध्यानांत आणण्याची आपली तयारी होणार आहे.

११७. आपलें संयुक्त जीवित कायम राखण्यासाठीं समाजास संयुक्तक्रिया करणें भाग पडत असतें; आणि त्याचें संयुक्तकार्य ज्या मानानें ज्यास्त पूर्ण असेल त्या मानानें त्याच्या संयुक्तजीविताचें संरक्षण ज्यास्त शक्य होत असतें. स्वसंरक्षण व परातिक्रम हीं करण्यासाठीं व्यक्तींच्या शक्ती संयुक्त कराव्या लागतात; आणि जेथें समाजांतील प्रत्येक व्यक्ति ह्या कामांस हातभार लावीत असेल तेथें यश मिळण्याचा संभव अत्यन्त मोठा असतो. दोन समाजांच्या लोकसंख्या, स्वभाव, आणि परिस्थिति ह्या सारख्या असून त्यांपैकीं एका समाजांत सर्व योग्य व्यक्तींच्या क्रिया संयुक्त होत असतील, व दुसऱ्यांत होत नसतील, तर सामान्यतः पहिला समाज दुसऱ्यावर विजयी होईल. म्हणजे, ज्या समाजांमध्यें युद्धविषयक सहकार्य सार्वत्रिक असेल ते समाज नेहमीं टिकाव धरून राहिले पाहिजेत.

हा सिद्धान्त बहुतेक स्वतः स्पष्ट आहे; तथापि तो एथें मुद्दाम ध्यानांत घेणें पुढच्या विवेचनाची पूर्व तयारी म्हणून अवश्य आहे. लढाईखेरीज ज्या क्रिया ते करीत असतात त्या त्यांस पृथक् पृथक् करतां येतील; पण ही क्रिया त्यांनीं संयुक्तरीत्याच केली पाहिजे.

११८. जे लढण्यास क्षम असतील त्यांच्या प्रत्यक्ष मदतीखेरीज, जे लढण्यास अक्षम असतील त्यांची अप्र-

त्यक्ष मदत ज्या मानानें ज्यास्त असेल त्या मानानें समाजाची स्वसंरक्षणशक्ति ज्यास्त असेल. कांहीं विवक्षित समाज इतर बाबतींत समान असल्यास त्यांपैकीं ज्यांच्यामध्यें लढवय्यांना अलढवय्यांची मदत सर्वांत ज्यास्त असेल ते टिकाव धरून राहतील. म्हणून शुद्ध युद्धशील समाजांत जे लोक लढाई करीत असतील त्यांच्या पोषणास मदत करण्यासाठीं जे लढत नसतील त्यांना श्रम करावे लागत असतात. प्रथम स्थिति असते त्याप्रमाणें, न लढणारीं माणसें म्हणजे केवळ स्त्रियाच असोत; किंवा मागाहून घडतें त्याप्रमाणें, त्यांजमध्यें गुलाम बनविलेल्या कैद्यांचा समावेश होत असो, किंवा त्याच्याहीनंतर होतें त्याप्रमाणें, त्यांच्यांत शेतगुलामांचा समावेश होत असो; सर्वत्र वरच्या म्हणण्याचा अर्थ एकच असतो. कारण दोन समाज इतर सर्व बाबतींत समान असून त्यांच्यापैकीं एकांत कामकरी वर्ग जर लढवय्या वर्गाच्या पोषणाच्याच कामीं गुंतलेला असेल व दुसऱ्यांत तितका गुंतलेला नसेल, तर त्याच्यामध्यें लढवय्यांचें पोषण पूर्णपणें किंवा पहिल्या इतकें चांगलें न झाल्यामुळें, त्यांस आपला कांहीं वेळ स्वपोषणाकडे खर्च करावा लागेल, आणि म्हणून त्यांस पहिल्या समाजांतील लढवय्यांइतका लढाईकडे आपला वेळ देतां येणार नाहीं. म्हणून असल्या दोन समाजांत जीवनार्थ झगड्यांमध्यें पहिला दुसऱ्यास बहुधा चित करील. एवंच योग्यतमाच्या टिकावानें जो समाजनमुना उत्पन्न होईल तो असा असेल कीं, त्यामध्यें लढाई करण्यासारखे आणि शस्त्रास्त्रें विश्वासतां येण्यासारखे सर्व लोक लढव-

त्यावर्गांत सामील झालेले असतील, आणि बाकीचे लोक केवळ त्यांचे कायमचे कोठवळे बनतील.

ह्यामध्यें एक गोष्ट गर्भित होते ती ही कीं, लढवय्या-वर्गाचें पोषण करण्यामध्यें गुंतलेला जो हा अलढवय्या-वर्ग, तो आपलें कर्तव्य करण्यापलीकडे ज्यास्त वाढल्यास तेणेंकरून समाजसंरक्षणाचें काम चांगलें होण्यास व्यत्यय येईल. कारण तो वर्ग ह्या मर्यादेपलीकडे वाढल्यास जे लढवय्याचें काम करूं शकतील असे कांहीं लोक उगीच कामकरी बनले आहेत असें होईल; आणि समाजाची लढण्याची शक्ति एरवीं असावयाची त्याहून कमी होईल. म्हणून युद्धशील नमुन्यामध्यें कामकऱ्यांच्या मानानें लढवय्यांचा वर्ग होईल तेवढा मोठा बनत असतो.

११९. दोन समाज असे आहेत म्हणून समजा कीं त्यांतील लोक एक लढवय्ये आहेत किंवा लढवय्यांच्या गरजा भागविणारे आहेत, तर, बाकीच्या गोष्टी समान असल्यास, ज्या समाजांत सर्वांचे यत्न अत्यन्त सफल रीतीनें संयुक्त होत असतील तो श्रेष्ठत्व कमावील. समरांगणांतील लढाईत संयुक्त क्रिया पृथक् क्रियेवर विजयी होते. युद्धविषयक इतिहास म्हणजे संयुक्तपणें हालचाल व युद्ध करण्यास शिकविलेल्यांच्या जयांचा इतिहासच होय.

ही संयुक्तक्रिया केवळ लढणाऱ्याच भागांमध्यें असली पाहिजे असें नाहीं, तर त्याच्याहून जो गौण भाग त्याजमध्येंही ती असली पाहिजे. हे दोन भाग जर स्वतंत्र रीतीनें वागतां येण्याइतके पृथक् असतील, तर लढवय्या वर्गाच्या गरजा बरोबर रीतीनें भागविल्या जाणार नाहींत. लढवय्यांचा तत्पुरत्या तळाशीं संबंध तुटणें

हें जर भयंकर आहे, तर अलढवय्यावर्गरूपी जो काय-मचा तळ त्याच्याशीं त्यांचा संबंध तुटणें हें त्याहूनही भयंकर होय. म्हणून एकाची मदत दुसऱ्यास पूर्णपणें व्हावी एतदर्थ दोघांचा एकमेकांशीं संबंध कायम राहिला पाहिजे. रानट्यांचा विस्कळित समूह ज्याप्रमाणें लगटीनें लढणाऱ्या तुकडीपुढें विरघळून जातो, त्याप्रमाणेंच, इतर गोष्टी समान असल्यास, ज्या समाजाचे भाग निकट रीतीनें परस्परसंबद्ध नसतील तो, ज्याचे भाग तसे परस्परसंबद्ध आहेत त्याच्यापुढें टिकाव धरूं शकत नाहीं.

१२०. पण ज्यामानानें माणसांस सहक्रिया करावयास भाग पाडावें त्या मानानें त्यांच्या स्वप्रेरित क्रिया नियंत्रित होऊन जातात. जितक्या मानानें एकेरी व्यक्ति सगळ्या समूहांत डुबून जाईल तितक्या मानानें तिचें व्यक्तित्व नष्ट होतें. म्हणून युद्धशील नमुन्याचें उत्क्रमण होत जाईल तसा नागरिकांचा अंकितपणा अनेक रीतींनीं कसा उत्पन्न होत जातो हें आतां लक्षांत आणूं.

असल्या व्यक्तीचें जीवित त्याच्या स्वताच्या ताब्यांत नसून त्याच्या समाजाच्या ताब्यांत असतें. जोंपावेतों असल्या माणसाच्या अंगात शस्त्रें धारण करण्याची शक्ति असते, तोंपावेतों त्याला बलावणें येईल तेव्हां लढाईस जाणें भागच असतें; आणि युद्धशीलता जेथें कळसास गेलेली असेल, तेथें तो जित होऊन परत आल्यास त्यास देहान्ताशिक्षाच व्हावयाची.

आतां अशा स्थितीमध्यें लढाईबद्दलचें जें त्याचें कर्तव्य तें उरकून बाकीच्या बाबतींतच कायती त्यास स्वतंत्रता असते. टोळी किंवा राष्ट्र ह्यांस जेव्हां त्याची ज-

रूरी नसेल तेव्हांच त्यास खासगी कामें करण्याची मोकळीक असते; आणि जेव्हां त्यांस त्याची जरूर लागेल, तेव्हां त्याचीं कृत्यें घटकोघटकीं त्याच्या इच्छेस नव्हे तर सार्वजानिक इच्छेस अनुसरून झालीं पाहिजेत.

त्याच्या मालमत्तेचीही गोष्ट अशीच आहे. त्याची मालमत्ता सार्वजनिक परवानगीनेंच धारण करण्याची त्यास परवानगी असो, किंवा तिजवरची त्याची खासगी मालकी ओळखीत असोत, प्रसंग पडल्यास समाजाच्या उपयोगासाठीं तिच्यापैकीं जेवढा भाग मागतील तेवढा त्यानें काढून दिला पाहिजे.

सारांश, थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, युद्धशील नमुन्यामध्यें व्यक्तीवर मालकी राष्ट्राची असते. म्हणजे, अशा स्थितींत समाजसंरक्षण हा मुख्य हेतु असून व्यक्तिसंरक्षण हा दुय्यम हेतु असतो; आणि त्या हेतूची किंमत पहिला साधण्यासाठींच म्हणूनच मुख्यत्वेंकरून असते.

१२१. आतां ह्या सर्व गोष्टी साधून येण्यास—म्हणजे, पूर्णपणें संयुक्तक्रिया असावी ह्यासाठीं अलढवय्यावर्ग लढवय्यावर्गाचें पोषण करण्यांत गुंतलेला असावा, सगळा समाज मजबूत रीतीनें एकत्र संबद्ध असावा, आणि समाजांतील व्यक्तींचीं जीवितें, स्वातंत्र्यें, आणि वित्तें, हीं राष्ट्राच्या अगदीं आधीन असावी—इतक्या गोष्टी होण्यास हे सर्व भाग पाडणारी अशी कांहीं तरी संघटना असली पाहिजे. तसली घटना असल्याखेरीज संयुक्तक्रियेसाठीं ह्या सर्व गोष्टी एकत्र जुळावयाच्या नाहींत. लढाईमध्यें मतभेद झाल्यानें, किंवा शत्रूच्या

समोर निरनिराळे तट झाल्यानें जे घातुक परिणाम होतात ते लक्षांत आणतां, नेहमींच्या युद्धशीलतेचा कल जुलमी सत्ता वृद्धिंगत करण्याकडे कसा असतो हें आपल्या ध्यानांत येतें. कारण, इतर गोष्टी समान असल्यास, असल्या सत्तेच्या जोरावर ज्या समाजांत संयुक्तक्रिया पूर्णपणें होत असेल ते इतर समाजांपेक्षां ज्यास्त टिकाव धरून राहतील.

आणि ही गोष्ट साध्य होण्यास अधिकार एककेंद्रीभूत होईल अशी व्यवस्था असली पाहिजे. म्हणजे, सर्व सैन्यावर एक मुख्य सेनापति असून त्याच्या लहान लहान भागांवर त्याच्याहून कमी कमी दर्जाचे अधिपती असावे, ही जी सैन्यामध्यें व्यवस्था दृष्टीस पडते, ती एकंदर समाजघटनेमध्यें असली पाहिजे. युद्धशील समाजास असली नियामक घटना नसेल तर त्याची संयुक्तक्रिया अत्यन्त फलदायक होणार नाहीं. लढवय्या भागाप्रमाणेंच अलढवय्या भागामध्यें निरनिराळ्या दर्जाचे नियामक केंद्र पसरले असल्याविना सर्व समुदायाची जी एकंदर शक्ति तिचा एकदम उपयोग करतां येणार नाहीं. लढवय्ये ज्या नियंत्रणाखालीं असतात तसल्याच नियंत्रणाखालीं कामकरी असल्याविना त्यांची मदत पूर्णपणें, तत्परतेनें, आणि खात्रीपूर्वक मिळावयाची नाहीं.

आणि जो समाज इतरांनीं घालून दिलेल्या स्थितीनें किंवा ठराविक दर्जानें विशिष्ट असतो त्याचें स्वरूप असेंच असतें; म्हणजे, त्याचे घटक अंकितपणाच्या निरनिराळ्या शृंखलांनीं परस्पराशीं संबद्ध असतात. स्वेच्छाचारी राजापासून तों तहत गुलामापर्यंत सर्वजण आप-

आपल्या खालच्या लोकांचे धनी असतात, आणि वरच्यांचे चाकर असतात. मुलाचा बापाशीं असलेला अंकितपणाचा संबंध, बापाचा त्याच्याहून कोणत्यातरी श्रेष्ठाशीं तसला संबंध, अशी जी ही तहत राजापर्यंत परंपरा लागते, तिजमध्यें खालच्या दर्जाचा माणूस वरच्या दर्जाच्या माणसाच्या अगदीं कह्यांत असतो.

१२२. युद्धशील घटनेचें अन्य तऱ्हेनें वर्णन केल्यास, ती एकप्रकारची रेजिमेंटी पद्धति आहे, आणि ती प्राधान्येंकरून फौजेमध्यें सुरू होऊन गौणत्वेंकरून सगळ्याच समाजास बद्ध करून टाकिते, असें म्हणतां येईल. ह्याचें पहिलें चिन्ह सर्वत्र दिसणाऱ्या ह्या गोष्टीमध्यें दिसून येतें कीं जो लष्करी मुख्य असतो तोच दिवाणी मुख्य बनतो—बहुधा एकदमच बनतो, आणि युद्धशीलता चालू राहिल्यास अखेरीस तरी बनतोच. युद्धांतील अग्रणी म्हणून सुरवात करून तो शांततेच्या वेळचा शास्ता बनतो; आणि जी नियामकपद्धति तो एका ठिकाणीं सुरू करितो, तीच साधेल तितकी दुसऱ्या ठिकाणींही अमलांत आणितो. बरें, अलढवय्या भाग लढवय्या भागास सामग्रीचा पुरवठा करणारा असल्यामुळें क्रमिक अंकितपणाचें तत्त्व त्यालाही लाविलें जातें. ज्या रीतीनें लढवय्याचें नियमन करितात तसल्याच मार्गानें त्यांचेंही करितात; आतां अगदीं शब्दशःच तसल्या मार्गानें नव्हे, कारण लढवय्यांचें घनीभवन करावें लागत असतें, आणि कामकऱ्यांचें प्रसरण करावें लागत असतें; म्हणून ह्या दोहोंमध्यें पूर्ण साम्य असत नाहीं; तरी पण दोहोंच्या मुळीं तत्त्व सारखेंच आहे. कारण हे

लोक जबरीखालीं मेहनत करीत असतात; आणि त्यांजवर देखरेख सर्वत्र असते.

स्वेच्छाचारी लष्करी मुख्य वंशपरंपरेनें आलेल्या चालीरीतींस अनुसरून लष्करांतील रेजिमेंटांना जर कडक शिस्तीनें वागवीत असेल, तर तसलीच शिस्त तो कामकरी किंवा उत्पादक वर्गावर लादणारा नाहीं अशी कल्पना करणें म्हणजे, त्याच्या परिस्थितीशीं अगदीं विसंगत असे मनोभाव व कल्पना त्याजमध्यें आहेत, अशी कल्पना करणें होय.

१२३. लष्करी सरकार हें विधिरूपानें नियामक असून निषेधरूपानेंही नियामक असतें ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे त्या सरकारच्या स्वरूपावर आणखी प्रकाश पडतो. तें सरकार केवळ लोकांस कांहीं गोष्टींपासून पराङ्मुख करितें इतकेंच नाहीं, तर कांहीं गोष्टी जबरीनें करावयासही लावितें. म्हणजे, त्यांस तें कांहीं गोष्टी करूं नको म्हणून सांगून कांहीं गोष्टी केल्याच पाहिजेत म्हणूनही सांगतें.

आतां फौजेवरील शासनपद्धति अशा पद्धतीची असते हें सांगावयास नकोच. शिपायाला केलेले विधिरूप हुकूमच निषेधरूप हुकमांहून ज्यास्त महत्त्वाचे असतात. लढाई विधिरूप हुकमांखालीं चालत असून, सैन्यांतील व्यवस्था दुसऱ्या प्रकारच्या हुकमांनीं राखिली जात असते. पण एथें आपणास विशेषतः सांगावयाची गोष्ट ही कीं, अशा प्रकारची ही स्थिति केवळ लष्करामध्येंच असते असें नाहीं, तर सामान्य लोकांमध्येंही असते. शास्त्यानें खासगी व्यक्तीशीं वागण्याचे दोन मार्ग आहेत.

दुसऱ्यांचें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या अतिक्रमण न करतां ज्या गोष्टी माणसास करतां येतील तेवढ्याच त्यानें कराव्या म्हणून त्यास मर्यादा घालून देणें हा एक मार्ग; आणि हा निषेधरूपी नियंत्रणाचा मार्ग होय. पण ह्याशिवाय, त्यानें कोणतेंही कृत्य कसें करावें, कोठें करावें, आणि केव्हां करावें, असें त्यास सरकारानें सांगणें, म्हणजे, आपणच होऊन तो ज्या गोष्टी करणार नाहीं त्या करावयास त्यास लावणें, हा विधिरूप नियंत्रणाचा मार्ग होय. लष्करी नमुन्याचें सरकार असलें म्हणजे हें विधिरूप नियमन फार पसरलेलें असून अगदीं जबरीचें असतें. म्हणजे, धंदा निराळा एवढी गोष्ट खेरीज करून बाकीच्या बाबतींत शिपायाची व नागरिकांची स्थिति बऱ्याच अंशीं सारखीच असते.

आणि युद्धशील नमुन्याचें मूलतत्त्व जबरीची सहक्रिया हें आहे हेंच सत्य सांगण्याचा हा अन्य मार्ग आहे. लढवय्याभागांतील लोक ह्या तत्त्वास अनुसरून वागतात हें जरी अगदीं उघड आहे, तरी लढवय्यावर्गाचा जोर चांगला रहावयास अलढवय्या भागालाही ह्याच तत्त्वास अनुसरून वागलें पाहिजे, हें तितकेंच उघड आहे; कारण त्या भागाकडून लढवय्या भागास जी मदत व्हावयाची ती एरवीं खात्रीनेंच व्हावयाची नाहीं.

१२४. ज्या एकत्र बद्धतेनें युद्धशील समाजांच्या घटकांची कर्तृत्ववान् अशी लढाऊ घटना बनते तिचा कल प्रत्येक माणसाची पदवी, धंदा, आणि स्थान ह्यासंबंधाची स्थिति कायम करण्याकडे असतो.

क्रमिक असें नियामक संघटन असलें म्हणजे खा-

लच्या पायरीवरून वरच्या पायरीवर जाण्यास अडथळा होत असतो. ह्याला कारणें दोनः—एक कारण, असले वरचे दर्जे संभाळण्यास लागणाऱ्या उपकरणांचा अभाव; आणि दुसरें कारण, जे लोक त्या स्थानीं असून तेथून कनिष्ठांस आपल्या कह्यांत ठेवूं शकतात त्यांचा प्रतिरोध म्हणून खालच्या दर्जाच्या माणसास वर येण्यास प्रतिबंध करून हे लोक आपल्या जागा व पदव्या आपल्या वंशजांप्रत संक्रान्त करीत असतात; आणि वंशपरंपरेचें तत्त्व जसें स्थापन होईल, तसा सामाजिक घटनेचा ताठरपणा (लवचीकपणाचा अभाव) वाढत जातो.

अशा रीतीनें पदव्या व दर्जे हे वंशपरंपरेनें कायम होऊन गेले म्हणजे धंदेही तसेच कायम होऊन जातात. अशा रीतीनें गुलामवर्ग आणि कामकरी वर्ग ह्यांना वंशपरंपरेनें त्यांचे दर्जे प्राप्त होतात इतकेंच नाहीं, तर त्यांचे विशिष्ट उद्योगही प्राप्त होतात. रेजिमेंटें बनवण्याचा जो कल त्याचा हा परिणाम असून त्यास मुख्य उत्तेजक दोन होत असतात:—एक, श्रेष्ठ माणसास प्रत्येक प्रकारच्या कामकऱ्याकडून विशिष्ट पदार्थ करून घ्यावयाचें असल्यामुळें त्या माणसाच्या मरणाच्यावेळीं त्याचें काम करण्यास दुसरा योग्य माणूस तयार असावा अशी सहजच त्यास इच्छा असते; आणि दुसरें, कामकऱ्यास आपल्या कामास हातभार लावणारा मिळावा अशी इच्छा असल्यामुळें तो त्यास सहजच आपला धंदा शिकवितो; आणि ह्या दोन गोष्टी जुळल्यामुळें मुलाच्या इच्छेचें कांहींच चालत नाहीं. एवंच, जबरीच्या सहाक्रियेच्या तत्त्वाखालीं वंशपरंपरेचें तत्त्व उत्पाद-

कसंघटनेमध्यें (जिन्नस उत्पन्न करणाऱ्या वर्गांमध्यें) सर्वत्र पसरून जाऊन त्यामध्येंही एकप्रकारचा ताठरपणा उत्पन्न होतो.

ह्यापासून कामकरी लोकांस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यासही प्रतिबंध होऊं लागतो. जीवित, स्वातंत्र्य, आणि वित्त ह्यांसंबंधानें माणूस जितका समाजाचा अंकित होईल त्यामानानें त्याचा ठिकाणा नेहमीं माहीत असणें हें समाजास आवश्यक होऊन जातें. शिपायाचा हपिसराशीं, आणि हपिसराचा त्याच्या वरिष्ठाशीं असा संबंध उघडच असतो कीं त्यांपैकीं प्रत्येक नेहमीं अगदीं नजीक असला पाहिजे; आणि जेथें युद्धशील नमुना पूर्णपणें पक्क झाला असेल तेथें सर्व समाजालाच हा कायदा लागू होतो. तेथें गुलामास आपलें नेमिलेलें वसतिस्थान सोडतां येत नाहीं; शेतगुलाम आपल्या शेताला बांधलेला असतो; आणि धन्यासही आपल्या ठिकाणापासून परवानगीविना गैरहजर राहतां येत नाही.

एवंच कर्तृत्ववान् युद्धशीलता बनण्यास जी संयुक्तक्रिया, जो संयुक्तपणा, जें परस्परबंधन, जी रेजिमेंटाची धर्ती, असावी लागते, तिच्या योगानें अशी घटना उत्पन्न होते कीं, ती कोणताही फेरबदल करावयाचा म्हटल्यास त्यास आड येते.

१२५. गतकलमांत सांगितलेल्या युद्धशील नमुन्याच्या विशेषाबरोबर सहजच दुसरा एक विशेष उत्पन्न होतो; तो हा कीं, सरकारी संघटनेचे भाग नाहींत अशा ज्या संघटना असतील त्या सरकार कांहीं अंशीं किंवा सर्वांशीं दाबून टाकूं लागतें. म्हणजे सरकारानें आपल्या

संयोगांनीं सर्व क्षेत्रें व्यापिलीं असल्यामुळें तें खासगी संयोग बनूं देत नाहीं.

पूर्वीं आपल्या ध्यानांत आलेंच आहे कीं, पूर्णपणें संयुक्तक्रिया साधण्यासाठीं, केवळ लढवय्या भागामध्यें-च नव्हे तर अलढवय्या भागामध्येंही केंद्रीभूत कारभार असला पाहिजे; आणि म्हणून स्वतंत्र रीतीनें वागणारे असे जर नागरिकांमध्यें संयोग असतील तर ते तित-क्यापुरते ह्या केंद्रीभूत व्यवस्थेचा टापू कमी करतील. ज्या ज्या रचना सरकारी संघटनेचे भाग नसतात त्या कमज्यास्त प्रमाणानें त्या घटनेस मर्यादित करीत अस-तात, आणि लोकांचा जो अमर्यादित अंकितपणा सर-कारास जरूर असतो त्याच्या कमज्यास्त आड येतात. खासगी संयोग जर बनूं दिले तर ते स्वैच्छिक सहक्रि-येच्या तत्त्वावर बनलेले असल्यामुळें, जबरीच्या सह-क्रियेच्या तत्त्वावर बनविलेल्या ज्या सामाजिक व्यवस्था त्यांच्याशीं विसंगत असणार. म्हणून व्यापारविषयक सभा, विशेष धर्मविषयक सभा, इत्यादि संस्था अशा समाजांत उत्पन्न होऊं शकत नाहींत.

युद्धशील नमुन्याशीं सुसंगत असे एकप्रकारचे मात्र खासगी संयोग आहेत; ते कोणते म्हणाल तर लहान-सहान संरक्षणात्मक किंवा अतिक्रमणात्मक हेतू साध-ण्यासाठीं बनविलेले संयोग. उदाहरणार्थ, तटरूपी संयोग, जे युद्धशील समाजांत बरेच असतात; मूळच्या धंदेज्ञा-तींसारखे एकमेकांच्या संरक्षणासाठीं बनविलेले संयोग; आणि गुप्तमंडळ्यांसारखे संयोग. कारण समाज जें मोठ्या प्रमाणावर करीत असतो तेंच असल्या मंडळ्या लहान

प्रमाणावर करितात; म्हणजे, स्वसंरक्षण, किंवा परातिक्रमण, किंवा दोन्ही; आणि त्या जबरीच्या सहक्रियेच्याच तत्त्वावर बनविलेल्या असतात; त्या इतक्या कीं आपल्यापैकीं कोणीं मंडळीच्या नियमांचें उल्लंघन केल्यास त्यास त्या ठार देखील करितात.

१२६. आणखी एक गोष्ट सांगावयाची ही कीं, युद्धशील नमुन्याच्या समाजाचा कल चांगली जोरदार पोषक संघटना उत्पन्न करणाऱ्याकडे असतो. राजकीय स्वावलंबनाबरोबर त्याच्या ठिकाणीं उत्पन्नविषयक स्वावलंबनही असतें. सभोंवतालच्या समाजांशीं त्याच्या वरचेवर लढाया चाललेल्या असल्यामुळें त्याचें त्यांच्याशीं जें व्यापारविषयक दळणवळण त्यास अडथळा येत असतो किंवा तें बंदच पडत असतें; कारण नेहमीं एकमेकांशीं लढणारांमध्यें पदार्थविनिमय फारच अल्प प्रमाणांवर झाला पाहिजे. म्हणून युद्धशील समाजानें आपल्या घटकांच्या निर्वाहास जरूर त्या जिनसांचा पुरवठा साधेल तितका देशांतल्या देशांतच केला पाहिजे. उदाहरणार्थ, लष्करी जमीनदारीच्या पद्धतीच्या अमदानींत फ्रान्सांतील किल्ल्यांतून जरूर ते बहुतेक पदार्थ तेथल्या तेथेंच उत्पन्न करीत असत, तशी स्थिति शेजाऱ्यांशीं नेहमीं लढणाऱ्या टोळ्यांची किंवा देशांची असली पाहिजे. असल्या एकाद्या देशांत एकादा जरूर तो जिन्नस उत्पन्न करणारी संस्था नसल्यास, तो जिन्नस बाहेरून न मिळाल्यामुळें तसली संस्था तेथें नवी उत्पन्न झाली पाहिजे.

यावरून असें सिद्ध होतें कीं परकीयांवर न अवलं-

पून .हण्याची इच्छा ही युद्धशील नमुन्याच्या समाजास योग्यच आहे. लढाई सुरू झाल्यानें बाहेर देशांतून येणाऱ्या मालाचा पुरवठा कदाचित् बंद होईल अशी जोंपर्यंत नेहमींची भीति असेल, तोंपावेतों तो माल देशांतल्या देशांतच उत्पन्न करण्याची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे अशी जरूरी अवश्यच भासणार; आणि म्हणून ही गोष्ट साधण्यास योग्य त्या तजविजी तो देश करणार. एवंच युद्धशीलता आणि उद्योगधंद्याच्या संबंधानें संरक्षक नीति ह्या दोहोंमध्यें उघड उघडच प्रत्यक्ष-संबंध दिसून येतो.

१२७. समाजांचा अस्तित्वासाठीं झगडा चालला असतां उत्तमांचा टिकाव होऊन कोणते विशेष त्यांजमध्यें उत्पन्न झाले पाहिजेत हें आतांपर्यंत आपण लक्षांत आणिलें. म्हणून आतां युद्धशीलतेच्या बाबतींत परस्परसदृश पण इतर बाबतींत विसदृश अशा समाजांमध्यें हे विशेष प्रत्यक्ष किती दृष्टीस पडतात हें पाहूं.

आतां लहान अशा रानटी समाजांमध्यें, ते कितीही लढवय्ये असले, तरी युद्धशील नमुन्याला योग्य अशा घटनेचें ओबड धोबड असें स्थूलस्वरूपच त्यांच्या मध्यें दिसेल. त्यांच्यामध्यें संकलन बेताचेंच असल्यामुळें त्यांच्या भागांच्या व्यवस्थित रचना फारच अल्प प्रमाणावर असणार. तथापि असल्या जमावाबद्दल जो पुरावा मिळतो तो वरच्या अनुमानांना पुष्टिदायकच मिळतो. असल्या जमावांत लढवय्या वर्ग म्हणजे त्यांतील सगळाच पुरुषवर्ग असतो ही गोष्ट इतकी परिचित आहे कीं तिजबद्दल पुरावाच द्यावयास नको. तद्वतच अ-

सल्या समाजांतील स्त्रिया नीचावस्थेंत असून त्या सर्व कष्टाचीं कामें करितात व ओझीं वाहतात हीही गोष्ट तितकीच प्रसिद्ध आहे. शिवाय लढाईच्या वेळीं शिधा-सामग्री नेण्याचें काम बहुधा त्यांच्याचकडे असतें; उदाहरणार्थ, एशिया खंडांत भिल्ल व खोंड लोकांमध्यें, पालिनिशियांत न्यूक्यालिडोनियन व सांडविच बेटवाल्या लोकांमध्यें, अमेरिकेंत कोमांची, मंद्रूकस, व पाटागोनियन लोकांमध्यें: एवंच प्रारंभीं प्रारंभीं कायमच्या लष्करी कोठावळ्याचें काम त्यांच्याचकडे असतें हें स्पष्ट दिसतें. जेथें लढाईतील कैद्यांस गुलाम करण्याची चाल उत्पन्न झाली असेल तेथें तेही लढवय्या वर्गाला पोसण्याच्या व मदत करण्याच्या कामीं उपयोगीं पडत असतात; शांततेच्या वेळीं ते जिन्नस उत्पन्न करितात; आणि लढाईच्या वेळीं स्त्रियांना सैन्याची नोकरी करण्याच्या कामीं मदत करितात. उदाहरणार्थ, न्यूझीलंदर लोकांमध्यें किंवा मालागासी लोकांमध्यें; त्या वेळीं ते सामग्री वाहून नेण्याचेंच काम करितात. शिवाय, नंतरच्या कालाप्रमाणें ह्या प्रारंभींच्या कालींही, युद्धशील नमुन्यामध्यें सार्वजनिक हक्कांपुढें खासगी हक्कांचें कांहींच चालत नसतें. प्रत्येक माणसाचा जीव सगळ्या समूहाच्या गरजांना वाहिलेला असतो; आणि म्हणून त्याचें क्रियास्वातंत्र्यही अर्थात् वाहिलेलें असतें. त्याच्या मालमत्तेचीही गोष्ट तशीच असते; उदाहरणार्थ, ब्राझीलमधील इंदियन लोकांबद्दल असें सांगतात कीं त्यांच्यांत खासगी मालमत्ता शांततेच्या वेळींही बेताबातानेंच ओळखीत असून लढाईच्या-

वेळीं बहुतेक मुळींच ओळखीत नाहींत; उत्तर अमेरिकें-तील कांहीं अगदीं उत्तरेकडील लोकांबद्दल हर्न असें सांगतो कीं, ते लढाईस जावयास लागले म्हणजे सार्वजनिक उपयोगाची जी जी मालमत्ता असेल तिजवरची त्यांची खासगी मालकी नाहींशी होते. ह्यासंबंधानें महत्त्वाची एक गोष्ट एथें पुनः सांगावयाची ती ही कीं, जेथें राजकीय अंकितपणा मूळचा नसेल तेथें तो लढाईपासून उत्पन्न होतो. असो; युद्धशील नमुन्याचे हे जे अंकूर लहान लहान जमावांमध्यें दृष्टीस पडतात त्यांवरून दृष्टि काढून, ती आतां त्याहून मोठाल्या जमावांमध्यें दिसणारे जे त्यांचे ज्यास्त मोठे आकार त्यांच्यावर लावूं.

डेहामेचें सैन्य, किंवा बर्टन म्हणतो त्याप्रमाणें, डेहामेचें सर्व राष्ट्रच हें ह्याचें फार चांगलें उदाहरण आहे; कारण त्याठिकाणीं युद्धशीलता इतकी कळसास गेलेली आहे कीं राजाच्या निजावयाच्या खोलीची भुई शत्रूंच्या कपाळांच्या कवच्यांची बनवलेली आहे. याठिकाणीं राजा पूर्ण स्वेच्छाचारी आहे, आणि तो दैविक आहे म्हणून समजतात; त्यास " आत्मा " म्हणतात, आणि तो धर्माध्यक्ष आहे हें सांगावयास नकोच, कारण तो भटांस दीक्षा देत असतो. त्याच्याठिकाणीं सगळे अधिकार व सर्व हक्क विलीन झालेले आहेत. तेथल्या कायद्याप्रमाणें सर्व लोक त्याचे गुलाम आहेत. तो आपल्या सर्व प्रजेचा वारस समजला जातो आणि त्यांच्यापासून तो पाहिजे तें घेऊं शकतो. परलोकास निरोप पाठविण्यासाठीं पुष्कळ वेळां तेथील लो-

कांस मारीत असतात, आणि मृतराजांकडे नोकर पाठविण्यासाठींही मारीत असतात; ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे लोकांचें जीवित, वित्त, आणि स्वातंत्र्य हीं सर्व तेथें राजाच्या आधीन कशीं आहेत हें स्पष्ट होतें. दिवाणी व लष्करी दोन्ही खात्यांमध्यें अधिकारी व पोटअधिकारी पुष्कळ आहेत. राजा सांगेल तीं अन्नें व वस्त्रें सर्वांना वापरावीं लागतात, आणि राजा देईल तें नांव धारण करावें लागतें. राजाच्या परवानगीखेरीज घरांत सुधारणा केल्यास, खुर्चीवर बसल्यास, मेण्यांतून गेल्यास, किंवा पेल्यांतून प्याल्यास, देहान्त शिक्षा होते.

दुसरें उदाहरण यशस्वी होत जाणाऱ्या इन्कांनीं हळू हळू स्थापन केलेलें जें पेरू देशांतील साम्राज्य त्याचें देतां येईल. एथील राजा देवकुलोत्पन्न, पवित्र, व स्वेच्छाचारी असून त्याचा सर्व जीवितावर ताबा असे. त्याची नायकी राजकीय, लष्करी, धार्मिक, आणि न्यायविषयक असे; आणि सर्व राष्ट्र शिपाई, कामकरी, व हर्पीसर या नात्यांनीं त्याचें आणि देवपदवीस चढलेल्या त्याच्या पूर्वजांचें गुलाम असे. कर देणाऱ्या व समर्थ अशा सर्व इंदियनांना लष्करांत नोकरी करणें भाग असे; आणि नियमितकालपर्यंत त्यांची नोकरी झाली म्हणजे त्यांस शिलकी फौजेंत टाकीत, आणि नंतर त्यांस सरकारच्या नजरेखालीं काम करावें लागे. दहा, पन्नास, शंभर, पांचशें, हजार, दहा हजार, इतकाल्या शिपायांच्या बनलेल्या तुकड्यांवर सामान्य अंमलदार असून, ह्याच्याहून मोठाल्या भागांवर इन्काच्या वंशांतील सेनापति असत. एकंदर समाजावर असलीच

रेजिमेंटी देखरेख होती; कारण लोकांचे वरच्यासारखे समूह नोंदलेले असून प्रत्येक समूहावर एकेक अंमलदार असे. ह्यांच्याकडून इन्कांकडे रपोट जावयाचे ते वरिष्ठ वरिष्ठ अंमलदाराच्या द्वारा अनुक्रमें जात, आणि इन्कांचे हुकूम त्याच चाळणींतून खालीं येत. तेथील धार्मिक संघटनाही अशीच मोठी संकीर्ण होती, कारण तिजमध्यें भविष्यवाद्यांचे सहा वर्ग होते; आणि इतर हपीसरांच्या कृत्यांची तपासणी करून रिपोर्ट करण्यास एक गुप्त हेरांचें खातेंही होतें. प्रत्येक गोष्टीवर सरकारची तपासणी असे. कांही गांवकामगारांचें काम नांगरणें, पेरणें आणि कापणें ह्यांजवर नजर ठेवण्याचें असे. पावसाची कमतरता असली म्हणजे सरकार लोकांस पाणी मेजून देत असे. परवानगीवांचून प्रवास करणारांस भटक्ये म्हणून शिक्षा होई; आणि जे सरकारी कामासाठीं फिरत असतील त्यांची जेवणाखाण्याची व रहाण्याची तस्तूद होत असे. निरनिराळ्या दर्जाच्या लोकांनीं पोषाक वगैरे कसा करावा हें पाहणारे देखील कामगार असत. ह्या बाह्य जीविताच्या नियमनाखेरीज तेथें लोकांच्या घरगुती जीविताचेंही नियमन होत असे. तपासनीसांस तपासणी करण्यास अडथळा होऊं नये एतदर्थ लोकांनीं दारें उघडीं ठेवून जेवावें असा हुकूम असे. ह्या तपासनिसाचें काम घर, सामान, वस्त्रें वगैरे स्वच्छ आहेत किंवा नाहींत, आणि मुलांना योग्य शिस्त लावितात किंवा नाहींत, हें पाहण्याचें असें; आणि ज्यांच्या घराची व्यवस्था चांगली नसेल त्यांस फटके मिळत. या सर्व खात्यांचा खर्च चालावा म्हणून लोकांस

खपावें लागत असे. राजकीय, धार्मिक आणि लष्करी वर्गांना हा भूर्दंड द्यावा लागत नसे. पण श्रमकरी वर्ग समरांगणांत खपत नसतील तेव्हां त्यांस ह्या कामीं खपावें लागून जें उत्पन्न होईल त्यांतील पोटापुरता तेवढा भाग ठेवून बाकीचें सर्व उत्पन्न सरकारास द्यावें लागे, सर्व राज्याचा तिसरा भाग सरकारच्या खर्चाकडे लावून दिलेला होता, एकतृतीयांश पूर्वजांचें तर्पण करणाऱ्या उपाध्याय-वर्गाकडे लावून दिला होता, आणि बाकीचा तिसरा भाग कामकऱ्यांना पोसण्याकडे जात असे. कामकरी लोकांस राजाच्या जमिनी नांगराव्या लागत असून शिवाय कामावर असलेल्या शिपायांच्या आणि दुबळ्यांच्याही नांगराव्या लागत असत. आणि शिवाय, वस्त्रें, पादत्राणें, आणि शस्त्रें ह्यांच्या खंडण्या द्याव्या लागत. ज्या शेतांवर लोक निर्वाह करीत त्यांतील भाग प्रत्येक माणसास त्याच्या कुटुंबाच्या आकाराच्या मानानें वांटून दिलेला असे. मेंढरांच्या उत्पत्तीचीही वांटणी अशीच करीत. त्यांच्या कळपांपैकीं जेवढ्या भागाची सार्वजनिक कामाकरितां जरूरी नसेल, तेवढ्याची लोंकर कांहीं ठराविक काळानें काढीत, आणि ती हपीसर लोक वांटून घेत. ह्या सर्व व्यवस्थांच्या मुळीं असें तत्त्व असें कीं, प्रत्येक माणसाला आपली खासगी मालमत्ता जी धारण करितां येते ती इन्कांच्याच मेहरबानीनेंच करतां येते, आणि कायद्याप्रमाणें त्याचा त्या मालमत्तेवर दुसरा कोणता हक्क नसतो. एवंच लोकांचे देह, वित्त, आणि श्रम हीं सर्व पूर्णपणें सरकारचीं असल्यामुळें, राजाच्या हुकमानुरूप त्यांस

पाहिजे तिकडे रहावयास जावयास सांगत असल्यामुळें, आणि ते लढाईंत गुंतलेले नसतील तेव्हां देखील त्यांच्यावर शिपायांसारखीच कडक देखरेख असल्यामुळें, ते एकप्रकारच्या रेजिमेंटासारख्याच समूहाचे घटक बनलेले असत, आणि त्यांस बहुतेक अंशीं इन्काच्या इच्छेप्रमाणें वागावें लागत असून स्वेच्छेप्रमाणें फारच अल्पांशानें वागावयास सांपडत असे. आणि त्यांच्यांत युद्धशील घटना अशा रीतीनें अगदीं पूर्णत्वास पोहोंचलेली असल्यामुळें दुसरी कोणत्याही प्रकारची घटना बहुतेक मुळींच नसे. त्यांच्यांत पैसे नसत; ते घरें, किंवा वस्त्रें, किंवा जमिनी विकीत नसत; आणि खाण्याच्या पदार्थांच्या कांहीं विनिमयापलीकडे त्यांच्यांत व्यापारही बहुतेक मुळींच नसे.

इतिहासावरून पाहतां प्राचीन ईजिप्तची स्थिति सामान्यतः अशाच प्रकारची होती. तेथील प्रसिद्ध मनोरे बांधावयास जे असंख्य गुलाम खपले असले पाहिजेत त्यावरून फार प्राचीन काळीं तेथें युद्धशीलता फार प्रबल होती हें स्पष्ट दिसतें; आणि त्यांच्या राजांचे जे मोठे डौलाचे लेख आहेत, आणि त्यांच्या देवळांच्या भिंतींवरून त्यांच्या जयांचीं जीं चित्रें काढिलेलीं आहेत, त्यांवरून ती युद्धशीलता तशीच पुढें चालू राहिली होती हेंही स्पष्ट दिसतें. शिवाय, तेथेंही देवकुलोत्पन्न राजा असून त्याच्या अधिकारास पूर्वीपासून चालत आलेल्या रूढींचेंच कायतें बंधन असे, आणि तो राजकीय मुख्य, मुख्य धर्मोपाध्याय, आणि मुख्य सेनापतिही असे. त्याच्या हाताखालीं केंद्रीभूत राज्यव्यवस्था असून; तिचे दिवा-

णी व लष्करी ह्या दोन्ही खात्यामध्यें वर्ग व पोटवर्ग केलेले होतेच. उपाध्ये, शिपाई, व्यापारी व सामान्य जन (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र) हे जे चार मोठे समाजवर्ग—ज्यांच्याखालीं गुलामांचा वर्ग येई—त्यांपैकीं पहिल्यामध्यें विसांहून ज्यास्त भिन्नभिन्न प्रकार असत; दुसऱ्यांत लष्करी दर्जाव्यतिरिक्त अर्ध्या डझनाहून अधिक प्रकार असत; तिसऱ्यांत सरासरी एक डझन असत; आणि चवथ्यांत तर ह्याच्याहूनही अधिक असत. शास्त्या वर्गांमध्यें जरी जातिनिर्बंध फार कडक नसत तरी बापाचा धंदा मुलगाच करीत असे, आणि एका धंद्याच्या माणसास दुसरा करण्यास परवानगी नसे. धंदेवाले लोकांमध्यें रेजिमेंटी प्रकार किती माजलेला होता हें त्यांच्या एका मोठ्या खाणीवर किती प्रकारचे हपिसर असत हें पाहतां लक्षांत येतें. ही जी भिक्षुकी, लष्करी, आणि दिवाणी संघटना, जिच्याकडे सर्व जमीन असे, तिच्या पोषणार्थ, खालचे वर्ग खपत. त्यांच्यावर देखरेख करण्यास अंमलदार नेमिलेले असून ते शब्दापेक्षां छडीचाच उपयोग ज्यास्त करीत. आणि हे अंमलदार जरी लोकांच्या घरांतून तपासणीकरितां जात नसले, तरी त्यांच्याकडे प्रत्येक कुटुंबाची नोंद असे. आपण आपला निर्वाह कसा करितों ह्याची हकीकत प्रत्येकानें म्याजिस्ट्रेटास दिली पाहिजे, न देईल त्यास देहान्त शिक्षा होईल, असा त्यांच्यांत कायदा असे.

आतां दुसऱ्या एका प्राचीन समाजाचें उदाहरण घेऊं. तो स्पार्टाचा होय. त्याच्यांत व वरील समाजांत कांहीं बाबतींत जरी फारच फरक होता, तरी तेथें कायमची

युद्धशीलता असल्यामुळें तेथें वरच्यासारखेच रचना-
विशेष दिसत होते. त्यांच्यामध्यें युद्धशीलतेमुळें एकच
स्वेच्छाचारी राजा उत्पन्न झाला नाहीं ह्याचें एक कारण
संयुक्त राजकीय मुख्य उत्पन्न होण्यास अनुकूल अशीं
कारणें तेथें होतीं हें होय, आणि दुसरें कारण त्यांच्या-
मध्यें देवकुलोत्पन्न असे दोन राजे होते हें होय. पण
ह्यामुळें त्यांच्यांत अपूर्णपणें केंद्रीभूत अशी जरी राज्य-
व्यवस्था उत्पन्न झाली, तरी त्या सरकारांचें लोकांशीं जे
संबंध ते सामान्यतः युद्धशील सरकारांचें जसे असतात
तसलेच होते. त्यांच्यांत हेलट लोक जरी खेड्यांतून
शेतगुलाम व शहरांतून साधे गुलाम असून पेरीकी
लोक जरी राजकीय दृष्ट्या स्पार्टन लोकांचे अंकित अ-
सत, तरी त्या सर्वांना खुद्द स्पार्टन लोकांप्रमाणेंच ल-
ष्करांत नोकरी करणें भाग असे; आणि तें काम संभा-
ळून त्या दोन वर्गांनीं आपलीं काबाडकष्टाचीं व व्या-
पाराचीं कामें अनुक्रमें करावीं असें असे. स्पार्टन लो-
कांनीं मात्र केवळ लष्करी काम करावें असें असे. त्यां-
च्या लष्करामध्येंही असेच विभाग असत. त्यांच्यांत रो-
ज कवाईत असून त्यांनीं खाणें असुकच प्रकारचें व अ-
मुकच ठिकाणी खावें, त्याबद्दल पैसे असुकच द्यावे, अ-
सा क्रम सातव्या वर्षापासून सुरू असे. शिवाय त्यांनीं
लग्न असुकच वर्षीं करावें, त्यांनीं सावकारीचा किंवा दु-
सरा कोणताही धंदा करूं नये, परवानगीवांचून देशा-
च्या बाहेर जाऊं नये, आणि रात्रंदिवस वरिष्ठाच्या न-
जरेखालीं रहावें, असे नियम असत. सारांश, नागरि-
क म्हटला म्हणजे स्वताचा किंवा आपल्या कुटुंबाचाही

नसून आपल्या राष्ट्राचाच असतो ही जी ग्रीक लोकांची समजूत ती स्पार्टामध्यें पुरी अमलांत आलेली होती. एवंच ह्या अपवादात्मक उदाहरणामध्यें नेहमींची युद्धशीलता असूनही प्रत्येक नागरिक व त्याची मालमत्ता ह्यांचा मालक असणाऱ्या एका वरिष्ठाची जरी उत्पत्ति झालेली नव्हती, तरी तेणेंकरून सगळा समाज आणि त्याचे घटक यांजमध्यें अगदीं तसलाच संबंध उत्पन्न झालेला होता. म्हणजे, ह्या ठिकाणीं एकेऱ्या नायकाच्या ऐवजीं संयुक्त नायकाच्या द्वारा राष्ट्र आपला अधिकार चालवीत असून त्यानें व्यक्तीस आपला पूर्ण गुलाम बनविलें होतें. कारण एकीकडे हेलट लोकांस जर लष्कराच्या पोषणासाठीं खपावें लागत असे, तर दुसरीकडे लष्करास राष्ट्रासाठीं नेहमीं खपावें लागे; म्हणजे, तेही एकप्रकारचे गुलामच होते.

आधुनिक उदाहरणांपैकीं रशियाचें उदाहरण पुरे आहे. ह्याठिकाणीं देखील लढायांमध्यें मुलुख जिंकून जसा राष्ट्राचा विस्तार वाढत चालला, तसाच विजयी सेनापतीचा स्वेच्छाचारी राजा बनून गेला; आणि तो जरी स्वरूपतःच दैविक म्हणून समजला जात नव्हता, तरी त्यास कांहीं अंशीं तसलाच मोठेपणा प्राप्त झालेला होता. डी. कुस्टाईन म्हणतोः—सर्व माणसें देवासमोर सारखीं आहेत, आणि बादशाह हा रशियन लोकांचा देव आहे. प्रख्यात पीटर राजाच्या अमदानींत सरदारांना सारखें लढावयास लागून ते सरकारचे नोकर बनले, आणि त्यांचे विशेष हक्क, किंवा विशेष मानमरातब हीं नाहींतशीं होऊन त्यांस शारीरिक शिक्षा देखील होऊं लागल्या. जो सरदार लष्करांत किंवा आरमारांत

किंवा दिवाणी खात्यांतून मूलवयापासून तों वृद्धपणापर्यंत नोकरी करण्याचें नाकारील, त्याचें पूर्वींप्रमाणें इस्टेटच जाई इतकेंच नाहीं, तर तो राजद्रोही समजला जाऊन त्याचें डोकेंही जाई. वॉलेस म्हणतो, पीटरनें सर्व दिवाणी व लष्करी हपीसांचे चवदा वर्ग किंवा दर्जे केलेले होते, आणि त्यांतील प्रत्येकाचीं कामें त्यानें अगदीं बारीक रीतीनें ठरवून दिलीं होतीं. त्याच्या पश्चात् हें वर्गीकरण अशाच रीतीनें चालू होतें, आणि निकलसच्या कारकीर्दींत तें अगदीं कळसास जाऊन पोहोंचलें. सारांश, ही डी. कुस्टाइन म्हणतो त्याप्रमाणें, रशियांत सर्व समाजाची, म्हणजे लढाईस कधीं न जाणाऱ्या अशा देखील लोकांची रेजिमेंटी धर्तीवर रचना केलेली होती. ह्या रेजिमेंटी रचनेबरोबर रेजिमेंटी शिस्तही अर्थात् तेथें आलीच होती. पीटर व त्याच्यानंतरचे राजे ह्यांचे कारकीर्दींत खासगी कर्मणुकी ठरविल्या असून त्यांजबद्दल नियम असत; पोषाक बदलण्याबद्दल लोकांवर जबरी असे; उपाध्ये लोकांना दाढी राखण्याची मनाई असे; आणि घोड्यांचीं जिनें देखील विशिष्ट नमुन्याचीं असावीं लागत. धंदे-उद्योगांचे संबंधानें नियमन इतकें असे कीं, तरुणानें कोणताही धंदा पत्करणें किंवा सोडणें, सरकारी नोकरी सोडून देणें, आपल्या मालमत्तेची वासलात लावणें, किंवा परदेशीं प्रवासास जाणें, ह्या सर्व गोष्टी झाराच्या परवानगीनें कराव्या लागत.

ह्या पांच निरनिराळ्या उदाहरणांचा विचार करतां आपणास असें म्हणावें लागतें कीं, त्यांच्यांत समाजरचनेचीं जीं साम्यें दृष्टीस पडतात तीं त्यांतील घटकांना

वंशपरंपरेनें एकच शील प्राप्त झालेलें असल्यामुळें उत्पन्न झालेलीं आहेत असें म्हणतां येणार नाहीं; कारण हे सर्व लोक एकमेकांपासून जातीनें अगदीं भिन्न आहेत. बरें, त्यांच्या लोकसंख्याही इतक्या भिन्न असल्यामुळें त्यांचीं रचनासाम्यें त्यांच्या आकारसाम्यांवरून उत्पन्न झालेलीं आहेत असेंही नाहीं. बरें, हवा, पाणी, जमीन, वनस्पति, प्राणी, इत्यादि परिस्थिति सारखी असल्यामुळें, आणि त्या परिस्थितीवरून सारख्या संवयी लागल्यामुळें, हीं रचनासाम्यें उत्पन्न झालेलीं आहेत असेंही म्हणतां येत नाहीं. म्हणून त्यांच्यांत दिसणारे सदृशविशेष अन्य कोणत्याही कारणाच्या माथीं मारतां येत नसल्यामुळें, त्यांच्यांत दिसणारी जी नेहमींची युद्धशीलता तिच्याच माथीं ते मारिले पाहिजेत. नुसत्या अनुभवमूलक अनुमानावरून देखील ही गोष्ट ठरत आहे; आणि पूर्व कलमांतून निरूपिल्याप्रमाणें विचारमूलक अनुमानाशीं ती जुळत असल्यामुळें तिला ज्यास्त जोर येतो.

१२८. युद्धशीलता सारखी चालू राहिली म्हणजे युद्धशील घटनेची आणखीही वाढ कशी होते हें लक्षांत आणिल्यानें, ह्या विषयाच्या संबंधानें कांहीं संशय राहिला असल्यास दूर होणार आहे. म्हणून त्याच्या संबंधानें तीनच उदाहरणें देऊं.

रोमन लोकांचे विजय चालले असतां, यशस्वी सेनापतीनें स्वेच्छाचारी बनावें अशी वरचेवर दिसून येणारी प्रवृत्ति जेव्हां फलद्रुप झाली (यशस्वी सेनापति जेव्हां स्वेच्छाचारी राजा बनला)—जेव्हां इम्परेटॉर ही मूलअर्थीं लष्करी पदवी दिवाणी शास्त्यास लावूं लागले, आणि अशा

रीतीनें लष्करी नायकीपासून दिवाणी नायकी उत्पन्न होणें ही जी पहिल्यापासून दिसणारी गोष्ट ती दृश्य झाली—आणि नेहमीप्रमाणें मुख्य शास्त्यास ऑगस्टस (मोठा) ही पदवी मिळून त्यास लोकांच्या दृष्टीनें जेव्हां दैविक स्वरूप ज्यास्त ज्यास्त येऊं लागलें—तेव्हां त्याजबरोबरच लष्करी नमुन्याचे ठिकाणीं दिसणारे जे विशेष त्यांस पहिल्याहून ज्यास्त ज्यास्त ठळक स्वरूप येऊं लागलें. म्हणजे, राष्टाचे अन्य अधिकार तेही नांवानें नाहीं तरी वस्तुतः राजा आपल्या ठिकाणीं ओढून घेऊं लागला. उदाहरणार्थ, कायदे करण्याचा अधिकार, अपिलें ऐकण्याचा, कायदे व म्याजिस्ट्रेट यांचे विरुद्ध वागण्याचा, सेनेट किंवा लोक यांस बलावून त्यांचा अध्यक्ष होण्याचा,—इतके अधिकार त्यास प्राप्त झाले आणि हे अधिकार त्यास जन्मभर असून रोमच्या सर्व साम्राज्यांत असत; आणि त्याबद्दल तो कोणासही जबाबदार नसे. या फेरफारांबरोबरच समाजविभाग ज्यास्त होऊन ज्यास्त ठळक झाले. उदाहरणार्थ, सरदारांचेच तीन मुख्य वर्ग बनले. ते असेः—मूळच्या प्याट्रिशयन वर्गाचे सरदार; सेनेटमधील सरदार; आणि सेनेटरचे मुलगे. हे सर्व लोक गरीब लोकांच्या महासमूहावर आपला भार घालीत असत. याबरोबर कारभारीमंडळही ज्यास्त विस्तृत व संकीर्ण बनून गेलें. उदाहरणार्थ, आगस्टसनें अनेक नव्या जागा उत्पन्न केल्या. सार्वजनिक कामांचा देखरेख्या, रस्त्यांचा, पाण्याच्या नळांचा, टैबरनदीचा, लोकांमध्यें धान्य वांटून देण्याच्या कामाचा, इ० इ०.जमाबंदी खात्यांतही याप्रमाणेंच त्यानें अनेक नवे

कामगार नेमिले, आणि एकटचा रोम शहरांत १०६० म्युनिसिपल हपीसर असत.

लष्कराला योग्य अशी जी संघटना ती दोन तऱ्हांनीं पसरली. लष्करी अंमलदारांकडे दिवाणी कामें आलीं, आणि दिवाणी अंमलदार कांहीं अंशीं लष्करी बनले. लोकांनीं नेमिलेल्या म्याजिस्ट्रेटांच्या ऐवजीं बादशाहानें नेमिलेले म्याजिष्ट्रेट येऊन त्यांना दिवाणी अधिकाराबरोबर लष्करी अधिकारही प्राप्त झाला, आणि लष्करी अधिकाऱ्यांना आगस्टसच्या नंतर सगळा दिवाणी अधिकार प्राप्त होऊं लागला. याबरोबर म्याजिष्ट्रेटांचें स्वातंत्र्यही नष्ट होत चाललें आणि या सरकारावलंबी म्याजिष्ट्रेटांनीं दिलेले हुकूम अमलांत आणण्याकरितां लष्कर कायमचें बनविलें आणि त्यास कडक शिस्त लावून दिली. अशा रीतीनें नियामक व आपले हुकूम जबरीनें अंमलांत आणणाऱ्या संघटनेच्या वाढीबरोबर माल उत्पन्न करणारांवरच्या मागण्याही वाढल्या, आणि पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कामकरी वर्गास हळूहळू कायमच्या लष्करी कोठावळ्यांचें किंवा कमिसेरियाटचें स्वरूप आलें. शेवटीं सर्व इटालीभर अशी स्थिति झाली कीं दास्यांतून मुक्त केलेल्या लोकांकडे मोठाले प्रदेश दिले जाऊन त्याबद्दल त्यांनीं एवढेंच करावें असें ठरलें कीं, त्यांनीं कामकरी लोकांना होईल तेवढें अल्प खावयास घालून त्यांजपासून साधेल तितकें ज्यास्त काम घ्यावें.

आतां एक आधुनिक उदाहरण घेऊं; तें जर्मनीच्या साम्राज्याचें होय. त्या देशांत युद्धशील नमुन्याचे जे विशेष फ्रान्साशीं १८७०–७१ मध्यें झालेल्या युद्धा-

च्या अगोदर दिसत होते ते त्या लढाईनंतर ज्यास्त स्पष्टपणें दिसूं लागले आहेत. सैन्याची एकंदर संख्या दोन लाखांनीं ज्यास्त झाली आहे. शिवाय, जर्मनींतील लहान लहान संस्थानांनीं आपापल्या सैन्यांवरचा अधिकार बादशाहाचे स्वाधीन केल्यामुळें एकंदर जर्मन सैन्य पूर्वींहून ज्यास्त संकलीभूतही झालें आहे. शिवाय, सैन्याला लागणाऱ्या खर्चाची मंजुरी पूर्वीं जी प्रत्येक वर्षीं तेथील पार्लमेंताकडून मिळत असे, ती आतां चार चार व सात सात वर्षांची मिळूं लागली आहे; याचा अर्थ असा कीं, बादशाहाच्या सत्तेवरील लोकाधिकाराचा जो आळाबंदा तो कमी होत चालला आहे. त्याबरोबरच लष्करी अंमलदार दिवाणी अंमलदारांना दोन रीतींनीं हुसकून लावीत आहेत. जे सब् आलटर्न पुष्कळ वर्षें नोकरी करितील त्यांस उत्तेजनार्थ दिवाणी नोकऱ्या देऊं लागले आहेत, आणि जे शिक्षक वगैरे लोक एक वर्ष व्हालंटियरचें काम करितील त्यांस कमिशन्ड-हपीसर नेमीत असतात. धर्मखातेंही राजकीय खात्याचें पूर्वींहून ज्यास्त अंकित झालें आहे. बिशपांनीं सस्पिंड केलेल्या भटांना सरकार नोकरीवर तसेंच ठेवूं शकतें; एकाद्या उपाध्यानें सार्वजनिक रीतीनें सरकारविरुद्ध चळवळींत अंग घातल्यास त्यास शिक्षा होते; न ऐकणाऱ्या बिशपाचा पगार बंद करितात; भटांची परीक्षा सरकारांतून होते; इ० इ०. औद्योगिक चळवळींकडे पाहतां बहुतेक आगगाड्या सरकारच्या झाल्या आहेत; धंद्यांस उत्तेजन देण्याकरितां परकी मालावर जकाती बसविल्या आहेत; फाजील व्याजाविरुद्ध कायदे जिवंत केले आहेत, आणि

रविवारची सुट्टी अमलांत आणिली आहे. पोस्टाची स्थापना करून हुंडयांचें वगैरे काम सरकारानें आपल्या हातांत घेतलें आहे, आणि पुस्तकें देखील सरकार लोकांस प्रकाशकांकडून आणून देतें. शिवाय, सामाजिक जीवितावरील सरकारी नियंत्रण प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या वाढविणारे कायदे झालेच आहेत. असल्या कायद्यांखालीं १८८० सालापावेतों २२४ सोशियालिस्ट मंडळ्या बंद केल्या आहेत, २८० मासिकें दाबून टाकिलीं आहेत, व ३१७ पुस्तकें निषिद्ध ठरविलीं आहेत. शिवाय, व्यापारी जमाती, व सरकारी विमा उतरणाऱ्या मंडळ्या, ह्यांना तेथील प्रधान उत्तेजन देत आहेत. ह्यावरून एकंदर संघटना ज्यास्त संकलित कशी होत चालली आहे, औद्योगिक रचनेच्या मानानें यौद्धिक रचना कशा वाढत चालल्या आहेत, दिवाणी संघटनेबद्दल लष्करी संघटना कशी उत्पन्न होत आहे,—म्हणजे व्यक्तीवरील नियंत्रण वाढून तिच्या जीविताचें नियमन ज्यास्त बारीक रीतीनें कसें व्हावयास लागलें आहे, हें स्पष्ट दिसतें.

शेवटचें उदाहरण, साहेब म्हणतात, खुद्द इंग्लंदचेंच घेऊं. त्या देशांत अलीकडे (१८७६-७७ सालापासून) लष्करी चळवळीस इतका जोर आला आहे कीं, इंग्लंदच्या सचित्र साप्ताहिकांतून लढाईखेरीज दुसरीं चित्रेंच बहुतेक येत नाहींशीं झालीं आहेत. उद्यमशील नमुन्याचें विशेष चिन्ह जें स्वैच्छिक सहकार्य त्याच्या ऐवजीं युद्धशील नमुन्याचें विशेष चिन्ह जें जबरीचें सहकार्य तें त्या देशांत कसें दिसूं लागलें आहे ह्याचीं उदाहरणें अगोदरच (दुसऱ्या भागांत) दिलीं आहेत. पण ल-

ष्करी संघटनेमध्येंच हल्लीं तसलेच फेरबदल होत आहेत. उदाहरणार्थ, जी व्हालंटियर फौज प्रथम देशाच्या संरक्षणासाठींच म्हणून तयार केलेली होती ती बाहेर देशीं युद्धाला पाठविण्याचें घाटत आहे (बोअर युद्धांत गेली होतीच); म्हणजे, तीस कायमच्या फौजेचें ज्यास्त ज्यास्त स्वरूप येत आहे. शिवाय, इतके दिवस लष्करी हपीसर कामावर नसले म्हणजे त्यांस साधा गृहस्थी पोषाक घालतां येत असे, पण आतां असा हुकूम सुटला आहे कीं त्यांनीं नेहमींच आपले युनिफार्म वापरावे. शिवाय, दिवाणी कामावर लष्करी लोक नेमण्याची प्रवृत्ति वाढत चालली आहे; उदाहरणार्थ, १८७४ सालीं शास्त्रीय व कलाविषयक वर्गाचे ९७ तपासनीस लष्करी खात्यांतील होते. पोलिसालाही रिव्हॉल्व्हर नामक छोट्या बंदुका देऊन लष्करी शिपायांचें स्वरूप देण्यांत येत आहे. याशिवाय अन्य रीतींनींही खासगी संस्थांबद्दल सरकारी संस्था स्थापन करण्याकडे कल वाढत चालला आहे. शास्त्रीय शोध करण्यासाठीं सरकारानें आधींच कांहीं देणग्या दिलेल्या आहेत, आणि त्या वाढवा म्हणून कांहीं लोक म्हणत आहेत. शिकविण्याचा अधिकार असलेल्या शिक्षकांची नोंद ठेवण्याचा कायदा घाटत आहे; तद्वतच स्थानिक सार्वजनिक पुस्तकालयांची तपासणी मुख्य सरकाराकडून व्हावी म्हणून एक बिल पुढें आलें आहे. आयुष्याचा विमा प्रत्येकानें उतरलाच पाहिजे म्हणून कांहीं लोक म्हणत आहेत; आणि एका गोष्टींत नियंत्रण केलें म्हणजे दुसऱ्या गोष्टींत तें करण्याची आवश्यकता त्यापासून कशी उत्पन्न होते

ह्याचें तें उत्कृष्ट उदाहरण आहे; कारण जबरीच्या धर्मादायाच्या कायद्यामुळें गरीब लोक अविचारानें लग्नें करावयास लागल्यावरून त्या लग्नांपासून होणाऱ्या संततीच्या पोषणासाठीं जबरीच्या विम्याचा कायदा करावा लागत आहे.

एवंच असें दिसतें कीं जे समाज नेहमींच मोठ्या प्रमाणावर युद्धशील असतात त्यांच्याच ठिकाणीं त्या नमुन्याला योग्य असे विशेष दिसतात असें नाहीं, तर इतर समाजांतूनही युद्धशीलता वाढली म्हणजे तिला योग्य असे विशेष वाढूं लागतात.

१२९. एकाद्या समाजाची रचना आणि त्याच्या घटकांचे स्वभाव यांच्यामध्यें एकप्रकारचा निकट संबंध असतो असें कांहीं ठिकाणीं स्पष्ट विधान केलें आहे, आणि कांहीं ठिकाणीं ध्वनित केलें आहे. म्हणून नमुनेदार अशा युद्धशील समाजाच्या घटकांचे स्वभाव कसे असावे, आणि बहुधा कसे असतात, ह्या गोष्टींचें बारीक रीतीनें विवेचन करूं.

इतर गोष्टी समान असल्यास, एकाद्या समाजाचे घटक ज्या मानानें शारीरिक शक्ति आणि शौर्य यांनीं युक्त असतील त्या मानानें ते युद्धांत यशस्वी होतील. आणि, एकंदरींत, एकमेकांशीं झगडणाऱ्या समाजांपैकीं ज्यांच्यांत लढाईस लागणारे शारीरिक व मानसिक गुण केवळ फारच ठळक नव्हत, तर फारच सन्मानितही असतील, तेच समाज टिकाव धरितील व पसरतील. इजिप्शन व आसीरियन खोदीव लेख व चित्रें ह्यांवरून असें दिसतें कीं, ते लोक इतर सर्व गुणांपेक्षां शौर्याचें

टिपण करून ठेवणें विशेष महत्त्वाचें समजत. 'चांगला', 'न्यायी' इत्यादि शब्द जेव्हां प्राचीन ग्रीक लोक योजीत तेव्हां कुलीन, श्रीमान्, वजनदार, शूर, अशा अर्थानें योजीत, मग तो माणूस नैतिक गुणांनीं कसाही असो; आणि 'वाईट' हा शब्द गरीब, नीच, दुबळा, अशा अर्थानें योजीत, मग तो माणूस कितीही सद्गुणी असो. रोमन लोकांत सद्गुण आणि शौर्य हीं एकच समजत ह्याचाही अर्थ तोच आहे. यूरोपामध्यें प्रारंभीच्या दंग्याधोप्याच्या काळीं सरदारी शील म्हणजे मोठें सन्मान्यशील समजलें जात असून त्यांत मुख्यत्वेंकरून धीटपणाचा समावेश होत असे; तो गुण जर नसेल तर बाकीच्या गुणांची कांहींच किंमत नसे; आणि तो जर असेल तर इतर पुष्कळ अवगुणांकडे, ते कितीही मोठे असले तरी, काणाडोळा करीत.

रानटी लोकांच्या परस्परविरोधी समूहांमध्यें, कांहीं समूह आपल्या घटकांना ठार करणें इतरांपेक्षां जर ज्यास्त सहन करीत असतील,—म्हणजे, कांहीं समूह नेहमींच सूड घेत असून अन्य जर घेत नसतील, तर त्यांच्यावर नेहमीं हल्ले होत जाऊन ते हळू हळू नष्ट होत जातील, किंवा त्यांस अनिष्ट प्रदेशांतून वस्ती करावी लागेल. म्हणून नेहमीं अक्षमाशीलांचा तगाव निघत असतो. शिवाय, सूड उगविण्याचा कायदा प्रथम विरोधी समूहांमध्यें अंमलांत येऊन नंतर समूहांतल्या समूहांतच अंमलांत येतो; आणि समूहांतील कुटुंबांमधील व ज्ञातींमधील नेहमींचे तंटे जीवास जीव ह्या सामान्यतत्त्वावर चालूं लागतात. म्हणून युद्धशील अमदानींत

सूड उगविणें हा सद्गुण बनतो, आणि तसें करण्यास चुकणें हा दुर्गुण बनतो. फीजीयन लोक मुलांस राग यावा एतदर्थ उत्तेजन देत असल्यामुळें, कोणीं अपमान केल्यास तो मुकाट्यानें करण्याच्या ऐवजीं माणसानें आत्महत्या करावी अशीं उदाहरणें वरचेवर घडतात; आणि अशींही घडतात कीं मरणाऱ्या माणसानें आपल्या मरणाचा सूड उगविण्याचें काम आपल्या मुलावर संपवावें. हा मनोभाव आणि त्यापासून उद्भवणाऱ्या चाली एरवीं अगदीं विसदृश परंतु चांगल्याच युद्धशील अशा अनेक लोकांत दृष्टीस पडतात. ह्याचें अगदीं पूर्वेकडचें उदाहरण म्हटलें म्हणजे जपानी लोकांचें होय. त्यांस असें शिकविलेलें असतें कीं, आपल्या बापास मारणारासमवेत माणसानें एकाच आकाशाखालीं राहतां कामा नये; आपल्या भावास मारणाराविरुद्ध शस्त्र आणण्यासाठीं त्यास कधीं घरीं जाण्याचा प्रसंग येतां कामा नये; आपल्या मित्रास मारणाराबरोबर त्यानें एकाच राष्ट्रांत रहातां कामा नये. पश्चिमेकडील उदाहरण पाहिजे असल्यास फ्यूडल पद्धतीच्या अमदानींतील फ्रान्साचें घ्या. तेथें त्यावेळीं अशी चाल असे कीं, कोणी ठार झाला असल्यास किंवा त्यास दुखापत झाली असल्यास त्याच्या आप्तांनीं त्याबद्दलचा सूड तो गुन्हा करणाराच्या कोणत्याही आप्तावर उगवावा, मग तो आप्त अगदीं दूर रहात असून त्यास त्या कृत्याबद्दल कांहींही माहिती नसली तरी हरकत नाहीं. जेथें युद्धशीलता फार जोरांत असेल तेथें सूड घेणें हें सार्वजनिक व खासगी कर्तव्य बनतें हें हल्लीं मॉन्टीनीग्रोमधील लोकांत दृष्टीस पडतें, कारण ह्या कारणामुळें

हे लोक तुर्क लोकांशीं आज कित्येक शतकें लढाया करीत आहेत.

जेथें शत्रूंचा संहार करण्याची चळवळ सारखी चाललेली असेल तेथें त्या कृत्यापासून तें करणारास आनंद व्हावयास लागेल; जेथें इतर माणसांस जित करणें हें मोठें सन्माननीय कृत्य समजलें जात असेल, तेथें इतरांवर आपला पगडा जोरानें बसाविण्यांतच माणसांस आनंद वाटूं लागेल; आणि जित लोकांस लुबाडण्यांत प्रतिष्ठा वाटूं लागली म्हणजे त्याबरोबर मालमत्तेवरील एकंदर जे हक्क त्यांच्याविषयीं त्या लुबाडणारास बेपर्वाई वाटूं लागेल. आतां जे लोक शत्रूच्या समोर शौर्यानें वागतात ते मित्रांसमवेत भित्रेपणानें वागतील ही गोष्ट जशी संभवनीयच नाहीं, तद्वतच इतरत्र नेहमीं लढाया करून जे मनोविकार वृद्धिंगत झाले असतील ते घरींही आपला प्रभाव पाडणार नाहींत हीही गोष्ट संभवनीय नाहीं. नुक्तेंच आपल्या नजरेस आलेंच आहे कीं समाजाबाहेर सूड उगवीत राहिल्यानें समाजांतही सूड उगविण्याची प्रवृत्ति लोकांमध्यें उत्पन्न होते;आणि नेहमींच्या लढाईमुळें त्यांच्यामध्यें विचार व कृति एतद्विषयक ज्या ज्या संवयी उत्पन्न होतील त्यांचे परिणाम एकंदर सामाजिकजीवितावर झालेच पाहिजेत. निरनिराळ्या काळच्या व स्थळच्या उदाहरणांवरून असें स्पष्ट होतें कीं, युद्धशील समाजांत जीवित, वित्त, आणि स्वातंत्र्य एतद्विषयक हक्कांची फारशी पर्वा कोणी करीत नाहीं. उदाहरणार्थ, जे डाहोमन लोक इतके युद्धशील आहेत कीं त्यांच्या बायकाही लढवय्यांचें काम करितात त्यां-

च्यामध्यें केवळ लोकांच्या संतोषासाठीं कैद केलेल्या शेंकडों लोकांस सार्वजनिक रीतीनें ठार करण्यांत येत असतें. फीजीयन लोकांचे उद्योग व संघटना दोन्ही युद्धयोग्य असून ते केवळ भोजनसमारंभाकरितांच आपल्याच लोकांना मारितात असें नाहीं, तर आपलीं अर्भकेंही शतशः ठार करितात, आणि एकादी नवी होडी पाण्यांत प्रथम ढकलावयाची अशा शुष्क प्रसंगीं देखील माणसांचे बळी देतात, आणि खून करणें म्हणजे मोठें प्रतिष्ठेचें कृत्य समजतात. आशिया व यूरोप ह्यांच्या प्राचीन इतिहासावरून तरी तीच गोष्ट व्यक्त होते. उदाहरणार्थ, मोंगल व तुर्क लोक पहिल्यापासून घरच्या घरांत खून करीत आहेत व अद्यापिही करितात. ग्रीक व लाटिन जातींच्या लोकांची स्थिति अशीच होती हें, स्पार्टन लोकांनीं एकदां दोन हजार हेलट लोकांना ठार केलें होतें, आणि क्रूर रोमन बादशाह केवळ संशयावरून शेंकडों नागरिकांना ठार मारीत, ह्यावरून स्पष्ट दिसतें. आतां जेथें माणसांच्या जीविताची इतकी बेपर्वाई आहे तेथें त्यांच्या स्वातंत्र्याची किती असेल हें सांगावयासच नको. जे लोक दुसऱ्यास ठार करण्यास कांकूं करीत नाहींत ते त्यांस गुलाम करण्यासही कांकूं करणार नाहींतच. म्हणूनच लढवय्ये रानटी लोक लढाईंत सांपडलेल्या शत्रूंस ठार करितात किंवा गुलाम बनवितात. प्राचीन काळीं जिकडे तिकडे कमज्यास्त युद्धशीलता नेहमींचीच असल्यामुळें, लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याविरुद्ध सामान्यजनमनोभाव इतका अल्प होता कीं, प्रारंभींच्या

ख्रिस्ती धर्मांत देखील गुलामगिरीचा स्पष्टपणें निषेध केलेला नाहीं. जीवित व स्वातंत्र्य ह्यांची अशी स्थिति असल्यामुळें वित्ताचीही सहजच तशीच असते. जेथें जबरीनें स्थापिलेली मालकी प्रतिष्ठेची समजतात, तेथें दुर्बलांनीं मालमत्तेवर सांगितलेले हक्क सबल लोक फारसे मानतील हें संभवनीय दिसत नाहीं. फीजी बेटांत प्रजेचा माल बुचाडून आणणें हें नायकास फार शोभतें असें समजतात; आणि चोरी जर उमगूं दिली नाहीं तर तो मोठा गुण समजतात. स्पार्टन लोकांमध्येंही चोरीच्या संबंधानें अशीच समजूत असे. मध्यकालीन यूरोपामध्यें एका समाजास दुसरा समाज नेहमीं लुबाडीत असतां, समाजांतल्या समाजांत देखील अशा लुबाडण्या सारख्या चालतच असत; आणि ह्या केवळ सामान्यलोकच करीत असें नाहीं, तर सरकारी नोकरही करीत.

जेथें लढाई नेहमींच्या परिपाठांतील असेल, आणि जरूर ते गुण अत्यन्त संमानित असतील, तेथें ज्यांच्या अंगीं ते दिसणार नाहींत त्यांना लोक तिरस्कारानें वागवितील, आणि त्यांचे उद्योगधंदे अगदीं हलके म्हणून समजतील. प्रारंभींच्या पायऱ्यांवर कष्ट करणें हें काम स्त्रियांचें व गुलामांचें असतें; आणि गुलाम म्हणजे जित माणसें व त्यांचे वंशज; तद्वतच त्यांच्यांत सर्व प्रकारचा व्यापार खालच्या वर्गाचे लोक करीत असल्यामुळें ते लोक हलक्या जातीचे व स्वभावाचे म्हणून पुष्कळकाळपावेतों समजले जातात. उदाहरणार्थ, डेहामीमध्यें शेतीचा धंदा गुलाम करीत असल्यामुळें ती हलकी समजतात. जपानी सरदार व हुद्देवाले लोक,

दुय्यम प्रतीचे असले तरी, व्यापार म्हणजे अगदींच तिरस्कार्य मानतात. प्राचीन इजिप्शन लोकांबद्दल विल्किन्सन असें म्हणतो कीं, स्पार्टाप्रमाणेंच तेथीलही शिपाई लोक सगळे कळाकुसरीचे धंदे हलके समजत. रॉलिन्सन म्हणतो, प्राचीन पर्श्यन लोकांस सर्व प्रकारच्या व्यापारधंद्याचा अत्यन्त तिटकारा असे. रोमन लोकांचे विजय वाढून जेव्हां त्यांची सत्ता वृद्धिंगत होऊन गेली, तेव्हां त्यांनीं असा कायदा केला कीं, कामाबद्दल पैसा घेणें हें नीचपणाचें आहे, आणि सेनेटाचे सभासद व त्यांचे पुत्र यांनीं फायद्याच्या दृष्टीनें कोणताही व्यापार करूं नये. सर्व यूरोपभर युद्धशील वर्ग उदमीवर्गाबद्दल किती तिरस्कार व्यक्त करितो हें प्रसिद्धच आहे.

आतां समाजाच्या फायद्यासाठीं स्वताचा जीव धोक्यांत घालण्याची इच्छा असण्यास, स्वदेशाभिमान ज्यास म्हणतात तो मनोभाव अंगीं बराच असला पाहिजे. स्वताच्या देशासाठीं मरणें हें मोठें कीर्तीचें काम आहे ही समजूत जरी आवश्यक आहे असें म्हणतां येणार नाहीं, कारण भाडोत्री शिपाई अशा समजुतीशिवायही लढतात,—तरी असली समजूत लढाईंत यश येण्यास फार उपयोगीं पडते यांत संशय नाहीं; आणि ह्या समजुतीची पूर्ण वाण कोणत्याही प्रकारच्या लढाईस इतकी प्रतिकूल आहे कीं, इतर गोष्टी समान असल्यास त्यामुळें अपेश येऊन पारतंत्र्य येण्याचा संभव फार आहे. म्हणून ज्या समाजांतून स्वदेशाभिमानबुद्धि विशेष जागृत असेल त्यांचा टिकाव लागल्यामुळें ती त्यांच्यांत कायम होत असते.

ह्याच मनोभावाबरोबर आज्ञाधारणाचा मनोभावही येतो. ज्या संयुक्तक्रियेमुळें, इतर गोष्टी समान असल्यास, लढाईत यश येतें, ती संयुक्तक्रिया उत्पन्न होणें ही गोष्ट आपल्या इच्छा सेनापतीच्या इच्छेहून कमी दर्जाच्या समजण्याची जी व्यक्तींची तयारी तिजवर अवलंबून असते. म्हणजे निष्ठा ही आवश्यक आहे. प्रारंभींच्या पायऱ्यांवर तिचें प्रदर्शन तितक्यापुरतेंच असतें. उदाहरणार्थ, ऑराकेनियन लोक एरवीं दुसऱ्याच्या कह्यांत राहण्याच्या अगदीं प्रतिकूल असून, लढाईच्या वेळीं तेवढें मात्र त्या वेळापुरत्या नेमलेल्या सेनापतीच्या अगदीं धोरणानें वागतात. पण युद्धशील नमुना जसा पक्क होत जाईल, तसा हा मनोभाव कायमचा होतो. उदाहरणार्थ, एरस्किन सांगतो कीं, फीजियन लोक फारच राजनिष्ठ असतात. राजाच्या वाड्याच्या पायाखालीं जिवंत पुरले जाणाऱ्या लोकांस आपल्यास हा मोठा मान मिळतो आहे असें त्यांच्यांत वाटतें. एका गुलामप्रांतांतील लोक म्हणाले, राजाच्या भक्ष्यस्थानीं पडणें हें आमचें कर्तव्यच आहे. डेहामीमध्येंही राजनिष्ठा अशाच प्रकारची आहे. प्राचीन ईजिप्तमध्येंही तसेंच होतें. स्पार्टामध्यें पूर्वीं सांगितले कारणांवरून जरी एक राजा उत्पन्न झालेला नव्हता, तरी जी राज्यव्यवस्था उत्पन्न झालेली होती ती त्या लोकांस अगदीं शिरसा वंद्य असे. रोममध्यें देखील जरी देवनियुक्त राजा नसे, तरी तेथील लोक लोकनियुक्त राजाचे फार अंकित असत, आणि विशेषप्रसंगींच आपलें विरुद्ध मत प्रकट करीत. एकंदर युरोपाचा इतिहास चाळतां असें दिसून येतें कीं, जेथें जेथें युद्धशील

नमुना फार ठळक झालेला आहे, तेथें तेथें राजनिष्ठेचा मनोभाव फार प्रबल बनलेला आहे.

हे जे स्वभावाचे ठळक विशेष त्यांवरून नजर काढून ती आतां आपण कमी ठळक अशा विशेषांकडे लावूं या. निष्ठेबरोबर अर्थात् श्रद्धा येत असते, कारण हे दोन मनोभाव बहुतेक एकच आहेत. समरांगणांत सेनापतीच्या आज्ञा मानण्याची तत्परता शिपायांमध्यें असण्यास त्याचा त्याच्या युद्धकौशल्यावर विश्वास पाहिजे; आणि शांततेच्या वेळीं तशी तत्परता लोकांमध्यें उत्पन्न होण्यास दिवाणी कामांतही तो हुशार आहे असा त्यांचा विश्वास पाहिजे. त्याला जसजसा एकेक ज्यास्त जय येत जाईल तसतसा लोकांच्या कल्पनाशक्तीवर त्याचा ज्यास्त ज्यास्त पगडा बसून त्याचा अधिकार वाढत जातो. कारण लोकांच्या जीवितांचें नियमन करण्याची शक्ति त्याच्या अंगीं आहे अशाविषयीं आणखी आणखी व ज्यास्त ज्यास्त ठळक असे पुरावे त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागतात, आणि त्याची शक्ति अमित आहे अशी कल्पना त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागते. त्यावरून सरकारी व्यवस्थेविषयीं त्यांच्या ठिकाणीं अमर्याद विश्वास उत्पन्न होऊं लागतो. खासगी व सार्वजनिक सर्व व्यवहार पाहणाऱ्या सरकारी व्यवस्थेखालीं लहानाचे मोठे झालेल्या लोकांस सहजच असें वाटूं लागतें कीं, कोणत्याही कामाची व्यवस्था अन्य तऱ्हेनें व्हावयाचीच नाहीं. ज्यांस दुसऱ्या एकाद्या प्रकारच्या व्यवस्थेचा अनुभवच नाहीं, त्यांस तसल्या व्यवस्थेची कल्पनाच होत नाहीं.

असें झालें म्हणजे सहजच एकाद्या व्यक्तीनें आपण

होऊन एकादी गोष्ट करणें ह्याच्यावर विरजण पडतें, आणि त्यामुळें खासगी साहसाची वाण उत्पन्न होते. एकादी फौज ज्या मानानें व्यवस्थित बनत जाईल, त्या मानानें त्यांतील घटकांनीं स्वतंत्ररीत्या कोणतीही गोष्ट करण्यास मनाई उत्पन्न होते, आणि सर्वांस ठराविक पद्धतीनें आपापलीं कामें करावीं लागूं लागतात. गुलाम म्हटले म्हणजे त्यांचे धनी सांगतील तेंच ते करणार; बरें, ते धनी देखील सरकारी परवानगीवांचून कोणतीही नवी गोष्ट करण्यास असमर्थ असणार; आणि वरच्या दर्जाच्या सर्व अधिकाऱ्यांचा अनुक्रमानें सल्ला घेतल्याविना स्थानिक अधिकाऱ्याची परवानगी मिळणें अशक्य. म्हणून अधिकारी काय देतील तें मुकाट्यानें स्वीकारणें, आणि पुढाऱ्याची आशा करीत बसणें अशा प्रकारची मनोवृत्ति अशा परिस्थितींत उत्पन्न होते. जेथं युद्धशील नमुन्याची पूर्ण वाढ झालेली असेल तेथें प्रत्येक गोष्ट सार्वजनिक संस्थांच्या हातूनच झाली पाहिजे; ह्यास कारण त्या संस्थांनीं सर्व क्षेत्रें व्यापिलीं असतात एवढेंच नव्हे, तर त्यांनीं तीं व्यापिलीं नसतील तर कोणतीही गोष्ट व्हावयाचीच नाहीं; आणि ह्यास कारण स्वतः कोणतीही गोष्ट करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या सर्व कल्पना व मनोभावना लोकांच्या मनांतून नष्ट झालेल्या असतात हें होय.

एथवर सांगितलेल्या नैतिक परिणामांबरोबर एक बुद्धिविषयक परिणाम उत्पन्न होत असतो, तो आतां सांगितला पाहिजे तो हा कीं, पौरुष कार्यकारणसंबंध तेवढा अशा लोकांच्या लक्षांत येत असतो आणि अपौ-

रुष येत नसतो. मूळ माणसाला कारण शब्दाच्या आधुनिक अर्थाची कल्पना नसते. त्याच्या सृष्टिकल्पनेप्रमाणें म्हटलें म्हणजे जिवंत माणसें आणि मृत माणसांचीं भुतें एवढेंच कायतें कार्यकर तो समजत असतो. अकस्मात् घडणाऱ्या सर्व गोष्टी आणि नेहमींच्याच परंतु निरनिराळ्या तऱ्हांनीं होणाऱ्या गोष्टी दैविक सत्त्वें करितात म्हणून तो समजतो. आणि ही उपपत्तिसरणी सुधारणेच्या पहिल्या पायऱ्यांवर कायम राहते; उदाहरणार्थ, होमरनें वर्णिलेले ग्रीक लोक लढाईत जखमा होणें, मृत्यु येणें, किंवा बचाव होणें, हीं सर्व देवांच्या कृपेनें किंवा अवकृपेनें होत असतात म्हणून समजत, आणि सर्व चांगल्या किंवा वाईट कृत्यांची प्रेरणा देवच करितात म्हणून मानीत. युद्धशील घटना आणि चळवळी चालू असतील तोंपावेतों ही विचारसरणी कायम राहते. ह्याचें पहिलें कारण हें कीं, ती वेळ कार्यकारणसंबंध शोधून काढण्यास प्रतिकूल असते. शास्त्रें हीं कलांपासून उत्पन्न होत असतात; म्हणजे, कलांच्या अभ्यासापासून जीं सत्यें प्रत्ययास येतात त्यांस सामान्यस्वरूपें दिल्यानें त्यांना सुरवात होत असते. पदार्थ उत्पन्न करण्याच्या पद्धति जसजशा वाढत जातील व ज्यास्त ज्यास्त संकीर्ण होत जातील, तसतशा ज्यास्त ज्यास्त नियमबद्धता किंवा एकस्वरूपता (uniformities) लक्षांत येऊं लागतात; आणि आवश्यक व भौतिक कारण ह्यांजबद्दलच्या कल्पना लोकांच्या मनांत उत्पन्न होऊन वृद्धिंगत होतात. परंतु युद्धशीलता औद्योगिक प्रगतीस अडथळा आणीत असल्यामुळें पौरुष कार्यकरांबद्दल अ-

पौरुष कारणांची कल्पना उत्पन्न होण्यास ती प्रतिकूल असते. दुसरें कारण हें कीं, बौद्धिक शिक्षणास युद्धशीलता प्रत्यक्ष दाबून टाकीत असते, व त्याचाही परिणाम तोच होतो. जे लोक शस्त्रास्त्रांना वाहिलेले आहेत त्यांना उद्योगाला वाहिलेल्या लोकांचा जसा तिरस्कार वाटत असतो तसाच ज्ञानाला वाहिलेल्या लोकांचाही वाटत असतो. स्पार्टन लोकांत ही गोष्ट प्राचीन काळीं उघड उघड दिसून येत असे; आणि फ्यूडल पद्धतीच्या अमदानींत सर्व यूरोपांतच ती दिसून येई; कारण त्या वेळीं शिकणें हें भटांनीं व हलक्या लोकांनींच करावें म्हणून समजत. एवंच, युद्धशीलतेच्या काळीं माणूस मूळ कल्पनांपासून मुक्त होत नाहीं, आणि नैसर्गिक नियमबंधांची कल्पना त्यास होत नाहीं. तिसरें आणि मुख्य कारण हें कीं, युद्धशील व्यवस्था असली म्हणजे पौरुषकार्यकरांचा अनुभव सारखा आणि ठळक रीतीनें येत असतो, आणि त्यामुळें अपौरुषकारणांची कल्पनाच येत नाहीं. लष्करांत सेनापतीपासून तो ड्रिल शिकणाऱ्या उमेदवारापर्यंत, सर्वांच्या हालचाली कोणत्या तरी वरिष्ठाच्या हुकमाप्रमाणें होत असतात; आणि सगळ्या समाजांतच एकंदर गोष्टी मुख्य शास्ता व त्याचे बगलबच्चे ह्यांच्या अगदीं इच्छेनुरूप होत आहेत असें लोकांच्या प्रत्ययास येत असतें. म्हणून सामाजिक व्यवहाराची उपपत्ति लावतांना लोक पौरुष कार्यकारणसंबंध तेवढा लक्षांत आणितात. इतिहास म्हणजे विलक्षण लोकांच्या कृतींचें वर्णन असा समज बनून जातो; आणि लोक मुकाट्यांनीं असें गृहीतच करूं लागतात कीं, समाज हे विलक्षण माणसांनीं बन-

विलेले आहेत. अपौरुष कार्यकारणकल्पना असल्या लोकांच्या मनाला अगदींच अपरिचित असल्यामुळें सामाजिक उत्क्रमणाची सरणी त्यांच्या लक्षांत येत नाहीं. सामाजिक रचना व व्यापार स्वाभाविकरीत्या उत्पन्न होत असतात ही कल्पना त्यांना अगदीं अनोळखीची असल्यामुळें ती कोणीं त्यांच्यापुढें मांडिल्यास त्यांस ती मूर्खपणाची वाटते. स्वताचेंच नियमन करणारी अशी एकादी सामाजिक सरणी असूं शकेल ही कल्पनाच त्यांच्या डोक्यांत भरत नाहीं. एवंच, युद्धशीलतेमुळें माणूस तिला योग्य अशा नैतिकस्वरूपाप्रतच पावतो असें नाहीं, तर बौद्धिकस्वरूपाप्रतही पावतो; आणि त्या स्वरूपीं त्यास युद्धशीलसरणीपलीकडे कांहींच दिसत नसतें.

१३०. एवंच समाजघटनेच्या युद्धशील नमुन्याचें स्वरूप आपल्या लक्षांत तीन तऱ्हांनीं येतें. त्या तीन तऱ्हांनीं लक्षांत आलेल्या गोष्टींची तुलना करतां त्या परस्परांशीं सुसंगत कशा दिसतात तें आतां पाहूं.

विरोधी समाजांपासून स्वताचें संरक्षण करण्यास योग्य होण्यासाठीं केवळ विचारावरूनच स्पष्ट दिसणाऱ्या अशा कांहीं अटी समाजास पुऱ्या कराव्या लागत असतात. संयुक्तजीवित कायम राखण्यासाठीं जरूर ती संयुक्तक्रिया अत्यंत फलप्रद होण्यास त्या क्रियेस प्रत्येकानें हातभार लाविला पाहिजे. इतर गोष्टी समान असतां, ज्या समाजांत लढवय्या लोकांच्या पोषणासाठींच अलढवय्ये लोक खपतात त्याची युद्धशक्ति सर्वांत ज्यास्त असेल; आतां अर्थात् अलढवय्या वर्ग लढवय्याचें पोषण करण्यास जेवढा पाहिजे त्याहून मात्र मोठा अ-

सतां कामा नये. बरें, सर्वांचे श्रम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या लढाईच्या कामीं खर्च होत असतां, जर ते अत्यंत संयुक्त असतील तरच अत्यन्त फलप्रद होतील; आणि लढवय्यांमध्यें संयुक्तता असून त्यांच्याशीं अलढवय्यांची सहक्रिया अशा प्रकारची असली पाहिजे कीं, त्यांची मदत त्यांस जलद रीतीनें आणि पूर्ण रीतीनें व्हावी. ह्या सर्व अटी पुऱ्या होण्यास प्रत्येक व्यक्तीचें जीवित, क्रिया, आणि वस्तू समाजास लागतील तशा उपयोगांत आणतां आल्या पाहिजेत. आतां सर्वांनीं अशा प्रकारें श्रम करावे, त्यांजमध्यें संयुक्तता असावी, आणि व्यक्तींचे हक्क समाजाच्या हक्कांत निलीन होऊन ह्या गोष्टी होण्यास अगोदर स्वेच्छाचारी नियामक घटना किंवा सरकार पाहिजे. जेव्हां समूह मोठा असेल तेव्हां लढवय्या नायकाची इच्छा अमलांत येण्यास त्याच्या हाताखालीं खालखालच्या दर्जाचे अनेक अधिकारी असले पाहिजेत; म्हणजे, त्यांच्याद्वारा लढवय्या व अलढवय्या भागांना हुकूम पोंचावितां येतील आणि ते अमलांत आणतां येतील. सेनापति शिपायास ज्याप्रमाणें त्यानें काय केलें पाहिजे व काय करतां कामा नये हें सांगतो, त्याप्रमाणेंच एकंदर सगळ्या युद्धशील समाजामध्यें एकंदर शासन खात्रीनें विधिविषयक व खात्रीनें निषेधविषयक असतें; म्हणजे शास्ता कांहीं गोष्टी करूं नका म्हणूनच लोकांस सांगतो असें नाहीं, तर कांहीं गोष्टी कराच म्हणूनही सांगतो.तात्पर्य, शिपायाप्रमाणें नागरिकही एकाप्रकारच्या सहाक्रियेच्या सरणीखालीं रहात असतो. युद्धशील नमुना जसा पक्क होत जाईल तसा तो

ज्यास्त जून होत जातो; कारण तेणेंकरून तसल्या समाजांतील व्यक्तींमध्यें जो स्निग्धपणा, जो संयुक्तपणा, जो अंकितपणा, आणि जो नियंत्रितपणा उत्पन्न होतो त्यामुळें आपल्या सामाजिक स्थिती, आपले धंदे, आणि आपलीं वसातिस्थानें बदलण्याचें त्या व्यक्तींचें जें सामर्थ्य तें अवश्यमेव कमी होतें.

गत व प्रस्तुत, आणि लहान व मोठे असे कांहीं युद्धशील समाज तपासून पाहतां, प्रत्यक्ष अनुभवरीत्या आपल्या असें प्रत्ययास येतें कीं, जात, परिस्थिति आणि वाढीचें मान, ह्यांवरून उत्पन्न झालेले भेद जरी ह्या समाजांतून दिसून येतात, तरी त्यांजमध्यें वर विचारदृष्ट्या अनुमित केलेल्या प्रकारचीं कांहीं मूलसादृश्यें आढळून येतात. उदाहरणार्थ युद्धास योग्य अशा सरणीला व्यक्तीच्या जीविताची, स्वातंत्र्याची आणि मालमत्तेची जशा प्रकारची मालकी राष्ट्राकडे असली पाहिजे तसली मालकी प्राचीन पेरू, ईजिप्त व स्पार्टा यांप्रमाणें आधुनिक डेहामी व रशिया यांजमध्यें दिसून येते. आणि युद्धविषयक उद्योगांना विशिष्ट समाजांस ज्यास्त योग्य करणारे फेरबदल जसे उत्पन्न होत जातील, तसें त्या समाजांत, शिपायांवर जसलें असतें तशा प्रकारचें हपीसरांचें वर्चस्व, त्यांचे जबरदस्तीचे हुकूम आणि त्यांची देखरेख हीं सर्वत्र पसरून जातात, ही गोष्ट जशी बादशाही रोम व बादशाही जर्मनी यांजमध्यें दिसून येते, तशीच अलीकडे बादशाही बनत चाललेल्या इंग्लंदांतही दिसून येते.

शेवटीं, युद्धशील समाजघटक व्यक्तींचे स्वभाव अ-

शा स्थितीस योग्य बनतात, अशा प्रकारचा पुरावा आपल्यास मिळतो. लढाईत यश हें सर्वांत कीर्तिकर समजून शौर्य आणि शक्ति म्हणजेच चांगलेपणा असें असल्या समाजांतील लोक समजूं लागतात. सूड घेणें हें त्यांचें एक पवित्र कर्तव्य बनून जातें; आणि सूड घेण्याचा जो कायदा ते बाहेर अमलांत आणीत असतात तो घरींही अमलांत आणून, ते बाहेरच्याप्रमाणें घरींही आपल्याकरितां इतरांस बळी देण्यास तयार होतात; कारण त्यांच्या सहानुभूती लढाईमध्यें सारख्या चेंचल्या जात असल्यामुळें शांततेच्या वेळीं त्यांस जीव येणें शक्य नसतें. म्हणून त्यांचा स्वदेशाभिमान अशा प्रकारचा असावा लागतो कीं आपल्या समाजाचा विजय हेंच आपल्या कृतीचें अत्यंत मोठें साफल्य म्हणून त्यांस वाटावें; त्यांच्या ठिकाणीं राजनिष्ठा अशा प्रकारची असली पाहिजे कीं त्यांनीं अधिकाऱ्यांची आज्ञा शिरसा वंद्य मानावी; आणि असला आज्ञाधारकपणा त्यांजमध्यें उत्पन्न होण्यास त्यांच्या मनांत अधिकाऱ्यांबद्दल भरपूर विश्वास पाहिजे. आतां अधिकाऱ्यावर भरंवसा, आणि म्हणून त्यांचे हुकूम मानण्याची तयारी हीं असलीं म्हणजे स्वताच कोणतीही नवी गोष्ट आरंभिण्याची शक्ति सहजच अगदीं क्षीण होते. प्रत्येक गोष्ट हपीसरांच्या द्वारा झालेली पाहण्याची मनास संवय झाली म्हणजे सहजच माणसास असें वाटूं लागतें कीं, हपीसरी देखरेख सर्वत्र असलीच पाहिजे; इकडे, पौरुष कार्यकारणसंबंध परिचित होईल व अपौरुष अज्ञात राहील अशा रीतीनें लोकांचे सर्व व्यवहार होऊं लागल्यामुळें सामाजिक व्यापा-

र स्वनियंत्रित व्यवस्थेनें चालवितां येतील ही कल्पना मनांत आणण्याचेंच त्यांचें सामर्थ्य नाहींसें होतें. सारांश, व्यक्तिस्वभावाचे जे विशेष युद्धशील नमुन्याला जरूरीचे म्हणून विचारांतीं आपल्यास दिसतात तेच प्रत्यक्ष युद्धशील समाजांच्या घटकांमध्यें अपल्यास आढळून येतात.

प्रकरण अठरावें

समाजाचा उद्यमशील नमुना

१३१. गतप्रकरणांत सांगितल्याप्रमाणें समाजांस आंतून आपल्या पोषणाचे व्यापार चालवीत असतां, बाहेरून बहुतेक सर्वदा शत्रूंपासून स्वसंरक्षण करावयाचें असल्यामुळें, त्यांच्यामध्यें ह्या दोन परस्पराभिन्न हेतू-साठीं योग्य अशा रचनांचीं मिश्रणें बहुधा दिसतात. त्यांची ती गुंतागुंत काढून त्या पृथक् पृथक् करणें सोपें नाहीं. ह्यांपैकीं ज्या रचनेचा विशेष जोर होईल ती दुसरींत आ-पल्या फांद्या पसरिते. उदाहरणार्थ, जेथें युद्धशील न-मुन्याची बरीच वाढ झालेली असेल, तेथें कामकरी हा बहुधा गुलाम असून तो शिपायाइतकाच परतंत्र असतो; उलट, जेथें उद्यमशील नमुना बराच पक्क झालेला असे-ल, तेथें शिपाई स्वेच्छेनें ठरीव अटींवर युद्ध करण्यास तयार झालेला असल्यामुळें, त्याला त्या मानानें स्वतंत्र काम करण्याचीच स्थिति प्राप्त झालेली असते. एका ठि-काणीं लढवय्या भागास योग्य अशी जी ठराविक स्थिती-ची सरणी ती कामकरी वर्गांत पसरलेली दिसते; आणि दुसऱ्या ठिकाणीं कामकरी वर्गास योग्य अशी जी करारी स्थितीची सरणी ती लढवय्या वर्गास लागू झालेली दृ-ष्टीस पडते. आतां, गतप्रकरणांत, हें आपल्या दृष्टीस पडलेंच आहे कीं, विचारदृष्ट्या युद्धशील नमुना जसा असावासें वाटतें तसा तो पुष्कळ समाजांत इतक्या चां-गल्या रीतीनें दिसून येतो कीं, त्याच्या वास्तविक स्व-

रूपाबद्दल कांहींच संशय रहात नाहीं; पण ह्या अद्यापि प्रबल असलेल्या युद्धशील नमुन्यानें उद्योगशील नमुन्याचे विशेष इतके झांकलेले आहेत कीं, त्याचें वास्तविक स्वरूप पूर्णपणें असें कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. वाचकांची व्यर्थ निराशा होऊं नये एतदर्थ इतकें सांगून, त्यांचे कांहीं गैरसमज होण्याचा संभव आहे त्यांचेंही एथें निराकरण करूं.

पहिली गोष्ट ही कीं, उद्यमशीलता म्हणजे उद्योगीपणा असा गैरसमज कोणीं करून घेऊं नये. उद्यमशीलतेच्या तत्त्वावर बनलेल्या समाजाचे घटक जरी बहुधा उद्योगी असतात, आणि तो समाज पक्वदशेस आला म्हणजे उद्योगी असणें हें त्यांस जरी भागच पडत असतें, तरी असल्या समाजामध्यें फार काम करणें प्रत्येकास अवश्यच असतें असें मात्र गृहीत करतां कामा नये. जेथें समाज लहान असून थोडक्या श्रमांनीं उदरनिर्वाह होईल अशा रीतीचें त्याचें अनुकूल वसतिस्थान असेल, तेथें समाजाचा नमुना उद्यमशील असूनही जिन्नस उत्पन्न करण्याचे उद्योग बेतानेंच केलेले चालतील. एथें विशिष्ट समाजास उद्यमशील असें जें आह्मी म्हणतों तें त्याच्या घटकांच्या उद्योगीपणावरून म्हणत नाहीं, तर त्यांचे कमी किंवा ज्यास्त प्रमाणांवर होणारे जे श्रम ते ज्या सहक्रियेच्या तत्त्वावर होत असतील त्याच्या स्वरूपावरून म्हणतों. हा भेद चांगला ध्यानांत येण्यास ही गोष्ट लक्षांत आणावी कीं, युद्धशील नमुन्यावर बनलेल्या समाजांत पुष्कळ उद्योग होत असूं शकेल, व बहुधा असतोही. प्राचीन ईजिप्तमध्यें कामकरी लोकवस्ती फारच

होती, आणि ते पुष्कळच व पुष्कळच प्रकारचे जिन्नस उत्पन्न करीत असत. प्राचीन पेरू देशांतही समाजरचना शुद्धयुद्धशील असून लोकसंख्या फार होती व ते सारखे श्रम करीत असत. तात्पर्य, एथें आपणास श्रमसंचयाचा विचार कर्तव्य नाहीं, तर श्रम करणारांची संघटना कोणत्या तऱ्हेची आहे ह्याचा विचार कर्तव्य आहे. शिपायांचें एकादें रेजिमेंट मातीचे बुरूज रचण्यास लाविलेलें असेल; दुसरें रान कापण्यास; तिसरें पाणी आणण्यास; पण तेवढ्यावरून तीं रेजिमेंटें तितक्या पुरतीं उद्यमशील समाज बनत नाहींत. त्यांतील संयुक्त व्यक्ती ह्या निरनिराळ्या गोष्टी हुकमाखालीं करीत असतात; आणि त्यांनीं उत्पादित वस्तूंवर त्यांचे खासगी हक्क नसल्यामुळें जरी त्यांचा काल उद्योगामध्यें जात असला, तरी त्यांची घटना उद्यमशील नसते. आणि युद्धशील समाजास रेजिमेंटी घटनेचें स्वरूप जसजसें ज्यास्त पूर्ण येत जाईल, तसतशी ही गोष्ट त्या सगळ्या समाजासच ज्यास्त ज्यास्त लागू पडूं लागते.

दुसरा एक समाजनमुना उद्यमशील नमुना म्हणून वाटण्याचा फार संभव आहे; करितां त्यापासून तो भिन्न म्हणून ओळखला पाहिजे. तो नमुना सोशियालिस्ट व कम्युनिस्ट लोक जसला असावा म्हणून म्हणतात तो होय. त्या नमुन्याच्या समाजाचे लोक जिन्नस उत्पन्न करणें व ते ठिकठिकाणीं पुरविणें ह्या कामीं केवळ गुंतले असून त्या गोष्टी ते कांहीं ठरीव नियमानुसार करीत असतात. हा नमुना उद्यमशील नव्हे असें म्हणण्याचें कारण त्यामध्यें जबरीच्या सहक्रियेच्या तत्त्वाचाच एक

दुसरा प्रकार समाविष्ट झालेला असतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या, व्यक्तींस पृथक् पृथक् आणि स्वतंत्रपणानें वाटेल तसें वागण्यास ह्या नमुन्यांत मुभा नसते; पैसे घेऊन जिन्नस देण्याच्या कामीं एकमेकांशीं वरचढ करण्याची बंदी असते, आणि योग्य वाटेल तो मजुरा घेऊन लोकांची नोकरी करण्याचीही परवानगी नसते. कामकऱ्यांचें नियमन करण्याची कोणतीही कृत्रिम पद्धति अशी असूं शकणार नाहीं कीं जिच्यामुळें स्वाभाविक पद्धतींत ढवळाढवळ होणार नाहीं. ज्या मानानें लोकांस वाटेल त्या अटींवर आपणास बांधून घेण्याची मनाई करावी त्या मानानें ते इतरांच्या हुकमाप्रमाणेंच वागत आहेत म्हणून समजलें पाहिजे. नियामक व्यवस्थेची घटना कशाही प्रकारची असो, युद्धशील समाजांतील नियामक व्यवस्थेचा नियमितांशीं जो संबंध तोच तिचाही असतो. हल्लींच्या चढाओढीच्या तत्त्वाविरुद्ध ओरड करणारे सोश्यालिस्ट लोक जी व्यवस्था अमलांत आणूं पाहतात ती आह्मी म्हणतों अशाच स्वरूपाची खरोखर कशी आहे ही गोष्ट ह्या दोन गोष्टींवरून सिद्ध होते कीं, पूर्वीं ज्या असल्या व्यवस्था अस्तित्वांत होत्या त्या जे समाज प्राधान्येंकरून युद्धशील होते त्यांच्यांत होत्या, आणि हल्लींही असल्या व्यवस्था असाव्या म्हणून जे म्हणत आहेत ते विशेष युद्धशील समाजच म्हणत आहेत.

मुख्य विवेचनास लागण्याच्या अगोदर आणखी एका गोष्टीचा खुलासा केला पाहिजे. उद्यमशील नमुन्यास योग्य अशा रचना प्रथम दृष्टीस पडल्या म्हणजे त्या स्पष्टस्वरूपींच दिसूं लागतील अशी आशा कोणीं करूं

नये. तर, उलट, त्या रचना अस्पष्ट आणि अस्थाईक अशा स्वरूपींच प्रथम उत्पन्न होण्याचा संभव आहे. त्या रचना अर्थात् पूर्वींच्या रचनांत फेरबदल होऊन उत्पन्न होत असल्यामुळें पूर्वींच्या रचनांचा सगळा मागमोस त्यांच्यांतून निघून जाण्यास अवश्यमेव पुष्कळ काळ लागतो. उदाहरणार्थ, ज्या स्थितींत कामकऱ्यांवर त्याच्या यजमानाची जनावरासारखी मालकी असून त्यानें त्याच्यासाठींच खपावें एतदर्थ त्यास तो पोटास घालीत असतो, ती स्थिति जाऊन ज्या स्थितींत तो धनी, जमीन, आणि ठिकाण यांपासून अगदीं पृथक् होऊन, पाहिजे तेथें व पाहिजे त्यासाठीं काम करण्यास स्वतंत्र बनतो, त्या स्थितीची प्राप्ति अर्थात् पायरीपायरीनेंच होते. शिवाय, युद्धशील स्थितींत पोषणाव्यतिरिक्त प्रजाजनांस कधीं कधीं बक्षिशी मिळत असते, ही व्यवस्था जाऊन त्यांस कायमचे पगार, किंवा रोजमुरे, किंवा ठराविक रकमा ज्या व्यवस्थेप्रमाणें मिळूं लागतात, ती व्यवस्था हळूहळू आणि न समजतांच उत्पन्न होत असते. आणखी एक गोष्ट ध्यानांत धरावयाची ही कीं, विनिमयाची पद्धति प्रथम अनिश्चित असून, जेथें उद्यमशीलता बऱ्याच पक्कदशेस येईल तेथेंच ती निश्चित होत असते. अदलाबदलीस जी सुरवात झाली ती एका वस्तूबद्दल दुसरी वस्तु तितक्याच किंमतीची द्यावयाची अशा स्पष्ट उद्देशानें झाली नाहीं;तर एक वस्तु नजर द्यावयाची व दुसरी घ्यावयाची अशा रीतीनें झाली;आणि ह्या मूळच्या सवद्याच्या कांहीं खाणाखुणा अद्यापिही आपल्या इकडच्या ह्या प्राच्य देशांतून दृष्टीस पडतात. कायरो शहरीं दुकानदाराकडे

कांहीं जिन्नस विकत घ्यावयास गेलें म्हणजे तो अगोदर काफीचा पेला व सिगारेटचा डबा पुढें करितो; आणि नाईल नदींतून जाण्यास एकादी बोट ठरवितांना नाविक गिन्हाइकाकडे नजराणे घेऊन येतो, आणि गिन्हाइकाकडून आपणास यावे म्हणून अपेक्षा करितो. शिवाय असल्या ह्या व्यापारांत निश्चित अशी समप्रमाण किंमत म्हणून मुळींच नसते; किंमती ठराविक नसून त्या प्रत्येक सवद्याच्या वेळीं बदलत असतात. म्हणून प्रस्तुत विषयाचें विवेचन करतांना नेहमींच आपण हें सत्य ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, उद्यमशील नमुन्यास योग्य अशा रचना व व्यापार युद्धशील नमुन्यास योग्य अशा रचना व व्यापार यांपासून हळूहळूच भिन्न होऊं लागतात.

अशा रीतीनें प्रस्तावना केल्यावर, आतां, जी समाजघटना बाह्यशत्रूंपासून स्वसंरक्षण करण्यास अगदीं अयोग्य असून, व्यक्तींच्या जीवितास साहाय्य केल्यानें समाजाचें जीवित संभाळून धरण्यास योग्य बनलेली आहे अशा घटनेचे विशेष काय असले पाहिजेत हें विचारदृष्ट्या पाहूं. म्हणजे, युद्धशील नमुन्याचा विचार करतांना त्याच्या कल्पनेप्रमाणें उत्तम स्वरूपाचा जसा प्रथम विचार केला, तसा येथें उद्यमशील नमुन्याच्या कल्पनेनें उत्तम अशा स्वरूपाचा विचार प्रथम करूं.

१३२. ज्या समाजाला वैरी समाजांपुढें आपलें संरक्षण करावयाचें असतें त्यास जर संयुक्तक्रिया अत्यंत आवश्यक आहे, तर, उलटपक्षीं, ज्या समाजास वैरी समाजांपासून स्वसंरक्षण करावयाचें नसेल त्या संयुक्तक्रिया ही कांहीं अत्यन्त आवश्यक गोष्ट नाहीं.

एकाद्या समाजाचें सारखें अस्तित्व राहण्यास पहिली गोष्ट ही झाली पाहिजे कीं, त्याचा सगळ्याचा नाश बाह्य शत्रूंनीं करतां कामा नये, आणि दुसरी गोष्ट ही झाली पाहिजे कीं, त्याच्या घटकांना आत्मपोषण व संतत्युत्पादन करण्याचें न साधल्यामुळें त्याचा अंशा-अंशानें नाश होतां कामा नये. म्हणून पहिल्या कारणापासून समाजाचा संहार होण्याची भीति जर नाहींशी झाली, तर दुसऱ्या कारणापासून संहार होण्याची तेवढी शिल्लक राहते. आतां समाजांतील व्यक्तींनीं आपलें पोषण आणि संख्यावर्धन केलें म्हणजे समाजप्रतिपालन झालेंच. प्रत्येकास जर आपलें हित आणि आपल्या संततीचें हित पूर्णपणें साधतां आलें, तर समाजाचें हित अर्थात् साधलेंच. म्हणून पहिल्या मानानें ह्या स्थितींत समाजास संयुक्तउद्योग फारसा करावयास नको. सगळ्या समाजाच्या हुकमाविना प्रत्येक माणूस आपला निर्वाह श्रम करून स्वतः करूं शकेल, आपण उत्पन्न केलेले जिन्नस देऊन दुसऱ्यांनीं उत्पन्न केलेले पदार्थ घेऊं शकेल, दुसऱ्यास मदत करून त्याबद्दल पैसे घेऊं शकेल, आणि एकादी लहान किंवा मोठी गोष्ट करण्यासाठीं दुसऱ्यांशीं जूट करूं शकेल. सार्वजनिक क्रियेनें दुसरा हेतु जो साध्य करावयाचा असतो तो खासगी क्रिया योग्य मर्यादेच्या बाहेर जाऊं न देणें हा होय; आणि खासगी कृति ज्या मानानें योग्य मर्यादांच्या आंत आपण होऊनच होऊं लागतील, त्या मानानें ह्या गोष्टीसाठीं लागणाऱ्या सार्वजनिक कृतीचा संचय कमी होऊन जातो.

एवंच युद्धशील नमुन्यांत संयुक्तक्रियेची जरूरी ज-

शी आंतून लागते, तशी उद्यमशील नमुन्यांत मुख्यत्वें करून बाहेरून असतें; म्हणजे, नेहमींच्या युद्धापासून मनुष्यस्वभावामध्यें जे इतरातिक्रम करण्याचे विशेष कल उत्पन्न झालेले असतील, आणि जे शांततेचें जीवित सारखें राहिल्यानें कमी होतील, त्यांच्यासाठीं ह्या संयुक्त-क्रियेची जरूरी उत्पन्न झालेली असते.

१३३. युद्धविषयक कृतीकरितां बनविलेल्या समाजामध्यें प्रत्येक घटकाचें व्यक्तित्व त्याचें जीवित, स्वातंत्र्य आणि वित्त ह्यांच्यासंबधानें सरकारच्या इतकें अंकित करावें लागतें कीं, त्यांजवर बऱ्याच किंवा सर्वच अंशांनीं सरकारची किंवा राष्ट्राची मालकी ठेवावी लागत असते; पण उद्यमशील नमुन्यावर बनविलेल्या समाजांत व्यक्तीच्या असल्या अंकितत्वाची आवश्यकता राहत नाहीं. दुसऱ्यांचे जीव घेण्याच्या कामांत तो गुंतला असतां स्वताचा जीव धोक्यांत घालण्याचे प्रसंग त्यास आतां येत नाहींत; आपला धंदा सोडून सेनापतीचे हुकूम मानण्यास त्यास आतां कोणी भाग पाडीत नाहीं; आणि सार्वजानिक कामासाठीं त्याच्यापासून मागतील तेवढी स्वताची मालमत्ता त्यास आतां द्यावी लागत नाहीं.

उद्यमशील व्यवस्थेमध्यें नागरिकाच्या व्यक्तित्वाचा बळी घेण्याच्या ऐवजीं समाजास उलट त्याचें संरक्षण करावें लागत असतें. कारण त्याच्या व्यक्तित्वाचें संरक्षण हेंच समाजाचें मुख्य कर्तव्य होऊन बसतें. बाह्यसंरक्षणाची जरूरी नाहींशी झाल्यावर, अंतःसंरक्षण हेंच राष्ट्राचें प्रधानकर्तव्य बनलें पाहिजे, आणि ह्या कर्तव्या-

ची योग्य बजावणी हाच उद्यमशील नमुन्याचा एक ठळक विशेष असला पाहिजे, हें सहजच दाखवितां येण्यासारखें आहे.

कारण हें उघडच आहे कीं, इतर गोष्टी समान असल्यास, ज्या समाजांत जीवित, वित्त आणि स्वातंत्र्य हीं सुरक्षित आहेत आणि सर्वांच्या हिताहिताचा न्याय्य विचार होत आहे, तो समाज ज्यांत ह्या गोष्टी होत नाहींत त्या समाजापेक्षां जास्त भरभराटीस आला पाहिजे; आणि, म्हणून, परस्परांशीं चढाओढ करणाऱ्या उद्यमशील समाजांपैकीं ज्यांच्यांत व्यक्तींच्या हक्कांचें संरक्षण अपूर्णरीत्या होत असेल ते जाऊन त्यांच्या ठिकाणीं ज्यांच्यांत तें पूर्ण रीतीनें होत असेल ते आले पाहिजेत. म्हणून योग्यतमाच्या टिकावानें असा एक सामाजिक नमुना तयार झाला पाहिजे कीं त्यामध्यें व्यक्तींचे हक्क पवित्र मानिले जाऊन, ते संभाळून धरण्यास, किंवा कदाचित् त्यांजबद्दल तिऱ्हाइती करण्यास जेवढी जरूरी लागेल त्या पलीकडे सरकारानें त्यांजवर खर्चाची जास्त गदा आणूं नये. कारण युद्धशीलतेनें वृद्धिंगत झालेला मनुष्यस्वभावाचा परातिक्रमण करण्याचा कल आतां निघून गेलेला असल्यामुळें, सरकाराकडे एवढेंच काम राहतें कीं ज्या परस्परविरोधी हक्कांची न्याय्य तडजोड कशी करावी हें लोकांस समजत नसेल त्यांची तशी तडजोड करावयाची.

१३४. ज्या संयुक्तक्रियेच्या योगानें सगळ्या राष्ट्राची शक्ति युद्धाच्या कामीं लावतां येते त्या क्रियेची

जरूरी नाहींशी झाल्यानें स्वेच्छाचारी अशा नियामक घटनेचीही जरूरी नाहींशी होते.

असली घटना असल्या स्थितींत अनावश्यक असते इतकेंच नाहीं, तर ती अस्तित्वांतच असूं शकणार नाहीं. कारण हें आपल्या नजरेस आलेंच आहे कीं उद्यमशील नमुन्यास एक आवश्यक गोष्ट अशी आहे कीं, इतरांच्या व्यक्तित्वाच्या संचारास बाध न येईल अशा प्रकारचा प्रत्येकाच्या व्यक्तित्वास पूर्ण संचार करूं द्यावयाचा; म्हणून माणसांच्या व्यक्तित्वाचें अन्य तऱ्हेनें नियंत्रण करणारा जो स्वेच्छाचारी अंमल त्यास अशा समाजांत जागाच देतां येत नाहीं. खरोखरच, अशा ठिकाणीं स्वेच्छाचारी शास्ता असणें म्हणजेच नागरिकांच्या स्वातंत्र्याचें अतिक्रमण करणें होय. कारण त्यांनीं न दिलेला अधिकार तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दृष्ट्या चालवीत असल्यामुळें, त्यांनीं स्वेच्छेनें आपल्या स्वातंत्र्यास घातलेली जी मर्यादा तिच्याहून तितकी तो जास्त मर्यादा घालणार.

१३५. उद्यमशील नमुना असला म्हणजे जें नियमन लागतें तें सार्वजनिक इच्छा काय आहे ती पाहून ती अमलांत आणण्यास नेमलेल्या मंडळाकडूनच चांगल्या रीतीनें होण्याचा संभव आहे; आणि तें करण्यास प्रतिनिधिमंडळच उत्तम होय.

चांगल्या वाढलेल्या समाजांत श्रमविभाग बराच पक्वदशेस आलेला असल्यामुळें सगळ्यांचे उद्योग सारखे नसतात, आणि म्हणून परस्परविरोधी हिताहितांची तडजोड करण्याची जरूरी उत्पन्न होते; आणि ही तडजोड

खात्रीनें न्यायाची व्हावी एतदर्थ, प्रत्येक प्रकारच्या हि-
ताहिताच्या लोकांस आपलें मत प्रदर्शित करण्याची
संधि दिली पाहिजे. ह्या कामाकरितां नेमिलेली संस्था
एकाच व्यक्तीची बनलेली असावी ही गोष्ट केवळ क-
ल्पनीय आहे; पण असल्या एकटया माणसास पुरावा
ऐकिल्याविना निरनिराळ्या धंद्यांच्या माणसांचे न्याय
बेराबर रीतीनें तोडतां येणार नाहींत; म्हणून प्रत्येक व-
र्गानें आपल्या हक्कांचें प्रतिपादन करण्यास प्रतिनिधि
पाठविले पाहिजेत. म्हणून पुढील दोन पद्धतींपैकीं को-
णती तरी एक निवडिली पाहिजे; एक पद्धति ही कीं
ह्या प्रतिनिधींनीं पृथक् पृथक् आणि खासगी रीतीनें आ-
पलीं म्हणणीं ह्या तिऱ्हाइतापुढें मांडावयाचीं; आणि दु-
सरी पद्धति ही कीं त्यांनीं एकमेकांच्या समक्ष तीं सग-
ळ्यांपुढें मांडावयाचीं, आणि सामान्य मतैक्याच्या धो-
रणानें निकाल कायतो प्रसिद्धपणें लावावयाचा. आतां
निरनिराळ्या वर्गांच्या हिताहितांची योग्य तडजोड प-
हिल्या पद्धतीपेक्षां या दुसऱ्या पद्धतीनें होण्याचा संभव
विशेष ज्यास्त आहे ही गोष्ट उघड असून दुसरें असें
कीं, उद्यमशील नमुन्याच्या अंतःस्वरूपाशीं ती ज्यास्त
सुसंगत आहे; कारण तेणेंकरून माणसांच्या व्यक्ति-
त्वांचें अतिक्रमण अत्यंत अल्प होतें. नागरिक आपल्या
ठिकठिकाणच्या समूहांतून प्रतिनिधी पाठवितात त्यांपे-
क्षां जे एक शास्ता कांहीं नियमित कालपर्यंत नेमून त्या
कालांत आपल्या इच्छांविरुद्ध वागण्याची त्यास संधि
देतात ते आपलीं व्यक्तित्वें ज्यास्त गमावतात, कारण
लोकनियुक्त प्रतिनिधी लोकांच्या नजरेखालीं आणि एक-

मेकांच्या दाबाखालीं बोलत व वागत असल्यामुळें ते बहुजनांच्या इच्छांशीं जुळतील असे निकाल बहुतकरून देतात.

१३४. समाजाच्या संयुक्तजीवितास अशा स्थितींत धोका नसल्यामुळें, आणि व्यक्तींचें जीवित अत्युत्तम रीतीनें चालण्यास जी परिस्थिति आवश्यक आहे ती कायम ठेवणें एवढेंच काम सरकारास शिल्लक राहिलेलें असल्यामुळें, प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ही परिस्थिति काय आहे?

ही परिस्थिति म्हणजे न्यायदान यथायोग्य करणें हीच होय ही गोष्ट अगोदरच ध्वनित झाली आहे; पण " न्यायदान करणें " ह्या शब्दांचा अर्थ लोक बहुधा इतक्या अस्पष्ट रीतीनें ध्यानांत आणीत असतात कीं, त्यांचा विशेष स्पष्ट खुलासा करणें इष्ट दिसतें. म्हणून असें सांगतों कीं कृती व त्यांचे परिणाम यांच्यामधील जे योग्य संबंध ते कायम राखणें—म्हणजे प्रत्येकाचे प्रयत्नानुरूपच त्यास फायदा मिळूं देणें, कमीही नाहीं व ज्यास्त नाहीं—ह्याचें नांव न्याय. एकमेकांच्या साहचर्यामुळें उत्पन्न झालेल्या नियंत्रणांखालीं निरनिराळ्या व्यक्ती वागत असल्यामुळें, न्याय म्हणजे त्यांनीं प्रत्येकीं आपापल्या वर्तनाचे परिणाम, जसेच्या तसे, भोगणें. श्रेष्ठास त्याच्या श्रेष्ठत्वाचा फायदा मिळावा; आणि कनिष्ठास त्याच्या कनिष्ठत्वाचा तोटा सोसावयास लागावा. म्हणून ज्या सार्वजनिक कृतीमुळें कांहीं माणसांपासून त्यांनीं मिळविलेल्या फायद्याचा भाग काढून घेतला जातो, आणि कांहींस त्यांनीं न मिळविलेला असा फायदा दिला जातो, अशी सर्व कृति त्याज्य होय.

आतां चांगल्या वाढलेल्या उद्यमशील नमुन्यामध्यें, चांगल्यांचीं व वाईटांचीं, उद्योग्यांचीं व आळशांचीं, जीवितें सारखीं करूं पाहणारी जी सोशियालिस्टिक पद्धति तिचा समावेश होत नाहीं हें तेव्हांच सिद्ध होतें. कारण लढाईच्या रूपानें समाजांमध्यें चाललेला जीवनार्थ कलह आतां बंद झालेला असल्यामुळें ज्या समाजांत उत्तम व्यक्ती (म्हणजे, उद्यमशील स्थितीस अत्यंत योग्य अशा व्यक्ती) सर्वांत पुष्कळ उत्पन्न होत असतील त्याच समाजांचा टिकाव लागून तेच सर्वत्र पसरले पाहिजेत. अशी कल्पना करा कीं, दोन समाज एरवीं परस्परसमान असून एकांतील श्रेष्ठ व्यक्तींस त्यांच्या मेहनतीचीं फळें त्यांच्या व त्यांच्या संततीच्या फायद्याकरितां आपल्यापाशीं ठेवावयास सांपडतात, आणि दुसऱ्यांस तशा व्यक्तींस आपल्या श्रमाच्या फायद्याचा कांहीं भाग कनिष्ठ व त्यांची संतति यांस द्यावा लागतो, तर हें उघडच आहे कीं, श्रेष्ठ लोकांची दुसऱ्यापेक्षां पहिल्या समाजांत ज्यास्त भरभराट व ज्यास्त संख्यावृद्धि होईल. त्याच्यांत दुसऱ्यापेक्षां उत्तम मुलांची ज्यास्त संख्या लहानाची मोठी होईल; आणि सरतेशेवटीं तो समाज दुसऱ्याहून ज्यास्त मोठा होईल. ह्यावरून असें अनुमान काढावयाचें नाहीं कीं, कनिष्ठांस खासगी रीतीनें व स्वेच्छेनें मदत करणें ह्याचा यामुळें निषेध होतो; तर केवळ सार्वजनिक व जबरीच्या मदतीचा होय. चांगल्यांना वाईटांबद्दल वाटणारी जी सहानुभूति तिचे जे आपोआप परिणाम घडतील त्यांस प्रतिबंध करतांच येत नाहीं, व त्यांपासून एकंदरींत फायदाच होतो. कारण

सामान्यतः, आपल्या संख्यावृद्धीस अडथळा येईल इतके असले प्रयत्न चांगले लोक जरी करणार नाहींत, तरी वाईटांची संख्यावृद्धि न होतां त्यांचीं दुःखें कमी व्हावीं इतकी ते त्यांस मदत करतील.

१३७. ज्या ह्या पद्धतीखालीं प्रत्येकास आपल्या प्रयत्नांचें स्वाभाविक फल तेवढेंच मिळतें, व कमज्यास्त मिळत नाहीं, त्या पद्धतीस अन्य दृष्टीनें कराराची पद्धति असें म्हणतां येईल.

आपल्या अगोदर हें लक्षांत आलेंच आहे कीं ठरीव स्थितीची पद्धति युद्धशील नमुन्यास सर्वथैव योग्य आहे. युद्ध करणाऱ्या फौजेचें संयुक्त कार्य जो क्रमिक अंकितपणा लागत असतो, आणि हें संयुक्तकार्य खात्रीनें होण्यास जो एकंदर समाजांत पसरणें जरूर असतें, त्याची ती सहचारिणी आहे. असल्या स्थितींत श्रम व त्यांचें फल यांमधील संबंध अधिकारी ठेवितील तसा असतो. सैन्यामध्यें प्रत्येक शिपायास अन्न, वस्त्र, वगैरे जें मिळत असतें तें त्यानें केलेल्या कामाचें प्रत्यक्ष फल नसतें, पण तें वरिष्ठानें स्वेच्छेप्रमाणें दिलेलें असतें, व तो त्याच्यापासून कामही स्वेच्छेनें घेत असतो; त्याप्रमाणें एकंदर युद्धशील समाजांत श्रेष्ठ कनिष्ठास काय करावयाचें तें सांगत असतो, व त्याच्या श्रमाच्या उत्पन्नाचा खुशीस येईल तो वांटा त्यास देत असतो. पण युद्धशीलता कमी होत जाऊन उद्यमशीलता जशी वाढत जाईल तशी अधिकाराची सत्ता व टापू हीं दोन्ही कमी होतात, अनियंत्रित कृति वाढूं लागते, व कराराचा संबंध बहुतेक सर्वत्र पसरतो; आणि उद्यमशील नमुना पूर्ण

वाढीस आला म्हणजे तो अगदीं सार्वत्रिक होतो.

हा जो कराराचा सार्वत्रिकसंबंध त्याची न्याय्यरीत्या बजावणी केल्यास प्रयत्नाशीं प्राप्तीची जुळणी करणें (प्रयत्नानुरूप फलप्राप्ति होऊं देणें) ही जी गोष्ट उद्यमशील समाजांतील व्यवस्थांच्या द्वारा साध्य करावयाची ती साधते. जिन्नस उत्पन्न करणारा, ते लागतील तेथें पाठविणारा, कामावर देखरेख ठेवणारा, सल्लामसलत देणारा, विद्या शिकविणारा, किंवा दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेची मदत करणारा, या नात्यानें प्रत्येकास त्याच्या कामाबद्दल मागणीप्रमाणें ठरेल ती किंमत जर मिळेल, तर ज्या गुणानुरूप फलप्राप्तीनें श्रेष्ठांची भरभराट खात्रीनें होते ती अनुरूपता उत्पन्न होते.

१३८. पुनः, निराळ्या दृष्टीनें पाहतां असें दिसून येतें कीं, युद्धशील नमुन्यांत सार्वजनिक नियंत्रण विधिरूपानें नियामक असून निषेधरूपानेंही जरी तसें असतें, तरी उद्यमशील नमुन्यांत तें निषेधरूपानें तेवढेंच नियामक असतें. गुलामास, शिपायास, किंवा लढाईकरितां बनविलेल्या समाजाच्या अन्य घटकास अधिकारी म्हणतोः—" तुला अमुक अमुक केलेंच पाहिजे; आणि अमुक अमुक त्वां करतांच कामा नये ". पण उद्यमशील नमुन्याच्या घटकास अधिकारी ह्यांपैकीं एकच हुकूम करितो; तो हा कीं, "अमुक अमुक त्वां करतां कामानये".

कारण जे लोक स्वेच्छेच्या सहक्रियेनें आपले खासगी व्यवहार चालवून सरकाररूपी संस्था बनविण्यास व पोसण्यास स्वेच्छेनें एकमेकांस साहाय्य करितात, ते लोक अर्थात् अशा प्रकारचे असले पाहिजेत कीं त्यांस

अतिक्रमणाचा बंदोबस्त होईल अशीं नियंत्रणें कायम ठेवण्यापासून फायदा असल्यामुळें तेवढींच आपल्या व्यवहारावर लादण्यास सरकाराला ते अधिकार देतात. गुन्हेगार वगळतां (आणि आह्मीं गृहीत केलेल्या स्थितींत ते फारच थोडे असावयाचे), बाकीच्यापैकीं प्रत्येक जण अशी इच्छा करील कीं आपण दुसऱ्यांच्या कृतींच्या टापूंत जर हात घालीत नाहीं, तर दुसऱ्यांनींही आपल्या कार्यक्षेत्रांत हात घालूं नये, आणि त्याच्या आंवाक्यांत आपण जे फायदे मिळवूं ते आपले आपल्यापाशींच रहावे. ज्या प्रोत्साहक कारणामुळें आपल्या व्यक्तित्वाचा सार्वजनिक पालनकर्ता संभाळून धरण्यास एकत्र होण्याची त्यांस स्फूर्ति होते, तेंच कारण वरील हेतु साध्य होण्यास आपल्या व्यक्तित्वांत जेवढा हात घालूं देणें जरूर असेल त्या पलीकडे तो घातला जाऊं नये एतदर्थ एकत्र होण्यास त्यांस स्फूर्ति देईल.

ह्यावरून असें ठरतें कीं, जरी युद्धशील नमुन्यामध्यें सैन्यांत जशी रेजिमेंटी व्यवस्था असते तशीच एकंदर समाजामध्येंही असते, तरी उद्यमशील नमुन्यामध्यें राज्यकारभार मुख्य केंद्रापासून पसरून अनेकांच्या हातीं जाऊन त्याबरोबर त्याचा टापूही लहान होत असतो. असल्या समाजांत न्याय देण्याच्या घटनेखेरीज बहुतेक सर्व सार्वजनिक घटना अवश्यच नाहींशा होतात; कारण त्या सर्वांचे ठिकाणीं एक सामान्य विशेष असा असतो कीं नागरिकास त्यानें काय करावें हें अधिकारपूर्वक सांगून, किंवा त्याचें रक्षण करण्यास जरूर असेल त्यापेक्षां ज्यास्त मालमत्ता त्याजपासून घेऊन, किंवा ह्या दोन्ही तऱ्हां-

नीं त्या त्याजवर कुरघोडी करीत असतात. ह्या किंवा त्या शाळेंत आपली मुलें पाठविण्याबद्दल ज्यांच्यावर जबरी होत असते, ज्यांस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या सरकारी धर्माधिकारी वर्गाचें पोषण करण्याच्या कामीं हातभार लावावा लागतो, ग्रामसमूहांतील अधिकाऱ्यांस सार्वजानिक रीत्या धर्म करतां यावा म्हणून ज्यांच्यापासून गांवपट्या घेतात, वाचनालयाच्या वर्गण्या देण्यासाठीं पैसा शिल्लक टाकीत नाहींत अशा लोकांस फुकट वाचावयास मिळावें म्हणून ज्यांच्यावर कर बसवितात, ज्यांचे व्यवहार देखरेख्यांनीं घालून दिलेल्या नियमाप्रमाणें चालतात, सरकारच्या शास्त्रीय व कलाशिक्षणाच्या शाळा, सरकारी मदतीनें परदेशगमन, इत्यादिकांचे खर्च ज्यांस द्यावे लागतात, त्या सर्वांच्या व्यक्तित्वांचें अतिक्रमण होत असतें; कारण अशा रीतीनें ते स्वतः खुशीनें करणार नाहींत अशा गोष्टी त्यांस कराव्या लागतात, किंवा त्यांच्या खासगी कल्याणास लावतां येण्यासारखा पैसा त्यांच्याकडून घेतला जातो. अशा प्रकारच्या जबरीच्या व्यवस्था युद्धशील नमुन्याशीं जरी सुसंगत आहेत, तरी उद्यमशील नमुन्याशीं त्या विसंगत आहेत.

१३९. आतां उद्यमशील नमुन्यामध्यें सार्वजनिक घटनांचा टापू जर बराच आकुंचित असतो, तर खासगी घटनांचा बराच विस्तृत असतो. म्हणजे, असल्या समाजांत सार्वजानिक व्यवस्थेनें रिकामीं केलेलीं क्षेत्रें खासगी व्यवस्था व्यापून टाकितात.

हा विशेष उत्पन्न होण्यास अनेक कारणें एकत्र जु-

ळतात. ज्या हेतूंमुळें लोक इतरांच्या हक्कांचें अतिक्रमण न होईल अशा रीतीनें आपल्या हक्कांचें प्रतिपादन करण्यासाठीं एकत्र होतात, त्याच हेतूंमुळें इतरातिक्रम न करतां त्यांचा खासगी संयोग बननिण्याचा जो हक्क त्याच्यांत कोणीं हात घालूं नये एतदर्थ ते एकत्र होतात. शिवाय हा किंवा तो व्यवहार किंवा व्यापार करण्याकरितां आपखुशीनें मंडळ्या बनवून संयुक्त रीतीनें तो करावयाचा म्हणून ते एकमेकांशीं करार करितात; आणि असल्या मंडळ्यांचे कारभार सहजच प्रतिनिधींच्या द्वारा होत असतात. सारांश, अशा समाजामध्यें सरकारांत व खासगी व्यवहारांत, सर्वत्र, एकच तत्त्व गोंवलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. एवंच उद्यमशील नमुन्याचा एक अनिवार्य विशेष हा असतो कीं, त्या समाजांत अनेक प्रकारच्या व अनेक आकारांच्या राजकीय, धार्मिक, व्यापारविषयक, धंदेविषयक, औदार्यविषयक आणि सामाजिक मंडळ्या उत्पन्न होऊन वाढत जातात.

१४०. उद्यमशील नमुन्याचे अप्रत्यक्षरीत्या उत्पन्न होणारे आणखी दोन विशेष आहेत, त्यांचा आतां उल्लेख करूं. त्यांपैकीं एक, तो नमुना युद्धशीलाच्या मानानें बराच लवचीक असतो, हा होय.

जोंपावेतों संयुक्तक्रियेची जरूरी राष्ट्रीय संरक्षणासाठीं म्हणून भासत असते—जोंपावेतों संयुक्तसंरक्षण किंवा अतिक्रमण करण्याकरितां सर्व कनिष्ठ सर्व श्रेष्ठांचे बंदे करून टाकण्यासाठीं क्रमिक अंकितपणा कायम ठेविलेला असतो—माणसें ज्या स्थितींत जन्मलीं असतील त्याच स्थितींत त्यांस ठेवणारी जी ठराविक स्थितीची सरणी

ती जोंपावेतों कायम राखिली जाते—तोंपावेतों सामाजिक संघटना अगदीं ताठर राहते. ज्या गरजांपासून युद्धशील नमुन्याची उत्पत्ति होऊन तो कायम राहतो, त्या गरजा नाहींशा झाल्या म्हणजे, आणि परस्परांच्या फायद्यासाठीं प्रयत्नसंयोगीकरणार्थ कराराचा संबंध सर्वत्र उत्पन्न होऊं लागला म्हणजे, सामाजिक संघटनेचा ताठरपणा नाहींसा होतो. मग जागा आणि धंदे वंशपरंपरेच्या तत्त्वावर ठरण्याच्या ऐवजीं वाकबगारीच्या तत्त्वावर ठरूं लागतात, आणि लोक अमुकच धंदा करण्यास आतां बांधलेले नसून जे धंदे करण्यास ते अत्यन्त योग्य असतील ते ते करूं लागल्यामुळें रचनाबदल सहज होऊं शकतात. एवंच, उद्यमशील नमुन्याच्या रचना सहज बदलतां येण्यासारख्या असल्यामुळें, त्या नमुन्यास नव्या गरजांस योग्य असें स्वरूप सहजगत्या येऊं शकतें.

१४१. उद्यमशील नमुन्यांत दुसरा एक विशेष उत्पन्न होतो तो हा कीं, राष्ट्रांचें उत्पन्नविषयक जें आपापल्यावरच अवलंबून राहणें तें नष्ट होऊं लागतें.

शेजारच्या समाजांशीं जोंपर्यंत वैरभाव सुरू असतील तोंपावेतों प्रत्येक समाजास सर्व वस्तू आपल्या आपल्यांतच उत्पन्न करणें जरूर असतें; पण त्यांच्याशीं शांततेचे संबंध उत्पन्न झाले म्हणजे ह्या स्वावलंबनाची आवश्यकता नाहींशी होते. म्हणून हल्लींच्या राष्ट्रांमध्यें लढाई जशी कमी होत जाईल तसें त्यांचें हल्लींचें जिनसांसंबंधाचें स्वावलंबन कमी होत जाईल, आणि परस्पराश्रय वाढत जाईल. प्रत्येक राष्ट्रास कांहीं विशिष्ट माल उत्पन्न करणें विशेष सुलभ असल्यामुळें निरनिराळ्या

राष्ट्रांनीं जिनसांची अदलाबदल करणें जसें एकापक्षीं सर्वांच्याच फायद्याचें होईल, तद्वत् अन्यपक्षीं आपला माल बाहेरदेशीं पाठविण्यास किंवा बाहेरचा स्वदेशीं आणण्यास कोणीं मनाई केल्यास किंवा अडथळा आणिल्यास लोकांस तें असह्य होईल.

म्हणून, उद्यमशीलतेच्या प्रसाराबरोबर राष्ट्रांमधील दळणवळणाचे प्रतिबंध मोडून काढण्याची, सर्वांमध्यें सामान्य संघटना उत्पन्न करण्याची, आणि सर्वांचें एकच सरकार न झाल्यास सर्वांचें मिळून संयुक्त सरकार तरी बनविण्याची, प्रवृत्ति उत्पन्न होते.

१४२. उद्यमशील समाजाच्या गरजांवरून त्याची घटना काय असावी याबद्दल इतका वेळ अनुमान केलें; आतां जे समाज प्रत्यक्ष उद्योगशीलतेकडे चालले आहेत त्यांच्या घटनेकडे पाहतां आमच्या अनुमानाच्या पुष्टीकरणार्थ प्रत्यक्ष पुरावा काय सांपडतो तो पाहूं.

पृथ्वीवर लोकवस्ती पसरत असतां, लहान लोकसमूहांपासून तों मोठ्या राष्ट्रांपर्यंत जीवनार्थ कलह ज्या अर्थीं बहुतेक सर्वत्र चाललेला आहे त्या अर्थीं, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, निवळ उद्यमशील जीवितास योग्य अशा सामाजिक नमुन्याचीं उदाहरणें सहज सांपडतील असें नाहीं. हल्लींच्या वर्तमानपत्रांप्रमाणें प्राचीन लेखांवरूनही असें दिसतें कीं, बाहेरच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठीं योग्य अशा सर्व सामाजिकरचना ज्यामध्यें अनावश्यक झाल्या आहेत असें सुधारलेलें किंवा अर्धवट सुधारलेलें राष्ट्र आजपर्यंत झालेलें नाहीं; आणि असुधारलेल्यांबद्दल प्रवासी लोक जीं वर्णनें करितात त्यांव-

रून असें दिसतें कीं, त्यांच्यामध्येंही बहुतेक सर्वत्र टोळ्याटोळ्यांचे तंटे सतत चाललेले असतात. तथापि ह्या नमुन्याचीं कांहीं उदाहरणें आस्तित्वांत आहेत, आणि त्यांवरून त्याच्या कच्च्या स्वरूपीं, म्हणजे जेथें विद्येचा प्रसार फारच अल्प झालेला आहे तेथें त्यास येणाऱ्या स्वरूपीं, त्याची सामान्य मांडणी कशी असते हें बऱ्याच स्पष्ट रीतीनें दृष्टीस पडतें. ह्या उदाहरणांचा आपण प्रथम विचार करूं; आणि नंतर जीं मोठीं राष्ट्रें प्राधान्येंकरून उद्यमशील झालीं आहेत त्यांचे ठिकाणीं त्या नमुन्याचे जे विशेष युद्धशील नमुन्याच्या विशेषांशीं गुरफटलेले दिसतात ते सुटे करून पाहूं.

आपल्या ह्या हिंदुस्थानच्या डोंगरांतून अशा पुष्कळ टोळ्या आहेत कीं त्या जरी निरनिराळ्या जातींच्या आहेत तरी त्या सर्व अर्धवट भटक्याच आहेत. त्या बहुतेक शेती करणाऱ्या असून त्यांचा सामान्य प्रघात असा आहे कीं जोंपर्यंत एकाद्या जमिनींत बरेंच पीक येत असेल तोंपर्यंत तेथेंच पिकें काढीत रहावयाचें, आणि तिच्यांतील कस निघून गेला म्हणजे दुसरीकडे जावयाचें, आणि तेथें तसेंच करीत रहावयाचें. ते स्वाऱ्या करणाऱ्या लोकांना भिऊन आपल्या मूळच्या ठिकाणांहून पळून गेलेले आहेत, आणि जेथें आपणास त्यांचा त्रास होणार नाहीं अशा ठिकाणीं जाऊन राहिलेले आहेत. बोडो आणि ढिमाल लोक हे अगदींच अयुद्धशील आहेत, त्यांच्यांत राजकीय संघटना मुळींच नाहीं, गुलाम नाहींत किंवा सामाजिक पायऱ्या नाहींत, आणि मोठाल्या कामांत ते एकमेकांस मदत करीत असतात;

टोडा लोकांत शत्रूपासून संरक्षण करण्याच्या नेहमींच्या तजविजी नसून ते आपले तंटे तिऱ्हाइतामार्फत किंवा पंचांमार्फत तोडीत असतात; मिश्मी लोक अयुद्धशील असून त्यांच्यांत नांवाचे नाईक असतात, आणि सभा भरून ते आपले तंटे तोडीत असतात; ह्या गोष्टी अगोदरच अन्यत्र सांगितलेल्या आहेत; आणि ह्या उदाहरणांत जात व ठिकाण ह्यांनीं अगदीं भिन्न असे जे उत्तर अमेरिकेंतील प्राचीन प्यूब्लोलोक ह्यांच्या उदाहरणाची भर घातलेली आहे; हे लोक आपल्या तटबंदी केलेल्या गांवांतून रहात असतात, आणि त्यांच्यावर कोणीं स्वारी केली तरच लढतात; आणि शांततेनें राहून आपला राजा व त्याचें पांचांचें कौन्सिल ह्यांची दरवर्षीं निवडणूक करितात. ह्या ठिकाणीं असलींच आणखी कांहीं उदाहरणें देऊं. सन १८६९-७० च्या हिंदुस्थानसरकारच्या रिपोर्टांत असें वर्णन आढळतें:—"गोरे क्यारेनलोक स्वभावानें गरीब व शांत असे आहेत. त्यांच्या नायकांच्या हातीं फारसा अधिकार नसतो". त्यांच्याबद्दल लेफ्टेनंट म्यॉकमेहॉन असें म्हणतो कीं, त्यांच्यांत कायदे नाहींत किंवा कोणी मुख्य अधिकारीही नाहीं. दुसरें उदाहरण लेप्चा लोकांचें घ्या; ते उद्योगी आहेत असें नाहीं, पण त्यांचे सामाजिक संबंध अयुद्धशील आहेत ह्या अर्थानें ते उद्यमशील आहेत. त्यांच्यांत निरनिराळ्या जाती नाहींत; त्यांच्यांत कुटुंबाकुटुंबांमध्यें किंवा टोळ्याटोळ्यांमध्यें कलह ऐकूं येत नाहींत. त्यांस शिपाईगिरीचा कंटाळा आहे; कोणी त्यांना अन्यायानें किंवा निर्दयपणानें वागवूं लागल्यास ते तो सोस-

ण्याऐवजीं जंगलांत जाऊन तेथें मिळेल तें खाऊन राहतील. ह्या एकंदर वर्णनावरून त्यांच्यांत राजकीय नियंत्रण आहेसें दिसत नाहीं. दुसरें उदाहरण 'शांत आणि निरुपद्रवी' अशा सांताळ लोकांचें घ्या; हे लोक आपल्यावर कोणीं हल्ला केल्यास जरी जिवावर उदार होऊन त्यांच्याशीं लढतात, तरी ते जातीचे शांतिशील आहेत. ते शेतीचें काम करून करितात, आणि त्यांच्यांत जातिबंधनें नाहींत. ते इंग्रजसरकारचे अंकित झाल्यामुळें त्यांच्या प्रत्येक खेडयांत त्यांच्यापासून खंडणी गोळा करण्यासाठीं इंग्रजसरकारानें नेमिलेला एक अधिकारी असतो, तरी ते इतर बाबतींत स्वतंत्रच आहेत. त्यांच्यांत एक गांवनाईक असतो, पण तो गांवच्या कारभारांत ढवळाढवळ करीत नाहीं. प्रत्येक खेडयांत तेथील कौन्सिल भरण्याची एक जागा असते; तेथें तें भरत असतें, आणि तेथें गांवच्या कारभाराची चर्चा चालते. दिवाणी किंवा फौजदारी सर्व प्रकारच्या लहानसहान तंटयांचा निकाल तेथें लावितात. शर्व्हेराय डोंगरांतील लोकांबद्दलचेंही सामान्यतः असलेंच वर्णन आढळतें. त्यांच्याबद्दल शॉर्ट असें म्हणतो कीं, ते स्वभावानें भितरे व निरुपद्रवी लोक आहेत; आणि त्यांचा मुख्यत्वें-करून शेतीचा व मेंढ्या पाळण्याचा धंदा आहे. ते शांततेनें राहून आपले तंटे तिऱ्हाइतांकरवीं तोडितात. हे सामाजिक विशेष जातीवर अवलंबून नसून स्थितीवर अवलंबून आहेत हें मागें सांगितलेल्या पापुआमधील आराफूरा लोकांच्या उदाहरणावरून व्यक्त होतें. त्यांच्यांत पदवीभेद किंवा नाईक नसून ते शांततेनें राहतात,

आणि तंटा उत्पन्न झाल्यास वृद्धमाणसांकरवीं तोडितात. लढाईकरितां ज्यांस संयुक्तक्रिया करणें भाग पडत नाहीं अशा समाजांस योग्य म्हणून जे मुख्य मुख्य विशेष आपण अनुमानानें वर ठरविले त्यांच्या खुणा ह्या सर्व उदाहरणांत नजरेस येतात. केंद्रीभूत जबर नियंत्रणाची आवश्यकता नसल्यामुळें त्यांच्यांत जें कांहीं नियमन आहे तें कौन्सिलाच्याद्वारा चालतें; वर्गभेद असत नाहींत, किंवा अगदीं अस्पष्ट असतात—म्हणजे, ठराविक स्थितीचा संबंध त्यांच्यांत नाहीं, त्यांच्यांत जे काय व्यवहार होतात ते करारानें होतात; आणि शास्त्यामंडळाकडे जें काय काम शिल्लक राहतें, तें जे तंटे उद्भवतील ते तोडून, आणि लहान लहान अपराधांबद्दल हलक्या शिक्षा करून, खासगी जीवितांचें रक्षण करण्याचेंच राहतें.

आतां सुधारलेल्या समाजाकडे वळून त्यांच्यांत उद्यमशील नमुन्याचे विशेष आपण पाहूं लागलों म्हणजे मात्र आपणास अडचणी आढळून येतात. त्यांना हल्लींचा आकार व व्यवस्था जी आलेली आहे ती बहुधा प्रारंभीं प्रारंभीं नेहमींच लढाया करून, आणि त्या बहुतेक परवांपर्यंत चालवून, आलेली आहे; आणि त्याबरोबरच त्यांच्यांत जिन्नस उत्पन्न करून ते देशांत पसरण्याच्या घटना उत्पन्न झालेल्या आहेत; त्यामुळें सर्वत्र त्या इतक्या मिश्रित स्थितींत आढळतात कीं, त्या एकमेकींपासून पृथक् करणें प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें बहुतेक अशक्यच आहे. आतां युद्धशील नमुन्याचें घटनाकारक तत्त्व जें जबरीचें सहकार्य तें उद्यमशील नमुन्याच्या स्वैच्छिक सहकार्यरूप घटकतत्त्वापासून जरी अगदीं मु-

ळांतूनच भिन्न आहे, तरी पहिलें तत्त्व ज्यांच्यांत दिसतें अशा संस्थांच्या क्षीणावस्थेचें अवलोकन केल्यानेंच, दुसरें तत्त्व ज्यांच्यांत दिसतें अशा संस्थांची वाढ मुकाट्यानें अवलोकिल्यासारखें होणार आहे. म्हणून ज्या प्रारंभींच्या राष्ट्रीय अवस्थांमध्यें लढाई हाच लोकांचा मुख्य धंदा असतो त्या अवस्थांकडून ज्या अवस्थांमध्यें लढाया कधीं कधींच होऊं लागतात, त्या अवस्थांकडे आपण गेल्यास, त्याबरोबरच, आपण अशा अवस्थांप्रत जातों कीं ज्यांच्यामध्यें समाजाची व्यक्तीवरील जी मालकी ती पहिल्याइतकी वारंवार व जोरानें दाखविली जात नाहीं, एका दर्जाच्या लोकांचा दुसऱ्या दर्जाशीं जो अंकितभाव तो कमी झालेला दिसतो, राजकीय शासन स्वेच्छाचारी व एकाच्या हातांतलें असत नाहीं, लोकांच्या जीविताचें नियमन पहिल्यापेक्षां कमी बाबतींत व कमी जोरानें होऊं लागतें, आणि त्यांचें रक्षण वाढतें. म्हणजे काय, तर, वाढीस लागलेल्या उद्यमशील नमुन्याचे विशेष आपल्या नजरेस येतात. निरनिराळ्या प्रकारच्या तुलना करतां हें सत्य बरोबर आहे असें दाखविणारा पुरावा नजरेस येतो.

प्रथम विशेष सुधारलेल्या यूरोपियन राष्ट्रांची प्रारंभींची स्थिति आणि नंतरची स्थिति ह्यांच्यामध्यें केवढें मोठें अंतर दिसतें तें पहा. रोमचें साम्राज्य नष्ट झालें तेथून सुरवात करतां आपल्या असें नजरेस येतें कीं, पुष्कळ शतकेंपर्यंत लढाया होऊन तीं बनत होतीं, क्षीण होत होतीं, आणि पुनः बनत होतीं; त्या काळीं त्यांचीं सामर्थ्यें प्रत्यक्ष लढाईमध्येंच खर्च होत नव्हतीं;

त्यांचा व्यय लढाई चालविणाऱ्या ज्या घटना त्यांच्या संरक्षणाकडेच बहुतेक होत असे; म्हणजे, राष्ट्राचा कामकरी भाग स्वतासाठीं अस्तित्वांत नसे, तर लढवय्या भागासाठीं असे. अशा रीतीनें युद्धशीलता जोरांत असून उद्यमशीलता अपक्व होती तेव्हां जें सामर्थ्याचें राज्य एक राष्ट्र दुसऱ्यावर वरचेवर स्थापीत असे, तेंच समाजांतल्या समाजांतही दिसून येत असे. घरगुलाम व शेतगुलाम ह्यांपासून निरनिराळ्या दर्ज्याच्या धारेकऱ्यांपर्यंत आणि त्यांच्यापासून तो ड्यूक व राजे ह्यांच्यापर्यंत जबरीचा अंकितपणा सर्वांवर लादलेला असे, व तेणेंकरून त्यांचीं व्यक्तिस्वातंत्र्यें बरींच नियंत्रित झालेलीं असत. आणि एकीकडे इतर देशांवर हल्ले किंवा त्यांचे प्रतीकार करण्याकरितां प्रत्येक देशांतील शास्ते आपल्या घटकांच्या हक्कांची जरी पायमल्ली करीत, तरी त्या घटकांचें एकमेकांपासून संरक्षण करण्याचें काम अगदीं अर्धवट रीत्या करीत, आणि तें काम बहुधा त्यांचें त्यांच्यावरच टाकीत. यूरोपियन राष्ट्रांचे मध्ययुगीन हे जे विशेष त्यांच्याशीं त्यांच्या आधुनिक विशेषांची जर आपण तुलना केली, तर त्यांजमध्यें पुढील महत्त्वाचे फरक दिसून येतात. पहिला हा कीं, मोठमोठाल्या प्रदेशांवर पसरलेलीं जशीं तेथील राष्ट्रें बनत गेलीं, तशा लहान लहान प्रदेशांमध्यें होणाऱ्या लढाया बंद झाल्या; आणि ह्या मोठाल्या राष्ट्रांमध्यें जरी मोठाल्या प्रमाणांवर हल्लीं लढाया होतात, तरी त्या पहिल्या इतक्या वरचेवर होत नाहींत, आणि त्यांमध्यें सगळ्याच नागरिकांना अंग घालावें लागत नाहीं. दुस-

रा हा कीं, प्रत्येक राष्ट्रांत स्वताकरितां जिन्नस उत्पन्न
करणारी व ते सर्वत्र पसरणारी लोकसंख्या पूर्वीहून
ज्यास्त झाली आहे; म्हणजे, पूर्वी राष्ट्राचा कामकरी
भाग लढवय्याभागासाठीं अस्तित्वांत आलेला असे त्या-
ऐवजीं आतां लढवय्या भाग मुख्यत्वेंकरून कामकरी
भागाच्या फायद्यासाठीं उत्पन्न झालेला असतो, म्हणजे,
त्याचे धंदे त्यास शांतपणें करतां यावे एतदर्थ तो अ-
स्तित्वांत आलेला असतो. तिसरा फरक हा कीं, ठरीव
स्थितीची पद्धति तिच्या कांहीं स्वरूपीं अजीबाद नष्ट
झालेली असून, आणि अन्य स्वरूपीं बरीच क्षीण झा-
लेली असून, तिच्या ऐवजीं बहुतेक सर्वत्र कराराची
पद्धति सुरू झालेली आहे. जे लोक खुशीनें, किंवा स-
वींनीं कांहीं वर्षें फौजेंत नोकरी करावी ह्या कायद्यानु-
रूप, लष्करांत शिरलेले असतात त्यांनाच ते तेथें राही-
तोंपावेतों ठरीव स्थितीची सरणी पूर्वीप्रमाणें कडकडीत
लागू असते. चवथा हा कीं, जबरीच्या सहक्रियेच्या
ह्या क्षीणावस्थेबरोबर आणि स्वैच्छिक सहक्रियेच्या वाढी-
बरोबर व्यक्तींच्या क्रियांवरील पुष्कळ लहानसहान
नियंत्रणें कमी झालीं आहेत किंवा निघून गेलीं आहेत.
माणसें पूर्वीइतकीं विशेष स्थानांना हल्लीं बद्ध झालेलीं
नाहींत; त्यांचें धर्ममत अमुकच असावें अशीं त्यांजवर
सक्ती नाहीं; त्यांचीं राजकीय मतें बोलून दाखविण्यास
पहिल्या इतके प्रतिबंध नाहींत. त्यांच्या पोषाकाच्या
तऱ्हा व राहण्याच्या पद्धती अमुकच असाव्या असें
त्यांस हल्लीं कोणी सक्तीनें सांगत नाहींत; खासगी सं-
योग बनविण्यास आणि कोणत्याही राजकीय, धार्मिक, किंवा

सामाजिक हेतूंसाठीं सभा भरविण्यास त्यांस हल्लीं बहुतेक मुळींच प्रत्यवाय नाहीं. पांचवा फरक हा कीं, नागरिकांच्या स्वातंत्र्याचें सरकार हल्लीं पूर्वींहून कमी अतिक्रमण करितें इतकेंच नव्हे, तर अतिक्रमणापासून पूर्वींहून त्यांचें ज्यास्त संरक्षण करितें. ज्या अमदानींत व्यक्ती आपले लोकांनीं केलेले खासगी अन्याय आंगजोरानें साधतील तितके भरून काढीत असत, किंवा मुख्य वा स्थानिक शास्त्यानें आपल्या वतीनें स्वसामर्थ्याचा उपयोग करावा म्हणून त्यास लांच देत असत, त्या अमदानीच्या ऐवजीं हल्लीं अशी अमदानी आली आहे कीं, एकीकडे पहिल्याइतकें स्वताचें संरक्षण करावें लागत नसून दुसरीकडे, मुख्य शास्ता व त्याचे मुनीम यांचें न्याय करणें हें एक प्रधानकर्तव्य होऊन बसलेलें आहे. एवंच, सर्व तऱ्हांनीं आपल्या असें दृष्टीस पडतें कीं, युद्धशीलता पूर्वींपेक्षां कमी होऊन उद्यमशीलता जशी वाढत चालली आहे, तशी ज्या सामाजिक स्थितींत व्यक्ती सरकाराच्या फायद्यासाठीं असतात ती स्थिति जाऊन जिच्यांत सरकार व्यक्तींच्या फायद्यासाठीं असतें ती स्थिति उत्पन्न झालेली आहे.

आतां युरोपियन राष्ट्रांच्या ह्या सामान्य स्थितींमधील भेदावरून नजर काढून त्यांपैकीं ज्याच्यांत दुसऱ्यांपेक्षां उद्यमशीलतेस युद्धशीलतेनें कमी अडथळा आलेला आहे त्याच्यात्यांच्यांतील फरकाकडे ती लाविल्यास वरच्यासारख्या गोष्टी नजरेस येतात. आह्मी अर्थात् एकीकडे इंग्लंद व दुसरीकडे इतर यूरोपस्थ देश ह्यांस अनुलक्षून बोलत आहों. म्हणून आतां इंग्लंद व फ्रान्स ह्या दोन देशांमधील फरकाकडेच पहा. विजेते नार्मन लोक इंग्लं-

दभर पसरल्यावर फ्रान्सापेक्षां त्या देशांत स्थानिक शास्ते
मुख्य शास्त्याचे ज्यास्त अंकित झाले; आणि त्या देशा-
इतके इंग्लंदांत सरदारांमध्यें आपसांत कलह उत्पन्न झाले
नाहींत. ह्या कालास अनुलक्षून हालाम असें म्हणतो कीं,
ह्या कालीं इंग्लंदांत खासगी लढाया फारशा ऐकूं येत
नाहींत. स्टीफनच्या राज्यांत उद्भवलीं त्याप्रमाणें जरी
कधीं कधीं बंडें उद्भवत, आणि सरदारांमध्यें जरी कधीं
कधीं लढाया होत, तरी अजमासें दीडशे वर्षेंपावेतों,
म्हणजे जॉनच्या कारकीर्दीपर्यंत, ह्या अंकितपणामुळें
इंग्लंदांत फ्रान्सापेक्षां ज्यास्त शांतता होती. शिवाय ध्या-
नांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, इंग्लंदचीं जीं सामान्य
युद्धें होत तीं देशाबाहेर होत. इंग्लंदच्या किनाऱ्यावर
शत्रू चालून आला असें फारच क्वचित् होई; आणि वेल्स,
स्काटलंद व आयर्लंद यांच्याशीं झालेल्या झगड्यांत
इंग्लंदावर असे फारच थोडे हल्ले झाले. ह्यामुळें उद्यम-
शील जीवित आणि त्यास उचित अशा संस्थांची वाढ
ह्यांस फ्रान्साच्या मानानें इंग्लंदांत फारच अल्प अडथळे
आले. आतां फ्रान्साची स्थिति ह्याहून फारच भिन्न दि-
सते. ह्या दीडशें वर्षांत आणि पुढेंही पुष्कळच काळपर्यंत
इंग्लिशांशीं केलेल्या पण फ्रान्सांतील जमिनीवर लढलेल्या
पुष्कळ युद्धांखेरीज, आणि इतर देशांशीं केलेल्या युद्धांखेरी-
ज, त्या देशांत सर्वत्र स्थानिक युद्धें चाललेलीं असत.
दहाव्या शतकापासून तों चवदाव्या शतकापर्यंत मुख्य
जमीनदार आणि पोटजमीनदार ह्यांच्यामध्यें, आणि
पोटजमीनदारांमध्यें नेहमीं लढाया चालत. सरदारांवर
राजाचा चांगला पगडा चवदावें शतक अर्धें जाई तोंप-

र्यंत बसला नव्हता; आणि स्थानिक शास्त्यांचे तंटे बंद करण्यास समर्थ असा श्रेष्ठ शास्ता पंधराव्या शतकांतच तेथें उत्पन्न झाला. ह्या यादवीमुळें उद्यमविषयक वाढीस केवढा धक्का बसला हें ह्या काळाबद्दलच्या एका लेखकानें केलेल्या पुढील अतिशयोक्तिपर वर्णनावरून स्पष्ट होईल. तो म्हणतोः—ज्या ह्या काळांत राजा आणि लष्करी जमीनदार ह्यांच्यामध्यें शेवटचा झगडा चालला होता त्या काळांत " शेती, व्यापार, आणि सर्व यांत्रिक कला बंद पडल्या होत्या ". आतां उद्यमविषयक जीविताच्या संबंधानें ह्या दोन देशांत असा हा फरक पडल्यामुळें राजकीय बाबतींत कोणता फरक उत्पन्न झाला तें पाहूं. ह्या संबंधानें पहिली गोष्ट ध्यानांत ठेवावयाची ही कीं, बाराशेंपन्नासच्या सुमारास वेठीस आळाबंदा बसून व तिजबद्दल पैसे द्यावयास लागून शेतगुलामांची स्थिति इंग्लंदांत सुधारावयास लागली, आणि चवदाव्या शतकांत ह्या दासवत् प्रजेस स्वतंत्र प्रजेचें स्वरूप बरेंचसें आलें. इकडे फ्रान्स व इतर यूरोपस्थ देशांत पूर्वींची स्थिति न सुधारतां उलट ज्यास्तच बिघडत चालली होती. ह्या कालाच्या संबंधानें फ्रीमन म्हणतोः— "इंग्लंदांत शेतगुलामी एकंदरींत नष्ट होत चालली होती आणि इतर पुष्कळ देशांत ती ज्यास्त ज्यास्त खडतर होत चालली होती". इंग्लंदांत ठराविक स्थितीच्या ऐवजीं ही कराराची स्थिति हळू हळू शहरांपासून खेड्यांकडे पसरत चालली होती, तिच्याबरोबर सरदारवर्गालाही स्वतंत्रता येत होती. छोट्या जमीनदारांस लष्करी नोकरी करणें पूर्वीं जें भागच असे त्याच्या ऐवजीं

आतां पैसे भरण्याची मुभा त्यांस मिळाली होती. एवंच जॉनच्या कारकीर्दीपर्यंत खालच्या वर्गाच्या श्रमरूप नोकरीप्रमाणेंच वरच्या वर्गाच्या संग्रामरूप नोकरीबद्दल मांडीवाळ होऊन गेली. ह्याप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्यावरील नियंत्रणें कमी झाल्यावर मागून मालमत्तेवरील हल्ले कमी होऊं लागले. जॉनच्या राज्यांतील प्रसिद्ध सनदेनें एकीकडे शहरें व राजाचे न लढणारे धारेकरी ह्यांवरील कर कमी होऊन, दुसरीकडे अशी व्यवस्था केली कीं, न्याय विकूं नये, लांबणीवर टाकूं नये, किंवा नाहीं म्हणूं नये. हे सर्व फेरबदल उद्यमशील नमुन्यास योग्य म्हणून ज्या व्यवस्था आपल्या दृष्टीस पूर्वी पडल्या त्या उत्पन्न करण्याला अनुकूल असेच होते. नंतर तेथें प्रतिनिधिविशिष्ट सरकारव्यवस्था उत्पन्न झाल्याचें आपल्या नजरेस येतें, आणि हीही व्यवस्था उद्यमविषयक वाढीपासून उत्पन्न होत असून त्या नमुन्यास योग्य अशीच आहे हें आपल्या नजरेस गत प्रकरणांत अन्य रीतीनें विचार करतां, आलेंच आहे. पण फ्रान्सांत ह्यांपैकीं कोणताच फेरबदल घडून आला नाहीं. शेतगुलामी त्यानंतर बराच काळपर्यंत तेथें जशीच्या तशीच राहिली. लष्करी जमीनदाराच्या लष्करी नोकरीबद्दलची मांडीवाळ इंग्लंदच्या इतकी तेथें झाली नाहीं; आणि लोकप्रतिनिधिसभा स्थापन करण्याचे जे कल दिसून आले ते सर्व जागच्याजागीं मुरले. पुढील काळामध्यें झालेल्या फेरबदलांची अशीच सविस्तर तुलना करूं म्हटल्यास फार वेळ लागेल; म्हणून त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचें तेवढेंच दिग्दर्शन करूं. आतां वर सांगितलेल्या कारणामुळें

ज्या काळीं इंग्लंदांत पार्लमेंतीय व्यवस्थेची स्थापना झाली त्या काळापासून आरंभ करतां आपणास असें आढळून येतें कीं, पुढें दीड शतकपर्यंत, म्हणजे "वार्स आव्हध रोझेस" ह्या युद्धांच्या काळापर्यंत, फ्रान्सांत जे यादवी दंगे झाले त्या मानानें इंग्लंदांत फार अल्प व लहानसहानच झाले; आणि त्याबरोबर दुसरी एक गोष्ट आपल्या लक्षांत येते ती ही कीं, इंग्लंद व फ्रान्स ह्यांमधील फ्रान्सांतील जमिनीवर होणाऱ्या युद्धांखेरीज, त्या देशाचीं फ्लॅन्डर्स, क्यास्टील, आणि नव्हारी ह्यांच्यांशीं जंगी युद्धें चालू असून, बर्गंडीशीं झगडा सुरूच होता. ह्याचा परिणाम असा झाला कीं, इंग्लंदांत कामन्स सभेच्या रूपानें लोकांची सत्ता स्थापन होऊन वाढत चालली असतां, फ्रान्सांत "स्टेट्स् जनरल" ला (तेथील पार्लमेंताला) जी सत्ता अगोदर प्राप्त झालेली होती ती कमी होत चालली. आतां वरील तीस वर्षें चाललेल्या इंग्लंदांतील यादवी युद्धांनीं राजाच्या स्वैच्छिकसत्तेकडे इंग्लंदची पुनः पीछेहाट झाली ही गोष्ट न विसरतां, ह्यापुढें कोणते फरक ह्या दोन देशांमध्यें दिसूं लागले ते पाहूं. वरील यादवीनंतर दीड शतकपर्यंत इंग्लंदच्या अंतःशांततेचे भंग फारच अल्प व फारच क्षुल्लक असे झाले; आणि ज्या थोड्याशा लढाया इतर देशांशीं झाल्या त्या नेहमींप्रमाणें इंग्लंदच्या बाहेर झाल्या. ह्या कालांत यादवी युद्धांमुळें झालेली पीछेहाट भरून आली, आणि लोकसत्तेची बरीच वृद्धि झाली; म्हणजे, बेजीहॉट म्हणतो त्याप्रमाणें, "आठव्या हेन्रीचें दासभूत पार्लमेंत जाऊन त्याच्याऐवजीं इलिझाबेथचें कुरकूर कर-

णारे, पहिल्या जेम्सचें दंगा करणारें, आणि पहिल्या चार्लसचें बंड करणारें, पार्लमेंत उद्भवलें ". इकडे फ्रान्स ह्या काळापैकीं पहिलीं पन्नास वर्षें बहुतेक सारखें इटाली, स्पेन, आणि ऑष्ट्रिया या देशांशीं लढाया करण्यांत गुंतलेलें होतें; आणि पुढच्या शंभर वर्षांत राजकीय व धार्मिक अशा बहुतेक सारख्या यादवी युद्धांमुळें त्याची खराबी होत चालली होती. ह्याचा परिणाम असा झाला कीं, लोकांनीं वेळोवेळीं केलेल्या विरोधास न जुमानतां राजाची सत्ता ज्यास्त ज्यास्त अनियंत्रित होत चालली.

ह्या परस्परभिन्न परिस्थितींत जे परस्परभिन्न सामाजिक नमुने उत्क्रांत झाले, ते पूर्णपणें ध्यानांत येण्यास आपणास ह्या दोन देशांच्या केवळ राजकीय घटनांचीच तेवढी तुलना करून उपयोगाची नाहीं, तर त्यांच्यांतील सामाजिक नियंत्रणाच्या ज्या सरणी त्यांचीही तुलना करून पाहिली पाहिजे. म्हणून ज्या प्रतिक्रियेचा शेवट फ्रान्सांतील महाराज्यक्रांतींत झाला तीस प्रारंभ होण्याच्या वेळीं या सरणी काय होत्या तें आतां लक्षांत आणूं. व्यक्तीचें जीवित, वित्त आणि स्वातंत्र्य ह्यांच्यावर सरकारची मालकी असते, ह्या युद्धशील नमुन्याच्या कृतीस अनुसरून राजा हा सर्व गोष्टींचा मालक आहे असें तेथें (फ्रान्सांत) कोणी म्हणत असत. जमीनदारावर त्यानें लादलेलीं कराचीं ओझीं एवढीं अवजड असत कीं तीं सोसण्यापेक्षां जमीनदाऱ्याच सोडणें त्यांपैकीं कित्येकांस बरें वाटत असें. बरें, सरकार अशा रीतीनें मालमत्ता घेऊन शिवाय लोकांची मेहनतही घेत असे. वर्षाचे एक चतुर्थांश दिवस राजाची व जमीनदारांची वेठ करण्यांत

गरीब लोकांस खर्च करावे लागत. शहरांना व गांवांना ज्या थोड्या बहुत विशेष सवलती दिल्या असतील त्यांबद्दल पुनःपुनः त्यांस भूर्दण्ड भरावा लागे; उदाहरणार्थ कांहीं शहरांचे म्युनिसिपल हक्क तीस वर्षांत त्यांच्याकडून सात वेळां काढून घेण्यांत व त्यांस पुनः विकण्यांत आले होते. सरदार आणि धारेकरी ह्यांस राजा सांगेल तितके वेळां लढाईवर जावें लागे; आणि अशा रीतीनें धरून नेलेल्या लोकांस चाबकाखालीं कवाईत शिकवावी लागे. ह्या त्रासामुळें लोक इतके दरिद्री झाले कीं ते शेतें पिकण्याच्या अगोदरच कापीत, गवत खात, आणि उपासमरीनें पटापट मरत; तरी देखील त्यांचे जीव किंवा घरें दारें ह्यांच्या संरक्षणार्थ सरकार फारच अल्प खबरदारी घेत असे. त्या काळीं भररस्त्यावर होणाऱ्या लुटालुटी, चोऱ्या, खून, आणि लपवून ठेविलेलें द्रव्य दाखविण्याकरितां लोकांस केलेल्या दुःसह वेदना, ह्यांचीं त्या काळचे लेखक फार वर्णनें करितात. भटके लोकांच्या टोळ्या जबरीनें पैसे उपटीत देशभर फिरत असत; आणि त्यांना शिक्षा करण्याकरितां निरपराधी लोकांस पकडून पुरावा नसतां तुरुंगांत टाकीत. राजा किंवा शत्रू ह्यांपासून जीवाचें संरक्षण होत नसे. चवकशी न झालेल्या किंवा शिक्षा न केलेल्या लोकांस कोंडण्यासाठीं एकट्या पारीस शहरांत सरासरी ३० कारागृहें होतीं; आणि न्यायाच्या नांवांवर चाललेला लुटारूपणाचा खर्च भागविण्याकरितां फिर्यादींवर वर्षाचा चार ते सहा कोटी फ्रांकांचा (साडेनऊ पेन्सांचें फ्रेंच नाणें) बोजा पडत असे. अशा रीतीनें सरकार एकीकडे लोकांवर इतका भार टा-

कून त्यांचें संरक्षण इतकें अल्प करीत असतां, त्यांचीं खासगी जीवितें आणि उद्योगधंदे ह्यांचें नियंत्रण करण्यांत तें सदा तत्पर असे. धर्माबद्दल इतकी सक्ती असे कीं प्राटेस्टंट असतील त्यांस तुरुंगांत टाकीत, किंवा जहाजावर गुलामगिरी करण्यास पाठवीत, किंवा फटके मारीत, आणि त्यांच्या उपाध्यायांस फांशीं देत. मिठावर जबर कर असून तें प्रत्येकानें किती खर्च करावें व कसें खर्च करावें ह्याचा निर्बंध असे. प्रत्येक उद्योगधंद्यावर सरकारची देखरेख असे. कांहीं प्रकारचीं पिकें काढण्याची मनाई असे; आणि अयोग्य ठरविलेल्या जमिनींवर द्राक्षवेल लाविल्यास ते उपटून टाकीत. मार्केटांत दोन बुशिलांहून ज्यास्त गहूं कोणीं खरेदी करूं नये असा नियम असे, आणि तो अमलांत आणण्यासाठीं तेथें सरकारी घोडेस्वार हजर असत. कारागिरांनीं कोणते जिन्नस तयार करावे आणि ते कोणत्या पद्धतींनीं करावे याबद्दल इतके कडक निर्बंध असत कीं, कोणीं नवीं यंत्रें तयार केल्यास त्यांचा आणि त्या यंत्रांनीं तयार केलेल्या ज्निसांचा नाश करण्यांत येत असे आणि ती यंत्रें करणारांस शिक्षा होत असे. हे नियम एकामागून एक इतके लवकर करण्यांत येत कीं त्यांना अंमलांत आणण्याच्या कामीं सरकारी नोकरांचा मोठा गोंधळ उडे; आणि ह्या हुकमांची संख्या जशी वाढे तशी अर्थात् अंमलदाराचीही वाढे. आतां तेव्हां इंग्लंदमध्यें काय स्थिति होती ह्याचा विचार करतां आपल्यास असें आढळून येतें कीं कामन्ससभा सर्वांत प्रबल व्हावी इतकी राजकीय रचनेच्या औद्योगिक नमुन्याची वाढ एकीकडे होत असतां

दुसरीकडे तीस योग्य अशा सामाजिक सरणीकडे प्रगति होतच होती. प्रजेचा सरकाराप्रत असलेला अंकितपणा जरी हल्लींपेक्षां ज्यास्त होता तरी तो फ्रान्सांतल्यापेक्षां कमी होता. व्यक्तीच्या खासगी हक्कांची तेथें फ्रान्सांतल्या सारखी बेगुमानपणानें पायमल्ली होत नसे; आणि माणसास पाहिजे तेव्हां वारंटाविना पकडला जाण्याची भीति नसे. न्यायदानपद्धति जरी अपूर्ण होती तरी ती फ्रान्सांतल्या इतकी भिकार नव्हती. लोकांच्या देहांची सुरक्षितता बरीच असे, आणि मालमत्तेचे अतिक्रम बेसुमार नव्हते. प्राटेस्टंट धर्मापासून भिन्न झालेल्या लोकांवर ज्या कांहीं अपात्रता लादलेल्या होत्या त्या शतकाच्या आरंभींच कमी केलेल्या होत्या, आणि पुढें क्याथलिकांच्यावरच्याही कमी केल्या होत्या. मुद्रणस्वातंत्र्य बरेंच स्थापन झालेलें होतें, आणि राजकीय विषयांची चर्चा निर्भीडपणें व्हावयास लागून पार्लमेंतीय वादविवाद प्रसिद्ध होऊं लागले होते. त्याच सुमारास सार्वजनिक रीत्या सभा भरवून लोक स्वतंत्रपणें आपले विचार लोकांपुढें मांडूं लागले. एवंच एकीकडे सरकार व्यक्तींचें अतिक्रमण कमी करून त्यांचें संरक्षण अधिक करावयास लागलें असतां, दुसरीकडे, त्यांच्या रोजच्या व्यवहारांत तें कमी हात घालूं लागलें. व्यापार व उद्योगधंदे यासंबंधानें जरी बरेंच नियंत्रण होतें, तरी तें फ्रान्सांतल्यासारखें कडक नव्हतें, आणि तेणेंकरून शेतकरी, व्यापारी आणि कारागीर ह्यांस प्रत्येक ठिकाणीं "असें असें कर" असें सांगण्यास सरकारी अंमलदारांची सेना तेथें नेमिलेली नसे. सारांश, इंग्लंदची

स्थिति फ्रान्साच्याहून इतकी भिन्न होती कीं, तेव्हांच्या अनेक फ्रेंच लेखकांनीं त्याबद्दल आश्चर्य व पसंती हीं प्रदर्शित केलेलीं आहेत. आणि त्यांच्या लेखांतून बकलनें हें सिद्ध करण्यास अनेक उतारे घेतलेले आहेत.

तथापि १७७५ ते १८१५ हा युद्धांचा काळ, आणि त्यानंतरचा शांततेचा काळ, ह्या दोन काळांत इंग्लंदांत अनुक्रमें पीछेहाटीचे आणि प्रगतीचे असे जे फेरबद्दल होऊन गेले आहेत तेच सर्वांत अत्यन्त अर्थप्रचुर आहेत. अठराव्या शतकाच्या शेवटीं आणि एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं समाजाची व्यक्तीवरील जी मालकी तिजकडे इंग्लंदांत बरीच पीछेहाट झालेली होती. "मुत्सद्यांस सगळें राष्ट्र मिळून सर्वांत अत्यन्त मोलाचें वाटूं लागलें, आणि आज्ञाधारकत्वाचा जो लोकांचा राष्ट्राशीं किंवा सरकाराशीं संबंध त्याविना लोकांची आठवण सरकारास होत होती असा कांहींही पुरावा शोधून काढण्यास मोठी मारामार पडते". "लोक म्हणजे कर देणारा आणि शिपायांचा पुरवठा करणारा असा समूह आहे याच दृष्टीनें सरकार त्यांचकडे पाहत असे". समाजाचा युद्धशील भाग एकीकडे पुष्कळ वाढला असतां, दुसरीकडे उद्यमशील भाग कायमच्या लष्करी कोठावळ्याच्या किंवा कमिसेरिएटच्या स्थितीप्रत जाऊन पोहोंचला होता. युद्धामध्यें जीवित व स्वातंत्र्य ह्यांचा जो बळी द्यावा लागत असतो तो असुक वर्षे अमक्यानें लष्करांत नोकरी केलीच पाहिजे अशा जबरीच्या कायद्यांनीं आणि लोकांस जबरदस्तीनें लढाईस धरून नेल्यानें बराच दिला जात होता; आणि निर्दयपणानें कर

वाढवून लोकांच्या मालमत्ताविषयक हक्कांची तुडवणी चालली होती. ह्याचा परिणाम मध्यमवर्गावर इतका जबरदस्त झाला कीं, त्यांस आपली राहणी पूर्वीपेक्षां कमी दर्जाची ठेवावी लागूं लागली, आणि कांहीं अंशीं दुष्काळ आणि बऱ्याच अंशीं लढाईचा बोजा एणेंकरून खालच्या वर्गांतील लोकांची विपत्ति इतकी वाढली कीं, " शेंकडों लोकांस रानफळें खाण्याचा प्रसंग आला ". सरकारानें व्यक्तींच्या केलेल्या ह्या मोठाल्या अतिक्रमणांबरोबर लहानसहान अतिक्रमणें कितीतरी होत होतीं. सार्वजनिक सभा जबरीनें बंद करून त्यांतील पुढाऱ्यांस पकडण्याकरितां बेजबाबदार माणसें सरकारानें नेमलेलीं होतीं. पुस्तकालयें व वर्तमानपत्रवाचनालयें परवान्याविना स्थापितां येत नसत; आणि परवानगीवांचून पुस्तकें उसनीं देणारास कायद्यानें शिक्षा असे. " वर्तमानपत्रांचीं तोंडें दाबण्यास फार नेटाचे प्रयत्न " करण्यांत आले होते; आणि सरकारास अप्रिय अशा ग्रंथकारांचे ग्रंथ छापण्यास पुस्तकविक्रे धजावत नसत. " गुप्त हेर पगारी ठेविलेले होते, साक्षीदारांकडून खोट्या साक्षी देवविल्या जात, ज्यूऱ्या अनुकूल लोकांच्याच नेमीत, आणि लोकस्वातंत्र्याचा स्तंभ असा जो " हेबिॲस कॉर्पस " नांवाचा कायदा त्याची अंमलबजावणी वरचेवर बंद करून सरकार चवकशी न करितां लोकांस पाहिजे तितके दिवस अटकेंत ठेवीत असे ". सरकार लोकांवर एकीकडे इतके कर लादीत असतां, इतकी जबरी करीत असतां, आणि त्यांचें इतकें नियंत्रण करीत असतां, दुसरीकडे लोकसंरक्षण बरोबर तऱ्हेनें होत न-

व्हतें. पीनल कोड किंवा शिक्षाविषयक कायद्यांचें वाड पूर्वींहून ज्यास्त कडक व ज्यास्त व्यापक केलें होतें. राजद्रोहाची व्याख्या ज्यास्त व्यापक बनविली होती, आणि पूर्वीं देहांतशिक्षा नसलेल्या पुष्कळ अपराधां-बद्दल ती आतां करूं लागले. एवंच "अनेक हास्यास्पद अपराधांबद्दल बायका व पुरुषांना फांशींच्या शिक्षा होऊं लागल्या", आणि "लोकांच्या जीविताची किंमतच नाहींशी झाली". पण त्याबरोबरच सुरक्षितता न वा-ढतां उलट कमी झाली. "इंग्लंदांतील अपराधांची ह-कीकत" (History of Crime in England) ह्या आपल्या पुस्तकांत पाइक म्हणतो त्याप्रमाणें, "असें उघड झालें कीं झगड्याचा ताण जसजसा ज्यास्त होत जातो तशी अंगजबरी आणि बेकायदेशीरपणा ह्यांकडे प्रतिक्रिया होण्याची भीति ज्यास्त होते". आतां ह्याच्या उलट चित्राकडे पहा. पुष्कळ काळपर्यंतच्या युद्धांनीं उत्पन्न झालेल्या क्षीणावस्थेंतून इंग्लंद देश उठ-ल्यावर, आणि दारिद्र्यामुळें उत्पन्न झालेले सामाजिक दंगे-धोपे निवाल्यानंतर, उद्यमशील नमुन्यास योग्य असे विशेष पुनः जीव धरूं लागले. सरकार नागरिकांवर जी जबरी करीत होतें ती अनेक तऱ्हांनीं कमी झाली. जब-रदस्तीची लष्करी नोकरी जाऊन स्वैच्छिक तसली नो-करी आली; आणि व्यक्तिस्वातंत्र्यावरील कांहीं लहानसान नियंत्रणें निघून गेलीं; उदाहरणार्थ, हलक्या कारागि-रांस पोटासाठीं पाहिजे तेथें जाण्याची जी बंदी असे ती निघाली, आणि कामकऱ्यांचीं मंडळें बनवूं देऊं लागले. "पीनलकोडा" चीही ह्याबरोबरच सुधारणा झाली;

त्यामध्यें स्त्रियांना प्रसिद्धपणें फटके मारण्याचा प्रघात प्रथम रद्द केला; देहान्तशिक्षा होणारे अपराधांची संख्या कमी होऊं लागली; आणि कर्जासाठीं खोडा किंवा कैद हींही रद्द केलीं. धर्मविषयक स्वातंत्र्यावर ज्या गदा शिल्लक राहिलेल्या होत्या त्या काढून टाकिल्या; त्या प्रथम प्राटेस्टंट धर्मापासून विभक्त झाले त्यांच्यावरच्या निघाल्या, मागाहून क्याथलिकांवरच्या, आणि शेवटीं केकर व ज्यू लोकांवरच्या. पार्लमेंतीय व म्युनिसिपल सुधारणांच्या कायद्यांनीं पुष्कळ लोक प्रजावर्गांतून निघून शास्त्यावर्गांत गेले. सोन्यारुप्याचा अनिर्बंध व्यापार करूं दिल्यानें, संयुक्त ठेवीच्या पेढ्या चालण्याची परवानगी दिल्यानें, आणि अनेक प्रकारच्या आयात मालावरील जकात काढून टाकिल्यानें, लोकांच्या व्यापारविषयक व्यवहारांतील अडचणी कमी झाल्या. शिवाय, ह्या आणि मुद्रणावरील बोजे काढून टाकण्यासारख्या असल्याच अन्य फेरफारांमुळें एकीकडे लोकांच्या स्वतंत्र कृतींमधील अडथळे दूर झाले असतां दुसरीकडे सरकारची संरक्षकक्रिया वाढती झाली. पोलीसव्यवस्थेंत ज्यास्त सुधारणा झाल्यानें, जिल्हाकोर्टें सुधारल्यानें, आणि अन्य रीतींनीं, जीवसुरक्षितता आणि वित्तसुरक्षितता हीं ज्यास्त वाढलीं.

युनैटेड्स्टेट्समध्यें बहुतेक अशा प्रकारची स्थिति झालेली आहे; तेव्हां तो व हा पुरावा लक्षांत आणतां आम्हीं केलेल्या सिद्धान्ताचें चांगलें पुष्टीकरण होतें. एकंदर सर्व भानगडी व घोंटाळे यांमध्यें, तुलनांवरून असें बऱ्याच स्पष्ट रीतीनें दिसून येतें कीं, उद्यमशील

समाजांचे जे विशेष असावे म्हणून आह्मीं तर्कदृष्ट्या ताडिलें होतें, तेच विशेष, ज्या मानानें एकंदर सामाजिक व्यवहार कराराप्रमाणें श्रमांची देवघेव करावयाची ह्या तत्त्वावर चाललेले असतील त्या मानानें प्रत्यक्ष अस्तित्वांत असलेल्या समाजांतून दिसून येतात.

१४३. जो समाज नेहमीं लढाया करीत असेल त्यांतील घटकास योग्य अशा शीलाचे विशेष कोणते असावे ह्या प्रश्नाचा जसा आपण गतप्रकरणांत विचार केला, तसा प्रस्तुत प्रकरणांत जो समाज केवळ उद्यमविषयक व्यवहारांतच गुंतलेला आहे त्याच्या घटकांचे स्वभावविशेष काय असले पाहिजेत ह्या प्रश्नाचा विचार करूं. आधींच, कांहीं अयुद्धशील अशा लहान लोकसमूहांमध्यें दिसणाऱ्या समाजरचनेच्या उद्यमशील नमुन्याच्या ठोकळ स्वरूपाचें वर्णन करतांना त्याबरोबरच येणाऱ्या व्यक्तिविषयक गुणांचें कांहीं दिग्दर्शन केलें आहे, पण त्यांहून ज्यास्त सुधारलेल्या औद्योगिक समाजांमध्यें जे तसलेच गुण लोकांमध्यें दृष्टीस पडतात त्यांचा विचार करण्यापूर्वीं त्यांचीं आणि त्यांशिवाय आणखीही कांहीं गुणांचीं उदाहरणें देणें इष्ट दिसतें.

केंद्रीभूत असें जबरीचें नियंत्रण नसलें म्हणजे व्यक्तीस आपल्या स्वातंत्र्याची चांगली किंमत वाटत असते, आणि तें न गमावण्याबद्दल त्याचा निश्चय असतो. म्हणून गोडेढिमाल व बोडो लोक भलतेच हुकूम त्यांजवर सोडल्यास ते निश्चयानें त्यांस प्रतिरोध करितात. शांतताप्रिय लेप्चा लोक जुलूम किंवा अन्याय सहन करण्याच्या ऐवजीं पुष्कळ हाल सोसण्यास

तयार होतात. साधे भोळे सांताळ लोक न्यायाचे मोठेच भक्त आहेत, आणि म्हणून त्यांच्यावर कोणीं जुलूम करण्याचा यत्न केल्यास ते तेथून पळून जातात. त्याचप्रमाणें पूर्वीं न सांगितलेले असे दक्षिणमलायांतील जाकून लोक अगदीं निरुपद्रवी, पण शूर व शांतताप्रिय असे असून, त्यांनीं नेमिलेल्या नायकाखेरीज कोणाचें नियंत्रण ते कबूल करीत नाहींत, आणि ते फार अभिमानी आहेत; त्यामुळें ते दुसऱ्याच्या कह्यांत मुळींच राहूं शकत नाहींत.

ह्या शांतताप्रिय लोकांमध्यें जसा स्वताच्या हक्कांबद्दल फार अभिमान असतो, तसाच इतरांच्या हक्कांबद्दलही त्यांच्यांत विलक्षण आदर असतो. ही गोष्ट त्यांच्यांत व्यक्तीव्यक्तींमध्यें क्वचितच झगडे होतात ह्यावरून प्रथम लक्षांत येते. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाल लोकांबद्दल हॉडसन असें म्हणतो कीं, ते आपल्या लोकांवर किंवा शेजाऱ्यांवर अगदीं हात टाकीत नाहींत. निलगिरीमधील शांतताप्रिय टोळ्यांबद्दल कर्नल ऑक्टरलोनी म्हणतो कीं, त्यांच्यांत दारू खाऊन झिंगणें आणि मारामारी हीं बिलकूल दिसत नाहींत. लेप्चा लोकांबद्दल **क्यांबेल** असें म्हणतो कीं, ते एकमेकांशीं फारच क्वचित् भांडतात. जाकून लोकांचेंही असेंच आहे, आणि त्यांच्यांत कधीं तंटे उत्पन्न झाल्यास त्यांनीं निवडलेले नाईक न लढतां किंवा मत्सर न करतां ते तोडितात. त्याप्रमाणेंच आराफुरा लोक एकमेकांशीं शांततेनें व बंधुप्रेमानें वागतात. शिवाय त्यांच्यांत आप्तांबद्दल सूड उगविण्याच्या कर्तव्याची कल्पना युद्धशील

लोकांतल्यासारखी मुळींच नाहीं; तर ह्याच्या उलट समज व प्रघात त्यांच्यांत दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, लेप्चा लोकांबद्दल कर्यांबेल असें म्हणतो कीं, ते त्यांस कोणीं इजा केल्यास विलक्षण क्षमाशीलपणा दाखवितात, आणि आनंदानें तडजोडीवर येतात.

अशा रीतीनें इतरांच्या स्वातंत्र्याबद्दल जर त्यांच्यांत आदरबुद्धि आहे, तर स्वताचे जे मालमत्तेचे हक्क त्यांच्याबद्दलही आहेच. प्रास्ताविक प्रकरणांत अगोदरच, ढिमाल, सांताळ, टोडा, व अन्य तसल्या प्रकारचे लोक फार प्रामाणिक असतात ह्याबद्दल पुरावा दिलेला आहे; तरी पण ह्याठिकाणीं ज्यास्त पुरावा देऊं. उदाहरणार्थ, लेप्चा लोकांबद्दल हूकर म्हणतो कीं, मीं त्यांच्याशीं केलेल्या एकंदर व्यवहारामध्यें ते मला फारच प्रामाणिक आढळून आले. हंटर म्हणतो, शुद्ध सांताळ लोकांत गुन्हा आणि तो पकडणारे अंमलदार मुळीं माहींतच नाहींत; आणि त्यांच्याच समूहांतील "हो" नांवाचे दुसरे लोक आहेत, त्यांजबद्दल हाल्ट असें म्हणतो कीं, त्यांच्या सत्यवादीपणाबद्दल किंवा प्रामाणिकपणाबद्दल कोणीं संशय काढिल्यास ते तेवढ्यावरून जीव देण्यास प्रवृत्त होतात. शॉर्ट असें सांगतो कीं, टोडा लोक कोणताही मोठा गुन्हा कधीं करीत नाहींत; आणि तसलेंच विधान तो शर्व्हेराय डोंगरांमधील इतर टोळ्यांच्या संबंधानें करितो. तद्वतच जाकून लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांनीं कधीं कोणाची अगदीं क्षुल्लक वस्तूही चोरिल्याचें ऐकिवांत नाहीं. तसेंच, मलाक्का एथील कांहीं लोकांबद्दल ज्यूक असें म्हणतो कीं,

गुन्ह्यापासून मल्लाकाप्रांताहून ज्यास्त मुक्त असा जगाचा दुसरा कोणताच भाग नाहीं; त्यांच्यांत थोड्याशा लहान-सहान मारामाऱ्या किंवा मालमत्तेबद्दल तंटे ह्यांपलीकडे कधीं मजल जात नाहीं.

एवंच युद्धविषयक चळवळींना जें जबरीचें शासन जरूर असतें त्यांपासून हे लोक मुक्त असल्यामुळें आणि त्या शासनास जो अंकितपणा पाहिजे तदनुकूल मनोविकारांचा त्यांच्यामध्यें अभाव असल्यामुळें, तद्वतच अशा रीतीनें हे लोक दुसऱ्यांच्या हक्कांबद्दल आदर दाखवून स्वताच्या हक्कांचें प्रतिपादन करीत असल्यामुळें आणि टोळीच्या बाहेरच्या लोकांनीं आणि आंतीलही लोकांनीं हल्ले केल्यानें जी सूड घेण्याची बुद्धि उत्पन्न होते ती त्यांजमध्यें नसल्यामुळें, ह्या लोकांत युद्धशील टोळ्यांमध्यें आणि समाजामध्यें जीव घेण्याची हांव, क्रूरता, स्वार्थासाठीं गरीबांना पायांखालीं तुडविणें, इत्यादि जे दृश्य होणारे गुण त्यांच्या ऐवजीं, दयाविषयक मनोभावच विशेष दिसून येतात. बोडो आणि ढिमाल लोक अशा प्रकारचे आहेत ह्याबद्दल हडसन साक्ष देतो. सांताल लोकांबद्दल हंटर असें म्हणतो कीं, ते आदरशील व स्वागत करण्यास उत्सुक असून जोरदार आणि वृथा आर्जव न करणारे असेही आहेत, आणि त्यांची अशी समजूत आहे कीं, अनुदार लोकांस परलोकीं प्रायश्चित्त भोगावें लागेल. रानांत किंवा निर्जन डोंगरावर नेहमीं पुढें असून मदत करण्यास, ओझें वाहण्यास, तंबू ठोकण्यास, सामग्री गोळा करण्यास किंवा जेवण तयार करण्यास लेप्चा लोक नेहमीं तयार अस-

तात असें सांगून त्यांजबद्दल हूकर असें म्हणतो कीं, प्रवाशास मनापासून व मुकाट्यानें मदत करून ते त्यास उत्साह आणितात; आणि त्यांस कांहीं बक्षिशीखातर दिल्यास नाखुशी न दाखवितां संतोषानें ते आपसांत सारखें वांटून घेतात. जाकून लोकांबद्दल देखील फेव्हर असें म्हणतो कीं ते बहुधा दयाळू, गोडरीतीनें वागणारे आणि स्वतः उपकार करून दुसऱ्यांनी केलेल्या उपकां-बद्दल कृतज्ञता दाखविणारे असे असतात; आणि त्यांचा सामान्य कल दुसऱ्यापासून मेहरबानीची अपेक्षा करण्यापेक्षां दुसऱ्यावर मेहरबानी करण्याकडेच विशेष असतो. आणि शांतताप्रिय आराकूरा लोकांबद्दल कॉल्फ असें सांगतो कीं, आपल्या गांवांतील गरीबलोकांचीं कर्जें फेडून आपणास श्रीमान् म्हणून घेण्याची प्रशंसनीय महत्त्वाकांक्षा त्यांच्यांत फार असते, आणि गरीबांस मदत करण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे याबद्दल त्यांस मोठा संतोष वाटतो; ते अधिकारप्राप्तीची एवढी आकांक्षा करीत नाहींत.

कायमच्या शांतिशील समाजांतील सामाजिक संबंधांच्या ह्या श्रेष्ठपणाबरोबर त्यांच्यांत घरगुती संबंधाचाही श्रेष्ठपणा दृग्गोचर होतो. गतभागांत दाखविल्याप्रमाणें, ज्याप्रमाणें लढाया करीत बसणाऱ्या टोळ्यांमध्यें आणि त्यांच्या पुढें गेलेल्या युद्धशील समाजांमध्यें स्त्रियांची स्थिति बहुधा फार नीच असते, त्याप्रमाणें प्राथमिक शांतिशील समाजांमध्यें ती बहुधा फार उच्च असते. बोडो, ढिमाल, कॉच, व सांताळ हे सर्व लोक एकपत्नी आहेत, आणि प्यूब्लो लोकही असेच होते.

लेप्चा लोकांबद्दल हूकर म्हणतो—"त्यांच्यांतील स्त्रिया बहुधा पतिव्रता असतात, आणि परपुरुषाकडे ढुंकून देखील पहात नाहींत". सांताळ लोकांत शिंदळकी बहुतेक माहीतच नसते, आणि घटस्फोट फारच क्वचित् होतो. बोडो व ढिमाल लोक अनेक स्त्रिया करणें, रांडा ठेवणें, आणि शिंदळकी करणें ह्या गोष्टींस थारा देत नाहींत; त्यांच्या पुरुषांमध्यें व स्त्रियांमध्यें, विवाहितांमध्यें आणि अविवाहितांमध्यें, स्त्रीपुरुषव्यवहारविषयक शुद्धाचरणाची किंमत फार समजतात. शिवाय ध्यानांत धरावयाची गोष्ट ही कीं, ते स्त्रियांशीं फारच चांगल्या रीतीनें वागतात. "सांताळ लोक आपल्या कुटुंबांतील बायकांस मानमान्यतापूर्वक वागवितात; त्यांस घराबाहेरचें काम बिलकूल करावें लागत नाहीं". आणि टोडा लोकांमध्यें स्त्रीपुरुषसंबंध हलक्या प्रकारचे असूनही "बायकांस नवरे फार मान देतात, व त्यांच्या कामीं तत्पर असतात". शिवाय ह्या अयुद्धशील लोकांपैकीं कांहींकांच्या संबंधानें आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत मुलांचीही स्थिति उच्च तऱ्हेची आहे; आणि युद्धशील लोकांत मुली व मुलगे ह्यांस वागविण्यांत जो भेद दाखविला जातो तो त्यांच्यांत मुळींच नाहीं.

आतां उद्यमशील नमुन्याच्या समाजामध्यें व्यक्तींचें शील कसें असतें हें पाहण्यासाठीं सुधारलेल्या लोकांकडे वळतां, आपल्यास ही अडचण येते कीं सामाजिक गुणविशेषांप्रमाणें त्यांच्यांत उद्यमशीलतेस योग्य असे पौरुषविशेष युद्धशीलतेस योग्य अशा तसल्या विशेषां-

बरोबर मिश्रित झालेले दृष्टीस पडतात. **स्पेन्सर साहेब** म्हणतात, उदाहरणार्थ, खुद्द इंग्लिशांचें उघड उघड असें आहे. जें राष्ट्र कधीं कधीं मोठाल्या लढाया करीत असून नेहमीं रानटी लोकांच्या टोळ्यांशीं लहान लहान लढाया करीत असतें—ज्या राष्ट्राचा कारभार पार्लमेंताच्या व वर्तमानपत्रांच्या द्वारा मुख्यत्वेंकरून अशा लोकांकडून होत आहे कीं ज्यांचें शाळाशिक्षण त्यांस आठवड्याचे सहा दिवस ग्रीक योद्धा आकिलीस याचें अनुकरण करण्यास आणि एक दिवस ख्रिस्ताचें अनुकरण करण्यास प्रवृत्त करितें—जें राष्ट्र सार्वजनिक मेजवान्यांच्या प्रसंगीं कायदेकानू करणाऱ्या मंडळाचें अभीष्टचिंतन करण्यापूर्वीं फौज व आरमार यांचें करितें; त्या राष्ट्रांत उद्यमशीलतेस योग्य अशा संस्था व स्वभावविशेष स्पष्टपणें दृष्टीस पडावे इतकें तें युद्धशीलतेंतून मुक्त झालेलें नाहीं. स्वातंत्र्यांत, प्रामाणिकपणांत, सत्यवादीपणांत, दयाभूततेंत, त्याचे घटक वर वर्णिलेल्या असंस्कृत पण शांतिशील लोकांची बरोबरी करूं शकणार नाहींत. इतर राष्ट्रांशीं केलेल्या वैरांनीं अबाधित अशा स्थितीला जे नैतिक गुण योग्य आहेत, तसल्या गुणांच्या जवळ जवळ जाणें एवढ्याचीच असल्या राष्ट्राचे ठिकाणीं अपेक्षा करतां येते; आणि ती गोष्ट इंग्लंदाचे ठिकाणीं आपणास आढळून येते.

पहिल्या प्रथम, त्या देशांत कराराचें राज्य जसें वाढत गेलें आहे त्याबरोबर स्वातंत्र्याचीहि वृद्धि झाली आहे. करारानुरूप रोज उपयोगीं पडण्याची देवघेव करण्यांत स्वताचे हक्क राखणें व दुसऱ्याचेही संभाळणें

ह्यांचा अंतर्भाव अवश्य होत असल्यामुळें त्या लोकांमध्यें स्वताच्या हक्कांची प्रतिपादणी आणि अनधिकृत अधिकारास विरोध करण्याची प्रवृत्ति हीं उत्पन्न झालीं आहेत. इंग्लदांत इतके निरनिराळे धर्मपंथ आणि राजकीय पंथ झाले आहेत, ह्याचें कारण ही त्यांची स्वातंत्र्यप्रीतिच होय; त्यांस अमका अमुक म्हणतो म्हणून तें मुकाट्यांनीं ऐकावयाचें हें खपत नाहीं; आणि युरोपांतील इतर देशांप्रमाणें कला किंवा शास्त्रें ह्या बाबतींत अमक्या अमक्याचे अनुयायी असे ठराविक पंथ त्यांच्यांत नाहींत.

स्वातंत्र्यप्रीति असली म्हणजे अधिकाऱ्यांना कमी वांकून वागणें हें त्याबरोबर सहजच येतें, आणि म्हणून राजनिष्ठेचाही कमीपणा त्यांत अंतर्भूत होतो. फ्रान्सांत अठराव्या शतकाच्या आरंभीं किंवा रशियांत एकोणिसाव्याच्या पहिल्या भागांत जशी राजपूजेची भावना लोकांत असे तितकी इंग्लंदांत कधींच नसून, हल्लीं तीस केवळ आदराचें स्वरूप आलेलें आहे; आणि तो कमज्यास्त असणें हें राजाच्या स्वताच्या शीलावर विशेष अवलंबून राहूं लागलें आहे. जेम्स राजास बेबल समर्पण करतांना धर्माधिकाऱ्यांनीं जसली अगदीं गुलामगिरीची प्रदर्शक अशी भाषा वापरली होती किंवा तिसऱ्या जॉर्जाला उद्देशून लार्डांची सभा जशी अतिशयोक्तिपर त्याची प्रशंसा करीत असे, तसें आतां कोणी करीत नाहीं. राजांस राज्य करण्याचा हक्क देवानें दिला आहे ही समजूत आतां पार नाहींशी झाली आहे; राजाच्या हातास स्पर्श केल्यानें भुतें व रोग निघून जावे अशी त्यांच्यांत

दैवी शक्ति असते असें आतां कोणी समजत नाहीं; उलट राजा असणें सोयस्कर आहे म्हणूनच ती संस्था असावी असें लोक म्हणूं लागले आहेत. युद्धशीलतेच्या साम्राज्यांत राजाबद्दल प्रजेची जी विशिष्टभावना असते ती हल्लीं इंग्लंदांत इतकी कमी झाली आहे कीं, लोक खात्रीपूर्वक असें विधान करितात कीं हल्लीं जर दुसरा चार्लस किंवा चवथा जॉर्ज असला राजा इंग्लंदच्या गादीवर असेल तर बहुधा लोकसत्ताकाची स्थापना होईल. आणि एकंदर सरकाराच्या संबंधानें जें लोकांचें वर्तन दिसून येतें त्यामध्येंही मनोभावांत झालेला हा फेरबदल व्यक्त होतो. कारण धर्मविषयक समजुतींखेरीज इतर कांहीं बाबतींत सरकारास अधिकारच नाहीं असें म्हणणारे पुष्कळ लोक आहेत इतकेंच नाहीं, तर कांहीं लोक असेही आहेत कीं सरकार कांहीं बाबतींत आपला अधिकार अन्यायानें गाजवीत आहे असें समजून त्यासंबंधानें युक्तक्रिया करण्याचें नाकारून त्याबद्दल दंड भरितात किंवा तुरंगांतही जातात.

या शेवटच्या गोष्टीवरून असें व्यक्त होतें कीं, राजनिष्ठा कमी झाल्यामुळें केवळ राजावरचाच लोकांचा भाव कमी झाला आहे असें नाहीं, तर सरकारावरचाही झाला आहे. प्राचीन ईजिप्त किंवा अर्वाचीन चीन यांमध्यें राजाच्या सर्व शक्तिमत्तेवर लोकांचा इतका विश्वास होता किंवा आहे कीं त्याची सत्ता परलोकींही चालते असें ते मानीत किंवा मानितात. असा समज यूरोपीयन राष्ट्रांतून कधींच नव्हता; तथापि गतकालीं त्या लोकांस असें वाटत असे कीं राजाच्या अंगीं वाईटाचें

बरें करण्याची, लोकांचें कल्याण करण्याची, आणि मनास वाटेल तसें वस्तुस्थितीस स्वरूप देण्याची कांहीं विलक्षण शक्ति असते. इंग्लंडच्याच संबंधानें पाहतां ही धर्मभोळी समजूत आतां कमी झालेली आहे. हल्लीं जी युद्धशीलतेकडे राष्ट्राची पीछेहाट होत आहे त्या काळांत सरकारची मदत अनेक कामीं लोक मागूं लागले आहेत, आणि त्याजवरील त्यांचा विश्वास वाढला आहे; परंतु ही प्रतिक्रिया सुरू होण्यापूर्वीं याच्या उलट दिशेनें मोठाच फेरबदल घडून आलेला होता. सरकारानें जबरीनें लादलेल्या धर्ममताचा निषेध केल्यानंतर, धर्मविषयक सत्य कोणतें हें ठरविण्यास सरकार समर्थ नाहीं असें प्रतिपादण्यांत आलें, आणि म्हणून तें शिकविण्याची सरकाराकडे दिलेली कामगिरी काढून टाकण्याबद्दलची चळवळ वाढूं लागली; कारण ही कामगिरी सरकाराकडे देणें अनवश्यकच नव्हे तर घातुकही आहे असा समज उत्पन्न झाला. लोकांचें खाणेंपिणें, वस्त्रप्रावरण, आणि घरगुती संवयी ह्यांच्याबद्दल कायदे करून सरकार कांहीं जनहित करूं शकेल हा समज अगोदरच नाहींसा झालेला होता; आणि पदार्थ उत्पन्न करणारे व सर्वत्र पसरणारे ह्यांच्या ज्या एकंदर पद्धती, ज्याच एकंदर सामाजिक व्यवहारांत प्रधान आहेत, त्यांच्यासंबंधानें सरकारी कायदे असणें हिताचें आहे असें आतां समजत नाहींत. शिवाय, प्रत्येक वर्तमानपत्रवाला प्रधानांचीं कृत्यें आणि कामन्स सभेचें वर्तन ह्यांजवर टीका करून लोकांचा आपल्या शास्त्यांवरील भाव कमी झाल्याचें दर्शवितो. ज्यास्त पक्व झालेल्या औद्योगिक स्थितीचा हा विशेष

इंग्लिशांच्या गत व प्रस्तुत स्थितींतील भेद पाहिल्यानेंच व्यक्त होतो असें नाहीं; तर इंग्लिश लोकांची मतस्थिति आणि इतर राष्ट्रांची मतस्थिति ह्यांच्यांतील भेद पाहिल्यानेंही तो व्यक्त होतो. फ्रान्स व जर्मनी ह्या देशांतील सामाजिक सुधारकांच्या विचारांकडे पाहतां त्यांवरून असें स्पष्ट होतें कीं सरकाराच्या द्वारा फायदे करून घेण्याची आशा त्यांच्यांत इंग्रजांपेक्षां फार अधिक आहे.

राजनिष्ठा आणि सरकारावर भरंवसा हे मनोभाव कमी होत चालले आहेत त्याबरोबर " स्वदेशाभिमान " ह्या शब्दाचा जो मूळ अर्थ त्याअर्थी तोही मनोभाव कमी होत चालला आहे. " राजा व राष्ट्र " ह्यांच्यासाठीं लढणें ही जी महत्त्वाकांक्षा ती लोकांच्या मनाची हल्लीं (हें १८८०-८५ च्या दरम्यान लिहिलेलें आहे.) फारशी जागा व्यापीत नाहीं; आणि " बरोबर असो किंवा चूक असो, आमचा देश तो आमचा देश !" (Our country, right or wrong!) असा मनोभाव, साहेब म्हणतात, जरी बहुजनांत वसत आहे, तरी असे लोकही पुष्कळ आहेत कीं ज्यांच्या मनांत राष्ट्राच्या इजतीपेक्षां एकंदर मानवजातीच्या कल्याणाची इच्छा इतकी प्रबल आहे कीं पहिली गोष्ट साधण्यासाठीं दुसरी गमावण्यास ते तयार नाहींत. स्वताच्याच गुणदोषविवेचनाच्या ज्या कलामुळें इंग्रजलोक इतर यूरोपियन लोकांमध्यें व आपल्यामध्यें आपल्यास प्रतिकूल अशी तुलना कांहीं बाबतींत करण्यास तयार होतात त्याच कलामुळें ते आपल्याहून दुर्बलतर लोकांशीं जें आपलें वर्तन त्याच्याबद्दलही आपल्यास दोष देण्यास हल्लीं तयार हो-

तात. अफगाण, झूलू, व बोअर लोक यांच्याशीं इंग्रजांनीं केलेल्या वर्तनाबद्दल त्यांच्यापैकीं पुष्कळांनीं जी जोराची नापसंती प्रदर्शित केली आहे त्यावरून "जिंगो" (युद्धशील) लोक ज्यास अस्वदेशाभिमानी असें म्हणतात असा मनोभाव इंग्रजांत बराच आहे असें दिसतें.

सामाजिक गरजांना व्यक्तिस्वभावाच्या ज्या योग्य बनण्यानें युद्धशील स्थितींत माणसांस लढाईचा मोठा अभिमान वाटतो, आणि शांततेच्या व्यवहाराचा तिटकारा वाटतो, त्याच कारणावरून इंग्लिश लोकांत कांहीं अंशीं वरच्या उलट मनोभावांची जुळणी हल्लीं बनून गेलेली आहे. शिपायाच्या धंद्याला पाहिल्या इतका मान मिळत नाहींसा झाला आहे, आणि कारकुनाच्या धंद्याला पहिल्याहून ज्यास्त मान मिळूं लागला आहे. चाळीस वर्षांच्या (१८१५ ते १८५५) शांततेच्या काळांत मनोभाव इतका पालटला कीं शिपाईगिरीबद्दल लोक तिरस्कारपूर्वक बोलूं लागले; आणि जे त्या धंद्यांत शिरतात ते बहुधा निरुद्योगी आणि दुराचारी असल्यामुळें त्यांनीं त्या धंद्यांत शिरणें म्हणजे नीच स्थितीच्या अगदीं खालच्या पायरीवर जाणें होय, असें समजूं लागले. त्याचप्रमाणें अमेरिकेंत १८६४ च्या सुमारचें यादवी युद्ध होण्यापूर्वीं लष्करी लोकांचीं जीं लहान लहान संमेलनें व कवायती कधीं कधीं होत असत त्यांबद्दल सर्व लोक थट्टा करीत. इकडे स्वतास व इतरास उपयुक्त असे जे शारीरिक व मानसिक श्रम त्यांस हल्लीं सन्मान्य मानूं लागले आहेत इतकेंच नाहीं, तर बऱ्याच अंशांनीं आवश्यकही मानूं लागले आहेत. अमे-

रिकेंत जो माणूस कांहीं करीत नाहीं त्याच्यावर विरुद्ध टीका व्हावयास लागल्यामुळें त्यास कांहींतरी उद्योगास लागणें भागच पडतें; आणि इंग्रजलोकांमध्येंही औद्योगिक जीवितावद्दल लोकांच्या मनांत इतका आदर उत्पन्न झाला आहे कीं मोठाल्या पदवीचे लोक आपल्या मुलांस उद्योगधंद्यांत घालूं लागले आहेत.

युद्धशीलतेला योग्य अशी जी जबरीची सहक्रिया ती स्वताच्या कल्पकतेनें कोणतीही गोष्ट लोकांनीं करण्यास प्रतिकूल असते हें आपण पाहिलेंच; पण उद्यमशीलतेमध्यें दिसून येणारी जी स्वैच्छिक सहक्रिया ती असल्या कल्पकतेच्या क्रियेस पाहिजे तितकी संधी आणून देत असते; आणि साहस करील त्यास त्याचा योग्य फायदा घ्यावयास मिळाल्यामुळें ती बुद्धि वृद्धि पावते. जे लोक नवी कल्पना काढितील, किंवा कांहीं नवी गोष्ट करतील त्यांची इतरांपेक्षा ज्यास्त भरभराट व संख्यावृद्धि होत जाऊन, कालानें नव्या गोष्टी अंगावर घेण्यास तयार असा स्वभावनमुनाच तयार होतो. इंग्लिश व अमेरिकन भांडवलवाले पुढच्या फायद्यावर दृष्टि देऊन स्वदेशीं व परदेशीं मोठाले व्यापार कसे करितात, व व्यापारी धाडसाचीं कृत्यें अंगावर किती घेतात हें पाहिल्यानें हा स्वभावविशेष ध्यानांत येतो. यूरोपांतील इतर देशांत उद्यमशीलतेनें युद्धशीलता बरीच कमी झाल्यामुळें तेथें देखील खासगी साहसाची जरी वृद्धि झाली आहे, तरी फ्रान्स व जर्मनी या देशांतील पुष्कळ शहरांना धुराचे दिवे व पाणी यांचा पुरवठा करण्याचें काम इंग्लिश कंपन्यांकडे आलेलें आहे,

आणि इंग्लंदांत बाहेरच्या असल्या कंपन्या बहुतेक मुळींच दिसत नाहींत, यावरून उद्यमशीलता विशेष वाढलेल्या इंग्रजांमध्यें स्वताच्या जबाबदारीवर काम करण्याची बुद्धि ज्यास्त उत्पन्न झालेली आहे असें दिसतें.

राष्ट्राराष्ट्रांमधील वैरें कमी होऊन त्याबरोबर कुटुंबें आणि व्यक्ती ह्यांच्याह्यांच्यामधील वैरेंही कमी झाल्यामुळें सूड घेण्याचा मनोभाव कमती झाला आहे असा पुरावा सांपडतो. इंग्लंदामध्यें ह्या यादवी लढाया लवकरच बंद झाल्या, आणि द्वंद्वयुद्धें उद्यमशीलतेच्याच वृद्धीबरोबर बंद होऊन फ्रान्स व जर्मनी यांमध्यें तीं चालू राहिलीं, ह्यावरून देखील वरील गोष्ट व्यक्त होते. सूड उगविण्याच्या कायद्याचा अधिकार इंग्लंदांत इतका कमी झाला आहे कीं, दुसऱ्यानें केलेल्या इजेबद्दल कोणी सूड उगवूं लागल्यास, साहेब म्हणतात, त्याची प्रशंसा करण्याच्या ऐवजीं लोक निषेधच करितात.

दुसऱ्याशीं मारामारी करणें आणि त्याच्यावर सूड उगविणें ह्यांमध्यें दिसून येणाऱ्या अतिक्रमणाच्या कमताईबरोबर एकंदर अपराधविशिष्ट कृत्यांमध्यें दिसून येणारा अतिक्रमही कमी झाला आहे. इंग्लंदांतील एकंदर अपराधांच्या इतिहासाचें जो अवलोकन करील त्यास हा फेरबदल, विशेष युद्धशीलता जाऊन विशेष उद्यमशीलता उत्पन्न होत गेली, तसाच होऊन गेला आहे, ह्याबद्दल शंका राहणार नाहीं. त्या विषयावरील आपल्या ग्रंथांत पाइक म्हणतो कीं, " युद्धविषयकप्रवृत्ति, आणि ज्यांस कायदा गुन्हे म्हणतो ते यांमध्यें निकटसंबंध असल्याचें या इतिहासांत पुनःपुनः व्यक्त करून दाख-

विलेलें आहे". पूर्वीं जेव्हां हल्लींपेक्षां युद्धविषयक चळवळींवर उद्यमविषयक चळवळींचा हल्लींइतका पगडा बसलेला नव्हता त्या काळाची व प्रस्तुत काळाची तुलना केल्यास असें दिसतें कीं, द्रव्य व देह ह्यांच्याविरुद्ध होणाऱ्या अपराधांची संख्या व प्रकार हे दोन्हीही पूर्वींहून भिन्न झालेले आहेत. चांचेपणा, गलबतफोडी आणि रस्तेलूट हीं हल्लीं नाहींशीं झालीं आहेत. शिवाय प्रधान, पार्लमेंताचे सभासद, आणि न्यायाधीश हे लांच देत किंवा घेत नाहींसे झाल्यामुळें राज्यकारभारांतही सुधारणा झालेली आहे. बरें, अपराधसंख्या व प्रकार कमी होण्याबरोबर त्यांचा निषेध वाढत चालला आहे. चांच्यागलबतांवरील कप्तानांचीं त्यांच्या शौर्याची प्रशंसा केलेलीं चरित्रें हल्लीं प्रसिद्ध होत नाहींत; आणि रस्तेलूट करणारांबद्दल हल्लीं कोणी दयार्द्रदृष्टीनें लिहीत नाहीं. वर्तमानपत्रांतून जरी पुष्कळ गुन्ह्यांचे रिपोर्ट येतात, तरी एकंदरींत त्यांची संख्या कमीच आहे; आणि व्यापारांत जरी अद्यापि अप्रत्यक्ष असा पुष्कळ अप्रामाणिकपणा आहे, तरी डीफोचें "इंग्रज व्यापारी" (English Tradeaman) हें पुस्तक वाचिलें म्हणजे या बाबतींतही हल्लीं किती सुधारणा झालेली आहे हें व्यक्त होतें. शिवाय हेंही आपण विसरतां कामा नये कीं, शीलामध्यें झालेल्या फेरबदलामुळें अन्यायाच्या कृती कमी झाल्या आहेत, त्याचमुळें परोपकाराच्या वाढल्या आहेत; आणि गुलामांच्या दास्यविमोचनासाठीं पैसे भरणें, लढत असलेल्या इतर राष्ट्रांच्याही जखमी शिपायांची शुश्रूषा करणें, आणि अन्य

प्रकारचीं परोपकाराचीं अनेक कृत्यें करणें हे जे प्रकार हल्लीं दिसतात त्यांवरूनही हीच गोष्ट व्यक्त होत आहे.

१४४. एवंच युद्धशील नमुन्याप्रमाणेंच उद्यमशील नमुन्याच्या संबंधानें त्याचें अंतःस्वरूप काय आहे हें तीन प्रकारच्या सुसंगत पुराव्यावरून आपल्या नजरेस येतें. तेव्हां ह्या तीन प्रकारच्या पुराव्यावरून काय निष्पन्न होतें तें एथें संक्षेपानें सांगूं या; असें कीं त्याचा सुसंगतपणा आपल्या चांगला ध्यानांत यावा.

समाजांतील व्यक्तींच्या जीविताचें चांगलें संधारण व्हावें एतदर्थ बनवलेल्या समाजाचे विशेष काय असावे असा विचार करतां, ते हे असावे असें आपल्यास आढळून येतें. व्यक्तींस संयुक्तयत्न करण्यास एकत्र करून त्यांचीं व्यक्तिशः कृत्यें संयुक्तक्रियेच्या अंकित करणें ह्या गोष्टीची असल्या समाजांत जरूर नसते. उलटपक्षीं, असल्या समाजांत जी संयुक्तक्रिया शिल्लक राहत असते तिचा उद्देश सर्व प्रकारच्या अडथळ्यापासून व्यक्तींच्या योग्य क्रियांचें संरक्षण करणें हा असतो; कारण असल्या समाजांत घटकांची भरभराट सर्वांत ज्यास्त होत असल्यामुळें, ही गोष्ट जेथें उत्तम रीतीनें होत असेल तोच समाज टिकाव धरून राहणार. उद्यमशील नमुन्यास ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या साधण्यास स्वेच्छाचारी नियंत्रणसंस्थेची जरूरी नसून, त्या नमुन्यांत जरूर असणारें सहकार्य साधण्याकरितां योग्य संस्था म्हटली म्हणजे सगळ्यांची इच्छा प्रदर्शित करणारी प्रतिनिधिसंस्था हीच होय. ह्या नियामकसंस्थेचें कर्तव्य म्हटलें म्हणजे न्यायदान करण्याचें आहे अशी त्याची स्थूल व्याख्या

होत असून, प्रत्येक माणसास त्याच्या उद्योगानें उत्पन्न होईल त्यापेक्षां ज्यास्त किंवा कमी फायदा मिळूं नये अशी तजवीज राखण्याचें होय अशी त्याची विशेष निश्चित व्याख्या करीत असतात; एवंच नफ्याची वांटणी कृत्रिम होईल अशी सर्व सार्वजनिक कृति अन्यायाची ठरते. युद्धशीलतेस योग्य असें ठराविक स्थितीचें साम्राज्य निघून गेलें असल्यामुळें, त्याच्या ऐवजीं येणारें जें करारांचें राज्य तें सर्वत्र दृढ करावयाचें असतें; आणि म्हणून पाहिजे तशी वांटणी करून उद्योग व त्यांचीं फलें यांच्यांत ढवळाढवळ करणें ह्या गोष्टीस एथें बिलकूल थारा देतां कामा नये. दुसऱ्या दृष्टीनें पाहतां, युद्धशील नमुना व उद्यमशील नमुना ह्यांच्यांत असा भेद करतां येईल कीं, त्यांपैकीं पहिला विधि व निषेध ह्या दोन्ही रूपांनीं नियामक असून, दुसरा केवळ निषेधरूपानेंच नियामक असतो. ह्या नमुन्याच्या राज्यांत क्रियेचा टापू अशा रीतीनें आकुंचित झाल्यामुळें व्यक्तिक्रियेचा टापू वाढून जातो; आणि जी स्वैच्छिक सहक्रिया ह्या नमुन्याचें मूलतत्त्व आहे त्यापासून अनेक खासगी संयोग उत्पन्न होतात, व समाजाच्या ज्या सार्वजनिक संयोगांत त्यांचा समावेश होतो त्यांच्यासारख्याच त्यांच्या रचना असतात. ह्याचा अप्रत्यक्ष परिणाम उद्यमशील नमुन्याच्या समाजाचा विशेष लवचीकपणा हा असतो; आणि असल्या समाजाचा कल आपली उद्यमविषयक स्वावलंबिता गमावण्याकडे, आणि त्या बाबतींत शेजारच्या समाजांशीं मिळून जाण्याकडे असतो.

ह्यानंतर ज्या प्रश्नाचा विचार आपण केला तो हा

कीं, विचारदृष्टीच्या ठरविलेले जे हे उद्यमशील नमुन्याचे विशेष त्यांचा अनुभवदृष्टीच्या ताळा मिळतो किंवा नाहीं; आणि आपणास असें आढळून आलें कीं, ज्या मानानें उद्यमशीलतेची कमी किंवा ज्यास्त वाढ झालेली असेल, त्या मानानें प्रत्यक्ष समाजांत ते कमी किंवा ज्यास्त स्पष्टपणें दिसून येतात. जे अशिक्षित लोकांचे लहान लहान समूह अगदीं अयुद्धशील असून ज्यांच्यांत उद्यमशील नमुना अगदीं कोंवळ्या स्वरूपीं दृष्टीस पडतो त्यांच्याकडे प्रथम नजर फेंकून, यूरोपियन राष्ट्रांच्या प्रारंभींच्या नेहमींच्या युद्धशीलतेच्या वेळच्या रचना, आणि वाढत जाणाऱ्या उद्यमशीलतेनें विशिष्ट अशा आधुनिक कलांतील त्यांच्या रचना, यांची तुलना आपण केली; तेव्हां त्यांच्यामध्येंही दिसावे म्हणून अगोदर अंदाज केला तसलेच भेद दृष्टीस पडले. नंतर ह्यांपैकीं फ्रान्स व इंग्लंद ह्या दोन समाजांची आपण तुलना केली; कारण हीं राष्ट्रें एकदां सदृशस्थितींत होतीं; पण त्यांपैकीं एकाचें उद्यमजीवित त्याच्या युद्धशील जीवितानें दुसऱ्यापेक्षां ज्यास्त दडपिलें गेलें होतें. त्या तुलनेवरून असें स्पष्ट झालें कीं त्यांच्या संस्थांमध्यें कालीं कालीं जे फेरबदल घडून आले ते पूर्वोक्त अंदाजाशीं जुळणारे असेच घडून आले. शेवटीं, केवळ इंग्लंदच्याच समाजावर नजर ठेवून, आणि जे उद्यमशीलतेचे विशेष त्याच्यांत अगोदरच उत्पन्न झालेले होते त्यांपासून एका दीर्घ अशा युद्धकालांत पीछेहाट कशी झाली हें प्रथम ध्यानांत घेऊन, पुढें, १८१५ सालानंतरच्या शांततेच्या दीर्घ कालांत, वृद्धिंगत झालेल्या उद्यमशीलतेबरोबर जी समा-

जरचना उत्पन्न झाली पाहिजे म्हणून आपण अंदाजिलें होतें, त्या रचनेकडे अनेक रीतींनीं इंग्लंदनें स्पष्टपणें मजल कशी मारिली, हें आपण आपल्या लक्षांत घेतलें.

नंतर आपण अशी चवकशी केली कीं समाजाच्या उद्यमशील नमुन्याबरोबर व्यक्तिस्वभावाचा कोणता नमुना उत्पन्न होत असतो; आणि अशा हेतूनें कीं एकंदर समाजाच्या शीलाप्रमाणें त्याच्या घटकांच्या शीलांवरूनही वरील अंदाजाचा ताळा मिळतो किंवा नाहीं हें पहावें. त्या चवकशीअंतीं असें दिसून आलें कीं, कांहीं अशिक्षित समाज शांततेच्या धंद्यांत आपलें आयुष्य घालवीत असून त्यांच्यांत स्वातंत्र्य, जबरीस विरोध, प्रामाणिकपणा, सत्यवादित्व, क्षमा, आणि दया हे गुण ठळक आहेत. हल्लींहून ज्यास्त युद्धशील काळांतल्या इंग्रजांच्या शीलांशीं आधुनिक इंग्रजांच्या शीलांची तुलना करतां असें दिसतें कीं त्यांच्यांत युद्धशीलतेशीं उद्यमशीलतेचें प्रमाण जसें वाढत चाललें आहे तसे ते ज्यास्त स्वतंत्र, कमी ठळकपणें राजनिष्ठ, सरकारावर कमी भाव ठेवणारे, आणि स्वदेशाभिमानाला ज्यास्त सौम्यस्वरूप देणारे, असे बनले आहेत; आणि उद्योगविषयक साहसी क्रिया, अधिकाऱ्यांवर कमी भरंवसा, बेजबाबदार अधिकारास विरोध, ह्याच्या योगानें एकीकडे त्यांच्यामध्यें जसें व्यक्तिहक्कांचें प्रतिपादन ज्यास्त जोरानें होत आहे, तसे दुसरीकडे ते दुसऱ्यांच्या व्यक्तिहक्कांस ज्यास्त मान देऊं लागले आहेत; आणि ही गोष्ट ते इतरांचे अतिक्रम हल्लीं कमी करितात, व त्यांच्या कल्याणाकरितां ज्यास्त श्रम करितात, ह्यावरून व्यक्त होते.

हें प्रकरण पुरें करण्यापूर्वीं, गैरसमज टाळण्याकरितां, असें स्पष्टीकरण इष्ट दिसतें कीं, हे विशेष उद्यमशीलतेचे प्रत्यक्ष परिणाम होत असें मानण्याच्या ऐवजीं ते अयुद्धशीलतेचे अप्रत्यक्ष परिणाम होत असें मानणें ज्यास्त बरोबर होईल. शांततेच्या उद्योगांत घालविलेलें सामाजिक जीवित प्रत्यक्ष सुनीतीचें वळण लावणारें असतें असें म्हणण्यापेक्षां, युद्धांत घालविलेलें जीवित प्रत्यक्ष कुनीतीचें प्रवर्तक असतें असें म्हणणें अधिक यथार्थ होय. स्वताकरितां दुसऱ्याला बळी देणें पहिल्या प्रकारच्या जीवितांत केवळ प्रसंगोपात्त होत असतें, पण दुसऱ्यांत तें अवश्यच होत असतें. उद्यमशील जीवितांत परातिक्रम करणारी जी स्वार्थबुद्धि ती केवळ बाह्य किंवा कारणवशात् असते; पण युद्धशील जीवितांत ती आंतूनची किंवा नैसर्गिकच असते. कराराप्रमाणें उपयोगीं पडण्याची अदलाबदल जरी सामान्यतः सहानुभूतिविहीन असली, तरी ती हल्लीं बऱ्याच अंशीं दुसऱ्याच्या हक्कांकडे योग्य लक्ष पुरवून होत असते, आणि ती तशी सर्वांशींही होण्यासारखी आहे; पण विरोध्यांस ठार करणें, त्यांचीं घरें जाळणें, त्यांचा मुलख हस्तगत करणें, ह्या गोष्टी करतांना त्यांस आपण त्रास देत आहों अशी ढळढळीत ज्ञानवत्ता मनांत उभी राहिल्याविना, आणि त्यामुळें आपले मनोभाव क्रूरपणाचे झाल्याविना, रहावयाचे नाहींत; आणि हे परिणाम केवळ शिपायांच्याच मनांवर घडून येतात असें नाहीं, तर त्यांस त्या कामास लावणारे, आणि त्यांचीं कृत्यें पाहून आनंद पावणारे, ह्यांच्या मनांवरही होत असतात. म्हणून सामाजिक जीविताच्या

ह्या स्वरूपापासून सहानुभूती अवश्यच मृत होतात, आणि अतिक्रमणाच्या गुन्ह्यास प्रवृत्त करणारी मनःस्थिति उत्पन्न होते; पण त्या जीविताच्या औद्योगिक स्वरूपापासून सहानुभूतीस प्रत्यक्ष उत्तेजन न मिळालें तरी आपला व्यापार करण्यास मुक्तद्वार सांपडल्यामुळें, परार्थविषयक मनोवृत्ती आणि त्यांपासून उत्पन्न होणारे सद्गुण, ह्यांच्या वाढीस उत्तेजन मिळतें.

प्रकरण एकोणिसावें

राजकीय संस्थांची भूत व भावि स्थिति

१४५. गत प्रकरणांतून राजकीय उत्क्रमणानें एकंदर उत्क्रमणविषयक कल्पनेचें पुनः निदर्शन कसें होतें ह्याविषयीं बहुतेक कांहींच सांगितलेलें नाहीं; जरी त्यांत वर्णिलेलीं रूपान्तरें रूपान्तराच्या सामान्य नियमास अनुरूप कशीं आहेत हें सावधान वाचकांच्या लक्षांत प्रसंगवशात् आलेंच असेल. ह्या ठिकाणीं, एकंदर विषयाची गोळाबेरीज करतांना, ह्या अनुरूपतेचें संक्षेपतः दिग्दर्शन करणें सोईचें दिसतें. प्रस्तुत शास्त्राच्या तत्त्वांच्या दुसऱ्या भागांत सामाजिक वाढ, सामाजिक रचना, आणि सामाजिक व्यापार ह्यांचा विचार करतांना ह्या अनुरूपतेची स्थूल रेखाटणी दाखविलीच आहे; पण तिचें ज्यास्त विशेषरीत्या दृष्टान्तीकरण करण्यासाठीं ह्या भागांत जी सामग्री एकत्र केली आहे, तिचा उपयोग तें सत्य पुनः स्पष्टपणें निरूपिण्याच्या कामीं करणें योग्य दिसतें; कारण तें सत्य अद्यापि सर्व लोक कबूल करीत नाहींत.

राजकीय वाढीचा तिच्या प्राथमिकस्वरूपीं विचार करतां, ती एक घनीभवनाची किंवा संकलीभवनाची सरणी असते, ही गोष्ट स्पष्ट आहे. तिच्यायोगानें पूर्वी पृथक् असलेल्या व्यक्ती एकत्र होऊन त्यांचा एक गोळा बनतो; आणि हा एकत्र होण्याचा प्रकार अनेक तऱ्हांनीं दृष्टीस पडतो. अगदीं प्रारंभींच्या पायऱ्यांवर माणसांचे समुदाय लहान असतात, विस्कलीत असतात, आणि

एका केंद्राला अंकित होऊन एकत्र झालेले नसतात. पण राजकीय प्रगति होत जाईल तसे ह्या समुदायांचे संयोग, पुनःसंयोग, आणि पुनःपुनःसंयोग बनत जातात, आणि शेवटीं त्यांपासून मोठालीं राष्ट्रें उत्पन्न होतात. शिवाय, राजकीय प्रगतीबरोबर येणारें स्थाईक जीवित आणि शेतीची वाढ यांबरोबर पूर्वींहून मोठाल्या प्रदेशांवर राहणाऱ्या समाजांची घटना होते; इतकेंच नाहीं, पण त्यांच्यांतील लोकवस्त्याही पूर्वींहून जास्त दाट होतात. शिवाय, रानटयांचें विस्कलित रीतीनें एकत्र राहणें जाऊन त्याच्या ऐवजीं नागरिकांचा सुसंबद्ध संयोग उत्पन्न होतो; प्रथम ते कुटुंबबंध आणि वर्गबंध ह्यांनीं जबरीनें एकत्र बांधलेले असतात, आणि मागाहून त्यांच्या परस्परावलंबी धंद्यांनीं आपखुशीनें एकत्र बांधलेले असतात. पुनः एकदां, ज्या सरकारच्या इच्छेमध्यें व्यक्तींच्या इच्छा विलीन होऊन गेल्यानें सैन्याप्रमाणें समाजसंकलित असा गोळा बनतो, तें विलीन होऊन जाणें उत्पन्न होतें.

त्याबरोबर अनेक तऱ्हांनीं विविधस्वरूपता वाढत जात असते. सर्वत्र, जेव्हां प्राथमिक लोकसमूहाचे घटक पराक्रम किंवा स्वसंरक्षण करण्यासाठीं सहक्रिया करूं लागतात, तेव्हां त्या समूहास एक प्रबल मनुष्य, थोडेसे श्रेष्ठ माणूस, आणि पुष्कळ कनिष्ठ माणूस, अशी विविधस्वरूपता प्राप्त होते. युद्धाच्या योगानें कांहीं समूह एकत्र झाले म्हणजे ह्यांच्यांतून मुख्य नाईक, पोटनाईक, आणि लढवय्ये यांची उत्पत्ति होते; आणि संकलनाच्या ह्याच्याही वरच्या पायऱ्यांवर, राजे, सरदार आणि लोक

ह्यांची उत्पत्ति होते; आणि त्याबरोबरच शास्ते व शासित हे जे दोन मुख्य सामाजिक थर त्यांनाही प्रत्येकीं विविधजातीयत्व येतच असतें. लहान समाज संयुक्त झाले म्हणजे त्यांच्या त्रिरूप अशा ज्या शासनसंस्था त्या प्रत्येकीं विसदृश होत जातात; आणि स्थानिक राजकीय संमेलनें एका मुख्य संमेलनाचीं अंकित अशीं बनतात. जरी कांहीं कालपर्यंत मुख्य सभेची घटना स्थानिक सभांच्या सारखीच राहते, तरी तिच्यांतील सामान्यलोकघटित भाग नाहींसा होऊन तिची घटना हळू हळू भिन्न होत जाते. इकडे ह्या स्थानिक व मुख्य सभा त्यांचे अधिकार व रचना ह्या बाबतींत भिन्नभिन्न होत असतां, त्या प्रत्येकीं आणखी एका रीतीनें भिन्नजातीय होत असतात. प्रारंभीं त्यांच्यापैकीं प्रत्येक लष्करी, राजकीय, व न्यायदात्री अशी असते; पण हळू हळू न्यायदान करणारी सभा सशस्त्र असावयाची बंद होऊन, राजकीय-लष्करीसभेशीं तिचें जें सादृश्य तें नष्ट होतें; आणि ह्या राजकीय—लष्करी संस्थेपासून शेवटीं एक सल्ला देणारें मंडळ उत्पन्न होतें; आणि त्याचे घटक राजकीय कामासाठीं जमावयाचें असेल, तेव्हां निःशस्त्र येऊं लागतात. शिवाय ह्या प्रत्येक भागांत असलेच फेरबदल मागाहून उत्पन्न होतात. स्थानिक न्यायसंस्था ज्यास्त ज्यास्त विशिष्टीकृत स्वरूप धारण करावयास लागून त्या एक मुख्य न्यायसंस्थेच्या कह्यांत जातात, आणि ही जी मुख्य न्यायसंस्था अगोदरच मूळच्या सल्लागारमंडळापासून विभिन्न झालेली असते तिचे पोटविभाग होऊन त्यांपैकीं प्रत्येक विभाग निर-

निराळ्या प्रकारचें काम पाहूं लागतो. मुख्य राजकीय-मंडळ देखील, जेथें त्याचे अधिकार मुख्य नायकाच्या अधिकारांत विलीन होऊन जाणार नाहींत, तेथें ज्यास्त संकीर्ण होऊं लागतें. उदाहरणार्थ, इंग्लंदांत राजाचें जें मूळचें सल्लागारमंडळ होतें त्यापासून प्रथम प्रिव्हीकौन्सिल म्हणून एक मंडळ भिन्न होऊन निघालें, आणि नंतर प्रिव्हीकौन्सिलापासून क्याबिनेट किंवा प्रमुख प्रधानमंडळ हें पृथक् झालें; आणि दुसऱ्या दिशेनें मूळ मंडळाचे निवडलेला व न निवडलेला (कामन्स व लार्डस ह्यांच्या सभा) असे दोन भाग झाले. हीं रूपांतरें चालली असतां, कायदे करणारे, न्याय देणारें, आणि अंमलबजावणी करणारे, ह्या ज्या तीन घटना त्यांचें पृथक्करण चाललेंच असतें. मोठाले राजकीय फेरबदल ह्याप्रमाणें चालले असतां लहान लहान तसले फेरबदल चाललेच असतात, आणि त्यांपासून पंचायती, म्युनिसिपालिट्या, धंदेजमाती, वगैरेची उत्पत्ति होते. एवंच, फेरबदलांवर फेरबदल होऊन त्यांच्या द्वारा सर्व दिशांनीं मूळच्या समस्वरूपतेच्या ऐवजीं अखेरची विविधस्वरूपता उत्पन्न होते.

ह्याप्रमाणें लहान, असुसंबद्ध, अशा सामाजिक समूहांची प्रगति होऊन मोठ्या सुसंबद्ध समूहांची उत्पत्ति होत असतां, आणि ते संकलीभवन पावून समस्वरूपांचें विविधस्वरूप होत असतां, राजकीय घटना प्रथम जी अनिश्चित असते ती हळूहळू निश्चित बनूं लागते. वंशपरंपरा आलेल्या कल्पना आणि रूढी ह्यांखेरीज प्राथमिक समुदायांत कांहींच निश्चित नसतें. पण वर

वर्णिलेलीं पृथग्भवनें, प्रत्येकीं अनिश्चितस्वरूपीं सुरू होऊन हळू हळू ज्यास्त ठळक होत जातात. वर्गभेद प्रथम मुळींच नसून आणि मागून अनिश्चित असून, शेवटीं फार स्पष्ट बनतात. घरगुलाम, शेतगुलाम, स्वतंत्र लोक, सरदार, राजा, एकमेकांपासून अगदीं पृथक् होतात, आणि मग एका वर्गांतले लोक दुसऱ्यांत बहुधा जाऊं शकत नाहींत, व अंगवैगुण्यें, पट्टे, पदकें, वगैरे खुणा, पोषाक, इत्यादिकांवरून ते कोणत्या वर्गांतील आहेत हें लोकांस कळूं लागतें. अधिकार आणि कर्तव्यें हीं पूर्वीं सर्व लोकांमध्यें पसरलेलीं असून मागून तीं भिन्नभिन्न होतात, आणि मग त्या त्या वर्गाचे ठिकाणीं तीं मोठ्या कडक नियमांनीं राखिलीं जातात. राजकीय यंत्रजालाच्या निरनिराळ्या भागांनीं अमुक अमुकच कामें करावीं असे ज्यास्त ज्यास्त कडक निर्बंध होऊं लागतात; आणि त्याप्रमाणें रूढी पडून व कालान्तरानें ज्यास्त ज्यास्त होणाऱ्या उदाहरणांमुळें त्यांस जोर येऊन, प्रत्येक जातीचें सरकारी काम ठरवून दिलेल्या मर्यादांच्या आंत येऊन बसतें. निश्चिततेची ही वाढ सर्वत्र कायद्यांच्या वाढीनें दिसून येते. वंशपरंपरेनें सूत्ररूपानें आलेले पवित्र हुकूम म्हणून कायद्यास सुरवात होऊन, त्यांची योजना कांहीं ठराविक रूपानें होऊं लागते, आणि विशिष्ट उदाहरणाच्या संबंधानें त्यांचा अर्थ काय करावयाचा हें स्पष्ट होऊं लागतें. कायदे अमलांत आणण्याच्या पद्धतीचे नियम विस्तृत व ठराविक होऊं लागतात, आणि सामान्य हुकूम विशिष्ट प्रसंगास लावण्यानें त्यांस विशिष्ट हुकुमांचें स्वरूप येऊं लागतें; अशा रीतीनें हळू

हळू सर्वत्र निश्चित आणि कायमची कायदेपद्धति उत्पन्न होते. ही प्रवृत्ति किती जोराची असते हें इंग्लंदांत समतेची जी पद्धत्ति उत्पन्न झाली आहे तिच्या ठिकाणीं फार मजेदार रीतीनें दिसून येतें. कारण ही पद्धती रूढीवरून उत्पन्न झालेल्या कायद्याच्या अतिशय सूक्ष्म रीतीनें ठरविलेल्या व बदलण्यास दुरापास्त अशा योजनांचा कडकपणा कमी करण्यास प्रथम उत्पन्न झालेली असूनही तीच स्वतः हळूहळू सामान्य कायद्याच्या सरणीइतकी ताठर व बारीकसारीक विधियुक्त अशी होऊन गेलेली आहे.

ह्याच्यावर एक उघड उघड येणारा ओक्षप टाळण्याकरितां, एथें असें सांगितलें पाहिजे कीं जे समाज लहान, विस्कलित, समस्वरूप, आणि रचनेनें अनिश्चित असतात ते जाऊन ज्या फेरबदलांनीं ते मोठाले, सुसंबद्ध, विविधस्वरूप आणि रचनेनें निश्चित असे बनतात, ते निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळ्या प्रकारचे असतात, आणि परिस्थिति बदलेल तसे बदलत जातात. समाजांचे उद्योग जसे ह्या किंवा त्या जातीचे असतील तदनुरूप समाजाच्या निरनिराळ्या भागांत हें रूपान्तर दिसून येतें. नेहमीं युद्धें होत असलीं तर सर्वांनीं एकवटणें अवश्यच होतें; आणि ज्या नियामक-घटनेच्या द्वारा सर्वांची संयुक्तक्रिया साध्य होते ती घटना सारखी ज्यास्त ज्यास्त विविधजातीय व निश्चितस्वरूप होत जाते; इकडे संघटनेचा जो भाग पदार्थांचें उत्पादन व प्रसरण करीत असतो त्यांच्यांत उत्क्रमणाचे हे विशेष वरच्याहून कमी प्रमाणानें दृग्गोचर हो-

तात. उलटपक्षीं, इतर समाजांविरुद्ध एकाद्या समाजाची संयुक्तक्रिया ज्या ठिकाणीं कमी होते, त्या ठिकाणीं ती क्रिया करण्यास बनलेल्या रचनेचे विशेष अस्पष्ट होऊं लागतात; इकडे उत्पादन व प्रसरण हीं करण्याकरितां बनलेल्या रचनांचे विशेष ठळक होऊं लागतात: म्हणजे, वाढत जाणारी सुसंबद्धता, विविधजातीयता, आणि निश्चितता हीं आतां एकंदर औद्योगिकघटनेंत दिसावयास लागतात. म्हणून एकाच काळीं समाजघटनेच्या एका भागाचें उत्क्रमण होऊन व दुसऱ्याचें अपक्रमण होऊन एकंदर समाजचमत्कार ज्यास्त संकीर्ण होतात. फेरबदलांची ही संमिश्रता इंग्लंदच्या समाजांत फार चांगल्या रीतीनें दिसून येते.

१४६. भूतस्थितीची ही सामान्य कल्पना पुढें ठेवून आतां आपण भाविस्थितीकडे वळूं या; आणि राजकीय उत्क्रमणास पुढें काय काय स्वरूपें येण्याचा संभव आहे हें पाहूं या.

उच्चतर राजकीय नमुन्यांबद्दलचे जे तर्क करावयाचे ते करतांना हें नेहमीं ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं हे नमुने सार्वत्रिक होण्याचा संभव नाहीं. गतकालाप्रमाणेंच भविष्यत्कालींही सरकारविषयक रचना बनवण्यांत स्थानिक परिस्थितींचा प्रभाव पडलाच पाहिजे; कारण ह्या रचना बऱ्याच अंशीं, विशिष्ट ठिकाणची हवा, जमीन, प्राणी आणि वनस्पति ह्यांस अनुसरून जशाप्रकारची रहाणी ठेवावी लागते तिजवर अवलंबून असतात. मध्यआशियासारखे जे प्रदेश मोठी लोकवस्ती पोसण्यास असमर्थ आहेत त्या प्रदेशांतून नियमनाचें

साधें स्वरूप ज्यांच्यामध्यें आहे असे भटकणारे लोकसमूहच कायम राहण्याचा संभव आहे. हल्लींच्या आफ्रिकेच्या कांहीं भागांसारखे जे मोठाले प्रदेश, उच्चतर जातींना कायमचा थारा करूं देत नाहींत, आणि जेथील वाफारे निघणारी हवा माणसास निःशक्त करिते, त्यांतून नीचतर जातीच याच्यापुढेंही राहतील, आणि त्यांना योग्य अशाच राजकीय रचना तेथें असतील. आणि पासिफिक महासागरांतल्या लहान बेटांतल्यासारखी जेथें परिस्थिति असेल त्या ठिकाणीं, लोकवस्ती लहान राहिल्यामुळेंच, मोठाल्या राष्ट्रांतूनच जशा प्रकारच्या राज्यपद्धती जरूर व शक्य असतात तशा उत्पन्न व्हावयाच्या नाहींत. जीवशरीराप्रमाणेंच समाजशरीरांमध्यें उच्चतर नमुने उत्क्रान्त झाल्यानें सर्व नीचतर नमुन्यांचा संहार होतोच असें नाहीं, ही गोष्ट ध्यानांत घेऊन, आपण एथें एवढ्याच मर्यादित प्रश्नाचा विचार करूं कीं, ज्या समाजांची परिस्थिति सामाजिक उत्क्रमण उच्चतम पायरीस पोंचण्यास अनुकूल आहे अशा समाजांत राजकीय घटना व क्रिया यांचे कोणते प्रकार उत्पन्न होण्याचा संभव आहे?

आतां हें उघडच आहे कीं पुढच्या काळाबद्दल जीं अनुमानें बांधावयाचीं तीं गतकाळच्या अनुभवावरूनच बांधिलीं पाहिजेत. आपण असें धरून चाललें पाहिजे कीं आजपर्यंत सामाजिक उत्क्रमण ज्या तत्त्वांवर चाललें आहे त्याच तत्त्वांवर पुढेंही चालणार. ज्या कारणांनीं सर्वत्र कांहीं विशिष्टपरिणाम घडले आहेत, ती कारणें जर तशींच कायम राहतील तर त्यांजपासून आ-

णखीही तसेच परिणाम होतील हें उघड आहे. आपणास जर असें आढळून आलें कीं कांहीं विशिष्टपरिस्थितींत जीं राजकीय रूपान्तरें घडून आलेलीं आहेत, तीं त्याच दिशेनें आणखीही होण्यासारखीं आहेत, तर आपण असें अंदाजिलें पाहिजे कीं पारिस्थिति कायम राहिल्यास तीं तशींच होत राहतील; आणि त्यांना पुढें वाढण्यास जागा राहणार नाहीं असें होईल तेव्हांच तीं व्हावयाचीं थांबतील.

आतां यापुढें लवकरच होणाऱ्या फेरबदलांबद्दल विश्वसनीय असा अंदाज करतां येईल असें यावरून समजावयाचें नाहीं. आतांपर्यंत जें सांगितलें आहे त्यावरून असें सिद्ध होतें कीं, युद्धशील व उद्यमशील अशा ज्या सामाजिकक्रियेच्या दोन परस्परविरुद्ध सरणी आहेत त्यांपैकीं जिचें प्राबल्य असेल, तिजवरून राजकीय संस्थांचीं स्वरूपें मुख्यत्वेंकरून ठरत असल्यामुळें, ज्याप्रमाणें वारंवार लढाया होत राहतील किंवा नेहमीं शांतता राहील, त्या मानानें त्यांस हें किंवा तें स्वरूप येईल. म्हणून आपण असें अनुमान काढिलें पाहिजे कीं एकंदर जवळच्या भविष्यत्काळांत निरनिराळे समाज एकमेकांशीं व्यवहार करण्यांत जे मार्ग स्वीकारितील (ज्यांबद्दल अगोदर भविष्य करतां येत नाहीं), त्यांजवर सर्व गोष्टी अवलंबून राहतील. एका पक्षीं, यूरोपांतील सर्व राष्ट्रांतून सैन्यें व आरमारें यांची सारखी वाढ होत असल्यामुळें थोडक्याशा कारणावरून मोठाल्या लढाया उत्पन्न होऊन त्या पुष्कळेवळपर्यंत कदाचित् चालू राहतील, व त्यामुळें कदाचित् जबरीचें राजकीय नियंत्रण पुनः सुरू

होईल. दुसऱ्या पक्षीं, पुष्कळकाळपर्यंत शांतता राहिल्यानें कारागिरी व व्यापार हीं कदाचित् इतकीं पुष्कळ वाढतील, त्याबरोबर त्यांना योग्य अशा राजकीय रचनांची प्रत्येक देशांत इतकी वाढ होईल, आणि परस्परांवर अवलंबून राहिल्यानें जीं बंधनें उत्पन्न होतात तीं इतकीं वळकट होतील कीं, लढायांस ज्यास्त ज्यास्त प्रतिबंध होऊं लागेल, आणि त्या करण्यास योग्य अशी जी घटना ती क्षीण होत जाईल.

परंतु अत्यंत पुढें गेलेल्या देशांत जवळच्या भविष्यत् काळीं कोणते राजकीय फेरबदल होण्याचा संभव आहे हा प्रश्न एकीकडे ठेवून, कमी किंवा ज्यास्त दूरच्या भविष्यत्काळीं औद्योगिक नमुना कायमचा स्थापिला जाईल असें सुधारणेमुळें आजपर्यंत उत्पन्न झालेल्या फेरबदलांवरून अनुमान करून, आपण आतां असा प्रश्न करूं कीं, अखेरीस कोणती राजकीय रचना उत्पन्न होण्याचा संभव आहे?

१४७. उद्यमशील नमुन्याच्या राजकीय विशेषांचा विचारदृष्ट्या व अनुभवदृष्ट्या नुक्ताच (गतप्रकरणांत) विचार केलेला असल्यामुळें ह्या ठिकाणीं ते फक्त सुसंगत व ज्यास्त मूर्त अशा स्वरूपानें दाखविले, व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कांहीं पूर्वी न निरूपिलेल्या विशेषांचें निरूपण केलें, म्हणजे झालें. आह्मी प्रथम त्यांमध्यें गर्भित होणाऱ्या राजकीय रचनांकडे आणि नंतर त्यांच्या व्यापारांकडे नजर फेंकूं.

स्वैच्छिक सहाक्रिया अगदीं होण्यासारखी असेल तितकी केली तर तिजपासून राजकीय संघटनेचे कोणते

प्रकार उत्पन्न होण्याचा संभव आहे? हें आपल्या लक्षांत अगोदर आलेंच आहे कीं युद्धशील नमुन्याबरोबर जबरी करण्याचीं जीं साधनें उत्पन्न झालेलीं असतात त्यांच्या अभावीं, कायदे करण्यासाठीं व राज्यकारभार चालविण्यासाठीं ज्या कांहीं रचना अस्तित्वांत येतील त्यांचा, सामान्यतः व विशेषतः, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या प्रतिनिधिसत्तेपासून उगम झालेला असला पाहिजे. सर्वांच्या इच्छेपासून ज्यांस अधिकार प्राप्त झालेले नाहींत, व जे त्या इच्छेनें बदलतां येत नाहींत, असे अधिकारी त्या रचनांत समाविष्ट झालेले असतील, तर त्यावरून असें गर्भित होईल कीं, ठराविक स्थितीचें साम्राज्य अजून कांहीं अंशीं शिल्लक आहे, व तें तर अगदीं निघून जाऊन कराराच्या स्थितीचें पूर्ण साम्राज्य स्थापन झालें आहे असें आपण घेऊन चालत आहों. पण बेजबाबदार सर्व अधिकारी निघून गेले असें गृहीत केल्यास, सर्व जनांची इच्छा प्रदर्शित करण्यास आणि अमलांत आणण्यास कोणत्या विशिष्टरचना उत्तम प्रकारें योग्य आहेत? हा प्रश्न असा आहे कीं त्यास जवळ जवळ बरोबर अशींच उत्तरें देतां येण्यासारखीं आहेत; अगदीं बरोबर देतां येण्यासारखीं नाहींत. सर्वांचा सामान्य मनोभाव व मत हीं अनेक प्रकारच्या घटनांच्या द्वारा प्रदर्शित करतां येतील, व तदनुसार कृतीही करतां येईल; आणि त्यांपैकीं कोणत्या प्रकारच्या घटनेचा स्वीकार करावयाचा हा तात्त्विक प्रश्न न होतां केवळ सोईचा प्रश्न होऊन बसेल. म्हणून आतां ह्या निरनिराळ्या प्रकारांचा विचार करूं.

मुख्य कायदेमंडळ ज्यांचें बनलेलें आहे असे जे लोकप्रतिनिधी त्यांचें सर्वांचें मिळून एक मंडळ असूं शकेल किंवा दोन असूं शकतील. केवळ एकच असल्यास तें योग्यगुणविशिष्ट अशा नागरिकांनीं प्रत्यक्ष निवडलेल्या प्रतिनिधींचेंच बनलेलें असेल; लोकांनीं प्रत्यक्ष निवडलेल्या स्थानिक सभांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचें तें बनलेलें असेल; किंवा तें कांहीं पहिल्या तऱ्हेनें निवडलेल्या व कांहीं दुसऱ्या तऱ्हेनें निवडलेल्या अशा प्रतिनिधींचें बनलेलें असेल. कायदेमंडळाच्या दोन शाखा असल्यास खालची शाखा वर सांगितल्यापैकीं पहिल्या रीतीनें उत्पन्न झालेली असेल; आणि दुसरी तिन्हींपैकीं कोणत्या तरी एका मार्गानें उत्पन्न झालेली असेल. तिचे सभासद स्थानिक प्रतिनिधिमंडळांनीं निवडलेले असतील, किंवा खालच्या शाखेनें आपल्यापैकींच कांहीं निवडलेले असे असतील. त्याचे सभासद होण्यास कांहींही विशिष्ट गुण लागत नसेल, किंवा कांहीं लागत असेल; उदाहरणार्थ, राज्यकारभाराचा अनुभव. आतां ह्या निरनिराळ्या प्रकारच्या कायदेमंडळांशिवाय, तें सगळेंच किंवा अर्धें-पाव नवें करण्याच्याही अनेक तऱ्हा असतात. एक शाखा किंवा दोन्ही शाखा कांहीं कांहीं कालानें जुन्या अगदीं मोडून नव्या निवडिल्या जात असतील, हे काळ दोन्ही शाखांस एकच असतील किंवा भिन्न असतील, आणि ह्या निवडणुकी एकाच वेळीं किंवा निरनिराळ्या वेळीं होतील; किंवा वरची शाखा प्रतिनिधिघटित असली तरी कायमची असेल, आणि खालची तेवढीच बदलणारी असेल;

किंवा ह्यांपैकीं एका किंवा दोन्ही शाखांची बदल पूर्णपणें न होतां अपूर्णपणें होत असेल; म्हणजे, त्यांचे घटकांपैकीं एकतृतीयांश किंवा एकचतुर्थांश वर्षानें किंवा दोन वर्षांनीं आपल्या जाग्यांचे राजीनामे देत असतील, आणि त्यांस पुनः निवडून येण्याचा हक्क असेल वा नसेल. ह्याप्रमाणेंच कारभार पाहणारें अधिकारी मंडळ प्रतिनिधितत्त्वास अनुसरून तयार करण्याच्या अनेक तऱ्हा असतात. तें मंडळ साधें असेल किंवा संयुक्त असेल, आणि संयुक्त असल्यास त्याचे घटक एकदम बदलत असतील किंवा पृथक्पणें बदलत असतील. राजकीयमुख्य सगळ्या समाजाकडूनच प्रत्यक्षरीत्या निवडला जात असेल, किंवा त्यांच्या स्थानिक शास्त्या मंडळांकडून निवडला जात असेल, किंवा मुख्य अशीं जीं एक दोन प्रतिनिधिमंडळें त्यांपैकीं एकाकडून किंवा दोघांकडूनही निवडला जात असेल; आणि त्याची निवड कांहीं नियमितकाळपर्यंत किंवा आमरण असेल. त्याचे मदतनीस किंवा प्रधान तोच स्वतःपसंत करीत असेल; किंवा त्यांपैकीं एकाची निवड तो करीत असून बाकीच्याची तो प्रधान करीत असेल; किंवा त्यांची सर्वांची मिळून किंवा पृथक् पृथक् निवड कायदेमंडळांपैकीं कोणतें तरी एक किंवा दोन्ही मिळून करीत असतील. आणि प्रधानमंडळांचे घटक ह्या दोन मंडळांपासून पृथकच असतील, किंवा त्यांपैकीं कोणत्या तरी एकाचे सभासद असतील.

ह्या व दुसऱ्या ज्या कांहीं ह्यांच्यांतच बदल करून व्यवस्था करतां येतील त्या, कायदे करणें व त्यांची ब-

जावणी करणें ह्या गोष्टी लोकमतास अनुसरून झाल्या पाहिजेत ह्या तत्त्वाशीं सुसंगत असून, त्यांपैकीं कोणत्या पसंत करावयाच्या हें कमी भानगड आणि काम करण्यास ज्यास्त सौलभ्य ह्या तत्त्वांवर मुख्यत्वेंकरून ठरविलें पाहिजे. आतां समाजाचा जो पूर्व इतिहास असेल त्यावरूनच ह्या व्यवस्था व त्यांतील बारीकसारीक गोष्टी पूर्वींप्रमाणेंच पुढेंही बऱ्याच अंशीं ठरतील, व केवळ विचारावरून फारशा ठरणार नाहींत असा अंदाज करण्यास हरकत नाहीं; म्हणून उद्यमशील नमुन्याच्या समाजांमध्यें त्यांच्या पूर्वपीठिकाभेदांवरून राजकीय घटनाभेद उत्पन्न होण्याचा संभव आहे. व्यक्तिशरीरांकडे पाहतां असें दिसतें कीं, एकाद्या जीवनमुन्याच्या प्रारंभींच्या अमदानींत ज्या रचना उत्पन्न झाल्या असतील, त्या त्या रचनांच्या व्यापारांची जरूरी नाहींशी झाली तरी नष्ट होत नाहींत, तर त्यांच्या पूर्व व्यापारांहून कमज्यास्त प्रमाणानें भिन्न अशा व्यापारास योग्य अशा बनतात. त्याप्रमाणेंच राजकीय संस्थांच्या संबंधानें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, उद्यमशील नमुन्यास योग्य अशा ज्या संस्था त्यांच्यांत पूर्वीं अन्य कारणासाठीं उत्क्रान्त झालेल्या संस्थांच्या खाणाखुणा दृष्टीस पडतील. म्हणून हीही गोष्ट संभवनीय दिसते कीं पुढें जे समाज सर्वांशी उद्यमशील म्हणून परस्परसदृश बनून जातील, त्यांच्यांमध्यें राजकीय संस्था अगदीं एकाच प्रकारच्या असतील असें नाहीं; तर त्यांच्यांत त्यांच्या पूर्व संस्थांच्या, आणि

वसाहतीसारख्या समाजांत त्यांच्या मूळसमाजाच्या संस्थांच्या, खाणाखुणा दृष्टीस पडतील.

कांहीं लोक असें म्हणतात कीं स्वतंत्र राष्ट्राचे कायदे करण्यास एकच कायदेमंडळ पुरे आहे; तरी वर सांगितलेल्या कारणांवरून असें शक्य दिसतें कीं, दोन कायदेमंडळांचें बीज अगदीं प्राथमिक समाजांतही दिसत असल्यामुळें दोनच मंडळें पुढेंही कायम राहण्याचा संभव आहे. थोडेसे नामांकित लोक व पुष्कळ सामान्य लोक असा प्राथमिक समूहाचा विभाग आपोआपच पडत असून, ते दोन्ही भाग त्या समूहाची कृति ठरविण्याच्या कामीं मत देत असल्यामुळें, ते दोन्ही तसेच राहण्याचा संभव दिसतो. आतां अशीं दोन मंडळें पुढेंही कायम रहावयाचीं असल्यास तीं दोन्ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निवडणुकीनें उत्पन्न झालेलीं असलीं पाहिजेत ही गोष्ट अगदीं उघड उघड असल्यामुळें, वरची शाखा व खालची शाखा ह्यांच्यामध्यें आजपर्यंत जसला भेद दिसत आला आहे तशाच प्रकारचा कांहीं भेद पुढेंही त्यांच्यांत दिसण्याचा संभव आहे. कारण एकादा उद्यमशील समाज कितीही उत्क्रान्त झालेला असला, तरी श्रेष्ठ व कनिष्ठ, शास्ते व शासित, ह्यांच्यामधील जो भेद तो कांहीं नाहींसा होऊं शकणार नाहीं. उद्योगधंदे चालविण्याकरितां कोणत्याही प्रकारच्या व्यवस्था ह्यापुढें स्थापन झाल्या तरी जे आपल्या शीलामुळें व सामर्थ्यामुळें उच्चतर पदास चढतात, व जे नीचतर पदावरच राहतात, त्यांच्यामधील भेद कायमच राहिला पाहिजे. हल्लीं कांहीं प्रकारचा माल सहकार्या-

च्या तत्त्वावर उत्पन्न होत असून देशांत पसरतही असतो, तसें पुढें सर्वच प्रकारच्या मालासंबंधानें झालें तरी, असल्या सहकारी मंडळ्यांचे नेमिलेले मुख्य व व्यवस्थापक कमिट्या असावयाच्याच. सर्व उद्यमशील संस्थांच्या मुख्यांच्या मिळून बनलेल्या किंवा राज्यकारभारांत असलेल्या सर्व लोकांच्या मिळून बनलेल्या मंडळाकडून सरतेशेवटीं कदाचित् एक सेनेट निवडलें जाऊं लागेल, आणि तें अर्थात् शास्त्या लोकांच्या प्रतिनिधींचें बनलेलें असेल, आणि शासितांच्या प्रतिनिधींचें नसेल. आतां प्रत्येक उद्यमशीलमंडळाच्या कारभाराप्रमाणेंच सर्वसामान्य कारभारामध्येंही शासित वर्गाच्या प्रतिनिधींचे हातीं शेवटची श्रेष्ठ सत्ता असलीच पाहिजे; परंतु शास्त्यावर्गाचे प्रतिनिधी वरील प्रतिनिधींच्या कृतींचें जरा नियंत्रण करण्यास असले तर बरें असें वाटतें. कोणत्याही कायद्याकडे जसें वरून किंवा खालून पहावें, म्हणजे शास्त्यांच्या किंवा शासितांच्या दृष्टीनें पहावें, तसें त्याचें रूप निरनिराळें दिसतें हें उघडच आहे. म्हणून ह्या दोन निरनिराळ्या रूपांमध्यें सुसंगतपणा आणिला पाहिजे. ह्या दोन वर्गांच्या हिताहितांमधील भेदांवरून त्यांचीं निरनिराळीं प्रतिनिधिमंडळें असणें अखेरपर्यंत आवश्यकच राहील असें धरून न चाललें तरी, असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, खालचें प्रतिनिधिमंडळ वरच्याइतकें सरकारी कामाच्या संबंधानें अनुभविक नसल्यामुळें त्यानें पुरविलेल्या योजनांमध्यें योग्य ते बदल करण्यास वरच्या मंडळानें आपल्या अनुभवाचा उपयोग केल्यास फायदा होईल,

आणि त्या दोन्हीं मंडळांच्या संयुक्तविचारापासून उत्पन्न होणारे कायदे समाजाच्या गरजा भागविण्यास उत्तम रीतीनें उपयोगी पडतील, असें समजणें सयुक्तिक दिसतें. उत्क्रमणविषयक चमत्कारांमध्यें सर्वत्र ज्यास्त ज्यास्त विशिष्टीकरण दिसत असल्यामुळें दोन कायदेमंडळें एकच बनतील असें त्यांवरून मुळींच व्यक्त होत नाहीं इतकेंच नाहीं, तर पक्क झालेल्या राजकीय घटनांमध्यें सर्वत्र दिसणारीं हीं दोन मंडळें किंवा त्यांपैकीं एक आणखीही विशिष्टीभवन पावेल असेंच कदाचित् संभवनीय दिसतें. **साहेब** म्हणतात, आमच्या कामन्ससभेंतच अशा प्रकारचा फेरबदल होण्याचा संभव आहे अशीं चिन्हें हल्लींच दिसत आहेत. दोन कायदेमंडळें असलीं म्हणजे कायदे करण्याच्या कामास अडथळा येतो असा जो आक्षेप आहे त्यास उत्तर हेंच कीं फेरबदल करण्याच्या कामास बराचसा अडथळा असणें इष्टच आहे. **साहेब** म्हणतात, हल्लीं जी आपली पार्लमेंटीय स्थिति आहे त्या स्थितींतच योग्य विचार न करतां केलेल्या कायद्यांमुळें फारच मोठालीं नुकसानें होत आहेत; म्हणून कायदे करण्याचें काम हल्लींहून ज्यास्त सुलभ होईल असे फेरबदल केल्यास हीं नुकसानें वाढण्याचा संभव आहे.

आतां अगदीं अखेरची जी अंमलबजावणी करणारी संस्था तिच्यासंबंधानें विचार करतां ती कोणत्या तरी रीतीनें निवडली गेलेली बनली पाहिजे असें अनुमान करणें भागच पडतें; कारण आनुवंशिक राजकीय नायकी वाढीस लागलेल्या लष्करी नमुन्याचा एक विशेष आहे;

आणि ठराविक स्थितींचें जें साम्राज्य,जें आपल्या क्लृप्ती-प्रमाणें उद्यमशील नमुन्यांत येऊं शकत नाहीं, त्याचा तो एक भाग आहे. हल्लींचीं जीं पुढें गेलेलीं राष्ट्रें आहेत त्यांमध्यें दिसणाऱ्या वस्तुस्थितीवरून पाहतां असें अनुमान करतां येतें कीं सर्वांत उच्च असा जो संस्कारी हुद्दा त्याच्यावर कोणीही असला तरी त्या हुद्याचें महत्त्व कमी कमी होणार आहे; आणि त्या हुद्यावर असणाऱ्या माणसाचीं कामें ज्यास्त ज्यास्त बाहुलीकामावजा होणार आहेत. हा हुद्देवाला असा पाहिजे कीं त्याच्या ठिकाणीं इंग्लंदच्या राजामध्यें दिसणारे कांहीं विशेष असावे, व कांहीं युनैटेड्स्टेट्स्च्या प्रेसिडेंटामध्यें दिसणारे असावे. एकापक्षीं, कायदेमंडळाच्या द्वारा प्रदर्शित झालेलें जें बहुजनमत तें अंमलांत आणणारे जे लोक असतात ते पाहिजेत तेव्हां काढतां येण्यासारखे असावे; म्हणजे ते आपल्या नीतीचें धोरण सार्वजनिकमतास अनुसरून ठेवतील. दुसऱ्यापक्षीं, ही गोष्ट जरूर आहे कीं हे लोक काढिले तरी रोजचा कारभार चालविण्याकरितां लाविलेले इतर लोक त्यांच्याबरोबर निघूं नयेत. इंग्लंदच्या राज्यव्यवस्थेकडे पाहतां ह्या अटी जरी तेथें बऱ्याच अंशीं पुऱ्या होतात, तरी तेथील राजकीय मुख्य निवडला जात नाहीं व मुख्यत्वेंकरून राष्ट्राच्या परकीय नीतींत तो बराच अधिकार चालवितो, ह्या बाबतींत त्या पुऱ्या होत नाहींत. युनैटेड्स्टेट्स्च्या राज्यकारभाराकडे पाहतां तेथील राजकीय मुख्य निवडला जातो, व परकीय राष्ट्राशीं व्यवहार करतांना राष्ट्राची अब्रू त्यास घालवतां येत नाहीं, ह्या बाबतींत जरी त्या पुऱ्या होतात, तरी

तो केवळ बाहुल्याप्रमाणें असून सार्वजानिक मतास जुमानणाऱ्या प्रधानमंडळाकडून त्याच्या कृतीवर दडपण पडत नाहीं, आणि तो आपल्या मुदतींत बराच स्वतंत्र अधिकार चालवूं शकतो, ह्या बाबतींत त्या पुऱ्या होत नाहींत. भविष्यत्काळीं कदाचित् ह्या दोन व्यवस्थांचे फायदे तेवढे व्हावे व तोटे होऊं नयेत अशी नवी व्यवस्था उत्पन्न होत जाईल. आपल्या ह्या संक्रमणस्थितींत दिसणारे पक्षविरोध नाहींसे झाल्यावर आणि सरकारी श्रेष्ठ अधिकाऱ्याची जागा सत्तेपेक्षां मानाची ज्यास्त बनल्यानंतर, असें कदाचित् होऊं शकेल कीं एकाद्या मोठ्या कामगिऱ्या बजावलेल्या माणसास राष्ट्राची त्यांबद्दल पसंती दर्शविण्यासाठीं अखेरीस ती जागा मिळावयास लागून ती त्यास दिल्यामुळें राष्ट्राच्या नीतींत कांहींही बदल होणार नाहीं, आणि समाजांतही कांहीं गडबड उडणार नाहीं; आणि कारभारीमंडळाचीं कृत्यें सार्वजनिक मतास जुळतीं करण्यासाठीं त्याजमध्यें जे फेरबदल करावयाचे ते हल्लीं इंग्लंदांत प्रधानमंडळांत फेरबदल होतात तशा प्रकारचे होऊं लागतील.

उद्यमशील नमुन्यास योग्य अशा मुख्य मुख्य राजकीय संस्थांच्या स्वरूपघटना आणि कृत्यें ह्यांची बरोबर कल्पना होण्यास आपण असें धरून चाललें पाहिजे कीं पक्षविरोध कमी कमी होत आहे. व्यापकदृष्टीनें पाहतां, राजकीय तट जे उत्पन्न होतात ते युद्धशीलता आणि उद्यमशीलता ह्यांच्यामधील विरोधापासून उत्पन्न होतात. म्हणजे, ते अनुक्रमें जबरीच्या कारभाराकरितां व स्वतंत्र कारभाराकरितां बनलेले असतात, किंवा ह्या

किंवा त्या शीलतेच्या ज्या विशिष्ट संस्था व कानू त्यांजसाठीं बनलेले असतात, अथवा ह्या किंवा त्या शीलतेस अनुरूप अशा धर्मविषयक समजुती व घटना ह्यांसाठीं बनलेले असतात, किंवा ह्या किंवा त्या शीलतेपासून वंशपरंपरेनें आलेलीं जीं तत्त्वें व रूढी निराळ्या स्थितींत कायम राहिलीं असतील त्यांच्या रक्षणार्थ उत्पन्न झालेले असतात. पक्षाभिमानाच्या अगदीं मुळापर्यंत शोधीत गेलें तर तो एके बाजूस कांहींतरी प्रकारचा अन्याय आहे तसा कायम ठेवणें, किंवा दुसरे बाजूस त्यास विरोध करणें, ह्या दोहोंपैकीं एका गोष्टीसाठीं उत्पन्न झालेला असतो. एक पक्ष बहुधा दुसऱ्यानें अन्याय केला आहे असें म्हणत असतो; आणि एका पक्षाच्या कृतींत तरी अन्याय असला पाहिजे, किंवा दुसऱ्या पक्षाच्या ह्या म्हणण्यांत तरी असला पाहिजे. म्हणून स्वैच्छिक क्रियेचें व तिजबरोबर येणाऱ्या योग्य अशा कल्पनांचें, मनोवृत्तींचें आणि रूढींचें साम्राज्य जसजसें वृद्धिंगत होत जाईल—जसजशा ह्या किंवा त्या नागरिकांच्या समस्वातंत्र्यास तुडविणाऱ्या व्यवस्था नाहींशा होतील, तसतशा पक्षापक्षांच्या लढाया वस्तुतः बंद पडल्याच पाहिजेत. मग जे मतभेद राहतील ते केवळ बारीकसारीक गोष्टी व राज्यकारभाराच्या लहानसहान बाबी ह्यांच्याचबद्दल राहतील. आतां हें उघडच आहे कीं युद्धशील नमुन्यापासून वंशपरंपरेनें आलेले मोठमोठाले अन्याय ज्या प्रमाणानें नष्ट होत जातील, त्या प्रमाणानें असल्या स्थितीकडे समाजाची मजल ज्यास्त ज्यास्त गेली पाहिजे. तद्वतच, हीही गोष्ट उघडच आहे कीं, पक्षभेद

वाढत चालले आहेत असा जो बोभाटा करण्यांत येतो तेही वाढतच गेले पाहिजेत; कारण त्यामुळें असा परिणाम होण्याचा रंग दिसतो कीं जो जनविभाग सत्ताधीश असेल त्याच्याच इच्छेप्रमाणें कोणतीही गोष्ट होऊं नये, तर त्यास सामान्यतः सर्व पक्षांची संमति असावी. आणि उघडच मनुष्यस्वभावाचें व्यक्तित्व वाढत जाऊन अशा रीतीनें तट जसे मोडून जातील, तसे हल्लीं नजरेस येणारे पक्षविरोध नष्ट होतील.

आतां स्थानिक सरकाराच्या संबंधानें असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, अधिकाराचें केंद्रीभवन हा जसा युद्धशील नमुन्याचा एक मुख्य विशेष आहे तसाच त्याचें प्रसरण हा उद्यमशील नमुन्याचा एक मुख्य विशेष आहे. स्वैच्छिक सहाक्रियेच्या साम्राज्यापासून जी स्वातंत्र्यप्रीति उत्पन्न होते तिजमुळें सामाजिक संबंध सुसंगत ठेवण्यास आवश्यक नाहीं अशा रीतीनें कोणी एका व्यक्तीनें माणसाच्या कृतीचें नियंत्रण करूं पाहिल्यास त्यास जसा तो विरोध करितो, तसें एकाद्या वर्गानें किंवा बहुजनानेंही करूं पाहिल्यास त्यांसही तो विरोध करितो. ह्याचा एक परिणाम असा झालाच पाहिजे कीं, एका ठिकाणच्या लोकांवर त्यांच्याच कामाच्या बाबतींत दुसऱ्या ठिकाणचे लोक हुकूम सोडूं लागल्यास ते त्यांस विरोध करितील. जे कायदे सर्वच व्यक्तींस लागू असतील, आणि जे कायदे निरनिराळ्या ठिकाणच्या परस्परांशीं होणाऱ्या व्यवहाराच्या संबंधाचे असतील, त्या ठिकाणीं बहुजनाच्या मतास लोक मान देतील, परंतु ज्या व्यवस्थांचा संबंध एकंदर समाजाशीं

येत नसून केवळ त्याच्या एकाच भागाच्या लोकांशीं येत असेल, त्यांच्या संबंधानें बाकीच्या भागांच्या लोकांच्या जबरदस्तीच्या सांगण्यास विरोध करण्याची इतकी प्रवृत्ति उत्पन्न होईल कीं, तिचा परिणाम स्थानिक व्यवस्था स्थानिक माणसांनींच होईल तितकी करावी अशा संस्था स्थापन करणें हा होईल. म्युनिसिपल व तसलींच इतर सरकारें आपापल्या ठिकाणांकरितां कायदे करण्याचे व ते अंमलांत आणण्याचे अधिकार बजावूं लागतील, आणि सर्व समाजाची सुसंगति राहण्यासाठीं जरूर तेवढा अधिकार मुख्य सरकारच्या हातीं राहील.

तथापि अखेरच्या राजकीय संस्थांच्या संबंधानें हे किंवा ह्यांच्यासारखेच जे तर्क आहेत ते केवळ अंदाजच म्हणून समजले पाहिजेत. पुढें जे फेरबदल होण्याचे संभव आहेत त्यांच्या सामान्यस्वरूपाचें केवळ दिग्दर्शन ह्याच दृष्टीनें ते एथें नमूद करण्याचें धाडस आह्मीं केलें आहे; आणि त्यांमध्यें जें कांहीं विशिष्ट भविष्य केलेलें असेल तें अंशतःच बरोबर ठरण्याचा संभव आहे. भविष्यत्काळीं इतर पुष्कळ अनपेक्षित गोष्टींप्रमाणें अनपेक्षित राजकीय व्यवस्थाही उत्पन्न होतील ह्यांत बिलकुल शंका नाहीं. आधींच ध्वनित केल्याप्रमाणें, उद्यमशील समाजांच्या राजकीय संस्थांचीं जीं विशिष्टस्वरूपें त्यांमध्यें बहुतकरून बरेंच वैविध्य उत्पन्न होईल; कारण गतसंस्थांच्या खाणाखुणा त्यांच्यांत शिल्लक राहतीलच. आणि हें किंवा तें स्वरूपच विशेष इष्ट होय असें म्हणण्यांतही विशेष अर्थ नाहीं; कारण नागरिकांचे स्व-

भाव जर असावे तसे बनले, तर व्यवस्थांमध्यें भेद असले तरी त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या फायद्यांमध्यें फारसे भेद होणार नाहींत.

१४८. आतां उद्यमशील समाजांस योग्य अशा ज्या राजकीय रचना त्या कोणते राजकीय व्यापार करतील ह्याबद्दल वरच्याहून कांहीं अंशीं ज्यास्त निश्चित व ज्यास्त निश्चयानें अनुमान करतां येण्यासारखें आहे. त्यांचें सामान्य दिग्दर्शन अगोदरच केलेलें आहे; पण एथें त्यांचें कांहींसें ज्यास्त विशिष्ट रीतीनें दिग्दर्शन केलें पाहिजे.

समाजाचें इतर समाजकृत नाशापासून किंवा नुकसानापासून रक्षण करण्यासाठीं सहक्रिया करण्याची जरूरी नाहींशी झाली म्हणजे समाजाच्या घटकांचें परस्परकृत नाशापासून किंवा नुकसानापासून रक्षण करण्याचें तेवढेंच काम सहक्रियेस शिल्लक राहतें; मात्र ह्या ठिकाणीं नुकसान ह्या शब्दाचा अर्थ तात्कालिक अन्याय एवढाच घ्यावयाचा नाहीं, तर दूरवरचा अन्याय असाही घ्यावयाचा. पुष्कळ पिढ्या स्वैच्छिक सहकार्य करून व त्याबरोबरच इतरांच्या हक्कांकडे योग्य नजर देऊन ज्यांच्या स्वभावांस योग्य स्वरूप आलेलें आहे ते नागरिक, प्रत्येकजण दुसऱ्यांच्या योग्य उद्योगांस व्यत्यय येणार नाहीं अशा धोरणानें जे उद्योग करितो त्यांपासून होणारे प्रत्यक्ष फायदे, आणि स्वैच्छिक करारांपासून होणारे अप्रत्यक्ष फायदे त्यास खात्रीनें मिळावे एतदर्थ ज्या राजकीय संस्था आवश्यक असतील त्या कायम ठेवण्यास सर्वांशीं कबूल होतील; आणि जेथें न्याय्यमार्ग कोणता हें उघड उघड दिसत नाहीं अशा वांटा-

ळ्याच्या प्रकरणांत न्याय करण्याकारितां जरूर त्या संस्था संभाळण्यासाठीं, आणि सर्व स्वाभाविक फायद्यांचा योग्य विभाग करण्याकरितां जरूर त्या कायदे करण्याच्या किंवा कारभार पाहण्याच्या कामासाठीं, जरूर तो आपल्या उत्पन्नाचा भाग देण्यास प्रत्येकजण तयार होईल. ह्या टापूच्या पलीकडे सरकार आपली मर्यादा वाढवूं लागल्यास त्यास विरोध दोन प्रकारच्या हेतूंनीं होईल; स्वार्थविषयक व परार्थविषयक.

पहिली गोष्ट ही कीं, वर दर्शविलेल्या शीलांचे नागरिक एकमेकांच्या कार्यटापूंचें रक्षण करण्यास जरूर अशा नियंत्रणांहून आपल्यावर व्यक्तिशः ज्यास्त नियंत्रणें लादून घेण्यास सरकाररूपानें कबूल होतील ही गोष्ट संभवत नाहीं. नेहमीं केलेल्या कराराप्रमाणें वागण्याची संवय प्रत्येकास लागलेली असल्यामुळें वरील मर्यादांच्या आंत स्वतंत्ररीत्या वागण्याचा हक्क सांगावा असा मनोभाव त्याच्यामध्यें उत्पन्न झालेला असणार; आणि म्हणून आपल्या कृतिस्वातंत्र्यास वरच्याहून ज्यास्त मर्यादा घालून घेण्यास कबूल करावयास लावील असा मनोभाव असल्या नागरिकांच्या समूहांत उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. आणि असल्या समाजाच्या एकाद्या भागानें असल्या मर्यादा इतरांवर लादाव्या हें आपण कल्पिलेल्या स्थितीच्या उलटही आहे; कारण असें होण्यास राजकीय असमता किंवा ठराविक स्थिति असली पाहिजे, आणि ती तर उद्यमशील नमुन्यांत येत नाहीं. शिवाय हेंही उघड आहे कीं वर सांगितलेल्या सार्वजनिक कामांव्यतिरिक्त इतर कामांसाठीं नागरिकांपासून पैसे घ्या-

वयाचे हीही गोष्ट त्यांत येत नाहींच. कारण व्यक्तिशः आपापले खासगी उद्योग करण्यास आणि त्यांच्या फलांचा उपभोग घेण्यास जरूर त्या अटी पाळण्याची इच्छा जरी सर्व लोकांस नेहमींच असण्याचा संभव आहे, तरी दुसऱ्या एकाद्या सार्वजनिक गोष्टीसाठीं ते सर्व एकमत करतील ही गोष्ट अत्यन्त असंभवनीय आहे. आणि अशा एकमताच्या अभावीं ती गोष्ट साध्य करण्यास जरूर ते पैसे देण्यास आणि जरूर तीं नियंत्रणें आपल्यावर लादून घेण्यास, त्या गोष्टीला प्रतिकूल असलेले लोक विरोध करतील. कारण ज्या न्यून-जनापासून त्यांच्या नव्हे तर इतरांच्या वासना तृप्त करण्यासाठीं पैसे घेणार ते लोक असंतुष्ट होणार आणि त्या गोष्टीस विरोध करणार. म्हणजे, भिरनिराळ्या लोकांना निरनिराळ्या रीतीनें वागविल्यासारखें होणार आणि ही गोष्ट तर स्वैच्छिक सहक्रियेच्या पूर्ण साम्राज्याशीं जुळत नाहीं.

बरें, नागरिकांमध्यें न्यायसंबंध राखण्याव्यतिरिक्त कामांकडे राजकीय संस्थांचा उपयोग करण्यास तीं कामें नको म्हणणारा न्यूनपक्ष जसा स्वार्थाच्या दृष्टीनें विरोध करील, तसा बाकीचे लोक परार्थाच्या दृष्टीनें करतील. म्हणजे, कांहीं लोकांना असल्या कामापासून जर असंतोष होत आहे तर आपल्याच संतोषासाठीं तीं करणें योग्य नाहीं असें त्यांस वाटूं लागेल. ज्याच्या मनांत न्यायाचा मनोभाव प्रबल झालेला आहे त्यास अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष रीत्या दुसऱ्याचें नुकसान करून आपला फायदा करून घेणें बिलकुल आवडत नाहीं; आणि म्हणून असल्या माणसांच्या समाजांत जे फायदे कांहीं लोकांस मिळत नाहींत

किंवा नको आहेत असे फायदे सर्वांच्या खर्चानें सार्व-जनिक संस्थांच्या द्वारा मिळविण्यास कोणीही इच्छि-णार नाहीं. सर्व नागरिकांत न्यायविषयक समतेची बुद्धि जर जागृत असेल तर, उदाहरणार्थ, असें घडलेंच पाहिजे कीं, एकीकडे दुसऱ्यांच्या मुलांस शिक्षण देण्या-स पैसे देण्याच्या विरुद्ध ज्यांस मुलें नाहींत ते लोक जसे जातील, तसेच दुसरीकडे, ज्यांस मुलें नाहींत, जे अविवाहित आहेत, आणि ज्यांची स्थिति बहुधा आप-ल्याहून गरीबीची आहे, अशा लोकांच्या पैशानें आप-ल्या मुलांचें शिक्षण कांहीं अंशीं तरी व्हावें, त्या गोष्टी-स मूलवाले तितकाच जोराचा विरोध करितील. एवंच सरकारचें जें मुख्य कर्तव्य म्हणून वर सांगितलें त्या-खेरीज इतर कृत्यांला कांहींकांचा विरोध ज्यास्त ज्यास्त होऊं लागल्यानें आणि त्यांजविषयींची इतरांची इच्छा कमी कमी झाल्यानें, तेंच कर्तव्य तेवढेंच अखेरीस स-रकार करूं लागेल.

१७९. चांगल्या बनलेल्या उद्यमशील नमुन्यामध्यें राजकीय संस्थांचा टापू इतका मर्यादित होतो असें जें वर अनुमान केलें तेंच अनुमान अन्यमार्गानेंही करतां येतें. कारण सेंद्रिय व सेंद्रियोत्तर अशा एकंदर उत्क्रमणाबरो-बर जी व्यापारविषयक विशिष्टीभवनाची सरणी सुरू होते तिचेंच सरकारच्या कर्तव्यांचें मर्यादीकरण हें एक फल आहे. प्राण्यामध्यें काय किंवा समाजामध्यें काय, विशिष्ट व्यापार करण्यासाठीं विशिष्ट रचनांच्या वृद्धीवरूनच त्यांच्यांत घटनावृद्धि झालेली नेहमीं दिसत असते. सर्वत्र आपल्यास असा नियम आढळून

येतो कीं, जो भाग प्रारंभीं अनेक कामें करीत असून त्यांपैकीं कोठलेंच चांगलें करीत नसेल त्याचे अनेक भाग पडतात, व त्यांपैकीं प्रत्येक त्या कामांपैकीं एकेक काम करूं लागतो, आणि त्याला त्या कामास विशेषतः योग्य अशा रचना प्राप्त होऊन, तें पहिल्याहून ज्यास्त चांगलें करूं लागतो. गेल्या एकंदर प्रकरणांतून खुद्द सरकाररूपी घटनेच्या उत्क्रमणावरूनच हें सत्य अनेक रीतींनीं उदाहृत झालेलें आपल्या नजरेस आलेलें आहे. म्हणून एथें एवढेंच दाखविणें जरूर आहे कीं, एकंदर सरकाररूपी घटनेचे व्यापार आणि समाजांत येणाऱ्या इतर घटनांचे व्यापार, ह्यांजमध्यें जो विभाग उत्पन्न झालेला आहे, व जो नेहमीं ज्यास्त ठळक होत जाईल, त्याच्या योगानें हें सत्य ज्यास्तच विस्तृतरीतीनें आणखी उदाहृत होतें. हें आपल्या अगोदरच नजरेस आलें आहे कीं, युद्धशील नमुन्यांमध्यें राजकीय नियंत्रण नागरिकांच्या जीवितांच्या सर्व भागांवर पसरलेलें असतें. तद्वतच, हेंही आपल्या नजरेस अगोदरच आलें आहे कीं, उद्यमविषयक प्रगति होऊन त्याबरोबरच योग्य ते राजकीय फेरबदल जसे होत जातात, तसा या नियंत्रणाचा टापू कमी होत जातो. कारण मग माणसांनीं आपली रहाणी कशी ठेवावी ह्याबद्दल सरकार हुकूम सोडीनासें होतें; पोषाकाबद्दलचेही नियम तें घालीत नाहींसें होतें; वर्गावर्गांच्या अंकितपणाबद्दलच्या नियमांचा जोर कमी होतो; धर्मविषयक समजुती व विधी जोरानें लादावयाचे बंद होतात; शेती करण्याच्या व वस्तू बनवण्याच्या तऱ्हा कायद्यानें ठरव-

ल्या जात नाहींतशा होतात; आणि अंतर्देशीय व बहिर्देशीय व्यापारावरील निर्बंध हळू हळू कमी होऊं लागतात. म्हणजे काय, तर, उद्यमशीलतेची प्रगति जशी होत गेली आहे तसें सरकार एकदां जीं नियंत्रणरूप कामें करीत होतें त्यांतील बऱ्याच कामांपासून मागें सरलेलें आहे. हा फेरबदल होत असतां असल्या अनेक प्रकारच्या नियंत्रणास लोकांचा विरोध वाढत गेलेला आहे, आणि तें नियंत्रण चालविण्याचा सरकारचा कल कमी होत गेलेला आहे. ह्या गोष्टीची अखेर आतां होऊन गेली आहे असें आपण धरून चाललों तर गोष्ट निराळी; नाहीं तर, असें व्यक्त होतें कीं उद्यमशीलतेची ह्यापुढें जशी ज्यास्त प्रगति होत जाईल, तसे तिच्या बरोबर येणारे हे फेरबदलही वाढत जातील. म्हणजे, एकीकडे, सरकारच्या हुकमांस नागरिक ज्यास्त ज्यास्त विरोध करूं लागतील; आणि दुसरीकडे, हुकूम सोडण्याची सरकारची प्रवृत्ति ज्यास्त ज्यास्त कमी होत जाईल. जरी आलीकडे युद्धशीलतेस पुनः जोर आल्यामुळें, सरकारचें नियंत्रण वाढत गेलें आहे, तरी ही प्रतिक्रियेची तत्पुरती लाट आहे असें म्हणतां येईल. आपणास अशी आशा करण्यास हरकत नाहीं कीं, हल्लींची पीछेहाटीची चळवळ बंद झाली आणि अबाधित उद्यमशील प्रगति पुनः सुरू झाली, म्हणजे, सरकारच्या कर्तव्यांचें जें आकुंचन सुधारणेच्या आलीकडील पायऱ्यांवर निःसंशय होत गेलेलें आहे तें पुनः सुरू होईल; आणि हल्लीं जरी विरुद्ध चिन्हें दिसतात तरी, वर दाखविलेली मर्यादा प्राप्त होईतोंपावेतों तें चालू राहील.

राजकीय व्यापारांचा टापू जसजसा ज्यास्त आकुंचित होत गेला आहे, तसतशा राजकीय संस्था लोकरक्षण करण्याच्या व्यापारास ज्यास्त ज्यास्त योग्य होत होत गेल्या आहेत, आणि त्या तें काम ज्यास्त ज्यास्त चांगल्या रीतीनें करूं लागल्या आहेत. पूर्ण युद्धशीलतेच्या अमदानींत जोंपावेतों सगळ्या समाजाचें मिळून अन्य समाजांपासून रक्षण करणेंच अत्यन्त जरूरीचें असे, तेव्हां समाजघटकव्यक्तींचें परस्परकृत नाशापासून किंवा नुकसानापासून संरक्षण करण्याबद्दल फारशी परवा करीत नसत; आणि जी कांहीं थोडीफार करीत असत ती सगळ्या समाजाची शक्ति कायम रहावी, व लढाईच्या कामीं तो तयार रहावा, ह्यासाठीं करीत असत. पण ज्या फेरबदलांमुळें त्यावेळीं सरकार करीत असलेलें इतके व्यापार नाहींसे झालेले आहेत, त्याच फेरबदलांमुळें हा जो मुख्य व कायमचा राजकीय व्यापार तो फार वाढून गेला आहे. जीवित व वित्त ह्यांचें रक्षण करणारी घटना ज्यास्त ज्यास्त वाकबगार होत गेली आहे; आणि ह्यास कारण आमचें रक्षण खात्रीपूर्वक करा अशी लोकांची ज्यास्त ज्यास्त मागणी हें जसें झालें आहे, तसें तें करण्याची सरकारची ज्यास्त ज्यास्त तयारी हेंही झालेलें आहे. आपल्या ह्या काळांत न्याय करण्यासाठीं ज्यास्त ज्यास्त व्यवस्था होत असल्यामुळें, आणि कायद्यांस व्यवस्थित बाडांचें स्वरूप देण्याची सरकारची इच्छा वाढत असल्यामुळें, ह्या दिशेनें उघड उघड प्रगति दिसत आहे; आणि हल्लीं सरकार जसें नागरिकाचा देह रक्षण्याचें आणि त्याच्यावर कोणीं अन्यायानें हल्ला के-

त्यास त्यास शिक्षा करण्याचें काम, त्याच्यावर खर्च न लादतां, करण्याचें पत्करितें, तसा त्यास दिवाणी न्याय देण्याचें जेव्हां पत्करील तेव्हां ही प्रगति पुरी होईल.

आणि ह्याबरोबरच दुसरा सिद्धान्त असा निघतो कीं वरच्या गोष्टीबरोबरच, उद्यमशीलतेच्या दृष्ट्या अत्यन्त व्यवस्थित बनलेल्या समाजांत जो एक विशेष दृष्टीस पडतो तो ज्यास्त वाढत जाईल; तो विशेष हा कीं, ज्या घटनांचीं सरकारची खातीं बनलेलीं आहेत त्यांव्यतिरिक्त घटनांकडून ज्यास्त ज्यास्त महत्त्वाचीं कामें होऊं लागतील. साहेब म्हणतात, आमच्या समाजांत अगोदरच नागरिकांच्या बनलेल्या व्यवस्थित मंडळ्यांच्या द्वारा एवढालीं प्रचंड व बिकट कामें व्हावयास लागलीं आहेत कीं तीं अशांच्या हातून होतील हें प्राथमिक समाजांच्या स्वप्नींही नव्हतें; आणि ज्या गोष्टी अशांच्या हातून होतील असें हल्लीं कोणाच्या स्वप्नींही नाहीं, अशा गोष्टी पुढें होऊं लागतील.

१५०. प्रत्यक्ष व्यवहारांशीं फार महत्त्वाचे संबंध असलेला असा एक वरील सिद्धान्तावरून निघणारा पोटसिद्धान्त एथें निरूपिला पाहिजे. वर दाखविलेलें रूपान्तर ज्या अनेक फेरबदलांचें मिळून बनलेलें आहे त्या कांहीं ठराविक प्रमाणांनींच एकमेकांशीं संयुक्त झाल्या पाहिजेत; आणि त्यांच्यांतही जर नियमित प्रमाणें न राहिलीं तर खचीतच नुकसान होण्याचा संभव आहे. त्या फेरबदलांचा एकमेकांशीं आणि नागरिकांच्या शीलांशीं कांहींएक योग्य संबंध आहे, आणि त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यास नुकसान झाल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं.

कागदी घटनांवर आतां कोणी विश्वास ठेवीत नाहीं, निदान सुशिक्षित लोक तरी ठेवीत नाहींत. घटकांच्या शीलांवरून घटितसमूहाचें शील ठरत असतें हें व्यापक सत्य जरी अद्यापि उघडपणें व पूर्णपणें कबूल झालेलें नाहीं, तरी कांहीं अंशीं तरी कबूल झालेलें—म्हणजे, इतक्या अंशानें कबूल झालेलें—आहे कीं, ह्या किंवा त्या प्रकारच्या कायद्यांनीं एखाद्या समाजाची स्थिति एकदम पूर्णपणें बदलतां येईल अशी आशा राजकीय शिक्षण अतिशय चांगलें मिळालेले लोक हल्लीं करीत नाहींत. पण हें सत्य पूर्णपणें मान्य केलें म्हणजे त्यावरून अवश्यमेव असा सिद्धांत निघतो कीं, नागरिकांचीं शीलें ज्या वेगानें बदलतात त्याहून ज्यास्त वेगानें राजकीय संस्था फलदायक रीतीनें बदलतां येणार नाहींत; आणि जर कांहीं आकस्मिक रीतीनें ज्यास्त प्रमाणावर बदलल्या तर हा फाजील बदल कांहीं उलट दिशेनें बदल होऊन निष्फल होईल. फ्रान्सांतल्याप्रमाणें स्वातंत्र्याचें शिक्षण न मिळालेले लोक जेव्हां राजकीय दृष्ट्या एकदम स्वतंत्र केले जातात, तेव्हां कांहीं तरी मत देऊन लोक आपली सत्ता खुशीनें एखाद्या स्वेच्छाचारी शास्त्याच्या हवालीं करितात, किंवा ते आपली पार्लमेंतीय घटना अशा रीतीनें चालवितात कीं, एखाद्या लोकप्रिय मुत्सद्यास आपल्यावर हुकूम सोडणारा बनवितात. लोकसत्ताक संस्था जेव्हां हळूहळू उत्क्रान्त होण्याच्या ऐवजीं, युनैटेड्स्टेट्स्‌मध्यें झाल्या त्याप्रमाणें एकदम निर्माण केल्या जातात, तेव्हां त्यांच्यांत अडून दोऱ्या ओढणारे राजकारणी लोक उत्पन्न होतात, आणि एकंदर लोकांचें

नांवाचें शासन धाब्यावर बसवून खरा कारभार आपल्या हातांत घेतात. इंग्लंदांत सुमारें वीस वर्षांपूर्वी झालें त्याप्रमाणें जेव्हां मतदानाचा अधिकार एकदां पूर्वीपेक्षां ज्यास्त लोकांच्या हातांत देऊन पुनः लवकरच आणखी लोकांना देतात, तेव्हां हे लोक एकाद्या राजकारणी लोकांच्या प्रबल मंडळाच्या जाळ्यांत सांपडतात, आणि मग हें मंडळ त्यांनीं निवडण्यासाठीं उमेदवार कोणीं व्हावयाचें हें ठरवितें, आणि कोणते कायदे पास करावयाचे हेंही ठरवितें. एवंच, माणसाचें शील राजकीय घटनांस योग्य बनलेलें नसल्यास ते एका दिशेनें मिळविलेलें स्वातंत्र्य दुसऱ्या दिशेनें गमावून टाकितात.

शील आणि संस्था ह्यांच्यामध्यें जसा हा नियमित संबंध आहे, तसाच संस्थासंस्थांमध्येंही आहे; आणि ह्या संबंधाकडे दुर्लक्ष केल्यास वरच्यासारखेच दुष्परिणाम घडून येतात. म्हणजे, एका दिशेनें लोकांचें दास्य कमी झाल्यास तें दुसऱ्या दिशेनें वाढतें. व्यक्तीवरील जुलूम इकडे सइलावला तर तिकडे ज्यास्त घट्ट होतो. उदारणार्थ, उद्यमशीलता वाढत जाऊन स्वैच्छिक सहकार्याच्या उत्पत्तीबरोबर जे न्याय्यसंबंध लोकांमध्यें उत्पन्न होतात त्यांच्याबरोबरच राजकीय घटना ज्यास्त लोकायत्त होऊन त्यांचे व्यापार ज्यास्त मर्यादित झाले पाहिजेत. कारण त्या ज्यास्त लोकसत्ताक होऊन त्यांनीं करावयाचीं कामें जर कमी झालीं नाहींत, तर त्यापासून उच्चतरांचें नुकसान होऊन नीचतरांचा फायदा व्हावा अशा व्यवस्था उत्पन्न होतात; आणि त्या लोकांची उन्नति न करतां अवनतिच करूं लागतात. सामान्यतः

व्यक्तींच्या मनावर परार्थापेक्षां स्वार्थाचाच पगडा ज्यास्त असल्यामुळें, प्रत्यक्ष अन्याय न करण्याइतकें त्यांचे मनोभाव शुद्ध असले तरी ते अप्रत्यक्ष अन्याय करण्यास प्रवृत्त होतात. आणि ज्या अर्थी बहुजन हा नेहमीं हलक्या लोकाचांच बनलेला असला पाहिजे, त्या अर्थी कायद्यांचा टापू जर आकुंचित केलेला नसला तर लोक कायद्यांस, कमज्यास्त अप्रत्यक्षरीत्या आपला फायदा व्हावा व आपल्यापेक्षां उच्चतरांचें नुकसान व्हावें असें रूप देतील. धंदेवाले लोकांचीं जीं मंडळें बनलीं आहेत त्यांच्या धोरणाकडे पाहतां हें सत्य लक्षांत येतें. त्यांनीं असे परिपाठ सुरू केले आहेत कीं, ज्यास्त उत्साहानें व हुशारीनें जे काम करितील त्यांस त्याबद्दल पूर्ण फायदा मिळूं नये; कारण त्यांनीं तसें केल्यास ह्या रूढी पाडणारे व जोरानें अंमलांत आणणारे जे बहुजन त्यांची अब्रू जाईल व नुकसान होईल. म्हणून सर्व लोकांस राजकीय बाबतींत सारखे अधिकार असून राजकीय घटनांचा उपयोग न्याय देण्याव्यतिरिक्त कामीं जर होत असेल, तर हीच प्रवृत्ति त्यांच्यामध्येंही अनेक तऱ्हांनीं उत्पन्न झालीच पाहिजे. ज्यांस त्यांच्या ज्यास्त सामर्थ्यामुळें ज्यास्त पैसे मिळाले आहेत त्यांच्यावर योग्याहून ज्यास्त कर लादून राज्यकारभाराचीं यंत्रें चालविल्यास तीं कमी सामर्थ्याच्या नागरिकांस त्यांच्या योग्यतेपेक्षां ज्यास्त फायदे करून देतील. आणि अधिक वाईटांच्या फायद्यासाठीं अधिक चांगल्यावर असें ओझें लादिल्यानें उच्चतर व योग्यतर असा मनुष्यस्वभाव उत्क्रान्त होण्यास अडथळा झालाच पाहिजे. ह्याचा अखेर परि-

णाम असा होईल कीं जो समाज शुद्ध न्यायाचें धोरण ठेवितो त्याच्याशीं, इतर गोष्टी समान असल्यास, ह्या समाजास बरोबरी करण्याच्या कामीं हार येईल, आणि अखेरीस सुधारणेच्या शर्यतींत हा समाज अगदीं मागें पडेल, किंवा नष्ट होईल.

सारांश, राजकीय व्यापार मर्यादित न करतां राजकीय सत्ता पुष्कळ लोकांच्या हातीं दिल्यास जीस सोश्यालिझम म्हणतात तिची उत्पत्ति झालीच पाहिजे. म्हणजे पूर्वी जे थोडे लोक पुष्कळ लोकांस प्रत्यक्षरीत्या लुबाडीत होते त्याऐवजीं आतां अप्रत्यक्षरीत्या पुष्कळ लोक थोडद्या लोकांस लुबाडूं लागतील. सारांश दोन्ही ठिकाणीं अन्यायाच्या मानानें अनर्थ हा ओढवलाच पाहिजे.

१५१. पण ह्या सर्व प्रकारच्या निरनिराळ्या प्रमाणशृंखलांवरून जो अत्यन्त महत्त्वाचा सिद्धान्त निघतो तो हा कीं, राजकीय व सामान्यदृष्ट्या उच्च अशी सामाजिक स्थिति प्राप्त होण्याचा संभव मुख्यत्वेंकरून लढाई बंद होण्यावर अवलंबून आहे. आतांपर्यंत इतकें विवेचन झालेलें असल्यामुळें, युद्धशीलता चालू राहून तिला योग्य अशा संस्था कायम राहिल्यास, त्यांच्याहून ज्यास्त न्याय्य अशा संस्था व कानू करण्याच्या दिशेनें जी हालचाल ती बंद झाली पाहिजे किंवा निष्फळ झाली पाहिजे, हें सत्य पुनः जोरानें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; बरें, कायमची शांतता झाल्यास प्रत्येक प्रकारें सामाजिक स्थिति सुधारत गेलीच पाहिजे हेंही सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

युद्धापासून जें कांहीं मिळावयासारखें होतें तें सर्व

मिळालेलें आहे. विशेष शक्तिमान् व बुद्धिमान् लोकांची पृथ्वीवर चोहोंकडे वस्ती व्हावी, ही गोष्ट बऱ्याच अंशानें साध्य झालेली आहे; आणि जी काय व्हावयाची राहिली आहे ती हळूहळू नष्ट होणाऱ्या रानटी स्थितीवर पसरत जाणाऱ्या उद्यमशील सुधारणेच्या मुकाट्यानें पडणाऱ्या दडपणानें सिद्ध होऊन जाणार आहे. साध्या समूहांचें संकलन होऊन संयुक्तसमूह बनणें, आणि त्यांचे दुबार संयुक्तसमूह बनणें, हें जें लढाईमुळें होऊन गेलें आहे, आणि ज्याच्या योगानें अखेरीस मोठालीं राष्ट्रें उत्पन्न झालेलीं आहेत, तें जितकें होणें इष्ट आहे किंवा शक्य आहे तितकें आधींच होऊन गेलें आहे असें दिसतें. एकमेकांना परकीय अशा लोकांचीं बनलेलीं साम्राज्यें त्यांना एकवटलेलीं ठेवणारें जें जबरीचें नियंत्रण तें कमी झालें म्हणजे बहुधा विस्काळित होतात; आणि जरी तीं एकवटलेलीं ठेवतां आलीं तरी गुण्यागोविंदानें एकत्र व्यवहार करणारीं अशीं तीं एकराष्ट्रें बनत नाहींत; म्हणून त्यांचें आणखी संकलन व्हावयाचें असल्यास, शांत रीतीनें त्यांचीं संयुक्तराष्ट्रें बनणें ह्याच रीतीनें तें होणें शक्य आहे. ज्या राजकीय घटनेस उत्तम लढवय्याच्या नायकीपासून सुरवात होऊन अखेरीस संमिश्र सरकारें व राज्यकारभारसरण्या यांचें स्वरूप आलेलें आहे, त्या घटनेची वाढ करून लढाईनें जो मोठा फायदा करून दिलेला आहे, तो पूर्णपणें प्राप्त झालेला आहे; आणि त्यासंबंधानें भविष्यत्काळीं एवढेंच काम राहिलें आहे कीं त्याचे जे अनावश्यक भाग असतील ते काढून टाकावयाचे, आणि जे आवश्यक असतील त्यांस

योग्य स्वरूप देऊन त्यांचें रक्षण करावयाचें. त्याचप्रमाणें जी उद्यमविषयक घटना लढाईमुळें उत्पन्न झाली, आणि जीस मालक व गुलाम ह्या रूपानें प्रारंभ होऊन, आणि पुढें धनी व चाकर हें स्वरूप येऊन, जिच्यापासून अनेक उद्यमविषयक रचना आणि मुख्य व्यवस्थापकांपासून (डायरेक्टरांपासून) तों कामकऱ्यांवर देखरेख ठेवणारे (फोरमन) लोकांपर्यंत कामगारांच्या अनेक पायऱ्या उत्पन्न झाल्या आहेत, ती घटना संयुक्तक्रियेस जरूर तितकी पूर्ण दशेस आलेली आहे; आणि तिच्यांत जी ह्यापुढें सुधारणा व्हावयास पाहिजे ती लष्करी पद्धतीच्या अंकितपणाच्या दिशेनें नव्हे, तर उलट दिशेनें होय. तद्वतच, सारखें लक्ष लावून कोणतीही गोष्ट करण्याची जी शक्ति रानटयांत नसते, आणि युद्धशील नमुन्याच्या समाजामध्यें जें जबरीनें वळण लावीत असतात त्यामुळेंच जी प्राप्त होण्यासारखी असते, ती सुधारलेल्या माणसानें आधींच बरीच प्राप्त करून घेतलेली आहे; आणि तिची जी आणखी कांहीं वाढ व्हावयास पाहिजे आहे, ती स्वतंत्र समाजांतून चढाओढीच्या ताणाखालीं उत्पन्न होऊं शकेल. मोठालीं सार्वजनिक कामें आणि पुढच्या पायरीवरच्या उद्यमविषयक कला ह्यांचीही गोष्ट अशीच आहे. एथॉसच्या संयोगभूमींतून पश्र्यन लोकांनीं केलेल्या कालव्याकडे पाहतां, आणि फीजीयन लोकांनीं केलेल्या दोन मैल लांबीच्या कालव्याकडे पाहतां, जरी लढाई अशीं मोठालीं कामें करण्यास माणसांस प्रवृत्त कशी करिते, आणि तिजमुळें उत्पन्न झालेलें स्वेच्छाचारी शासन हीं कामें करण्यास जरूरीचें कसें

असतें, ह्या दोन्ही गोष्टी दिसतात, तरी आपल्यास हेंही दिसतें कीं उद्यमविषयक उत्क्रमण आतां अशा पायरीवर जाऊन पोहोंचलें आहे कीं ह्यांच्याहूनही फार मोठीं व पुष्कळ कामें करण्यास व्यापारदृष्ट्या फायदा एवढेंच उत्तेजक पुरें आहे, आणि खासगी व्यापारीमंडळ्या ह्या संस्थाही पुरे आहेत. आणि पूर्वीं दगडांच्या चिपा पाडून त्यांचे बाण करीत व गदा कोरून तयार करीत, तेव्हांपासून हल्लींच्या लढाऊ गलबतांच्या एक फूट जाडीच्या पत्र्यांच्या कालापर्यंत, स्वसंरक्षण व पराक्रम हींच जरी नवे नवे शोध व यांत्रिकचातुर्यवृद्धि ह्यांस कारणीभूत झालेलीं आहेत तरी, हल्लींच्याच काळचें वाफेनें व पाण्याच्या शक्तीनें चालणारे घण, टेलिग्राफ, टेलिफोन, इत्यादि अनेक यंत्रें, यांकडे पाहतां असें सिद्ध होतें कीं, उद्यमविषयक कलांची ह्यापुढें आणखी वृद्धि होण्यास उद्यमविषयक गरजा हेंच पुरेसें उत्तेजक होणार आहे. एवंच, निरनिराळ्या समाजांचे एकमेकांशीं झगडे होऊन जें सामाजिक उत्क्रमण करून घ्यावयाचें होतें तें अगोदरच होऊन गेलेलें आहे; आणि त्या झगड्यांपासून आणखी फायदे होण्याचा संभव दिसत नाहीं.

सुधारलेल्या राष्ट्रांतून युद्धशीलता चालू राहिल्यास नुकसानच होण्याचा संभव आहे. एकंदर गत प्रकरणांवरून जो धडा शिकावयाचा तो हा कीं ह्या सरणीनें राष्ट्रें संकलित, व्यवस्थित आणि सुशिक्षित झालेलीं असल्यामुळें जरी ती अत्यावश्यक होती, आणि मानवी स्वभावाच्या कांहीं विशेषांची वाढ होण्यास तिजमध्यें येणारी जबरी जरी जरूरीची होती, तरी तिजपासून लो-

कांस प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या कल्पना करवत नाहीं इतके हाल सोसावे लागले आहेत; आणि हे हाल त्या सरणीस जरूर अशा राजकीय संस्थांच्या स्वरूपांमुळें, आणि त्याप्रमाणेंच त्याबरोबर उत्पन्न झालेल्या मानवी स्वभावाच्या नमुन्यामुळें झालेले आहेत. आणि त्यांजवरून असेंही व्यक्त होतें कीं, हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हाल कमी होण्यास जी एक गोष्ट आवश्यक आहे ती ही कीं, राष्ट्रांराष्ट्रांचे विरोध कमी करणें आणि त्या विरोधांचें कारण व कार्य असे जे त्यांचे फौजफांटे तेही कमी करणें. लष्करी चळवळींस जसजसा आळाबंदा पडेल, आणि लष्करी घटना जसजशा क्षीण होत जातील, तसतशीच इतर सर्व संस्थाप्रमाणें राजकीय संस्थांचीही सुधारणा होणार आहे. आणि ह्या गोष्टी झाल्याखेरीज असल्या सुधारणा कायमच्या होणें शक्य नाहीं. केवळ नांवाची व आकाराची स्वतंत्रता बाहेरून प्राप्त झाल्यास ती आंतून वस्तुतःनष्ट होऊन जाईल.

तथापि हें सत्य अत्यंत स्पष्टपणानें सिद्ध केलें तरी—फार तर काय, पण अगदीं संशय रहावयाचा नाहीं अशा रीतीनें सिद्ध केलें तरी—त्यापासून फार ठळक असे कांहीं परिणाम उत्पन्न होतील अशी आशा करतां येत नाहीं. कोणत्याही वेळीं परिस्थितीवरून आवश्यक झालेली सामाजिक स्थिति आणि राजकीय व व्यक्तिविषयक वर्तनाच्या संमत कल्पना, ह्यांमध्यें सामान्य मेळ नेहमीं असावा लागतो. तात्कालिक गरजांशीं विसंगत अशा मतांचें कोणीं ग्रहण केल्यास, तें एक नांवाचेंच असणार, किंवा मर्यादित असणार, किंवा नांवाचें व मर्यादित असें

दोन्ही प्रकारचें असणार. ज्या कल्पना सार्वजनिक व खासगी वर्तनाच्या सामान्य सरण्यांशीं सुसंगत असतील त्या विचारदृष्ट्या कितीही लंगड्या असल्या तरी त्याच लोक कबूल करितात व त्यांचाच वर्तनावर परिणाम घडत असतो. म्हणून सध्यांच्या काळच्या फार पुढच्या मताचें प्रसरण करून एवढेंच करणें शक्य आहे कीं, ज्या शक्ति प्रगति होण्यास अनुकूल असतील त्यांच्या कार्यास मदत करावयाची. तेणेंकरून त्या शक्तींस ज्यास्त जोर आणून देतां येईल असें मुळींच नाहीं, तर त्या भलत्याच दिशेनें खर्च होऊं नयेत ह्या गोष्टीस मदत करतां येईल. हल्लींपेक्षां उच्चतर स्थिति प्राप्त व्हावी असें ज्या लोकांस वाटत असतें त्यांपैकीं कांहीं लोक (आणि हल्लीं तर बरेच लोक) ह्या किंवा त्या प्रकारच्या सरकारी संस्था नव्या उत्पन्न करून लोकांचें कल्याण करूं पाहतात. तेणेंकरून लोकांचें तात्काल कल्याण होईल असें ह्या लोकांस वाटत असल्यामुळें, ह्या आपल्या करण्यानें उच्चतर स्थितीला पाहिजेत त्यांशीं विसंगत अशा सामाजिक संस्था आपण वाढवीत आहों, आणि अशा रीतीनें त्या स्थितीच्या प्राप्तीच्या मार्गांतील अडचणी ज्यास्त करीत आहों, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अशा लोकांपैकीं कांहींच्या मनावर गत प्रकरणांचा कदाचित् कांहीं परिणाम होईल, आणि आपण लोककल्याणार्थ ज्या व्यवस्था करा म्हणून म्हणत आहों त्यांचा कल लष्करी नमुन्यास योग्य असें सार्वजनिक शासन वाढविण्याकडे आहे, किंवा उद्यमशील नमुन्यास योग्य असें व्यक्तित्व आणि स्वैच्छिक सहकार्य ज्यास्त ज्यास्त उत्पन्न करण्या-

कडे आहे, ह्याचा विचार त्यांस करावासा वाटेल. सारांश, वेडेपणाच्या उत्सुकतेपासून होणारें जें लोकांचें नुकसान त्यापासून एकाद दुसरा माणूस निवृत्त व्हावा इतकाच प्रस्तुत ग्रंथापासून तात्कालिक परिणाम होईलसें वाटतें; ह्याहून ज्यास्त आशा करतां येत नाहीं.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८५	६	समाजाच्या मध्यें	समाजाच्या
९७	२४	वेषाचे	पेशाचे
९९	२२	दर्जानें	दर्जाचे
१०५	६	येथें	जेथें
१०७	१२	ज्यास्त व	ज्यास्तच
१०९	१	जनन	अभिजातजनन
,,	३	" कारण	कारण
१२७	२४--२५	बायकांना	नायकांना
११९	३	बिटाने जिमॉट	बिटानेजिमॉट
१४०	११	सगळयाच्या	सगळया
१५०	१७	बायकांमध्यें	नायकांमध्यें
१९६	१४	असतात,	असल्यास
२११	१८	मेहॉब	मेहॉन
२१७	१६	तेथें	जेथें
२२०	१०	भरावें.	भरावें
२२२	१४	ढोकळच	ठोकळ
२३०	१७	आक्ट	आबट
२३१	२५	केल्यामुळें	केल्यामुळें,
२३३	२	मोगलीं	मोठालीं
२३४	१	जमावामुळें	अभावामुळें
,,	६	उरलेलें	ठरलेलें
२४१	२	पडलें	पडतें

२४७	१६	हर्ली	हार्डी
२५६	२६	झाली	झाली.
२६७	४	होतें;	असतें;
२७०	२०	नियंत्रणांत	निमंत्रणांत
२७४	१५	नखुशीनें	नाखुशीनें
२८२	२०-२१	वायकांचा	नायकांचा
२८२	२३	मोगले	मोठाले
२९२	१४	संस्थांचाही	संस्थानांही
२९८	२०	लिव्हिंग्न	लिव्हिंग्स्टन
३००	५	लोकांतील	लोकांतही
३१०	१८	उरूं	ठरूं
३१२	२३	करणाराच	करणारांचा
३२२	८	मनुष्याचे	मनुष्यांचे
३२६	१०	त्यास	त्यांस
३३३	२१	डेव्हिच्या	डेव्हिडच्या
३६४	१३	असेल	आलेलें असेल
४११	१७	वेळीं,	वेळीं.
४१३	२	लागतात,	लागतात.
४२३	६	लादणारा	लादणार
४२५	५-६	विरोध	विरोध.
४२८	८	करणाऱ्याकडे	करण्याकडे
४३३	१६	तस्तूद	तरतूद
४४१	२४	टेंबर	टैवर
४६८	९	करतांता	करतांना
४७६	११	कार्य	कार्य होण्यास
५१९	१५	क्रियेचा	संयुक्त क्रियेचा
५२२	२	इष्ट	करणें इष्ट
५३९	१४	जरा	जर
५४१	५	संस्कारी	सरकारी